म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
स. नं. ६१४
१८५४३

# सरदार परशुरामभाऊ पटवर्धन

" तलवार विश्वासाची त्या परशुरामपंत भाऊंची "

( खड्यांच्या लढाईचा पोवाडा, पा. २३२. शाहीर–अप्पा येशवंत )

लेखक

सखाराम अच्युत सहस्रबुद्धे



चैत्र शु० १ शके १८७५

६ मार्च १९५३

REFBK-0008043
REFBK-0008043

मूल्य ६ रुपये.

१९८३५
२८।८।५३

ग्रं. नं.
१९८३५
२८।८।५३

श्री.

# सरदार परशुरामभाऊ पटवर्धन

" तलवार विश्वासाची त्या परशुरामपंत भाऊंची "

( खर्ड्याच्या लढाईचा पोवाडा, पा. २३२. शाहीर-अप्पा येशवंत )

लेखक

## सखाराम अच्युत सहस्रबुद्धे



REFBK-0008043

मूल्य ६ रुपये.

: प्रकाशक :

बलवंत संस्था
रत्नागिरी.

प्रथमावृत्ति
मार्च १९५३

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

: मुद्रक :

मो. दि. जोशी
बी. ए. एल्एल्. बी.
बलवंत मुद्रणालय, रत्नागिरी.

# निवेदन

सरदार परशुरामभाऊ पटवर्धन यांचें चरित्र आज हातानिराळें होऊन प्रसिद्ध होत आहे त्याबद्दल आनंद वाटतो. प्रस्तुत चरित्र माझे हातून पुरें होण्याला जी विशिष्ट परिस्थिति कारणीभूत झाली तिचा उल्लेख आरंभींच केला पाहिजे. सांगलीच्या बाजूचे श्री. लागू नांवाचे गृहस्थ पटवर्धन-चरित्रमाला लिहिण्याच्या उद्योगांत होते. त्यांनीं गोपाळराव पटवर्धन व पुरुषोत्तमराव दाजी पटवर्धन यांचीं चरित्रें लिहिलीं आहेत. परशुरामभाऊंचें चरित्र त्यांनीं लिहिण्यास घेतलें होतें व ७०।८० बंद लिहून काढले होते. पण दुर्दैवानें हे लागू अकस्मात मरण पावले. त्यांनीं लिहिलेले हे ७०।८० बंद पुण्याच्या भा. इ सं. मंडळाचे आजीव सेवक श्री० शंकरराव जोशी यांनीं माझ्याकडे पाठविले व ' हें चरित्र पुरें करतां आलें तर पहा," म्हणून सांगितलें. अशा परिस्थितींत हें चरित्र मी लिहावयास घेतलें व तें आज पुरें होत आहे. लागूंच्या हस्त लिखितांत परशुरामभाऊंच्या पूर्व वृत्तान्तासंबंधानेंच जास्त माहिती होती व ती थोडीशी विस्तृतहि होती आणि त्यांतली बरीच माहिती गोपाळराव आणि पुरुषोत्तमराव दाजी यांच्या चरित्रांत आलेलीहि होती. म्हणून मी लागूंचें हस्तलिखित अजिबात बाजूला ठेवून पहिल्या प्रकरणापासूनच लिहिण्यास सुरवात केली व लागूंच्या विस्तृत लिखाणांत छाटाछाट करून पूर्ववृत्तान्ताचीं नवीन प्रकरणें लिहिलीं. चवथ्या प्रकरणापासून मात्र सर्व माहिती मी गोळा केली आहे. तथापि येथें हें सांगणें जरूर आहे कीं, लागूंचें हस्तलिखित जर माझेकडे आलें नसतें तर हा चरित्र ग्रंथ मी लिहिण्यास घेतलाच असता असें म्हणतां येत नाहीं. अशा रीतीनें हा ग्रंथ एक हातीं व एक टाकी झाला असला तरी लागूंच्या हस्तलिखिताच्या प्रेरणेमुळेंच तो झाला आहे असें म्हणणें प्राप्त आहे.

प्रस्तुत चरित्रग्रंथ मुख्यतः कै. खरे शास्त्री यांच्या ऐ. लेखसंग्रहावरच आधारलेला आहे. इतर उपलब्ध माहितीचाहि उपयोग केला आहे. पण या ग्रंथाला अलीकडेच उपलब्ध झालेल्या पुना रेसेडन्सी रेकॉर्डमधल्या समकालीन इंग्रजी पत्रव्यवहाराचा भरपूर आधार घेतला आहे व या ग्रंथाचा हा विशेष आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. खरेशास्त्री यांनीं प्रसिद्ध केलेलें पटवर्धनी दप्तर हें एकतर्फी असें कांहीं इतिहास संशोधकांचें म्हणणें आहे. पण पुना रेसेडन्सी रेकार्डस् संबंधानें असें म्हणतां येणार नाहीं.

या इंग्रजी पत्र व्यवहारावरून खरे शास्त्री यांनीं काढलेलीं अनुमानेंच अधिक दृढ होतात हें या ग्रंथावरून दिसून येणार आहे.

ग्रंथ लिहून झाला खरा; पण एवढा मोठा ग्रंथ हल्लींच्या महागाईच्या काळांत छापून काढणें ग्रंथकाराच्या आटोक्याबाहेरचेंच काम होतें, आणि ग्रंथकार स्वत: मुंबई सोडून पेन्शन घेऊन आपल्या कोतवडें गांवीं रहाण्यास आल्यावर हें ग्रंथ प्रकाशनाचें कार्य जवळ जवळ स्थगित झाल्यासारखेंच होतें. पण रत्नागिरीच्या **'बलवन्त' प्रेसचे** उत्साही आणि धडाधडीचे मालक श्री. गजाननराव पटवर्धन यांनीं हें कार्य हौसेनें अंगावर घेऊन शक्य तितक्या लवकर तें पुरें केलें याबद्दल त्यांस धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच आहेत. छपाईकरतां सुवाच्य हस्तलिखित तयार करण्याचें कार्य मुंबईचे आमचे स्नेही श्री वामनराव ताम्हनकर व पुंडोपंत जोशी यांनींच प्रामुख्यानें केलें असल्यामुळें ग्रंथकार त्यांचा ऋणि आहे. तसेंच मुद्रितें तपासण्याचें काम रत्नागिरीचे सुप्रसिद्ध वकील व आमचे स्नेही श्री. वासुदेवराव जोग यांनीं मोठ्या आपुलकीनें केलें त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

या ग्रंथाचें सर्वांत मोठें भाग्य म्हणजे या ग्रंथाला केसरीचे विश्वस्त व माजी संपादक आणि महाराष्ट्रांतील एक तपस्वी विद्वान् श्री. **तात्यासाहेब करंदीकर** यांची १६ पानी प्रस्तावना लाभली आहे. श्री तात्यासाहेबांना विनंति करतांच त्यांनीं प्रस्तावना लिहिण्याचें मान्य करून ती शक्य तितक्या लवकर लिहून पाठविली याबद्दल ग्रंथकाराजवळ त्यांचे आभार मानण्यास शब्द अपुरे आहेत. त्याचप्रमाणें 'बलवंत' मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्री. वा. वि. गांधी यांनीं फार मेहनत घेऊन ग्रंथाची छपाई उत्कृष्टपणें करून दिली आणि श्री. केशवराव उर्फ आप्पासाहेब दामले रिटायर्ड मामलेदार यांनीं ज्या विशेष सूचना केल्या व आपुलकीनें सातत्यानें मदत केली त्याबद्दल आणि ग्रंथ-रचना होण्याचें स्फूर्तिस्थान आरंभीं उल्लेखिलेले कै. लागू व कै. खरेशास्त्री यांचे आभार मी ज्या शब्दांत मानावेत ते शद्ब थोडेच होतील. त्याचप्रमाणें मुंबई ग्रंथसंग्रहालयाचे चिटणीस श्री. भट यांनीं वेळोवेळीं आधारग्रंथ पुरविल्यामुळें त्यांचाही ग्रंथकार आभारी आहे.

अशा रीतीनें ग्रंथ तयार होऊन तो वाचकांच्या हातीं देण्यास आनंद होत आहे. महाराष्ट्रीय वाचकवर्ग गुणग्राहक वृत्तीनें आमच्या या कृतीचें कौतुक करून श्रमांचें चीज करील अशी आशा आहे.

माघ व।। १३ महाशिवरात्रि शके १८७४

कोतवडें ( धामेळें )<br>
ता. १२-२-५३

**सखाराम अच्युत सहस्रबुद्धे**

प्रस्तावना

९२८३५ २८।८।७३

# नेकीचे पराक्रमी सरदार परशुरामभाऊ

सरदार परशुरामभाऊ पटवर्धन यांचें एक चरित्र श्रीयुत निगुडकर यांनीं गेल्या शतकांतच प्रसिद्ध केलें होतें. त्यावेळीं इतिहास–संशोधनाला प्रारंभहि नव्हता आणि इतिहास लेखनाचीं साधनें अत्यंत अपुरीं होतीं. अशा परिस्थितींतहि श्रीयुत निगुडकर यांनीं जें चरित्रलेखन केलें तें पुष्कळच बऱ्यापैकीं होतें. त्यानंतर खरेशास्त्री यांचे ऐतिहासिक लेखसंग्रह छापून बाहेर पडूं लागले आणि त्यांतून अस्सल पत्रव्यवहार वाचावयास मिळाला. त्यानंतर पेशवे दप्तरांतील कागदपत्रांचे अनेक खंड प्रसिद्ध झाले आणि अगदीं अलीकडे **'पुणें रेसिडेन्सी रेकॉर्डस्'** मधील महत्वाचीं पत्रें छापलीं गेलीं आहेत. इतकी नवी सामुग्री उपलब्ध झाल्यामुळें त्या नव्या माहितीची जुळणी करून **श्री. सखाराम अच्युत सहस्रबुद्धे** यांनीं हें प्रस्तुतचें **सरदार परशुरामभाऊ पटवर्धन** यांचें चरित्रलेखन केलें आहे.

देशवाईंत सरदारांचीं जीं अनेक घराणीं उदयाला आलीं आणि ज्यांच्या पराक्रमाच्या आधारावर पेशवाईचा डोलारा डौलानें डोलत राहिला त्यांत पटवर्धनांचें घराणें अनेक दृष्टींनीं विशेष नांवाजण्याजोगें आहे. उत्तरेकडे जशी होळकर, शिंदे, पवार यांच्या पराक्रमानें मराठेशाहीच्या अंमलाची लाट दिल्लीला जाऊन थडकली तशीच दक्षिणेकडे ती लाट श्रीरंगपट्टणला जाऊन थडकली. पेशवाईचा दक्षिण हिंदुस्थानांत जो प्रभाव पडला त्या यशाचे पटवर्धन सरदार हे प्रमुख मानकरी होत. उत्तरेकडील मोहिमांचा प्रारंभ बाजीराव व चिमाजीअप्पा यांच्या खास देखरेखीखालीं झाला आणि बाजीराव चिमाजी यांनीं आपल्या मर्दुमकीनें माळव्यांत मराठेशाहीचा भक्कम पाया घातला. त्या पायाच्या आधारावर उत्तरेकडील सरदारांनीं यशोमंदिर उभारलें आणि मराठेशाहीच्या यशाचे झेंडे फडकत ठेवले. या यशोमंदिराला पानपतच्या पराभवानें जबरदस्त धक्का बसला,

या इंग्रजी पत्र व्यवहारावरून खरे शास्त्री यांनीं काढलेलीं अनमानेंच अधिक दृढ होतात हें या ग्रंथावरून दिसून येणार आहे.

ग्रंथ लिहून झाला खरा; पण एवढा मोठा ग्रंथ हल्लींच्या महागाईच्या काळांत छापून काढणें ग्रंथकाराच्या आटोक्याबाहेरचेंच काम होतें, आणि ग्रंथकार स्वतः मुंबई सोडून पेन्शन घेऊन आपल्या कोतवडें गांवीं रहाण्यास आल्यावर हें ग्रथ प्रकाशनाचें कार्य जवळ जवळ स्थगित झाल्यासारखेंच होतें. पण रत्नागिरीच्या '**बलवन्त**' **प्रेसचे** उत्साही आणि धडाधडीचे मालक श्री. गजाननराव पटवर्धन यांनीं हें कार्य हौसेनें अंगावर घेऊन शक्य तितक्या लवकर तें पुरें केलें याबद्दल त्यांस धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच आहेत. छपाईकरतां सुवाच्य हस्तलिखित तयार करण्याचें कार्य मुंबईचे आमचे स्नेही श्री वामनराव ताम्हनकर व पुंडोपंत जोशी यांनींच प्रामुख्यानें केलें असल्यामुळें ग्रंथकार त्यांचा ऋणि आहे. तसेंच मुद्रितें तपासण्याचें काम रत्नागिरीचे सुप्रसिद्ध वकील व आमचे स्नेही श्री. वासुदेवराव जोग यांनीं मोठ्या आपुलकीनें केलें त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

या ग्रंथाचें सर्वांत मोठें भाग्य म्हणजे या ग्रंथाला केसरीचे विश्वस्त व माजी संपादक आणि महाराष्ट्रांतील एक तपस्वी विद्वान् श्री. **तात्यासाहेब करंदीकर** यांची १६ पानी प्रस्तावना लाभली आहे. श्री तात्यासाहेबांना विनंति करतांच त्यांनीं प्रस्तावना लिहिण्याचें मान्य करून ती शक्य तितक्या लवकर लिहून पाठविली याबद्दल ग्रंथकाराजवळ त्यांचे आभार मानण्यास शब्द अपुरे आहेत. त्याचप्रमाणें 'बलवंत' मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्री. वा. वि. गांधी यांनीं फार मेहनत घेऊन ग्रंथाची छपाई उत्कृष्टपणें करून दिली आणि श्री. केशवराव उर्फ आप्पासाहेब दामले रिटायर्ड मामलेदार यांनीं ज्या विशेष सूचना केल्या व आपुलकीनें सातत्यानें मदत केली त्याबद्दल आणि ग्रंथ-रचना होण्याचें स्फूर्तिस्थान आरंभीं उल्लेखिलेले कै. लागू व कै. खरेशास्त्री यांचे आभार मी ज्या शब्दांत मानावेत ते शद्ब थोडेच होतील. त्याचप्रमाणें मुंबई ग्रंथसंग्रहालयाचे चिटणीस श्री. भट यांनीं वेळोवेळीं आधारग्रंथ पुरविल्यामुळें त्यांचाही ग्रंथकार आभारी आहे.

अशा रीतीनें ग्रंथ तयार होऊन तो वाचकांच्या हातीं देण्यास आनंद होत आहे. महाराष्ट्रीय वाचकवर्ग गुणग्राहक वृत्तीनें आमच्या या कृतीचें कौतुक करून श्रमांचें चोज करील अशी आशा आहे.

माघ व॥ १३ महाशिवरात्रि शके १८७४

कोतवडें ( धामेळें )<br>
ता. १२-२-५३

**सखाराम अच्युत सहस्रबुद्धे**

प्रस्तावना

नं. ९२८३५ २८।८।७३

# नेकीचे पराक्रमी सरदार परशुरामभाऊ

सरदार परशुरामभाऊ पटवर्धन यांचें एक चरित्र श्रीयुत निगुडकर यांनीं गेल्या शतकांतच प्रसिद्ध केलें होतें. त्यावेळीं इतिहास–संशोधनाला प्रारंभहि नव्हता आणि इतिहास लेखनाचीं साधनें अत्यंत अपुरीं होतीं. अशा परिस्थितींतहि श्रीयुत निगुडकर यांनीं जें चरित्रलेखन केलें तें पुष्कळच बऱ्यापैकीं होतें. त्यानंतर खरेशास्त्री यांचे ऐतिहासिक लेखसंग्रह छापून बाहेर पडूं लागले आणि त्यांतून अस्सल पत्रव्यवहार वाचावयास मिळाला. त्यानंतर पेशवे दप्तरांतील कागदपत्रांचे अनेक खंड प्रसिद्ध झाले आणि अगदीं अलीकडे **'पुणें रेसिडेन्सी रेकॉर्डस्'** मधील महत्वाचीं पत्रें छापलीं गेलीं आहेत. इतकी नवी सामुग्री उपलब्ध झाल्यामुळें त्या नव्या माहितीची जुळणी करून **श्री. सखाराम अच्युत सहस्रबुद्धे** यांनीं हें प्रस्तुतचें **सरदार परशुरामभाऊ पटवर्धन** यांचें चरित्रलेखन केलें आहे.

देशवाईंत सरदारांचीं जीं अनेक घराणीं उदयाला आलीं आणि ज्यांच्या पराक्रमाच्या आधारावर पेशवाईचा डोलारा डौलानें डोलत राहिला त्यांत पटवर्धनांचें घराणें अनेक दृष्टींनीं विशेष नांवाजण्याजोगें आहे. उत्तरेकडे जशी होळकर, शिंदे, पवार यांच्या पराक्रमानें मराठेशाहीच्या अंमलाची लाट दिल्लीला जाऊन थडकली तशीच दक्षिणेकडे ती लाट श्रीरंगपट्टणला जाऊन थडकली. पेशवाईचा दक्षिण हिंदुस्थानांत जो प्रभाव पडला त्या यशाचे पटवर्धन सरदार हे प्रमुख मानकरी होत. उत्तरेकडील मोहिमांचा प्रारंभ बाजीराव व चिमाजीअप्पा यांच्या खास देखरेखीखालीं झाला आणि बाजीराव चिमाजी यांनीं आपल्या मर्दुमकीनें माळव्यांत मराठेशाहीचा भक्कम पाया घातला. त्या पायाच्या आधारावर उत्तरेकडील सरदारांनीं यशोमंदिर उभारलें आणि मराठेशाहीच्या यशाचे झेंडे फडकत ठेवले. या यशोमंदिराला पानपतच्या पराभवानें जबरदस्त धक्का बसला,

५८४४९

तथापि माळव्यांतला मूळ पाया पक्का खंबीर असल्यानें पानपतमुळें वरच्या मंदिराची जी पडझड झाली होती ती थोडयाच अवधींत दुरुस्त करण्यांत आली आणि महादजीच्या धोरणी पराक्रमानें मराठेशाहीची छाप पुनश्च दिल्लींत प्रस्थापित झाली. अशा रीतीनें सुखाची भाकरी खाऊन धन्याची चाकरी करावयाची जी सुसंधि उत्तरेकडील सरदारांना मिळाली, तिचा त्यांनी कसा काय उपयोग केला, तो कथाभाग येथे अप्रस्तुत असल्यानें त्याचा विस्तार येथें करीत नाहीं. परंतु उत्तरेकडील सरदार आणि दक्षिणेकडील सरदार यांच्या परिस्थितींत जें महदंतर होतें तें लक्षांत घेऊनच वाचकांनीं दक्षिणेकडील सरदारांत अग्रभागीं चमकणारे जे पटवर्धन सरदार त्यांच्या कामगिरीकडे पहावें, हें सुचविण्याकरितांच उत्तरेकडील परिस्थितीचा ओझरता उल्लेख केला आहे.

पटवर्धनांची सरदारकी ही अशी सुखाची भाकर नसून ती तापल्या तव्यावरची भाकर होती. भाकर काढून घ्यावी तर हाताला चटका बसल्याशिवाय रहावयाचा नाहीं आणि हाताची गय करावी तर भाकरी करपून जाऊन उपासमारीची पाळी यावयाची, अशा दुहेरी अडचणींत अनेक वीरांचे बळी देऊन पटवर्धन सरदारांनीं पेशवाईची दक्षिण बाजू सांभाळली; एवढेंच नव्हे तर तुंगभद्रेपर्यंत तिची खंबीरी पक्की मजबूत करून ठेवली.

पटवर्धनांचें घराणें रामचंद्र हरीच्या पराक्रमानें प्रथम उदयास आलें आणि हा पराक्रमाचा वारसा तीन पिढयांनीं केवळ राखला, एवढेंच नव्हे तर तो मोठयाच उत्कर्षास चढविला. रामचंद्र हरीनें जंजिऱ्याच्या मोहिमेंत वाखाणण्याजोगी फारच मेहनत केली व शिद्दी साताला कंठस्नान घालण्यांत आलें; त्या लढाईंतील पराक्रमाबद्दल त्यास पालखी मिळाली. त्यानंतर वसईच्या मोहिमेंत ठाणें, केळवें, माहीम, तारापूर इत्यादि अनेक ठिकाणच्या झटापटींत रामचंद्र हरीची तलवार चमकली आणि वसईचा दुर्घट दुर्ग हस्तगत करून त्यावर मराठ्यांचें निशाण

 ऊ. ५९४

फडकविण्यांत रामचंद्र हरीचें पाऊल आघाडीवर होतें. मध्यंतरीच्या भाऊबंदकीच्या झगडयांत रामचंद्र हरीच्या पथकानें दमाजी गायकवाडास चांगलाच दम भरून हात दाखविला.

उत्तर हिंदुस्थानांत पेशव्यांच्या फौजा पुनः संचार करूं लागल्या. त्या फौजेंत रामचंद्र हरी मोहिमेवर असतांच शिवराजपूर येथें मृत्यु पावले. वडलांच्या मरणसमयीं प्रस्तुत **चरित्राचे नायक, परशुरामभाऊ** हे केवळ १३ वर्षांचे होते. तथापि घरीं मातुःश्री कडून आणि स्वारी शिकारींत चुलत्याकडून उत्तम शिक्षण मिळवून परशुरामभाऊ हे आपली सरदारकी सांभाळण्याला लायक झाले. तथापि वडीलकीचा मान गोपाळराव यांच्याकडे असल्यानें गोपाळरावाच्या मृत्यूपर्यंत परशुरामभाऊंस त्यांच्या अनुषंगानेंच कामगिरी करावी लागत होती. त्यामुळें १७७० पर्यंत परशुराम भाऊंचा पराक्रम स्वतंत्रपणें डोळयांत भरण्यासारखा नमूद करतां येत नाहीं.

गोपाळरावांची जवामर्दी रामचंद्र हरीच्याहून वरचढ होती. रामचंद्र हरीचा अंत झाल्यावर पटवर्धनांची सरदारकी कोण वरूं शकेल, असा अंदेशा पेशव्यांनीं व्यक्त केल्यावरून गोपाळरावानें पेशव्यांस कळविलें कीं, "एक रामचंद्रपंत गेले तरी आम्हीं पांच-सात असामी रामचंद्रपंतांच्या जागीं आहोंत, **मरून बरें म्हणवूं परंतु पळून स्वामीस तोंड दाखविणार नाहीं.**" गोपाळरावांनीं व्यक्त केलेला हा वीर वृत्तीचा बाणा पटवर्धनानीं तीन पिढया अक्षरशः खरा करून दाखविला. कोणाही पटवर्धन सरदारानें रणांगणांतून पळ काढला नाहीं. अनेकांनीं धारातीर्थीं आपले देह ठेवले. रामचंद्र हरी हे उत्तर हिंदुस्थानांत स्वारीवर असतांना मरण पावले. गोपाळराव हरी हे हैदरावरील खडे स्वारींत मोहीमशीर असतां आजारी पडले आणि घरीं पोंचतात न पोंचतात तोंच त्यांना मृत्युनें गांठलें. त्यांच्या पाठीमागें वामनराव हे राघोबा दादाचा पाठलाग करतां करतां थकून काळाच्या तावडींत सांपडले. पांडुरंगराव हे सावशीच्या लढाईंत

पाडाव झाल्यामुळें हैदराच्या कैदखान्यांतच वारले. कोन्हेरराव हे त्याच लढाईंत सरकारकामास आले. निळकंठराव हे मोतितलावाच्या रणांगणांत तोफेचा गोळा छातीवर बसून गतप्राण झाले! विठ्ठल धोंडदेव हे खर्ड्याच्या लढाईंत पतन पावले. स्वतः परशुरामभाऊ हे पट्टणकुडीच्या लढाईंत जबर जखमी होऊन पडले असतां करवीरकरांच्या हुकमावरून मारले गेले. प्रमुख पुढाऱ्यांची ही नाममालिका झाली. या शिवाय किरकोळ आप्तेष्ट मुख्य सरदाराबरोबर असतच; त्यांची वेगळी नोंद नसली तरी अनेकांनीं मराठेशाहीकरितां आपले प्राण खर्चीं घातले यांत शंकाच नाहीं. मोहिमेवर जाण्याची पाळी आली कीं, पटवर्धन सरदार कामगिरी पत्करण्याला तत्पर असत. आणि मुख्य सरदाराबरोबर त्यांच्या परिवारांतले, वयांत आलेले, अनेक आप्त संबंधी असत. कोठल्याहि स्वारींत झालें तरी पटवर्धनांची फौज आघाडीवर असे. तलाव्यावर जाण्याचें आणि टेहळणी करण्याचें पहिलें धोक्याचें काम पटवर्धनांच्याच वांट्याला येई, त्यामुळें त्यांच्या सैन्याची हानि इतरांच्या मानानें पुष्कळ होई. तथापि त्यांनीं कधींहि अवघड कामांत उडी टाकण्यास कांचकूच केली नाहीं.

परशुरामभाऊ हे आपल्या वयाच्या १७ व्या वर्षापासून तों वयाच्या ६० व्या वर्षापर्यंत ४२ वर्षें रणयज्ञ चालवीत होते. एक युद्धसमाप्त होतें न होतें तोंच दुसरें काम त्यासाठीं वाढून तयारच असे; त्यामुळें त्यांना मध्यंतरीं फारशी फुरसतहि मिळाली नाहीं. इ. स. १७५७ त वयाच्या १७ व्या वर्षीं त्यांनीं श्रीरंगपट्टणच्या मोहिमेंत म्हैसूरच्या फौजेला आपल्या तलवारीचें पाणी पाजलें. ती तलवार इ. स. १७९९ च्या सप्टेंबरच्या १७ व्या तारखेस त्यांच्या हांतांतून गळून पडली. मध्यंतरींच्या काळांत शिदखेडच्या लढाईंत निजामाला कोंडण्याच्या कामांत ते हजर होते. रट्टेहळ्ळीच्या लढाईंत त्यांनीं हैदराला चांगले रट्टे लगावले आणि मोतीतलावाच्या लढाईंत तर त्यांनीं हैदराची दौलत जवळ जवळ बुडविलीच होती. त्याच वेळीं थोरल्या माधवरावांची प्रकृति अत्यवस्थ झाल्यामुळें पेशवाई सैन्याला परत फिरण्याचा हुकूम झाला म्हणूनच हैदरच्या जिवावरचा धोका शेपटावर गेला.

त्या नंतर भाऊसाहेब हे दादांचे खूळ मोडून काढण्यांत गुंतल्यामुळें इकडे हैदरखानानें पटवर्धनांच्या मुलखाची अतोनात नासाडी केली. दादाचें खूळ पाठीशीं घेऊन इंग्रजांनीं मराठ्यांच्या मुलखावर तीन स्वाऱ्या केल्या, त्या तीन्हींत इंग्रजांना हार खाण्याचा प्रसंग आला. त्यांतील शेवटच्या लढाईंत गॉडर्डला बोरघाटापासून मागें रेटीत रेटीत पनवेलच्या खाडीपर्यंत चेपीत नेण्यांत परशुरामभाऊंची कामगिरी ठळकपणानें दिसून आली.

दादांचें खूळ मोडून काढण्यांत आणि करवीरकरांचा बंदोबस्त करण्यांत पटवर्धनी फौजा गुंतल्या असतां टिपूनें नरगुंदकरांवर स्वारी करून कळ काढली. परशुरामभाऊंनीं तो वेढा उठविला; पण टिपूचा कांटा काढण्याची ही संधि नानांच्या सलोख्याच्या धोरणामुळें वायां गेली आणि टिपूनें दगलबाजी करून, मध्यंतरींचे करारमदार मोडून परत नरगुंदवर स्वारी केली आणि नरगुंद व कित्तूर या दोन संस्थांनांचा सत्यानाश केला. नरगुंदकरांवर ओढवलेली ही अपत्ति भाऊंच्या मानी मनाला फार लागून राहिली आणि टिपूच्या पारिपत्याच्या स्वारींत त्यांनीं उदासीनता स्वीकारली. लढाईंत पुढाकार घेण्याची टाळाटाळ त्यांनीं उभ्या जन्मांत कधीं केली नव्हती ती या वेळीं केली. यावरूनच नरगुंदचें हें प्रकरण त्यांच्या मनाला किती झोंबलें तें दिसून येतें.

त्यानंतर इंग्रजांच्या सहकार्यानें टिपूवरच चढाई करण्याचें ठरतांच भाऊंची उदासीनता लोपली व टिपूवरील या मोहिमेंत परशुरामभाऊंचे क्षात्रतेज विशेष चमकलें. धारवाडच्या किल्ल्यांतून बद्रीजमालखानाला हुसकून लावून त्या किल्ल्यावर पेशव्यांचें निशाण चढविण्यांत भाऊंनीं आपल्या मर्दुमकीची शर्थ केली. या लढाईंत इंग्रजांचा एक लष्करी अधिकारी कॅप्टन लिटल हा भाऊंच्या मदतीस होता आणि त्याच्या शौर्याचा आणि त्याच्या हाताखालील कवाईती पलटणीचा भाऊंना मोठा उपयोग झाला, यांत शंका नाहीं. मध्यंतरीं इंग्रजांचा एक अधिकारी कर्नल फ्रेडरिक, भाऊंच्या मदतीला म्हणून गव्हर्नर जनरलच्या हुकूमानें येऊन दाखल झाला! त्याला धारवाडचा किल्ला घेणें म्हणजे पोरखेळच आहे, असें वाटत असावें असें दिसतें. त्यानें

भाऊंपुढें असा पेंच टाकला कीं, तुम्ही तरी हा किल्ला काबीज करा, नाहीं तर मी तरी तो काबीज करून देतों. जो पैजेचा विडा उचलील त्यानें दुसऱ्याच्या मदतीची अपेक्षा धरूं नये. हा पैजेचा विडा आपण न उचलावा तर मराठ्यांना कमीपणा येईल व इंग्रज फत्ते झाल्यास ते शेर होतील ; बरें, आपण इरेला पडावें तर किल्ला दुर्घट ; माणूस फार जायां होईल, सैन्याची खराबी होऊन देखील फत्ते न झाली तर अब्रूचीहि खराबी व्हावयाची. अशा पेंचात भाऊंनीं पोक्त विचार करून आणि तरतमभाव पाहून, व्यर्थ इरेला न पडतां फ्रेडरिकाला सांगितलें कीं, तुम्हीच किल्ला घेऊन दाखवावा. त्या प्रमाणें फ्रेडरिक पुढें सरसावला ; पण किल्ल्यावरून होणारा मारा सहन न होऊन त्याला पराजित होऊन माघार घ्यावी लागली! त्यानंतर भाऊंनीं आपले मोर्चे किल्ल्याच्या तटाशीं भिडवून बद्रिजमालच्या नाड्या इतक्या जोरानें आंखडल्या कीं, बद्रिजमालखान हा किल्ला स्वाधीन करावयास कबूल झाला आणि भाऊंनीं किल्ल्यावर मराठ्यांचें निशाण चढविलें.

धारवाडच्या या मोहिमेंत भाऊंच्या अंगच्या सर्वच गुणांची चांगली कसोटी लागली. शौर्याबरोबरच मुत्सद्देगिरीचाहि या कामीं मोठा उपयोग झाला. इंग्रजांचा सरदार कॅप्टन लिटल याच्याशीं सख्य राखून उभयतांच्या एकविचारानें त्यांनीं वेढ्याचें काम चालविलें. कॅप्टन लिटलनें धारवाडची पेठ काबीज केली आणि भाऊंनीं किल्ला हस्तगत केला. किल्ला हस्तगत होण्यापूर्वी आंतील अन्नपाण्याच्या तुटवड्यामुळें किल्ल्यांतील फालतू माणसें बद्रिजमालनें किल्ल्याबाहेर घालवून दिलीं. पण भाऊंनीं भलत्या दयेमायेच्या आहारीं न जातां, किल्ल्यांतून बाहेर पडणाऱ्या त्या बुणग्यास परत किल्ल्यावर पिटाळून लावण्याचा सक्त हुकूम आपल्या लष्करास दिला. कारण किल्ल्यांतील जितकीं माणसें बाहेर निघून जातील तितक्या प्रमाणांत किल्ला अधिक दिवस लढत चालवूं शकेल हें उघड आहे. या सक्त हुकमामुळेंच कौलाचें बोलणें ताबडतोब सुरू झालें. बद्रिजमाल यांस बाहेर जाण्यास भाऊंनीं परवानगी दिली होती, तरी त्याच्या हालचालीकडे त्यांचें पूर्ण लक्ष

मराठी ग्रंथ संग्रहालय क्रमांक

होतें. आणि जेव्हां त्यानें करारांतल्या अटी मोडल्या असें त्यांस दिसून आलें, त्यावेळीं भाऊंनीं त्यास अटकेंत ठेवलें.

पुढें श्रीरंगपट्टणवरील मोहिमेंत इंग्रजांच्या मदतीला त्वरित जाण्याविषयीं जरी नानाकडून वरचेवर तगादे येत होते, तरी भाऊंनीं बिदनूर व शिमोगा हे दोन प्रांत जिंकून, लुटून बेचिराख केले. टिपूनें पटवर्धनांचा मुलूख लुटून जें त्यांचें भयंकर नुकसान केलें होतें तें भरून काढून, स्वारीचा खर्च उगवून घेण्यासाठीं भाऊंना ही स्वतंत्र मोहीम करावी लागली. अखेरीस श्रीरंगपट्टणचा वेढा रंगांत आलेला पहातांच भाऊ अचानकपणें पट्टणच्या दक्षिणेस उमटले आणि त्यांनीं दक्षिण दिशेची नाकेबंदी केली. उत्तर, पश्चिम व पूर्व या तीन बाजू इंग्रज, निजाम व हरिपंत फडके यांनीं अगोदर पासूनच घेरल्या होत्या. अशा रीतीनें चारी बाजूनीं कोंडल्यामुळें टिपू शरण आला आणि तीन कोटी रुपये खंडणी आणि अर्धें राज्य देण्याचें मान्य करून टिपूनें आपली तात्पुरती सुटका करून घेतली.

भाऊ बिदनूरकडे गुंतल्यामुळें लवकर येऊन श्रीरंगपट्टणला पोंचले नाहींत, या विषयीं थोडीशी कुरबूर झालीच. पण भाऊंनीं त्या विषयीं अगाऊ नानांची संमत्ति घेतली होती आणि त्या संमतींत स्वतः मॅलेटहि गुंतलेला होता व त्याकरितां त्याला गव्हर्नर जनरलचा ठपकाहि सोसावा लागला; त्यावरून भाऊंची बिदनूरकडची मोहीम पूर्व संमतीनेंच होती हें उघड आहे. दुसरें असें कीं, भाऊंनीं शिमोगा व बिदनूर या बाजूला उठावणी केल्यानें दुहेरी काम साधलें; एकतर भाऊंच्या स्वारीचा खर्च परभारें बांहेर पडला आणि भाऊंनीं तो मुलूख लुटल्यामुळें दोस्तांच्या सैन्यांतली धान्य वैरणीची ददात नाहींशी झाली आणि मुख्य महत्वाची गोष्ट ही कीं, टिपूकडे त्या भागांतून येणारी रसद बंद झाल्यामुळें टिपूच्या नाड्या आंखडल्या त्यामुळें टिपू लवकर शरण आला. एवंच भाऊंच्या या आडमार्गी कामगिरीमुळें मुख्य कामगिरी अडून न राहातां उलट ती सुलभच झाली. भाऊंनीं दक्षिणेकडून श्रीरंगपट्टणला गराडा घातला, त्यावेळीं भाऊंच्या पाठीशीं टिपूच्या कोणत्याहि सैन्याचा शिलशिला शिल्लक राहिला नव्हता, त्यामुळें दोस्तांना निर्वेधपणें टिपूला वेढतां आलें.

श्रीरंगपट्टणच्या मोहिमेनंतर भाऊंची मोठी कामगिरी खर्ड्याची लढाई ही होय. महादजी शिंदे आणि हरिपंत फडके या उभयतांच्या निधनामुळें मराठेशाहींत परशुरामभाऊशिवाय दुसरा कर्ता सरदार कोणी राहिला नव्हता. अर्थातच खर्ड्याच्या लढाईची जोखीम भाऊंना आपल्या शिरावर घ्यावी लागली. नानांची आतां सारी भिस्त भाऊंच्यावरच होती, म्हणून साहजिकपणेंच खर्ड्याची जबाबदारी परशुरामभाऊंवरच येऊन पडली. या व इतर अनेक प्रसंगीं ग्रँटडफनें भाऊंना जितका कमीपणा देतां येईल तितका कमीपणा देण्याचा उपद्व्याप केला आहे. परंतु अलीकडे 'पूना रेसिडेन्सी रेकॉर्डस्' छापून निघाल्यामुळें, इंग्रजांच्या पत्रव्यवहारावरूनच ग्रँटडफच्या चुका दाखवितां येतात; आणि खरे यांनीं प्रसिद्ध केलेल्या ऐतिहासिक लेखसंग्रहांतील पत्रांना दुजोरा मिळतो. या करितां प्रस्तुतच्या चरित्रांत ठिकठिकाणीं पूना रेसिडेन्सी रेकॉर्डस्‌मधील उतारे पुराव्याकरितां म्हणून दिले आहेत, ते वाचकांनीं सूक्ष्म दृष्टीनें वाचावे.

खर्ड्याच्या लढाईंतील पहिल्या हल्ल्यांत भाऊंचें पथकच आघाडीवर असल्यानें भाऊ जखमी झाले व त्यांना थोडें मागें हटावें लागलें. पण अशा रीतीनें शत्रूची फौज अंगावर घेतल्यानें ती शिंद्यांच्या तोफांच्या मारगिरींत सांपडली आणि त्या फौजेची दाणादाण उडाल्यामुळें निजामाचा पराजय करणें सुलभ झालें.

खर्ड्याच्या लढाईंतील विजयानें भाऊंच्या भाग्याचा ख-बिंदु गांठला. येथून पुढें त्यांच्या पराक्रमास उतरती कळा लागली. भाऊंचें क्षात्रतेज लोपलें असा त्याचा अर्थ नव्हे, परंतु राजकारणांतल्या विचित्र भानगडी भाऊंना अंगावर घ्याव्या लागल्यामुळें त्यांची मसलत त्यांच्या अंगलट आली. बाजीरावाला बाजूला सारून चिमणाजीला पेशवाई देण्याचा मूळचा बेत नानांचा. त्याला दौलतरावांचीहि आंतून संमति होती. पण पैशाच्या लोभानें दौलतराव उलटले. आणि बाजीराव व दौलतराव शिंदे यांच्या पाताळयंत्री कारस्थानांत गुंतल्यामुळें नानाही भाऊवर उलटले आणि भाऊंना बाजीरावाचा रोष आपणावर विनाकारण ओढून घ्यावा लागला. नाना व बाजीराव या

उ. ६९४

उभयतांच्या विरोधामुळें भाऊंना अटकेंत कुचंबावें लागलें आणि थोड्याच कालावधींत त्यांची मुक्तता झाली तरी त्यानंतरच्या सर्व मोहिमांत बाजीरावाचा विरोध भाऊंना भोवला.

भाऊंना अटक झाल्यानंतर सातारच्या महाराजांची उठावणी, शिंद्यांच्या बायांचें बंड आणि करवीरकरांचा उपद्रव पेशवाईस भोवूं लागला. हीं तीनहि संकटें दूर करण्याला भाऊशिवाय दुसरा कोणी सरदार समर्थ नाहीं असें जाणून भाऊंची अटकेंतून सुटका करण्यांत आली; पण त्या सुटकेचा मोबदला म्हणून भाऊंवर १५ लक्ष रुपयांचा दंड लादण्यांत आला! या प्रसंगानें उत्तरेकडील सरदार आणि दक्षिणेकडील पटवर्धन सरदार यांच्या कामगिरीची आणि स्वामिनिष्ठेची तुलना करणें प्राप्त आहे. शिंदे व होळकर यांना उत्तरेंत ज्या मोठाल्या जहागिरी देण्यांत आल्या त्यांचा मूळ हेतु काय, आणि त्यांचा परिणाम काय झाला, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. सरदारांनीं सैन्य बाळगून, धनी बोलावतील त्यावेळीं सैन्यासह सरकारी कामावर हजर होऊन, गादीची कामगिरी करून दाखवावी, हाच जहागीर देण्यांतला मूळ हेतु. चिमाजी आप्पा, बाजीराव, भाऊसाहेब यांच्या सारखे खंदे वीर डोकीवर होते तोंपर्यंत शिंदे होळकरांनीं ही रीत पाळली. राघोभरारीच्या बिनबुडाच्या धोरणामुळें ही घडी विसकटूं लागली आणि पानिपतच्या धक्क्यानें ती घडी अगदींच विस्कळीत झाली. त्यांतूनहि माधवरावासारखा तापट, करारी व धाडसी पेशवा खंबीर होता तोपर्यंत शिंदे होळकरांना निमूटपणें सरकारी कामावर हजर व्हावें लागत होतें. परंतु माधवरावाचा मृत्यु आणि नारायणरावाचा खून यामुळें सर्वच धरबंद सुटला आणि शिंदे व होळकर हे हुकमाचे ताबेदार न राहतां उलटचा गोष्टी सांगूं लागले आणि त्या वेळेपासून सरकारी कामावर हजर होण्यासाठीं त्यांना लांच देण्याचा पायंडा पडत चालला! मूळच्या जहागिरीचा हिशेब पेशव्यास देणें बाजूलाच राहून, उलट राघोबाचा पक्ष न घेण्याबद्दल बक्षीस, राघोबाचें पारिपत्य करण्याकरतां त्यांजवर चालून जाण्यासाठीं बक्षीस, राघोबा हातीं लागला असतां त्याला सोडून देण्याचा

धाक घालून बक्षीस, इंग्रजांशीं तडजोड करून देण्यासाठीं बक्षीस, असले विपरीत प्रकार सुरू झाले ! या खाबूपणाचा सर्वांत मोठा अनिष्ट परिणाम असा झाला कीं, अशा रीतीनें पेशवाईंतून उकळलेल्या द्रव्याच्या जोरावर शिंद्यांनीं आपली नवी कवाइती फौज तयार केली आणि ती फौज, पेशवाईचे हात बळकट होण्यास उपयोगी न पडतां, पेशवाईला डोईजड होऊन, शत्रूप्रमाणें भासूं लागली. शिंदे आपली फौज घेऊन पुण्याला येत आहेत ही गोष्ट कौतुकास्पद न होतां भीतिप्रद होऊन बसली.

कोणचाहि एक पक्ष स्वीकारून विरुद्ध पक्षावर नसते आरोप लादण्याचा यांत हेतु नाहीं. पण प्रत्यक्ष ज्या घटना घडल्या त्याचा जो उघड अर्थ होतो, तो कोणासहि नाकारतां येणार नाहीं. महादजी शिंदे दक्षिणेंत आले ते आपल्या जहागिरीचा हिशेब देण्यासाठीं म्हणून आले. पण प्रत्यक्ष घडलें काय, तर महादजीशीं तंटा नको म्हणून नानांना हिशेबाचा आग्रह सोडून द्यावा लागला. इतका हिशेब तर पचलाच; पण तेवढयानेंहि भागलें नाहीं. आम्ही कांहीं हिशेब मागत नाहीं, पण तुम्ही एकदांची ही फौज येथून हलवून आपल्या प्रांतीं जा, असा तगादा लावला असतां, सैन्य घेऊन निघून जाण्यासाठीं दोन कोटी द्या, तीन कोटी द्या, असली भाषा तोंडांतून काढणें, म्हणजे जगाविपरीत न्याय नव्हे काय ? एकीकडून बाजीरावाला गादीवर न बसविण्यासाठीं पैका, दुसरीकडून बाजीरावाला गादीवर स्थापण्यासाठीं पैका, नानांना कैद करण्यासाठीं पैका, नानांना कैदेंतून सोडण्यासाठीं पैका, अशा प्रकारें जेथें उघड उघड लिलांव होऊं लागले, सैन्य हलविण्यासाठीं जेथें दोन कोट रुपयांचा तगादा सुरू झाला आणि इतका पैका सरळ मार्गानें मिळेना म्हणून पेशव्यांच्या राजधानीचें पुणें शहर लुटण्याचा कहर उसळला, तेथें नीति अनीति, कोणाची बाजू खरी कोणाची खोटी, असला वाद तरी करावयाला जागा राहते काय ?

याच्या उलट पटवर्धनांची नेकी पहा. मिळालेल्या जहागिरींत, ठरलेल्या संख्येइतकीं पथकें ठेवतां येतील कीं नाहीं, याचा विचारहि न करतां

कामगिरी निघाली कीं ते स्वारीवर हजर. त्यांतून जहागीर मिळाली ती सुळावरची पोळी. इकडून करवीरकरांनीं लुटावें, तिकडून हैदरटिपूंनीं मुलूख वैराण करावा. अशा परिस्थितींत स्वारीखर्चाकरितां पैका मागितला असतां, 'स्वारीचा खर्च कामगिरीवर परभारें भागवा' असें उत्तर मिळे! पदरचे सोनें नाणें विकून प्रपंच चालविण्याची पाळी आली-तरी कधीं सरकारकामांत चुकारपणा नाहीं. एकदां टिपूवरच्या स्वारीवर तांतडीनें निघण्याचा हुकूम आला, त्यावेळीं हरीपंत फडक्यांच्या घरच्या मुली पटवर्धनांच्या घराण्यांत देण्याचा निश्चय झाला होता. तरी पण सरकारी कामांत दिरंगाई न व्हावी म्हणून घरांतला लग्नसोहळा सोडून दोघेहि व्याही लष्करांत दाखल झाले आणि त्यांच्या गैरहजेरींतच लग्नें उरकण्यांत आलीं. इतक्या एकनिष्ठेनें पेशवाईची कामगिरी पटवर्धन घराण्यानें केली.

या एकनिष्ठेचें चीज कसें झालें, तें बघण्यासारखें आहे. भाऊसाहेबांवर रोष होऊन त्यांना अटकेंत ठेवलें असतां, इकडे सातारा, करवीर इत्यादि ठिकाणीं दंगे उसळले व ते कोणास आवरेनांत, तेव्हां निरुपायानें परशुरामभाऊंना मुक्त करणें भाग पडलें व त्यांची साताऱ्यावर रवानगी झाली. स्वतःवरचें संकट दूर करण्यांकरितां बाजीरावानें भाऊंना सोडलें, तरी पण १५ लाखांचा दंड कांहीं माफ केला नाहीं. सातारची कामगिरी मनासारखी झाली, त्यानंतर तरी दंड माफ व्हावा, तर तेंहि नाही. पुढें टिपूवरची इंग्रजांची शेवटची मोहीम निघाली. तींत पूर्वीच्या कराराप्रमाणें पेशव्यांनीं सैन्य पाठविणें प्राप्त होतें. अर्थातच त्या स्वारीवर भाऊसाहेबांस पाठवा, म्हणजे तिकडे स्वारींत पैसा मिळेल व ते दंड भरतील, असें सुचविण्यांत आलें, तरी देखील भाऊंना जाण्याला हुकूम दिला गेला नाहीं. आपलें नाक कापून घेऊन दुसऱ्यास अपशकून करण्यांतलाच हा प्रकार झाला. भाऊंनीं पराक्रम गाजवून पैका मिळवू नये म्हणून भाऊंना परवानगी न दिल्यानें, टिपूच्या राज्यांतील अखेरची एक तृतीयांश वांटणी पेशव्यांना मिळावयाची ती मात्र हातची गेली!

अशाप्रकारें चोहोंकडून गांजणूक चालू असतां करवीरकरांनीं उचल खाऊन पटवर्धनांच्या मुलखांत जाळपोळ व लुटालूट चालविली. ती गोष्ट भाऊंना सहन न होऊन त्यांनीं करवीरकरांविरुद्ध मोहीम प्रारंभिली. या मोहिमेंत पुण्याहून मदत मिळावी म्हणून भाऊंनीं मागणी केली. परंतु पुण्याहून मदत येऊं शकली नाहीं. सर्वांत अश्लाघ्य प्रकार असा कीं, मिरज व कुरुंदवाड येथूनहि घरची मदत आली नाहीं. अशा निःसहाय्य परिस्थितींत वैतागाने त्रागा करून भाऊंनी ही मोहीम तशीच पुढें रेटली. परंतु पट्टणकुडीच्या लढाईत प्रतिपक्षाचा जोर अनावर होऊन भाऊंवर प्राणत्यागाचा प्रसंग ओढवला. अशा रीतीनें या शूर वीराचा अंत झाला. या अखेरच्या संग्रामाशिवाय त्यांना तत्पूर्वी कोठेंहि अपयश म्हणून आलेंच नव्हतें.

पटवर्धन कुळांत अनेक पराक्रमी पुरुष झाले व त्यांनी आपल्या जिवाची तंमा न धरतां अचाट पराक्रम केले. त्यांतल्यात्यांत गोपाळराव आणि परशुरामभाऊ हे दोघे विशेष पराक्रमी आणि यशस्वी ठरले. गोपाळरावांनी आपली कारकीर्द १७५७ पासून १७७० पर्यंत गाजविली आणि त्यांत निजाम व हैदर यांना आपल्या तलवारीचें पाणी दाखविलें. गोपाळरावांनी दौलताबादचा मजबूत किल्ला आपल्या पथकांची फारशी हानि न होऊ देतां घेतला. आणि तिकडे हैदरलाहि सळो का पळो, असे केलें. पानिपतच्या लढाईवर अनेक सरदारांची रवानगी झाली, पण दक्षिणेकडील बंदोबस्तासाठीं म्हणून पटवर्धन मंडळीना उत्तरेंत धाडण्यांत आलें नाहीं, हा दैववशात सुयोगच म्हणावयाचा. कारण, पटवर्धन सरदार पानिपतावर गेले असते, तर आपल्या ब्रीदाला अनुसरून ते रणांगणावरून मागे न हटतां धारातीर्थीं पतन पावले असते आणि भावी काळांत पराक्रम गाजविणारी त्यांची पिढी तेथेंच खलास झाली असती ! गोपाळरावांच्या मृत्यूनंतर १७७० पासून १७९९ पर्यंत २९ वर्षें परशुरामभाऊंनी रणभूमि गाजविली आणि परकीय इंग्रज अधिकाऱ्याकडूनहि 'Best military Officer' अशी शिफारस मिळविली. हैदरावरील मोहिमेंत पटवर्धनांची बिनीची छावणी मतोडावर

असतां हैदरानें रात्री आकस्मिकपणें पटवर्धनांच्या गोटावर हल्ला चढविला. त्यावेळीं पटवर्धनांच्या सैन्यांतील सावधता, शिस्त आणि पराक्रमाची शिकस्त प्रत्ययास आली. रात्रीं अंधारांतून तोफांची व गोळ्यांची मारगिरी चालू असतां पटवर्धनांचे सरदार व शिपाई ठासून आपलें ठाणें धरून उभे राहिले. त्यावेळीं खुद्द भाऊंच्या मांडीखालची तीन घोडी ठार झालीं, तरी पुन्हा ही स्वारी चौथ्या घोड्यावर स्वार होऊन शत्रूला तोंड देण्यास तयारच होती! धारवाडच्या किल्ल्यावरील वेढ्यांत ज्या दिवशीं कॅ. लिटल यांच्या कंपूनें बद्रीजमालच्या ३ हजार सैनिकांचा हल्ला परतवून त्यास पिटाळून लावले व त्यांच्या तोफा हिसकून घेतल्या, त्या दिवशीं कॅ. लिटल याच्या सांगण्यावरून भाऊ तो पराक्रम पाहात उभे होते; त्यावेळीं त्यांच्या उजव्या हाताला एक तोफ व डाव्या हाताला एक तोफ अशा तोफा कॅ. लिटलने लावून ठेवल्या होत्या. प्रतिपक्षाकडून तोफावरच नेमका नेम धरण्यांत येतो, त्यामुळें तोफांच्या नजीक उभे राहणें धोक्याचें असतें. परंतु भाऊ त्या धोक्याच्या मध्यभागीच त्या दिवशीं बेडरपणें उभे होते.

परशुरामभाऊंच्या निधड्या छातीविषयीं त्यांच्या प्रतिपक्षासहि अंदेशा वाटत नव्हता; परंतु भाऊ हे केवळ शिपाई गडी, त्यांच्यात मुत्सद्दी-पणा नव्हता, असा जो आक्षेप आहे तो गैर समजुतीचाच परिणाम होय. बाजीरावाला सोडून चिमणाजीला हातीं धरण्यांत भाऊंचें धोरण चुकलें व त्यामुळें त्यांच्यावर आपत्ति ओढवली असें सांगण्यांत येतें; परंतु या बाबतींत भाऊंची नानाशी तुलना करणेंच अन्यायाचें आहे. नानांचा सारा जन्मच कारस्थानें करण्यांत गेला, तेव्हां शिपाई बाण्याचे भाऊ तात्पुरते कारभारी झाले असतां त्यांची बाजू घसरली यांत नवल तें काय? परंतु या सामन्यांत भाऊंची बुद्धिमत्ता कमी पडली असा त्याचा अर्थ होत नाहीं. तीन तपें राज-कारण खेळलेल्या नानांच्या हातांत कारस्थानें करण्याचीं सगळीं साधनें हाताशीं जय्यत तयार होतीं. तशी हेरांची मालिका भाऊंच्या हाताखालीं एकदम कशी तयार होणार? पण दुसरा मुख्य विचार हा कीं, जेथें मित्र-त्वाचा व शत्रुत्वाचा उघड उघड लिलाव होऊं लागला, तेथें बिचारे कर्ज-

बाजारी भाऊ नानाशीं टक्कर देण्यांत कसे टिकणार ? जो दौलतराव शिंदा दोन कोटी रुपयांच्या आमिषाने बाजीरावाला अनुकूल होऊन भाऊंच्या विरुद्ध झाला, त्याच शिंद्याला तीनचार कोटींचें आमिष दाखविण्याला भाऊंच्याजवळ साधन असतें, तर भाऊंचें राजकारण यशस्वी होऊन तेहि मुत्सद्दी ठरले असते! परंतु स्वत: कर्जबाजारी होऊन धन्याची चाकरी इमानेंइतबारें बजावणारे भाऊ, पैशाच्या लिलावांत हलके ठरल्यास त्यांत त्यांना कमीपणा कसचा ?

एरवीं लढाईचें धोरण ठरविण्यांत, तहनामे करण्यांत, तहनाम्याची बजावणी करून घेण्यांत भाऊंचें धोरण चुकलें असें घडलें नाही. हैदरच्या किंवा टिपूच्या हुलकावण्यांनी ते केव्हांहि फसले नाहींत; धारवाडच्या किल्ल्यावर हल्ला करण्यासाठीं कर्नल फ्रेडरिकने त्यांना इरेला घालण्याचा पेच टाकला, पण ते पैजेत गुंतले नाहीत. नरगुंदचा वेढा उठविल्यानंतर टिपूवर विश्वास टाकून आपलीं सैन्ये काढून नेऊ नयेत, असें भाऊ स्वच्छ सांगत असतां, सैन्य माघारें नेण्यांत आलें ! त्याचा केवढा घोर परिणाम झाला तें इतिहासांत नमूद आहेच. परंतु भाऊंच्या हृदयाला झालेली ही जखम अखेरपर्यंत भरून आलीच नाही. हैदरवरील एका स्वारींत मराठ्यांची तीस हजार फौज ठाण मांडून राहिली असतां, हैदर थोड्या फौजेनिशी चालून आला, त्यावरून चाणाक्ष भाऊंनी आपल्या फौजेंत फितुरीचें पाणी कोठें तरी मुरतें आहे असा कयास केला व ते लढाई न देतां मागे हटून चौकशी करूं लागले. त्यावेळीं फाकड्या मानाजी आणि म्हसवडचे माने यांनीं फितुरी आरंभिल्याचें दृष्टोत्पत्तीस आलें ! त्याबरोबर भाऊंनी फांकड्याचा गोट लुटविला आणि मान्याला तोफेच्या तोंडी दिला. त्या गडबडींत मानाजी फांकडे निसटून पळाला आणि तोच भाऊना अखेर भोंवला. धारवाडच्या किल्ल्यांतून भाऊंनी बद्रिजमालला बाहेर निघून जाण्याची परवानगी दिली खरी, पण त्याच्यावर पक्की नजर ठेवली आणि त्याची लबाडी उघडकीस येताच त्यास कैद केलें. सारांश, भाऊ हे 'केवळ शिपाईगडी' नसून ते धोरणी सेनापति होते.

३. ६१४

स्वामिनिष्ठा, मराठेशाहीचा अभिमान आणि धर्मनिष्ठा या गुणांत भाऊंची सर ज्यांना येईल असे सरदार विरळाच, मग त्यांच्याहून कोणी वरचढ नव्हते, हे सांगावयास नकोच. खर्ड्याच्या लढाईच्या आधीं निजामाने भाऊंना मध्यस्थ घालून तडजोड करण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण भाऊंनी साफ जबाब दिला कीं, चौथाई–सरदेशमुखीची बाकी तीन कोट रुपये आधीं भरा मग तहाचा विचार पाहूं आणि तह न झालाच तर मी पेशव्यांचा सरदार आहे, तुमच्यावर हल्ला चढविणें हें माझें कर्तव्यच आहे याच बाबतींत दौलतराव शिंद्याने तडजोड करतो म्हणून निजामाकडून २७ लाख रुपये घेतले आणि शेवटीं उलट खाल्ली आणि लढाईंत विजय मिळा ल्यावर निजामाकडून ५० लक्ष रुपये हबकले, मात्र निजामहि तसाच वस्ताद असल्यानें त्यानें या ५० लक्षांतून पूर्वीचे २७ लक्ष वजा टाकले! भाऊंना या सगळ्या खटाटोपांत केवळ एक लक्ष रुपये दरबार खर्च मिळाला; पण भाऊंनी कधीहि त्याबद्दल तक्रारीचा शब्द तोंडांतून काढला नाही.

भाऊंची धर्मनिष्ठाहि केवळ दिखाऊ नसून कडक होती. प्रत्यक्ष रणधुमाळींतहि ते आपले व्रताचार पाळण्यांत कसूर करीत नसत. कोल्हापूरकरांच्या शिरोळे ठाण्यावर एकाएकीं हल्ला करण्याचें ठरलें. त्या वेळीं भाऊ पूजा करीत होते. हल्ला सुरू झाल्याचें कळतांच ते तसेच उठून स्वार होऊन हल्ल्यात शिरले आणि ठाणें हस्तगत होऊन त्यावर निशाण चढतांच परत येऊन नंतर त्यांनी पूजा आटोपून अन्नग्रहण केलें. घरची स्थिति ओढघस्तीची असून देखील त्यांनी तासगांव, कोतवडे, काशी, पंढरपूर, चिंचणी, भिलवडी मिरज, इत्यादि स्थळीं सुंदर व भव्य देवळें, वाडे, घाट, इत्यादींची बांधणी करविली आणि अनेक स्थळीं अन्नछत्रें चालविण्यासाठीं वर्षासनें करून दिलीं. पटवर्धनांच्या घराण्यांतली ही परंपरा पटवर्धनी संस्थानें विलीन होईपर्यंत अखंड चालू होती. पटवर्धनी संस्थानें हीं प्राचीन वेदविद्या आणि शास्त्रें यांच्या पुरस्काराच्या कार्याचीं केंद्रेंच होतीं. स्वाभिमानाची व स्वातंत्र्यप्राप्त्यर्थ केल्या जाणाऱ्या प्रयत्नांना हातभार लावण्याची पटवर्धनांची ही परंपरा १८५७ पर्यंत जागत होती, हें स्वातंत्र्यसंग्रामाच्या इतिहासज्ञांस अवगत आहेच.

या गतगोष्टी आतां उकरून काढून काय उपयोग, असा आक्षेप घेणाऱ्यांना एवढेंच उत्तर पुरे आहे कीं, गत इतिहासापासून परिस्थितीची आणि माणसांची पारख करण्याला शिकणें, हाच इतिहासाच्या अभ्यासाचा उपयोग असतो. मात्र त्याचा तसा उपयोग होण्याला, इतिहास यथार्थ व स्फूर्तिदायक असा लिहिला गेला पाहिजे. इकडे इतिहासाची पारायणें करावयाची, स्वतःहि इतिहास लिहिण्याचा आव आणावयाचा, पण इतिहासकालांत माजी मुत्सद्यांच्या हातून ज्या चुका घडल्या तसल्याच घोड चुका आपल्या हातून घडूं नयेत म्हणून पूर्वीच्या इतिहासापासून जो योग्य बोध घ्यावयास हवा तो बोध मात्र घ्यावयाचा नाहीं, याला काय म्हणावें ? याला कारण एकच; तें हेंच कीं, जो इतिहास अभ्यासला गेला तो इतिहासच विकृत असल्यानें त्या पासून भलतीं अनुमानें काढून नसतें वेड डोक्यांत शिरल्याचाच हा दुष्परिणाम होय. यास्तव वाचकांच्यापुढें खरा साधार इतिहास मांडणें हें ग्रंथकारांचें आद्य कर्तव्य आहे. हें लक्षांत घेऊन **श्रीयुत सखाराम अच्युत सहस्रबुद्धे** यांनीं खरे शास्त्री यांचे ऐतिहासिक लेख संग्रह, पेशवे दप्तर आणि पूना रेसिडन्सी रेकॉर्डस् यांचा आधार घेऊन पुण्यप्रतापी परशुरामभाऊंचें स्फूर्तिदायक चरित्र वाचकांच्या पुढें परिश्रमपूर्वक यथार्थ मांडलें, याबद्दल त्यांस धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच आहेत.

पुणें माघ शु. १ शके १८७४ }          **ज. स. करंदीकर**

# अनुक्रमणिका


| विषय | | पृष्ठें |
|---|---|---|
| प्रकरण | १ — पूर्व वृत्तांत | १ – ११ |
| ,, | २ — परशुरामभाऊंचें बालपण | १२ – १७ |
| ,, | ३ — परशुरामभाऊंचें रणांगणावर पदार्पण | १८ – ३२ |
| ,, | ४ — वामनरावबाबा–पटवर्धनांचे मुख्य पुढारी | ३३ – ६१ |
| ,, | ५ — सावशीची लढाई | ६२ – ७६ |
| ,, | ६ — परशुरामभाऊंकडे पटवर्धनांचें पुढारीपण | ७७ – ९७ |
| ,, | ७ — मोरोबादादाचें कारस्थान | ९८ – १२१ |
| ,, | ८ — इंग्रजांचा रेंच मोडला | १२२ – १४१ |
| ,, | ९ — परशुरामभाऊंची सुरापुरावर स्वारी | १४२ – १५१ |
| ,, | १० — करवीरकरांचा बंदोबस्त | १५२ – १६४ |
| ,, | ११ — टिपूचा समाचार | १६५ – १९३ |
| ,, | १२ — श्रीरंगपट्टणची मोहीम | १९४ – २४३ |
| ,, | १३ — करवीरकरांवर मोहीम | २४४ – २५२ |
| ,, | १४ — खडर्याची लढाई | १५३ – २८४ |
| ,, | १५ — बाजीरावाचें पुण्यास आगमन | २८५ – ३२१ |
| ,, | १६ — चिमाजीअप्पा पेशवे आणि भाऊ कारभारी | ३२२ – ३५६ |
| ,, | १७ — परशुरामभाऊंची सातार्‍यावर स्वारी | ३५७ – ३८६ |
| ,, | १८ — परशुरामभाऊंचा वध | ३८७ – ४२४ |
| ,, | १९ — उपसंहार | ४२५ – ४४४ |

C-842

श्री

# सरदार परशुरामभाऊ पटवर्धन यांचें चरित्र.

## प्रकरण १ लें.

## पूर्व वृत्तांत

सरदार परशुरामभाऊ पटवर्धन यांचे पूर्वज रत्नागिरी जिल्ह्यांत कोतवडें म्हणून गांव आहे त्या ठिकाणीं रहात असत. कोतवडें हा गांव रत्नागिरी शहरापासून सुमारें आठ मैल लांब आहे. त्या गांवांत सहस्त्रबुद्धे व पटवर्धन हीं त्यावेळीं प्रमुख घराणीं होतीं. सहस्त्रबुद्धे हे गांवचे खोत असून पटवर्धन हे त्यांचे उपाध्ये होते. कोतवडें गांवीं नांदत असलेल्या पटवर्धन घराण्यांतील देशावर येणारे पटवर्धनांचे मूळ पुरुष हरभट बाबा हे होत. आज देशावर नांदत असलेल्या सर्व पटवर्धन संस्थानिकांचे मूळ पुरुष हे हरभटबाबाच होत. हे हरभटजी सुमारें सन १६५५ सालीं जन्मले. हरभटजींचें वेदाध्ययन बेताचेंच झालें होतें. हरभटजींचे वडील बाळंभट यांचें कुटुंब मोठें होतें. हरभटजीखेरीज त्यांस विठ्ठलभट व केशवभट असे आणखी दोन पुत्र होते. या सर्व कुटुंबाचा उदरनिर्वाह भिक्षुकीवर होणें कठीण होतें. शिवाय बाळंभटजींचे वडील पुत्र हरभट हे बेताचेच शिकले असल्यामुळें भिक्षुकी करण्यासहि त्यांचा फारसा उपयोग होईना.

अशा परिस्थितींत हरभटांनीं घरांतून बाहेर पडण्याचें ठरविलें. व जवळच म्हणजे कोतवड्यापासून सुमारें सहा मैलांवर असलेल्या गणपतीपुळें या गांवीं श्री गणपतीच्या सेवेंत आयुष्य घालविण्याचा त्यांनीं निश्चय केला. श्री गजाननाची सेवा करीत असतांच हरभटजीबोवांना असा श्रीचा दृष्टांत झाला कीं त्यांनीं गांवांतील पुराणिक शेंडे यांच्या मुलीशीं विवाह करावा. पुराणिक शेंडे यांनाही असाच दृष्टांत झाला कीं त्यांनीं आपली मुलगी हरभटजीबोवांस द्यावी. अशा रीतीनें हरभटजींचा विवाह झाल्यावर ते आपल्या कोतवडें गांवीं गेले व पुढें त्यांचाही संसार वाढला. ( टीप— हरभटजींनीं शेंडे यांच्या मुलीशीं लग्न केलें त्या मुलीचें नांव लक्ष्मीबाई असें होतें, असें पे. द. भा. ९—७० वरून दिसतें. तिचें मुळचें नांव गौराबाई होतें असा उल्लेख आढळतो). तेव्हां हरभटजींनीं देशावर जाण्याचें ठरविलें. हरभटजींवर श्रीगजाननाची कृपा झाल्यामुळें हरभटजींचा सर्वत्र चांगला लौकीक झाला होता. त्यामुळें अनेक लोक हरभटजींच्या दर्शनास येत व त्यांच्या दर्शनानें आपण कृतार्थ झालों असें मानीत. तात्पर्य हरभटजीबोवांची एक तऱ्हेची शिष्यपरंपरा निर्माण झाली होती. असो. हरभटजींस एकंदर सात पुत्र झाले. त्यांपैकीं कांहीं कोंकणांत असतांना व कांहीं देशावर आल्यावर झाले असावे. या सात पुत्रांपैकीं गोविंद हरी, त्रिंबक हरी व रामचंद्र हरी हे पुढें नांवलौकीकास आले. या तिघांपैकीं रामचंद्र हरी हेच परशुरामभाऊ यांचे वडील होत. हरभटजी हे सन १६९७-९८ च्या सुमारास देशावर आले असावे: हरभटजी हे देशावर आले तेव्हां त्यांचा लौकीक चांगलाच वाढला होता. ते तपस्वी आणि विरक्त असून श्रीगजाननाची त्यांजवर कृपा आहे अशी त्यांची कीर्ती ऐकून शेकडों लोक त्यांच्या दर्शनाला येऊं लागले. हरभटजींची ही कीर्ती ऐकून संताजी घोरपडे यांच्या आश्रयास असलेले नारो महादेव जोशी व त्यांची पत्नी हीं उभयतां त्यांचे दर्शनास आलीं. नारो महादेव यांस मूल नव्हतें, व पुत्रप्राप्तीच्या इच्छेनें आपण दर्शनास आल्याचें त्यांनीं हरभटजींस कळविलें. हरभटजींनीं श्री गजाननाचें ध्यान करून नारो महादेव यांची पत्नी लक्ष्मीबाई इजला गिरीन जाऊन

श्री व्यंकटेशाची आराधना करण्याचा उपदेश दिला. नारो महादेव हे नेहमीं स्वारी शिकारीवर असल्यामुळें त्यांना आपल्या पत्नीसह गिरीच्या व्यंकटेशास जाऊन त्याची आराधना करणें शक्य नव्हतें. तेव्हां हरभटजी यांनीं आपण होऊन नारो महादेव यांच्या पत्नीबरोबर गिरीस जाण्याचें कबूल केलें. अशा रितीनें नारो महादेव यांची पत्नी हरभटजींबरोबर गिरीस गेली व तेथें श्री व्यंकटेशाची सेवा करण्यांत योग्य तो काळ घालवून हरभटजींबरोबर परत आली. पुढें कांहीं दिवसांनीं नारो महादेव यांच्या पत्नीस गर्भ राहिला. श्री व्यंकटेशाच्या प्रसादाचेंच हें फळ असें समजून पुढें नारो महादेव यांस पुत्र झाला त्याचें नांव व्यंकटराव असें ठेविलें. व्यंकटरावांचा जन्म सुमारें सन १७०१-२ चा आहे. अशा रितीनें नारो महादेव व हरभटजी यांचा स्नेहसंबंध जडल्यामुळें हरभटजी हे नारो महादेवाच्या आश्रयानेंच राहूं लागले. ( टीप--परशुरामभाऊंचे आद्य चरित्रकार श्री. निगुडकर यांनीं हरभटजी व नारो महादेव यांच्या संबंधानें असें लिहिलें आहे कीं हरभटजींना असा दृष्टांत झाला होता कीं तुम्ही देशावर जावें व वाटेंत जो कोणी पहिल्यानें भेटेल त्याच्या आश्रयास राहून आपला उद्धार करून घ्यावा. याप्रमाणें हरभटजी देशावर जात असतां एक विधवा स्त्री व तिचा आठ दहा वर्षांचा मुलगा ही दोन माणसें त्यांना एका झाडाच्या छायेमध्यें बसलेलीं प्रथम दिसलीं. त्यांच्या आश्रयानें हरभटजी देशावर गेले व त्यांनीं त्या मुलाला प्रसिद्ध संताजी घोरपडे यांचे वडील म्हाळोजीराव घोरपडे यांच्या आश्रयास ठेविलें पुढें त्या मुलावर घोरपड्यांची कृपा होऊन तो इचलकरंजी संस्थानचा मालक झाला व त्याच्या आश्रयानें हरभटजीचें कुटुंब वर आलें. हा मुलगा म्हणजेच नारो महादेव जोशी वरवडेकर हे होत. या हकिगतींत नारो महादेवाच्या आश्रयानें हरभटजींचें कुटुंब वर आलें ही गोष्ट खरी आहे. पण हरभटजींना विधवा स्त्री व तिचा आठ दहा वर्षांचा मुलगा हीं वाटेंत भेटलीं वगैरे हकिगत खरी दिसत नाहीं. कारण इचलकरंजीच्या इतिहासांत नारो महादेव यांचा जन्म सन १६६३ चा दिला आहे. आणि हरभटजींचा जन्मकाल सन १६५५ आहे. दोघांचा

जन्मकाल लक्षांत घेतां नारो महादेव आठदहा वर्षांचे होते तेव्हां हरभटजी पंधरा वर्षांचे असले पाहिजेत. पण पुळ्याच्या गणपतीची आराधना कांहीं वर्षें करून व लग्नकार्य करून हरभटजी देशावर गेले हें स्पष्ट असल्यामुळें हरभटजी देशावर गेले तेव्हां त्यांचें वय तिसाच्या पुढें असावें; म्हणून निगुडकरांनीं दिलेली माहिती बरोबर नसावी असे दिसतें).

नारो महादेवाच्या आश्रयास राहिल्यावर हरभटजींकडे आस्ते आस्ते नारो महादेवाच्या घरची व्यवस्था पहाण्याचें काम आलें. कारण नारो महादेव यांना नेहमीं स्वारी शिकारीवर जावें लागत असे. हरभटजी हे मूळचे भिक्षुकी पेशाचे होते. हळू हळू नारो महादेवाचे पुत्र व्यंकटराव हे मोठे होऊन त्यांचा व्रतबंध करण्याची वेळ आली. हा व्रतबंध सन १७०९ मध्यें झाला. त्या वेळीं मुलाच्या मुंजीचें उपाध्येपण नारो महादेवानीं हरभटजींस दिलें, व आपल्या घराण्याशीं हरभटजींच्या घराण्याचा उपाध्येपणाचा संबंध कायमचा जोडला. व्यंकटराव यांची मुंज झाल्यावर चार वर्षांनीं म्हणजे १७१३ सालीं त्याचा विवाह झाला. बाळाजी विश्वनाथ पेशवे यांची कन्या अनुबाई ही व्यंकटरावास दिली. हें लग्न जमविण्यामध्यें बाळाजी विश्वनाथ यांना हरभटजींचा फारच उपयोग झाला. त्यामुळें हरभटजी व बाळाजी विश्वनाथ यांचाही स्नेहसंबंध वाढला. बाळाजी विश्वनाथ यांस पुढच्याच वर्षीं म्हणजे सन १७१४ सालीं पेशवेपद मिळालें व त्यामुळें पेशव्यांच्या आधारानें घोरपडे व पटवर्धन हीं दोन्ही घराणीं उदयास आलीं. पेशव्यांशीं लग्नसंबंध झाल्यामुळें व्यंकटराव यांचें जाणें येणें नेहमीं पुण्यास होऊं लागलें. अर्थातच व्यंकटरावाचे आश्रित जे पटवर्धन यांचाहि पेशव्यांकडे प्रवेश झाला. हरभटजींना एकंदर सात पुत्र होते. त्यांपैकीं पेशव्यांच्या दरबारीं प्रवेश झाल्यानंतर ज्यांची हुशारी पेशव्यांच्या नजरेस आली व ज्यांना पेशव्यांच्या लष्करांत घेण्यांत आलें असे हरभटजीचे तीन पुत्र होते. हे तीन पुत्र म्हणजेच गोविंद हरी, त्रिंबक हरी, व रामचंद्र हरी हे होत. गोविंद हरी हे बाजीरावसाहेब पेशवे यांच्या पथकांत राहिले. त्रिंबकपंत यांसही पेशवाई कारभारांत नोकरी मिळाली आणि रामचंद्र हरी

म्हणजेच आमच्या चरित्रनायकाचे वडील हे श्रीमंत चिमाजीआप्पासाहेब पेशवे यांचेकडे नोकरीस राहिले. अशा रीतीनें हरभटजींचे तिन्ही पुत्र चांगल्या तऱ्हेनें नोकरीस लागल्यामुळें हरभटजींना प्रपंचाची कांहींच काळजी राहिली नाहीं. हरभटजी यांनीं यानंतरचा आपला सर्व काळ तीर्थयात्रा करण्यांत घालविला. हरभटजींना आयुष्य फार लाभलें. शेवटीं त्यांनीं संन्यास घेतला व भिक्षान्नावर निर्वाह करून ते पुणें येथें राहूं लागले. अशा स्थितींत १७५० सालीं म्हणजे वयाचीं पंचाण्णव वर्षे झाल्यावर ते समाधिस्त झाले. पुणें येथें नदीकाठीं यांची समाघी आहे.

हरभटजींच्या पुत्रांपैकीं रामचंद्र हरी हे चरित्र नायक परशुरामभाऊ पटवर्धन यांचे वडील होत. रामचंद्र हरीचा जन्म स. १७०१।०२ चा असावा. म्हणजे व्यंकटराव घोरपडे व रामचंद्र हरी हे सारख्याच वयाचे होते. आरंभीं रामचंद्र हरी हे व्यंकटराव घोरपडे यांचेकडेच नोकरीला होते. नंतर सन १७२६।२७ च्या सुमारास ते पेशव्यांच्या नोकरींत शिरले. पेशव्यांकडे आल्यावर रामचंद्र हरीची महत्वाची कामगिरी पेशव्यांनीं केलेल्या जंजिऱ्यावरच्या स्वारींत दिसून येते. पेशव्यांची जंजिऱ्यावरची मोहीम सन १७३३–३६ पर्यंत चालली होती. या मोहिमेंत अनेक युद्धप्रसंग झाले. त्यांत गोवळकोटचें ठाणें काबीज करण्याची कामगिरी रामचंद्र हरीनें मोठ्या मर्दुमीनें केली. या प्रसंगाची सविस्तर हकिगत त्यानें चिमाजी-आप्पास कळविल्याचें एक पत्र पे. द. मध्यें छापलें आहे. (पे. द. ३–११०) ( टीप–रामचंद्र हरीच्या गोवळकोटच्या कामगिरी संबंधानें आणखी ही दोन पत्रें सविस्तर माहिती देणारीं आहेत. गोवळकोटची कामगिरी किती कठीण होती, त्यांत अडचणी काय होत्या व त्यांचें निवारण कसें करतां येईल व या कामाला मदत किती पाहिजे वगैरे सर्व हकिगत रामचंद्र हरीनें लिहिली आहे. (पे. द. भाग ३३–२४२।४३ )

जंजिऱ्यावरची ही मोहीम चालू असतांच कोल्हापूरच्या संभाजीनें व्यंकटराव घोरपड्याच्या इचलकरंजी या गांवावर हल्ला केला. व्यंकटराव घोरपडे या वेळीं थोरले बाजीराव साहेब यांच्या बरोबर उत्तरेंत स्वारींत

गेले होते. इचलकरंजी हा गांव सेनापती घोरपडे यांजकडून व्यंकटराव नारायण यांना मिळाला होता. या गांवावर हल्ला करण्याचें कोल्हापूरच्या संभाजीस कांहींच कारण नव्हतें. व्यंकटराव घोरपडे हे पेशव्यांचे आप्त असल्यामुळें त्याच्यावर आलेल्या संकटांत ' त्यांना मदत करणें हें पेशव्यांचें कर्तव्यच होतें. प्रथमतः चिमाजी आप्पानें शाहूला विनंती करून कोल्हापूरच्या संभाजीचा इचलकरंजीस उपद्रव थांबवावा असा प्रयत्न करून पाहिला. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तेव्हां इचलकरंजीस मदत करणें भाग पडलें. चिमाजीआप्पांनें जंजिऱ्याच्या स्वारींत असलेले रामचंद्र हरी यांस इचलकरंजीस पाठविलें. रामचंद्र हरी इचलकरंजीस गेल्यावर त्यांनीं कोल्हापूरकर संभाजीची दाणादाण उडवून दिली. असें होतांच संभाजीनें छत्रपती शाहूकडे तक्रार केली व कळविलें कीं रामचंद्र हरीची फौज तात्काळ माघारी बोलवावी. तसें न झाल्यास आपण आपल्या संरक्षणाकरितां निजामाची मदत मागूं. संभाजीनें शाहूस आणखी असें ही कळविलें कीं रामचंद्र हरीची फौज कोल्हापूर प्रांतांत येणें ही गोष्ट शाहू व संभाजी यांमध्यें झालेल्या वारणेच्या तहाविरुद्ध आहे. शाहूच्या कानावर ह्या गोष्टी जातांच त्यानें पेशव्यांस लिहून रामचंद्र हरीची फौज परत बोलाविली व संभाजीस भेटीस बोलावून हें प्रकरण तडजोडीनें मिटविलें. (टीप— पेशव्यांची फौज संभाजीवर गेली या मुळें छत्रपती शाहूस फार राग आल्याचें पे. द वरून दिसतें. या प्रकरणासंबंधानें पे. द. भा. ११ पत्र नं. २०,२१, २२, २३, २७, २९ हीं पत्रें सविस्तर माहिती देणारीं आहेत. या पत्रांतून पेशव्यांच्या अनेक हितसंबंधी लोकांनीं म्हणजे पुरंदरे, पिलाजी जाधव वगैरेनीं रामचंद्र हरीस तात्काळ परत बोलावण्या संबंधानें विनंति केलेली आढळते. संभाजी राजे हे शाहू छत्रपतींचे चुलत बंधु; तेव्हां त्यांच्यावर आपल्या नोकरानें स्वारी करणें हें शाहूला आवडण्यासारखें नव्हतेंच. त्या बाबतींत शाहूनें रागानें काढलेले उद्गार पिलाजी जाधवानें एका पत्रांत खालील प्रमाणें चिमाजीआप्पास कळविले आहेत. " स्वामी ( छत्रपती शाहू ) बोलिले कीं राजश्री पंत प्रधान फौज पाठवून बंधूसी युद्ध करितात.

ते आम्हासी युद्ध करावयास कोठें आंतर करतील. यास्तव राजश्री रामचंद्रपंतांस तिकडे ठेवावें हा विचार लिहिला होता. त्यास येथील मरजी या प्रकारची देखिली. यावर आपणास फौज आणावी हा विचार लिहिला. त्यास आपण फौज आणावयास लिहिलें आहे म्हणोन लिहिलें त्यास सांप्रत येथें वर्तमान या प्रकारें ऐकतों. यैसियास घोरपडयाचें जें होणार तें सुखरूप हो. येथील मरजी करतां राजश्री रामचंद्रपंतास अविलंबें पत्र पाठवून बोलावून आणविलें पाहिजे. ये विशीं अनमान केला न पाहिजे. यथील मरजीनुरूप झालें वर्तमान विदित व्हावें यास्तव लिहिलें असे' ( पे. द. भा. ११–२३). पिलाजी जाधवानें शाहूचे जे उद्गार वरील पत्रांत कळविले आहेत ते शाहूच्या बंधुप्रेमाच्या उकळीचे निदर्शक आहेत. या वरून पेशव्यांची वागणूक गैरशिस्त किंवा अन्यायाची होती असा अर्थ नव्हे. कारण कोल्हापूरच्या संभाजीनें घोरपडयावर स्वारी केली ही अन्यायाची गोष्ट होती याची जाणीव शाहूलाही होती, आणि म्हणूनच रामचंद्र हरीला परत बोलाविण्याचा जसा शाहूनें आंग्रह धरला त्या प्रमाणेंच त्यानें कोल्हापूरच्या संभाजीला साताऱ्यास बोलावून घोरपडे व संभाजी यांचा समेट करून दिला व संभाजीकडून इचलकरंजी हा गांव घोरपडयास कायम इनाम करून दिला. ही सविस्तर हकिगत ( पे. द. भाग ११–२९ या पत्रांत आली आहे ).

जंजिऱ्याच्या मोहिमेनंतर रामचंद्र हरीची ठळक कामगिरी वसईच्या मोहिमेंत झाली. पेशव्यांनीं वसईवर केलेली ही मोहोम सन १७३७–३९ सालीं चालली होती. या मोहिमेंत गोविंद हरी, त्रिंबक हरी, व रामचंद्र हरी, हे तिघे बंधू हजर होते. रामचंद्र हरी हे नेहमीं आघाडीवर असत. ठाण्याचा किल्ला घेण्यांत रामचंद्र हरीचा पराक्रम विशेष कारणीभूत झाला. १७३८ मध्यें मोहिमेचें काम जरा थंडावलें होतें. त्या अवधींत केळवें माहीमचे अधिकारी फडके यांच्यावर पोर्तुगीज लोकांनीं जोराचा हल्ला चढविल्यामुळें फडक्यांनीं केळवें माहीम सोडून पळ काढिला.ही हकिगत पेशव्यास समजतांच बाजीरावानें पुन्हा रामचंद्र हरीस वसईकडे पाठविलें. त्या वेळीं बाजीरावानें रामचंद्र

हरीस लिहिलेल्या पत्रावरून पेशवे रामचंद्र हरीची किंमत काय समजत होते हें दिसून येतें. या पत्रांतला कांहीं मजकूर खालीं दिला आहे. यावरून रामचंद्र हरीच्या कर्तृत्वाविषयीं पेशव्यांना केवढा भरंवसा वाटत होता हें दिसून येईल. " तुम्हांस रवाना केलें. साडे बत्तीसशें माणूस केळवें माहीमचे कार्यभागास तुम्हाकडे नेमिलें आहे. सरदारही तुमचे स्वाधीन आहेत. तर तुम्हीं सदरहू साडे बत्तीसशें माणसांनिशीं लगट करून केळवें माहीम हस्तगत करणें. झुंज भांडणाचे प्रसंगीं कितीएक माणूस सलाबत खाऊन पळून जातील. ऐशास लाखो खर्चून लोकांस द्यावे. आणि प्रसंगीं पळ काढतील त्या पाजींचा मुलाहिजा काय? साहेब काम करतील त्याचे उर्जीत करीतच आहेत. ज्या ज्या वाटा पळून जावयाच्या आहेत तेथें चौक्या ठेवून पळतील त्यास धरून परिच्छिन्न डोचकीं मारणें. सरदार प्यादा न म्हणणें. विना एखाद दुसरा सरदार परदेशी कानडा मारल्याविना माणूस गय धरून वर्तणार नाहीं. यास्तव हेच परवानगी जाणून पळ्याचे पारिपत्य करावें. फिरंग्याचे लोकांनीं बारें घेतलें आहे. तुम्हावरही तोंड टाकतील. त्यास जपून एकवार कापून काढणें." ( मराठी रियासत मध्यविभाग भाग १ पान २९५-९६ वरून). वरील पत्रावरून रामचंद्र हरीची लायकी पेशवे केवढी मानीत होते हें स्पष्ट दिसून येतें. रामचंद्र हरी केळवें माहीमकडे आल्यावर त्यानें तावडतोब माहीमला वेढा दिला. हा वेढा चालू असतां फिरंग्यानींही रामचंद्र हरीला जोरानें प्रतिकार केला. पण रामचंद्र हरीनें जातीनिशीं लढून फिरंग्याचे शेकडों लोक कापून त्यांना मागें हटविलें. य झटापटींत रामचंद्र हरीस गोळीची जखम लागली. केळवें माहीम प्रमाणें शिरगांव तारापूर या ठिकाणींही पेशव्यांच्या सैन्यानें वेढे दिलेच होते. या वेढ्याचें कामही रामचंद्र हरीच्याच देखरेखी खालीं चाललें होतें. हीं सर्व ठाणीं आणि अशेरीचें ठाणें हीं सन १७३८ च्या अखेरीस पेशव्यांच्या ताब्यांत आलीं, व तीं घेण्यामध्यें रामचंद्र हरीच्या पराक्रमाचा भाग विशेष होता. ( टीप--केळवें, माहीम, शिरगांव, तारापूर, अशेरी, वगैरे ठाणीं पेशव्यांच्या ताब्यांत आल्याची हकीगत पे. द. भाग २२ पत्रें ३८९ व ३९२

या पत्रांत सविस्तर आली आहे. शेवटीं चिमाजीअप्पानीं वसईला वेढा घातला. तेव्हां ३–४ महिने युद्धप्रसंग होऊन फिरंग्याना वसई सोडावी लागली. ही हकीगत पे. द. भाग २२–३९६ या पत्रांत आहे. वसई ताब्यांत आल्यामुळें मराठयांना किती आनंद झाला तें पत्रांतील कांहीं उद्-गारांवरून दिसून येतें. ते उद्गार खालील प्रमाणें आहेत " वैशाख वद्य मंदवारीं वसईंत आप्पाचे ठाणें गेलें. आप्पाहि गेले. फिरंगी निघोन गेले. वसई फत्ते जाली. सवस्थानच प्राप्त झालें. राज्यच एक सुटलें. फिरंगी स्थलापासून चेवले. ईश्वरें त्यास ( चिमाजीआप्पास ) स्थल दिलें. मोठी फत्ते झाली. यांनीही करोड रुपये खर्च केला. फार यत्न केला. ऐसा यत्न या राज्यांत कोणी केला नाहीं. ( पे. द. भा. २२–३९६ ) वरील पत्र ता. ७–५–१७३९ चें आहे. एवढया महत्वाच्या विजयांत रामचंद्र हरीचा भाग मोठाच होता. वसई ताब्यांत आल्यावर वसईवर मराठयांचें निशाण चढ-विण्याचा मान रामचंद्र हरीस मिळाला व याबद्दल त्यास वसईची फडणिशी मिळाली असें हरिवंशाच्या बखरींत नमुद आहे).

वसईची मोहीम आटपल्यावर पुढच्याच वर्षीं बाजीराव पेशवे वारले व लगेच १७४१ सालीं चिमाजीआप्पाही वारले. तथापि नानासाहेब पेशव्यांनींही रामचंद्र हरीचा योग्य उपयोग करून घेतला. नानासाहेबांनीं उत्तर हिंदुस्थानांत ज्या स्वाऱ्या केल्या त्यांत रामचंद्र हरी होते. तथापि या स्वाऱ्यांतील रामचंद्र हरीच्या कामगिरीचा ठळक उल्लेख असलेले कागद उपलब्ध नाहींत. नानासाहेबांनीं सन १७४१, १७४३, १७४५ आणि सन १७४८ या सालीं उत्तरेंत स्वाऱ्या केल्या. सन १७४८ च्या स्वारींतून परत येतांना नानासाहेबांनीं रामचंद्र हरी हा आपल्या भरंवशाचा सरदार उत्तरेंत शिंदे होळकरांबरोवर ठेविला. उत्तरेंत असतानांच सन १७४९ मध्येंच उदराची भावना होऊन रामचंद्र हरी मृत्यू पावले. त्यांचा काल अंतर्वेदींत ब्रम्हावर्तानजीक शिवराजपूर येथें फौजेची छावणी करून राहिले असतां झाला. (टीप– रामचंद्र हरीच्या मृत्यूसंबंधानें निश्चित उल्लेख उपलब्ध नाहीं. दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानांचा इतिहास या पुस्तकाचे

कर्ते बाळाजी प्रभाकर मोडक यांनीं रामचंद्र हरीच्या मृत्यूचें साल १७४० दिलें आहे. पण १७४० मध्यें परशुराम भाऊचा जन्म झाला हें निश्चित आहे, व नंतर रामचंद्र हरीला एक मुलगी झाली हें ही निश्चित आहे. म्हणून १७४० हें साल बरोबर नाहीं. कै० खरे शास्त्री यांनीं हरिवंशाच्या बखरींतील टीपेंत रामचंद्र हरीच्या मृत्यूचें साल १७४३ हें दिलें आहे. पण या वेळीं परशुरामभाऊ मुंजीस योग्य झाले होते असें बखरींतील उल्लेखांवरून दिसतें. सन १७४३ सालीं परशुरामभाऊ तीनच वर्षांचे होते म्हणजे मुंजीस योग्य नव्हते. म्हणून १७४३ हें मृत्यूचें सालही चूक दिसतें. शेवटीं परशुरामभाऊचे आद्य चरित्रकार श्री. निगुडकर यांनीं सन १७४९ हें मृत्यूचें साल दिलें आहे तेंच बरोबर असावें. सन १७४० चा परशुरामभाऊंचा जन्म नंतर त्याच्या पाठीवर झालेली बहीण आणि रामचंद्र हरीच्या मृत्यूच्यावेळीं परशुरामभाऊचें मुंजीचें वय ही एकंदर हकिगत लक्षांत घेतली म्हणजे सन १७४९ हेंच रामचंद्र हरीच्या मृत्यूचें बरोबर साल असावें असें वाटतें). रामचंद्र हरी हे स्वभावानें मोठे मानी आणि तापट असावे असें वाटतें. त्यांच्या पत्नीचें नांव जानकीबाई असें होतें. ह्या जानकीबाई पुण्याचे श्रीमंत खासगीवाले लिमये यांच्या घराण्यांतल्या होत्या. रामचंद्र हरीला बरेच दिवस पर्यंत संतती नव्हती. म्हणून त्यांनीं आपले वडील बंधु कृष्णंभट यांचे द्वितीय चिरंजीव पुरुषोत्तमराव दाजी यांस जवळ बाळगिलें होतें. पुरुषोत्तमराव दाजीचें सर्व लहानपण रामचंद्र हरीच्या संगतींत गेलें. त्यामुळें तेही मोठे शूर पराक्रमी असेच झाले. रामचंद्र हरीला फार उशीरां मूल झालें. पहिला मुलगा झाला. तेच परशुरामभाऊ होत. त्यांचा जन्म श्रावण शु. अष्टमीस शके १६६२ म्हणजे सन १७४० सालीं झाला. रामचंद्र हरीला नंतर एक कन्या झाली. तिचें नांव जिऊताई असें होतें. ती कोल्हटकर यांचे घराण्यांत दिली होती. रामचंद्र हरीच्या मृत्यूच्या वेळीं परशुरामभाऊ लहान असल्यामुळें रामचंद्र हरीच्या पागेची सर्व व्यवस्था पुरुषोत्तमराव दाजीच पहात असत. पुरुषोत्तमराव दाजी हे मोठे निस्पृह आणि बाणेदार होते. मरण समयीं रामचंद्र हरीला पुरुषोत्तमरावांनीं असें सांगितलें कीं

नों. नं.

परशुरामभाऊ लहान आहेत त्याची काळजी तुम्हीं करूं नका. ते मोठे होईपर्यंत त्यांचा कारभार करून नंतर सर्व व्यवस्था परशुरामभाऊंच्या स्वाधीन करीन. पुरुषोत्तमरावांनीं असें सांगतांच रामचंद्र हरीचें प्राणोत्क्रमण झालें असें बखरींत वर्णन आहे. रामचंद्र हरी हे हाडापेरानेंही बळकट असावे असें वाटतें. त्यांनीं एकदां उत्तर हिंदुस्थानांतील एका पटाईत ढालाइताला द्वंद्व युद्धांत ठार केल्याचें बखरींत नमूद आहे. शिवाय गोसावी यांनीं लिहिलेल्या परशुरामभाऊच्या पद्यात्मक चरित्रांत रामचंद्र हरीनें एका मस्तीस आलेल्या हत्तीला एकटचांनीं ठाण बद्ध केलें असें वर्णन आहे. रामचंद्र हरीच्या या जबरदस्त सामर्थ्यामुळेंच पेशव्यांनीं त्यास सरंजाम दिला असें वर्णन आहे.

असो. एकंदरींत रामचंद्र हरी हेही मोठे बळकट, पराक्रमी, शूर, निग्रही आणि स्वामिनिष्ठ असे होते यांत शंका नाहीं. मरण समयीं त्यांचें वय पन्नाशीच्या जवळ असावें.

--------

## प्रकरण २ रें

# परशुरामभाऊंचें बालपण

रामचंद्र हरीच्या मृत्यू नंतर त्यांचे वडील बंधु गोविंद हरी यांनीं श्रीमंतांकडे खटपट करून रामचंद्र हरीची पागा त्याचे अज्ञान चिरंजीव परशुरामभाऊ यांचें नांवें करून दिली. रामचंद्र हरीच्या पथकाची नोकरी बजावण्याचें काम गोविंद हरीनीं आपल्या अज्ञान पुतण्यातर्फें स्वतः पत्करिलें. गोविंद हरीनीं आपल्या पथकाची कामगिरी आपले चिरंजीव गोपाळराव यांजकडे सोंपविली व आपल्या दिमतीस पुरुषोत्तम दाजीला घेऊन परशुरामभाऊंची पागा सांभाळण्याचें काम स्वतःकडे घेतलें.

परशुरामभाऊंचें वय या वेळीं आठ नऊ वर्षांचें होतें. अर्थात हा त्यांच्या शिक्षणाचा काळ होता. त्यांचें शिक्षण त्यांचे चुलते गोविंद हरी व त्रिंबक हरी यांच्या देखरेखी खालीं झालें. त्या काळांत आजकाल प्रमाणें सार्वत्रिक शिक्षणाच्या शाळा नव्हत्या. मोडी बालबोध वाचतां येणें, मोडी अक्षर चांगलें वळणदार लिहितां येणें, नित्य व्यवहारास लागणारें गणित हिशोब वगैरे येणें, आणि विद्यार्थी ब्राम्हण असल्यास नित्यकर्मास आवश्यक असें वैदिक शिक्षण एवढेंच त्या काळच्या शिक्षणाचें क्षेत्र होतें. बौद्धिक शिक्षण याप्रमाणें झाल्यावर दुसऱ्या प्रकारचें शिक्षण म्हणजे युद्धकलेचें शिक्षण होय. या शिक्षणाला मात्र मराठेशाहींत फार महत्व होतें. तथापि या बावतीं-

तहो शिक्षण घेण्याची सार्वत्रिक अशी कांहीं सोय नव्हती. प्रत्यक्ष अनुभव हीच त्या वेळची खरी शाळा होती. या शिक्षणांत घोडयावर बसतां येणें, भाला, बर्ची, तरवार, पट्टा, इत्यादि हत्यारांचा उपयोग करितां येणें, दांडपट्टा वगैरे खेळतां येणें वगैरे गोष्टींचा समावेश होत असे. हें सर्व शिक्षण प्रत्यक्ष अनुभवानेंच घ्यावयाचें असे. मराठे शाहींत मराठे सरदारांचीं व शिलेदारांची मुलें वयांत आल्यावर, त्यांना घोडयावर चांगल्या तऱ्हेनें बसतां येऊं लागल्यावर युद्धाच्या अनुभवाकरितां म्हणून तीं मुलें मोठ्या सरदाराच्या देखरेखीखालीं स्वारीवर जात. आणि अशा तऱ्हेनें स्वारीवर जाऊन जाऊनच त्यांना युद्धकलेची सर्व माहिती होत असे. प्रत्यक्ष रणांगणावरचा अनुभव हीच त्या वेळची खरी शाळा होती.

परशुरामभाऊंचें वय अगदींच लहान असल्यामुळें रणांगण पहाण्याला त्यांना अजून थोडा अवकाश होता. या अवधींत त्यांच्या वयाप्रमाणें त्यांचें लिहिण्यावाचण्याचें शिक्षण त्यांचे चुलते गोविंद हरी व त्रिंबक हरी ह्यांच्या देखरेखीखालीं चालू होतें. तथापि परशुरामभाऊंच्या या अज्ञानावस्थेच्या काळांतसुद्धां परशुरामभाऊंच्या पथकाला लढाईची कामगिरी करणें प्राप्तच होतें. प्रसंग आला म्हणजे इतरांबरोबर भाऊंच्या पथकालाही कामगिरीवर हजर व्हावेंच लागे. असा प्रसंग लवकरच म्हणजे सन १७५१ सालींच उत्पन्न झाला. सन १७४९ मध्यें शाहू छत्रपती मरण पावल्यावर ताराबाईचे नातु रामराजे यांस नानासाहेबांनीं गादीवर बसविलें. ताराबाईचा विचार, रामराजाला हाताशीं धरून पेशव्यांचा कारभार उखडून टाकण्याचा होता. पेशव्यांविरुद्ध ताराबाईनें एक कट निर्माण केला व पेशव्यांशीं लढाई देण्याचा विचार चालविला. या उद्योगांत ताराबाईनें दमाजी गायकवाड यास पुढारी नेमिलें व दमाजीनें युद्धप्रसंगापर्यन्त पाळी आणली. नानासाहेब पेशवे हे त्या वेळीं सातान्यास नव्हते. त्यांचे सरदार महादोबा पुरंदरे हे साताऱ्यास असून पटवर्धनांचीं पथकें हीं पुरंदऱ्यांच्या मदतीस होतीं. दमाजी गायकवाडानें पुरंदऱ्यावर एकदम हल्ला चढविला. त्यांत प्रथमतः पुरंदऱ्यांनीं थोडी माघार घेतली. पण पटवर्धनांच्या पथकांनीं उलट खाऊन गायकवाडावर एवढ्या

निकराचा हल्ला चढविला कीं दमाजी गायकवाडाला साताऱ्याच्या किल्याच्या माचीपर्यंत पळ काढावा लागला, व त्याचा पूर्ण पराजय झाला. ( टीप– दमाजी गायकवाडाचा पराभव केल्याची हकिगत पे. द. भाग ६ पत्र नंबर १७१ व १८५ या पत्रांमध्यें आली आहे. त्यांवरून पटवर्धनांच्या पथकांनींच या लढाईमध्यें चांगली कामगिरी केल्याचें दिसून येतें. पटवर्धनांच्या फौजेमध्यें रामचंद्र हरीच्या मृत्यूपर्यंत रामचंद्र हरी हेच प्रमुख लढवय्ये होते असें दिसतें. रामचंद्र हरी कैलासवासी झाले तरी त्यांचाच लौकीक पुढें चालविण्यास पटवर्धन समर्थ आहेत अशा तऱ्हेचा मजकूर या लढाईसंबंधानें गोपाळराव पटवर्धनानें पेशव्यांस लिहिला आहे. गोपाळराव, पेशव्यांस लिहिलेल्या पत्रांत खालील प्रमाणें लिहितो ' काली दमाजी गायकवाड बाहेर आले होते. युद्ध जालें. चाकरी कोणाकोणाची जाली तें स्वामीनी परस्परें आइकिलें असेल, आणि स्वामीचें आगमन येथें झाल्यावर सारें लष्कर व रा. नाना निवेदन करतील. तीर्थस्वरूप रामचंद्रपंत कैलासवासीचें ईश्वर वाईट करणार नाहीं. येक रामचंद्रपंत गेले. आम्ही पांच सात रामचंद्रपंतांच्या जागां आहोंत. मरून बरें म्हणवूं. परंतु पळून स्वामीस तोंड दाखविणार नाहीं. बहादुरपुऱ्यावरील जुंजी सारे लोक जमा नव्हते. आठशें होते, परंतु तेथेंहि साहेब चाकरी उत्तमच जाली. ईश्वरी कृपेनें येथें दमाजीसच पुसावें आणि चाकरी होऊन आली असेल त्याची पाठ थोपटावी हेंच इच्छितों. त्याणेच आम्ही मारायाम-रायाची उमेद धरूं. उमेदी प्रमाणें सेवाही करूं.' ( पे. द. भाग ६–१८५). रामचंद्र हरी गेले तरी पेशव्यांची चाकरी करण्यास पटवर्धन कमी पडणार नाहींत याची जाणीव वरील पत्रांत गोपाळरावानें पेशव्यांस करून दिल्याचें दिसतें. सदरहू लढाई संबंधानें हरिवंशाचे बखरींत असें लिहिलें आहे कीं पेशव्यांचे दरबारांत लढाई होण्यापूर्वीं कोणी कुचेष्टेनें किंवा पटवर्धनांच्या मत्सरानें असें म्हणाला कीं रामचंद्र हरीचें पथक म्हणजे ' बाल परवेशी, रांडरोटी चालवावयाची. ' हें बोलणें रामचंद्र हरीच्या बायकोच्या कानावर जाऊन तिनें पुरुषोत्तम दाजीला बोलाविलें व रामचंद्र हरीचा लौकीक कायम राखण्यासाठीं पेशव्यांची कामगिरी योग्य रीतीनें बजावण्यास पुरुषोत्तम

दाजीस सांगितलें. पुरुषोत्तमदाजी हे मोठे स्वाभिमानी गृहस्थ होते. त्यांनीं बाईस सांगितलें कीं गायकवाडावरील स्वारींत योग्य चाकरी करून दाखवीन तरच तुला परत तोंड दाखवीन, नाहींतर पांढरे कावळे असतील तिकडे जाईन. इतकें झाल्यावर मोठ्या आवेशानें व त्वेषानें पुरुषोत्तम दाजी व गोपाळराव यांनीं गायकवाडावर मोठा निकराचा हल्ला चढविला व त्याला पिटाळून लाविलें).

सन १७५१ मध्यें गायकवाडाचा तंटा मिटल्यावर परशुरामभाऊंच्या पथकाला पुन्हां लढण्याचा प्रसंग सन १७५५ मध्यें आला. या वर्षीं श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनीं सावनुरावर स्वारी केली. या स्वारींत पटवर्धनांचीं पथकें हजर असून त्या सर्वांवर गोपाळराव हे मुख्य सरदार होते, व परशुरामभाऊंचें पथक पुरुषोत्तमरावदाजी ह्यांच्या हाताखालीं होतें. या स्वारींतही भाऊंच्या पथकानें चांगली कामगिरी केली व त्या पथकाचे मुख्य पुरुषोत्तमरावदाजी यांस तिराची जखम झाल्याचें हरिवंशाचे बखरींत नमूद आहे. या स्वारींतल्या कामगिरीबद्दल पुरुषोत्तमदाजीला पालखीचा सरंजाम मिळाला. सावनूरच्या नबाबानें खंडणी भरून तह केला. अशा रीतीनें सावनूरचें प्रकरण आटोपल्यावर नानासाहेब परत आले व पटवर्धनांच्या पथकांस त्यांनीं सौंध्यावर पाठविलें. सौंधेकराच्या किल्यास पटवर्धनानी वेढा देतांच सौंधेकर तहास आले, व त्यांनीं आठलक्ष खंडणी कबूल करून तह करून घेतला. या खंडणीपैकीं अडीचलक्ष रोख घेतले, व बाकीच्या रकमेकरितां मर्दनगड किल्ला ओलीस घेऊन पटवर्धनांचीं सैन्यें परत फिरलीं.

सौंध्याचें प्रकरण मिटल्यावर पटवर्धनांच्या फौजा मागें फिरल्या त्या बंकापूरनजीक हनगळ येथें छावणी करून राहिल्या होत्या. पावसाळ्याचे दिवस असल्यामुळें पावसाळा संपतांच या फौजांनीं श्रीरंगपट्टणाकडे जावें असा श्रीमंतांचा त्यांस हुकूम होता. सन १७५७ मध्यें श्रीमंतांनीं श्रीरंगपट्टणावर स्वारी करण्याचें ठरविलें व पटवर्धनांस पुढें पाठवून मागून आपण स्वतः व बळवंतराव मेहेंदळे असे श्रीरंगपट्टणावर चालून गेले. श्रीरंगपट्टण चारीबाजूंनीं वेढलें गेल्यामुळें म्हैसूरच्या नंद राजाचा नाइलाज

होऊन त्यानें पेशव्यांस बत्तीस लक्ष रुपये खंडणी देऊन तह करण्याचें ठरविलें. नंदराजानें बारालक्ष रुपये रोख दिले व बाकीच्या रकमेच्या फेडीस म्हैसूरपैकी बारा महाल पेशव्यांकडें लाऊन दिले. या स्वारींत ही पटवर्धनांची कामगिरी विशेष झाली व स्वारीच्या यशाचें सर्व श्रेय पटवर्धनांनाच असल्याचा कागदोपत्रीं उल्लेख आहे.

श्रीरंगपट्टणवरील ही स्वारीं १७५७ च्या सुमारास झाली म्हणजे या वेळीं परशुरामभाऊंचें वय १७ वर्षांचें होतें. सरदार घराण्यांतलीं मुलें सोळा सतरा वर्षांचीं झालीं म्हणजे त्यांना रणक्षेत्रावर पाठविण्याची परंपरा त्या काळीं होती. त्या परंपरेला अनुसरून या स्वारींत पटवर्धनांच्या घराण्यांतली पंधरा सोळा वर्षांच्या वयाचीं मुलें स्वारीवर गेलीं होतीं व त्यांत परशुरामभाऊही होते. परशुरामभाऊशिवाय दुसरी तरूण मंडळी म्हणजे गोपाळरावांचें धाकटे बंधू वामनराव बाबासाहेब व पुतणे श्रीपतराव मोरेश्वर असे होते. हीं तीन तरूण मुलें हौसेनें स्वारीवर गेलीं होतीं. ( टीप :– लहान मुलें स्वारीवर गेल्यामुळें त्यांच्या घरांतील वडील माणसांना किती काळजी वाटत असते या संबंधानें पटवर्धनांच्या घरांतील वडील मंडळी म्हणजे त्रिंबक हरी व गोविंद हरी यांनी काढलेले उद्‌गार खरे संग्रहांत नमूद आहेत ते खालीस प्रमाणें. त्रिंबक हरी गोपाळरावास लिहिलेल्या एका पत्रांत लिहितात " चि. वामनराव यांस आशिर्वाद. मुलुखगिरीचें सुख कळलें. बहुत काय लिहिणें हे आशिर्वाद. चि. परशुराम यांस आशिर्वाद, तुम्हांस आम्हीं बहुत प्रकारें सांगितलें कीं, श्रीमंतांची चाकरी घडेल चार महिने फिराल. तुम्हीहि ऐकिलें. ईश्वरें स्वस्तिक्षेम आणलेस लक्षजोडी जाहली " ( खरे. प. नं. ६ ). गोविंद हरीनेंही याच अर्थाचें पत्र लिहिलें आहे).

पटवर्धनांचा सरंजाम हा मूळ गोविंद हरीच्या नांवें असून त्यांत रामचंद्र हरी व त्रिंबक हरो हे पोटहिस्सेदार होते. या वेळीं पटवर्धनांची फौज इतलाखी म्हणजे सरकारांतून रोख तनखा मिळणारी होती. पुढें सन १७६४ सालांत सैन्याचे खर्चास मुलुख तोडून देऊन गोविंद हरीच्या नांवें

सरंजाम झाला. या सरंजामांत गोविंद हरीनें शेचाळिसशें, परशुराम रामचंद्र यानें चौवीसशें व त्रिंबक हरीनें एक हजार मिळून एकंदर पटवर्धनांनीं आठ हजार स्वार ठेवावयाचे होते. सर्व पटवर्धनांचा मिळून एक पुढारी सरदार असे. त्या वेळीं गोपाळराव हे मुख्य सरदार होते. परशुराम भाऊ व त्रिंबक हरीचे पुत्र निळकंठराव यांचीं पथकें सरंजामी सरदार म्हणून होतीं. गोपाळराव व त्यांचे बंधु वामनराव यांच्या नंतर सर्व पटवर्धनांचें पुढारीपण परशुरामभाऊंकडे आलें हें पुढच्या इतिहासावरून दिसून येईलच.

---------

## प्रकरण ३ रें

# परशुरामभाऊंचें रणांगणावर पदार्पण.

मागील प्रकरणांत श्रीरंगपट्टणांवरील स्वारींत परशुरामभाऊ पहिल्यानेंच गेल्याचें सांगितलें आहे. पहिल्यानेंच स्वारीवर गेल्यामुळें भाऊंचे चुलते गोविंद हरी व त्रिंबक हरी यांना क्रिती काळजी लागली होती हेंहि त्या ठिकाणीं सांगितलेंच आहे. या स्वारीनंतर पुढें पटवर्धन ज्या ज्या स्वारीवर गेले त्या प्रत्येक ठिकाणीं परशुरामभाऊ आपल्या पथकासह हजर असत. पटवर्धनांचीं तीन्हीं पथकें प्रत्येक स्वारींत हजर असत. सर्व पथकांना म्हणून एक पुढारी असे ह्या वेळीं गोविंद हरीचे चिरंजीव गोपाळराव हे पटवर्धनांच्या पथकाचे पुढारी होते. गोपाळरावानें ज्या ज्या स्वाऱ्या केल्या त्यांत भाऊंचाही पराक्रम असल्यामुळें गोपाळरावांच्या पुढारपणाखालीं झालेल्या स्वाऱ्यांची थोडक्यांत हकिगत येथें देणें प्राप्त आहे.

म्हैसूरच्या नंदराजानें पेशव्यांकडे खंडणीच्या वसुली करितां म्हैसूरचे बारा महाल लावून दिले होते. पण हैदर नाइकाच्या मदतीनें नंदराजानें म्हैसूरच्या महालांतून मराठ्यांचीं ठाणीं उठवून लाविलीं. अर्थातच नंदराजाला व हैदरला प्रतिकार करण्या करितां गोपाळरावास तिकडे जाणें प्राप्त होतें. पण इतक्यांत पेशव्यांची निजामाशीं कटकट उत्पन्न झाली, व म्हैसूरचें

काम बाजूस ठेवून गोपाळरावास पेशव्यांच्या आज्ञेप्रमाणें महाराष्ट्रांत यावें लागलें. निजामानें पेशव्यांस द्यावयाचा पंचवीस लाखांचा मुलूख न दिल्यामुळें ही लढाई उत्पन्न झाली होती. रामचंद्रराव जाधव व निजाम असे एक होऊन मराठ्यांशीं सामना देण्यास तयार झाले होते. पण पटवर्धनांनीं निजामाला शिंदखेडला कोंडल्यामुळें त्याचा नाइलाज होऊन तो तहास आला. साखरखेडें येथें तह होऊन पेशव्यांस नळदुर्गचा किल्ला व पंचवीस लाखांचा मुलूख मिळाला. या लढाईंत गोपाळराव, त्याचे वडील गोविंद हरी, पुरुषोत्तमराव दाजी, व परशुरामभाऊ हे सर्व प्रमुख पटवर्धन हजर होते. ही लढाई सन १७५८ मध्यें झाली.

शिंदखेडच्या लढाईंतून मोकळे झाल्यावर नंदराजाचा समाचार घेण्याकरितां पेशव्यांनीं गोपाळरावाची रवानगी केली. सर्व पटवर्धनांखेरीज आणखी आनंदराव रास्तेहि या स्वारींत पटवर्धनांच्या मदतीस गेले होते. ही स्वारी सन १७५९ मध्यें झाली. या स्वारींत पहिल्या धडाक्यासरशींच गोपाळरावानें नंदराजाचा अंमल उठवून आपला अंमल बसविला, व बेंगरुळास वेढा घालून चेन्नापट्टणचा किल्ला घेतला. पण हैदरानें हा किल्ला परत घेतला आणि मोठें सैन्य जमवून मराठ्यांवर छापे घालण्याचा सपाटा चालविला. मराठ्यांच्या स्वारांना जंगलांत जेथें जातां येणार नाहीं अशा ठिकाणीं आपल्या सैन्याची छावणी देऊन मराठ्यांवर छापे घालण्यांचे हैदरानें अनेक प्रयत्न केले. पण गोपाळरावाच्या सावधपणामुळें हैदर व नंदराजा यांना यश आलें नाहीं. या प्रमाणें सुमारें तीन महिने सारख्या झटापटी होऊन हैदर व नंदराजा हे तहास आले. पेशव्यांना खंडणीबद्दल हे म्हैसूरचे महाल नंदराजानें लाऊन दिले होते. नंदराजा व हैदर हे बत्तीस लक्ष खंडणी देण्यास तयार झाल्यामुळें गोपाळरावानें खंडणी घेऊन महालांवरील पेशव्यांचा हक्क सोडण्याचें ठरविलें. पण हा तह नानासाहेब पेशव्यांना पसंत पडला नाहीं.

म्हैसूरचें प्रकरण मिटल्यावर पुन्हां निजामाशीं कटकट उत्पन्न झाली. शिंदखेडच्या लढाईंत कबूल केलेला पंचवीस लक्षांचा मुलूख निजामानें दिला

नव्हता. म्हणून निजामाशीं पुन्हां लढाई करणें प्राप्त झालें. सन १७५९।६० सालीं उदगीर येथें लढाई होऊन निजामाचा पूर्ण मोड झाला. निजामानें तह करून पेशव्यांस ६० लक्षांचा मुलूख व विजापूर, दौलताबाद, अहमदनगर हीं शहरें व अशीरगड आणि दौलताबाद हे किल्ले देण्याचें कबूल केलें. वरील प्रमाणें तह होतांच दौलताबादचा किल्ला ताब्यांत घेण्याची कामगिरी श्रीमंतांनी गोपाळरावास सांगितली. किल्ला अवघड असल्यामुळें किल्लेदारास कांहीं पैसा देऊन किल्ला घेण्याचा गोपाळरावाचा विचार होता. पण गोपाळरावाचें हें करणें श्रीमंतांस पसंत पडलें नाहीं. त्यांनीं हल्ला करून किल्ला घेण्याबद्दल गोपाळरावास खरमरीत पत्र लिहिलें. गोपाळरावानें हल्ला करून किल्यास मोर्चे बसविले असें होतांच किल्लेदारानें घाबरून किल्ला ताब्यांत दिला. दौलताबाद घेतल्यावर स्वतः नानासाहेब किल्यावर आले व त्यांनीं किल्ला घेतल्याबद्दल संतोष व्यक्त केला.

उदगीरची लढाई संपतांच प्रसिद्ध पानिपतची लढाई उत्पन्न झाली. या स्वारींत पटवर्धन नव्हते. पण सदाशिवरावभाऊंच्या मदतीकरितां नानासाहेब उत्तरेंत निघाले. त्यांचे बरोबर गोपाळराव पटवर्धन गेले होते. श्रीमंत नानासाहेब भेलशापर्यंत गेले. तेथेंच त्यांना पानिपतच्या पराजयाची हकिगत समजली, आणि पानिपतहून परत आलेले लोकही भेटले. त्यांच्या आग्रहास्तव नानासाहेब परत फिरले, व पुण्यास आल्यावर सदाशिवरावाचा शोक करीत करीत ता. २३-६-१७६१ रोजीं त्यांनीं कैलासवास केला. नानासाहेबांनंतर माधवराव गादीवर आले. त्यांचें वय लहान होतें. स्वाभावीकच राघोबादादास प्रमुखपण आलें. राघोबादादा व सखाराम बापू हे एकमताचे असून पटवर्धनांचें व त्यांचें ठीक नव्हतें. पानिपतच्या पराभवामुळें मराठे हलके झाले अशा समजुतीनें निजामानें पुन्हां कटकट करण्यास सुरवात केली. उदगीरच्या लढाईत गेलेला मुलूख परत मिळविण्याची त्याची महत्वाकांक्षा होती. पण पेशव्यांनीं तात्काळ निजामावर चढाई करून त्याचा मेदकच्या लढाईंत पूर्ण पराभव केला. या लढाईंत गोपाळराव पटवर्धन व इतर सर्व पटवर्धन मंडळी यांनीं फारच पराक्रम केला. निजामानें या वेळीं

हिंदूंच्या क्षेत्रांचाही विध्वंस केला होता, त्यामुळें त्याच्या बाजूचे कांहीं मराठे सरदारहि फुटून पेशव्यांना येऊन मिळाले. शेवटीं उरळी मुक्कामीं तह होऊन ही लढाई संपली. हा उरळीचा तह सन १७६१ च्या डिसेंबरांत झाला. हा तह परस्परांस कांहीं न देतां घेतां असा झाला. यामुळें पटवर्धन आदि सरदार फार नाखूष झाले. ( टीप-- उरळीच्या तहाच्या वेळीं सर्व सरदार निजामाला चांगलाच हलका करावा असें म्हणत होते. पण माधवराव लहान असल्यामुळें राघोबा व सखारामबापू यांना राज्यकारभारांत महत्व आलें होतें. आणि त्यांनीं पुढें मागें निजामाचा आपणाला माधवरावाविरुद्ध उपयोग होईल म्हणून गुळमुळित तह केला. या संबंधानें नारोशंकरानें आपल्या पुतण्यास लिहिलेल्या पत्रांत खालील प्रमाणें लिहिलें आहे. ' हरएक प्रसंगी मोंगलास ( निजामास ) शिकस्त दिली असतां, सरदारांची मर्जी नसतां श्रीमंत व सखारामबापू आपल्या विचारें मोंगलावर कृपावंत झाले. '. ( ऐ. पत्रव्यवहार ले० १०३ ) निजामावर केलेले हे उपकार त्यानें राघोबाला माधवरावाविरुद्ध मदत करून फेडले हें पुढील इतिहासावरून दिसून येईलच).

उरळीच्या तहामुळें पेशव्यांच्या दरबारांत बरेच तंटे बखेडे माजले. दादासाहेब व सखारामबापू यांचा एक पक्ष होऊन माधवराव, त्रिबकराव पेठे व पटवर्धन असा दुसरा पक्ष झाला. शेवटीं प्रकरण लढाईवर येऊन घोडनदी मुक्कामीं चुलत्या पुतण्याची लढाई झाली. या लढाईंत नेमका निजाम उरळीच्या तहाप्रमाणें दादासाहेबांच्या मदतीस आला हें सांगावयास नकोच. माधवरावांची सर्व भिस्त पटवर्धनांवर होती. पण सखारामबापूनें पटवर्धनांच्या फौजेंत बेसुमार फितूर केल्यामुळें पटवर्धनांचा नाइलाज झाला. सन १७६२ च्या नोव्हेंबरांत दादा व माधवराव यांच्या घोडनदी व आळेगांव या ठिकाणीं लढाया झाल्या. पण फौजेंतील फितुरामुळें माधवरावांना माघार घ्यावी लागून दादाशीं तहाचें बोलणें करण्याचा प्रसंग आला. या लढाईंत गोपाळराव, परशुरामभाऊ, निळकंठराव, वामनराव, कान्हेरराव वगैरे सर्व प्रमुख पटवर्धन मंडळी होती. पण माधवरावाचा पराभव

झाल्यामुळें माधवराव दादांच्या स्वाधीन झाले व पटवर्धनांची मात्र मोठी तारांबळ उडाली. दादाचें व पटवर्धनांचें बरें नसल्यामुळें आणि दादाच्या स्वाधीन माधवराव झाल्यामुळें पटवर्धनांना पेशव्यांच्या राज्यांत स्थानच राहिलें नाहीं. दादाकडे मुखत्यारी येतांच त्यानें पटवर्धनांचा सरंजाम जप्त करण्याचें ठरविलें, व पटवर्धनांना मिरज हें ठिकाण राहावयास मिळालें होतें तें खालीं करण्याबद्दल दादानें गोविंद हरीस लिहिलें. पटवर्धन स्वखुशीनें मिरज सोडण्यास तयार नव्हते. दादाने मिरजेवर हल्ला करून पटवर्धनांना हाकून लाविलें. शिवाय दादानें आबा पुरंदरे यास पाठवून गोपाळरावावरहि हल्ला चढविला. गोपाळरावाचा नाइलाज होऊन त्याला पळ काढावा लागला. गोपाळराव, वामनराव, परशुरामभाऊ वगैरे सर्वांना मराठी राज्यांतून बाहेर पडावें लागलें, व ते सर्व निजामाच्या आश्रयास गेले. दादाच्या बेशिस्त कारभारामुळें पटवर्धनांप्रमाणें इतर अनेक सरदारहि निजामाला मिळाले. भवानराव प्रतिनिधी, गमाजी यमाजी, पिराजी नाईक निंबाळकर, जानोजी भोसले वगैरे सरदार निजामाला मिळाले. राघोबाच्या मूर्ख राजकारणाचा हा परिणाम होता. याचा फायदा घेण्यास निजाम चुकला नाहीं. इतके सरदार आपणाकडे आल्यावर त्यानें पेशव्यांशीं युद्ध देण्याची तयारी चालविली. हें युद्ध सन १७६३ मध्यें राक्षसभुवन येथें झालें. या युद्धांत माधवरावांनीं मोठा पराक्रम करून निजामाच्या कचाटींत सांपडलेल्या दादासाहेबांना सोडविलें व निजामाचा प्रमुख सेनापती विठ्ठल सुंदर हा ठार मारला. त्यामुळें निजामाची दाणादाण होऊन त्याला तहास यावें लागलें. निजामानें या तहांत पेशव्यास ब्यायशीं लक्षांचा मुलूख देण्याचें कबूल केलें. निजामाला लढाईचें हें बळ त्याला मिळालेल्या मराठे सरदारामुळें प्राप्त झालें होतें, हें लक्षांत घेऊन माधवरावांनीं निजामाकडे गेलेल्या सर्व मराठे सरदारांना परत समजूत करून मराठेशाहींत आणलें, त्यांतच पटवर्धन मंडळीं आली व आपल्या कामावर हजर झाली. राक्षसभुवनच्या या लढाईत माधवरावांचें तेज विशेष चमकल्यामुळें राज्यकारभारांत माधवरावांना पुढारीपण आलें, व दादा-

साहेबांचें वजन नाहींसें होऊन त्यांना माधवंरावाच्या तंत्रानें वागण्याची पाळी आली.

राघोबाचे चाळे थांबून तो जाग्यावर बसतांच व निजामाचा बंदोबस्त होतांच माधवरावांना हैदराकडे लक्ष देणें जरूर झालें. या अवधींत हैदर स्वस्थ बसला नव्हता. त्यानें मागील स्वारींत गोपाळरावाला बत्तीस लक्ष रुपये देऊन म्हैसूरचे महाल सोडविले होते. त्यामुळें त्याला म्हैसूरांत फार महत्व प्राप्त झालें होतें. त्याचा फायदा घेऊन त्यानें नदराजाला कैदेंत टाकलें व म्हैसूरचें राज्य बळकावून तें उत्तर दक्षिणेकडे वाढविण्याचा सपाटा चालविला. या उद्योगांत त्यानें पेशव्यांच्या ठाण्यांना उपद्रव दिला व पेशव्यांना खंडणी देणाऱ्या संस्थानिकांवरही हल्ले करण्यास सुरवात केली. अशी स्थिति झाल्यामुळें हैदराची उपेक्षा करणें शक्यच नव्हतें. माधवरावांनीं निजामाच्या कामगिरींतून मोकळे होतांच ताबडतोब हैदरवर स्वारी करण्याचें ठरविलें. या स्वारींत पटवर्धनांची आठ हजार फौज असून त्यांत गोपाळराव. परशुरामभाऊ, वामनराव, निळकंठराव, कान्हेरराव वगैरे सर्व पटवर्धन मंडळी हजर होतीं. पेशव्यांची ही स्वारी सन १७६४।६५ या सालीं झाली. पेशव्यांची फौज कर्नाटकांत शिरतांच आघाडीवर असलेल्या पटवर्धनांच्या फौजेनें विजापूर, हलसंगी, सावशी, कुंदगोळ, शिरहट्टी वगैरे ठाणीं घेतलीं. माधवरावांच्या खासास्वारीनेंहि बेळहट्टी व मुळगुंद हीं ठाणीं घेऊन तें सावनुरावर आले. हैदर मासूरच्या बारींत छावणी करून होता. तेथून तो पटवर्धनांच्या फौजेवर चालून आला. रट्टेहळ्ळी येथें मोठी लढाई होऊन त्यांत हैदराचा पूर्ण पराजय झाला- माधवरावांनींहि धारवाडचा किल्ला घेऊन अनवडी येथील हैदराचे छावणीस वेढा दिला. हैदर पळून बिदनुरास गेला. तेथेंहि श्रीमंतांनीं त्याचा पाठलाग करून वेढा दिल्यामुळे हैदराचा नाईलाज होऊन तो तहास कबूल झाला. त्यानें पेशव्यांस बत्तीस लाख रुपये खंडणी दिली व पेशव्यांचे महाल आणि पेशव्यांस खंडणी देणारे संस्थानीक यांना उपद्रव न देण्याचें कबूल केलें.

हैदराचा स्वभाव कबूल केलेला तह पाळावा अशा तऱ्हेचा नव्हता.

झाल्यामुळें माधवराव दादांच्या स्वाधीन झाले व पटवर्धनांचो मात्र मोठी तारांबळ उडाली. दादाचें व पटवर्धनांचें बरें नसल्यामुळें आणि दादाच्या स्वाधीन माधवराव झाल्यामुळें पटवर्धनांना पेशव्यांच्या राज्यांत स्थानच राहिलें नाहीं. दादाकडे मुखत्यारी येतांच त्यानें पटवर्धनांचा सरंजाम जप्त करण्याचें ठरविलें, व पटवर्धनांना मिरज हें ठिकाण राहावयास मिळालें होतें तें खालीं करण्याबद्दल दादानें गोविंद हरीस लिहिलें. पटवर्धन स्वखुशीनें मिरज सोडण्यास तयार नव्हते. दादाने मिरजेवर हल्ला करून पटवर्धनांना हाकून लाविलें. शिवाय दादानें आबा पुरंदरे यास पाठवून गोपाळरावावरहि हल्ला चढविला. गोपाळरावाचा नाइलाज होऊन त्याला पळ काढावा लागला. गोपाळराव, वामनराव, परशुरामभाऊ वगैरे सर्वांना मराठी राज्यांतून बाहेर पडावें लागलें, व ते सर्व निजामाच्या आश्रयास गेले. दादाच्या बेशिस्त कारभारामुळें पटवर्धनांप्रमाणें इतर अनेक सरदारहि निजामाला मिळाले. भवानराव प्रतिनिधी, गमाजी यमाजी, पिराजी नाईक निंबाळकर, जानोजी भोसले वगैरे सरदार निजामाला मिळाले. राघोबाच्या मूर्ख राजकारणाचा हा परिणाम होता. याचा फायदा घेण्यास निजाम चुकला नाहीं. इतके सरदार आपणाकडे आल्यावर त्यानें पेशव्यांशीं युद्ध देण्याची तयारी चालविली. हें युद्ध सन १७६३ मध्यें राक्षसभुवन येथें झालें. या युद्धांत माधवरावांनीं मोठा पराक्रम करून निजामाच्या कचाटींत सांपडलेल्या दादासाहेबांना सोडविलें व निजामाचा प्रमुख सेनापती विठ्ठल सुंदर हा ठार मारला. त्यामुळें निजामाची दाणादाण होऊन त्याला तहास यावें लागलें. निजामानें या तहांत पेशव्यास ब्यायशीं लक्षांचा मुलूख देण्याचें कबूल केलें. निजामाला लढाईचें हें बळ त्याला मिळालेल्या मराठे सरदारामुळें प्राप्त झालें होतें, हें लक्षांत घेऊन माधवरावांनीं निजामाकडे गेलेल्या सर्व मराठे सरदारांना परत समजूत करून मराठेशाहींत आणलें, त्यांतच पटवर्धन मंडळीं आली व आपल्या कामावर हजर झाली. राक्षसभुवनच्या या लढाईत माधवरावांचें तेज विशेष चमकल्यामुळें राज्यकारभारांत माधवरावांना पुढारीपण आलें, व दादा-

साहेबांचें वजन नाहींसें होऊन त्यांना माधवरावाच्या तंत्रानें वागण्याची पाळी आली.

राघोबाचे चाळे थांबून तो जाग्यावर बसतांच व निजामाचा बंदोबस्त होतांच माधवरावांना हैदराकडे लक्ष देणें जरूर झालें. या अवधींत हैदर स्वस्थ बसला नव्हता. त्यानें मागील स्वारींत गोपाळरावाला बत्तीस लक्ष रुपये देऊन म्हैसूरचे महाल सोडविले होते. त्यामुळें त्याला म्हैसूरांत फार महत्व प्राप्त झालें होतें. त्याचा फायदा घेऊन त्यानें नदराजाला कैदेंत टाकलें व म्हैसूरचें राज्य बळकावून तें उत्तर दक्षिणेकडे वाढविण्याचा सपाटा चालविला. या उद्योगांत त्यानें पेशव्यांच्या ठाण्यांना उपद्रव दिला व पेशव्यांना खंडणी देणाऱ्या संस्थानिकांवरही हल्ले करण्यास सुरवात केली. अशी स्थिति झाल्यामुळें हैदराची उपेक्षा करणें शक्यच नव्हतें. माधवरावांनीं निजामाच्या कामगिरींतून मोकळे होतांच ताबडतोब हैदरवर स्वारी करण्याचें ठरविलें. या स्वारींत पटवर्धनांची आठ हजार फौज असून त्यांत गोपाळराव. परशुरामभाऊ, वामनराव, निळकंठराव, कान्हेरराव वगैरे सर्व पटवर्धन मंडळी हजर होतीं. पेशव्यांची ही स्वारी सन १७६४।६५ या सालीं झाली. पेशव्यांची फौज कर्नाटकांत शिरतांच आघाडीवर असलेल्या पटवर्धनांच्या फौजेनें विजापूर, हलसंगी, सावशी, कुदगोळ, शिरहट्टी वगैरे ठाणीं घेतलीं. माधवरावांच्या खासास्वारीनेंहि बेळहट्टी व मुळगुंद हीं ठाणीं घेऊन तें सावनुरावर आले. हैदर मासूरच्या बारींत छावणी करून होता. तेथून तो पटवर्धनांच्या फौजेवर चालून आला. रट्टेहळ्ळी येथें मोठी लढाई होऊन त्यांत हैदराचा पूर्ण पराजय झाला- माधवरावांनींहि धारवाडचा किल्ला घेऊन अनवडी येथील हैदराचे छावणीस वेढा दिला. हैदर पळून बिदनुरास गेला. तेथेंहि श्रीमंतांनीं त्याचा पाठलाग करून वेढा दिल्यामुळे हैदराचा नाईलाज होऊन तो तहास कबूल झाला. त्यानें पेशव्यांस बत्तीस लाख रुपये खंडणी दिली व पेशव्यांचे महाल आणि पेशव्यांस खंडणी देणारे संस्थानीक यांना उपद्रव न देण्याचें कबूल केलें.

हैदराचा स्वभाव कबूल केलेला तह पाळावा अशा तऱ्हेचा नव्हता.

पेशव्यांच्या मांडलीक संस्थानांना आपण उपद्रव देणार नाहीं ही गोष्ट त्यानें तहांत कबूल केली होती, तरी ती अट त्यानें पाळली नाहीं. चित्रदुर्ग, हरपनहळी वगैरे ठिकाणांस त्यानें पुन्हां उपद्रव देण्यास सुरवात केली. चित्रदुर्ग हे पेशव्यांचे मांडलीक संस्थान होतें. त्यावर हैदरनें स्वारी केल्यामुळें पुन्हां हैदरावर स्वारी करण्याचा पेशव्यांवर प्रसंग आला. पेशव्यांची ही हैदरावरील दुसरी स्वारी सन १७६६-६७ या सालीं झाली. हैदरावरील या स्वाऱ्यांमध्यें पटवर्धनांची फौज नेहमींच आघाडीवर असे. स्वारी करण्याचें ठरल्याबरोबर सर्व पटवर्धन मंडळी गोपाळरावांच्या नेतृत्वाखालीं आघाडीवर निघाली व श्रीमंत माधवराव पाठीमागून लगेच निघाले. हैदर बल्लारीस वेढा घालून बसला होता. पण गोपाळराव स्वारीवर निघाले हें कळतांच तो तेथून निसटला. श्रीमंत माधवराव गलगल्यावरून सुरापुराकडे आले. सुरापूरची खंडणी वसूल करून श्रीमंत तालीकोटकडे आले. तेथें पटवर्धनांची व श्रीमंतांची गांठ पडली. गोपाळरावांची गाठ पडतांच श्रीमंतांनीं त्यांस आजूबाजूच्या मुलखांतून खंडण्या वसूल करण्यांकरितां पाठविलें. गदवाल, कांचनगड, बल्लारी, शिदनूर, अदवानी, कर्नूल, कनकगिरी वगैरे संस्थानांतून गोपाळरावानें खंडण्या वसूल केल्या. इकडे श्रीमंतांनीं थेट हैदराच्या मुलुखांत प्रवेश केला. हैदरानें स्वराज्यापैकीं शिऱ्याचा सुभा बळकाविला होता. व तेथें आपला मेहुणा मीररेझाखान याला फौजबंद ठेविलें होतें. या मीररेझानें श्रीमंतांच्या फौजेशीं लढाई दिली. पण त्याच्या फौजेची कत्तल होऊन त्याला शरण यावें लागलें. मीररेझाचा निकाल लागल्यावर गोपाळरावानें चिकबाळापूर घेतलें व श्रीमंतांनीं मदगिरी, चेनायदुर्ग, म मडकशिरें हीं ठाणीं घेतलीं. नंतर गोपाळरावांची फौज श्रीमंतांच्या फौजेस येऊन मिळाली. दोन्ही फौजा एक झाल्यावर त्यांनीं देवनहल्ली, होसकोटें, कोल्हार हीं ठाणीं घेतलीं. अशा रीतीनें हैदरनें बळकाविलेला मराठी राज्यांतला सर्व मुलूख श्रीमंतांनीं पुन्हां काबीज केला. इतकेंच नव्हे तर कांहीं नवीन मुलूखही मिळविला. इतकें झाल्यावर हैदराचा नाईलाज होऊन तो तहास आला. तहांत असें ठरलें कीं नानासाहेबांच्या वेळीं जितका मुलूख मराठेशाहींत

होता तितका श्रीमंतांनीं ठेवावा व जास्त जिंकला असेल तो हैदरास परत द्यावा. हैदरनें पेशव्यांस सदतीस लक्ष खंडणी द्यावी. आणि मुराररराव घोरपडे व सावनूरचें संस्थान यांस हैदरनें उपद्रव देऊं नये. असा करार झाल्यावर मराठी फौजा देशीं परतल्या व हैदरावरील या स्वारीचें काम पुरें झालें.

माधवराव हैदरावरील स्वारीवर असतांना दादासाहेब उत्तर हिंदुस्थानांत स्वारीवर गेले होते. पण दादाची मदार ज्या मल्हारराव होळकरावर तो मल्हारराव मरण पावल्यामुळें दादाच्या हातून कांहींच कामगिरी न होतां त्यांना हात हलवीतच परत यावें लागलें. परत आल्यावर पुतण्यांशीं बखेडा करावा असा त्यांचा बेत होता, व त्या प्रमाणें ते फौजही जमा करूं लागले. श्रीमंत माधवरावांनीं हें पहातांच पटवर्धनांना तात्काळ फौजेसह बोलाविलें. गोपाळराव तीन हजार स्वारांसह येऊन दाखल झाले. गोपाळराव फौज घेऊन येतात हें समजतांच दादासाहेब अशीरगडाकडे जाऊं लागले. फौज मागें ठेवून माधवराव आपणांस भेटत असल्यास आपली भेटण्याची तयारी असल्याचें दादासाहेबांनी कळविलें. पटवर्धन मंडळीस ही गोष्ट कबूल नव्हती. पण माधवराव हे मोठे धाडशी व आत्मविश्वासाचे असल्यामुळें त्यांनीं फौज मागें ठेवून गोपाळराव, परशुरामभाऊ, निळकंठराव वगैरे खाशा मंडळीसह दादाची भेट घेण्याचें ठरविलें. ठरल्याप्रमाणें भेट झाल्यावर दादाचें कर्ज वारण्याचें माधवरावांनीं कबूल केलें व नेमणूक घेऊन स्वस्थ बसण्यास दादा तयार झाले.

दादांची ही कटकट तूर्त मिटल्यावर सन १७६७ च्या दसऱ्यानंतर माधवरावांनीं गोपाळरावास खंडण्या वसूल करण्याकरितां कर्नाटकांत पाठविलें. गोपाळरावाबरोबर पटवर्धनांची सर्व फौज असून शिवाय इतर फौजही दिली होती. गोपाळरावाच्या हाताखालीं एकंदर पंचवीस हजार फौज देऊन त्यास खंडण्या वसूल करण्याकरितां पाठविलें. गोपाळरावानें अदवानी, कर्नोळ, सुरापूर, दवेदुर्ग, यादगिरी वगैरे ठिकाणच्या खंडण्या वसूल केल्या व फ्रेंचांकडेही खंडणीची मागणी केली. फ्रेंचांनीं चिपथी, चंद्रगिरी

कित्तुर हीं ठाणी पेशव्यांस देऊन दरसाल चारलाख खंडणी देण्याचा ठराव केला.

दादासाहेबांचें कर्ज वारून त्यांची व्यवस्था माधवरावांनीं केल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. पण दादाचें समाधान त्यानें झालें नाहीं व त्यांनी पुन्हा चाळे सुरू करून फौज जमविण्यास सुरवात केली. दादाची यापुढें उपेक्षा करणें शक्य नाहीं असें माधवरावांनी ठरविलें, व दादास धोडपच्या किल्यांत गाठून त्या किल्यास माधवरावांनी वेढा दिला. माधवराव किल्ला घेतल्याशिवाय सोडीत नाहींत असें पाहून दादा शरण आले व माधवरावांच्या स्वाधीन झाले. माधवरावांनी दादाला पुण्यास शनिवार-वाड्यांत कडक बंदोबस्तांत ठेवून आपल्या पाठीमागची ही व्याद कायमची मिटविली.

दादाची कटकट कायमची मिटल्यावर दादासारख्या घरबुडव्या माण-सास फूस देऊन राज्यांत बखेडे उत्पन्न करणारा जानोजी भोसले, याचा समाचार घेण्याचें श्रीमंत माधवराव पेशवे यांनी ठरविलें. पटवर्धन मंडळी कर्नाटकांत खंडण्या वसूल करण्याकरितां गेली होती, ती परत आल्यावर माधवरावांनी जानोजी भोसल्याच्या मुलुखावर स्वारी करण्या-करितां गोपाळरावास बोलाविलें. गोपाळराव येतांच श्रीमंतांनी भोसल्यांचा मुलूख काबीज करण्याचा सपाटा चालविला. वर्धेच्या अलीकडील सर्व मुलूख घेऊन श्रीमंतांनी अमळनेरचा किल्ला घेतला व ते नागपुरावर चालले. गोपाळरावानें भंडाऱ्याचा किल्ला घेतला आणि श्रीमंतांनी चांद्याचा किल्ला घेतला. चांद्याचा किल्ला घेतांना जानोजी किल्लेकऱ्यांच्या मदतीस धाऊन येत होता. पण गोपाळरावानें त्यांस अडविल्यामुळें जानोजी तेथून निसटून माहूरकडे गेला. जानोजी निसटून गेल्यावर त्याचा पाठलाग करण्याकरितां श्रीमंतांनी गोपाळराव पटवर्धन व रामचंद्र गणेश कानडे यांस पाठविलें. या दोघां बरोबर श्रीमंतांनी पंचवीस हजार फौज दिली होती. जिकडे जानोजी जाईल तिकडे त्याच्या पाठीवर हें दोघे सरदार असल्यामुळें जानोजी चारी बाजूंनी वेढला गेला व नाइलाज

झाल्यावर तहास कबूल झाला. या तहानें जानोजीस पेशव्यांनी असा जखडून टाकला कीं त्यानें आपल्या हयातींत पेशव्यां विरूद्ध पुन्हा ब्र काढला नाहीं. भोसल्यावरील ही स्वारी सन १७६९ सालीं झाली.

भोसल्याच्या स्वारींतून श्रीमंत माधवराव पेशवे मोकळे होतात तोंच त्यांना हैदरकडे पुन्हां लक्ष द्यावें लागलें. हैदर हा असा कांहीं विलक्षण मनुष्य होता कीं कबूल केलेल्या गोष्टी पाळण्याचें बंधन आपणावर आहे. हें समजण्यासारखी त्याच्या स्वभावाची ठेवणच नव्हती. नाइलाज म्हणजे तह करावा व संधी येतांच तो मोडावा असा त्याचा क्रम होता. पेशवे भोसल्यावरील स्वारींत गुंतले असतां त्यानें मुराराव घोरपड्यास उपद्रव दिला आणि चित्रदुर्ग हरपन्नहळी वगैरे संस्थानाकडून खंडण्याही वसूल केल्या. ह्या गोष्टी त्यानें मागील पेशव्यांशी झालेल्या तहाच्या विरुद्ध केल्यामुळें पेशव्यांना पुन्हां हैदरावर स्वारी करण्याचा विचार करावा लागला. स्वारी करण्याचें ठरल्यावर तात्काळ पटवर्धन मंडळीस पेशव्यांनी तुंगभद्रापार होण्यास सांगितलें, व मागून आपणही स्वारीस निघण्याची जंगी तयारी केली. या वेळीं श्रीमंतांनी फौजही जास्त जमा केली. भोसले, गायकवाड वगैरेनाही मदतीस बोलाविलें. एकंदर फौज या स्वारींत पाउण लाख जमली. हैदरजवळहि जवळ जवळ तितकीच फौज होती, व तो अनवडी येथें झाडींत बातेऱ्या बांधून तयार होता. श्रीमंत माधवरावांनी पटवर्धनांच्या फौजेस हैदरच्या तोंडावर ठेविलें व हैदर जिकडे जिकडे जाईल तिकडे तिकडे त्याचा पाठलाग करावा असा गोपाळरावास हुकूम दिला, आणि आपण स्वतः श्रीरंगपट्टणकडे जाण्याचें ठरविलें श्रीमंत श्रीरंगपट्टणकडे निघाल्यावर वाटेंत लागणारी हैदरचीं सर्व ठाणीं काबीज करण्याचा त्यांनी सपाटा चालविला. बुधिहाळ, हगलवाडी, चिकनायनहळ्ळी, कंदकिरें वगैरे प्रमुख ठाणीं श्रीमंतांनी काबीज केलीं. या ठाण्यांचा बचाव करण्याकरितां हैदरनें आपला मुलगा टिपुमिया यास ठेविलें होतें. पण श्रीमंत माधवरावापुढें त्याचा टिकाव लागेनासा झाल्यावर हैदरनें टिपूच्या मदतीस येण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें तो चेनगिरीवर आला. पण गोपाळराव हैदराच्या पाठीवर असल्यामुळें

हैदरलाही टिपूची मदत करितां आली नाहीं. इकडे श्रीमंतांनी मात्र ठाणीं घेण्याचा धूमधडाका सारखा चाल ठेऊन नागमंडळ, केरूर, कोल्हार, गुरुमकोंडा वगैरे ठाणीं घेतलीं आणि मागडी, भैरव दुर्ग वगैरे किल्ले घेतले.

माधवराव व गोपाळराव या दोघांच्याही धूमधडाक्यांत हैदरची अगदीं दाणादाण होऊन गेली. राजरोस सामना होऊन आपला कांहीं निभाव लागत नाहीं असें दिसतांच कपटाच्या मार्गानें कांहीं वळलें तर पहावें असा विचार हैदर करूं लागला. पटवर्धनांची फौज छावणीस असे तेथून त्याच्यापैकीं एखाददुसरा सरदार रोज दाणावैरणीकरतां दहाबारा मैलांची दौड करीत असे. गोपाळराव, परशुरामभाऊ, निळकंठराव, आनंदराव रास्ते यांपैकीं कोणीना कोणीतरी दहापंधरा मैल तलाव्यास जाऊन येत. या पटवर्धनी फौजेचा फडशा उडविल्याशिवाय आपला कार्यभाग साधत नाहीं हें जाणून हैदरनें एक कपटाचा डाव खेळण्याचा उद्योग आरंभिला. पटवर्धनांवर अचानक छापा घालून त्यांचा समूळ नाश करावा असा हैदरचा बेत होता. हा बेत साधण्याकरितां त्यानें अशी खोटीच एक हूल उठविली कीं आपण आपल्या सर्व फौजेसह पट्टणास जाणार. गोपाळराव या वेळीं मतोडास होते. हें ठाणें हैदरच्या छावणी लगत होतें. आपली छावणी सोडून आपण पट्टणकडे जाणार अशी बातमी हैदरनें पसरविल्यामुळें पटवर्धनांच्या फौजेंत थोडासा बेसावधपणा उत्पन्न झाला पण खरी स्थिती अशी होती कीं हैदरनें आपण सन १७७० च्या फेब्रुवारींत पट्टणकडे जाणार अशी बातमी उठविली व पटवर्धनांच्या बेसावधपणाचा फायदा घेऊन तो ता. २४ फेब्रुवारी सन १७७० या दिवशीं अचानक पटवर्धनांच्या गोटा नजीक आलेला आढळला. हैदरनें या वेळीं आपल्याजवळ तयारीही चांगली ठेविली होती. बारातेराहजार गार्दी, चारहजार स्वार, पंचवीस तोफा शिवाय बाणांचे पंचवीस उंट अशा जय्यत तयारीनें हैदर पटवर्धनांवर छापा घालण्याच्या विचारांत होता. आदल्याच दिवशीं निळकंठराव व परशुराम भाऊ तलाव्यास दहाबाराकोस गेले होते. त्यांनाहि वाटेंत बातम्या अशाच लागल्या कीं हैदर पट्टणा-

कडे गेला. या बातम्यांमुळें पटवर्धन थोडे बेसावध राहिले. या बातम्या उठविण्याची आगाऊच व्यवस्था हैदरनें केली असावी असें दिसतें.

पटवर्धनावर होणाऱ्या या छाप्याची बातमी पटवर्धनांना मोठ्या विलक्षण रीतीनें समजली. पेशव्यांची नोकरी सोडून हैदरकडे नोकरीस गेलेला एक गारदी पटवर्धनांच्या फौजेंत पळत आला व हैदरकडून होणाऱ्या छाप्याची माहिती त्यानें पटवर्धनांस दिली. ही बातमी मिळतांच गोपाळराव, निळकंठराव, परशुरामभाऊ वगैरे सर्वजण स्वार होऊन नौबत निशाणासह आघाडीस येऊन उभे राहिले. नौबतीचे आवाज येतांच हैदरला चाहूल लागली व त्यानें लगेच तोफांचा मारा सुरू केला. गोपाळरावाजवळच असलेल्या त्याच्या हुजऱ्याला तोफेचा गोळा लागून त्याच्या चिंधड्या उडाल्या. हुजऱ्याच्या रक्तानें गोपाळरावाचें अंग भरून गेलें. गोपाळरावाचे चुलत बंधु माधवराव कृष्ण यांच्या घोड्यास गोळा लागून तो ठार झाला, व माधवरावाच्या गुडघ्याच्या मांसाच्या चिंध्या उडाल्या. या जखमेमुळें माधवराव कृष्ण पुढें पंधरा दिवसांनीं मरण पावले. परशुरामभाऊंच्या घोडीलाही गोळा लागून ती पडली. परशुरामभाऊंच्या घोड्यांना लागोपाठ गोळे लागत गेले. अशा रीतीने भाऊंखालच्या तीन घोड्या जाया झाल्या. पण भाऊ मात्र बचावले. तोफांचा मारा सहन करीत पटवर्धनांना उजाडे-पर्यंत सैन्यासह ठासून उभें रहावें लागलें. हैदराचा हा छापा ता. २४ फेब्रुवारी सन १७७० या दिवशीं मध्यरात्रीनंतर सुरू झाला. उजाडल्याबरोबर पटवर्धनांच्या स्वारांनीं हैदरच्या सैन्यावर बेजरब घोडीं घातलीं त्याबरोबर हैदरचे लोक पळून गेले. या छाप्यांत पटवर्धनांनीं मोठ्या धाडसानें उजाडे-पर्यंत तोफांचा भडिमार सहन करून टिकाव धरल्यामुळें त्यांचें लष्करचें सामान, डेरे, राहुट्या, जामदारखाना लष्करचा बाजार वगैरे सर्व सुरक्षित राहून मागें बुद्धिहाळ या ठिकाणीं नेतां आलें. या छाप्यांत पटवर्धनांच्या तीनही पथकांत मिळून पंचवीस लोक ठार व शें दिडशें जखमी झाले. पटवर्धनावर छापा घालण्याचा हैदरनें आणखी एकदां प्रयत्न केला. पण पटवर्धन सावध असल्यामुळें दुसराहि प्रयत्न फसला.

पटवर्धनांच्या सैन्यावर घातलेले दोन्ही छापे फसले आणि इकडे माधवरावही हैदराचीं ठाणीं झपाट्यानें घेत चालले, हें पाहून हैदरची तारांबळ उडाली. माधवरावांनी नंदीदूर्ग, कोलार, मुलबागल वगैरें ठाणीं घेतलीं व तेथून ते देवरामदुर्गाकडे आले. झपाट्यानें एकएक ठाणें जात चालल्याचें पाहून हैदरनें पिछेहाटीचें धोरण स्वीकारलें व त्यानें श्रीरंगपट्टणच्या मार्गें प्रयाण केलें. हैदर श्रीरंगपट्टणकडे गेल्याचें नक्की समजतांच श्रीमंत माधवराव साहेबांनी पटवर्धनांच्या पथकांस आपणाकडे बोलाविलें व निजगलचा किल्ला घेण्याची कामगिरी गोपाळरावास सांगितली. गोपाळरावानें तात्काळ निजगलच्या किल्यास वेढा दिला, आणि किल्यावर जोराचा मारा सुरू केला. श्रीमंत माधवरावहि नंदिदुर्ग, गणेशगड वगैरे किल्ले घेऊन गोपाळरावाच्या मदतीस आले. श्रीमंत आल्यावर त्यांनीं किल्ल्यावर निकराचा हल्ला चढविला. या स्वारींत श्रीमंत माधवरावाबरोबर त्यांचे धाकटे बंधु नारायणराव हेही स्वारीचा अनुभव घेण्याकरितां आले होते. हल्ल्याच्या कामांत माधवराव व नारायणराव हे दोघेही आघाडीवर होते. या हल्ल्यांत नारायणरावाच्या हातास बंदुकीच्या गोळीची जखम लागली. या स्वारींत श्रीमंतांनीं हैदरचा पुष्कळसा मुलूख उध्वस्त करून टाकला, अनेक ठाणीं घेतलीं. परंतु हैदर कांहीं या वेळीं तहास येईना. दिवस उन्हाळ्याचे होते. पावसाळा सुरू व्हावयाचा होता. तेव्हां मराठे पावसाळ्यांत कांहीं इकडे रहात नाहींत अशा समजुतीनें हैदर कालहरण करीत होता. हैदराचें हें धोरण पाहून श्रीमंतांनी त्याची पुरी खोड मोडण्याकरितां पावसाळ्यांत कर्नाटकांत छावणीस रहाण्याचें ठरविलें. श्रीमंत माधवराव यांची प्रकृती दिवसेंदिवस स्वाऱ्या शिकाऱ्यांच्या दगदगीमुळें बिघडूं लागली होती. त्यामुळें स्वतः छावणीस न रहातां त्रिंबकरावमामा पेठे यांस स्वारीचे मुख्य सरदार नेमून श्रीमंतांनी परत फिरण्याचें ठरविलें. त्रिंबकरावमामा हे जवानमर्द, शूर आणि पराक्रमी होते. त्यांच्या लायकीबद्दल प्रश्नच नव्हता. पण हैदरवरील स्वाऱ्यांत पटवर्धनांच्या कामगिरीला महत्वाचें स्थान होतें. हें लक्षांत घेऊन स्वारीचें नेतृत्व गोपाळराव पटवर्धनाकडे येईल अशी पुष्कळांची अपेक्षा होती.

पण श्रीमंतांनीं तसें न करितां त्रिंबकरावासच मुख्य सेनापती नेमिलें व त्याच्या हाताखालीं सर्वांनीं वागावें असें ठरविलें. या गोष्टीमुळें गोपाळरावांची थोडी मानहानी झाली यांत शंका नाहीं. पण श्रीमंतांनाही त्रिंबकरावमामाना सर्वाधिकार देण्याला तशींच कांहीं कारणें होतीं. गोपाळरावाची लायकी कमी होती असा अर्थ नव्हे. पण गोपाळराव हा पेशव्यांच्या अनेक सरदारांपैकीं एक होता. आणि त्रिंबकरावही पेशव्यांच्या दरबारांतली खासा स्वारी होती. तो पेशव्यांचा आप्तसंबंधी होता. त्याचें पेशव्यांच्या दरबारांत गोपाळरावापेक्षां जास्त वजन होतें. अशी स्थिती असल्यामुळें पेशव्यांच्या फौजेंत गोळा झालेल्या निरनिराळ्या सरदारांवर वजन असलेला माणूसच मुख्य सेनापती पाहिजे ही गोष्ट स्वाभाविक होती. या सर्व गोष्टींचा विचार करून श्रीमंतांनीं त्रिंबकरावाला सर्वाधिकार दिले, व आपण पुण्यास निघून आले. श्रीमंत पुण्यास गेल्यावर त्यांनीं कर्नाटकांतील स्वारीला मदत करण्याकरितां म्हणून नवीन फौजेची तयारी चालविली. श्रीमंतांची प्रकृती बरी असती तर नवीन फौज घेऊन पुन्हां कर्नाटकांत स्वारीवर जाण्याचा त्यांचा विचार होता. पण श्रीमंतांची प्रकृती दिवसेंदिवस बिघडतच चालली. त्यामुळें कर्नाटकांत जरूर लागेल त्या प्रमाणें सैन्य पाठविण्याचें ठरलें.

त्रिंबकरावमामाच्या हातांत सर्व सूत्रें आल्यावर त्यांच्या हुकमाप्रमाणें पटवर्धनांस वागणें प्राप्त होतें. स्वाऱ्या शिकाऱ्याच्या दगदगीमुळें पटवर्धनांचे फार हाल झाले होते, व त्यांना कर्जहि फार झालें होतें. श्रीमंतांनीं पटवर्धनांच्या कर्जाच्या फेडीस अदवानीचा नबाब बसालतजंग यांजकडे येणें असलेली मागील खंडणी लावून दिली होती. ती खंडणी वसूल करावी असें गोपाळरावांचें मत होतें.. तूर्त तें कांम राहूं द्यावें असें त्रिंबकरावमामा म्हणत होते. पण कर्जाच्या ओढगस्तीमुळें गोपाळराव अदवानीस खंडणी वसूल करण्याकरितां गेले. खंडणीची बाकी त्यांनी वसूल केली व नंतर ते कनकगिरीस आले. तेथें त्यांस जलोदराची विकृती झाली. आपली प्रकृती बिघडली हें पाहून गोपाळरावांनी वडिलांस लिहून आपले धाकटे बंधू वामनराव यांस लष्करांत बोलाविलें. वामनराव आल्यावर त्यांचे स्वाधीन सर्व पथकांचीं

फौज करून गोपाळराव मिरजेस वडील मातोश्रीस भेटण्याकरितां आले. मिरजेस आल्यावर त्यांची प्रकृती जास्तच बिघडली व तारीख १ फेब्रुवारी १७७१ रोजीं वडील व मातोश्री यांस दुःखसागरांत लोटून गोपाळरावांनी कैलासवास केला.

गोपाळराव हे शरिरानें सडपातळ व मध्यम उंचीचे होते. त्यांचा स्वभाव आनंदी पण मानी असा होता. मरणसमयीं त्यांचें वय पन्नाशीच्या सुमारास होतें. गोपाळराव गेल्यावर पटवर्धनांचें पुढारीपण गोपाळरावांचे धाकटे बंधू वामनराव यांचेकडे आलें. दुसऱ्या दोन पथकांचे पुढारी निळकंठराव व परशुरामभाऊ हे वामनरावापेक्षांही लहान होते स्वाभाविकच वामनराव हे पटवर्धनांच्या सर्व पथकांचे पुढारी झाले. वामनरावा नंतर मात्र पुढारीपणाचा मान परशुरामभाऊंकडे आला, तो इतिहास पुढें येईलच.

---

## प्रकरण ४ थें

# वामनरावबाबा पटवर्धनांचे मुख्य पुढारी

गोपाळराव पटवर्धन आजारी पडून मिरजेस आले त्या वेळीं पटवर्धनांच्या फौजेचा तळ कनकगिरी येथें होता. गोपाळराव आजारी झाल्यामुळें त्यांचे धाकटे बंधू वामनरावबाबा हे फौजेचे मुख्य सरदार म्हणून फौजेचे आधिपत्य स्वीकारण्यास कनकगिरीस आले. यावेळीं पटवर्धन मंडळीमध्यें गोपाळरावानंतर वामनराव हेच वडील होते व गोपाळरावाप्रमाणेंच ते लष्करी कामांत तरबेज असल्यामुळें त्यांच्याकडेच पुढारीपण आलें. वामनराव हे निधड्या छातीचे शूर आणि पराक्रमी असे सरदार होते. पण त्यांची प्रकृती मात्र चांगली नव्हती. त्यांना दम्याचा विकार होता. तरीसुद्धां त्यांनीं लष्कराचे जोखीम सांभाळण्यांत कोणतीही तक्रार न करितां एकदम ते कनकगिरीच्या तळांत येऊन दाखल झाले. वामनरावाच्या हाताखालीं परशुरामभाऊ व निळकंठराव यांची पथकें होतीं. अर्थातच वामनरावाच्या राजवटींत झालेल्या सर्व उलाढालींत परशुरामभाऊंचें पथक हजर असल्यामुळें वामनरावाच्या पुढारीपणाखालीं झालेल्या उलाढालीचें थोडक्यांत वर्णन देणें जरूर आहे. यावेळीं पेशव्यांची हैदरावरील तिसरी मोहीम चालू होती. पेशवे आजारी पडून पुण्यास गेल्यावर मोहिमेचे सेनापती त्रिंबकरावमामा पेठे हे नेमले गेले होते, हें मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे. त्रिंबकरावमामांचा तळ यावेळीं देवरायदुर्ग या

फौज करून गोपाळराव मिरजेस वडील मातोश्रीस भेटण्याकरितां आले. मिरजेस आल्यावर त्यांची प्रकृती जास्तच बिघडली व तारीख १ फेब्रुवारी १७७१ रोजीं वडील व मातोश्री यांस दुःखसागरांत लोटून गोपाळरावांनी कैलासवास केला.

गोपाळराव हे शरिरानें सडपातळ व मध्यम उंचीचे होते. त्यांचा स्वभाव आनंदी पण मानी असा होता. मरणसमयीं त्यांचें वय पन्नाशीच्या सुमारास होतें. गोपाळराव गेल्यावर पटवर्धनांचें पुढारीपण गोपाळरावांचे धाकटे बंधू वामनराव यांचेकडे आलें. दुसऱ्या दोन पथकांचे पुढारी निळकंठराव व परशुरामभाऊ हे वामनरावापेक्षांही लहान होते स्वाभाविकच वामनराव हे पटवर्धनांच्या सर्व पथकांचे पुढारी झाले. वामनरावा नंतर मात्र पुढारीपणाचा मान परशुरामभाऊंकडे आला, तो इतिहास पुढें येईलच.

---

# प्रकरण ४ थें

## वामनरावबाबा पटवर्धनांचे मुख्य पुढारी

गोपाळराव पटवर्धन आजारी पडून मिरजेस आले त्या वेळीं पटवर्धनांच्या फौजेचा तळ कनकगिरी येथें होता. गोपाळराव आजारी झाल्यामुळें त्यांचे धाकटे बंधू वामनरावबाबा हे फौजेचे मुख्य सरदार म्हणून फौजेचे आधिपत्य स्वीकारण्यास कनकगिरीस आले. यावेळीं पटवर्धन मंडळीमध्यें गोपाळरावानंतर वामनराव हेच वडील होते व गोपाळरावाप्रमाणेंच ते लष्करी कामांत तरबेज असल्यामुळें त्यांच्याकडेच पुढारीपण आलें. वामनराव हे निधड्या छातीचे शूर आणि पराक्रमी असे सरदार होते. पण त्यांची प्रकृती मात्र चांगली नव्हती. त्यांना दम्याचा विकार होता. तरीसुद्धां त्यांनीं लष्कराचे जोखीम सांभाळण्यांत कोणतीही तक्रार न करितां एकदम ते कनकगिरीच्या तळांत येऊन दाखल झाले. वामनरावाच्या हाताखालीं परशुरामभाऊ व निळकंठराव यांची पथकें होतीं. अर्थातच वामनरावाच्या राजवटींत झालेल्या सर्व उलाढालींत परशुरामभाऊंचें पथक हजर असल्यामुळें. वामनरावाच्या पुढारीपणाखालीं झालेल्या उलाढालीचें थोडक्यांत वर्णन देणें जरूर आहे. यावेळीं पेशव्यांची हैदरावरील तिसरी मोहीम चालू होती. पेशवे आजारी पडून पुण्यास गेल्यावर मोहिमेचे सेनापती त्रिंबकरावमामा पेठे हे नेमले गेले होते, हें मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे. त्रिंबकरावमामांचा तळ यावेळीं देवरायदुर्ग या

ठिकाणीं होता. वामनराव लष्करांत येऊन दाखल झाल्यावर त्रिंबकरावांनी त्यांना कनकगिरीहून पेशव्यांच्या मुख्य फौजेस येऊन मिळण्याचा हुकूम दिला. त्या प्रमाणें वामनराव यांनीं आपला कनकगिरी येथील तळ हालविला व ते देवरायदुर्ग येथें पेशव्यांच्या मुख्य फौजेस येऊन मिळाले. हैदर यावेळीं मागडीचे आसपास जंगलांत छावणी करून राहिला होता. ह्या ठिकाणाहून मराठ्यांच्या लष्करावर छापे घालण्याचा त्यानें उद्योग करून पाहिला पण त्यांत त्याला यश आलें नाहीं. पटवर्धनांची फौज येऊन मिळाल्यावर त्रिंबकरावमामानी देवरायदुर्ग हा किल्ला हल्ला करून घेण्याचें ठरविलें. त्रिंबकरावमामा हे मोठे हिंमतीचे आणि धाडसी सरदार होते. त्यांनीं मोठ्या जोरानें देवरायदुर्गाला वेढा घालून तो किल्ला सपाट्यासरसा घेतला व त्याबरोबरच आजूबाजूचे माकलीदुर्ग, व उत्तरदुर्ग हेहि किल्ले घेतले. असें होतांच मागडीच्या रानांत छावणीस राहिलेले हैदरचे लोक दहशत खाऊन पळून गेले.

हैदरच्या लोकांनीं दहशत खाल्ल्यामुळें हैदरला आपला मुक्काम हालविणें भाग पडलें. शिवाय हैदरच्या रसदेची लुटालूटहि मराठे करीतच होते. पटवर्धनांची फौज रोज तलाव्यास जाई ती हैदरच्या कांहीं कवाडाची लूट करीत असे. एका प्रसंगीं तर मराठ्यांकडचा सखाराम हरी गुप्ते हा सरदार हैदरच्या गोटापर्यंत गेला व त्यानें हैदरची पट्टणाकडून येणारी सर्व कही लुटली. अशा प्रकारामुळें हैदरच्या लष्करांत धान्याचा दुष्काळ पडला व आतां तेथें रहाणें धोक्याचें असें समजून हैदरनें श्रीरंगपट्टणाकडे निघून जाण्याचा बेत ठरविला. हैदर श्रीरंगपट्टणाकडे जाणार असें समजतांच त्रिंबकरावमामानें पटवर्धनांच्या फौजेस हैदरच्या तोंडावर पाठविलें व आपण हैदरच्या पिछाडीस राहून हैदरचा मार्ग अडविण्याचा उद्योग आरंभिला. हैदरानें आपला मोर्चा पट्टणकडे वळवितांच पटवर्धनांनीं त्याच्या फौजेवर बेजरब घोडीं घातलीं. हैदरजवळ यावेळीं फौजहि बरीच होती. पंचवीस हजार गारदी, आठहजार स्वार, पंचवीस तोफा असा भक्कम सरंजाम होता. पण पटवर्धनांनीं या हैदरच्या फौजेवर असा निकराचा हल्ला केला कीं

हैदरची बहुतेक सर्व फौज मारली व लुटली जाऊन खासा हैदर व टिपू यांनीं जेमतेम आपला जीव बचावून दहावीस स्वारानिशीं श्रीरंगपट्टण गांठलें. या लढाईंत पटवर्धनांना जय मिळाला पण त्यांचें एक मोठें नुकसान झालें. पटवर्धनाच्या पथकांतील एका पथकाचे प्रमूख निळकंठराव त्रिंबक पटवर्धन यांना छातींत तोफेचा गोळा लागून ते ठार झाले. या लढाईचें वर्णन करतांना वासुदेव धोंडदेव पटवर्धन यांनीं खालील प्रमाणें लिहिलें आहे. "हैदरनाइकाचें झुंज असें कधीं झालें नाहीं. पंचवीस हजार गारद्यांची एकच शिलक होई तेव्हां गगन गर्जत असे. या प्रसंगीं निळकंठराव, भाऊ, बाबा यांनी व लहानापासून थोरांनी मोठी शर्त केली. परंतु निळकंठराव यामुळें हर्षभंग झाला." ( खरे प. ११०३ ) या लढाईत हैदरच्या फौजेचा फडशा उडाला. त्याच्या फौजेपैकीं पांच सात हजार लोक पळाले तेवढेच वांचले बाकी दहाहजार स्वार, पंधरा हजार गारदी व कितीएक हजार कानडी प्यादे ठार झाले. पंचेचाळीस तोफा, आठ हजार घोडे, पंचवीस हजार बंदुका, दारूगोळा हत्यारें पालख्या, उंट, जामदारखाना इतकें सर्व मराठ्यांच्या हातीं लागलें. वामनरावबाबा यांनीं या लुटीसंबंधानें खालीलप्रमाणें लिहिलें आहे "लुटून फस्त झाला. तोफा, हत्ती वगैरे सर्व सलतनत लुटली. राऊत आठनऊ हजार होते ते लुटले, आमच्या तीनही गोटांत मिळून दोन हजार घोडीं आलीं." ( खरे प. ११०० ). दुसऱ्या एका पत्रांत खालीलप्रमाणें मजकूर आहे. "पंचवीस हजार गारदी, बारा हजार फौज, पन्नास तोफा एक घटकेंतच सत्यनाश झाला." ( खरे प. ११०१ ) ✻

ही लढाई ता. ८ माहे मार्च सन १७७१ रोजीं झाली. या लढाईसंबंधानें पेशव्यांचे मुख्य सेनापती त्रिंबकरावमामा पेठे यांनीं पेशव्यांना लिहिलेलें पत्र

✻ ( टीप:—हैदरखानाबरोबर झालेली ही लढाई ज्या ठिकाणीं झाली त्याचे लगत मोतीतलाव नांवाचा एक मोठा तलाव असल्यामुळें या लढाईस मोतीतलावची लढाई असें म्हणतात. )

फौज करून गोपाळराव मिरजेस वडील मातोश्रीस भेटण्याकरितां आले. मिरजेस आल्यावर त्यांची प्रकृती जास्तच बिघडली व तारीख १ फेब्रुवारी १७७१ रोजीं वडील व मातोश्री यांस दुःखसागरांत लोटून गोपाळरावांनी कैलासवास केला.

गोपाळराव हे शरिरानें सडपातळ व मध्यम उंचीचे होते. त्यांचा स्वभाव आनंदी पण मानी असा होता. मरणसमयीं त्यांचें वय पन्नाशीच्या सुमारास होतें. गोपाळराव गेल्यावर पटवर्धनांचें पुढारीपण गोपाळरावांचे धाकटे बंधू वामनराव यांचेकडे आलें. दुसऱ्या दोन पथकांचे पुढारी निळकंठराव व परशुरामभाऊ हे वामनरावापेक्षांही लहान होते स्वाभाविकच वामनराव हे पटवर्धनांच्या सर्व पथकांचे पुढारी झाले. वामनरावा नंतर मात्र पुढारीपणाचा मान परशुरामभाऊंकडे आला, तो इतिहास पुढें येईलच.

---

## प्रकरण ४ थें

# वामनरावबाबा पटवर्धनांचे मुख्य पुढारी

गोपाळराव पटवर्धन आजारी पडून मिरजेस आले त्या वेळीं पटवर्धनांच्या फौजेचा तळ कनकगिरी येथें होता. गोपाळराव आजारी झाल्यामुळें त्यांचे धाकटे बंधू वामनरावबाबा हे फौजेचे मुख्य सरदार म्हणून फौजेचे आधिपत्य स्वीकारण्यास कनकगिरीस आले. यावेळीं पटवर्धन मंडळीमध्यें गोपाळरावानंतर वामनराव हेच वडील होते व गोपाळरावाप्रमाणेंच ते लष्करी कामांत तरबेज असल्यामुळें त्यांच्याकडेच पुढारीपण आलें. वामनराव हे निधड्या छातीचे शूर आणि पराक्रमी असे सरदार होते. पण त्यांची प्रकृती मात्र चांगली नव्हती. त्यांना दम्याचा विकार होता. तरीसुद्धां त्यांनीं लष्कराचे जोखीम सांभाळण्यांत कोणतीही तक्रार न करितां एकदम ते कनकगिरीच्या तळांत येऊन दाखल झाले. वामनरावाच्या हाताखालीं परशुरामभाऊ व निळकंठराव यांची पथकें होतीं. अर्थातच वामनरावाच्या राजवटींत झालेल्या सर्व उलाढालींत परशुरामभाऊंचें पथक हजर असल्यामुळें. वामनरावाच्या पुढारीपणाखालीं झालेल्या उलाढालीचें थोडक्यांत वर्णन देणें जरूर आहे. यावेळीं पेशव्यांची हैदरावरील तिसरी मोहीम चालू होती. पेशवे आजारी पडून पुण्यास गेल्यावर मोहिमेचे सेनापती त्रिंबकरावमामा पेठे हे नेमके गेले होते, हें मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे. त्रिंबकरावमामांचा तळ यावेळीं देवरायदुर्ग या

ठिकाणीं होता. वामनराव लष्करांत येऊन दाखल झाल्यावर त्रिंबकरावांनी त्यांना कनकगिरीहून पेशव्यांच्या मुख्य फौजेस येऊन मिळण्याचा हुकूम दिला. त्या प्रमाणें वामनराव यांनीं आपला कनकगिरी येथील तळ हालविला व ते देवरायदुर्ग येथें पेशव्यांच्या मुख्य फौजेस येऊन मिळाले. हैदर यावेळीं मागडीचे आसपास जंगलांत छावणी करून राहिला होता. ह्या ठिकाणाहून मराठ्यांच्या लष्करावर छापे घालण्याचा त्यानें उद्योग करून पाहिला पण त्यांत त्याला यश आलें नाहीं. पटवर्धनांची फौज येऊन मिळाल्यावर त्रिंबकरावमामानी देवरायदुर्ग हा किल्ला हल्ला करून घेण्याचें ठरविलें. त्रिंबकरावमामा हे मोठे हिमतीचे आणि धाडसी सरदार होते. त्यांनीं मोठ्या जोरानें देवरायदुर्गला वेढा घालून तो किल्ला सपाट्यासरसा घेतला व त्या बरोबरच आजूबाजूचे माकलीदुर्ग, व उत्तरदुर्ग हेहि किल्ले घेतले. असें होतांच मागडीच्या रानांत छावणीस राहिलेले हैदरचे लोक दहशत खाऊन पळून गेले.

हैदरच्या लोकांनीं दहशत खाल्ल्यामुळें हैदरला आपला मुक्काम हालविणें भाग पडलें. शिवाय हैदरच्या रसदेची लुटालूटहि मराठे करीतच होते. पटवर्धनांची फौज रोज तलाव्यास जाई ती हैदरच्या कांहीं कवाडाची लूट करीत असे. एका प्रसंगीं तर मराठ्यांकडचा सखाराम हरी गुप्ते हा सरदार हैदरच्या गोटापर्यंत गेला व त्यानें हैदरची पट्टणाकडून येणारी सर्व कही लुटली. अशा प्रकारामुळें हैदरच्या लष्करांत धान्याचा दुष्काळ पडला व आतां तेथें रहाणें धोक्याचें असें समजून हैदरनें श्रीरंगपट्टणाकडे निघून जाण्याचा बेत ठरविला. हैदर श्रीरंगपट्टणाकडे जाणार असें समजतांच त्रिंबकरावमामानें पटवर्धनांच्या फौजेस हैदरच्या तोंडावर पाठविलें व आपण हैदरच्या पिछाडीस राहून हैदरचा मार्ग अडविण्याचा उद्योग आरंभिला. हैदरानें आपला मोर्चा पट्टणकडे वळवितांच पटवर्धनांनीं त्याच्या फौजेवर बेजरब घोडीं घातलीं. हैदरजवळ यावेळीं फौजहि बरीच होती. पंचवीस हजार गारदी, आठहजार स्वार, पंचवीस तोफा असा भक्कम सरंजाम होता. पण पटवर्धनांनीं या हैदरच्या फौजेवर असा निकराचा हल्ला केला कीं

हैदरची बहुतेक सर्व फौज मारली व लुटली जाऊन खासा हैदर व टिपू यांनीं जेमतेम आपला जीव बचावून दहावीस स्वारानिशीं श्रीरंगपट्टण गांठलें. या लढाईंत पटवर्धनांना जय मिळाला पण त्यांचें एक मोठें नुकसान झालें. पटवर्धनाच्या पथकांतील एका पथकाचे प्रमूख निळकंठराव त्रिंबक पटवर्धन यांना छातींत तोफेचा गोळा लागून ते ठार झाले. या लढाईचें वर्णन करतांना वासुदेव धोंडदेव पटवर्धन यांनीं खालील प्रमाणें लिहिलें आहे. " हैदरनाइकाचें झुंज असें कधीं झालें नाहीं. पंचवीस हजार गारद्यांची एकच शिलक होई तेव्हां गगन गर्जत असे. या प्रसंगीं निळकंठराव, भाऊ, बाबा यांनी व लहानापासून थोरांनी मोठी शर्त केली. परंतु निळकंठराव यामुळें हर्षभंग झाला." ( खरे प. ११०३ ) या लढाईत हैदरच्या फौजेचा फडशा उडाला. त्याच्या फौजेपैकीं पांच सात हजार लोक पळाले तेवढेच वांचले बाकी दहाहजार स्वार, पंधरा हजार गारदी व कितीएक हजार कानडी प्यादे ठार झाले. पंचेचाळीस तोफा, आठ हजार घोडे, पंचवीस हजार बंदुका, दारूगोळा हत्यारें पालख्या, उंट, जामदारखाना इतकें सर्व मराठ्यांच्या हातीं लागलें. वामनरावबाबा यांनीं या लुटीसंबंधानें खालीलप्रमाणें लिहिलें आहे " लुटून फस्त झाला. तोफा, हत्ती वगैरे सर्व सलतनत लुटली. राऊत आठनऊ हजार होते ते लुटले, आमच्या तीनही गोटांत मिळून दोन हजार घोडीं आलीं." ( खरे प. ११०० ). दुसऱ्या एका पत्रांत खालीलप्रमाणें मजकूर आहे. " पंचवीस हजार गारदी, बारा हजार फौज, पन्नास तोफा एक घटकेंतच सत्यनाश झाला. " ( खरे प. ११०१ ) ✻

ही लढाई ता. ८ माहे मार्च सन १७७१ रोजीं झाली. या लढाईसंबंधानें पेशव्यांचे मुख्य सेनापती त्रिंबकरावमामा पेठे यांनीं पेशव्यांना लिहिलेलें पत्र

✻ ( टीप:—हैदरखानाबरोबर झालेली ही लढाई ज्या ठिकाणीं झाली त्याचे लगत मोतीतलाव नांवाचा एक मोठा तलाव असल्यामुळें या लढाईस मोतीतलावची लढाई असें म्हणतात. )

पे. दप्तरमध्यें छापलें आहे. त्यांत या लढाईची सविस्तर माहिती आहे. पत्र फारच मोठें असल्यामुळें त्यांतला कांहीं भाग खालीं दिला आहे. त्यावरून या लढाईंत हैदरखानाचा केवढा मोठा जबरदस्त पराभव झाला हें दिसून येईल. "सारे सरदारांनीं निकडकरून घोडे चालविले. त्यास हैदरखान पुढें आघाडीस चालिला होता. पिछाडीस तोफा व गारदी, फिरंग्यांचे बुरूज बांधून चालत होता. ते उधळून मारीत मारीत हैदरखानापावेतों निशाण घेऊन जाऊन पोचलों. तेव्हां हैदरखानानी मोतीतल्या समीप डोंगर होता त्याचा आश्रय करून डोंगरावर पांचसात हजार माणसांनिशीं सडाजीव घेऊन चढला. तमाम त्यांची फौज मारून गारद केली. मोठी लढाई झाली. राव सेनापती यांजकडे तोफा आल्या त्यासुद्धां चाळीस पंचेचाळीस तोफा व वीसपंचवीस हत्ती, सातआठ हजार घोडे, व खजाना जवाहीर व जरी निशाणें हौदे व अंबारी साहेब नौबत पाडाव आली. सारी सलतनत लुटून फौज मारून ताराज केली. हजार दोन हजार माणूस कापून टाकिलें. हैदरखान जीवमात्र घेऊन डोंगरावर चढला. तेथूनहि एक वख्त चालून आला. तेव्हां फिरोन मारीत मारीत डोंगरावर लाविला' उपाय न चाले तेव्हां डोंगरावर चढला. त्याजवर आम्ही इकडील बंदोबस्त राखून दोन हजार फौज घेऊन जलद डोंगराखालीं जाऊन पोचलों. इतक्यांत चार घटिकाचा अवकाश पडिला. त्याजमुळें हैदरखानानीं कलरूचें सोंग घेऊन पाई उतारा अथवा एक घोड्यांनी अगोदर पळून पट्टणास गेला. डोंगरावर लोक व सरदार होते त्यांनी नामुरादीनें कौल मागितला. त्याजवरून कौल देऊन हातेर वगैरे घेऊन जिवानसी मात्र सोडून दिलें. लालामिया व मिर-रेजा व लालाबक्षी वगैरे मोठे मोठे पांच सात सरदार पाडाव करून आणिले व कितेक लढाईंत ठार झाले. वरकड लोकांत हैदरखान पहावा तो वोळखी माणसें घालून चौकशी केली. परंतु न सांपडला. हजारों माणूस दातीं तृण धरीत असतां त्यास आपले लोक मारीत नाहीं या अर्थे सोडून दिलें. स्वामीचे पुण्यप्रतापें स्वामीची आजीन अस्मानी फत्ते झाली. सरकारच्या फौजेंतील माणूस, घोडे फार जखमी व ठार झाले. आम्हांस गोलीची जखम उजवे

मराठी ग्रंथ संग्रहालय

कानास लागली. गोली निघून गेली. खैर जाहली. लौकरच जखम बरी होईल. वर्तमान अधीक उणे सेवेशीं जाईल याजकरितां लिहिलें असे. निळकंठराव त्रिंबक ( पटवर्धन ) गोपालराव गोविंद यांचे भाऊ व अंतोजी माने पागेकडील कामास आले. मोठी शर्तीची लढाई जाली. हुजरात व सरंजामी सरदार लोक यांनीं निकड केली. लोकांनी चाकरी मोठे तऱ्हेनें केली. सरकारचे निशाणाचे हत्तीचे पायास गोला लागला, तो कापून काढिला. खैर झाली. लष्करचे घोडे ठार फार झाले, व मातबर लोक जाया जखमी फार झाले, व कित्येक ठारहि झाले याचा तपशील मागाहून सविस्तर लेहून पाठवूं. स्वामीची फत्ते जाली याजमुळें इतकीही क्षित जालीशी सर्वांस वाटली नाहीं. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना. ( पे. द. भा.–३७–२९६ )

हैदर पळून पट्टणास गेल्यावर मराठे पट्टणास वेढा घालतील ही धास्ती हैदराला होतीच व त्या प्रमाणें त्रिंबकरावमामानें पट्टणास वेढा दिला. पण या वेढ्यापासून मराठ्यांचा फारसा फायदा झाला नाहीं. कारण पट्टणाच्या आसपास महागाई फार झाली. घोड्यांस दाणावैरण मिळण्याचीहि पंचाईत पडूं लागली. तेव्हां मामांनीं वेढा उठविण्याचें ठरविलें, व जिकडे लाग साधेल तिकडे जाऊन खंडण्या वसूल करण्याचा सपाटा चालविला. त्रिंबकरावमामांनीं तंजावरकर व अर्काटचे नबाब यांच्याकडून खंडण्या वसूल केल्या. पटवर्धनांनींही जीं ठाणीं मिळतील तीं घेण्याचा सपाटा चालविला. गर्दनगड, देवरायदुर्ग, बहिरवदुर्ग, नागमंडळ, किकेरी, नारायणगड वगैरे ठिकाणें पटवर्धनांनीं घेतलीं. त्रिंबकरावमामांनीं बारामहाल प्रांतांत लुटालूट करून जबर खंडण्या वसूल केल्या व कोईमतूरप्रांत लुटून फस्त केला. या प्रमाणें हैदराचा घाटाखालील मुलूखहि लुटून फस्त झाल्यामुळें हैदर बेचैन झाला. पण तहाची गोष्ट मात्र तो अजून बोलत नव्हता. याचें कारण माधवराव पेशवे आजारी असल्याची बातमी त्याला लागली होती. माधवराव वारल्यावर मराठ्यांत फूट पडून त्याचा फायदा आपणास मिळेल अशी हैदरची अपेक्षा होती. पण माधवरावाच्या मरणाची वाट पहावी तर तोंपर्यंत

आपलें राज्य तरी शिल्लक रहातें कीं नाहीं ही काळजी आतां हैदरास उत्पन्न झाली. कारण त्याच्या ताब्यांत आतां फक्त बेंगरूळ, श्रीरंगपट्टण आणि बेदनूर एवढेच प्रांत राहिले, बाकीचा त्याच्या राज्यांतील सर्व मुलूख मराठ्यांनीं जाळून लुटून फस्त केला. अशी स्थिती प्राप्त झाल्यामुळें तो आतां तहाचें बोलणें करण्यास तयार झाला. इकडे श्रीमंत माधवराव पेशवे यांची प्रकृतीहि दिवसेंदिवस जास्त बिघडत चालली होती. त्यामुळें जमेल तसा तह करून देशीं परत येण्यासंबंधानें पेशव्यांचीं पत्रें त्रिंबकरावमामांस येत होतीं. तेव्हां जास्त ओढून न धरतां हैदरचें आलेलें तहाचें बोलणें मान्य करून तह करण्याचें त्रिंबकरावानें ठरविलें.

हैदराबरोबर झालेल्या तहांत मराठ्यांचा कर्नाटकांत स्वराज्य म्हणून जेवढा मुलूख होता तो सर्व मिळाला. शिरें, होसकोटें, बाळापूर, कोल्हार हे चार परगणे, मदगिरी प्रांत आणि गुरुमकोंडा प्रांत एवढा मुलूख मराठ्यानीं आपणाकडे ठेविला व बाकीचा हैदरचा जिंकलेला मुलूख त्याला परत दिला. हैदरनें खंडणीबद्दल पेशव्यांस पन्नास लाख रुपये व दरबार खर्च दहा लाख रुपये देण्याचें कबूल केलें. यापैकीं बत्तीस लाख हैदरनें रोख दिले व बाकी अठ्ठावीस लाखाची योग्य ती जामिनगिरी दिली. तह झाल्यावर मराठी फौजा देशीं येण्यास निघाल्या त्या तुंगभद्रा नदी ओलांडून आपापल्या मुलखांत गेल्या. हैदरावरील ही तिसरी स्वारी सन १७७० च्या आरंभापासून सन १७७२ च्या जुलईपर्यंत म्हणजे जवळ जवळ अडीच वर्षें चालली. अडीच वर्षें परमुलखांत छावणी करून रहावें लागल्यामुळें पटवर्धनांचें या स्वारींत बरेंच नुकसान झालें. पटवर्धनांच्या घराण्यांतील कर्ते तीन पुरुष या स्वारींत मृत्यू पावले. गोपाळराव हे आजारानें वारले. पण माधवराव कृष्ण व निळकंठ त्रिंबक हे लढाईत मारले गेले. या सर्वांचे वृद्ध वडील पुत्रशोकानें मरण पावले. या स्वारींत परशुरामभाऊ सतत हजर होते. त्यांची आई जानकीबाई ही काशियात्रा करून आली होती, व आपला एकुलता एक पुत्र स्वारींतून लवकरच परत येईल अशी मार्गप्रतीक्षा करीत होती. स्वारीचें काम केव्हां संपेल याचा कांहीं अंदाज लागेना. हैदरजवळ तहहि

होईना. असें पाहून परशुरामभाऊंनीं कंटाळून एका पत्रांत असेंही लिहिलें आहे कीं "तह होवो अथवा न होवो आपण आतां छावणीस रहाणार नाहीं. मग श्रीमंतांनीं जहागीर जप्त केली तरी बेहेत्तर" परशुरामभाऊ अजून लहानच होते. या स्वारींत त्यांना रणांगणाचा चांगलाच अनुभव आला. अडीच वर्षे सारखें रणांगणावर राहिल्यामुळें त्यांनी आपल्या आईला भेटण्याच्या आतुरतेनें वरील प्रमाणें उद्गार काढले, ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. असो. या स्वारींत विजयी झालेल्या मराठ्यांची जर ही स्थिती झाली तर पराजित झालेल्या हैदराची काय झाली असेल हें सांगावयास नकोच.

हैदरवरील स्वारीचें काम त्रिंबकराव पेठे यांजवर सोंपवून श्रीमंत माधवरावसाहेब पेशवे प्रकृति बिघडल्यामुळें परत आले हें मागें सांगितलेंच आहे. पुण्यास आल्यापासून श्रीमंतांची प्रकृति न सुधारतां जास्तच बिघडत गेली. प्रकृतिस्वास्थ्याकरितां धौमास जाऊन रहाण्याचा श्रीमंतांचा विचार होता. व त्या प्रमाणें ते निघालेही. पण वाटेंत थेऊर मुक्कामीं आल्यावर प्रकृतिं जास्त झाली तेव्हा श्रीमंतांनीं थेऊरासच रहाण्याचा बेत ठरविला. हैदरच्या स्वारींतून परत आल्यावर सर्व प्रमुख पटवर्धन मंडळी श्रीमंत आजारी असल्यामुळें त्यांच्या दर्शनास आली. त्यांत वामनरावबाबा, परशुरामपंतभाऊ व रघुनाथराव निळकंठ हे पटवर्धनांच्या तीनहि पथकांचे प्रमुख हजर होते. थेऊरास आल्यापासून श्रीमंतांची प्रकृति जास्तच बिघडत गेली. शेवटीं ता. १८ नोव्हेंबर १७७२ रोजीं श्रीमंत माधवराव पेशवे कैलासवासी झाले. रमाबाईसाहेब सती गेल्या. सती जाण्याच्या वेळीं थोर थोर लोक दर्शनास आले होते. रमाबाईंनीं आपल्या अंगावरचे हिऱ्यामोत्यांचे सर्व अलंकार वाटून टाकले, व शांतवृत्तीनें धर्मशीळेवर चढून त्या साध्वीनें अग्निप्रवेश केला. वामनरावपटवर्धन पाया पडावयास गेले त्यावेळीं त्यांना रमाबाईनें आंत गणपतीची मूर्ती असलेली हिऱ्याची आंगठी दिली, व परशुरामभाऊंना पाचेची दिली.

माधवराव कैलासवासी झाल्यावर त्यांचे बंधु नारायणराव हे पेशव्याच्या गादीवर आले. साताऱ्याहून वस्त्रें वगैरे आणण्याचा समारंभ

झाल्यावर श्रीमंत नारायणराव साहेब आपल्या मातोश्रीस भेटण्याकरितां नाशिक क्षेत्रीं गंगापुरीस गेले. त्यावेळीं त्यांचे बरोबर वामनराव व परशुरामभाऊ पटवर्धन हेहि गेले होते. नारायणरावाचे चुलते राघोबा याचा आरंभापासूनच नारायणरावाशीं बेबनाव सुरू झाला. नारायणराव गंगापुरीस गेल्यावर इकडे पुण्यांत राघोबानें आपले चाळे करण्यास सुरवात केली. हैदरच्या वकिलाशीं त्यांचें राजकारण सुरू झालें. नारायणरावास ही बातमी समजतांच ते परत आले व हैदरच्या वकिलास त्यांनीं तात्काळ कैद करून पुरंदरच्या किल्ल्यावर ठेविलें. माधवरावांच्या मृत्यूमुळें हैदराला आपला गेलेला मुलूख परत मिळविण्याची संधी आली असें वाटत होतें, व त्याच धोरणानें त्यानें घरबुडव्या राघोबाजवळ आपल्या वकिलामार्फत राजकारण सुरू केलें होतें. हैदरचें हें धोरण पाहून नारायणरावांनीं हैदरवर स्वारी करण्याचें ठरविलें, व त्या प्रमाणें कर्नाटकांत स्वारी करण्याकरितां त्यांनीं पटवर्धन सरदारांस फौज जमविण्यास हुकूम दिला. नारायणरावाच्या अंगीं माधवरावांचे गुण नव्हते. ते रागीट व उतावळे असून हलक्या कानाचे होते. माधवरावांची तडफ व जरब दाखविण्याचा ते प्रयत्न करीत. पण माधवरावांचें थोरपण नारायणरावाच्या अंगीं नसल्यामुळें त्यांना तें साधत नसे. नारायणरावाच्या अशा वागणुकीमुळें दरबारांतील प्रतिष्ठित लोकांचा अपमान होऊं लागला. व त्यामुळें अब्रूदार मुत्सद्दी लोक दरबारांत लक्ष घालीनासे झाले. त्याच वेळी प्रभू लोकांना वेदोक्त कर्म करण्याचा अधिकार आहे किंवा नाहीं असा एक वाद उत्पन्न झाला. त्याचा निकाल प्रभू लोकांच्या विरुद्ध लागून त्यांच्यापासून एक करार लिहून घेतला गेला. हा करार प्रभू लोकांना अपमानास्पद असा वाटल्यामुळें ते राघोबादादास सामील झाले. राघोबादादावरील कडक बंदोबस्त, प्रभूलोकांवरील झालेलें ग्रामण्य, आणि नारायणरावाच्या स्वभावामुळें पुणें दरबारांतील प्रतिष्ठित लोकांची कारभारांत लक्ष घालण्यासंबंधानें उदासीनता, या सर्वांचा परिणाम असा झाला कीं नारायणरावाविरुद्ध पुणें दरबारांत एक गुप्त कट उत्पन्न झाला. या कटाचा मूळ उद्देश दादासाहेबांना

प्रतिबंधांतून मुक्त करावें एवढाच होता. पण पुढें या कटांत मोठमोठे लोक सामील होऊन त्यांत नारायणरावाला कैद करून राघोबाला गादीवर बसवावें असें ठरलें. या कटाची अंमल बजावणी करण्याचें काम सुमेरसिंग नांवाच्या गारद्याकडे दादासाहेबांनीं दिलें होतें. पण प्रत्यक्ष कामगिरी करितांना सुमेरसिंग व त्याचे साथीदार यांनीं नाराणरावास कैद करण्याऐवजीं ता. ३० माहे ऑगस्ट सन १७७३ रोजीं ढवळ्या दिवसा नारायणरावाचा शनिवार वाड्यांत अमानुषपणें खून केला. ही गोष्ट घडली त्या वेळीं सर्व पटवर्धन मंडळी पुण्यास नसून मिरजेस होती. *

नारायणरावाचा खून झाल्यानंतर पेशव्यांच्या घरांत दुसरा कोणीच नसल्यामुळें स्वाभाविकच राघोबा पेशवा झाला, व त्याच्या पेशवेपदाला नाइलाजानें कां होईना सर्व लोकांनीं पहिल्यानें तरी मान्यता दिली. नारायणरावाला धरण्याच्या कटाचें रूपांतर त्याच्या खुनांत झाल्यामुळें राघोबाचा पाठिराखा साथिदार सखारामबापू याच्या वृत्तींत थोडी चलबिचल झाली. सखारामबापूनें कारभार पहावा अशी दादाची इच्छा होती. पण नारायणरावाच्या खुनानंतर कारभार हातीं घेतल्यास खुनांत आपलें अंग

---

* ( टीप -- नारायणरावाच्या खुनासंबंधानें अजून बराच गैरसमज प्रचलित आहे. ध चा मा करून आनंदीबाईनें हा खून करविला अशी समजूत रूढ आहे. पण अस्सल कागदपत्रांतील पुरावा याच्या विरुद्ध आहे. खरी हकिगत अशी आहे कीं, मुळांत नारायणरावाला पकडण्याचा कट झाला. या कटांत सखारामबापू सुद्धां सामील होता ही गोष्ट नारायणरावाच्या मारेकऱ्यांपैकीं एकाची जबानी इतिहास संग्रह या ग्रंथांत कै० पारसनीस यांनीं छापिली आहे. त्यावरून स्पष्ट आहे. मुळांत पकडण्याचा कट असतां त्याचें रूपांतर नारायणरावाला मारण्यांत कसें झालें याबद्दलहि अस्सल कागदपत्रांवरून असें दिसतें कीं, राघोबानेंच गारद्यांना जरूर पडल्यास नारायणरावास ठार करण्याची परवानगी दिली. या संबंधानें कै० पारसनीस यांनी इतिहाससंग्रह या ग्रंथांत हरिपंत फडक्यांनीं नाना फडनवीस यांस लिहिलेलें एक पत्र छापलें आहे. *

आहे असा लोकांना संशय येईल म्हणून सखारामबापूंनीं कारभारासंबंधानें उदासवृत्ती धारण केली. दादानें चिंतो विठ्ठल सारख्यांस हातांशीं धरून कारभारास सुरवात केली, आणि राज्यांतील बडचा बडचा फौजबंद सरदारांस भेटीस येण्यासंबंधानें हुकूम पाठविले. भवानराव प्रतिनिधी, बापूजी नाईक वगैरे येऊन भेटले. आतां पटवर्धनांची भेटण्याची पाळी आली. पटवर्धनांसंबंधानें दादाचा ग्रह फारच वाईट होता. पण मोरोबा व नाना यांनीं खात्री करून दिल्यावर दादांनीं पटवर्धनांस भेटीस बोलाविलें. यावेळीं दादास भेटण्याकरितां परशुरामभाऊंनी यावें असें ठरलें, व त्या प्रमाणें परशुरामभाऊ पुण्यास येऊन पोंचले. भाऊंची भेट होतांच दादांनीं वामनराव पटवर्धनास फौजेसुद्धां घेऊन यावें असें भाऊस सांगितलें. परशुरामभाऊ पुण्यास आल्यावर त्यांनीं तेथील परिस्थितीचें बारकाईनें निरीक्षण केलें. त्यांत त्यांना असें आढळून आलें कीं नारायणरावांची बायको गंगाबाई हिला कांहीं दिवस गेले असून ती गरोदर होती. तूर्तच्या राज्यक्रांतीच्या काळांत गंगाबाईला पुण्यास रहाणें धोक्याचें होतें म्हणून तिचें रक्षण व्हावें या हेतूनें गंगाबाईला मिरजेस घेऊन यावें कीं काय अशी कल्पना परशुरामभाऊंच्या

---

* ( इतिहास संग्रह ऐतिहासिक चर्चा पान ६ ) त्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं गारद्यांनीं राघोबाच्या सांगण्यावरून नारायणरावाला पकडण्याची कामगिरी पत्करिली त्या वेळीं त्यांनीं राघोबाकडून असें वचन घेतलें कीं, पकडण्याच्या कटकटींत मारणें जरूर झालें तर राघोबाची हरकत नसावी. या गोष्टीला राघोबानें परवानगी दिल्यावर गारद्यांनीं नारायणरावास ठार मारिलें. राघोबानें दिलेला हा हुकूम नारायण रावाला धरावा या मताचे जे लोक होते त्यांनाहि माहीत नसावा. राघोबाला सर्व बाबतींत अपयश येऊन त्याला पेनशन मिळाल्यावर त्यानें गोपिकाबाईस भेटण्याची इच्छा प्रदर्शित केली. पण आपल्या मुलाचा खून करणाऱ्या पापी राघोबाचें दर्शन घेण्याचें गोपिकाबाईनें नाकारिलें. पापाचा उच्चार करून प्रायश्चित्त घेण्यास राघोबा तयार असेल तरच आपण त्याची भेट घेऊं असें गोपिकाबाईनें सांगितल्यावरून राघोबाशीं *

मनांत आली. पण गंगाबाईला मिरजेस नेण्यांत फारच मोठी जबाबदारी पटवर्धनांवर येणार होती व ती सांभाळणें आपल्यास झेपेल कीं नाहीं याबद्दल सर्व पटवर्धन मंडळीस शंका वाटत असल्यामुळें गंगाबाईला मिरजेस नेण्याची कल्पना पटवर्धनांस सोडून द्यावी लागली. पण गंगाबाई गरोदर असल्यामुळें तिच्या नांवानें कारभार सुरू करावा व दादाला शह द्यावा असें कारस्थान करण्यास आतां सखारामबापूनेंच सुरवात केल्यामुळें सर्व पटवर्धन मंडळींनीं या कारस्थानास पाठिंबा देण्याचें ठरविलें, व पुण्यास बारभाईच्या कटाची उभारणी झाली. या कटांत सखारामबापू, नाना, हरिपंत फडके आणि पटवर्धन हे प्रमुख होते. या सर्वांच्या विचारें गंगाबाई व पार्वतीबाई ह्या पेशव्यांच्या घरांतील दोन्ही बायकांना पुरंदर किल्यावर ठेवावें असें ठरलें, व त्या प्रमाणें त्या दोघींची रवानगी पुरंदरावर झाली.

नागपूरच्या भोसल्यांच्या घरांत भांडण लागलें होतें. मुधोजी व साबाजी यांमध्यें सेनासाहेब सुभ्याचे पदाबद्दल बेबनाव उत्पन्न झाला होता. त्यांत दादानें मुधोजीचा पक्ष घेतल्यामुळें साबाजीनें निजामाची मदत मागितली होती. निजामानें साबाजीला मदत करण्याचें ठरविल्यामुळें

---

* वाटाघाटी सुरू झाल्या. त्या वाटाघाटींत नारायणरावाचा खून कसा झाला याची स्पष्ट कबुली राघोबानें दिली आहे, व तीच हकिगत वर उल्लेख केलेल्या हरीपंत फडक्यांच्या पत्रांत खुलासेवार आली आहे. राघोबानें पुढें प्रायश्चित्त घेतलें व नंतर गोपिकाबाईची भेट घेतली वगैरे संबंधानेंहि अस्सल पत्रें इतिहास संग्रहांत आहेत. तात्पर्य नारायणरावाचा खून आनंदीबाईनें ध चा मा करून केला नाहीं हें स्पष्ट आहे; इतकेंच नव्हे तर आनंदीबाईचा संबंध नारायणरावाला धरण्याचा जो कट होता त्यांतहि नव्हता. कारण मारेकऱ्यांपैकीं तुळच्या पवार याची जी जबानी प्रसिद्ध आहे त्यांत सखारामबापू, भवानराव प्रतिनिधी सारख्यांचीं नांवें आहेत. पण आनंदीबाईचें नांव नाहीं. हा सर्व पुरावा लक्षांत घेतला म्हणजे आनंदीबाईचा धरण्याच्या किंवा मारण्याच्या कोणच्याच कटाशीं कांहीं संबंध नव्हता हें *

निजामावर स्वारी करणें दादाला प्राप्त झालें. दादाची व परशुरामभाऊंची भेट झाली त्यावेळीं दादानें वामनरावाला फौजसुद्धां पाठवून देण्यासंबंधानें परशुरामभाऊस सांगितल्याचें पूर्वीं लिहिलेंच आहे. वामनरावाला हें आमंत्रण निजामावरील स्वारींत सामील होण्याकरितांच होतें. या आमंत्रणाप्रमाणें वामनराव, रघुनाथ, निळकंठ वगैरे पटवर्धन मंडळी दादाच्या निजामावरील होणाऱ्या स्वारींत दाखल झाली. पटवर्धनांचीं तिन्हीं पथकें या स्वारींत आलीं होती. व तीं सर्व वामनरावाच्या हुकमतीखालीं होतीं. दादा विरुद्ध नाना, सखारामबापू वगैरेनीं बारभाई कारस्थान सुरू केल्याचा सुगावा अजून दादास लागला नव्हता. दादा स्वारीस निघाले तेव्हां दादाच्या समाधानाकरितां म्हणून नाना व बापू हे दोन्ही निघाले होते पण कांहीं थोडचा मजली गेल्यावर दोघेही प्रकृतीच्या अस्वास्थ्याचें कारण सांगून परत फिरले व पुण्यास येऊन दाखल झाले. पटवर्धनमंडळी मात्र बरोबर होती. पटवर्धनांना बरोबर घेऊन दादाची स्वारी निघाली. त्यांनीं वाटेंत नळदुर्गचा किल्ला घेतला. पुढें बेदर मुक्कामीं निजामाशीं गांठ पडली पण विशेष मोठी लढाई न होतां किरकोळ झटापटी झाल्यावर निजाम तहास आला. या तहांत निजामानें वीस लक्षांची जहागीर व औरंगाबादचा किल्ला देण्याचें

* स्पष्ट होतें; आणि या संबंधानें तिनें स्वतः जे उद्गार काढले आहेत तेच खरें असावे असें दिसतें. तिच्या संबंधानें गैरसमज मात्र त्यावेळींहि होता असें दिसतें. कारण ती सुद्धां आपल्या बोलण्यांत ' ध ' माचा उल्लेख करते. पे. द. मध्यें आनंदीबाईची दिनचर्या म्हणून जो भाग छापला आहे त्यांत आनंदीबाई खालील प्रमाणें म्हणते. " माझी ममता विशेष म्हणोन नारायणरायाचा गर्दीचा मजकूर मला ( राघोबा ) सांगत नव्हते. यांणी ( कारभाऱ्यांनीं ) चौकशी किमर्थ केली नाहीं ? यादीची अक्षरें ' ध ' चा ' मा ' कोणी केला याची चौकशी किमर्थ न केली? माझा दस्ताऐवज किंवा निरोप कांहीं तरी निवडावयाचें होतें. कांहींच न करितां उगेच पेचांत ठेविलें. दैवास उपाय नाहीं." ( पे. द. भा. ४–७३ ) आनंदीबाईचे हे उद्गार आणि इतिहास संग्रहांतील वर उल्लेखिलेलीं पत्रें पाहिलीं म्हणजे नारायणरावाच्या खुनाशीं आनंदीबाईचा कांहीच संबंध नव्हता असें स्पष्ट दिसतें ).

प्रथम कबूल केलें होतें. पण नंतर खासा निज़ाम भेटीस येऊन त्यानें दादाची इतकी मनधरणी आणि खुशामत केली कीं दादानेंहि वीस लक्षांची जहागीर स्वखुशीनें परत निजामास दिली. निजामाचा उलगडा झाल्यावर दादाची स्वारी सुरापूरच्या नाइकाकडे खंडणी तुंबली होती ती वसूल करण्याकरितां निघाली.

दादा स्वारीस निघाले तेव्हां सखारामबापू व नाना यांच्याबरोबर थोडचा मजली गेल्यावर स्वारींतून परत फिरल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. नाना व बापू परत पुण्यास आल्यावर त्यांनीं आपले पूर्वींचें मतभेद विसरून दादाला शह देण्याकरितां बारभाईचें कारस्थान उभें केलें व तें यशस्वी होण्याकरितां झपाटचानें उद्योग सुरू केला. पटवर्धन रास्ते यांचा या कारस्थानाला पाठिंबा होताच. कारस्थानाची उभारणी झाल्यावर गंगाबाईचा गर्भ रक्षण करणें हें या कारभाऱ्यांपुढें मोठेंच काम होतें. गंगाबाईला कारभाऱ्यांनीं पुरंदरला नेऊन ठेविली व नाना आणि बापू हेहि पुरंदरला जाऊन राहिले. पुरंदरला गेल्यावर कारभाऱ्यांनीं गंगाबाईच्या नांवानें कारभार सुरू केला. गंगाबाईस पुत्र झाला तर ठीकच नच झाला तर दत्तक घेऊन राज्यकारभार चालविण्याचें कारभाऱ्यांनीं ठरविलें.

सुरापूर, गडवाल वगैरे प्रांतांत खंडणी वसूल करण्याकरितां दादाची स्वारी फिरत होती. या स्वारींत दादाला बातमी समजली कीं हैदरनें पुन्हां धुमाकूळ घालून मदगिरी चेनायदुर्ग, होसकोटें, बाळापूर वगैरे तालुके घेतले. हैदरचा वकील आपाजीराम यास नारायणरावानें कैदेंत ठेविलें होतें. पण नारायणरावाचा वध झाल्यावर दादा पेशवे झाले व आपल्या या सहकाऱ्याला त्यांनीं ताबडतोब बंधमुक्त केलें. हैदरचा वकील बंधमुक्त झाल्यावर त्यानें तात्काळ हैदरला सूचना दिली कीं पुण्यास राज्यक्रांती झाल्यामुळें पुन्हां आपला गेलेला मुलूख मिळविण्यास ही संधी उत्तम आहे. हैदरनें ही सूचना येतांच ताबडतोब वर लिहिल्या प्रमाणें बराच मुलूख काबीज केला. दादास ही हकिगत समजल्यावर हैदरवर स्वारी करण्याची तयारी दादास करणें प्राप्त झालें. हैदरावरील स्वारीचा विचार दादा करीत

असतांनाच तंजावरच्या राजाकडून दादाकडे मदतीची मागणी आली. महमदअल्लीनें इंग्रजांच्या मदतीनें तंजावरचा किल्ला घेतल्यामुळें तंजावरच्या राजानें दादाकडे मदत मागितली होती. तंजावर हा स्वराज्यांत मोडणाऱ्या प्रांतांपैकीं होता. म्हणून दादानें पहिल्यानें तंजावरच्या मदतीस जाण्याचें ठरविलें, व त्या प्रमाणें दादाची स्वारी रायदुर्ग, कल्याणदुर्ग पर्यंत आली. या ठिकाणीं मुरारराव घोरपडे येऊन दादाला मिळाले. कल्याणदुर्गाहून दादा कार्तिकस्वामीच्या दर्शनास गेले. तेथून परत येत असतांना दादास बारभाईच्या कारस्थानाची बातमी समजली, व तीहि हैदराच्या वकिलाकडून समजली. ही बातमी समजतांच दादाच्या मनांत संशय आणि गोंधळ उत्पन्न झाला असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. दादाबरोबर यावेळीं भवानराव प्रतिनिधी, पटवर्धन मंडळी, मुरारराव घोरपडे वगैरे लोक होते. त्यांचा दादाला संशय येऊं लागला. भवानराव प्रतिनिधीच्या फौजेंत फितूर आहे असा दादाला संशय आल्यावरून दादानें भवानरावास फौज कमी करण्यास सांगितलें. पण भवानरावानें दादाचा हुकूम मानला नाहीं. त्यामुळें दादानें एकदम भवानरावावर हल्ला करून उभयपक्षीं गोळागोळी सुरू झाली. भवानराव व पटवर्धन मंडळी यांचा स्नेह होता. भवानरावावर हल्ला होतांच पटवर्धन भवानरावाच्या मदतीस आले. आज जी गत भवानरावाची तीच उद्यां आमची होईल म्हणून पटवर्धन मदतीस आले. पण दादाला हें समजतांच दादानें कारकून पाठवून पटवर्धनांचा जाब विचारला. पटवर्धनांनीं उत्तर दिलें कीं श्रीमंतांची स्वारी तयार होऊन आलेचें कळल्यावर आम्ही तयार होऊन राहिलों. पुढें आम्हास काय आज्ञा तें कळवावें. त्याप्रमाणें वर्तणूक करूं. शेवटीं पटवर्धनातर्फे पुरुषोत्तमरावदाजी व दादातर्फे चिंतोविठ्ठल यांमध्यें बोलणें चालणें होऊन मुराररावानें मध्यस्थी केल्यावरून उभयपक्षीं तूर्त तरी गोडी झाली, व दादाचा संशय नाहींसा झाला. ☙

---

☙( टीप— भवानराव प्रतिनिधीवर दादांनी हल्ला करण्याची तयारी केली त्या प्रमाणेंच पटवर्धनावरहि हल्ला करण्याचा दादाचा विचार होता. भवानरावावर हल्ला करण्याची तयारी होतांच परशुरामभाऊ पहिल्यानें ☙

श्री ग्रंथ संग्रहालय

मुराररावाच्या मध्यस्थीनें दादाचा व पटवर्धन प्रतिनिधींचा तंटा मिटल्यासारखा दिसला तरी एकमेकांच्या मनांत संशय आला तो कायमचा नाहींसा होणें कठीण होतें. ही परिस्थिती लक्षांत घेऊन पटवर्धन, प्रतिनिधी हे दादाच्या लष्करांतून फुटून तीन कोसांवर दूर जाऊन राहिले. वामनराव व प्रतिनिधी यांचें लष्कर दूर गेल्यावर दादांनीं गुत्तीकडे पलायन करण्याचा बेत केला. पण हा बेत वामनरावाला कळल्यावर तो दादाचा पाठलाग करण्याचा विचार करूं लागला. या संबंधानें पेशवे दप्तरमध्यें एक खुलासेवार पत्र आहे, त्यांत खालीलप्रमाणें मजकूर आहे. 'देवाचें दर्शन घेऊन ( दादा ) बुणग्यांत येत होते. ऐकोन ( बारभाईच्या कारस्थानाचें वर्तमान ) तेथें थबकोन उभे राहिले. नानाप्रकारच्या वल्गना करूं लागले.

---

* प्रतिनिधीच्या मदतीस आले, व त्यामुळें प्रतिनिधीप्रमाणेंच पटवर्धनांचाहि दादाला संशय आला होता. पण मुरारराव घोरपडे मध्यस्थी पडून हा तंटा थांबविला. या संबंधानें पे. दप्तरमध्यें खालील प्रमाणें उल्लेख आहेत. "वामनरावांनीं आपले बुनगें गजेंद्रगडाकडे लावून देऊन आपण सडेच होते. त्यास पेशजी भवानराव यांजवर दगा होऊन त्याची फौज दूर करून पांचशें राऊत ठेविले, याचें कारण भवानराव फितुरी आहेत असें चौघानी समजाविलें होतें, त्यावरून हें केलें. तथापी संशये न जाये तेव्हां हुजुरातची पथकें होतीं त्यांस आज्ञा जाहली कीं तुम्ही भवानरायांस नजरेंत असो देणें. ऐसें करितां एक दिवस श्रीमंत सायंकाळीं खासे हल्ला करावयासी चालोन गेले. तेव्हां भवानरावाचे कुमकेस परशुराम रामचंद्र मदतीस सामील जाहले. तेव्हां हेहि नरम पडले. इतक्यांत सेनापती दरमियान पडोन समाधान केलें.' ( पे. द. भा. ५–४० ) दुसऱ्या एका पत्रांत खालीलप्रमाणें मजकूर आहे. "श्रीमंत पंचमीस मध्यरात्रीं प्रतिनिधीवर हल्ला करावयाचा हुकूम जाहला. प्रतिनिधी तयार झाले. वामनराव वगैरे सरदार प्रतिनिधीस सामील झाले. इतका मजकूर झाला तो मुरारराव येऊन रात्रीची हल्ला महकूब करविली. दुसरे दिवशीं वामनरावावर हल्ला करावयाचा हुकूम झाला, तोहि मुराररावांनी राहविला.' ( पे. द. ३६–२१ )

जे बंदीत होतों तेथें सांभानी रक्षिलें. आतांहि ईश्वर आहे. तितक्यांत मालोजी घोरपडे होते. हळू बोलावें. तुमचे जवळ शत्रू आहे. लवकर निघोन गुत्तीच्या ठाण्यांत जावें. तैसेच आडवाटे निघोन पाचशें राऊतानिशीं गेले. वामनरायास कळतांच पाठी लागले. हें वर्तमान आनंदीबाईस कळलें. गारद्यांस बोलावून आपल्या भोवता बंदोबस्त केला. महमद इसफ यांनी मनावर धरून बाईच्या डेऱ्या भोंवता बंदोबस्त चांगला केला. ज़ुजुन मरावें हें मानस. वामनराव याचे मंडळीचे लोक होते ते बाईजवळून निघोन दो कोसावर थांबले. या प्रमाणें बातमी एक. दुसरी बातमी. हें वर्तमान कळतांच ( दादा ) बुणग्यांत येत होते. विसाकोसांवर थबकोन मुक्काम केला. दहा हजार फौजेनिशीं लोक तेथून रात्रीं पळाले. तिसरी बातमी देवाचें दर्शन घेऊन बुणग्यांत आले. हें वर्तमान कळतांच मऱ्हाठे मंडळीं पाटणकर, निंबाळकर, घाटगे, माने वगैरे यांस बोलावून सांगितलें जे, आम्हां भोवते वामनराव यानीं अरिष्ट मांडलें. याचें पारिपत्य तुम्ही करावें. येविसी शपथ द्यावी. मऱ्हाठे मंडळीने उत्तर केलें जे, तुम्ही प्रभु एक उरले. वामनराव किमपी करणार नाहीं. आम्हीं तुमचे सोबती आहों. वामनराव यास चार गोष्टी समजोन सांगू. येथ रात्र जाहली. उदईक याचा बंदोबस्त करूं. तूर्त आमच्यानें वामनराव याजवर जाववत नाहीं. आपल्यांत लढावें हें विदीत नाहीं. त्याची कल्पना असेल ती उदईक काढू, ऐसें बोलोन आपले गोटांत गेले. दादासाहेबी आपले गार्दी बोलावून भोवता बंदोबस्त करून रात्रों राहिले. तेथून बायकोसुद्धां व गारदी चारहजार फौज सुद्धां निघोन गेले. वामनराव व मराठे मंडळी सारे एक होऊन तेथें थबकले. चिंतो विठ्ठल वामनरावाकडे आले हेंही ऐकिलें. थोडकी मसलत मराठे जवळून गेली. दादा जातो हें कळतांच पाठिलाग न केला. त्यांस ( दादास ) राखिले. वामनरावास मसलत भारी पडली. ( पे. द. ३६–२० )

दादाला बारभाईच्या कारस्थानाची बातमी समजतांच त्याला पटवर्धन प्रतिनिधी वगैरेचा संशय येऊं लागला. आणि म्हणूनच त्यानें पटवर्धन व प्रतिनिधी यांवर हल्ला करण्याचें ठरविलें. पण जवळ असलेल्या

मराठे सरदारांनीं दादाला मदत केली नाहीं. बारभाईंच्या कारस्थानाला पटवर्धनांचा पाठिंबा पहिल्यापासूनच होता. दादा पळून जाऊं लागला तर त्याला पकडावें असा वामनरावाचा बेत होता. पण या गोष्टीलाहि मराठे सरदारांनीं पाठिंबा दिला नाहीं. 'थोडकी मसलत मराठे जवळून गेली. दादा जातो हें कळतांच पाठिलाग न केला. त्यांस राखिलें. वामनरायास मसलत भारी पडली.' या वरील पत्रांतील उद्गारावरून दादाला पकडण्याचें काम वामनरावाना साधलें नाहीं, हें उघड होतें. मराठे सरदारांनीं वामनरावाला या वेळेस मदत केली असती तर दादानें पुढें केलेले अनेक अनर्थ टाळतां आले असते. व बारभाईंचा मार्ग सोपा झाला असता असें वाटतें.

मुधोजी व साबाजी भोसले यांच्या भांडणांत दादानें मुधोजीचा पक्ष घेऊन साबाजीचें पारिपत्य करण्याचें ठरविलें होतें, व त्या कामगिरीकरितां दादानें त्रिंबकरावमामा पेठे व रास्ते यांची फौज नेमिली होती. पण बारभाईंच्या कारस्थानाची नक्की उभारणी झाल्याचें कळतांच त्रिंबकरावमामा व रास्ते यांनीं साबाजीजवळ मिळतें घेऊन दादाशींच लढा देण्याचें धोरण स्वीकारलें. निजामाचें धोरणहि साबाजीलाच अनुकूल होतें. तेव्हां निजाम, साबाजी, त्रिंबकरावमामा व रास्ते या सर्वांनीं दादाशींच लढा देण्याचा उद्योग आरंभिला. दादाचा बेत यावेळीं तंजावरच्या राजास मदतीस जाऊन नंतर हैदरवर स्वारी करण्याचा होता. पण त्रिंबकरावमामा, साबाजी भोसले वगैरेंनी उलट खाल्याचें पाहून दादास हैदरावरील स्वारीचा बेत सोडून द्यावा लागला. दादानें हैदरावरील स्वारीचा बेत सोडला इतकेंच नव्हे तर त्यानें हैदरशीं मैत्री संपादन करण्याकरितां म्हणून नवीन तह हैदरशीं केला. हा तह फेब्रुवारी सन १७७४ मध्यें झाला. या तहानें दादानें तुंगभद्रा व कृष्णा या नद्यांमधील माधवराव पेशव्यांनीं मिळविलेला सर्व मुलूख हैदरास देऊन टाकला. या तहास कल्याणदुर्गचा तह म्हणतात. या तहानें हैदरनें पेशव्यास दरसाल सहा लक्ष खंडणी द्यावी व राघोबाचा पेशवाईच्या गादीवरील हक्क हैदरनें मान्य करावा असें ठरलें. माधवराव

पेशवे व विशेषतः पटवर्धन सरदार यांनीं रक्ताचें पाणी करून मोठ्या परिश्रमानें मिळविलेला सर्व मुलूख दादानें चुटकीसरसा हैदरला देऊन टाकला. यांत त्याचा हेतू पटवर्धनांवर सूड उगविण्याचा होता. कारण या मुलुखांत पटवर्धनांच्या जहागिरीचा बराच मुलूख असल्यामुळें पटवर्धनांचें वाटोळें करण्यास ही चांगलीच संधीं आली असें समजून बेछूटपणानें दादानें सर्व मूलूख हैदरला दिला.

हैदरशीं तह झाल्यामुळें दादा कृष्णेच्या **पाण्याने** परत देशीं येंण्यास निघाले. त्रिंबकरावमामा या वेळीं भांडारकवठ्यापर्यंत आले होते. त्रिंबकरावमामा जवळ आल्याची बातमी दादाला होतीच, व त्यामूळें त्याच्या फोजेंत थोडी गडबडहि झाली. दादा झपाट्यानें कृष्णा नदी उतरून रास्ते व पटवर्धन यांच्या मुलखांचो जाळपोळ करीत पंढरपुरापर्यंत आले. पटवर्धनहि त्याचे मागें एक दोन मजलांनीं होतेच. त्रिंबकरावमामा, साबाजी व निजाम यांची गांठ गुंजोटी मुक्कामीं पडली, व तेथून दादासाहेबांवर हल्ला करण्याची योजना ते ठरवीत होते. लांब मजल करून पटवर्धन मंडळीहि त्रिंबकरावास येऊन मिळाली. पटवर्धन मंडळींत वामनराव, परशुरामभाऊ, पुरुषोतमराव, रघुनाथ निळकंठ वगैरे सर्व प्रमुख पटवर्धन हजर होते. गुंजोटीच्या मुक्कामाहून त्रिंबकरावमामा कोसेगांवास आले, त्याच दिवशीं पटवर्धन मंडळी अठ्ठावीस कोसांची मजल मारून त्रिंबकरावमामास मिळाली. पटवर्धनांची फौज लांब मजलीमुळें दमून गेली होती, म्हणून एक दिवस विश्रांति घेऊन नंतर दादावर हल्ला करावा असा सर्वांचा बेत होता. पण दादानेंच एकदम जोराचा हल्ला त्रिंबकरावमामावर चढविला. त्रिंबकरावमामाच्या फौजेंत दादानें फितूर केला होता, त्याची माहिती त्रिंबकराव मामास लागली नाहीं. दादाचा जोराचा हल्ला होतांच फितूर लोकांनीं पळ काढला व मामाचे तोंडावर जबर जखम होऊन त्रिंबकरावमामा दादांकडे पाडाव सांपडले. कासेगांवची ही लढाई ता. २६ माहे मार्च सन १७७४ रोजीं झाली. या लढाईंत त्रिंबकरावमामा जखमी झाले व त्या जखमेमुळें

पुढें दोन दिवसांनीं मरण पावले. *

त्रिंबकरावासारखा मोहरा गमावल्यामुळें बारभाईंच्या बंडाचा जोर कमी होईल अशी दादाला आशा होती. पण ती व्यर्थ होती. कारण नारायण-रावाच्या खुनामुळें दादाविरुद्ध जें असंतोषाचें वातावरण उत्पन्न झालें होतें, त्याचा फायदा बारभाईंनाच मिळत होता, व बारभाईंनाच सर्व बाजूंनीं अनुकूल वातावरण होतें. साबाजी भोसलेच दुसऱ्या एका पत्रांत म्हणतो " श्रीमंतांचे मागें ( नारायणरावाचे मागें ) जिवावर उदार होऊन कार्यास प्रवर्तलों तों मामा नाहींत म्हणून चुकतों असा प्रकार नाहीं. आज नबाब (निजाम) आले म्हणजे उदईक सारा जमाव जथून चढाई करून जातो. (खरे प. नं १३४९) त्रिंबकरावमामा मरण पावल्यामुळें पेशव्यांच्या फौजेचे मुख्य सेनापती म्हणून हरीपंत फडक्यांची नेमणूक झाली. हरीपंत, पटवर्धन, रास्ते, भोसले, निजाम, नारोशंकर वगैरे सर्व मंडळी एकत्र झाल्यावर यांच्यापुढें आपला टिकाव लागणार नाहीं असें समजून दादानें कायगांवटोक्यावरून औरंगाबादेकडे प्रयाण केलें पण तेथेंहि थांबण्याचें त्यास धाडस झालें नाहीं तेथून दादा पळाला तो बऱ्हाणपुराकडे गेला. हरीपंतहि सर्व फौजेसह त्याच्या पाठीस लागले.

दादाच्या पाठलागाचें काम करण्यांत हरीपंत गुंतले असतां इकडे पुरंदरच्या बाजूस काय चाललें होतें हें पाहिलें पाहिजे. पुरंदरच्या किल्ल्यावर

* (टीपः—कासेगांवच्या लढाईंत त्रिंबकरावमामा मरण पावले तरी धीर सोडण्याचें कारण नाहीं. वामनराव, रास्ते, नारोशंकर, निजाम वगैरे मंडळी आम्हांजवळ आहेत व आम्ही दादाचा समाचार घेऊं अशा अर्थाचें पत्र साबाजी भोसले यांनीं बारभाईंच्या कारस्थानाचे एक प्रमुख नाना फडणीस यांना लिहिलें आहे. साबाजी लिहितो " दादांनी कूच मात्र न करावें. ईश्वर सर्व गोष्टी अनुकूल करील. " ( पे. द. ३६–४१ ) दादा पळण्यांत मोठा चपळ होता. पळून हातचा निसटलातर सांगतां येत नाहीं. पण जाग्या-वर असेल तर आम्ही त्याचा समाचार घेऊं. त्रिंबकरावासारखा शूर योद्धा गेला तरी भिण्याचें कारण नाहीं. असा मजकूर साबाजीनें नाना फडणिसास वर उल्लेखिलेल्या पत्रांत लिहिला आहे. )

८०४२

गंगाबाई, पार्वतीबाई वगैरे पेशव्यांच्या स्त्रिया होत्या व त्यांच्या रक्षणासाठीं नाना व बापू हेहि तेथेंच होते. त्रिंबकराव मेल्यामुळें आतां बारभाईचा मोठा आधार म्हणजे पटवर्धन सरदार हाच होता. पटवर्धनांची पथकें जरी तीन होतीं तरी तीं कोणत्याहि प्रसंगीं एकोप्यानें वागत. त्यांचा पुढारी एकच असे. आपल्या पुढाऱ्याच्या शब्दाबाहेर पटवर्धन कधींहि जात नसत. अशा स्थितींत एका पुढाऱ्याच्या हूकमतीखालीं वागणारीं पटवर्धनांचीं तीन पथकें ही मोठी दांडगी शक्ति समजली जात असे, व याच शक्तीचा आधार आतां कारभाऱ्यांना होता. कारभाऱ्यांना पटवर्धनांच्या या सामर्थ्याची जाणीव होती. पटवर्धनास उत्तेजन देण्याकरितां नानांनी पटवर्धनासंबंधानें त्यांच्या कारकुनाजवळ खालील उद्गार काढल्याचें एका पत्रांत आढळतें. "पुढें मनसबा शेवटास नेणें हा भरंवसा त्यांचाच (पटवर्धनांचाच) आहे. भरंवसा त्यांचाच धरून उद्योग केला. पुढें मनसबा शेवटास नेणें त्यांचेकडेसच आहे." ( खरे प. नं- १३६२ ) दुसऱ्या एका पत्रांत पार्वतीबाईचे उद्गार पटवर्धनांच्या कारकुनानें वामनरावास खालीलप्रमाणें कळविले आहेत. 'भरंवसा तुमचा. तुमच्या भरंवशावर ही गं ठ झाली.' ( खरे प. नं. १३५७ )

पटवर्धन हे एकोप्यानें वागत असल्यामुळें त्यांचें सामर्थ्य जरी दांडगें होतें तरी आर्थिक दृष्टीनें पटवर्धनांची स्थिती खालावलेली होती. दादाच्या पळापळींत पटवर्धनांचाच मुलूख ज्यास्त उध्वस्त झाला होता. व त्यामुळें त्यांच्या मूलखाचा वसूलहि वेळेवर येत नव्हता. अशा स्थितींत कर्ज काढनच पटवर्धनांचे कारभारी पांडुरंगराव यांना फौजेचा खर्च चालवावा लागत होता. तरी सुद्धां पटवर्धन आपल्या कर्तव्यास मात्र चुकत नव्हते.

दादासाहेबानें जिकडे तिकडेच गोंधळ उडवून दिल्यामुळें कोणच्या वेळीं दादाचे हस्तक काय करतील याचा नेम नव्हता. त्रिंबकच्या किल्ल्यावर असाच गोंधळ उडवून देण्याचें काम दादाच्या हस्तकांनीं सुरू केलें. त्रिंबकचा किल्ला ताब्यांत घेऊन दादाच्या हस्तकांनीं आसपासच्या गांवांत लुटालूट व जाळपोळ करण्यास सुरवात केली. या बंडवाल्यांचा समाचार घेण्यास

९२८३५
२८।८।५३



कारभाऱ्यांनीं पुरुषोत्तमराव दाजी पटवर्धन यास पाठविलें. पुरुषोत्तमरावानें ताबडतोब बंडवाल्यांचा फडशा उडवून दिला व नंतर तो गंगापुरास गोपिकाबाईच्या भेटीस गेला. बंडाचें निवारण होऊन बंडवाले कबज्यांत आले. आतां किल्ला कोणाच्या ताब्यांत द्यावा ह्या संबंधानें पुरुषोत्तमरावानें गंगाबाईचा सल्ला विचारला. गंगाबाईनें कारभाऱ्यांचा सल्ला घेऊन ते सांगतील त्याप्रमाणें करावें असें पुरुषोत्तमरावास सांगितलें.

दादाचा पाठलाग व त्याच्या हस्तकांनीं राज्यांत उडवून दिलेला गोंधळ यामुळें कारभाऱ्यांचीं मनें व्यग्र झालीं होतीं. पण ते एकाच आशेवर अवलंबून होते ती आशा ही कीं गंगाबाईच्या पोटीं पूत्र जन्मास आला तर राज्याला योग्य वारस उत्पन्न होऊन दादाचे चाळे आपोआपच थांबतील. कारभारी ज्या आशेची वाट पहात होते ती सफळ होण्याचा योग आला. श्रीमंत मातोश्री गंगाबाईसाहेब प्रसूत होऊन त्यांचे पोटीं श्रीमंत सवाई-माधवराव यांचा जन्म ता. १८ एप्रिल १७७४ रोजीं झाला. गंगाबाईला पुत्र झाल्यामुळें जिकडे तिकडे आनंदी आनंद झाला, व जणू कांहीं महाराष्ट्राचा भाग्यरवीच उदयाचलावर आला अशी लोकांची भावना झाली. *

गंगाबाईस पुत्र होऊन राज्यास वारस उत्पन्न झाल्यामुळें दादाच्या चळवळीला स्वाभाविकच बंडाचें स्वरूप आलें आणि त्याचा पाठलाग करणारे हरीपंत, पटवर्धन, वगैरेनाहि मोठा धीर आला. पेशवाईस वारस उत्पन्न झाल्यामुळें लगेच त्याचे नांवें पेशवाईचीं वस्त्रें आणण्याची खटपट कारभाऱ्यांनीं केली. उभयतां कारभारी साताऱ्यास छत्रपतींकडे गेले व त्यांनी श्रीमंत सवाई माधवराव यांचे नांवें पेशवाईचीं वस्त्रें आणून तीं श्रीमंतांस

---

* ( टीप— गंगाबाईस पुत्र झाल्याची बातमी पे. द. मध्यें एका पत्रांत खालील प्रमाणें आहे. ' पुरंदरचें पत्र येच क्षणीं आलें. श्रीमंत मातोश्री गंगाबाई यांस अधिक ( वैशाख ) शु० ७ इंदुवारीं प्रसूत जाली. पुत्ररत्न झालें. आपणास कळावें ' ( पे. द. ५–४५ ) खरे यांच्या ऐ. ले. संग्रहामध्यें गंगाबाईस पुत्ररत्न झाल्याची हकीगत प. नं. १३६०, १३६१ आणि १३६४ मध्यें आली आहे. )

५८३८ 
E/ ७।३१२८



ता. २८ मे सन १७७४ रोजीं अर्पण केलीं. *

श्रीमंत सवाईमाधवराव पेशवे झाल्यामुळें राघोबाच्या बंडाचें प्रकरण कोठवर आलें इकडे आतां वळलें पाहिजे. हरीपंत, पटवर्धन, निजाम वगैरेंच्या फौजांपुढें आपला टिकाव लागणार नाहीं असें समजून राघोबा बऱ्हाणपुराकडे गेल्याचें वर लिहिलेंच आहे. बऱ्हाणपुरावरून दादानें पलायन केलें व ते थेट इंदुरास होळकरांकडे गेले. इंदुरला गेल्यावर दादा होळकरांना भेटले व त्याच ठिकाणीं शिंदेहि दादांना येऊन भेटले. दादासाहेब नर्मदा उतरून पलीकडे गेल्याची बातमी लागतांच हरिपंतांनी त्यांचे पाठीवर वामनराव पटवर्धनास पाठविलें. वामनरावास मदती करितां रास्ते व धायगुडे यांची पथकें हरिपतांनी दिलीं. रास्ते व धायगुडे यांच्यासह वामनराव दादाच्या पाठलागाकरितां नर्मदातीरापर्यंत गेले ही बातमी शिंदे होळकरांस लागतांच त्यांनीं वामनरावास निरोप पाठविला कीं दादासाहेबांजवळ तडजोडीचें बोलणें आम्हीं करीत आहों. आपण पुढें येऊं नये. सरदारांचा असा निरोप आल्यामुळें वामनराव तेथेंच मुक्काम करून राहिले. शिंदे होळकरांबरोबर दादाचें बोलणें झालें. त्यांत असें ठरलें कीं दादाला झालेलें फौजेचें देणें देण्याकरितां कारभाऱ्यांनी पैसा द्यावा व उभयतां सरदारांनीं दादास देशीं पोंचवून त्याची व्यवस्था लावून द्यावी. ह्या कराराप्रमाणें दादाकडे हरिपंतांनी रक्कम पाठविली. पण रक्कम हातीं पडतांच दादा पुन्हां आपल्या वळणावर गेले, व शिंदे होळकरांशीं तंटा करूं लागले. दादाचा बेत शिंदे होळकरांच्या हातावर तुरी देऊन पुढें भोपाळकडे जाण्याचा

* ( टीप-- सवाईमाधवराव यांस पेशवाईचीं वस्त्रें मिळाल्याचें ऐकून आनंद झाल्याचें रघोजी आंग्रे यानें खालील प्रमाणें पत्रांत लिहिलें आहे. "श्रीमंत महाराज राजश्री छत्रपतीस्वामी यांनी पेशवाईचीं वस्त्रें बहुमानपूर्वक दिलीं तीं छ १६ रबिलावल वैशाख वद्य चतुर्थीस वीस घटका रात्रौ सुमूहूर्तें करून धेतलीं म्हणोन पत्रीं आज्ञा. ऐशास पत्रार्थ श्रवण होऊन कोटयावधी आनंद जाहला ' (पे. द. ३६-५५ ) खरे ले. संग्रहामध्येंहि पत्र नं. १३७५ मध्यें श्रीमंतांस वस्त्रें मिळाल्याची हकिगत आहे. )

होता. पण शिंदे होळकरांनी दादास जरबेनें बजाविलें कीं कराराप्रमाणें आपण देशीं चलावें. आम्हीं आपणास पुढें जाऊं देणार नाहीं. सरदारांचे असें निकराचें बोलणें पडल्यावर दादा ताळ्यावर आलें व निरुपाय होऊन देशीं परत येण्याचें त्यांनीं कबूल केलें.

पटवर्धन व रास्तें यांच्या फौजा दादासाहेबांच्या पाठलागामध्यें गुंतल्यामुळें इकडे कर्नाटकांत त्यांच्या जहागिरीचा मुलूख मोकळा पडला, आणि हैदर व अदवानीचा नबाव बसालतजंग यांना या मुलुखांत धुमाकूळ घालण्यास मोकळें रान सांपडलें. शिंदे होळकरांजवळ दादाचा देशीं येण्याचा करार झाल्यामुळें दादाचें प्रकरण थोडें नरम झालें होतें. यामुळें हरिपंतांनी कारभाऱ्यांच्या सांगण्यावरून वामनराव, परशुरामभाऊ, आनंदराव रास्ते वगैरेना कर्नाटकांत बंदोबस्त करण्याकरितां परत पाठविलें. वामनराव, परशुरामभाऊ वगैरे पुण्यापर्यन्त येतात तों बसालतजंग अदवानीकडे परत फिरल्याचें समजलें, व त्यामुळें कारभाऱ्यांनीं पटवर्धनांच्या फौजेला पुण्यासच ठेऊन घेतलें. पटवर्धनांची फौज पुण्यास ठेऊन घेण्यालाहि एक कारण झालें होतें. तें असें कीं पुण्यास नानाचे चुलत बंधू मोरोबादादा हे दादाच्या कारस्थानांत असून शक्यतर दादाला गादीवर आणून आपण त्याचे कारभारी व्हावें अशी त्यांची महत्वाकांक्षा होती. त्यावेळीं दिवस सन १७७४ च्या पावसाळ्याचे असल्यामुळें कारभारी मातोश्री गंगाबाई व श्रीमंत सवाई माधवराव यांच्यासह पुरंदराहून निघून सासवडास येऊन राहिले होते. मोरोबाची योजना या सर्व मंडळीस पकडून दादाला गादीवर आणण्याची होती. पण कारभाऱ्यांना मोरोबाच्या या कारस्थानाची बातमी लागल्यामुळें भर पावसांत ते गंगाबाई व सवाईमाधवराव यांना घेऊन पुरंदरवर गेले. मोरोबाच्या कारस्थानाचें जाळें कितीं लांब पसरलें असेल याची कांहीं कल्पना नव्हती. कदाचित् कठीण प्रसंग आला तर आयत्यावेळीं पंचाईत पडूं नये म्हणून कारभाऱ्यांनीं आपल्या विश्वासाची अशी पटवर्धनांची फौज पुण्यास ठेवून घेतली.

दादासाहेबांनीं शिंदे होळकरांजवळ करार करून देशीं येण्याचें कबूल

केलें होतें हें पूर्वी लिहिलेंच आहे. शिंदे-होळकरांनी दादाला दहा लक्षांची जहागीर व दोन किल्ले देण्याबद्दल करार केला होता. हा करार कारभाऱ्यांकडून मान्य करून घ्यावयाचा होता. या कामाकरितां शिंदेहोळकरांनी आपापले वकील पुरंदरास कारभाऱ्यांकडे पाठविले. परंतु वकिलांमार्फत वाटाघाटी होऊन करार कायम होण्यास विलंब लागूं लागला व दादाहि निरनिराळ्या सबबी काढून आढेवेढे घेऊं लागले. अशा प्रकारें हें प्रकरण चिघळत चालल्यामुळें शिंदे-होळकरांनीं कारभाऱ्यांना असें कळविलें कीं या प्रकरणाचा सोक्षमोक्ष करण्याकरितां कारभाऱ्यांनींच पुरंदराहून इकडे यावें. कारभारीहि या गोष्टीस तयार होते. कारण दादाचें हें प्रकरण शक्य तितकें लवकर निकालांत काढणें जरूर होतें. पण त्यांनीं पुरंदर सोडण्यास एक अडचण होती. ती अशीं कीं गंगाबाई व श्रीमंत सवाईमाधवराव यांच्या रक्षणाची जबाबदारी कोणीतरी घेणें जरूर होतें. या कामाकरितां पेशव्यांच्या विश्वासाचे पटवर्धन सरदार हेच कारभाऱ्यांच्या डोळ्यापुढें होते. शिंदे-होळकरांचें बोलावणें आल्यावर कारभाऱ्यांनीं श्रीमंतांच्या रक्षणाची जबाबदारी पत्करण्याकरितां परशुरामभाऊ यांस विचारलें व भाऊंनीं ही गोंष्ट तात्काळ मान्य केली. सवाईमाधवराव व गंगाबाई यांच्या संरक्षणाचीं जबाबदारी घेणें ही लहानसहान गोष्ट नव्हती. कारण दादाच्या कारस्थानाचें जाळें चोहोंकडे पसरलें होतें. त्यामुळें श्रीमंतांच्या जिवाला अपाय केव्हां होईल याचा नेम नव्हता. अशास्थितींत स्वामिनिष्ठ आणि मर्दुमीच्या सरदाराचीच जरूर होती. असे सरदार म्हणजे पटवर्धन हेच होते, व त्यांनी हीं जबाबदारी पत्करण्याचें कबूल केलें. पटवर्धनांच्या घराण्यांतील सर्वच पुरूष मोठे धाडशी आणि शूर होते. त्यांतल्यात्यांत पुरुषोत्तमराव दाजी व कान्हेरराव हे निधड्या छातीचे व कोणच्याही प्रसंगाला न डरणारे होते. त्यांचीच नेमणूक वामनराव व परशुरामभाऊ यांच्या मतानें गंगाबाई व सवाई माधवराव यांच्या रक्षणासाठीं पुरंदरवर करण्यांत आली. पटवर्धनांनीं ही कामगिरी कबूल केल्यामुळें नानांनी त्यांस लिहिलें "आमचें जाणें आपण घडविलें." या

लिहिण्यावरून कारभाऱ्यांचा पटवर्धनावर केवढा विश्वास होता हें दिसून येतें. गंगाबाईची व श्रीमंत सवाईमाधवराव यांची अशी व्यवस्था लागल्यावर दादाचें प्रकरण मिटविण्याकरितां कारभारी बाहेर पडले.

कारभाऱ्यांनीं श्रीमंतांच्या रक्षणाची व्यवस्था केल्यावर आतां वामनराव व परशुरामभाऊ यांना पुण्यास रहाण्याचें कारण नव्हतें. म्हणून ते उभयतां हरिपंतांच्या सूचनेप्रमाणें दादाच्या पाठलागास गेलेल्या हरिपंताच्या फौजेस जाऊन मिळाले. दादा कासारबारीपर्यंत आले होते. शिंदे होळकर त्यांचे मागें होते. कासारबारीचे अलीकडे वामनराव रास्ते वगैरेंची दहा बारा हजार फौज होती. मागून कारभारी येत होते, त्यांच्या बरोबरहि फौज होती. शिवाय निजाम, साबाजी वगैरेहि कारभाऱ्यांच्या मदतीस येत होते, एकंदरींत कारभाऱ्यांचा जमाव मोठाच झाला. शिंदे होळकरांच्या अपेक्षेपेक्षां मोठा झाला. दादाचा समेट करून देण्याच्या निमित्तानें आणि आपणांजवळ फौज जास्त या जोरावर शिंदे होळकरांना कारभाऱ्यांकडून आपले कांहीं प्रश्न सोडवून घ्यावयाचे होते. पण कारभारी भेटीला येणार तेहि फौजबंद व त्यांचे जवळ हरिपंत, वामनराव, परशुरामभाऊसारखे सरदार असल्यामुळें कारभाऱ्यांवर वजन पाडून आपलीं कामे उरकून घेण्याची शिंदेहोळकरांची महत्त्वाकांक्षा जागच्या जागींच जिरली, व ते दादाच्या प्रकरणांत उदासीनता दाखवूं लागले. शिंदे होळकरांच्या या उदासींनतेमुळें त्यांचा दादावरचा वचक कमी झाला व दादानें त्याचा तात्काळ फायदा घेऊन तो शिंदे होळकरांच्या तावडींतून निसटला व तापीतीरास गेला.

दादाची व्यवस्था लावण्याची जबाबदारी शिंदे होळकरांनी पत्करली होतीच त्या कामांत तडजोडीचीं बोलणीं करण्याकरितांच त्यांनीं कारभाऱ्यांस बोलाविलें होतें. पण कारभारी येतात ते फौजबंद येतात हें पाहतांच शिंदे होळकरांनीं अवसान टाकलें व दादाला हातचा जाऊं दिला. वास्तविक पाहातां दादा हातचा निसटल्यावर शिन्देहोळकरांनीं त्याचा पाठलाग करावयास पाहिजे होता. पण तसें कांहींएक न करितां उलट शिंदे होळरांनीं कारभाऱ्यांस

लिहिलें कीं दादा आमचें न ऐकतां निघून गेले. तरी त्यांच्या पाठलागाकरितां फौज पाठवा. शिंदे होळकरांचा असा निरोप येतांच हरिपंत, वामनराव, परशुरामभाऊ व ोरे दादाच्या पाठलागाकरितां निघाले. पण एवढ्या अवधींत दादानें नर्मदा ओलांडून धारेचें ठाणें गाठलें. पळपुटेपणांत दादा हे एकमेव शूर असल्यामुळें ते कोणासच सांपडले नाहींत. दादा हातचे निसटले. आतां दादांची व्यवस्था लावण्याकरितां तडजोडीच्या बोलण्याचें कांहींच कारण राहिलें नाहीं. तेव्हां कारभाऱ्यांनाहि परत फिरण्याशिवाय गत्यंतर राहिलें नाहीं. कारभारी यांनीं बरोबरची फौज हरिपंताच्या स्वाधीन केली व ते परत देशीं येण्यास निघाले. इकडे दादानें धारेस आनंदीबाईला ठेवून तेथून उज्जनीस पलायन केलें. उज्जनीहून पळ काढण्याकरितां दादानें तीन आश्रयदाते मनाशीं योजले. एक सुजाउद्दौला, दुसरा हैदर व तिसरे इंग्रज. पहिल्या दोहोंकडे जाणें हें जास्त लांबोचें असें समजून व हैदरकडे जावयाचें तर महाराष्ट्रांतून जाणें जरूर या अडचणीमुळें दादानें शेवटीं इंग्रजांचा आश्रय घेण्याचें ठरविलें, व त्या प्रमाणें इंग्रजांकडे जाण्याकरितां त्यानें उज्जनीहून गुजराथकडे पळ काढला. ही बातमी हरिपंताला लागतांच तेहि दादाच्या पाठीवर मामनराव, परशुरामभाऊ यांच्या सुद्धां निघाले. दादानें गुजराथकडे जातांना हैदरशीं संधान सुरू ठेविलेंच होतें; आणि कारभाऱ्यांना व विशेषतः पटवर्धनांना पायबंद देण्याकरितां हैदरनें मिरजेपर्यंत धुमाकूळ घालावा अशी दादाची हैदरला सूचना होती. हैदरनें याचा फायदा घेऊन तुंगभद्रेपर्यंत धुमाकूळ घातलाच. पण त्याच्या अलीकडे मात्र तो आला नाहीं. कारण कारभाऱ्यांच्या जोरापुढें दादाचें राजकारण टिकेल किंवा नाहीं याची त्याला शंकाच वाटत होती. आरंभीं आरंभीं दादाला हैदरकडून पैशाचीहि मदत होत असे. पण कारभाऱ्यांच्या जोरापुढें दादाचें कांहीं चालण्याचा संभव नाहीं हें लक्षांत घेऊन हैदरानें दादाची मदतही बंद केली होती. हैदरकडील सूत्राचा कांहीं फारसा उपयोग नाहीं हें समजून दादा गुजराथकडे गेला. गुजराथमध्यें गोविंदराव गायकवाड व फत्तेसिंग गायकवाड यांचेमध्यें भांडणें सुरू होतीं. फत्तेसिंग कारभाऱ्यांच्या

बाजूचा होता व गोविंदराव दादाच्या बाजूचा होता. दादा गुजराथेंत आल्यावर गोविंदराव त्यास लगेच सामील झाला. गोविंदराव व दादा हे एकत्र झाल्यावर त्यांनीं बडोद्यास येऊन तळ दिला. पण इतक्यांत हरिपंत व वामनराव यांच्या फौजा पाठीवर आल्या ही बातमी कळतांच दादानें बडोद्याहून कूच केलें, व अहमदाबादकडे जाण्याचें ठरविलें. अहमदाबादेस जातांना वाटेंत महीनदीच्या काठावर हरिपंतांनीं दादास गाठलें व त्याच्या फौजेचा फडशा उडविला. ही लढाई सन १७७५ च्या फेब्रुवारींत झाली. ह्या लढाईंत दादाचा पूर्ण पराजय होऊन त्याची फौज पळून गेल्यामुळें तो दोनशें लोकांसह खंबायतकडे पळाला, व त्याचे साथिदार गोविंदराव गायकवाड मानाजी फांकडे सखाराम हरी वगैरे सरदार नडीयादकडे पळाले. दादासाहेब खंबायतकडे पळाल्यावर त्याच्या पाठलागास हरीपंतानें वामनरावास पाठविलें, व दादाच्या बाकीच्या सरदारांनीं नडीयादकडे पलायन केलें होतें त्या बाजूला स्वतः हरीपंत गेले. दादा खंबायतेस पोंचतात तोंच त्यांना वामनराव पटवर्धन पाठीवर येत असल्याचें कळलें. ही बातमी समजतांच दादानें खंबायतच्या नबाबाकडे आश्रय मागितला. पण त्यानें आश्रय देण्याचें नाकारल्यावर दादा तेथून निसटला तो थेट सुरतेस इंग्रजांच्या आश्रयास गेला. दादा हातचा निसटला व इंग्रजांच्या आश्रयास गेला. हें समजतांच वामनराव पटवर्धन आपल्या फौजेसह हरिपंतांच्या मुख्य फौजेस येऊन मिळाले. मराठ्यांच्या राज्यांत हात घालतां आला तर पहावा या संधीची इंग्रज वाट पहात होते. दादा आयतेच त्यांच्या आश्रयास आल्यामुळें मराठ्यांच्या राज्यांत चंचुप्रवेश करण्याची संधी इंग्रजांस मिळाली व तिचा फायदा घेण्याचें त्यांनीं ठरविलें. सुरतेस आल्यावर दादा व इंग्रज यांमध्यें देवघेवीचा तह ठरला व इंग्रजांच्या मदतीनें पेशवाईची गादी मिळविण्याचा उद्योग दादानें सुरू केला. दादा व इंग्रज यांमध्यें ता. ६ मार्च सन १७७५ रोजीं तह ठरला. त्यास सुरतेचा तह म्हणतात. या तहानें इंग्रजांनीं दादाचा पक्ष घेऊन त्याची पेशवाईच्या गादीवर स्थापना करण्याची जबाबदारी पत्करिली, व त्या प्रमाणें कर्नल किटिंग या नांवाच्या सरदाराची या कामगिरीवर

नेमणूक झाली. इतकें झाल्यावर दादा कर्नल किटिंग व त्याची फौज यांच्या मदतीनें पुन्हा सुरतेहून खंबायतकडे येण्यास निघाले. तूर्त दादाच्या मदतीला दिलेला हा सरंजाम तीन हजार कवाइती पायदळाचा असून त्याजबरोबर पंधरा तोफा होत्या, व कर्नल किटींग हा त्या फौजेवरचा मुख्य अंमलदार होता.

इंग्रजांनीं दादाचा पक्ष घेऊन त्याची पेशवाईच्या गादीवर स्थापना करण्याचें ठरविल्यावर इंग्रजमराठ्यांचा मोठाच झगडा सूरू झाला. या झगड्याची हकिगत पुढें एका स्वतंत्र प्रकरणांत दिली असल्यामुळें येथें जास्त कांहीं लिहीत नाहीं. इंग्रजमराठ्यांची लढाई चालू असतांच पटवर्धनांचे पुढारी वामनराव यांना मृत्यू आला. वामनराव हे प्रकृतीनें नेहमीं आजारीच असत तरी शक्यतोंपर्यंत ते आपली कामगिरी योग्य रीतीनें बजावीत असत. औषध उपचारहि नेहमीं चालूच असत. त्यांनी आपली तुळाहि केली होती. त्यानंतर त्यांना थोडा उतारहि पडला होता. पण पुन्हां ज्वर येऊं लागला व प्रकृति एकाएकीं बिघडून वामनराव शके १६९७ कार्तिक शु० ९ ता. १ ऑक्टोबर सन १७७५ रोजीं मृत्यू पावले. वामनरावाच्या राजवटींत पटवर्धनांचीं प्रमुख पथकें दादाच्या प्रकरणांत गुंतल्यामुळें कर्नाटकांत त्यांचा मुलूख मोकळा पडला होता. पटवर्धन दादाच्या पाठलागांत गुंतले याचा फायदा घेऊन कोल्हापूरकर, कित्तुरकर देसाई आणि हैदर हे आपापला लाग साधीत होते. या सर्वांचा बंदोबस्त करण्याकरितां नानाफडणिसांनीं कान्हेरराव पटवर्धन यांची योजना केली होती, व त्या प्रमाणें कान्हेररावानें मोठ्या हिमतीनें कोल्हापूरकर व कित्तूरकर देसाई यांचें बंड मोडलें होतें. इतक्यांत इंग्रजांनीं दादाचा पक्ष घेऊन मराठ्यांशीं लढा सुरू केला. या लढ्यांत आरंभी वामनराव होतेच. पण वर लिहिल्याप्रमाणें इंग्रजांचा लढा चालू असतांच त्यांची प्रकृति बिघडून त्यांना मृत्यू आला. वामनरावाच्या मरणामुळें पटवर्धनांवर मोठीच आपत्ती आली. वामनरावाचें वय मरणसमयीं सुमारें पन्नाशीचें होतें. त्यांचें कुटुंब आधींच निवर्तलें होतें. त्यानंतर त्यांचा द्वितीय विवाह

करण्याच्या खटपटी चालू होत्या. पण प्रकृति बरी नसल्यामुळें वामनराव त्या गोष्टीस तयार नव्हते. वामनरावाला पुत्रसंतान नव्हतें. त्यांना दोन मुली होत्या. एक मनाक्का व दुसरी मथाक्का. मनाक्का ही वाईचे वैद्य यांचेंकडे दिली होती व दुसरी मथाक्का ही लागू यांचेकडे दिली हीती. वामनराव यांचे अकालीं मरणानें बारभाईंचा एक मोठा आधार नाहींसा झाला. कै० खरेशास्त्री यांनी ऐ० ले० संग्रहाच्या प्रस्तावनेंत वामनरावासंबंधानें अभिप्राय दिला आहे तोच खालीं देतों. म्हणजे त्यावरून वामनरावांची योग्यता कळून येईल. “ वामनराव शूर, तल्लख व मेहनती सरदार होता. तो पूर्वीपासून प्रकृतीनें अशक्त असून दम्यानें घेर-लेला असे. त्यामुळें त्याला नेहमीं घरीं बसून रहावें लागे. गोपाळर.व यांचे मरणानें सरदारीचा बोजा त्यांचे अंगावर पडला, व तो त्यांनी मोठ्या हिम-तीनें पत्करिला. त्यांची कारकीर्द पांचच वर्षांची झाली. पण तीं वर्षे मोठीं उलाढालीचीं व आणीबाणीचीं होतीं. रोगी म्हटला म्हणजे तो थंडीवाऱ्याला भिऊन पथ्यपाणी सांभाळून असावयाचा. परन्तु वामनरावांनीं जिवाकडे न पहातां उन्हांत, पावसांत, रातबेरात रानांत वनांत जेथें ज्यावेळीं काम पडेल तेथें त्यावेळीं निष्ठेनें हजर राहून दक्षिणेंत कर्नाटकांतील गुत्तीपासून उत्तरेंत काठेवाड पर्यंतच्या प्रदेशांत सैन्यासह हजर राहून श्रीमंत नानासाहेब यांच्या वंशाची सेवा व चाकरी स्वामिभक्तिपूर्वक करून दाखविली. ” खरे शास्त्र्यां सारख्या अधिकारी व्यक्तीच्या वरील अभिप्रायावरून बामनराव पटवर्धन हे केवढ्या योग्यतेचे सरदार होते हें सहज कळून येण्यासारखें आहे. बार-भाईंच्या कारस्थानाला मुख्य आधार पटवर्धनांचाच होता. प्रत्यक्ष नाना फडणिसांनीं हरिपंततात्यास लिहिलेल्या एका पत्रांत असें लिहिलें आहे कीं “ त्यांचेच ( पटवर्धनांचे ) अंगेजणी ( पराक्रम ) या मनसब्यास. आतां न करितां गत्यंतर काय आहे. ” यावरून पटवर्धनांच्या हिमतीवरच कारभा-ऱ्यांनीं बारभाईंच्या कारस्थानास हात घातला हें स्पष्ट होतें. या वेळीं पटवर्धनांचे पुढारी वामनराव होते. स्वाभाविकच वामनरावाच्या आधारा-वर उभारलेल्या या कारस्थानाला वामनरावाच्या अकालीं निधनामुळे केवढा धक्का बसला असेल हें सांगावयास नको.

नेमणूक झाली. इतकें झाल्यावर दादा कर्नल किटिंग व त्याची फौज यांच्या मदतीनें पुन्हा सुरतेहून खंबायतकडे येण्यास निघाले. तूर्त दादाच्या मदतीला दिलेला हा सरंजाम तीन हजार कवाइती पायदळाचा असून त्याजबरोबर पंधरा तोफा होत्या, व कर्नल किटींग हा त्या फौजेवरचा मुख्य अंमलदार होता.

इंग्रजांनीं दादाचा पक्ष घेऊन त्याची पेशवाईच्या गादीवर स्थापना करण्याचें ठरविल्यावर इंग्रजमराठ्यांचा मोठाच झगडा सूरू झाला. या झगड्याची हकिगत पुढें एका स्वतंत्र प्रकरणांत दिली असल्यामुळें येथें जास्त कांहीं लिहीत नाहीं. इंग्रजमराठ्यांची लढाई चालू असतांच पटवर्धनांचे पुढारी वामनराव यांना मृत्यू आला. वामनराव हे प्रकृतीनें नेहमीं आजारीच असत तरी शक्यतोंपर्यंत ते आपली कामगिरी योग्य रीतीनें बजावीत असत. औषध उपचारहि नेहमीं चालूच असत. त्यांनी आपली तुळाहि केली होती. त्यानंतर त्यांना थोडा उतारहि पडला होता. पण पुन्हां ज्वर येऊं लागला व प्रकृति एकाएकीं बिघडून वामनराव शके १६९७ कार्तिक शु० ९ ता. १ ऑक्टोबर सन १७७५ रोजीं मृत्यू पावले. वामनरावाच्या राजवटींत पटवर्धनांचीं प्रमुख पथकें दादाच्या प्रकरणांत गुंतल्यामुळें कर्नाटकांत त्यांचा मुलूख मोकळा पडला होता. पटवर्धन दादाच्या पाठलागांत गुंतले याचा फायदा घेऊन कोल्हापूरकर, कित्तुरकर देसाई आणि हैदर हे आपापला लाग साधीत होते. या सर्वांचा बंदोबस्त करण्याकरितां नानाफडणिसांनीं कान्हेरराव पटवर्धन यांची योजना केली होती, व त्या प्रमाणें कान्हेररावानें मोठ्या हिमतीनें कोल्हापूरकर व कित्तूरकर देसाई यांचें बंड मोडलें होतें. इतक्यांत इंग्रजांनीं दादाचा पक्ष घेऊन मराठ्यांशीं लढा सुरू केला. या लढ्यांत आरंभी वामनराव होतेच. पण वर लिहिल्याप्रमाणें इंग्रजांचा लढा चालू असतांच त्यांची प्रकृति बिघडून त्यांना मृत्यू आला. वामनरावाच्या मरणामुळें पटवर्धनांवर मोठीच आपत्ती आली. वामनरावाचें वय मरणसमयीं सुमारें पन्नाशीचें होतें. त्यांचें कुटुंब आधींच निवर्तलें होतें. त्यानंतर त्यांचा द्वितीय विवाह

करण्याच्या खटपटी चालू होत्या. पण प्रकृति बरी नसल्यामुळें वामनराव त्या गोष्टीस तयार नव्हते. वामनरावाला पुत्रसंतान नव्हतें. त्यांना दोन मुली होत्या. एक मनाक्का व दुसरी मथाक्का. मनाक्का ही वाईचे वैद्य यांचेंकडे दिली होती व दुसरी मथाक्का ही लागू यांचेकडे दिली होती.वामनराव यांचे अकालीं मरणानें बारभाईंचा एक मोठा आधार नाहींसा झाला. कै० खरेशास्त्री यांनी ऐ० ले० संग्रहाच्या प्रस्तावनेंत वामनरावासंबंधानें अभिप्राय दिला आहे तोच खालीं देतों. म्हणजे त्यावरून वामनरावांची योग्यता कळून येईल. " वामनराव शूर, तल्लख व मेहनती सरदार होता. तो पूर्वीपासून प्रकृतीनें अशक्त असून दम्यानें घेरलेला असे. त्यामुळें त्याला नेहमीं घरीं बसून रहावें लागे. गोपाळराव यांचे मरणानें सरदारीचा बोजा त्यांचे अंगावर पडला, व तो त्यांनी मोठ्या हिमतीनें पत्करिला. त्यांची कारकीर्द पांचच वर्षांची झाली. पण तीं वर्षें मोठीं उलाढालीचीं व आणीबाणीचीं होतीं. रोगी म्हटला म्हणजे तो थंडीवाऱ्याला भिऊन पथ्यपाणी सांभाळून असावयाचा. परन्तु वामनरावांनीं जिवाकडे न पहातां उन्हांत, पावसांत, रातबेरात रानांत वनांत जेथें ज्यावेळीं काम पडेल तेथें त्यावेळीं निष्ठेनें हजर राहून दक्षिणेंत कर्नाटकांतील गुत्तीपासून उत्तरेंत काठेवाड पर्यंतच्या प्रदेशांत सैन्यासह हजर राहून श्रीमंत नानासाहेब यांच्या वंशाची सेवा व चाकरी स्वामिभक्तिपूर्वक करून दाखविली. " खरे शास्त्र्यां सारख्या अधिकारी व्यक्तीच्या वरील अभिप्रायावरून वामनराव पटवर्धन हे केवढ्या योग्यतेचे सरदार होते हें सहज कळून येण्यासारखें आहे. बारभाईंच्या कारस्थानाला मुख्य आधार पटवर्धनांचाच होता. प्रत्यक्ष नाना फडणिसांनीं हरिपंततात्यास लिहिलेल्या एका पत्रांत असें लिहिलें आहे कीं " त्यांचेच ( पटवर्धनांचे ) अंगेजणी ( पराक्रम ) या मनसब्यास. आतां न करितां गत्यंतर काय आहे. " यावरून पटवर्धनांच्या हिमतीवरच कारभाऱ्यांनीं बारभाईंच्या कारस्थानास हात घातला हें स्पष्ट होतें. या वेळीं पटवर्धनांचे पुढारी वामनराव होते. स्वाभाविकच वामनरावांच्या आधारावर उभारलेल्या या कारस्थानाला वामनरावाच्या अकालीं निधनामुळे केवढा धक्का बसला असेल हें सांगावयास नको.

---

# प्रकरण ५ वें

## सावशीची लढाई.

—ಾ—

पटवर्धनांची जहागीर पूर्वीपासून वामनरावाचे वडील गोविंद हरी यांच्या नांवें चालू होती. या जहागिरींत परशुरामभाऊ व निळकंठ त्रिंबक हे जरी पोटहिस्सेदार होते तरी गोविंद हरीच्या घरांत सरदारीचा मान असल्यामुळें व गोविंद हरीचे दोन पुत्र गोपाळराव व वामनराव हे पराक्रमी व शूर असल्यामुळें स्वाभाविकच गोपाळराव व नंतर वामनराव हे पटवर्धनांचे क्रमानें पुढारी झाले. वामनरावांच्या मृत्यूनंतर पूर्वपरंपरेप्रमाणें वामनरावाचे बंधु पांडुरंगराव यांच्याकडे सरदारचें पुढारीपण येणें स्वाभाविक होतें. परंतु पांडुरंगराव हे लष्करी बाण्याचे गृहस्थ नव्हते. लहानपणीं त्यांनीं गोपाळराव, वामनराव, परशुरामपंतभाऊ यांप्रमाणें लष्करी शिक्षण घेतलें नव्हतें व ते कधीं स्वारीवरहि गेले नव्हते. मिरजेला राहून जहागिरीचा कारभार ते करीत असत. हिशोबाच्या कामांत मात्र ते तरबेज होते. पांडुरंगरावास गंगाधरराव बाळासाहेब म्हणून आणखी एक बंधु होते. पण ते वयानें फारच लहान असल्यामुळें त्यांच्यावर एवढचा मोठचा जहागिरीचा कारभार सोंपविण्यासारखा नव्हता; आणि कदाचित तो सोंपविला तरी तसें करून पांडुरंगररावानें लष्करांत यावें असें म्हणावें तर पांडुरंगरावाची लष्कराचें अधिपत्य स्वीकारण्याची पात्रता नव्हती. पण त्या वेळची प्रथा अशी

नों. नं. .........



होती कीं लष्करांत कोणीतरी खासा असल्याशिवाय लोकांना आळा बसत नसे व त्यांवर वजनहि रहात नसे. ही एकंदर परिस्थिति लक्षांत घेऊन परशुरामभाऊ एका पत्रांत लिहितात " बाळाची (गंगाधररावबाळ) प्रकृति नीट असल्यास त्याची इकडे रवानगी करावी. चिरंजीव येथें असले म्हणजे चांगले दिसतें चिरंजीव येथें नाहींत म्हणून मी यांचे (वामनरावांचे) डेऱ्यांत आहे. चिरंजीव बाळाचे रवानगीविशीं फार काय लिहावें." (खरे प. न. १५३५) गंगाधरराव बाळासाहेब हे वयानें लहान असले तरी लष्करांत धनी असल्याशिवाय लष्करचा लौकीक नाहीं अशी त्या काळची समजूत होती. आणि म्हणून परशुरामभाऊसारखा कर्तृत्ववान पुरुष जरी लष्करांत होता तरी सरदारी गोविंद हरीच्या वंशांत असल्यामुळें गोविंद हरीच्या मुलांपैकीं कोणीतरी लष्करांत हजर असणें जरूर होतें म्हणून परशुरामभाऊ आग्रहानें दुसऱ्या एका पत्रांत लिहितात " येथें फौजेंत धनी असल्याशिवाय आळा ठीक बसत नाहीं. लौकिकाची सरदारी, काळ या प्रकारचा, तुम्हांस या म्हणावें तर तेथील खटला भारी, स्थळ पदरीं मातबर, दुसऱ्याचे वस्तु निभावयाचे नाहीं. याज करितां तूर्त चिरंजीव राजश्री बळवंतराव याची रवानगी करून द्यावी. तुम्ही म्हणाल तेथें आपण असतां आम्ही अधिक काय ? त्यास हें घरांत खरें आहे. परंतु लौकीक वडीलांचा मोठा, फौज मातबर, कारखाना पागा वगैरे लहान नव्हे. सर्व तुम्हांस समजत आहे. मी आहें खरा परंतु चिरंजीव येतील ते सांगतील त्याप्रमाणें चाकरी करीन. आपणाकडून व्यंग पडूं देणार नाहीं. हें लिहिणें उपरोधिक नव्हे चिरंजिवास रवाना करावें. आर्शाची ( मुळव्याधीची ) मात्र पीडा नसावी. घोड्यावर चांगलें बसण्याचें सामर्थ्य पाहिजे. आतां तुम्हां उभयतांवर नजर देऊन दुतर्फाचें काम करीत आहे. त्यांनीं ( गोपाळराव व वामनराव यांनीं ) सांभाळ करून चालविलें त्या प्रकारें तुम्हीहि चालवावें. " ( खरे ले. १५३६ )

वास्तविक पहातां परशुरामभाऊ हेच आतां पटवर्धनांच्या घरांत पराक्रमी व कर्तृत्ववान पुरुष होते. पण जहागीर गोविंद हरीच्या नावें असल्यामुळें गोविंद हरीच्या मुलांचा योग्य मान राखून त्यांच्या हाताखालीं नोकरी

करण्यास आपण तयार आहों असें परशुरामभाऊ मोठ्या आदरानें लिहीत आहेत. वरील पत्रांत सुचविल्याप्रमाणें गोविंद हरीचे धाकटे चिरंजीव गगाधरराव बाळासाहेब हे लष्करांत आल्याचें दिसत नाहीं. त्यांना मूळव्याधीचा विकार होता. त्यामुळें कदाचित् ते आले नसावे. गोपाळराव व वामनराव हे लष्करी बाण्याचे दोन्ही सरदार मृत्युमुखीं पडल्यावर गोविंद हरीचे दुसरें दोन पुत्र पांडुरंगराव व गंगाधरराव बाळासाहेब हे त्या वेळच्या परंपरेंप्रमाणें पटवर्धनांचे पुढारी झाले खरे. पण या दोघांपैकीं कोणीहि लष्करी बाण्याचा नसल्यामुळें पटवर्धनांचे पुढारीपण आस्ते आस्ते परशुरामभाऊकडेच येत चाललें होतें. तथापि परशुरामभाऊ प्रत्यक्षपुढारी होण्यास थोडा अवधि लागला. या अवधींत पांडुरंगरावानें पुढारीपण स्वीकारून जो उद्योग केला तो त्याच्या चांगलाच आंगलट येऊन सावशीच्या लढाईंत पटवर्धनांचा कसा सत्यनाश झाला याचीच हकिगत आतां आपणास पहावयाची आहे.

पांडुरंगरावाचा व गंगाधरराव बाळासाहेबांचा विचार असा होता कीं आपण मिरजेस राहून परशुरामभाऊनें आपले दुय्यम सरदार म्हणून पटवर्धनांच्या पथकाचें नेतृत्व चालवावें. परशुरामभाऊ या गोष्टीला नाकबूल होते असें नाहीं. पण त्या वेळच्या समजुतीप्रमाणें ज्याच्या नावें सरदारी तो स्वतः हजर असणें लौकिकासाठीं व फौजेवर वजन रहाण्यासाठीं जरूर होते. शिवाय तहाच्या वगैरे वाटाघाटी होत असतां प्रमुख सरदार हजर असणें यालाहि त्या काळांत महत्व होतें. दादासाहेबांचा कड घेऊन इंग्रजांनीं चालविलेलें युद्ध थांबविण्याकरितां कलकत्तेकर इंग्रजांचा वकील पुण्यास सन १७७६ च्या जानेवारींत आला होता, व तहाच्या वाटाघाटी सुरू होत्या अशावेळीं पांडुरंगराव किंवा गंगाधरराव बाळासाहेब या पैकीं कोणीतरी पुण्यास असावें असें नाना फडणिसांचें म्हणणें होतें. शिवाय या वेळीं गंगाधरराव बाळासाहेब हे पांडुरंगराव याच्या पुत्राच्या लग्नाच्या निमित्तानें पुण्यासहि आले होते. पण ते नानांच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष करून परत मिरजेस गेले. बाळासाहेबांनीं ही गोष्ट बरी केली नाहीं असें पटवर्धनांच्या वकिलानें मिरजेस पांडुरंगरावाला लिहिलेल्या पत्रांत लिहिलें आहे.

हा वकील लिहितो 'श्रीमंत रा. गंगाधरराव राहिले नाहींत. याजकरितां श्रीमंत राजश्री नाना आम्हांवर परम खट्टे दरबारास गेल्यास आम्हाशीं बोलत नाहींत. आपल्या मर्जीस आल्यास त्यांची (गंगाधररावांची) रवानगी करावी अथवा आपण यावे. प्रसंग आहे. समयास येऊन पावलां असें होईल. (खरे. ले. १५५६) वरील प्रमाणें पटवर्धनांच्या वकिलानें कळविलें तरी सुद्धां गंगाधरराव किंवा पांडुरंगराव हे पुण्यास आल्याचें दिसत नाहीं. पांडुरंगराव यांस जहागिरीच्या कारभाराची कामें असल्यामुळें त्यांस येतां आलें नसेल. पण गंगाधररावहि आले नाहींत. या वरून ते मूळव्याधीच्या विकारानें बेजार असावेत असें दिसतें. एरवीं नाना फडणिसाच्या एवढ्या आग्रहाच्या बोलावण्याचा पटवर्धन अव्हेर करतील असे नाना व पटवर्धन यांचे संबंध नव्हते. पण या वरून एक गोष्ट लक्षांत येते ती अशी कीं लष्करांत धन्याचें महत्व केवढें हें स्पष्ट होतें. धनी लहान असो मोठा असो, लष्करी बाण्याचा असो नसो त्यानें आपल्या लष्करांत हजर राहिलें पाहिजे असा त्या काळचा दंडक होता.

इंग्रजांचा वकील पुरंदरास तहाच्या वाटाघाटी कारभारी यांच्याजवळ करीत होता. इंग्रजांनीं युद्ध थांबविण्याचें ठरविल्यामुळें दादासाहेब मदतीच्या अभावीं गळाकांवळा येथें स्वस्थ राहिले होते हरीपंत व पटवर्धन यांच्या फौजा सोनगडचे आसपास होत्या. दादासाहेब नाइलाजानें स्वस्थ होते. तरीपण चाळे करण्याचा प्रसंग ते सहसा फुकट घालवीत नसत. मानाजी फाकड्याजवळ थोडी फौज देऊन दादांनीं थोडी उचल केली. मानाजीनें सोनपूरचें ठाणें जाळलें व लुटालूट केली हरिपंतानें मानाजीचे बंदोबस्तास पटवर्धनांची पथकें, रास्ते, धायगुडे, आपा बळवंत वगैरेनां पाठविलें. या फौजेनें नवापूरचें ठाणें घेतलें, व घाटाखालीं जाऊन ती फौज दादाच्या तोंडावर उभी राहून तिनें दादाचा मार्ग अडविला हरीपंत आपल्या फौजेसह घाटावर होते. या झटापटींत दादाकडे धान्य घेऊन जाणारा दहाहजार बैलांच्या लमाणांचा तांडा पटवर्धनांच्या फौजेनें लुटला यामुळें

पटवर्धनांच्या फौजेंत धान्याची चंगाळी उडाली. इंग्रजांशीं तहाच्या वाटाघाटी चालल्या होत्या त्या संपून पुरंदर मुक्कामीं इंग्रज मराठे यांमध्यें तह झाला. या तहाला पुरंदरचा तह म्हणतात. हा तह सन १७७६ सालीं झाला. तह झाल्यामुळें दादासाहेबांचें चाळे तूर्त तरी बंद झाले, व ते सुरतेस जाऊन राहिले तह झाल्यावर हरीपंत व पटवर्धन यांच्या फौजा सन १७७६ च्या जुलईच्या सुमारास देशीं परत आल्या. परशुरामभाऊ मिरजेस येऊन तेथून तासगावीं गेले. इंग्रजांशीं चाललेला लढा तूर्त बंद झाला तरी या अवधींत महाराष्ट्रांत इतर गडबडी बऱ्याच चालू होत्या, तिकडेहि कारभाऱ्यांना लक्ष पुरवावें लागलें

दादाचें हें प्रकरण चालू असतां कारभाऱ्यांना ज्या इतर गोष्टींकडे लक्ष पुरवावें. लागलें त्यांत तोतयाचें बंड, कोल्हापूरकर आणि हैदर अल्ली हीं तीन प्रमुख प्रकरणें होतीं. तोतयाच्या बंडाचा बंदोबस्त कारभाऱ्यांनीं केला. त्या प्रमाणेंच कोल्हापूरकरांच्या चळवळीकडेहि कारभाऱ्यांना लक्ष पुरवावें लागलें. कोल्हापूरकरांनीं पेशव्यांच्या घरांत उत्पन्न झालेल्या भाऊबंदकीचा फायदा घेऊन हैदरअल्लीप्रमाणेंच आपले हातपाय पसरण्यास सुरवात केली होती. सन १७७६ च्या मार्च एप्रिल महिन्यांत कारभाऱ्यांनीं कोल्हापूरकरांच्या बंदोबस्ताकरितां पटवर्धन सरदारांपैकीं कान्हेरराव पटवर्धन यांची नेमणूक केली होती कान्हेररावानें कोल्हापुरास वेढा घालून कोल्हापूरच्या पेठा जाळल्या व तेथील स्वामींचा मठही लुटला. या मठांत कोल्हापूरकरांनीं आश्रय घेतल्यामुळें कान्हेररावाला स्वामींच्या मठावरहि शस्त्र धरावें लागलें. कान्हेररावानें कोल्हापूरकरांचीं कडोली कागल, आळतें वगैरे ठाणीं घेतलीं. कान्हेररावाच्या या चढाईमुळें कोल्हापूर दरबार एकदम चिडून गेलें होतें. व याचा वचपा काढण्याकरितां कोल्हापूरकरांचा सरदार येसाजी शिंदे हा टपून बसला होता. येसाजी शिंद्याजवळ तीन हजार स्वार व तितकेंच पायदळ होतें. कारभाऱ्यांनीं कोल्हापूरकरांविरुद्ध रामचंद्र गणेश कानडे नांवाचा आणखी एक सरदार पाठविला होता. त्याला मदत म्हणून एक हजार स्वार व पांचशें पायदळ प्रतिनिधीमार्फत जात होतें. ही फौज

वारणेच्या काठीं असतां तिची बातमी राखून येसाजी शिंद्यानें तिजवर जोराचा हल्ला केला व तिची दाणादाण उडवून दिली. त्याप्रमाणेंच पेशव्यांचे दुसरे एक सरदार बाजीपंत अण्णा हेहि कोल्हापूरकरांविरुद्ध कोंकणांतून येत होते. येसाजी शिंद्यानें त्यांची ही बातमी राखून त्यांच्यावरही असाच जोराचा छापा घातला. पण बाजीपंत सावध असल्यामुळें येसाजीचाच मोड होऊन व पुष्कळ नुकसान सोसून त्यास पळून जावें लागलें. कोल्हा-पूरकरांनीं पेशव्यांस उपद्रव देण्याचें धोरण चालू ठेविलें होतें. त्या प्रमाणेंच त्यांनीं इचलकरंजीकरांसहि उपद्रव देण्यास सुरवात केली होती. तात्पर्य कोल्हापूरकरांचें हें प्रकरण तात्पुरत्या उपायांनीं मोडण्यासारखें नव्हतें. म्हणून कोल्हापूरकरांवर पेशव्यांना मोठी स्वारीच करावी लागली. या स्वारीची हकिगत पुढें एका स्वतंत्र प्रकरणांत दिली असल्यामुळें येथें जास्त माहिती देत नाहीं.

पेशव्यांच्या घरांतील भाऊबंदकीचा फायदा घेऊन आपले हातपाय पसरण्याचा उद्योग करणारा पेशव्यांचा दुसरा शत्रु हैदरअल्ली हा होय. भाऊबंदकीच्या भांडणांत पेशव्यांच्या व पटवर्धनांच्या फौजा गुंतून राहि-ल्यामुळें हैदरला पेशव्यांच्या मुलखांत धुमाकूळ घालण्याला चांगलीच संधी मिळाली. शिवाय हैदरच्या उद्योगाला दादानेंहि चांगलाच हातभार लाविला. बारभाईचें कारस्थान उभें राहिल्यावर दादानें कल्याणदुर्गच्या तहानें रास्ते व पटवर्धन यांच्या सरंजामाचा कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांच्या दरम्यानचा सर्व मुलूख दरसाल सहा लक्ष खंडणी घेण्याच्या करारानें हैदरास देऊन टाकिला होता. माधवराव पेशव्यांनीं हैदरावर तीन स्वाऱ्या करून पन्नास लाख उत्पन्नाचा कर्नाटकांत संपादन केलेला मुलूख आणि कृष्णा व तुंगभद्रा यांमधील सुमारें पाऊण कोट उत्पन्नांचा मुलूख मिळून एकंदर सव्वा कोट उत्पन्नाचा मुलूख दादानें चुटकीसरसा हैदरास देऊन टाकला. मराठ्यांच्या राज्यांतील इतका मुलूख हैदरला तहानें मिळाला तरी त्या धूर्तमाणसानें गडबड सुरू केली ती मात्र तुंगभद्रेच्या पलीकडच्या मुलखांत केली. याचें कारण इंग्रजांशीं चाललेल्या मराठ्यांच्या लढाईकडे त्याचें लक्ष होतें. सन

१७७४ मध्यें त्यानें शिंदें, मदगिरी, बाळापूर, होसकोटें, गुरूमकोंडा वगैरे किल्ले घेतले. सन १७७५ मध्यें त्यानें बल्लारी, कडापा, कर्नूल, अदवानी हीं संस्थानें घेतलीं, आणि मुरारराव घोरपड्यावर स्वारी करून त्याला कैद केलें, व त्याचा गुत्तीचा किल्लाहि घेतला. इतका वेळपर्यंत हैदरची सर्व चळवळ तुंगभद्रेपलीकडच्या मुलखांत होती. नंतर त्यानें आपले शिवमोघे वगैरे सरदार तुंगभद्रेच्या अलीकडे पाठविले. या सरदारांनीं तुंगभद्रेअलीकडे हरीहर हल्याळ वगैरे ठिकाणें घेतलीं व पटवर्धनांच्या लक्ष्मेश्वर तालुक्यास उपद्रव देण्यास सुरवात केली. इतक्यांत सन १७७६ सालीं पुरंदरास इंग्रजांचा व मराठ्यांचा तह झाल्याची बातमी हैदरला समजली. याच वेळीं श्रीरंगपट्टणचा राजा मरण पावला व नायर लोकांनीं बंडास सुरवात केली होती. शिवाय मद्रासच्या बाजूनें इंग्रजांनींहि हैदरविरुद्ध चळवळ सुरू केली होती. अशी परिस्थिति असल्यामुळें हैदर आपली मुख्य फौज घेऊन श्रीरंगपट्टणला गेला. तथापि त्यानें कर्नाटकांतून अजिबात पाय काढला होता असा अर्थ नाहीं. त्यानें आपला सरदार शिवमोघे यास बंकापुरास ठेविलें होतें. या सरदारानें धारवाडास मोर्चे देऊन तोफा लाविल्या होत्या.

इंग्रजमराठ्यांचा तह होऊन पेशव्यांच्या फौजा गुजराथेंतून परत आल्यावर कारभाऱ्यांना हैदरच्या बंडखोरीचाच पहिल्यानें विचार करावा लागला. हैदर हा कांहीं सामान्य शत्रु नव्हता. त्याला चांगलाच शह देतां यावा म्हणून कारभाऱ्यांनीं हैदरच्या या प्रकरणांत निजामालाहि सामील करून घेतलें. निजाम व पेशवे या उभयतांनीं हैदरवर स्वारी करावी, आपला हैदरनें घेतलेला मुलुख सोडवावा आणि शत्रूचा जो नवीन मुलूख मिळेल तो मुलूख व खंडणी सारखी वांटून घ्यावी असें ठरून सन १७७६ सालचा दसरा झाल्यावर हैदरवर स्वारी करावी असें ठरलें. निजामाकडून इब्राहिमखान धोंसा व पेशव्यांकडून हरीपंततात्या फडके यांची या स्वारीवर नेमणूक झाली होती. स्वारी करण्याचें ठरल्यावर पटवर्धनांसहि कारभाऱ्यांचे हुकूम गेले. त्या प्रमाणे स्वारीची व्यवस्था करण्याकरितां परशुरामभाऊ तासगांवाहून मिरजेस आले.

परशुरामभाऊ हेच जरी आतां पटवर्धन घराण्यांत कर्तृत्ववान आणि शूर असे पुढारी होते तरी पटवर्धनांची सरदारी गोविंदहरीच्या नावें असल्यामुळें गोविंदहरीचे तिसरे पुत्र पांडुरंगराव यांच्या कडेच पटवर्धनांच्या सरदारीचा वडीलपणा होता. स्वाभाविकच स्वारी शिकारीच्या खर्चाचा बोजा सरदारीचा मालक या नात्याने पांडुरंगरावाला सांभाळणें प्राप्त होतें. आजपर्यंत पांडुरंगरावाचेच वडीलभाऊ गोपाळराव व वामनराव हे पटवर्धनांचे पुढारी असल्यामुळें या बाबतींत पटवर्धनांच्या घराण्यांत बाचाबाची झाली नाहीं. पण आतां लढण्याचें काम परशुरामभाऊंनीं करावयाचें व खर्च पांडुरंगरावानें करावयाचा अशी वेळ आली होती. शिवाय दादासाहेबाबरोबर झालेल्या लढाईंत पटवर्धनांना बरेंच कर्ज झालें होतें आणि प्राप्ति तर कांहींच झालेली नव्हती अशा स्थितींत पांडुरंगरावाला खर्चाची तोंडमिळवणी करणें मोठें कठीण झालें होतें. स्वारीची व्यवस्था करण्याकरितां परशुरामभाऊ जेव्हां मिरजेस आले तेव्हां पांडुरंगरावांनीं बोलणें लाविलें कीं एकंदर पटवर्धनी सरदारीचे तीन हिस्सेदार असल्यामुळें मसलतीस व स्वारी शिकारीस पैसा लागेल तो हिस्सेरशीनें तिघांनीं द्यावा. परशुरामभाऊंनीं ही गोष्ट मान्य केली नाहीं. आम्हांस हिस्सेरशीची गांठ पडत नाहीं. वडिलांनीं चालविलें तसें चालवावें असें पांडुरंगरावाला परशुरामभाऊंनीं सांगितलें. पांडुरंगरावाचे पुत्र चिंतामणराव आप्पासाहेब यांनीं पटवर्धनघराण्यासंबंधानें लिहिलेल्या वाक्यांत या हकिगतीसंबंधानें खालील प्रमाणें मजकूर आहे. ' त्या समयीं मसलतींत तुमची सरकत असावी म्हणोन श्रीमंत तात्यासाहेबांचें ( पांडुरंगरावाचें ) म्हणणें. आपण पेटचांतील पेटचांत चाकरी करावयाची सबब तुम्ही सांगाल तेथें चाकरी करूं म्हणोन सरकतीस कबूल झाले नाहींत. परशुरामभाऊ व रघुनाथरावदादा ( रघुनाथ निळकंठ ) यांचा एक विचार,! पांडुरंगराव व परशुरामभाऊ यांमध्यें स्वारीशिकारीच्या खर्चाबद्दल असा मतभेद उत्पन्न होण्याचें एक कारण असें संभवतें कीं वामनरावाच्या मृत्यूनंतर आतां स्वाभाविकपणें परशुरामभाऊएवढा पराक्रमी पुरूष पटवर्धनांच्या घराण्यांत दुसरा कोणी नव्हता. तेव्हां

१७७४ मध्यें त्यानें शिरें, मदगिरी, बाळापूर, होसकोटें, गुरूमकोंडा वगैरे किल्ले घेतले. सन १७७५ मध्यें त्यानें बल्लारी, कडापा, कर्नूल, अदवानी हीं संस्थानें घेतलीं, आणि मुराररराव घोरपड्यावर स्वारी करून त्याला कैद केलें, व त्याचा गुत्तीचा किल्लाहि घेतला. इतका वेळपर्यंत हैदरची सर्व चळवळ तुंगभद्रेपलीकडच्या मुलखांत होती. नंतर त्यानें आपले शिवमोघे वगैरे सरदार तुंगभद्रेच्या अलीकडे पाठविले. या सरदारांनीं तुंगभद्रेअलीकडे हरीहर हल्याळ वगैरे ठिकाणें घेतलीं व पटवर्धनांच्या लक्ष्मेश्वर तालुक्यास उपद्रव देण्यास सुरवात केली. इतक्यांत सन १७७६ सालीं पुरंदरास इंग्रजांचा व मराठ्यांचा तह झाल्याची बातमी हैदरला समजली. याच वेळीं श्रीरंगपट्टणचा राजा मरण पावला व नायर लोकांनीं बंडास सुरवात केली होती. शिवाय मद्रासच्या बाजूनें इंग्रजांनींहि हैदरविरुद्ध चळवळ सुरू केली होती. अशी परिस्थिति असल्यामुळें हैदर आपली मुख्य फौज घेऊन श्रीरंगपट्टणला गेला. तथापि त्यानें कर्नाटकांतून अजिबात पाय काढला होता असा अर्थ नाहीं. त्यानें आपला सरदार शिवमोघे यास बंकापुरास ठेविलें होतें. या सरदारानें धारवाडास मोर्चे देऊन तोफा लाविल्या होत्या.

इंग्रजमराठ्यांचा तह होऊन पेशव्यांच्या फौजा गुजराथेंतून परत आल्यावर कारभाऱ्यांना हैदरच्या बंडखोरीचाच पहिल्यानें विचार करावा लागला. हैदर हा कांहीं सामान्य शत्रु नव्हता. त्याला चांगलाच शह देतां यावा म्हणून कारभाऱ्यांनीं हैदरच्या या प्रकरणांत निजामालाहि सामील करून घेतलें. निजाम व पेशवे या उभयतांनीं हैदरवर स्वारी करावी, आपला हैदरनें घेतलेला मुलुख सोडवावा आणि शत्रूचा जो नवीन मुलूख मिळेल तो मुलूख व खंडणी सारखी वांटून घ्यावी असें ठरून सन १७७६ सालचा दसरा झाल्यावर हैदरवर स्वारी करावी असें ठरलें. निजामाकडून इब्राहिमखान धौसा व पेशव्यांकडून हरीपंततात्या फडके यांची या स्वारीवर नेमणूक झाली होती. स्वारी करण्याचें ठरल्यावर पटवर्धनांसहि कारभाऱ्यांचे हुकूम गेले. त्या प्रमाणें स्वारीची व्यवस्था करण्याकरितां परशुरामभाऊ तासगांवाहून मिरजेस आले.

परशुरामभाऊ हेच जरी आतां पटवर्धन घराण्यांत कर्तृत्ववान आणि शूर असे पुढारी होते तरी पटवर्धनांची सरदारी गोविंदहरीच्या नावें असल्यामुळें गोविंदहरीचे तिसरे पुत्र पांडुरंगराव यांच्या कडेच पटवर्धनांच्या सरदारीचा वडीलपणा होता. स्वाभाविकच स्वारी शिकारीच्या खर्चाचा बोजा सरदारीचा मालक या नात्याने पांडुरंगरावाला सांभाळणें प्राप्त होतें. आजपर्यंत पांडुरंगरावाचेच वडीलभाऊ गोपाळराव व वामनराव हे पटवर्धनांचे पुढारी असल्यामुळें या बाबतींत पटवर्धनांच्या घराण्यांत बाचाबाची झाली नाहीं. पण आतां लढण्याचें काम परशुरामभाऊंनीं करावयाचें व खर्च पांडुरंगरावानें करावयाचा अशी वेळ आली होती. शिवाय दादासाहेबाबरोबर झालेल्या लढाईंत पटवर्धनांना बरेंच कर्ज झालें होतें आणि प्राप्ति तर कांहींच झालेली नव्हती अशा स्थितींत पांडुरंगरावाला खर्चाची तोंडमिळवणी करणें मोठें कठीण झालें होतें. स्वारीची व्यवस्था करण्याकरितां परशुरामभाऊ जेव्हां मिरजेस आले तेव्हां पांडुरंगरावांनीं बोलणें लाविलें कीं एकंदर पटवर्धनी सरदारीचे तीन हिस्सेदार असल्यामुळें मसलतीस व स्वारी शिकारीस पैसा लागेल तो हिस्सेरशीनें तिघांनीं द्यावा. परशुरामभाऊंनीं ही गोष्ट मान्य केली नाहीं. आम्हांस हिस्सेरशीची गांठ पडत नाहीं. वडिलांनीं चालविलें तसें चालवावें असें पांडुरंगरावाला परशुरामभाऊंनीं सांगितलें. पांडुरंगरावाचे पुत्र चिंतामणराव आप्पासाहेब यांनीं पटवर्धनघराण्यासंबंधानें लिहिलेल्या वाक्यांत या हकिगतीसंबंधानें खालील प्रमाणें मजकूर आहे. ' त्या समयीं मसलतींत तुमची सरकत असावी म्हणोन श्रीमंत तात्यासाहेबांचें ( पांडुरंगरावाचें ) म्हणणें. आपण पेटचांतील पेटचांत चाकरी करावयाची सबब तुम्ही सांगाल तेथें चाकरी करूं म्हणोन सरकतीस कबूल झाले नाहींत. परशुरामभाऊ व रघुनाथरावदादा ( रघुनाथ निळकंठ ) यांचा एक विचार, ' पांडुरंगराव व परशुरामभाऊ यांमध्यें स्वारीशिकारीच्या खर्चाबद्दल असा मतभेद उत्पन्न होण्याचें एक कारण असें संभवतें कीं वामनरावाच्या मृत्यूनंतर आतां स्वाभाविकपणें परशुरामभाऊएवढा पराक्रमी पुरूष पटवर्धनांच्या घराण्यांत दुसरा कोणी नव्हता. तेव्हां

स्वारीशिकारीचें यश व लौकीक परशुरामभाऊंना व आपण नुसते कारकुनी हिशोब करीत घरीं बसणार असें पांडुरंगरावास वाटलें असावें. कारण सरदारी पांडुरंगरावाच्या नावें होती. सरदारीचे मालक आपण आणि यश परशुरामभाऊंच्या पदरीं ही गोष्ट कदाचित् पांडुरंगरावास कमीपणाची वाटली असावी. कसेंहि असो. परशुरामभाऊ व रघुनाथराव नीळकंठ या पटवर्धनांच्या दुसऱ्या दोन पोटहिस्सेदारांनीं खर्चाचा बोजा पत्करण्याचें नाकरिल्यामुळें पांडुरंगरावानें त्यांस असें सांगितलें कीं ज्या अर्थी तुम्ही खर्चाचा व कर्जाचा बोजा पत्करण्यास तयार नाहीं त्या अर्थी तुमची सरदारी तुम्ही चालवा व आमची आम्ही चालवूं. अशा तऱ्हेनें पांडुरंगरावानें स्वतःचें बळ व सामर्थ्य न ओळखतां लष्करी बाणा स्वीकारण्याचा आव आणिला व तिन्ही पटवर्धनांच्या पथकांचा एक पुढारी ही आजपर्यंत चालत आलेली परंपरा मोडण्याचा विचार केला. त्यानें पुण्यास कारभाऱ्यांसहि कळविलें कीं धारवाड प्रांतीं हैदराच्या सरदारांनीं जो धुमाकूळ घातला आहे त्याच्या बंदोबस्तास आपण जातों. परशुरामभाऊ व रघुनाथराव नीळकंठ यांस कोल्हापूरकरांच्या बंदोबस्तास पाठवावें. कारभाऱ्यांनीं या योजनेस मान्यता दिली व पांडुरंगराव आणि परशुरामभाऊ यांस त्या प्रमाणें हुकुमहि पाठविले. परशुरामभाऊंनीं जास्त मदत मागितल्यावरून त्यांच्या मदतीस रामचंद्र गणेश, रास्ते, अक्कलकोटकर भोसले, प्रतिनिधि व बाजीपंत अण्णा वगैरेंची पथकें दिलीं. पांडुरंगराव यांच्या मदतीसहि कान्हेरराव पटवर्धन आणि कृष्णराव पानसे यांस जाण्याकरितां कारभाऱ्यांचे हुकूम झाले. अशा रीतीनें पांडुरंगराव व परशुरामभाऊ यांनीं दोन निरनिराळ्या स्वाऱ्यांस जावें असें ठरलें.

पांडुरंगराव मिरजेहून ता. ६ आक्टोबर सन १७७६ रोजीं स्वारीस निघाले. त्यांची व कान्हेररावांची गांठ कुडची मुक्कामीं पडली. पुढें यादवाड मुक्कामीं पानशे व शिवराव घोरपडे पांडुरंगरावास मिळाले. पांडुरंगराव मिरजेहून स्वारीस निघाले हें कळतांच धारवाडला मोर्चे लावून बसलेले हैदरचे सरदार श्रीपतराव व शिवमोघे हे धारवाडचे मोर्चे

उठवून बंकापुरास गेले बंकापुरास जातांना हैदरच्या सरदारांनीं कांहीं सैन्य धारवाडच्या आसपास झाडीच्या आश्रयानें लपवून ठेविले होतें. बंकापुरास गेल्यावर श्रीपतराव व शिवमोघे यांनीं हैदरास लिहून जास्त मदतीची मागणी केली. या मागणीप्रमाणें हैदरनें तात्काळ महमदल्ली कुमदान नांवाचा एक मोठा शूर सरदार मदतीस पाठविला. या सरदाराजवळ सहासात हजार पायदळ, तीन हजार स्वार आणि नऊ तोफा असा पोक्त सरंजाम हैदरनें दिला होता. कुमदान आपल्या फौजेसह रटेहळीच्या जंगलांत येऊन उतरला. पांडुरंगरावाची फौज या वेळीं मुरगोडची बारी ओलांडून दोदवाड नजिक आली होती. आपण शत्रूचे मुलखांत फारपुढें आलों हें पांडुरंगरावाच्या लक्षांत आलें नाहीं. पांडुरंगरावास सरदारीचें कसब किंवा धोरण फारसें नव्हतेंच. स्वतःच्या जबाबदारीवर त्यांनीं कधीं स्वारी केली नव्हती. त्यांचे मदतनीस कान्हेरराव पटवर्धन हे काळाच्याहि जबड्यांत उडी घालणारे मर्द शिपाई होते. त्यांची समशेर सदा उपसलेलीच असे. हाणा, मारा, ठोका हा मंत्र त्यांस पाठ होता. तरी सुद्धां सरदारीचें धोरण व कसब त्यांना नव्हतें. ते सांगितलें काम प्राणाचीहि पर्वा न करतां करणारे होते. पांडुरंगरावाचे आणखी एक मदतनीस शिवराव घोरपडे हे मात्र मुराररावाच्या तालमींत तयार झालेले लढाईच्या कामांत खरे वाकबगार होते. पण त्यांचा सरंजाम थोडा असल्यामुळें पांडुरंगरावावर वजन पाडण्यासारखी त्यांची स्थिति नव्हती. उलट पक्षीं हैदरनें पाठविलेला सरदार कुमदान हा अनुभवी सरदार होता, आणि त्याचा सरंजामहि पटवर्धनापेक्षां श्रेष्ठ दर्जाचा होता. शिवाय बंकापूरच्या किल्याचा व झाडीचा हैदरच्या फौजेस आश्रय होता हैदरचा मुलुखहि पाठीशीं लागून असल्यामुळें मदत व रसद या दोन्हीं गोष्टीहि हैदरच्या फौजेस जास्त सुलभ होत्या.

पटवर्धनांची फौज इंदिगोलच्या ओढ्यावर उतरली होती. या फौजेवर छापा घालून तिचा फडशा उडवावा या तयारीनें कुमदान बंकापुराहून ता. ८ जानेवारी सन १७७७ रोजीं बाहेर पडला. बंकापुराहून

स्वारीशिकारीचें यश व लौकीक परशुरामभाऊंना व आपण नुसते कारकुनी हिशोब करीत घरीं बसणार असें पांडुरंगरावास वाटलें असावें. कारण सरदारी पांडुरंगरावाच्या नावें होती. सरदारीचे मालक आपण आणि यश परशुरामभाऊंच्या पदरीं ही गोष्ट कदाचित् पांडुरंगरावास कमीपणाची वाटली असावी. कसेंहि असो. परशुरामभाऊ व रघुनाथराव नीळकंठ या पटवर्धनांच्या दुसऱ्या दोन पोटहिस्सेदारांनीं खर्चाचा बोजा पत्करण्याचें नाकरिल्यामुळें पांडुरंगरावानें त्यांस असें सांगितलें कीं ज्या अर्थी तुम्ही खर्चाचा व कर्जाचा बोजा पत्करण्यास तयार नाहीं त्या अर्थी तुमची सरदारी तुम्ही चालवा व आमची आम्ही चालवूं. अशा तऱ्हेनें पांडुरंगरावानें स्वतःचें बळ व सामर्थ्य न ओळखतां लष्करी बाणा स्वीकारण्याचा आव आणिला व तिन्ही पटवर्धनांच्या पथकांचा एक पुढारी ही आजपर्यंत चालत आलेली परंपरा मोडण्याचा विचार केला. त्यानें पुण्यास कारभाऱ्यांसहि कळविलें कीं धारवाड प्रांतीं हैदराच्या सरदारांनीं जो धुमाकूळ घातला आहे त्याच्या बंदोबस्तास आपण जातों. परशुरामभाऊ व रघुनाथराव नीळकंठ यांस कोल्हापूरकरांच्या बंदोबस्तास पाठवावें. कारभाऱ्यांनीं या योजनेस मान्यता दिली व पांडुरंगराव आणि परशुरामभाऊ यांस त्या प्रमाणें हुकुमहि पाठविले. परशुरामभाऊंनीं जास्त मदत मागितल्यावरून त्यांच्या मदतीस रामचंद्र गणेश, रास्ते, अक्कलकोटकर भोसले, प्रतिनिधि व बाजीपंत अण्णा वगैरेंची पथकें दिलीं. पांडुरंगराव यांच्या मदतीसहि कान्हेरराव पटवर्धन आणि कृष्णराव पानसे यांस जाण्याकरितां कारभाऱ्यांचे हुकूम झाले. अशा रीतीनें पांडुरंगराव व परशुरामभाऊ यांनीं दोन निरनिराळ्या स्वाऱ्यांस जावें असें ठरलें.

पांडुरंगराव मिरजेहून ता. ६ आक्टोबर सन १७७६ रोजीं स्वारीस निघाले. त्यांची व कान्हेररावांची गांठ कुडची मुक्कामीं पडली. पुढें यादवाड मुक्कामीं पानशे व शिवराव घोरपडे पांडुरंगरावास मिळाले. पांडुरंगराव मिरजेहून स्वारीस निघाले हें कळतांच धारवाडला मोर्चे लावून बसलेले हैदरचे सरदार श्रीपतराव व शिवमोघे हे धारवाडचे मोर्चे

उठवून बंकापुरास गेले बंकापुरास जातांना हैदरच्या सरदारांनीं कांहीं सैन्य धारवाडच्या आसपास झाडीच्या आश्रयानें लपवून ठेविले होतें. बंकापुरास गेल्यावर श्रीपतराव व शिवमोघे यांनीं हैदरास लिहून जास्त मदतीची मागणी केली. या मागणीप्रमाणें हैदरनें तात्काळ महमदल्ली कुमदान नांवाचा एक मोठा शूर सरदार मदतीस पाठविला. या सरदाराजवळ सहासात हजार पायदळ, तीन हजार स्वार आणि नऊ तोफा असा पोक्त सरंजाम हैदरनें दिला होता. कुमदान आपल्या फौजेसह रटेहळीच्या जंगलांत येऊन उतरला. पांडुरंगरावाची फौज या वेळीं मुरगोडची बारी ओलांडून दोदवाड नजिक आली होती. आपण शत्रूचे मुलखांत फारपुढें आलों हें पांडुरंगरावाच्या लक्षांत आलें नाहीं. पांडुरंगरावास सरदारीचें कसब किंवा धोरण फारसें नव्हतेंच. स्वतःच्या जबाबदारीवर त्यांनीं कधीं स्वारी केली नव्हती. त्यांचे मदतनीस कान्हेरराव पटवर्धन हे काळाच्याहि जबड्यांत उडी घालणारे मर्द शिपाई होते. त्यांची समशेर सदा उपसलेलीच असे. हाणा, मारा, ठोका हा मंत्र त्यांस पाठ होता. तरी सुद्धां सरदारीचें धोरण व कसब त्यांना नव्हतें. ते सांगितलें काम प्राणाचीहि पर्वा न करतां करणारे होते. पांडुरंगरावाचे आणखी एक मदतनीस शिवराव घोरपडे हे मात्र मुराररावाच्या तालमींत तयार झालेले लढाईच्या कामांत खरे वाकबगार होते. पण त्यांचा सरंजाम थोडा असल्यामुळें पांडुरंगरावावर वजन पाडण्यासारखी त्यांची स्थिति नव्हती. उलट पक्षीं हैदरनें पाठविलेला सरदार कुमदान हा अनुभवी सरदार होता, आणि त्याचा सरंजामहि पटवर्धनापेक्षां श्रेष्ठ दर्जाचा होता. शिवाय बंकापूरच्या किल्याचा व झाडीचा हैदरच्या फौजेस आश्रय होता हैदरचा मुलुखहि पाठीशीं लागून असल्यामुळें मदत व रसद या दोन्हीं गोष्टीहि हैदरच्या फौजेस जास्त सुलभ होत्या.

पटवर्धनांची फौज इंदिगोलच्या ओढ्यावर उतरली होती. या फौजेवर छापा घालून तिचा फडशा उडवावा या तयारीनें कुमदान बंकापुराहून ता. ८ जानेवारी सन १७७७ रोजीं बाहेर पडला. बंकापुराहून

कुमदान सावशीस आला. हें ठाणें शिरहट्टीकर देसायांचे असून तोहि कुमदानास सामील झाला होता. त्या रात्रीं पटवर्धनावर छापा घालावा असा कुमदानाचा बेत होता. पण पटवर्धनांच्या सावधगिरीमुळें कुमदानाचा बेत साधला नाहीं. कुमदान सावशीस आल्यावर त्याच्यावरच चालून जाऊन आपण लढाई द्यावी असा पांडुरंगरावानें बेत केला. शत्रूची फौज फार आहे, त्याचे बरोबर तोफाहि आहेत, तेव्हां त्याचेवर चालून जाण्यास फार सावधगिरी पाहिजे अशी सूचना पांडुरंगरावास त्याच्या बरोबरच्या लोकांनीं दिली, पण पांडुरंगरावानें तिकडे लक्ष दिलें नाहीं.

पांडुरंगरावानें शत्रूवर चालून जाऊन लढाई देण्याची केलेली योजना कुमदानास समजण्यास वेळ लागला नाहीं. आपणावर हल्ला होणार हें समजतांच त्यानें सावशीच्या किल्याबाहेर तुरीची उंच उंच शेतें होतीं त्यांत तोफा, पायदळ, कवाइती फौज व कांहीं स्वार लपून ठेविले व त्यांस ताकीद दिली कीं शत्रूची फौज तोफेच्या माऱ्यांत येतांच व किल्यावरून खूण होतांच शत्रूवर तोफांचा मारा करावा, व त्या मारानें फौज विस्कळीत झाली कीं स्वारांनीं व पायदळानें हल्ला करावा. अशी योजना केल्यावर कुमदानानें कांहीं स्वार सावशीच्या किल्यापुढें ठेविले, व आपण स्वतः किल्यावर राहिला. हल्ला करण्याच्या बेतानें मराठी फौजा सावशीच्या किल्यासमोर आल्या, तेव्हां त्यांना समोरचे शत्रूचे स्वार मात्र दिसले, लपवून ठेवलेली फौज दिसली नाहीं. किल्यासमोर शत्रूचे स्वार दिसतांच मराठी फौजेनें त्यांवर बेगुमानपणें हल्ला चढविला. पण ती फौज तोफांच्या माऱ्यांत येतांच व किल्यावरून खूण होतांच लपून बसलेल्या कुमदानाच्या फौजेनें मराठी फौजेवर असा जोराचा तोफांचा मारा सुरू केला कीं मराठी फौज विस्कळीत होऊन ती सैरावैरा पळत सुटली. पांडुरंगराव व कान्हेरराव यांनीं पळत सुटलेल्या फौजेला सावरण्याचे शिकस्तीचे प्रयत्न केले, पण एकदां धीर सुटलेल्या फौजेला सावरणें शक्य झालें नाहीं. त्यामुळें पुढें पटवर्धनांची जी दुर्दशा झाली तिचें वर्णन करणें अशक्य आहे. कान्हेरराव या लढाईंत मारले गेले व स्वतः पांडुरंगराव इतर अनेक थोर थोर

लोकांसह जखमी होऊन शत्रूच्या हातीं सांपडले. प्रमुख सरदारांपैकीं जनोबा सुभेदार यादवाडकर आणि कृष्णराव पानशे एवढेंच कायते जीव बचावून परत आले. बाकी सर्व कोणी शत्रूच्या हातीं व बाकीचे ठार झाले. या लढाईसंबंधानें परशुरामभाऊंना लिहिलेल्या पत्रांत शत्रूच्या हातीं सांपडलेल्या लोकांची यादी दिली आहे. त्यांत खालील प्रमाणें नांवनिशी आहे. ( १ ) श्रीमंत पांडुरंगराव तात्यासाहेब जखम भाल्याची भारी आहे(२) श्रीपतराव यांस दोन जखमा आहेत. ( ३ ) कान्होपंत यास जखमा दोन, ( ४ ) वासुदेवकाका यांस जखमा आहेत. ( ५ ) रामचंद्र कृष्ण दातार यांस जखमा नाहींत ( ६ ) बहीरजी घोरपडे खैर आहेत. या पकडलेल्या इसमांशिवाय ठळक अशीं बारातेरा ब्राम्हण मंडळीं ठार झालीं त्यांस अग्नि दिल्याची हकिगत सदरहू पत्रांत आहे. ( खरे ले. १९६६ ) चिंतामणराव आपा सांगलीकर यांनीं लिहिलेल्या पटवर्धनी वाक्यांत या लढाईसंबंधानें जी हकिगत आहे त्यांत पाडाव झालेल्या मंडळींत आनंदराव सबनीस सातारकर आणि येसाजीपंत कुलकर्णी अशीं दोन नांवे जास्त असून पांडुरंगरावास तीन जखमा होत्या असें लिहिलें आहे. या तीन जखमांपैकीं दोन तलवारीच्या व एक भाल्याची असल्याचें नमूद आहे.

पांडुरंगरावासुद्धां पाडाव झालेल्या सर्व लोकांस कुमदानानें बंकापुरास पाठवून दिलें. त्या ठिकाणीं राघोबांचे एक हस्तक बाजीराव बर्वे नांवाचे हैदरशीं राजकारण करण्याकरितां आलेले होते. ते पांडुरंगरावाच्या माहितीचे असल्यामुळें त्यांनीं पांडुरंगराव वगैरे सर्व मंडळींचा योग्य समाचार घेऊन त्यांच्या जखमांची निगा वगैरे उत्तम प्रकारें केली. पुढें कांहीं दिवसांनीं जखमा वगैरे बऱ्या झाल्यावर सर्व पाडाव मंडळींना श्रीरंगपट्टणकडे पाठविण्यांत आलें. हैदरनेंहि पांडुरंगरावाला योग्य सन्मानानें ठेविलें. पांडुरंगराव हैदरच्या कैदेंत सुमारें दहा महिनें होते. तेथें त्यास ज्वराची व्यथा होऊन ता. ४ माहे नोव्हेंबर सन १७७७ रोजीं पांडुरंगराव हैदरच्या कैदेंतच कैलासवासी झाले. बाकीची पाडाव मंडळी हैदरच्या कैदेंत

सुमारें तीन चार वर्षें होतीं. हैदरनें जबर दंड घेऊन या सर्वांस सोडून दिलें.

सावशीच्या या लढाईंत पटवर्धनावर मोठीच आपत्ती कोसळली. पांडुरंगराव कैदेंत सांपडून तेथेंच मरण पावले, आणि पटवर्धनांच्या घराण्यांतील दुसरे मोठे धडाडीचे जवान मर्द माणूस कान्हेरराव हे लढाईंत मारले गेले. कान्हेररावासंबंधानें एका पत्रांत खालील प्रमाणें उल्लेख आहे. 'यांचे घराण्यांत आज कान्हेररांवासारखा हत्ती माणूस नव्हता,' ( खरे ले. १९८५ ) हरिवंशाच्या बखरीमध्यें कान्हेररावासंबंधानें खालील-प्रमाणें हकिगत आहे. मोतीतलावच्या लढाईंत कान्हेररावाचे थोरले बंधु निळकंठराव हे ठार झाले. त्यांचें उत्तरकार्य कावेरीतीरावर करण्यांत आलें. त्यावेळीं दहावे दिवशीं घडलेली हकिगत हरिवंशाच्या बखरींत खालील-प्रमाणें आहे. ' दहावे दिवशीं पिंडास कावळा शिवेना तेव्हां नानाप्रकारचीं उदकें सोडलीं. तिसरा प्रहर झाला. परंतु कावळा शिवेना तेव्हां त्यांचे बंधु कान्हेरराव बोलले. मला एक सुचलें आहें तें मी बोलतों. असें बोलतांच पुरुषोत्तमराव दाजी म्हणाले काय सुचलें असेल तें बोलावें. असें म्हणतांच कान्हेरराव म्हणाले कीं अहो नीळकंठराव आपले मनांत असेल जे माझा भाऊ एक आहे. हा घरांत पडश्याखोकल्यानें बिछान्यावर मरेल, अशी काळजी आपणास लागली असेल. त्यास आपणास ठाऊक असो द्यावें कीं आपण जसे हैदरखान याचे निशाणावर चालून जाऊन रणाचे ठायीं ठार जाहलां त्या प्रमाणेंच मी कान्हेरराव या हैदरखानाचे निशाणावर चालून जाऊन देह अर्पण करीन. याप्रमाणें बोलून उदक सोडतांच तात्काळ कावळा शिवला. हें सारें फौजेनें व मानकरी वगैरे सर्व मंडळीनें पाहून सर्वांनीं आश्चर्य केलें. आणि कीर्तीचीहि गर्जना केली ' ( हरिवंशाची बखर पान ३७ ) कान्हेर-रावानें आपल्या बंधूच्या दहाव्या दिवशीं वचन दिलें त्याप्रमाणेंच त्यानें आपला देह रणांगणावर ठेवला व पटवर्धन घराण्याची मर्दपणाची कीर्ति अजरामर केली यांत शंका नाहीं.

पांडुरंगराव पटवर्धन कर्नाटकांत निघाले त्याच वेळीं परशुरामभाऊंनीं कोल्हापुराकडे स्वारीस जावें असें ठरलें होतें. त्याप्रमाणें परशुरामभाऊ

९८३५ २८।८।५३

कोल्हापुरकरावरील स्वारीची तयारी करीत होते. मागल्याच सालीं म्हणजे सन १७७६ सालीं कान्हेररावानें कोल्हापूरच्या पेठा लुटल्या होत्या व स्वामींचा मठहि लुटला होता. या सर्व गोष्टींची कोल्हापुरकरांस मोठी चीड आली होती, आणि त्यांचा मुख्य कारभारी येसाजी शिंदे हा पटवर्धनांवर सूड घेण्याचा कसून प्रयत्न करीत होता. पेशव्यांच्या मार्फत रामचंद्र गणेश यांस कोल्हापूरकरांच्या बंदोबस्ताकरितां पाठविण्यांत आलेंच होतें. पण त्यांच्या एकटयाच्या हातून हें काम रेटण्यासारखें नव्हतें. म्हणून या कामगिरीवर कारभाऱ्यांनीं परशुरामभाऊंची नेमणूक केली होती. परशुराम-भाऊंस मदत करण्याकरितां बाजीपंत अण्णा यांसहि कारभाऱ्यांचा हुकूम झाला होता. त्याप्रमाणें बाजीपंत अण्णाहि भाऊंच्या मदतीस येत होते. येसाजी शिंद्यानें बाजीपंत अण्णावर छापा घालण्याचा प्रयत्न केला. पण तो साधला नाहीं. परशुरामभाऊ, बाजीपंत अण्णा, रामचंद्र गणेश या सर्वांनीं एक होऊन कोल्हापूरची कामगिरी करावी असें कारभाऱ्यांनीं ठरविलें होतें. या कामगिरीवर जाणेंकरितां परशुरामभाऊ तासगांवाहून निघाले. वाटेंत चिकोडी व बागेवाडी हीं ठाणीं भाऊनीं घेतली. बागेवाडीवर परशुरामभाऊ, रघुनाथराव नीळकंठ, रामचंद्र गणेश, रास्ते वगैरेंच्या फौजा एकत्र झाल्या. फौजा एकत्र झाल्यावर परशुरामभाऊ कोल्हापूरच्या राज्यांत भूदरगडाकडे आले. तेथील आजूबाजूच्या ठाण्यांत अंमल बसवीत बसवीत भाऊ कोल्हापूरकडे आले. भाऊच्या हाताखालीं बरीच फौज एकत्र झाल्यामुळें येसाजी जरा नरम झाला होता व त्यानें वरकरणी तहाचें बोलणें सुरू केलें होतें. पण एकीकडे तहाचें बोलणें सुरू होऊन त्यानें कोल्हापुरास चार हजार स्वार, तीन हजार पायदळ असा पोक्त सरंजाम तयार ठेविला होता, व जरूर तर लढाई देण्याची त्याची तयारी होती. इतकें होईपर्यंत सन १७७७ चा अर्धा जानेवारी महिना खलास झाला. याच अवधींत सावशीची लढाई होऊन पटवर्धनांचा मोड झाल्याची बातमी जिकडे तिकडे समजली. कुमदानानें सावशीचा विजय मिळविल्यावर लगेच धारवाड प्रांतावर आपला अंमल बसविला व धारवाडच्या किल्यास मोर्चे लावून तोफांची मारगिरी

सुरू केली. अशी परिस्थिति उत्पन्न झाल्यामुळें परशुरामभाऊंना कोल्हापूरची कामगिरी अर्धवट टाकून धारवाडकडे लक्ष देणें भाग पडलें. धारवाडास कुमदान मोर्चे लावून बसला होता. त्याची उपेक्षा केल्यास तो मनोळीची बारी ओलांडून बेळगांव, शहापूर, तेरदाळ, मिरज पर्यंत येण्याचा संभव होता. ही अडचण टाळण्याकरितां परशुरामभाऊंना कोल्हापूरचें काम बाजूस ठेवावें लागलें. परशुरामभाऊंनीं कोल्हापूरकराशीं तह होण्याचा संभव आहे कीं काय याची चाचपणी केली. पण पटवर्धनांचा सावशीच्या लढाईंतील पराभव त्यांनाहि समजलाच असल्यामुळें कोल्हापूरकर तह करण्यास तयार होण्याचा संभव नव्हता. अशा स्थितींत कोल्हापूरच्या मोहिमेचें काम रामचंद्र गणेश व बाजीपंत अण्णा यांजवर सोंपवून परशुरामभाऊ एकदम मनोळीच्या बारीकडे वळले. पुणें दरबारांतूनहि भाऊंस धारवाडकडे जाण्याचा हुकूम आला. या वेळेपासून परशुरामभाऊ हे पटवर्धनांचे मुख्य सरदार व सेनापती झाले. त्यांच्या पुढारीपणाला पांडुरंगरावाचे बंधु मिरजेचे गंगाधरराव बाळासाहेब यांनीं आतां पूर्णपणें मान्यता दिली. परशुरामभाऊंनींहि सर्व पटवर्धनांच्या पथकाचें अधिपत्य स्वीकारून पटवर्धनांना आलेलें अपयश धुऊन काढण्याकरितां मोठा निकराचा प्रयत्न करण्याचें ठरविलें. परशुरामभाऊंच्या या उद्योगाचीच हकिगत आतां पुढील प्रकरणांत द्यावयाची आहे.

------

## प्रकरण ६ वें

# परशुरामभाऊकडे पटवर्धनांचें पुढारीपण

पटवर्धनांची जहागीर मुळांत गोविंद हरीच्या नांवची असून त्यांत जरी दुसरे दोन पोट हिस्सेदार होते तरी पटवर्धन घराण्याची हा वेळ पर्यन्त म्हणजे सावशीच्या लढाईपर्यन्तची परंपरा एका पुढाऱ्याच्या हुकमानें वागण्याची होती. पण पांडुरंगरावानें आपल्या पथकाची स्वतंत्र सरदारी करून ही परंपरा मोडल्यामुळें सावशीच्या लढाईंत पटवर्धनांचा कसा फडशा उडाला ही हकिगत मागील प्रकरणांत आलीच आहे. लष्करी बाणा उसना आणतां येत नाहीं. ज्याचा तो मूळ स्वभाव असेल त्यानेंच तें काम केलें पाहिजे हें तत्व पटवर्धनांना शेवटीं मान्य करावें लागून त्यावेळीं पटवर्धनांच्या घरांत लष्करी अनुभवानें सर्वांत वडील असलेले परशुरामभाऊ यांनाच मिरजेच्या गंगाधरराव बाळासाहेबांनीं पुढारी होण्याची विनंति केली, व परशुरामभाऊंनीं ती मान्य करून पटवर्धनांचें पुढारीपण स्वीकारिलें. परशुरामभाऊ यावेळीं कोल्हापुरकरांच्या बंदोबस्तास गेले होते. पण सावशीच्या लढाईंत पटवर्धनांचा समूळ नाश झाल्यामुळें कोल्हापूरची कामगिरी रामचंद्र गणेश व बाजीपंत अण्णा यांवर सोपवून परशुरामभाऊ सन १७७७ च्या जानेवारीच्या अखेरीस कुमदानाला अडविण्याकरितां मनोळीच्या बारीवर येऊन दाखल झाले. यावेळीं भाऊंजवळ

सुमारें त्यांची अशी चारपांचहजार फौज होती, आणि सावशीच्या लढाईंतून पराभूत होऊन आलेली अशी सुमारें तीन हजार फौज त्यांना येऊन मिळाली होती. एकंदरींत भाऊंजवळ आठदहाहजार फौज होती पण कुमदानाला तोंड देण्याकरितां ही फौज पुरेशी होती असा मात्र अर्थ नाहीं. कारण कुमदानाजवळ स्वार भाऊंइतकेच असून शिवाय आठदहाहजार कवाइती पायदळ होतें आणि दहाबारा तोफा होत्या. शिवाय नुकताच सावशींच्या लढाईंत त्यांचा जय झाला असल्यामुळें त्याचें सैन्य उमेदींत होतें. परशुरामभाऊंना मात्र पराजयामुळें हतवीर्य झालेले लोक बरोबर घेऊन कुमदानशीं सामना करावयाचा होता. अशा परिस्थितीमुळें भाऊंचें काम जास्त बिकट झालें होतें. भाऊ मनोळीच्या बारीवर आल्यावर त्यांना मुख्यत: कामगिरी करावयाची होती ती अशी कीं कुमदान मनोळीची बारी ओलांडून अलीकडे येईल तर त्याला प्रतिबंध करावयाचा, बारीपलीकडे मराठ्यांच्या ताब्यांत असलेल्या मुरगोड, मोरब, दोदवाड वगैरे ठाण्यांचें रक्षण करावयाचें, आणि कुमदान धारवाडास मोर्चे लावून बसला होता त्याला तेथून हाकलावयाचा. भाऊंची ही कामगिरी लक्षांत घेतां त्यांच्याजवळ असलेली फौज या कामगिरीस फारच अपुरी होती. म्हणून भाऊंनीं व मिरजेहून गंगाधरराव बाळासाहेब यांनीं पुण्यास कारभाऱ्यांकडे लिहून हरीपंत फडक्यांना फौजेसह मदतीस पाठविण्यासंबंधानें निकड लाविली. परशुरामभाऊंना अपुऱ्या फौजेमुळें अडचण होतीच. पण त्याहूनहि जास्त मोठी भाऊंची अडचण होती ती पैशाची होती. दादासाहेबांवरील स्वारींत पटवर्धन गुंतल्यामळें त्यांचें कर्नाटकांतील उत्पन्न हैदरच्या धुमाकूळामुळें साफ बुडालें होतें. यामुळें भाऊंना आपल्या फौजेचा खर्च भागविण्यास मनोळीच्या आसपासच्या म्हणजे आपल्याच मुलखांतून दाणावैरण लुटून आणावी लागत असे. बरें पुण्याहून अशी मदत होईल म्हणावें तर पुणें दरबारहि कफल्लक झालें होतें. हरीपंताच्या फौजेचें देणें तुंबलें होतें. तें देण्याकरितां पुणें सरकारजवळ पैसा नव्हता. त्यामुळें हरिपंताची फौज पुणें प्रांत लुटून ओस पाडीत होती. अशी स्थिति होती. तरीसुद्धां हरीपंतास मदतीस पाठविण्यासंबंधानें

परशुरामभाऊ कारभाऱ्यांस सारखें लिहितच होते. पटवर्धनांचा पुण्यांतील वकील शिवाजीपंत म्हसकर हा भाऊंस मदत पाठविण्याकरितां कारभाऱ्यांचे उंबरठे सारखे झिजवीत होता. परंतु या आणीबाणीच्या वेळीं पुण्याहून भाऊंना कसलीच मदत होण्याचा रंग दिसेना. अशा स्थितींत भाऊंना आपलाच मुलूख लुटून लष्करचा सर्व खर्च भागवावा लागत होता. पण ही स्थिति फार दिवस टिकण्यासारखी नव्हती. थोड्याच अवधींत मनोळी तालुक्यांतील दाणावैरण खलास झाली. तेव्हां बारीपलीकडच्या मुलखांत दाणावैरणीकरितां भाऊंच्या फौजेच्या टोळ्या जाऊं लागल्या. या टोळ्यांच्या व कुमदानाच्याहि दाणावैरणीकरितां फिरणाऱ्या टोळ्यांच्या चकमकी होऊं लागल्या. अशा या झगड्यांत भाऊंच्या टोळ्या कुमदानाच्या तळापासून तीनचार कोसांपर्यंत संचार करूं लागल्या. कुमदान हा भाऊंचें सामर्थ्य ओळखून होता. शिवाय भाऊंजवळ काय तयारी असेल याचाहि त्याला नीटसा अंदाज नसावा. भाऊंच्या टोळ्या बेधडक कुमदानाच्या तळापासून तीनचार कोसांपर्यन्त मजल मारूं लागल्यामुळें कुमदानानें धारवाडचा वेढा उठविला व तो हुबळीस जाऊन राहिला.

परशुरामभाऊंनीं वर लिहिल्याप्रमाणें गनीमी हालचाली सुरू केल्यामुळें कुमदानाला मनोळीच्या बारी अलीकडे येण्याचें धाडस करितां आलें नाहीं. अशा गनीमी पद्धतीनें भाऊंनीं कुमदानाला बारी पलीकडे अडवून धरिला खरा. पण ही स्थिति फार दिवस टिकण्यासारखी नव्हती. दोनतीन आठवड्यांतच मनोळीच्या आसपास दाणावैरणीची एक काडीही मिळेनाशी झाल्यामुळें भाऊंना तेथून मुक्काम हालविणें प्राप्त झालें. परंतु मनोळीच्या बारीहून मुक्काम हालविला तर बारी शत्रूचे हातीं लागण्याचा संभव होता. शिवाय भाऊ तेथून गेलेतर नवलगुंद, कित्तुर, डंबळ वगैरे ठिकाणचे देसाई भाऊंच्या दबाबानें तटस्थ होते ते कदाचित् शत्रूलाहि मिळण्याचा संभव होता. तेव्हां अशा परिस्थितींत बारीवर तर दाब रहावा आणि दाणावैरणीची तर पंचाईत पडूं नये अशा बेतानें बारीपासून

वीसपंचवीस कोसांवर कोठेंतरी सोईच्या ठिकाणीं मुक्काम करावा असा भाऊंचा बेत होता. हा बेत ठरवितांना भाऊंचा दुसराहि एक हेतु होता. तो असा कीं भाऊ मनोळीकडे आले त्यावेळीं त्यांनीं कोल्हापूरकराचे तोंडावर रामचंद्र गणेश व बाजीपंत अण्णा यांस ठेविलें होतें. कोल्हापूरकरांनीं फारच उचल केली तर चटकन् रामचंद्र गणेशाच्या मदतीस जातां यावें असाहि भाऊंचा उद्देश होता. जरूर तर कोल्हापुराकडेहि जातां यावें आणि कुमदानावरहि वचक ठेवतां यावा अशा धोरणानें सोइस्कर पडेल त्या ठिकाणीं भाऊंना आपला मुक्काम हालवावयाचा होता. भाऊंच्या अपेक्षेप्रमाणें कोल्हापुरकरांनीं खरोखरच उचल करण्यास सुरवात केली होती. रामचंद्र गणेश मिरज प्रांताकडे होते, आणि भाऊ मनोळीकडे गेले हें पहातांच कोल्हापूरकराचा सरदार येसाजी शिंदे यानें पटवर्धनाच्या मुलखांत धुमाकूळ घालण्यास सुरवात केली. या कामीं त्याला हैदरची फूस होती. हैदरनें कोल्हापूरकरांना द्रव्याचीहि मदत केली होती. ( काव्य. इ. संग्रह प. नं. २३७,२३८ आणि खरे ले. २०४१ ) या द्रव्याच्या जोरावर येसाजी शिंद्यानें बरीच गडबड करण्यास सुरवात केली. शिवाय येसाजी शिंद्याला मुधोळकर शंकराजी घोरपडे हेहि दोनहजार स्वारांसह मिळाले. याच वेळीं हैदरनें कुमदानास श्रीपतराव बार्की याच्या हाताखालीं तीन हजार स्वारांची मदत पाठविली. तात्पर्य भाऊंचा मुक्काम हालविण्याचा जो बेत होता तो त्यांना पार पाडतां आला नाहीं. भाऊंचा मुक्काम मनोळीस व कुमदानाचा हुबळीस होता. मनोळी सोडून भाऊ कोल्हापूरकरांच्या विरुद्ध रामचंद्र गणेशाच्या मदतीस जाते तर कुमदानानें मनोळीची बारी घेतलीच असती. या अडचणीमुळें भाऊंस मनोळीची बारी सोडतां येईना. पुण्याच्या दरबारांत भाऊंना मदत पाठविण्याचा विचार घाटतच होता हरीपंताच्या फौजेच्या देण्याचा निकाल अजून लागला नव्हता. तथापि देण्याची कांहीं थोडी व्यवस्था करून पांच हजार फौज परशुरामभाऊंच्या मदतीस पाठविण्याचें कारभारी यांनीं ठरविलें होतें. या फौजेवर विसाजीपंत आठवले यांची नेमणूक झाली होती. ही फौज भाऊंच्या मदतीस जाण्याकरितां म्हणून

तयार झाली होती. पण मुधोळकर घोरपड्यांच्या मदतीनें येसाजी शिंद्यानें फारच धुमाकूळ घातल्यामुळें विसाजीपंत आठवल्यांची रवानगी भाऊंकडे न होतां रामचंद्र गणेशाच्या मदतीस त्यांनीं जावें असा कारभारी यांनीं आठवले यांस हुकूम दिला. आठवल्यांची मदत येतांच येसाजी शिंद्याचा उपद्रव थोडा कमी झाला. हैदरनें कुमदानास मदत पाठविल्यामुळें भाऊंना मनोळी सोडून जाणें शक्यच नव्हतें. कुमदानाच्या मनांत मनोळीची बारी घ्यावी असें फार होतें. त्याला मदत येतांच त्यानें हालचालहि करण्यास सुरवात केली होती. कुमदानानें मोरबचें ठाणें हल्ला करून घेतलें, व त्या ठाण्याच्या आश्रयानें सौंदत्तीपर्यंत कुमदानाची फौज फेरफटका करूं लागली. कुमदान पुढें येत चालला हें पाहून परशुरामभाऊंनीं आपला तळ मनोळीहून सौंदत्तीस नेला व तेथून बारी पार होऊन भाऊंच्या फौजेच्या टोळ्या तलाव्यास जाऊं लागल्या. बारीपलीकडे दाणावैरण अजून मिळण्यासारखी होती रोज तलावा करून ही दाणावैरण आणावी व दिवस काढावे असा भाऊंचा क्रम चालला होता. भाऊंच्या फौजेचा संचार बारीपलीकडे होऊं लागल्याबरोबर कुमदानाच्या टोळ्यांचा फेरफटका जरा नरम पडूं लागला. भाऊंच्या फौजेचा प्रताप कुमदानाला जाणवूं लागला असावा असें दिसतें. कारण कुमदानाच्या टोळ्यांचा संचार कमी झाला इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष कुमदानानें आपला मुख्य हुबळीचा तळ हालविला व तो बंकापुराकडे दहाबारा कोस मागे सरकला.

कुमदान मागें सरकला तो मतलबानें सरकला होता. आपण मागें गेलों म्हणजे भाऊ पुढें येतील अशी त्याची अपेक्षा होती. भाऊ पुढें आले म्हणजे त्याजवर एकदम छापा घालावा असा कुमदानाचा बेत होता. परशुरामभाऊ सावध होते. तरीपण ते बारी सोडून पलीकडे उरगोळच्या ठाण्यापर्यंत आले होतें. या ठिकाणीं ते थोडक्या फौजेसह तलाव्याकरितां आले होते. परशुरामभाऊ पुढें आले हें पाहून कुमदानानें त्यांना दगा करून त्यांच्यावर छापा घालण्याचा बेत केला व त्या प्रमाणें ता. २२ मार्च सन १७७७ रोजीं स्वतः कुमदान सातहजार स्वार व बाराहजार कवाइती

पायदळ या शिवाय तोफा असा सरंजाम घेऊन भाऊंवर छापा घालण्यास निघाला. परशुरामभाऊ नेहमीं सावधगिरीनें वागणारे सरदार होते. ते बातमीहि चांगली राखीत असत. यामुळें कुमदानाच्या छाप्याची बातमी भाऊंना कळली होती. लष्कराभोंवतीं छबिनें नेहमीं फिरत असत. शत्रू एक कोसावर येतांच भाऊंनीं लढाईच्या तयारीनें आपली फौज आघाडीस उभी केली व बुणगें मागें लावून देऊन मोठ्या सावधगिरीनें भाऊही मनोळीकडे वळले. उदगोळाहून मनोळीपर्यंत मागें येतांना भाऊंच्या लष्कराच्या व कुमदानाच्या लष्कराच्या बऱ्याच झटापटी झाल्या. परंतु सर्व फौज व बुणगें सुरक्षितपणें मनोळीच्या तळावर पोंचलें. उरगोळच्या मुक्कामीं भाऊंवर छापा घालण्याचा डाव अशा रीतीनें फसल्यामुळें कुमदानानें मनोळीच्या तोंडावर हुली नावाचें एक ठाणें होतें तें घेण्याचा बेत केला. पण परशुरामभाऊंनीं त्या ठाण्याच्या रक्षणाकरितां फौज पाठवितांच कुमदानाचे लोक पळून गेले. या नंतर मनोळीच्या तळावरून रोज भाऊंची फौज तलाव्या करितां बाहेर जाऊं लागली. या फौजेच्या व कुमदानाच्या फौजेच्या पुन्हा झटापटी सुरू झाल्या. गनिमी काव्याच्या या लढाईला कुमदान कंटाळून गेला. भाऊंचा कालहरण करण्याचा हा उद्योग आहे असें वाटून कुमदान उरगोळाहून पुन्हां हुबळीच्या तळावर गेला.

मनोळीच्या तळावर भाऊंनीं ठाणें दिल्यापासून आज दोन अडीच महिनें गेले होते. या दोन अडीच महिन्यांत प्रत्यक्ष कार्य असें जरी परशुरामभाऊंना कांहीं करतां आलें नाहीं, तरी अप्रत्यक्ष रीतीनें परशुरामभाऊंच्या मनोळीच्या बारीवरील मुक्कामाचा बराच फायदा झाला तो असा कीं कर्नाटकांतले लहान लहान पाळेगार, देसाई वगैरे हैदरच्या उपद्रवामुळें फार गांजले होते. नवलगुंदकर, कित्तूरकर वगैरे नाइलाजानें हैदरला मिळण्याचाहि संभव होता. पण परशुरामभाऊ ठांसून मनोळीच्या बारीवर उभा असल्यामुळें या सर्व बारिकसारिक लोकांस धीर येऊन ते तटस्थ राहिले. पेशवे सरकारकडून हैदरचा समाचार घेण्याचा कांहीं उपक्रम होत आहे

अशी लोकांची खात्री झाली. पण ही परिस्थिति फार दिवस टिकणें शक्य नव्हतें. बारीपलीकडे तलावाकरून भाऊंची फौज आपला निर्वाह करीत होती पण फौजेस रोजमुरा देण्यास आतां भाऊंजवळ कांहींच शिल्लक राहिलें नव्हतें. अशा स्थितींत कोठेंतरी खंडणी वगैरे वसूल करून फौजेस काहींतरी देणें प्राप्त होतें. नाहींतर फौजेंतील लोकच दंगा करण्याचा संभव होता. भाऊंच्या स्वारींत रास्त्याचें पथक होतें व आनंदराव रास्ते स्वतः हजर होते. रास्त्यांच्या कर्नाटकांतील जहागिरीतल्या जालिहाळकर वगैरे देसायांनीं शत्रूच्या चिथावणीनें रास्त्यांचा अंमल उठवून देण्याचा उद्योग आरंभिला होता. तेव्हां रास्त्यांच्या विनंतीवरून परशुरामभाऊंनीं या बंडखोर लोकांचा बंदोबस्त करून त्यांच्या पासून जबर दंड वसूल करण्याचें ठरविलें. हा उद्योग हातीं घेऊन दोन कामें साधणार होतीं. रास्त्यांचा अंमल बसून तूर्त खर्चाकरितां पैसाहि मिळण्याचा संभव होता. म्हणून भाऊंनीं रास्त्यांचें म्हणणें मान्य करून जालिहाळकडे कूच करण्याचें ठरविलें. मुलुखगिरीचा हा प्रांत मनोळीपासून पंचवीस कोसाचे आंतच होता. भाऊ दूर होतांच कुमदान कदाचित् बारीकडे वळला तर लगेच भाऊंनाहि मागें फिरण्यासारखें होतें. म्हणून भाऊंनीं ही कामगिरी कबूल केली परशुरामभाऊंनीं ही कामगिरी मोठ्या झपाट्यानें पुरी केली. ज्या पाळेगारांनीं रास्त्यांचा अंमल उठविला होता तो पुन्हा बसविला व पाळे-गारांकडून खंडण्या दंड वगैरे वसूल केला. या बंडखोरांचा प्रमुख जालिहाळ-कर देसाई यानें बळकाविलेलीं सर्व ठाणीं भाऊंनीं परत घेतलीं. त्याचे कडून पंचवीस हजार दंड वसूल केला. परशुरामभाऊ मनोळीपासून दूर गेले या गोष्टीचा फायदा घेण्याचा कुमदानानें उद्योग करून पाहिला. परशुरामभाऊंनाहि या गोष्टीची जाणीव होतीच. त्यामुळें कुमदान मनोळीकडे आला तर आपल्या फौजेपैकीं कांहीं टोळ्या कुमदानावर पाठवावयाच्या अशी योजना भाऊंनीं आंखलेलीच होती. अपेक्षेप्रमाणें कुमदानानें मनोळीकडे येण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण भाऊंची फौज समाचारास हजरच होती. कुमदानानें दोनचारदां असा प्रयत्न करून

पाहिला. पण तो त्यास साधला नाहीं. शेवटीं कुमदानानें मनोळीचा नाद सोडून दिला.

इंग्रजांनीं दादासाहेबांचा पक्ष सोडला होता. तरी दादांचे चाळे मात्र बंद झाले नव्हते. दादाचे हस्तक बाजीपंत बर्वे हे हैदरचे राज्यांत जाऊन त्याचेकडून पेशव्यांच्या राज्याला उपद्रव देत होते. हैदरनें या गोष्टीचा फायदा घेण्यास कमी केलें नाहीं. शिवाय कोल्हापुरकरांकडूनहि पेशव्यांच्या राज्यास उपद्रव देण्याकरितां हैदरनें कोल्हापुरकरांसहि मदत दिली. या उपद्रवाचा परिणाम सावशीच्या लढाईत पेशव्यांना व मुख्यतः पटवर्धनांना भोगावा लागलाच पण सावशीचे लढाईनंतर लगेच परशुरामभाऊ मनोळीचे तोंडावर हैदरला अडविण्याकरितां येऊन राहिले. आणि रामचंद्र गणेश कोल्हापुरकरांचे तोंडावर येऊन राहिले. त्यामुळें बरीच बाजू सावरली. नाहींतर हैदर व कोल्हापूरकर यांनीं पेशव्यांच्या राज्यांत मोठा अनर्थच उडवून दिला असता.

कोल्हापूरकरांचा सरदार येसाजी शिंदे व रामचंद्र गणेश यांची कवठें, हिंगणगांव येथें मोठीच लढाई झाली. ही लढाई ता. १९ मे सन १७७७ रोजीं होऊन त्यांत येसाजी शिंद्याचा पूर्ण पराभव झाला, व त्यास दोनशें स्वारांनिशीं पन्हाळ्यास पळून जावें लागलें. शिंद्याची सर्व चीजवस्त रामचंद्र गणेशाच्या हातीं लागली. अशी स्थिती झाल्यामुळें तूर्त कोल्हापूरकरांचा उपद्रव बंद झाला. शिवाय पुढें लवकरच पावसाळा सुरू होऊन नद्यांस पाणी आलें. तेव्हां कोल्हापुरकरांकडून पेशव्यांच्या मुलखास उपद्रव होण्याचें भय निदान पावसाळा संपेपर्यंत तरी उरलें नाहीं. कोल्हापुरकरांचा अशा रीतीनें बंदोबस्त झाल्यामुळें रामचंद्र गणेश पुण्याकडे परत वळले. कोल्हापुरकरांचा तात्पुरता बंदोबस्त झाला आणि हैदराच्या तोंडावर परशुरामभाऊ अजून होतेच. तथापि हैदर आणि कोल्हापूरकर यांचा कायमचा बंदोबस्त करण्याकरितां पेशव्यांच्या कारभाऱ्यांना जादा तयारी करणें जरूर होतें. तात्पुरत्या तयारीनें हे दोन्ही शत्रू आटपण्यासारखें नव्हते. करवीरच्या मोहिमेवर कारभाऱ्यांनी महादजी शिंद्याची नेमणूक केली होती व महादजी

शिंदे त्याप्रमाणें तयारीला लागलेहि होते हैदरच्या बाबतींत मात्र जास्त तयारीची जरूर होती. या प्रकरणांत कारभाऱ्यांनीं निजामाची मदत घेण्याचें ठरविलें होतें. पुणें दरबारकडून हरीपंत फडक्यांची रवानगी करण्याचें घाटत होतें. निजाम, हरिपंत, व परशुरामभाऊ या तिघांनीं एकत्र होऊन हैदरअल्लीला चांगलीच तंबी द्यावी असा बेत घाटत होता.

कारभाऱ्यांच्या योजनेला निजामानें मान्यता दिली व आपला सरदार इब्राहिम धौशा याला कर्नाटकांत पाठविण्याचें ठरविलें. पुण्याहून कारभाऱ्यांनीं हरिपंताची रवानगी केली. सन १७७७ च्या एप्रिल अखेरीस हरिपंत तुंगभद्रेच्या आसपास आले. त्यांची व परशुरामभाऊंची गांठ तारीख ५ मे सन १७७७ रोजीं गजेंद्रगडनजीक पडली. हरिपंत आल्यावर त्यांना आपणापाशींच राहून घेण्याचा भाऊंचा विचार होता. हरिपंत व आपण मिळून हुबळीस तळ देऊन बसलेल्या कुमदानास पहिल्यानें हांकून लावावा असा भाऊंचा विचार होता. पण निजामानें धौशाला पाठविलें होतें. हा धौशा कर्नुळापर्यंत आला असें पाहून हैदरनें मीररेझा व टिपू यांच्या हाताखालीं मोठी जबरदस्त फौज धौशाचा समाचार घेण्यास पाठविली. असें झाल्यामुळें धौशानें हरिपंतांस मोठ्या निकडीचीं पत्रें पाठवून आपल्याकडे बोलाविलें. धौशाचीं अशीं पत्रें आल्यामुळें हरिपंतांस धौशाकडे जावें लागलें. हरिपंत धौशाकडे गेल्यामुळें परशुरामभाऊंना आपल्या बळावरच कुमदानाला तोंड देण्याचें काम करणें प्राप्त झालें. पण हैदरला हरिपंत व धौशा यांचा दुसरा मोठा पेंच उत्पन्न झाल्यामुळें हैदरनें कुमदानाला हुबळीहून परत बोलाविलें. कुमदान गेल्यावर भाऊंचा मार्ग बराच मोकळा झाला. नंतर त्यांनीं कर्नाटकांतल्या ज्या संस्थानिकांनीं पटवर्धनांच्या जहागिरीचा मुलूख दडपला होता त्यांचा समाचार घेण्याचें काम झपाट्यानें सुरू केलें. परशुरामभाऊंनीं डंबळचे देसायावर तात्काळ स्वारी केली. पन्नास हजार रुपये खंडणी देण्यास हा देसाई तयार झाला होता. पण हरिपंत भाऊंच्या फौजेपासून दूर गेले ही बातमी समजतांच हा देसाई टाळाटाळ करूं लागला. तेव्हां भाऊंनीं मोठ्या झपाट्यानें हरला-

पूर, उमजगी, नरगळ, जखली वगैरे ठाणीं घेतलीं व हिरेहळास वेढा घातला. या ठिकाणीं बरीच झटापट होऊन ता. ५ जून १७७७ रोजीं भाऊंनीं हें ठाणें घेतलें. या लढाईंत कृष्णराव पानशे गोळी लागून ठार झाले व जनोबा सुभेदार यादवाडकर जखमी झाले. डंबळकर देसाई नरम आला व त्यानें हिरेहाळ बद्दल ऐंशीं हजार व इतर ठाण्यांबद्दल पंचवीस हजार खंडणी देण्याचें कबूल केलें. शिवाय पानशे यांच्या कुटुंबास एक गांव या देसायांकडून इनाम देवविण्यांत आला.

परशुरामभाऊंनीं हा जो खंडण्या वसुलीचा धुमधडाका चालविला त्याचें कारण हरिपंत व धौशा यांच्या फौजा कर्नाटकांत उतरल्यामुळें हैदरला दुसरीकडे शह लागला हें होय. अर्थातच हैदरला चारी बाजूंनीं ताण बसल्याशिवाय हैदर वठणीवर येणारा नव्हता. तेव्हां कांहीं झालें तरी हरीपंताची फौज कर्नाटकांत टिकवून धरणें जरूर होतें. पण हरीपंताजवळ पैशाची मोठी अडचण होती. दिवस पावसाळ्याचे असल्यामुळें फौज छावणीस रहावयाची म्हणजे फौजेच्या पदरांत कांहींतरी टाकणें प्राप्त होतें. अशा परिस्थितीमुळें हरिपंतानें धौशास मिळवून घेऊन पहिल्या सपाटयाबरोबरच खंडण्या वसुलीला सुरवात केली. हरिपंतांनें कनकगिरी संस्थानापासून सत्तर हजार खंडणी घेतली. नंतर ते केंचनगुडास गेले. हरीपंत व धौशा एकत्र झालेले पहातांच हैदर धौशास अडविण्याकरितां पुढें आला होता. तो मागें हटून चित्रदुर्गकडे गेला. इकडे हरिपंतानें केंचनगड लुटून फस्त केला. इतकें होईपर्यंत सन १७७७ चा जून महिना संपत आला. हरिपंतांच्या मनांत तुंगभद्रेच्या पलीकडे जाऊन शत्रूच्या मुलखांत छावणी करावी असें होतें. पण धौशा या गोष्टीस कबूल नव्हता. त्याचें म्हणणें तुंगभद्रेच्या अलीकडेच छावणी करावी असें होतें. धौशाच्या आग्रहामुळें हरीपंतानें तुंगभद्रेच्या अलीकडेच छावणी करण्याचें ठरविलें. हरिपंतानें छावणी केली खरी पण छावणीच्या दिवसांत फौजेच्या पोटास द्यावयास हरिपंताजवळ पैसे नव्हते. हरिपंताची ही अडचण परशुरामभाऊंच्या कानावर आली होती. परशुरामभाऊ स्वतःहि अडचणींतच होते. पण हरिपंताची फौज कर्नाटकांत टिकून

राहील तरच हैदरला पायबंद बसेल व त्यानें बळकाविलेला पटवर्धनांच्या जहागिरींतला मुलूख सोडवितां येईल अशी भाऊंची खात्री होती. तेव्हां कांहीं झालें तरी हरिपंताची अडचण दूर केली पाहिजे असें भाऊंनीं ठरविलें व स्वतःच्या जबाबदारीवर चार लक्ष रुपये कर्ज काढून हरिपंताकडे पाठवून दिले. हैदरचा उपद्रव कर्नाटकांतील इतर संस्थानिकांनाहि जाणवूं लागला होता. चित्रदुर्ग, हरपनहळ्ळी, कर्नोळ, कडपेकर वगैरे ठिकाणच्या संस्थानिकांनींहि परशुरामभाऊंस अशी गळ घातली कीं कसेंहि करून हरिपंताची फौज ठेवून घ्यावी. या सर्व संस्थानिकांनीं हैदरास हाकलून देण्याकरितां शक्य ती मदत देण्याचेंहि परशुरामभाऊंना अभिवचन दिलें. ही सर्व परिस्थिती लक्षांत घेऊन भाऊंनीं स्वतः हरिपंताची गांठ घेण्याचें ठरविलें, व त्याप्रमाणें ते सड्या स्वारीनें हरिपंताच्या लष्कराकडे गेले. परशुरामभाऊंनीं स्वतःच्या जबाबदारीवर हरिपंतास खर्चास पाठविलें आणि पुण्यास कारभाऱ्यांसहि त्यांनीं लिहिलें कीं हरीपंतास खर्चास न आल्यास हरीपंत कर्नाटकांत छावणी करूं शकणार नाहींत. कारभारी जरी पेचांत होते तरी हरिपंतानें परत येऊं नये असें त्यांचेंहि म्हणणें होतें. पण खर्चास पैसे आल्याशिवाय हरिपंत राहणार कसे ? शिवाय हरिपंत पुण्यास परत आले तर त्यांच्या फौजेचा उपद्रव पुण्याच्या आजुबाजूच्या मुलखांतहि झाल्याशिवाय राहिला नसता, आणि पुन्हां हैदरास मोकळें रान मिळालें असतें. हा सर्व पेंच लक्षांत घेऊन कारभाऱ्यांनीं तात्काळ दोन लाख रुपये हरिपंताकडे पाठविले आणि पुढील चार महिन्यांत बारा लाख पाठविण्याचें कबूल केलें. अशा रीतीनें परशुरामभाऊंनीं केलेल्या खटपटीला यश येऊन हरीपंताच्या फौजेची छावणी होण्याचें नक्की ठरलें व परशुरामभाऊ सड्या स्वारीनें हरीपंताकडे गेले होते ते त्यांस घेऊन शिरहट्टीस आले. भाऊ या खटपटींत होते तेव्हां त्यांची फौज नवलगुंदकराचे खंडणी वसुलीचे कामांत गुंतली होती. नवलगुंदकरानें पासष्टहजार खंडणी देण्याचें कबूल केलें. ही खंडणी वसूल होऊन भाऊ वर लिहिल्याप्रमाणें शिरहट्टीस आले. इतकें होइपर्यंत सन १७७७ चा जुलई महिना समाप्त झाला.

हरिपंताच्या छावणीची सर्व व्यवस्था झाल्यावर परशुरामभाऊंनीं आपल्या जहागिरींतील गेलेला मुलूख सोडविण्याचा उद्योग झपाट्यानें सुरू केला. लक्ष्मेश्वर परगणा हा पटवर्धनांच्या जहागिरीपैकीं होता. हा परगणा शिरहट्टीकर देसायानें बळकाविला होता. या देसायानें हैदरची मदतहि मागविली होती. या परगण्यांत शिरहट्टी व सावशी अशीं दोन प्रमुख ठाणीं होतीं. व तीं देसायाच्याच ताब्यांत होतीं. देसायाचीं मुलें माणसें शिरहट्टीस होतीं व स्वतः देसाई बंकापुरास होता. लक्ष्मेश्वरचा परगणा घ्यावयाचा म्हणजे त्या परगण्यांतील प्रमुख ठाणें शिरहट्टी हें पहिल्यानें घेणें जरूर होतें. परशुरामभाऊ व हरिपंत हे एकत्र झाल्यावर उभयतांच्या फौजेनें शिरहट्टीस वेढा घातला व तेथील पेठ घेतली. शिरहट्टीच्या किल्यांत देसायाचे दोन हजारपर्यन्त लढाऊ लोक होते व त्यांचीं किल्ला लढविण्याची तयारी होती. किल्यांतील लोकांस बंकापुराहून किंवा सावशीहून मदत मिळण्याचा संभव होता. किल्लेकरी मधून मधून समेटाच्या बोलण्याचाहि आव आणीत. पण तो कालहरणाचा डाव होता. भाऊंनीं हा डाव ओळखून किल्यावर हल्ला करण्याचें ठरविलें, व हल्ला करून तात्काळ किल्ला घेतला. किल्ला स्वाधीन झाल्यावर देसायाचीं मुलें माणसें व कारभारी आंत होतीं. त्या सर्वांस कैद करून मिरजेस पाठविण्यांत आलें. शिरहट्टीवरील या हल्यांत बळवंतराव पटवर्धन यादवाडकर यांस गोळी लागून ते जखमी झाले. शिरहट्टी घेतल्यावर लक्ष्मेश्वर परगण्यांतील इतर ठाणीं म्हणजे श्रीमंतगड, येळवतो, वडहट्टी, बालेहसूर व हणगी हीं ठाणीं एका मागून एक भराभर कबज्यांत आलीं. आतां फक्त सावशीचें ठाणें घ्यावयाचें राहिलें. या वेळीं परशुरामभाऊ व हरिपंत निरनिराळ्या कामगिरीवर गेले. हरीपंत सावनुराकडे खंडणी वसूल करण्याकरितां गेले आणि परशुरामभाऊ व रास्ते यांचीं पथकें सावशी घेण्याच्या मार्गाला लागलीं. इतकें होईपर्यंत सन १७७७ चा सप्टेंबर महिना आला.

परशुरामभाऊंचा हा उद्योग चालला असतां दुसरीकडे काय काय हकिगती घडत होत्या त्यांचा थोडासा आढावा घेणें जरूर आहे. पुरंदरच्या

तहामुळें इंग्रजांशीं युद्ध बंद झालें होतें. तथापि दादाचें व इंग्रजांचेहि चाळे बंद झाले होते असा अर्थ नाहीं. दादाची महत्वाकांक्षा अजून मावळली नव्हती आणि इंग्रजांनाहि पेशव्यांच्या राज्यांत हात घुसविण्याला एक साधन म्हणून दादा हवाच होता. वास्तविक पुरंदरच्या तहानें इंग्रजांनीं दादास आश्रय देऊं नये असें ठरलें होतें. तरी सुद्धां इंग्रजांनीं दादास मुंबईस ठेऊन घेतला होता. इंग्रजांचा वकील मॉस्टिन हा कारभाऱ्यांस असें सांगत होता कीं दादाची योग्य सोय करून द्या म्हणजे दादा तुमच्याकडे येतील. पण योग्य सोय कोणती याबद्दल कांहींच ठरेना. अर्थातच इंग्रजांचें बोलणें लबाडीचें असें समजून कारभाऱ्यांना या बाबतींत जास्त लक्ष घालणें प्राप्त झालें. कोल्हापूरच्या मोहिमेवरून नुकतेच रामचंद्र गणेश परत आले होते. त्यांच्या बरोबर चारहजार फौज देऊन त्यांस कारभाऱ्यांनीं मुंबईच्या वाटेवर तळेगांव येथें पाठविलें. रामचंद्र गणेशाच्या मदतीस कारभाऱ्यांनीं आनंदराव गोपाळ रास्ते यांचें पथकहि दिलें होतें.

या अवधींतली दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे ता. १२ जुलई सन १७७७ रोजीं सवाई माधवराव यांची मातोश्री गंगाबाईसाहेब या पुरंदर मुक्कामीं वारल्या. श्रीमंत सवाई माधवरावांच्या संगोपनाचें काम आतां सदाशिवराव भाऊसाहेब यांची पत्नी पार्वतीबाई यांस करावें लागलें.

पुण्यास कारभाऱ्यांना आणखी एक अडचण उत्पन्न झाली होती. नाना फडणीस यांचे चुलत बंधु मोरोबादादा यांचा कारभारांत कांही हात नव्हता. फडणिशीच्या कामांत त्यांचाहि हक्क असल्यामुळें आपल्याला कांहींच अधिकार नाहीं म्हणून मोरोबा दादा हे नाखूष होते. स्वाभाविकच मोरोबाचा ओढा दादासाहेबांकडे असून दादामार्फत मोरोबाचा हैदरशीं पत्रव्यवहारहि असे. घरांतच असलेला हा अस्तनींतला निखारा शक्यतर विझवून टाकावा म्हणून नानांनीं मोरोबास कारभारांत घेण्याची खटपट केली. पण नानाच्या या प्रयत्नास यश आलें नाहीं. मोरोबाचें हें प्रकरण बरेंच वाढून त्यामुळें राज्यांत केवढा बखेडा निर्माण झाला याची हकिगत पुढें स्वतंत्र प्रकरणांत दिली असल्यामुळें येथें जास्त लिहीत नाहीं.

असो. परशुरामभाऊ व हरिपंत यांच्या फौजा शिरहट्टी काबीज झाल्यावर निरनिराळ्या ठिकाणीं गेल्याचें पूर्वी लिहिलेंच आहे. परशुरामभाऊ सावशीकडे गेले. व हरीपंत सावनुराकडे गेले. मराठ्यांचे हे सर्व उद्योग तुंगभद्रेच्या अलीकडे चालले होते. या वेळीं हैदर काय करीत होता हें पाहिलें पाहिजे. हैदर यावेळीं चित्रदुर्गकरांच्या पाठीस लागला होता. तुंगभद्रेच्या पलीकडील संस्थानांपैकीं हें एक संस्थान होतें. श्रीमंत थोरले माधवरावसाहेब पेशवे यांच्या कारकीर्दींत तुंगभद्रेपलीकडे पेशव्यांना खंडणी देणारीं अशीं आठ संस्थानें होतीं. कडपें, कर्नुळ, अदवानीं, बल्लारी, रायदुर्ग, चित्रदुर्ग, हरपनहळ्ळी व गुत्ती अशीं हीं आठ संस्थानें पेशव्यांना खंडणी देत असत यांपैकीं गुत्ती हें मराठी संस्थान असून हैदरनें तें पूर्वीच बुडविलें होतें कडपें, कर्नुळ व अदवानी ही निजामाच्या ताब्यांत असून तिकडे अजून हैदरची दृष्टी वळली नव्हती. बल्लारी व रायदुर्ग हीं संस्थानें हैदरनें गेल्या दोनतीन वर्षांत बुडविलीं होतीं. बाकी राहिलीं चित्रदुर्ग व हरपनहळ्ळी. हीं दोन संस्थानें बुडविण्याचा हैदरचा उद्योग चालू होता. या दोन संस्थानांपैकीं तूर्त तो चित्रदुर्गच्या पाठीस लागला होता. मराठ्यांच्या फौजा तुंगभद्रेच्या अलीकडे असल्यामुळें चित्रदुर्गकराला थोडें अवसान वाटत होतें. त्यानें आपला कारभारी हरीपंताकडे पाठवून मदतीची याचना केली होती. पण हैदरनें एकदम चित्रदुर्गास वेढा घातल्यामुळें चित्रदुर्गकरानें हैदरकडे तहाची याचना केली. हैदरनें त्या संस्थानिकाजवळ चौदा लक्ष खंडणीची मागणी केली. ही मागणी चित्रदुर्गकराच्या आटोक्या बाहेरची होती आणि मराठ्यांच्या फौजा तुंगभद्रेच्या अलीकडे असल्यामुळें त्यांची आपणास मदत मिळेल अशी चित्रदुर्गकराला आशा वाटत होती. यामुळें चित्रदुर्गकरानें हैदरची मागणी धुडकावून लाविली. खंडणी चित्रदुर्गकरानें नाकारल्यामुळें हैदरनें चित्रदुर्गास मोर्चेबंदी केली व चित्रदुर्गकराचें व त्याचें धूमधडाक्याचें युद्ध सुरू झालें.

तुंगभद्रेपलीकडे हैदरनें असा धुमाकूळ चालू ठेऊन त्यानें पुण्यास कारभाऱ्यांना तहाच्या मधाचें बोट लावण्याचाहि उद्योग केला. तुंगभद्रा ही

मराठ्यांच्या व आपल्या राज्याची हद्द मराठ्यांनीं मान्य केल्यास तीन सालची खंडणी व मागील बाकी देण्यास हैदर तयार होता. पण तुंगभद्रेपलीकडील मुलूख सोडण्यास कारभारी तयार नसल्यामुळें हें तहाचें प्रकरण जुळलें नाहीं.

परशुरामभाऊंची कामगिरी यावेळीं सावशीकडे चालू होती. सावशी व मिश्रीकोट हीं ठाणीं फारसे परिश्रम न पडतां भाऊंच्या स्वाधीन झालीं. आतां फक्त जुन्या हुबळीचें ठाणें घ्यावयाचें राहिलें होतें. त्यास मोर्चेबंदी करण्याचा भाऊंचा विचार होता. पण इतक्यांत परशुरामभाऊंना अशी बातमी लागली कीं चित्रदुर्गकराचा व हैदरचा तह होऊन हैदर तुंगभद्रेपलीकडे हरिहराजवळ तळ देऊन राहिला आहे. ही बातमी कळतांच परशुरामभाऊ हुबळीचें काम तसेंच ठेऊन सावनुरास हरीपंतास मिळण्याकरितां गेले. हैदरनें तुंगभद्रेच्या सर्व उतारांवर चौक्या बसवून कडक बंदोबस्त केला होता. ह्या हकिगती घडत होत्या तेव्हां सन १७७७ चा नोव्हेंबर महिना चालू होता.

या सालीं पर्जन्यवृष्टि फार झाली. त्यामुळें मराठ्यांच्या फौजेचे फार हाल झाले. प्रत्यक्ष भाऊंनींच पर्जन्यामुळें आपले कसे हाल झाले याचें वर्णन खालीलप्रमाणें केलें आहे. भाऊ लिहितात ' कचेरीचा डेरा, मुदपाकखानेची, देवपूजेची व जामदारखानेची राहुटी अगदीं उभी करावयाचे कामांतून गेली आहे. टाकून दिली. स्वयंपाक व जेवण उघड्यांत मैदानांतच होत असतें. एक राहुटी राजेश्री हरीपंतांनीं दिली आहे. तेवढ्यांत सर्व गुजराणा करितों. मोठें बिपत्य होतात. (खरे ले. २१६९, २१७६, २१८६) मुख्य सरदाराचे जर हे हाल तर मग सामान्य फौजेची काय स्थिती झाली असेल हें सांगावयास नको.

परशुरामभाऊंच्या मनांत जुनी हुबळी काबीज करावी व कित्तुरकराकडून खंडणी वसूल करावी असें फार होतें. पण शत्रू नजीक असल्यामुळें हीं कामें भाऊंना सोडून द्यावीं लागलीं. पण फौजेचा खर्च चालविण्याला कांहीं तरी मार्ग काढणें प्राप्त होतें, कारण यावेळीं मराठी फौज जवळजवळ

तीसपसतीस हजार जमली होती. एवढ्या फौजेचा खर्च चालविणेंकरतां खंडणीवसुलीचें काम चालूं ठेवणें सारखें जरूर होतें. परशुरामभाऊंनीं धारवाड व कोपळ या दोन सुभ्यांच्या मामलती रामचंद्रपंत हुपरीकर यांच्या गळयांत बांधून त्यांच्याकडून साडेचारलाखांची रसद घेतली, व सावनूरची खंडणी तीन लाख ठरवून तीहि वसूल केली. इतकें झालें तरी मराठी फौजेच्या खर्चाला हा सारा पैसा अपुराच पडत होता. शिवाय खंडणीवसुलीचें तुंगभद्रेअलीकडचें काम बहुतेक संपलें असल्यामुळें आतां जास्त पैसा मिळविण्याचें साधनहि तुंगभद्रेअलीकडे राहिलें नाहीं. अशी परिस्थिति असल्यामुळें परशुरामभाऊ व हरीपंत यांनीं असा विचार केला कीं तुंगभद्रा ओलांडून शत्रूच्या मुलखांत प्रवेश करावा व त्या प्रांतांत पैसा वसूल करून पोट भरावें. मराठे तुंगभद्रा ओलांडणार ही बातमी चित्रदुर्गकरास लागतांच त्यानें हरीपंताला असा निरोप पाठविला कीं गलगनाथाजवळ तुंगभद्रा उतरून आमचे मदतीस याल तर हैदरजवळ केलेला तह मोडून मी तुम्हास सव्वालाख होन देईन व पुढेंहि वेळोवेळीं पैसा पुरवीन असा चित्रदुर्गकराचा निरोप आल्यामुळें गलगनाथाजवळच तुंगभद्रा उतरण्याचें परशुरामभाऊ व हरीपंत यांनीं ठरविलें. याचवेळीं पुण्याहून कारभाऱ्यांकडूनहि हरीपंतास साडेचारलाख रुपये खर्चास आले.

सन १७७७ च्या नोव्हेंबर महिन्यांत मराठे तुंगभद्रा नदी उतरले आणि या वेळेपासून त्यांच्या व हैदरच्या झगड्यास खरी सुरवात झाली. हैदरवर चालविलेल्या या मोहिमेंत फार मोठ्या अशा लढाया झाल्याच नाहींत. लहानसहान चकमकीच चालू होत्या. मराठे नदीपार झाल्यावर पहिल्यानें हैदरनें उतारांवर ठेवलेल्या चौक्याशींच मराठ्यांस झगडावें लागलें. बळवंतराव पटवर्धन यादवाडकर व व्यंकटराव घोरपडे हे पहिल्यानें नदीपार झालें. नदीपार होतांच तेथील शत्रूची चौकी त्यांनीं मारून काढली. ही चौकी मारून काढल्यावर इतर सर्व चौक्या पळून गेल्या. मग मराठ्यांचें लष्कर हळूहळू सर्व पलीकडे गेलें. मराठी फौजा नदीपलीकडे गेल्या त्यावेळीं परशुरामभाऊ मोडशीचे विकारानें व तापानें आजारी होते. मराठ्यांचा

विचार नदी उतरल्यावर चित्रदुर्गकडे जाण्याचा होता. यावेळीं हैदर हरिहरापलीकडे पांच कोसांवर होता. मराठे चित्रदुर्गाकडे जाणार हें समजतांच त्यांचा रस्ता अडविण्याचा हैदरनें विचार केला. मराठ्यांचा रस्ता डोंगराळ होता. परशुरामभाऊ आजारी असल्यामुळें त्यांना पालखींतून जाणें प्राप्त होतें. मुख्य सरदार आजारी असल्यामुळें पटवर्धनांच्या फौजेवरहि हरीपंतांलाच लक्ष देणें जरूर झालें होतें. पटवर्धनांची फौज निदान एकमुखी तरी होती. पण हरिपंतांची फौज पंचभेळ होती, व त्या फौजेला रोजमुराहि भरपूर मिळत नव्हता. यामुळें हरीपंताच्या फौजेंत मधून मधून फितुरहि होत असे. या सर्व अडचणी लक्षांत घेऊन हरीपंतानें चित्रदुर्गकडे जाण्याचा डोंगराळमार्ग सोडून दिला व निजामाचा सरदार धौशा हा बल्लारीकडे होता त्याला मिळवून घेऊन मग चित्रदुर्गकडे जावें असें हरीपंतांनीं ठरविलें व ते धौशास मिळवून घेण्याकरितां बल्लारीकडे वळले. मराठ्यांच्या या लष्करावर वाटेंत कोठेंतरी छापा घालावा असा हैदराचा बेत होता, व त्यानें या कामाकरितां बाराहजार स्वार, तीस हजार पायदळ, आणि पंधरा तोफा असा दोक्त सरंजाम मराठ्यांच्या पाठीवर तयारहि ठेवला होता. पण हैदरचा हा डाव साधला नाहीं आणि मराठ्यांचें लष्कर सोंडूरची बारी ओलांडून रारावीच्या मैदानांत तळ देऊन राहिलें. येथें येईपर्यंत परशुरामभाऊ आजारीच होते. त्यामुळें रारावी येथें पंधरा दिवस मराठी लष्कराचा मुक्काम झाला. पंधरा दिवसांनंतर परशुरामभाऊंची प्रकृती हळु हळु सुधारूं लागली. लष्कर रारावीच्या मैदानांत आल्यावर आणि भाऊंची प्रकृति सुधारल्यावर हरीपंतानें खंडण्यावसुलीचें काम सुरू केलें. अनागोंदी कनकगिरी, अदवानी वगैरे संस्थानांकडून हरीपंतानें खंडणीची मागणी केली. मराठे धौशास मिळवून घेण्याकरितां म्हणून या मार्गानें आले होते. पण मराठ्यांची व धौशाची अजून गांठ पडली नव्हती. मराठे पुढें आल्यावर हैदरनें त्यांच्या पिछाडीस फौजेची एक मोठी टोळी ठेविली होती. देशाहून मराठी लष्करास येऊन मिळण्याचा मार्ग बंद करणें हें या टोळीचें काम होतें. पुण्याहून दारूगोळ्याचे सातआठशें

बैल आणि गजेंद्रगडकर घोरपडे हे मुख्य लष्करास मिळण्याकरितां येत होते. हैदरच्या टोळीची बातमी लागल्यामुळें या टोळीस झुकांडीं देऊन त्यांना मुख्य लष्करास येऊन मिळावें लागलें. अजूनसुद्धां निजामाच्या धौशाची व मराठ्यांची गांठ पडलीच नाहीं. हैदरनें मराठ्यांच्या पिछाडीस एक टोळी ठेविली त्याप्रमाणें मराठ्यांच्या आघाडीसहि एक फौज आणून ठेविली होती. या आघाडीच्या फौजेचें पुढारीपण हैदरनें स्वतःच घेतलें होतें व तो स्वतः मराठ्यांच्या आघाडीस मुरगोड येथें तळ देऊन बसला होता. अशा रीतीनें आघाडी व पिछाडी या दोन्हीं बाजूनें हैदरनें कडेकोट बंदोबस्त केल्यामुळें बुनगें व इतर लटांबर दूर करून शत्रूच्या तोंडावर सडे होऊन रहावें असा परशुरामभाऊ व हरीपंत यांनीं बेत केला. पण इतक्यांत मराठ्यांच्या कही बरोबर गेलेल्या स्वारांवर हैदरनें अचानक ता. १ जानेवारी सन १७७८ रोजीं हल्ला केला. मराठ्यांचे स्वार शत्रूजवळ लढत लढत मागें दमानें आले व मुख्य फौजेस मिळाले. शत्रू पुढें आला हें कळतांच परशुरामभाऊ व हरीपंत हे मुख्य फौजेसह आघाडीस शत्रूच्या तोंडावर उभे राहिले. एवढ्या अवधींत बुनगें व इतर लटांबर मागें सुरक्षित ठिकाणीं गेलें. मग मराठे सरदार तीसपसतीस हजार स्वारांचा गोट करून ठांसून उभे राहिल्यावर शत्रूची पुढें येण्याची छाती झाली नाहीं. बुणगें मागें गेल्यावर शत्रूवरहि हल्ला करण्याच्या मोहास मराठे बळी पडले नाहींत. आपल्याजवळ एवढी फौज असतां हैदर पुढें आला याचें कारण आपल्या फौजेंत कांहीं तरी फितूर असल्याची माहिती हैदरला लागल्याशिवाय हैदर पुढें आला नाहीं अशी मराठे सरदारांना शंका आली. म्हणून उलट हैदरवर चालून जाण्याचा प्रयत्न त्यांनीं केला नाहीं. हैदर पुढें आला पण त्यानेंहि मराठ्यांवर हल्ला न करितां तो राराबी येथें तळ देऊन राहिला, आणि हैदर पुढें आला त्या अर्थीं आपल्या लष्करांत कांहींतरी बिघाड असला पाहिजे असें समजन त्याची चौकशी करण्याकरितां मराठी लष्करहि तुंगभद्रा उतरून अलीकडे आलें. मराठ्यांचें बुनगें आधींच नदी अलीकडे आलें होतें.

३६१४

अशा रीतीनें तुंगभद्रेपलीकडे गेलेले मराठे पुन्हां अलीकडे आले व त्यांनीं आपल्या लष्करांतील फितुरीचा बारीक तपास सुरू केला. या तपासांत असें आढळून आलें कीं मानाजी शिंदे फांकडे यांनीं शत्रूकडून एक लाख होन आणून फौजेंत वाटले होते. ही गोष्ट उघडकीस आल्यामुळें सरदारांनीं मानाजीचा गोट लुटला या गडबडींत मानाजी निसटून पळून गेला. पण मानाजीचे साथीदार म्हसवडचे यशवंतराव माने यांस तोफेच्या तोंडीं देण्यांत आलें, व याच कटांत सामील असलेल्या एका गारद्यांच्या पुढाऱ्याचा शिरच्छेद करण्यांत आला. या प्रकरणांत सामील असलेले दुसरे दोन गृहस्थ महादजीराजे भोंसले व निळकंठराव थोरात यांस कैद करून बंदोबस्तानें पुण्यास पाठविण्यांत आलें. फितुराचा अशा कडक रीतीनें बंदोबस्त केल्यावर मराठ्यांनीं निजामाच्या धौशाला मिळवून घेण्याचा प्रयत्न केला. या वेळीं धौशाची व मराठ्यांची गांठ पडली. पण धौशाची ही संगत मराठ्यांना फारच उपद्रवकारक ठरली. निजामाच्या व मराठ्यांच्या फौजा एकत्र झाल्यावर सर्वांनीं पुन्हां नदीपार होऊन हैदरचें पारिपत्य करावें असें ठरलें. पण या कामगिरीला निजामाच्या धौशाचा उपयोग होण्याच्या ऐवजीं उपद्रवच होऊं लागला. धौशा चारदोन कोसांपलीकडे मजलच मारीना. त्यामुळें त्याच्या मंदगतीबरोबरच मराठ्यांना चालावें लागे. याचा परिणाम असा झाला कीं, हैदरच्या सैन्याचा नदीपलीकडे बेफाट संचार सुरू झाला, इतकेंच नव्हे तर त्याच्या फौजेच्या कांहीं टोळ्या नदी अलीकडे येऊनहि लुटालूट करूं लागल्या. ह्या प्रकारामुळें परशुराम-भाऊंनीं पूर्वी सोडविलेल्या लक्ष्मेश्वर तालुक्यांतीलहि ठाणीं पुन्हां शत्रूच्या हातीं पडूं लागलीं. हैदरनें टिपूच्या हाताखालीं एक टोळी पाठवून तिला धारवाडकडे लुटालूट करण्यास हुकूम दिला. टिपूची धाड मोठ्या झपाट्यानें येऊन धारवाडवर पडली व तेथें लुटालूट करूं लागली. पण किल्यावरून तोफांचा मारा सुरू झाल्यामुळें टिपू पळून गेला. जातांजातां टिपूनें नव्या हुब्बळीसहि त्रास दिला, व नंतर तो मुख्य सैन्यास जाऊन मिळाला. या प्रमाणें शत्रूनें चोहोंकडे संचार सुरू केला व त्याला यशहि येत गेलें. याचें

कारण मराठ्यांच्या चपळ स्वारांचा धौशाच्या मंदगतीमुळें नाईलाज होऊं लागला.

मराठे व निजामाचा धौशा यांच्या फौजा तुंगभद्रा उतरण्याकरितां पुढें पुढें येत होत्या. पण त्यांची गती इतकी मंद होती कीं, नदीपलीकडे हैदरला आपलें काम करण्यास या फौजांची काहींच पर्वा वाटत नव्हती. धौशानें मंदगतीचें हें जें धोरण स्वीकारलें होतें त्याचें कारण धौशा आंतून हैदरला सामील आहे कीं काय अशीहि शंका मराठ्यांना येऊ लागली होती. ✿

एकंदरींत धौशाच्या या वागणुकीला कंटाळून परशुरामभाऊ एका पत्रांत लिहितात ' घौषा नव्हता तेव्हां आम्ही आमचे स्वाधीन तरी होतों. आतां याची गांठ पडल्यापासून दोन महिने तुंगभद्रा उतरतों आहों असे दिवस जातात. दुष्टाशीं गांठ पडली. उपाय नाहीं. ' ( खरे ले. २२६० )

धौशाला मिळवून घेऊन सर्वांनीं मिळून पुन्हां तुंगभद्रा पार व्हावें व हैदराचें पारिपत्य करावें असें मराठे सरदारांच्या मनांत होतें. पण धौशाच्या कुचराईमुळें दोनतीन महिने तुंगभद्रेअलीकडेच सर्व फौजेचा घोळ पडून राहिला. नाहीं म्हणावयाला या अवधींत मराठ्यांनीं अनागोंदीच्या संस्थांनिकांकडून खंडणीवसुलीचें तेवढें काम केलें. हा संस्थानिक शत्रूस सामील झाला होता, व त्याच्या मदतीस हैदरनें कुमदानास पाठविण्याचा विचार केला होता. पण ही बातमी मराठ्यांना लागतांच त्यांनीं या संस्थानिकांच्या गंगावती या ठाण्यावर एकदम हल्ला केला व तें ठाणें घेतले. असें होतांच त्या संस्थानिकानें खंडणी देऊन मराठ्यांशीं तह केला. इतकें होईपर्यंत सन १७७८ चा मार्च महिना संपत आला. तेव्हां जास्त वेळ न काढतां एकदम नदीपलीकडे व्हावें आणि चित्रदुर्गास

---

✿ ( टीप-- धौशाला हैदरनें कांहीं लांच दिला असावा अशी माहिती खरे ले. २२६४, २२६५ या पत्रांत आढळते ).

जाऊन तेथील संस्थानिकाच्या मदतीनें बल्लारी, रायदुर्ग वगैरे ठिकाणें घ्यावीं म्हणजे झाडीच्या आश्रयानें राहिलेल्या हैदरास मैदानांत येऊन लढा द्यावा लागेल, अशी मसलत योजून हरीपंत व परशुरामभाऊ यांनीं नदी ओलांडण्याचें ठरविलें व त्या प्रमाणें धौशास कळविलें. धौशा नदीपलीकडे होण्यास तयार नव्हता. तेव्हां त्यानें हरीपंतास असें कळविलें कीं नदी उतरणेचा निजामाचा आपणास हुकूम नाहीं. धौशाचा असा निरोप येतांच मराठ्यांना धौशाच्या मैत्रीचा सोक्षमोक्ष लावणेंच प्राप्त झालें. हरीपंतानें व परशुरामभाऊंनीं धौशास असें स्पष्टच कळविलें कीं तुम्हीं आमचे बरोबर येणार कीं नाहीं हें नीट विचार करून कळवा. न येणार असाल तर तुम्ही शत्रू असें समजून आम्हास वागावें लागेल. असा खरमरीत निरोप पोचतांच धौशा ताळ्यावर आला व नदी उतरण्याकरितां मराठ्यांच्या लष्करांत येऊन सामील झाला.

या प्रमाणें धौशाशीं घासाघीस घालीत घालीत मराठे मार्च १७७८ च्या अखेर पुन्हां तुंगभद्रा उतरले, व हैदरच्या मुलखांत शिरले. अडीचतीन महिन्यापूर्वीं मराठे तुंगभद्रा उतरले होते पण फौजेंतल्या फितुरामुळें त्यांस मागें परतावें लागलें होतें. आतां पुन्हां नदी उतरल्यावर पंधरा दिवस होतात न होतात तोंच त्यांस पुन्हां मागें परतण्याचा प्रसंग आला. पहिल्यावेळीं मागें परतण्याचें कारण फौजेंतील फितूर हें होतें. या वेळींहि मागें परतण्याचें कारण फितूर हेंच होतें. पण या वेळचा फितूर व पहिल्या वेळचा फितूर यांत जमीन अस्मानाचें अंतर होतें. पहिल्या फितुरानें हरीपंत व परशुरामभाऊ यांच्या दहावीस हजार फौजेचीच धूळदाण झाली असती, पण दुसऱ्या फितुरानें सबंध मराठी राज्यच खलास होण्याचा संभव होता. याच प्रकरणांत वर उल्लेख केलेले मोरोबादादा यांनीं प्रचंड कारस्थान रचिलें होतें. चिंतो विठ्ठल, बजाबा पुरंदरे, सखारामबापू, तुकोजी होळकर वगैरे वडे लोक या कारस्थानांत सामील होते. या सर्वांच्या व इंग्रजांच्या मदतीनें मोरोबानें दादासाहेबांस पुन्हा पेशवाईच्या गादीवर आणण्याचा उद्योग सुरू केला होता. एवढें प्रचंड अरिष्ट राज्यावर आलें असतां हरीपंत व परशुरा-

मभाऊसारखे सरदार दूर कर्नाटकांत स्वारीवर ठेवणें इष्ट नव्हतें. मोरोबाच्या कारस्थानाचा सुगावा लागतांच नाना फडणिसानें हरीपंत व परशुरामभाऊ यांस तात्काळ परत फिरण्यासंबंधानें पत्रें लिहिलीं. हीं पत्रें सन १७७८ च्या एप्रिलचे आरंभी परशुरामभाऊंस मिळालीं. पत्रें मिळतांच हैदरवरील मोहिमेची सर्व मसलत एकदम सोडून देऊन हरीपंत व भाऊ मागें फिरले. अशा अचानक रीतीनें हैदरवरील या स्वारीचा शेवट झाल्यामुळें मराठ्यांच्या लष्करी सामर्थ्याचा जो वचक थोरल्या माधवरावापासून हैदरवर बसला होता तो अर्थातच कमी झाला. मराठ्यांच्या घरांत भाऊबंदकी उत्पन्न झाल्याचा हा परिणाम होता, व हैदरसारखा जहांबाज शत्रू या भाऊबंदकीचा फायदा घेण्यास टपून बसला होता. असो. मोरोबाच्या या राष्ट्रद्रोहि आणि आत्मघातकी कारस्थानाचीच हकिगत आतां आपणांस पुढील प्रकरणांत पहावयाची आहे.

-------

## प्रकरण ७ वें

# मोरोबा दादाचें कारस्थान

हरीपंत व परशुरामभाऊ १७७८ च्या मार्चचें अखेरील तुंगभद्रापार होऊन हैदरच्या मुलखांत उतरल्याचें मागील प्रकरणांत सांगितलें आहे. तुंगभद्रे पलीकडील हैदरनें बळकाविलेला मराठ्यांचा मुलूख सोडवावा हा त्यांचा मुख्य उद्देश होता व या कामीं त्यांनीं निजामाचा सरदार घोशा यालाहि बरोबर घेतलें होतें. निजामाच्या व आपल्या सहकार्यानें तुंगभद्रे पलीकडचा हैदरचा कांटा साफ उपटून टाकावा या ईर्षेनें नदीपलीकडे झालेल्या या सरदारांवर एक नवीनच संकट येऊन ओढवलें व त्यामुळें त्यांना मोहिमेचें काम तसेंच टाकून परत पुण्याकडे वळावें लागलें. हें संकट म्हणजे नाना फडणीसांचे चुलत बंधु मोरोबादादा यांनीं पुण्यास उभारलेलें प्रचंड कारस्थान होय. मराठे शाहींत फंद फितुरी नेहमींच चालत असे. पण मोरोबाचा हा फितूर विशेष महत्वाचा असून त्यामळें सर्व मराठी राज्यच धुळीस मिळतें कीं काय अशी भीती उत्पन्न झाली होती. आणि म्हणूनच मोहिमेचें काम तसेंच टाकून परत पुण्याकडे वळण्यासंबंधानें नानानें हरीपंत व परशुरामभाऊ यांस पत्रें लिहिलीं.

मोरोबा हा नानाचा सखा चुलत भाऊ असल्यामुळें त्यालाहि साहजिकच असें वाटें कीं नानाप्रमाणेंच आपणासहि राज्यकारभारांत कांहीं

महत्त्व असावें. मोरोबाची ही महत्वाकांक्षा अन्यायाची होती असें म्हणतां येत नाहीं आणि हें लक्षांत घेऊनच मोरोबाची कांहींतरी सोय करून द्यावी असा नानाचा विचार चालू होता. पण मोरोबा स्वतः नाना इतका धूर्त नसल्यामुळें तो इतर जास्त लबाड लोकांच्या जाळचांत अडकला जाऊन त्यानें राज्यांत एक मोठेंच खूळ उभें केलें. अलीकडे नाना व बापू यांचे सूत जमेनासें झालें होते व त्यांत आणखीं मोरोबाचें व नानाचें सख्य झाल्यास तें अर्थात आपल्याला जास्त जड जाईल हें जाणून बापूनें मोरोबाला आपल्या जाळचांत ओढिलें. बापूच्या नादीं लागून मोरोबानें नानाच्या सर्व योजना अमान्य केल्या व नानाकडे भरमसाट मागण्या करण्यास सुरवात केली, आणि अशा तऱ्हेनें मोरोबाचें हें खूळ आस्ते आस्ते मूळ धरूं लागलें.

नाना व बापू यांची राजकीय धोरणें सर्वस्वीं भिन्न होतीं. एकमतानें फार दिवस कारभार चालणें शक्य नव्हतें. दरबारी कामांत बापूकडून वारंवार अडथळे उत्पन्न होऊं लागल्यामुळें नानानें पुष्कळ कामें स्वतःच्याच जबाबदारीवर पार पाडण्यास सुरवात केली होती, आणि महादजी सारख्या प्रबळ माणसाशीं संधान राखून अडी अडचणीला महादजी आपल्याला उपयोगी पडेल अशी खात्री करून घेतली होती. बापूला अर्थातच नानाचें हें धोरण आवडलें नाहीं. महादजी ज्याच्या हाताशीं त्याचा राज्यकारभार ही गोष्ट बापू जाणून होता. नाना महादजीचे सख्य आपल्या मुळांवर आल्या शिवाय राहणार नाहीं हें ओळखून परस्पर मोरोबाच्या हातून नानाला पेचांत आणितां आलें तर पहावें आणि महादजी करवीरच्या मोहिमेवर व फडके-पटवर्धन कर्नाटकांत आहेत या संधीचा फायदा घेऊन नानाला आपलें पाणी दाखवावें असा बापूनें बेत केला. मोरोबाची समजूत पाडण्याचे नानाचे प्रयत्न सुरूं होते पण त्यांना यश येण्याचें चिन्ह कांहीं दिसेना. बापूसारख्या मुरब्बी मुत्सद्यानें कानमंत्र दिल्यावर मोरोबा हुरळला यांत काय आश्चर्य ? पटवर्धनांचा वकील शिवाजीपंत या संबंधें लिहितो " राजश्री मोरोबादादाच्या मनांतील भाव अनेक प्रकारचे आहेत. कोणी

1042

अनुकूल झाल्यास मांडी थापटण्यास चुकणार नाहींत. स्वत: अंगेजणी होणें न होणें कळतच आहे" (अ. यो. पा. ६८) राज्यकारभारांतुन नानाचें अजीबात उच्चाटण करावें असा मोरोबाचा हेतु होता व त्याला अनुसरून त्यानें आपल्या कारस्थानाच्या उभारणीस खालीलप्रमाणें योजना मनाशीं ठरविल्या होत्या. (२) सवाई माधवरावाचें पेशवेपद मान्य करावें, (२) दादाला आणून त्याजकडे वडीलकीचा मान द्यावा (३) मुख्य कारभारी सखाराम बापू असावे. (४) आणि अखत्यारीचा कारभार व दुय्यम कारभारी हें पद नानाकडे होतें तें आपल्याकडे चालावें व नानाचा कारभाराशीं कांहींच संबंध राहूं नये. वरील योजनेंत दादा व सवाई माधवराव या दोघांच्या पक्षाचे आपण समाधान करूं असा मोरोबाचा भ्रम होता व तसें झालें म्हणजे नानाला दूर केल्याबद्दल फार गवगवा होणार नाहीं अशी त्याची समजूत होती. दादाला आणून त्याला वडीलकीचा मान द्यावा ही गोष्ट बापूला पसंत नव्हती पण आरंभींच मोरोबाला दुखवूं नये अशा समजुतीनें बापूनें मोरोबाच्या या योजनेस संमती दिली. नाना मेणवलीस गेले ही संधी साधून मोरोबा व बापू यांनीं गुप्त खलबतें केलीं. व करारमदार व आणा शपथाहि झाल्या. कारस्थानाच्या उभारणी करितां होळकराला सामील करून घेऊन त्याला आगाऊ पांच लक्ष बयाना दिला व काम झाल्यावर जहागीर देण्याचेंहि वचन दिलें. नारो शंकरचा मुलगा रघुनाथराव नारायण यांस पन्नास हजार दिले व आणखीहि कोणाकोणास किरकोळ रकमा देऊन फौजा उभारणीचा उद्योग सपाट्यानें सुरू केला. शिवाय मोंगलाईंत पैसे चारून गारदी व स्वार गुप्तपणें चाकरीस ठेविले. दादाच्या सर्व अनुयायांना मोरोबानें आपल्या बाजूस वळवून घेतलें. फडके व पटवर्धन यांची फौज कर्नाटकांत होती. मोरोबाला या फौजेची फार भीति वाटत होती. तिकडे फितुर करण्याकरितां नरसिंगराव धायगुडे नांवाच्या सरदारास रवाना केलें व बरोबर पैकाही भरपूर दिला. मुंबई सरकारचा वकील मॉस्टिन याच्या मार्फत दादाला पुण्यास आणण्याकरितां इंग्रजांना मोरोबानें ३६ लाख रुपये दिले. नाना मेणवलीस गेल्याचें पूर्वी लिहिलेंच आहे. तिकडून

ते परत येतांच त्यांना असें आढळलें कीं मोरोबानें गुप्तपणें चाकरीस ठेवलेले मोंगलाईंतले लोक पुण्याकडे येत आहेत. त्या लोकांजवळ सरकारचे दस्तक नसल्यामुळें नानानें त्यांना पकडून मारून टाकिलें व कांहींना कैद केलें. चौकशी अंतीं हे लोक मोरोबाचे असा पत्ता लागला. हा प्रकार बापूच्या लक्षांत येतांच त्यानें मोरोबाला सूचना दिली कीं " आतां मंत्र फुटला यास्तव त्वरा करावी. "—

मोरोबानें तात्काळ होळकराकडे धांव घेतली. होळकर यावेळीं बाफगांवीं होतें. चिंतो विठ्ठल, बजाबा पुरंदरे वगैरे सर्व मंडळी होळकराकडे गेली. होळकराची व इतरांची मिळून १६।१७ हजार फौज तयार आहे असें दिसतांच ही सर्व मंडळी पुण्यावर चालून आली. नानानें तात्काळ पुण्याहून पळ काढला व पुरंदर गांठलें. त्यानें किल्याचा बंदोबस्त करून घाईघाईनें अदमासें ५।६ हजार फौज जमा केली. या हकिगती सन १७७८ च्या मार्चमध्यें घडल्या. इकडे मोरोबानें पुणै ताब्यांत घेऊन जागोजागीं आपल्या चौक्या बसविल्या. शनिवार वाड्यांत जाऊन पार्वतीबाईकडून दिवाणगिरीचीं वस्त्रें, शिक्के, कट्यार, जरीपटका व नौबत हीं मोरोबानें जबरदस्तीनें घेतलीं. नंतर होळकरासह मोरोबानें पुरंदरावर चालून जाण्याचा बेत केला. इतक्या थरास गोष्टी येतांच बापूच्या कारस्थानास सुरवात झाली. झाला हा प्रकार आपल्या सल्यानेंच झाला हें बापूस माहीत होतेंच. आतां प्रसंग आल्यावर तो निस्तरण्याचा उद्योग करून आपणच श्रेय घ्यावें असें त्या धूर्त मुत्सद्यानें ठरविलें व तात्काळ सासवडाहून निघून नानाकडे पुरंदरास प्रयाण केलें. बापूलासुद्धां दादा पुण्यास यावयास नको होता. तेव्हां या संकटांतून आतां पार कसें पडावयाचें याचा सल्ला तो नानास विचारूं लागला. नानानें असें पाहिलें कीं समयास शिंदे जवळ नाहींत. फडकेपटवर्धनहि नाहींत. अशा स्थितींत मोरोबा व होळकर यांना तंबी देणें कठीण, तेव्हां युक्तीच्या वाटेनें या लोकांशीं पडतें घेऊनच वेळ निभाऊन नेली पाहिजे. नानानें सर्वभार बापूवर टाकिला व त्याला सांगितलें कीं दादासाहेबांस पदच्युत करून गंगाबाईची स्थापना करण्याच्या मसलतींत मी तुमच्या विश्वासावर पडलों

तोच माझा विश्वास अद्यापि कायम आहे. या प्रसंगीं तुम्ही जें सांगाल त्याप्रमाणें वागण्यास मी तयार आहें. नानाची संमत्ति मिळाल्यावर बापू मोरोबाला भेटले व त्यांनीं मोरोबाची समजूत अशी पाडली कीं नानाजवळ एकदम हातघाईवर येऊन कांहीं फायदा होणार नाहीं. पेशवे व छत्रपति नानाच्या हातीं आहेत व फौजफाटा पैसारूका त्याच्या लगामीं आहे. शिवाय नाना तडजोडीनें अकत्यारीचा अधिकार तुमच्याकडे देण्यास तयार आहेत. तेव्हां तडजोडीनेंच प्रकरण मिटविणें बरें. नाना जास्तच गडबड करूं लागला तर दादा व इंग्रज यांना आणण्याचा बेत शेवटचें शस्त्र म्हणून आपणांस करितां येईलच. तूर्त घाई करण्याचें कारण नाहीं. कारण कांहीं झालें तरी बाल पेशव्याला तुमच्या हातीं देण्याचें नाना कधीहि कबूल करणार नाहीं. तेव्हां अखत्यारी तुम्हांला मिळते आहे तेव्हढी घेऊन तूर्त मिटतें. घ्यावें. बापूनें याप्रमाणें मोरोबाची समजूत पाडिल्यावर त्या दोघांमध्यें एक करार झाला त्याचीं कलमें खालील प्रमाणें होतीं. (१) सखारामपंतांनीं "देणें" करावे. "वडीलकीपण" आहे तसेंच त्यांच्याकडे असावें. त्यांस पुसल्याशिवाय कारभार करूं नये. (२) अखत्यारी राजश्री मोरोबादादानीं करावी. नानास संमतींत घ्यावें "देविणे" नानानीं करूं नये. (३) सर्वत्रांचें (सरंजाम, तैनात, इनामे वगैरे) यथापूर्व चालवावें. कोकणस्थ देशस्थ हें चित्तीं आणूं नये. (४) दादासाहेबांस तूर्त आणूं नये. पुढें आणिले तर आणावे". (अ. यो. पा. ७४) वर लिहिल्या प्रमाणें समेटाचा ठराव झाल्यावर बापू मोरोबा नाना वगैरे सर्व पुरंदरावर एकत्र जमले व होळकरहि पाठीमागून आले. सर्वांनीं श्रीमंतास नजरा केल्या व तडजोड झाल्यामुळें आतां कारभार व्यवस्थित चालेल असा रंग दिसूं लागला. मोरोबाच्या कारस्थानाची बातमी कर्नाटकांत फडके पटवर्धनांस समजलीच होती. आतां कारभाऱ्यांनीं त्यांना पत्रें पाठवून असें कळविलें कीं येथें आमची आपसांत तडजोड झाल्यामुळें तुम्ही मोहीम सोडून इकडे येऊं नये. हीं पत्रें पाहून हरीपंत व परशुरामभाऊ यांची खात्री होईना, व त्यांनीं मोहीम तशीच ठेवून परत फिरण्याचेंच ठरविलें. इकडे पुण्यास तडजोडीचे कलमा-

प्रमाणें नानाचा सर्व कारभार मोरोबाचे हातांत आला व होळकराच्या फौजेच्या जोरावर मोरोबाहि सर्व कामें रगडून करूं लागला. अशा रीतीनें सर्व राज्यच आपलें हातीं आलें असें वाटून मोरोबानें आपली अधिकाराची हौस तूर्त तरी फेडून घेतली असें म्हणण्यास हरकत नाहीं. मिळालेल्या अधिकारावर समाधान मानून राहण्याचा मोरोबाचा स्वभाव नव्हता. तडजोडीच्या कलमाप्रमाणें प्रत्यक्ष व्हवहारांत त्यानें वागणूकहि तशी ठेविली नाहीं. शिवाय नानाचा पाणउतारा करून राज्यकारभारांत त्याचें स्थान अजिबात नाहीसें करण्याचा उद्योग मोरोबानें आरंभिला. फडके पटवर्धनांचें नानाशीं दळणवळण बंद करण्याचा त्यानें उद्योग सुरू केला व नानाचे लोकांत फितूर करण्यासहि सुरवात केली. तडजोडीच्या कलमांत दादास तूर्त आणूं नये असें कलम होतें. पण इंग्रजाशीं संधान बांधून दादास आणण्याचाहि मोरोबाचा विचार आहे असें नानास आढळून आलें. दादा पुण्यास आला तर काय गोंधळ राज्यांत उत्पन्न होईल, सवाई माधवरावाची काय अवस्था होईल वगैरे विचार नानाच्या मनांत उत्पन्न होऊन त्याला मोठीच काळजी वाटूं लागली. व या घोर संकटांतून राज्याचा गाडा कसा सुरळीतपणें पार न्यावा या विषयीं तो विचार करूं लागला. मोरोबाच्या कारस्थानांत सामील झालेले लोक निरनिराळ्या मतलबामुळें सामील झाले होते. सखारामबापूला वडीलकीचा अधिकार पाहिजे होता. मोरोबाला बापू व नाना कोणीच नको होते. दादाला आणावें असेंहि त्याच्या मनांत नव्हते पण नाइलाज झाला तर मात्र दादाला आणण्याचा त्याचा बेत होता. होळकराला नाना नको होता. कारण नानानें होळकरास वगळून शिंद्याशीं मैत्री जोडली होती. चिंतो विठ्ठलाला बापू, नाना, मोरोबा कोणीच नको होते त्याला फक्त दादा यावा असें वाटत होतें. कारण दादा आल्यावर चिंतो विठ्ठलला दिवाणगिरी मिळणार होती. इंग्रजांचा वकील मॉस्टीन याला नाना नको होता. दादाला राज्यावर स्थापून आपल्या कंपनीचा फायदा करून घ्यावा असें त्याला वाटत होतें. शिवाय मराठ्यांच्या दरबारीं फ्रेंच्यांचें वजन वाढत होतें तेंहि त्याला नाहींसे करावयाचें होतें. अशा तऱ्हेनें

भिन्न मतांच्या लोकांचें हें कारस्थान यशस्वी होण्याचा फारच थोडा संभव होता. तरी नानाचा द्वेष ही एक गोष्ट सर्वांच्याच ठायीं वसत असल्यामुळें मोरोबाच्या कारस्थानाला मोठें भयंकर स्वरूप आलें, व त्यामुळें नानाचें चित्त अस्वस्थ झालें ही गोष्ट मात्र खरी. मोरोबानें कारभार हातांत घेतल्यावर मोठमोठ्या लोकांस हुकूम फर्माविण्यास मुळींच कसूर केली नाहीं. हरीपंत व परशुरामभाऊ कर्नाटकांत होते. त्या दोघांनाहि मोरोबानें हुकूम पाठविले कीं त्यांनीं आपापल्या फौजास निरोप देऊन हरीपंतानीं सड्यास्वारीनिशीं पुण्यास यावें व भाऊनीं तासगांवास जावें. दादासाहेबांस मुंबईहून आणण्यास मोरोबा मनांतून नाखूषच होता. पण नानाचा पुरा रेंच मोडण्यास त्यानें दादाला मुंबईहून आणण्याचा विचार केला. आणि त्याप्रमाणें इंग्रजाना आणि दादाला इषारा पाठविला. इंग्रजांची मदत घेऊन दादाची स्वारी साष्टीस आली. याच सुमारास बंगालच्या इंग्रजांचीं सहा पलटणें यमुना उतरून कालपीला आलीं. मुंबईकरांना मदत करण्याचे हेतूनेंच हीं सहा पलटणें पुण्याची वाट चालूं लागली होती यांत संशय नाहीं. या सर्व गोष्टी १७७८ च्या एप्रिलच्या सुमारास घडल्या. अर्थातच मोहीमेला फक्त आतां २ महिन्याचा काळच सोईचा आहे हे लक्षांत घेऊन इंग्रजांनीं उचल केली होती. पण नानानेंहि आपल्या मनाशीं असा विचार केला कीं तूर्त दोन महिने आपण मोरोबालाच मोठा मानून त्याच्याशीं मिळतें घेतलें तर मोरोबा व इंग्रज दादाच्या नादीं लागणार नाहीं. एवढें मोहिमेचे दोन महिने निभावले म्हणजे मग आक्टोबर नोव्हेंबर महिना उजाडणार. तेवढ्या अवधींत आपण शिंदे फडके पटवर्धन वगैरेना इकडे आणून मोरोबाचा काटा समूळ उपटून टाकूं. म्हणून तूर्त पडतें घ्यावें व त्यालाच मुख्य कारभारी मानून त्याच्या तंत्राप्रमाणें वागावें. नानानें ठरविलेलें हें धोरण कर्नाटकांत फडके पटवर्धन होते त्यांना कळण्यासारखें नव्हतें. कारण उघड पत्रव्यवहार करणें त्यावेळीं शक्य नव्हतें. फडके पटवर्धनांना इंग्रज दादाला घेऊन पुण्यास येणार या बातम्या मात्र समजत होत्या. यामुळें त्यांचें चित्त मात्र फार अस्वस्थ झालें. उलट त्यांच्या मनानें असा ग्रह करून

घेतला कीं एवढ्या प्राण संकटांत नाना कांहींच करीत नाहींत. दादा इंग्रजासह पुण्यास आल्यावर राज्यांत काय घोटाळे माजतील याची फडके पटवर्धनांना पूर्ण जाणीव होती. दादा पुण्यास आल्यावर सवाई माधवराव व नाना यांची तो काय अवस्था करील या विषयीं परशुरामभाऊंना फार काळजी वाटत होती. त्याना नानांचा या बाबतींत रागहि आला. भाऊंच्या मनाची ही अस्वस्थता त्यांच्या अनेक पत्रांत व्यक्त झालेली आढळते. त्यापैकी कांहीं महत्वाचे उद्गार खालीं दिले आहेत. " आतां श्री. गजाननानें श्रीमंत राजश्री रावसाहेबांचा व नानांचा बचाव करावा. पुरंदर किल्याचा बंदोबस्त असावा म्हणजे सर्व जोड पावली. " " पुण्याहून नानाची पत्रें आली. त्यावरून सर्व आशा सोडली. श्रीमंत राजश्री दादासाहेबांचा टेंबा उभा राहिला. श्रीमंतांची व नानांची काय अवस्था होते श्री. हरी जाणें. श्रीमंत रावसाहेबास सलाबत असावी म्हणजे बाकी फिकीर करीत नाहीं. " "सखारामपंत मोरोबाच्या भेटीस पुण्यास गेले तेव्हां विवेकच व्हावासा प्रकार दिसतो. याचे कारण बाजी हातांत आल्याखेरीज जावयाचे नव्हत, त्याकरितां वाटते. "." विना ज्यानी राजकारण केलें त्यांनीं शिंद्यास टाकून केलें असेल असें नाहीं जेथें होळकर तेथें शिंदे याचा संशयच नाहीं. हरकसेंही करून श्रीमंताचें व नानाचें संरक्षण होतें म्हणजे बरें होतें." " ज्या पक्षीं थोरले श्रीमंत आणावेसा सिद्धांत तेथील (मोरोबाचा) आहे तेव्हां फारच वाईट होणार. त्या लक्षांत वृद्ध (सखारामबापू) आहेत त्यासही विरुद्ध होईलसें दिसतें. सारांश करवीरकर गृहस्थाचे (महादजी शिंद्याचे) पुरतेपणी आंतील भाव समजून त्यांस या कार्यावर प्रवर्तिलें पाहिजे. " " श्रीमंतास (दादास) मुंबईहून आणविणार हा तर सिद्धांतच दिसतो. तेव्हां बाकी काय राहणार? प्राणाशींच गांठ आहे. नानास मनसबा करणें असतां तर फौजेस खर्चास पाठविते. पत्रें न येत तर विप्र एकामागून एक रवाना करते. तें नाहीं. तेव्हां सर्व कळलेंच आहे. श्रीमंतरावसाहेबांस कसाबाच्या हातीं देतील इतकाच खेद. वरकड ते तरआपले जिवावर उदारच आहेत. पुढें पैका कोण खाणार श्रीहरी जाणे." " इंग्रज सुद्धां येतात

१२७५ २८८५३

त्यापक्षीं कोणाचे जीव राहतात ऐसा अर्थ नाहीं. श्रीमंतासी घासलें नाहीं असें राज्यांत कोणीच राहिलें नाहीं. सर्व त्यांच्या नजरेंतच आहेत. मोरोबानी इंग्रजास ३६ लाख रुपये देऊं केले ते कोणच्या मोहिमेंत मिळवून देणार! तेव्हां आम्हा सारख्या चार गोर गरीबांकडूनच घेतील. " परशुरामभाऊचे वरील उद्गार पाहतां त्याच्या मनांत केवढी कालवाकालव झाली होती हें स्पष्ट दिसते. या संकटाला तोंड देण्याकरितां नाना कांहींच करीत नाहींत असे भाऊंना प्रथम साहजीकच वाटलें व त्यामुळें त्याच्या तोंडून वरील प्रमाणें निराशेचे उद्गार निघाले. पण दरम्यानच्या काळांत नानानें आपली गुप्त योजना भाऊच्या व हरीपंताच्या कानावर युक्तीनें पोंहचविली व त्या दोघांनी कर्नाटकांतून हळू हळू सावध गिरीनें कसें यावें याबद्दलहि इशारा दिला. या बातम्या येतांच अर्थातच परशुरामभाऊंस फार समाधान वाटलें. तेव्हां निराशा मावळून भाऊंच्या तोंडून लगेच उमेदीचे उद्गार बाहेर पडले. भाऊ लिहितात. " नानास मनसबा करणें, तेव्हां जिवावर उदार असलें पाहिजे. लवींचीं लक्षें हिमतीनें राखावीं. सारांश हिंमत न सोडावी. किल्ले कोटांचे बंदोबस्त चांगले करावे. त्यानीं काय करणें आहे. नानांनीं या मसलतींत पडणें, तेव्हां अब्रूनें मेळवावें अगर गमवावें. नासल्यास हिंमत न सोडावी. नबाबाकडील राजकारण पक्कें करावें. तसेंच भोसले, गायकवाड याचें लक्ष नीट राखावें. असें निरोप नानाकडे सांगून पाठवावे. " " राजश्री नाना किल्याखालीं येतात जातात म्हणून कळलें. त्यांस ये विशिची सूचना जरूर करावी कीं खाली उतरूं नये ते ( होळकर–मोरोबा ) दगाबाज आहेत. कोणेसमयीं काय करतील नकळे यास्तव वरूनच जाबसाल करणें तो करावा. ये विशी आम्ही नानासहि चिठी लिहिली आहे. " ( खरे अधीकार योग पान ८१–८२ ) नानाच्या गुप्त सूचनेप्रमाणें हरीपंत व परशुरामभाऊ हे कर्नाटकांतून हळू हळू मजला मारून येत होते. इकडे मोरोबानें आपल्या औट घटकेच्या अधिकारांत मोठाच दिमाख दाखविण्याचा सपाटा चालविला. त्यानें हरिपंताला हुकूम फर्माविला कीं त्यानें आपल्या फौजेस निरोप देऊन तात्काळ पुण्यास निघून यावें. त्याच प्रमाणें आप्पा बळवंत,

वाजी अण्णा, रामचंद्र गणेश, वगैरे प्रतिष्ठीत सरदारावरहि मोरोबानें हुकूम बजावणी करून यांच्याहि फौजेस घरीं बसावयास लाविलें वेळ मोठी नाजूक होती. जरा विरुद्ध गेलें तर मोरोबास संशय येऊन कलागत होण्याचा संभव. या गोष्टीकडे लक्ष देऊन नानांच्या संमतीनें सर्वांनीं मोरोबाचे हुकूम पाळले. अधिकार हातीं येतांच मोरोबापुढें दादासाहेबाचें काय करावयाचें हा मोठा प्रश्न विचाराकरितां उत्पन्न झाला. स्वतः मोरोबाला दादा विषयीं प्रेम नव्हतेच. पण अधिकार प्राप्तीला जरूर तर दादांना आणण्याला त्याची तयारी होती व त्याप्रमाणें त्यानें इंग्रजांचा वकील मॉस्टीन, चिंतोविठ्ठल व होळकर वगैरेना वचनहि दिलें होतें. हे लोक मोरोबाच्या पाठीस लागून दादाला आणण्याचा प्रश्न नेहमीं पुढें आणीत. मोरोबाहि नाना व बापू यांजपाशीं खलबत करी. पण या त्रिवर्ग कारभाऱ्यांच्या बैठकींत दादाला आणण्याचा प्रश्न निघाला कीं तो कांहींना कांहीं कारणामुळें मागें पडत असे. अशा वाटाघाटी चालतां चालतां सन १७७८ चा एप्रिल महिना निघून गेला. नाना व बापू यांच्या विरोधामुळें दादाला आणण्याचा मोरोबाचा बेत तडीस गेला नाहीं. अर्थातच मोरोबा होळकर वगैरे मंडळी यामुळें नाखूष होती. नानापुढें आपलें कांहीं चालत नाहीं असें पाहून मोरोबानें एक मोठाच डाव टाकला तो असा कीं नानाला पकडून कैदेंत टाकिलें कीं सर्व काम सुरळीत चालेल. अशा बेतानें. होळकराच्या मदतीनें नानाला पकडण्याचा मोरोबानें प्रयत्न करून पाहिला पण तोहि साधला नाहीं. हा प्रयत्न फसला तेव्हां मोरोबाची खात्री झाली कीं नानाला उखडून टाकणें हें सोपें काम नाहीं. तेव्हां इंग्रजांच्या मदतीनें दादाला आणण्याशिवाय गत्यंतर नाहीं असें मोरोबानें ठरविलें, व त्याप्रमाणें त्यानें एक गुप्त चिठी बापूकडे पाठविली ती अशी "पटवर्धनांचें व वडिलांचें (नानाचें) व शिद्याचें पारिपत्य नाहीं तरी आम्ही सर्वच बुडतों. सर्व दौलत नानाचे हाती याचा विचार केला पाहिजे. याज करितां विसाजीपंत व दादोपंत वाघोलकर असे पाठवावे त्यासी बोलून आपणाकडे पाठवितों ते सविस्तर सांगतां कळेल." मोरोबाची ही चिठी नानांनीं मोठ्या युक्तीनें पकडली तेव्हां

नानाची खात्री झाली कीं दादाला आणण्याच्या कारस्थानांत बापूंची संमत्ती मिळविण्या करितांच ही चिठी लिहीली असली पाहिजे. शिवाय यावेळीं पुण्यांत अशा वदंताहि पसरल्या होत्या कीं गोपाळ नाईक तांबवेकर व इंग्रजांचा वकील मॉस्टीन या दोघांना मोरोबानें मुंबईस दादाला आणण्या-साठीं पाठविण्याची खटपट सुरू केली होती. या बातमीमुळें वरील चिठीचा अर्थहि स्पष्टच झाला. पण या कारस्थानाला आयत्यावेळीं बापूनें संमती नाकारली. त्यामुळें सर्वच बेत फुकट गेला. मोरोबानें उभारलेल्या या खुळाचा फायदा घेण्यास इंग्रज कसे टपून बसले होते हेंहि पाहिलें पाहिजे. पुरंदरचा तह झाल्यानंतर त्या तहाच्या अटी पाळण्यासंबंधानें नाना व इंग्रज़ यांमधें बरीच भवती नभवती झाली. तहा विरुद्ध इंग्रजांनीं दादाला आश्रय दिल्यामुळें नानाचा इंग्रजावर राग होता. शिवाय नानानें फ्रेंचांचा वकील पुण्यास ठेविल्यामुळें इंग्रजांचाहि नानावर राग होता. नाना आपल्याला विचारीत नाहीं तेव्हां दादाला हातीं धरून मोरोबा मार्फत नानाचा कांटा अजिबात काढून टाकण्याचा इंग्रजांनीं विचार चालविला. पण सखाराम बापूच्या मध्यस्थीनें नाना व मोरोबा यांचा समेट होऊन मोरोबाला अखत्यारी मिळाल्याचें ऐकतांच इंग्रजांचा हिरमोड झाला. मोरोबानें नानाला थोडातरी अधिकार शिल्लक ठेविला व कारभारी मंडळांत नानाचें स्थान कायम ठेविलें ही गोष्ट इंग्रजांचा वकील मॉस्टीन याला फारच झोंवली. अशा रीतीनें मोरोबाचें काम होतांच तो आतां इंग्रजांना कशाला विचारतो असे मॉस्टीनला वाटलें व इंग्रजांनीं नानास चिरडून टाकण्याकरितां उभारलेला डाव फुकट गेला. हें पाहून इंग्रजांना फार वाईट वाटलें. पण बापूच्या मध्यस्थीनें झालेला मोरोबाचा व नानाचा समेट फार दिवस टिकणें शक्य नव्हते, आणि मोरोबाला जेव्हां असें वाटूं लागलें कीं आतां इंग्रजांच्या मदतीनें दादाला आणण्या खेरीज गत्यंतर नाहीं तेव्हां त्यानें पुन्हां इंग्रजाशीं कारस्थान सुरूं केलें. पण इंग्रजां-नीहि या वेळेला फारच ताणून धरलें. लढाईच्या खर्चास ३६ लाख रुपये द्यावे व वसई परगण्यालगतचा मुलुख द्यावा. शिवाय सखाराम बापूनें

रीतसर आमंत्रण देऊन आम्हांस दादाची स्थापना पुण्यास करण्याकरितां बोलवावें असें इंग्रजांचें म्हणणें होतें. या म्हणण्याला सखारामबापू मुळींच तयार नव्हता तें लिहून आमंत्रण देण्यास तयार नाहींत असे दिसतांच सारे राजकारण एकदम बिघडलें. दादाची स्वारी साष्टीहून निघाली लवकरच पुण्यास प्रवेश करणार वगैरे अफवा पुण्यांत उठल्या होत्या त्या आतां आपोआपच बंद झाल्या. सखाराम बापूनें लेखी आमंत्रण नाकारल्याची हकीगत मॉस्टीन यानें मुंबईच्या गव्हर्नरास कळविली व असेंहि आणखी कळविलें कीं मोरोबा बापु व नाना हे सर्व लवाड कारस्थानी आहेत त्यावर विश्वास ठेविण्यांत अर्थ नाहीं. हा खलीता मुंबईचा गव्हर्नर व त्याचें कौन्सील यांपुढें येतांच त्यांचा मराठ्यांवर मोठाच घुस्सा झाला. त्यांनीं आपल्या वकीला मार्फत मराठ्यांस असें कळविण्याचें ठरविलें कीं पुरंदरच्या तहाच्या कलमांतील वादग्रस्त मुद्यांचा निकाल मराठे तात्काळ लावितात कीं नाहीं हें त्यांस विचारावें व ते न लावित असल्यास इंग्रज सरकारनें मराठी राज्या विरुद्ध लढाई सुरू केली आहे असें समजून चालावें. परंतु इतक्या थरावर गोष्टी येई पर्यन्त सन १७७८ चा मे महिना संपत आल्यामुळें इंग्रजांचा हा दम पोकळ होतां हे नाना पक्कें ओळखून होता. कारण पावसाळ्यांत इंग्रज कांहीं करणें शक्य नव्हतें आणि म्हणून नानानें इंग्रजांच्या या दमाला मुळींच भीक घातली नाहीं. नानानें या कारस्थानांत दाखविलेलें चातुर्य, धाडस व बुद्धीमत्ता ही अवर्णनीय होती यांत शंका नाहीं. मोरोबा, होळकर, सखाराम बापू चिंतो विठ्ठल वगैरे लोकांशीं गोडीगुलाबीनें वागावयाचें व त्याचवेळीं त्यांना उलथून पाडण्याकरितां गुप्त कारस्थान चालवावयाचें या गोष्टी किती कठीण हें सांगावयास नकोच. मोंगल, भोसले, शिंदे, फडके, पटवर्धन वगैरे लांब असलेल्या सरदारांस मोरोबा विरूद्ध उभे करण्याचें काम नानाला निरोपा निरोपीं करावें लागत होतें. कारण चिठ्ठीचपाटी पकडली जाण्याचा संभव, व तसें झालें म्हणजे सर्वच गोंधळ व्हावयाचा. नानाच्या या प्रसंगांतील वागणूकी संबंधानें खरेशास्त्री खालील प्रमाणें लिहीतात. " दारूखान्यांत उभें राहून

कोलितांचे खेळ खेळण्याचा त्यांवर ( नानावर ) प्रसंग आला होता. जर कोठें एखादी ठिणगी पडली तर सर्वस्वानिशीं प्राणांचा होम होण्यास उशीर नव्हता. पण हा खेळ ते धारिष्टानें कौशल्यानें व सावधपणानें खुशाल खेळत होते " ( अ. यो. पा. ९३ ) बापूनें इंग्रजांना लेखी आमंत्रण देण्याचें नाकारून त्यांना तोंडघशीं पाडलें पण त्यामुळें मोरोबाच्या कारस्थानावर जो परिणाम झाला तो बापूला अनिष्ट असाच झाला. कारण इंग्रज येत नाहींत म्हणजे दादा येत नाहीं आणि म्हणूनच नानाची बाजूच यांत शेर झाली. नानाला खालीं पाडण्याचा जो बापूचा व मोरोबाचा बेत तो साधत नाहींसें झालें. शिवाय मोरोबाशीं संगनमत केल्या पासून बापूला मोरोबाचा जो अनुभव आला त्यापासून मोरोबाविषयीं बापूचेंहि मन विटत चाललें होतें. कारण मोरोबाचा उल्लु व शिरजोर स्वभाव बापूलाहि मानवण्याजोगा नव्हता. अशा स्थितींत मोरोबाचा नाद यापुढें ठेवण्यांत शहाणपणा नाहीं असें वाटून बापूनें नानाशीं मैत्री जोडण्याचा उद्योग आरंभिला व भिवराव पानशे याचे मार्फत त्यानें नानाशीं बोलणें सुरू केलें. बापू व मोरोबा यांचे फार दिवस जमणार नाहीं असा नानाचा अंदाज होताच आणि त्याप्रमाणेंच घडून आल्यावर नानानें बापूचे मैत्रींचें बोलणें एकदम मान्य केलें व बापूला एक मोठी मेजवानी देऊन आपलें मन साफ आहे हें त्याच्या नजरेस आणिलें. सखारामबापू व नाना यांचे ऐक्य झाल्यामुळें मोरोबाच्या कारस्थानांतला एक मोठाच दुवा निसटला व त्यामुळें मोरोबाचें अवसान जात चाललें. नाना, हरिपंत, परशुरामभाऊ व महादजी अशा प्रमुख लोकांस नामोहरम करून मोरोबाला आपलें कारस्थान टिकवावयाचें होतें. या कामांत सखाराम बापूचा त्याला मोठाच आधार होता. पण इंग्रजांना लेखी आमंत्रण देण्याचें नाकारून व नानाशीं मैत्री जोडून बापूनें मोरोबाला तोंडघशीं पाडलें, व व त्यामुळें मोरोबाची कामगिरी अर्थातच जास्त कठीण झाली. नाना, हरिपंत व परशुरामभाऊ यांना फंदफितूरीच्या जोरावर आपण वठणीस आणूं असें मोरोबाला वाटत होतें. पण महादजीशीं मात्र त्याची कांहींच मात्रा चालण्यासारखी नव्हती. महादजी हा फौजबंद, मर्द व मसलती

होता. बाळाराव गोविंद, राणेखानभाई, हरी बाबाजी, इंगळे, कदम वगैरे त्याचे सरदार धन्याशीं एकनिष्ट होते. अशा माणसाशीं प्रसंग हें मोरोबाला मोठें संकटच वाटत होतें. तथापि नानाची बाजू महादजीनें घेतल्यामुळें त्याचाहि कांटा काढलाच पाहिजे हा मोरोबाचा ठाम निश्चय होता. शिवाय होळकरास निरोप पाठवून त्याला मोरोबाच्या कारस्थानांतून फोडण्याचा उद्योग महादजीनें मार्च सन १७७८ मध्यें केला होता. त्याचा मोरोबाला फारच राग आला होता. महादजी यावेळीं करवीरकरांच्या मोहिमेवर होता. करवीरकरांनीं शिंद्यास वीस लाख रुपये देण्याचे कबूल करून तह ठरविला होता. मोरोबाला ही बातमी लागतांच त्यानें करवीरकरांस कळविलें कीं शिंद्याशीं तूर्त तह करूं नये. तुमची कुमक करण्यास मी तयार आहे. करवीरकरांस हें बोलणें खरें वाटलें कारण पुण्याच्या दरबारांत मोरोबाचा बोलबाला आणि नानाची पिछेहाट या गोष्टी करवीरकरांच्या कानावर गेल्या होत्या. शिवाय इंग्रजहि मोरोबाला मदत करण्याकरितां पुण्यास येणार हे करवीरकरांनीं ऐकिलें होतें. अशा स्थितींत शिंद्याशीं केलेला तह मोडणेंच बरें असें वाटून करवीरकरांनीं तह मोडून लढाई सुरूं केली. तह मोडल्याचें समजतांच महादजीनें करवीरकरांवर असा निकराचा तोफांचा मारा सुरू केला कीं करवीरकर महाराज पूर्वीचा तह कायम करून लढाई बंद करण्यास तत्काळ तयार झाले. करवीरकरांची मसलत फसल्याचें पाहतांच मोरोबानें महादजीची खोड मोडण्यास दुसरी एक युक्ति योजली. महादजीचा एक भाऊबंद मानाजी फांकडे ( शिंदे ) हा हैदरअल्लीकडे पळून गेला होता. त्याला पत्र पाठवून मोरोबानें पुण्यास बोलाविलें, व त्याला शिंद्याची सरदारी देण्याचें कबूल केलें. महादजीला दुसरा एक भाऊबंद उभा करून कलह लावून द्यावा असा मोरोबाचा हेतु होता. पण महादजीचें सूत्र हैदरअल्लीकडेहि चांगलेंच असल्यामुळें हैदराकडे पत्र व्यवहार करून मानाजीला तिकडेच पकडण्याची महादजीनें व्यवस्था केली. अशा रीतीनें मोरोबाची दुसरी मसलतहि फुकट गेली. या प्रसंगीं महादजीनें मात्र नानाची बाजू राखून मराठी राज्याची योग्य सेवा केली

हें त्यास भूषणावह आहे. महादजीचा स्वभाव खोल व मतलबी होता त्यामुळें महादजी काय करील आणि काय करणार नाहीं याचा कोणासच थांग लागत नसे. निदान पटवर्धनांची तरी अशी समजूत होती. गंगाधरराव पटवर्धन या संबंधानें लिहितात. " शिंदे श्रीमंत राजश्री बापू व नाना याच्या पुरते लक्षांत असल्यास मग चिंता नाहीं होळकरासुद्धां सर्वांस गुंडाळून ठेवतील. परंतु एकतंत्री राहतील कीं काय पहावें ( कारभाऱ्यांनीं ) जहागीर व किल्ला देऊं केला आहे त्यावरून मात्र भरवसा वाटतो " ( अ. यो. पा. ९९ ) मराठी राज्याची सेवा करितांना वेळीं अवेळीं महादजीनें जादा जहागिरीचा आग्रह धरला हें खरें असलें तरी अशी जहागिरी त्याला मोरोबानेंहि दिली असती. पण मोरोबाचें न ऐकतां त्यानें नानाचीच बाजू घेतली यांत राज्यांचें कल्याण कशांत आहे हें तो बरोबर जाणत होता यांत शंका नाहीं. शिंद्याची करवीर करांवरची मोहीम चालू असतांना हरिपंत व परशुराम भाऊ हे विजापूर पंढरपुराकडे फिरत होते. त्यांच्या जवळ सुमारें १५।२० हजार फौज होती. शिंदे करवीरची मोहीम आटोपून परत फिरले ते सन १७७८ मे च्या अखेर लोणंद येथें येऊन पोहचले. फडके पटवर्धनहि पूर्वसंकेताप्रमाणें त्यांना येऊन मिळाले शिंदे लोणंद येथें आल्यावर सखारामबापूनीं त्यांच्या भेटीस जाण्याचा बेत केला होता. परंतु बापू शिंद्यास आगाऊच भेटून काय सांगतील न कळे अशी शंका मोरोबास आल्यामुळें मोरोबानें बापूस शिंद्याचे भेटीस जाऊं दिलें नाहीं. उलट त्यास असें सांगितलें कीं तुम्ही व आम्ही मिळून शिंद्याच्या भेटीस जाऊं. हें म्हणणें बापूनें मान्य केलें. मोरोबा शिंद्याच्या भेटीस निघाला होता, पण इकडे त्यानें इंग्रजांस व दादासाहेबांस बोलावण्याची तयारी चालविली होती. व त्या कामगिरीवर त्यानें चिंतो विठ्ठल यास तांतडीनें मुंबईस पाठविलें होतें. ह्या हकीगती शिंद्याच्या कानावर आल्याच होत्या. अर्थातच मोरोबाची भेट घ्यावयाची नाहीं असे शिंद्यानें नक्की ठरविलें होतें. बापू व मोरोबा शिंद्याला भेटण्याकरितां परिंच्या पर्यंत आले व शिंदे कदाचित् जेजूरीस जाऊं लागतील तेव्हां वाटें-

होता. बाळाराव गोविंद, राणेखानभाई, हरी बाबाजी, इंगळे, कदम वगैरे त्याचे सरदार धन्याशीं एकनिष्ट होते. अशा माणसाशीं प्रसंग हें मोरोबाला मोठें संकटच वाटत होतें. तथापि नानाची बाजू महादजीनें घेतल्यामुळें त्याचाहि कांटा काढलाच पाहिजे हा मोरोबाचा ठाम निश्चय होता. शिवाय होळकरास निरोप पाठवून त्याला मोरोबाच्या कारस्थानांतून फोडण्याचा उद्योग महादजीनें मार्च सन १७७८ मध्यें केला होता. त्याचा मोरोबाला फारच राग आला होता. महादजी यावेळीं करवीरकरांच्या मोहिमेवर होता. करवीरकरांनीं शिंद्यास वीस लाख रुपये देण्याचे कबूल करून तह ठरविला होता. मोरोबाला ही बातमी लागतांच त्यानें करवीरकरांस कळविलें कीं शिंद्याशीं तूर्त तह करूं नये. तुमची कुमक करण्यास मी तयार आहे. करवीरकरांस हें बोलणें खरें वाटें कारण पुण्याच्या दरबारांत मोरोबाचा बोलबाला आणि नानाची पिछेहाट या गोष्टी करवीरकरांच्या कानावर गेल्या होत्या. शिवाय इंग्रजहि मोरोबाला मदत करण्याकरितां पुण्यास येणार हे करवीरकरांनीं ऐकिलें होतें. अशा स्थितींत शिंद्याशीं केलेला तह मोडणेंच बरें असें वाटून करवीरकरांनीं तह मोडून लढाई सुरूं केली. तह मोडल्याचें समजतांच महादजीनें करवीरकरांवर असा निकराचा तोफांचा मारा सुरू केला कीं करवीरकर महाराज पूर्वीचा तह कायम करून लढाई बंद करण्यास तत्काळ तयार झाले. करवीरकरांची मसलत फसल्याचें पाहतांच मोरोबानें महादजीची खोड मोडण्यास दुसरी एक युक्ति योजली. महादजीचा एक भाऊबंद मानाजी फांकडे ( शिंदे ) हा हैदरअल्लीकडे पळून गेला होता. त्याला पत्र पाठवून मोरोबानें पुण्यास बोलाविलें, व त्याला शिंद्याची सरदारी देण्याचें कबूल केलें. महादजीला दुसरा एक भाऊबंद उभा करून कलह लावून द्यावा असा मोरोबाचा हेतु होता. पण महादजीचें सूत्र हैदरअल्लीकडेहि चांगलेंच असल्यामुळें हैदराकडे पत्र व्यवहार करून मानाजीला तिकडेच पकडण्याची महादजीनें व्यवस्था केली. अशा रीतीनें मोरोबाची दुसरी मसलतहि फुकट गेली. या प्रसंगीं महादजीनें मात्र नानाची बाजू राखून मराठी राज्याची योग्य सेवा केली

हें त्यास भूषणावह आहे. महादजीचा स्वभाव खोल व मतलबी होता त्यामुळें महादजी काय करील आणि काय करणार नाहीं याचा कोणासच थांग लागत नसे. निदान पटवर्धनांची तरी अशी समजूत होती. गंगाधरराव पटवर्धन या संबंधानें लिहितात. " शिंदे श्रीमंत राजश्री बापू व नाना याच्या पुरते लक्षांत असल्यास मग चिंता नाहीं होळकरासुद्धां सर्वांस गुंडाळून ठेवतील. परंतु एकतंत्री राहतील कीं काय पहावें ( कारभाऱ्यांनीं ) जहागीर व किल्ला देऊं केला आहे त्यावरून मात्र भरवसा वाटतो " ( अ. यो. पा. ९९ ) मराठी राज्याची सेवा करितांना वेळीं अवेळीं महादजीनें जादा जहागिरीचा आग्रह धरला हें खरें असलें तरी अशी जहागिरी त्याला मोरोबानेंहि दिली असती. पण मोरोबाचें न ऐकतां त्यानें नानाचीच बाजू घेतली यांत राज्यांचें कल्याण कशांत आहे हें तो बरोबर जाणत होता यांत शंका नाहीं. शिंद्याची करवीर करांवरची मोहीम चालू असतांना हरिपंत व परशुराम भाऊ हे विजापूर-पंढरपुराकडे फिरत होते. त्यांच्या जवळ सुमारें १५।२० हजार फौज होती. शिंदे करवीरची मोहीम आटोपून परत फिरले ते सन १७७८ मे-च्या अखेर लोणंद येथें येऊन पोहचले. फडके पटवर्धनहि पूर्वसंकेताप्रमाणें त्यांना येऊन मिळाले शिंदे लोणंद येथें आल्यावर सखारामबापूनीं त्यांच्या भेटीस जाण्याचा बेत केला होता. परंतु बापू शिंद्यास आगाऊच भेटून काय सांगतील न कळे अशी शंका मोरोबास आल्यामुळें मोरोबानें बापूस शिंद्याचे भेटीस जाऊं दिलें नाहीं. उलट त्यास असें सांगितलें कीं तुम्ही व आम्ही मिळून शिंद्याच्या भेटीस जाऊं. हें म्हणणें बापूनें मान्य केलें. मोरोबा शिंद्याच्या भेटीस निघाला होता, पण इकडे त्यानें इंग्रजांस व दादासाहेबांस बोलावण्याची तयारी चालविली होती. व त्या कामगिरीवर त्यानें चिंतो विठ्ठल यास तांतडीनें मुंबईस पाठविलें होतें. ह्या हकीगती शिंद्याच्या कानावर आल्याच होत्या. अर्थातच मोरोबाची भेट घ्यावयाची नाहीं असे शिंद्यानें नक्की ठरविलें होतें. बापू व मोरोबा शिंद्याला भेटण्याकरितां परिंच्या पर्यंत आले व शिंदे कदाचित् जेजूरीस जाऊं लागतील तेव्हां वाटें-

तच त्यांना भेटावें असा बापू मोरोबाचा बेत होता. पण मोरोबाची भेट घ्यावयाची नाहीं असें शिंद्यानें नक्की ठरविलें असल्यामुळें ते जेजूरीस न जातां मोरगांवच्या मुक्कामास आले. शिंद्यांच्या या हालचालीवरून मोरोबा मनांत समजला कीं शिंदे आपली भेट घेण्यास तयार नाहींत. मोरोबाचा या गोष्टीमुळें फार हिरमोड झाला व तो जास्त लगट करीत न बसतां आपल्या मंडळीसह परत फिरला. मोरोबा परत फिरला तरी बापूनें अजून आशा सोडली नव्हती. शिंदे आपली भेट नक्की घेतील अशी त्याची खात्री होती, म्हणून तो शिंद्यास भेटण्याकरितां ५-६-१७७८ रोजीं मोरगांवास आला. बापूनें मोरोबालाहि असें आश्वासन दिलें होतें कीं त्याची व शिंद्याची भेट मी करून देईन. मोरगांवास आल्यावर बापू शिंद्यास भेटला व झालेल्या सर्व हकीगतीबद्दल शिंद्याजवळ दुःख प्रदर्शित करून शिंद्यांची क्षमा मागितली. शिंद्यानें बापूला सर्व गुन्हे माफ केले. हरीपंत व परशुरामभाऊ यांच्या मनांत आपल्या विषयीं वांकडे आहे तरी त्यांचीहि गोडी करून द्यावी अशी शिंद्याला बापूनें विनंती केली. तीहि शिंद्यानें मान्य केली. इतकें झाल्यावर बापूनें शिंद्याला सांगितलें कीं या गोंधळांतून कांहीं तरी तडजोडीचा मार्ग काढणें जरूर आहे. तेंहि शिंद्यानें मान्य केलें आणि हरीपंत व परशुरामभाऊ यांची व बापूची भेट करवून दिली. हरीपंताच्या भेटींत बापूनें त्याला सांगितलें कीं होळकर व शिंदे यांमधें कांहीं बेबनाव झाला आहे त्या संबंधानें कांहीं तडजोड झाली तर खटपट करण्याचा विचार आहे. हरीपंताला हें सांगण्यांत बापूनें असा पोक्त आविर्भाव आणला कीं जणूं काय मोरोबाच्या या कारस्थानांत आपला कांहीं संबंधच नाहीं. शेवटीं बापूनें शिंद्यांस अशी भीड घातली कीं त्यानें मोरोबाची भेट घ्यावी. शिंद्यानें ही गोष्ट कबूल केली व नाझरें मुक्कामी बापूच्या डेऱ्यास येऊन मोरोबाची भेट घेण्याचें ठरलें मोरोबा तीन हजार फौजेसह शिंद्याच्या भेटीस आला. मोरोबा मुख्य कारभारी तेव्हां शिंद्यानीं पुढें सामोरें जाऊन भेट घ्यावी तें न करतां डेऱ्यांतच उभ्या उभ्यांनीं भेट घेतली व एक शद्बहि न बोलतां शिंदे मोरगावास परत आले. शिंद्यानें ज्या प्रकारें मोरोबाची भेट घेतली त्यावरून मोरोबा व त्याच्या पक्षाचे सर्व लोक समजून चुकलें कीं शिंदे

मोरोबाचें पारिपत्य केल्याशिवाय रहात नाहींत. शिंद्यानीं मात्र या बाबतींत काय धोरण स्वीकारणार याचा मागमूसहि लागूं दिला नाहीं. हरिपंत फडके व परशुरामभाऊ यांचा विचार असा होता कीं आपण सर्व शिंद्यासुद्धां जवळ जवळ चाळीस हजार फौजेसह आहों. मोरोबा होळकर वगैरे सोळा हजार आहेत. अशा स्थितींत एकदम हल्ला करून मोरोबाचें खूळ तात्काळ मोडून टाकावें. पण शिंद्यास हें मत मान्य नव्हतें. कारण बापूचें व त्याचें या बाबतींत कांहीं तरी तडजोडी संबंधानें बोलणें झालें होतें. परशुरामभाऊ या बाबतींत लिहितात "आम्ही विशेष बोलणें तर खर्चाच्या अडचणी हें बाह्यातकारी आंतील बापूचें बोलणें झालें हें भाव. तेव्हां आम्हीं आग्रह धरून फल काय ? आणि शिंद्याशी आमचे गुजारतीचें राजकारणही नव्हे, परभारें नानानीं केलें, आम्ही आग्रह कशास धरावा" (अ. यो. पा. १०२) तात्काळ हल्ला करण्याचा बेत रद्द झाल्यावर शिंदे, फडके, पटवर्धन वगैरे सर्व मंडळी ता. ८ जून १७७८ रोजीं पुरंदराखालीं श्रीमंतांच्या भेटीस आली. त्या भेटीची हकीगत परशुराम भाऊंनीं खालील प्रमाणें लिहिली आहे. "राजश्री नाना नारायण देवळाजवळ भेटावयास किल्यावरून खालीं आले. तमाम लहान मोठ्या सरदारांच्या भेटी जाहाल्या. श्रीमंतांचे डेरे किल्या खालीं दिले होते तेथें श्रीमंत होते. लोकांच्या भेटीचा समारंभ उरकून खासे स्वारी श्रीमंतांच्या भेटीस गेले तरी चार घटका श्रीमंत डेऱ्यांत बसून मुजरा लोकांचा घेऊन विडे दिले. धनीयाचे पाय पाहिले आनंद झाला तो कोठवर लिहावा ! लोक कसाला सोसून आले. श्रीमंतांस पाहून बहूत संतोष झाला. श्रीमंताची बसावयाची व बोलावयाची व देखणें-पणाची तारीफ काय लिहावी ! अती उत्तम आहे ! भेट झाल्यावर तोफांची सरबती खालीं व किल्यावर झाली. श्रीमंत चारपांच घटका दिवस अस्त मानास राहिल्यानंतर किल्लेवर गेले. राजश्री बापूंची भेट श्रीमंताजवळ झाली. कारभारी या जवळ बसून चार घटका बोलोन राजश्री हरीपंत तात्या व पाटील बावा व आम्ही निघोन सहा घटका रात्रीस गोटास आलो. श्रीमंताची बाललीला काय लिहावी ! केवळ ईश्वर स्वरूपी आहेत"

( अ. यो. पा. १०२ याच भेटीचे आणखी वर्णन परशुरामभाऊंनीं दुसऱ्या एका पत्रांत खालील प्रमाणें केलें आहे. " अर्धघटका नानाचें व आमचें बोलणें झालें. शिद्याचें व बापूचें कांहीं वेळ. शिद्याचें व नानाचें बोलणें घटकाभर झालें. मग शिंदे नाना व बापू असे मिळून बोलणें झालें. त्यांतील अर्थ पाहतां जांबुवंत यांचे मतें आपले मंडळीचें संरक्षण करावें. शिद्यांची व होळकरांची भेट करावी. मग नानांनीं कारभार करावा. मोरोबाचें चित्तास येईल तें करावें. म्हणजे आमची ( कोकण्यांची ) बोटें आमच्याच डोळ्यांत घालावीं. उपरांतिक आमचें नानाचे तात्यासुद्धां बोलणें झालें. त्यातील निश्चय नानांनीं शिद्याच्या लष्करांत यावें खडखडीत बोलावें व मग ठरेल तें खरें. शिद्याचे बोलण्यांतहि बोलण्यास लांब पडते. बापू व तुम्ही आम्ही बसून निश्चय करावा. त्यावरून आज नानांनीं येथें यावेसें ठरलें आहे. फल कांहीं चांगलें दिसत नाहीं. काल बुडता आला. शिंदे होळकर उभयतां सरदार. त्यांत खुद्द शिद्या जवळ फौज भारी. आमचीहि हुजरांतसुद्धां बारातेरा हजार फौज शिवाय नानाजवळ पांच हजार लोक. कमपेश चाळीस हजार फौज, गारदी तोफखाना उभयपक्षींचा म्हणतां मातबर सरंजाम. तिकडील होळकर सुद्धां सोळा पंधरा हजारांचा अजमास. याप्रमाणें फौजा आहेत. परंतु कार्य दिसत नाहीं. आंत आंत मनस्वी राजकारणें ! कोणाचाहि विश्वास येत नाहीं ! आणशपथेंत ताल कांहीं राहिला नाहीं ! चिंतो विठ्ठल श्रीमंताकडे मुंबईस गेलेच आहेत. मोरोबादादा आणखीं फौज ठेवीतच आहेत. जांबुवंताचे मतें बजाबा आदिकरून आणखी मंडळी तिकडे मिळाली आहे तिचें संरक्षण करावें. मग मोरोबा आदिकरून कोकण्यांचें चित्तास येईल तें करावें. इतक्यांत श्रीमंत ( मुंबईहून ) येतांत कीं काय पहावें. बापूच्या मनांत आमच्या व हरीपंताच्याविषयीं वांकडे फार आहे. असो ! श्रीमंताचें पुण्यप्रतापें करून आम्हीं निष्ठेनें सेवा केली आहे. बापूशीं चहूपांच वर्षांत कांहीं वांकडे केलें नाहीं, त्यापक्षीं चिंता नाहीं, त्यांची कर्में त्यांस जाचून याचा प्रतिकार करतील " ( अ. यो. पा. १०३ ) वरील हकीगती वरून पुण्याच्या दरबारांत केव्हढी बजबजपुरी माजली होती हें कळून येईल. ही

सं. न. ........

बजबजपुरी मोडण्याचें काम शिंद्यानें तात्काळ हातीं घेतलें व प्रतिस्पर्धी नाना व बापू यांचा समेट करून दिला. हा समेट झाल्यानंतर ते दोघे ( नाना व बापू ) परशुरामभाऊकडे आले. त्या संबंधानें भाऊ खालील प्रमाणें लिहितात. "त्यानंतर नाना व बापू उभयतां मिळून सायंकाळच्या चार घटका दिवस राहतां आम्हाकडे आले. वृद्धांस आमचा संशय होता. बोलणें दोन घटका जाहले. ( आम्हीं म्हणालो कीं आपण ) उभयतां एक झाले. श्रीमंताच्या पायाशीं निष्ठेनें वर्तणूक करणार त्यापक्षीं आमचा दुसरा अर्थ नाहीं. म्हणोन आम्ही वचन दिलें. त्यांनीं बेलभंडार दिला. आम्हीही दिला." ( अ. यो. पा. १०४ ) नाना बापू व परशराम-भाऊ यांची एक वाक्यता झाल्यावर शिंद्यानें होळकराचा प्रश्न हातीं घेतला. होळकरानें "वृद्धानी आम्हास फसविलें" असें आपल्या वर्तनाचें समर्थन केलें व आतां शिंदे सांगतील त्याप्रमाणें वागण्यास आपण तयार असल्याचें सांगितलें. मोरोबाची समजावीशी शिंद्यानें करून द्यावी असा आग्रह होळकरानें धरिला होता, पण मोरोबाच्या प्रकरणांत तुम्ही पडूं नये त्याचा विचार स्वतंत्र होईल असें शिंद्यानें सांगितल्यावरून होळकराचें समाधान झालें व मोरोबाला सोडून तो आपल्या फौजेनिशीं सासवडाजवळ येऊन उतरला. मोरोबाचा सगळा जोर होळकराच्या फौजेवर होता व होळकरा-जवळ १६ हजार फौज असून तीं चांगली कणखर होती. अशा सरदाराचा आश्रय जातांच मोरोबाच्या तोंडचें पाणी पळालें व तो आतां कसें तरी करून नानाजवळ मिळतें घेण्याचा उद्योग करूं लागला. तुम्ही आम्हीं मिळून कारभार करावा व सखाराम बापूला अजीबात कारभारांतून काढून लावावा असा मोरोबाचा बेत होता. पण नानानें तो ऐकिला नाहीं. नंतर त्यानें बापू नाना व आपण असा त्रिवर्गानें कारभार करावा असेंहि बोलणें लाविलें पण तेंही मान्य झालें नाहीं. शेवटीं शिवनेरी किल्ला, जरीपटका व शिक्का कट्यार एवढें तरी माझ्याकडे ठेवावे असें बोलणें घातलें. पण पडत्या माणसाला विचारतो कोण ? हेंहि त्याचे बोलणें नानानें मान्य केलें नाहीं. सरकारचा मानमरातब व सरंजाम कांहींहि तुम्हाकडे राहणार नाहीं,

सर्व आमचे हवाली करून व तुमच्याजवळ जी काय थोडी बहुत फौज असेल तिला निरोप देऊन तुम्ही भीमातीरी जाऊन रहावें. तुम्हांवर सरकारची चौकी राहील असा नानानें स्पष्ट व खडखडीत जबाब दिल्यावर मोरोबाला आपली काय किंमत हें कळून चुकलें. पण यावरून त्यानें शहाणपणाचा कांहींच बोध घेतला नाहीं. उलट वीरश्रीचा फुसका आव आणून "माझी समजूत काढा. नाहींतर मरून जाईन पण शिक्के कटचार व जरीपटका देणार नाहीं असा नानाला उलट निरोप पाठविला. बजाबा-पुरंदरे, पांडुरंगराव बारामतीकर वगैरेनींहि मोरोबास या बाबतींत दुजोरा दिला. मरून गेलो तरी बेहेत्तर पण नानापुढें मान वाकविणार नाहीं असें या त्रिवर्गाचें म्हणणें होतें. ज्यानीं जन्मास आल्या तागायत कधींच लढाई पाहिलेली नव्हती अशा या सुखवस्तु त्रिवर्ग मुत्सद्यानीं शिपाईगिरीची ऐट आणलेली ऐकतांच शिंदे, फडके पटवर्धन या सारख्या रणवीरांना थोडावेळ करमणूक झाली असेल यांत शंका नाहीं. आपल्या प्रमाणेंच आपले फौजेंतील लोक मरणास तयार आहेत कीं नाहीं हें पाहण्या करीतां मोरोबानें एक जेवण समारंभ केला. "आपले मरणाचे सोबती असतील त्यानीच मात्र जेवणास यावे" अशी जेवणाची अट होती. हा हास्यास्पद उद्योग पाहून परशुरामभाऊ विनोदानें लिहीतात "हजार बाराशें पात्र भोजनास झाले. मग किती मरतात. पहावें" मोरोबानें एका बाजूनें लढाईचा आविर्भाव दाखविला आणि दुसऱ्या बाजूनें त्यानें मुंबईकर इंग्रज आणि हैदरअल्ली यांच्याशींहि सगनमत चालू ठेविलें होतें. नानाला या बातम्या होत्याच. त्यामुळें त्यांनीं हरीपंत व परशुरामभाऊ यांस मोरोबाचा गोट लुटण्यास सांगितलें. मोरोबाच्या गोटावर फडके पटवर्धन चालून जातांच मोरोबा गर्भगळीत झाले, व त्यांनीं शिंद्याकडे निरोप पाठवून त्यास कळविलें कीं तुम्ही मध्यें पडून माझे प्राण वांचवा. नाना सांगतील त्याप्रमाणें वागण्यास मी तयार आहे. असें होतांच शिंद्यांनीं नानाला निरोप पाठविला कीं मोरोबा तुमच्या म्हणण्या प्रमाणें फौजेला निरोप देऊन जरीपटका तुमच्या स्वाधीन करतील, तरी तुम्ही सबूरी करावी. मध्यंतरी मोरोबा पळून गेल्यास

त्याची जबाबदारी आम्हांकडे लागली. पण फडके पटवर्धनांना मोरोबाचा विश्वास येईना. तेव्हां शिंद्यानें हजार बाराशें निवडक लोक देऊन त्याचे दिवाण बाळाराव गोविंद व नारो गणेश यांस मोरोबाचे डेऱ्या भोंवतीं चौकीस बसविलें. इतके झाल्यावर हरीपंत व परशुरामभाऊ आपल्या फौजेसह गोटास परत आले. भाऊ लिहीतात. " सरकारची फौज चार घटका रात्रीस गोटास आली बारा घटका रात्रीस भोजन जाहलें. सोमवार प्रदोषाचे दिवशीं इतका प्रकार झाला. " मोरोबाचें गोटावर प्रत्यक्ष शिंद्यानेच चौकी पहारा बसविल्यावर मोरोबाचे उपाय थकले आणि ता. २० जून सन १७७८ ला त्यानें शिक्का कट्यार नानाचे स्वाधीन करून आपल्या फौजेस निरोप दिला व स्वारी एकदांची बहुल मुक्कामीं रहावयास गेली. तेथें गेल्यावरहि त्याची कारस्थानें बंद पडलीं नाहींत. तेव्हां नानानें त्याला गुळटेकडीवर बंदोबस्तानें ठेविलें. मोरोबाची कायमची रवानगी मिरजेस करावी असा नानाचा विचार होता. पण परशुरामभाऊनी ती गोष्ट साफ नाकारिली. कारण मोरोबाला तेथें ठेविल्यावर त्याच्यावर देखरेख करण्याचें काम आपोआपच पटवर्धनावर पडणार व तें करावयाचें म्हटल्यास आमच्या सर्व स्वाऱ्या शिकाऱ्या बंद पडतील असें भाऊंचें म्हणणें पडलें. भाऊंचा नकार येतांच नानाने मोरोबास नगरच्या किल्यावर रवाना केलें व तेथें ही स्वारी २२ वर्षे कैदेंत होती. अशा रीतीनें मोरोबाच्या या देश बुडव्या कारस्थानाचा शेवट झाला. मोरोबाचे बंड मोडल्यावर त्या बंडांत सामील असलेल्या लोकांना शिक्षा करण्याचें काम सुरू झालें. यांतील बरेच लोक होळकराच्या आश्रयानें राहिले होते. होळकर त्यांस सुखासमाधानानें सरकारच्या स्वाधीन करीना तेव्हां जबरदस्ती करण्याचा प्रसंग आला- या बाबतींत भाऊ लिहितात. " होळकरांकडील कारभारी राजश्री नारो गणेश यांनीं इतकें खूळ केले, त्यास पाठवून देणें म्हणून होळकरांस सांगून पाठविलें. ते सुप्रवर्तीनें पाठवीनात तेव्हां काल भृगुवारी शिंद्याच्या विचारे फौजेसहीत तयार होऊन होळकराचे गोटाजवळ गेलों. तेव्हां त्यासही समजलें कीं निकर्षाचा प्रकार

दिसतो. तेव्हां राजश्री महादजी शिंदे मध्यस्थ पडोन ज्यानी लबाडी केली त्यास धरून द्यावें व आपली निखालसता करून द्यावी " असें निक्षून सांगितलें. फौजहो उरावर उभी राहिली. तेव्हां नारोगणेश, गोपाळनाईक तांबवेकर, आपाजीपंत गोंधळेकर, कचोबा पाळंदे, बाळाजीपंत दामले, दादापंत वाघोलकर व बाबाजी जामदार निंबाळकर इतके लागलेच होळकरांनीं हातीं धरून दिले. ते सरकारांत आल्यावर फौज गोटास आली. इतकी असामी पहिल्या पासून खेळांतील, याजकरीतां साऱ्यास सरकारांत आणिले याजउपर शक्तिनुसार हिरण्यश्राद्ध होईल. " ( अ. यो. पा. १०८ ) होळकराला हे लोक सरकारच्या स्वाधीन करावे लागले यामुळे त्याचे मन जरा खट्टु झाले व आपला दिवाण नारो गणेश यालाहि स्वाधीन करावें लागल्यामुळें होळकराला थोडा अपमान झाल्यासारखें वाटलें. त्याचें समाधान करण्याकरितां नाना, बापू व शिंदे होळकराचे भेटीस गेले. भाऊ लिहितात. " हे त्रिवर्ग शिष्टाचार करून आले. " त्याचाच अर्थ असा कीं होळकराचे या शिष्टाचारानें समाधान झालें नाहीं. मोरोबाच्या बंडांत सामील झालेल्या लोकांना नानानें चांगलेंच प्रायश्चित दिलें. सर्वांपासून जबरदस्त दंड वसूल केले. परशुरामभाऊचें आजोळ खासगीवाल्याकडे होतें. त्यांच्यावरहि दंडाची पाळी आली. अर्थात भाऊंनीं रदबदली केली. या संबंधानें भाऊ लिहितात. " इष्टमित्र, शरीरसंबंधी श्रीमंताचेच अन्नानें वाढलेले, सेवा चाकरी न करतां घरी बसल्यासही लाख दोन लाख रुपयांचा सरंजाम खाऊन श्रीमंतांचे कल्याण चिंतून सुखी राहीनात ! खेळ चुकेनात. कारभारी आज पांच वर्षें सबूरी करीत आले. परिणाम नाहीं. तेव्हां राज्य कारभार करणाऱ्यास बंदोबस्त केल्या शिवाय उपाय नाहीं म्हणून कारभारी उभयतांनीं निष्ठूरता धरिली आहे. आम्ही समीप आहों म्हणून आप्त व स्नेहि यांची मुरवत पडते. तेव्हां सरकारांत जावें लागतें. बोलल्यासही आरोप न बोलल्यासही आरोप असें प्राप्त झालें आहे, उपाय नाहीं. " ( अ. यो. पा. १०९-११० ) भाऊंच्या रदबदलीमुळें खाजगीवाल्यांची कैद चुकली पण त्यांना दंड भरावा लागलाच. विनीवाले घायगुडे

यांसारखे लोक या फंदात सांपडले त्यावर दया करावी म्हणून भाऊनी फार खटपट केली. परंतु फंदफितुरी लोकांचा बीमोड करण्याचे नाना व शिंदे यांनीं मनावर घेतल्यामुळें भाऊंच्या प्रयत्नास फारसें यश आलें नाहीं. तात्पर्य मोरोबाच्या या खुळामुळें राज्यावर मोठें संकट आलें होतें हें खरें पण परिणामीं द्रव्य जमा करण्याचें तेंच एक उत्तम साधन होऊन बसलें व अशा रितीनें मोरोबाचें हें शिराळशेटीचें राज्य फार जणांस भोवलें यांत शंका नाहीं.

---

## प्रकरण ८ वें

# इंग्रजांचा रेंच मोडला

—००⁂००—

'इंग्रजांस धमक बरीच होती, परंतु त्यास आमच्या फौजेची कवाईत समजली' ( वामनराव पटवर्धन खरे ५–१४६४ )

नारायणरावाच्या खुनामुळें मराठी राज्यावर आलेलें मोठें संकट म्हणजे इंग्रजांचा मराठी राज्यांत प्रवेश हें होय. नारायणरावाचा खून झाल्यामुळें दादासाहेबांचें मोकाट सुटलेलें पिलुं एकदम इंग्रजांच्या तावडींत सापडलें व त्याला पुढें करून इंग्रजानीं मराठी राज्य गिळंकृत करण्याच्या आपल्या योजनेचा पहिला अंक सुरू केला. दादाला कबज्यांत घेण्याचा उद्योग हरिपंत सारखा करीतच होता पण ह्या उद्योगाला शिंदे होळकरांनीं हिसका दिल्यामुळें हरिपंताला यश आलें नाहीं, आणि दादानें याच परिस्थितीचा फायदा घेऊन एकदम इंग्रजांचा आश्रय केला. शिंदे होळकरांवर अवलंबून न रहातां हरिपंतानें आपल्याच हिमतीवर मही नदीच्या कांठीं दादाशीं गांठ घातली व १७७५ च्या फेब्रुवारी महिन्यांत दादाचा पूर्ण पराभव केला. या लढाईंत दादाच्या फौजेची दाणादाण झाल्यामुळें त्यानें एकदम सुरत गांठली आणि इंग्रजांचा आश्रय घेऊन पुन्हा पुण्यावर स्वारी करण्याचा उद्योग आरंभिला. सुरतेला दादासाहेब आपल्या पूर्ण कह्यांत आल्यावर इंग्रजांनीं त्याच्यापासून भरमसाट मागण्या मान्य करून घेऊन

त्याची तळी उचलण्याचें कार्य अंगावर घेतलें व कलकत्तेकर वरिष्ठ इंग्रजांच्या परवानगीचीहि वाट न पहातां एकदम मराठ्यांशीं युद्ध सुरू केलें. दादाला मदत करण्याकरितां इंग्रजांचा अधिकारी कर्नल कीटिंग हा इंग्रजी फौज घेऊन मुंबईहून सुरतेस आला. दादाची व इंग्रजांची फौज एकत्र होऊन ही सगळी फौज सुरतेहून खंबायतकडे वळली. या सर्व सरंजामानिशीं दादानीं एकदम पुण्यावर स्वारी करण्याचा बेत केला. इंग्रजांची ही मोहीम सुरू होण्यापूर्वीच शिंदे होळकर माळव्यांत निघून गेले होते. पण हरिपंतानें बिलकूल धीर सोडला नाहीं. फत्तेसिंग गायकवाडाला मिळवून घेऊन त्यानें इंग्रजांना तोंड देण्याचें ठरविलें. इंग्रजांची व हरिपंताची गांठ पडून पांच चार चांगल्याच चकमकी झाल्या. त्यांत इंग्रजांना मराठ्यांच्या कणखर वृत्तीचा चांगलाच अनुभव आला. या प्रसंगांत नापार ह्या ठिकाणीं झालेली लढाई चांगलीच हमरीतुमरीची झाली. ही लढाई १७७५ च्या मे महिन्यांत झाली. ह्या लढाईंत इंग्रजांचें फारच नुकसान झालें. इंग्रजांचे सुमारें चारशें लोक या लढाईंत मारले गेले. दोन्ही बाजूनीं लढाई जोरानें लढली गेली. ' मैदानांत गांठ पडती तग इंग्रजांचा फडशाच होता ' असें या लढाईचें वर्णन करतांना वामनराव पटवर्धनानें लिहिलें आहे. या प्रकरणाच्या आरंभीं जें वाक्य दिलें आहे तेंहि वामनराव पटवर्धनानें लिहिलेल्या या लढाईच्या वर्णनांतलेंच आहे. वामनराव पटवर्धन अभिमानानें लिहितात कीं ' इंग्रजास धमक बरीच होती परंतु त्यास आमच्या फौजेची कवाईत समजली. ' लढाईचा असा प्रकार झाल्यामुळें कर्नल कीटिंगचा थेट पुण्यावर चालून जाण्याचा बेत आपोआपच मावळला. शिवाय मे अखेर आल्यामुळें पावसाळा नजीकच आला तेव्हां इंग्रजांनीं भडोच येथें छावणी केली. हरिपंतानें थोडीशी फौज गुजराथच्या बंदोबस्तास ठेविली व तो खानदेशांत तळ देऊन राहिला. पावसाळा संपल्यानंतर पुन्हा इंग्रजांबरोबर लढाई सुरू करावयाची असें हरिपंतानें ठरविलें होतेंच. त्या प्रमाणें दसरा होतांच तो खानदेशांतून पुन्हा गुजराथकडे वळला. मराठ्यांचें धोरण निश्चित असून ते दादांचें पुरतें पारिपत्य केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाहींत हें इंग्रजानांहि कळून आलें.

अशा परिस्थितींत पूर्व अनुभव लक्षांत घेऊन पुन्हा मराठ्यांबरोबर लढाई सुरू ठेवावयाची कीं नाहीं हा इंग्रजांना विचारच पडला. मुंबईचे इंग्रज हे लढाई चालविण्यास तयार होते. पण कलकत्त्याच्या वरिष्ठ इंग्रजांनीं मराठ्यांचा ठाम निश्चय पाहून नानाबापूंकडे तहाचा संदर्भ लाविला. मुंबईचे इंग्रज हे आमच्या हाताखालचे आहेत त्यांनीं आमच्या परवानगी शिवाय लढाई चालू ठेविली आहे ती आम्ही मना केली आहे तरी तुम्हीहि मना करावी. तहाचे करारमदार ठरविण्याकरितां आम्ही आमचा वकील तुम्हाकडे लवकरच पाठवीत आहों. असें इंग्रजांचें बोलणें येतांच नानाबापूनींहि सारासार विचार करून लढाई बंद करण्याचें ठरविलें. इंग्रजानी कर्नल अपटन् नांवाचा आपला वकील पुरंदरास तह करण्याकरितां पाठविला. या वकीलाच्या व कारभाऱ्यांच्या अनेक बैठकी झाल्या या बैठकींचें मार्मिक वर्णन पुरुषोतमराव पटवर्धनानें लिहिलें आहे - त्यांत तो लिहितो "परंतु तो (इंग्रजांचा वकील) गवस गवसूं देत नाहीं व कारभारीहि त्यास गवस गवसूं देत नाहींत" कारभारीहि अक्कल हुशारीनें इंग्रजांना पुरून उरणारे आहेत हें या वाटाघाटींत इंग्रजांच्या अनुभवास आलें. लढाई सुरू करण्याचें कारण इंग्रजांच्या वकिलाला स्पष्ट करतां येईना. दादासाहेब राज्याचे मालक अशा समजुतीनें आम्ही लढाई सुरू केली असे इंग्रजांच्या वकीलानें म्हणतांच सवाई माधवरावाचा जन्म लढाई सुरू होण्याच्या आधीं दहा महिने झाला हे तुम्हांस माहीत नाहीं काय असें नानानें विचारलें तेव्हां कर्नल अप्टनची बोबडीच वळली व त्यानें लढाई सुरू करण्यांत इंग्रजांची चूक झाली ही गोष्ट कबूल केली. शेवटीं अनेक वाटाघाटी होऊन तारीख १-३-१७७६ रोजीं पेशवे व इंग्रज यांमध्यें पुरंदर मुक्कामीं तह झाला. साष्टी इंग्रजांस द्यावी तीन लक्षांचा मुलूख इंग्रजांस द्यावा, दादानें पेशव्यांच्या स्वाधीन होऊन कोपरगांवीं रहावे वगैरे अटी या तहांत होत्या. अशा रीतीनें इंग्रज मराठ्यांच्या युद्धांतील पहिल्या अंकाचा पडदा पडून तूर्त तरी युद्ध थांबल्या सारखेंच झाले. ( टीपः—पुरंदरच्या तहासंबंधानें विवेचन करतांना ग्रांटडफ् साहेबांनीं कर्नल अपटन् याच्या सरळ व नेमस्त स्वभावाबद्दल प्रशंसोग्दार काढून दक्षिणी ब्राह्मणांना कावेबाज म्हटलें आहे. डफ् साहेब म्हणातात.

" As Brahmins in politics misconstrue modoration and attribute concession solely to fear, they assumed a high tone of demand which Colonel Upton judging by himself believed to be firm and sincere. Colonel Upton's correspondence bears ample testimony of sincerity and moderation, but he was ill-qualified to conduct a negotiation with Maratha Brahmins. ' पुरंदरच्या तहामुळें इंग्रजांचें समाधान झालें नव्हतें. संधी साधेल तेव्हां पुन्हां मराठ्यांच्या राज्यांत हात घुसविण्याचा त्यांचा उद्योग सुरूच होता. तशांत नानानें फ्रेंचांशीं दोस्ती केल्याचा संशय इंग्रजांना आल्यामुळें कसेंहि करून नानाच्या हातचा कारभार काढण्याकरितां त्यांनीं नवीन उचापती सुरू केल्या. पुरंदरच्या तहाच्या अटी तुम्ही पाळा म्हणजे आम्ही पाळूं असें नानानें इंग्रजांस उत्तर दिलें होतें तें इंग्रजांच्या मनांत डांचत होतें. मोरोबा, चिंतोविठ्ठल, होळकर वगैरे नानाच्या विरुद्ध आहेत हें इंग्रजांस माहीत होतें. तेव्हां अशा आपसांत फाटाफूट असलेल्या लोकांना नुसता लढाईचा आव आणून आपण जाग्यावर बसवूं अशी इंग्रजांना घमेंड होती. मुंबईकर इंग्रजांच्या या मोहिमेला मदत म्हणून कलकत्त्याच्या इंग्रजांनीं बंगालचीं सहा पलटणें मदतीस पाठविण्याचें ठरविलें होतें. पण त्याच्या मदतीची वाट न पहाता मुंबईकरांनीं एकदम पुण्यावर स्वारी करण्याचें ठरविलें. या स्वारींत इंग्रजांजवळ चार हजार फौज होती. दादासाहेबाची स्वारी या फौजेबरोबर होती. त्याच्या बरोबर आणखी दोन हजार फौज होती, मिळून एकंदर सहा हजार फौजेनिशीं इंग्रज व दादा यांनीं मिळून मुंबईहून निघून बोरघाटापर्यंत मजल मारली.

मुंबईकरांचीं स्वारी पुण्यावर होणार ही बातमी नानाला होतीच. नानानेंहि इंग्रजांस तोंड देण्याकरितां शिंदे होळकरादि सर्व प्रमुख सरदारांच्या फौजा गोळा केल्या. मराठ्यांचें एकंदर चाळीस हजार सैन्य सिद्ध झालें. इंग्रजांचा तोफखान्यावर जोर मोठा यामुळें नानानेंहि तोफखान्याची

उत्तम तयारी केली व ती कामगिरी भीमराव पानसे याजकडे सोपविली. इंग्रजांचा सेनापति कॅप्टन् स्टुअर्ट हा आपल्या आघाडीच्या टोळीसह बोरघाट चढून वर आला. त्याला तोंड देण्याकरितां भीमराव पानसे तयारच होते. दोघांची गांठ पडून झगडा झगडी सुरू झाली. इतक्यांत रामचंद्र गणेश व बाजीपंतअण्णा हे तळेगांवास होते ते पानशांच्या मदतीस आले, तेव्हां इंग्रजांच्या मदतीसहि दादासाहेब सुद्धां सर्व लष्कर घाटावर आलें. इंग्रजांचें लष्कर वर आल्याची बातमी येतांच शिंदे होळकर तळेगांवच्या रोखें आले. इतकें होतें तों इंग्रजांनीं पानश्याशीं लढत लढत तळेगांवपर्यन्त मजल मारली. पण येथपर्यन्त मजल गाठतांना इंग्रजांना फारच वाईट अनुभव आला. पानशाचा निकराचा विरोध त्यांना सहन करावा लागला, शिवाय खंडाळ्याच्या घाटांत त्यांचा एक अधिकारी कर्नल के हा जखमी झाला व कारल्याच्या मुक्कामीं कॅप्टन् स्टुअर्ट हा तोफेचा गोळा लागून ठार झाला. आणखींहि इंग्रजांचे शें दोनशें नामी माणूस लढाईंत कामास आलें. ही हकिगत होई पर्यंत १७७९ चा जानेवारी महिना उजाडला. इंग्रज तळेगांवास येतांच त्यांना मराठ्यांच्या फौजेचें खरें स्वरूप कळलें. चिंतो-विठ्ठल दादा वगैरेनीं दिलेल्या आश्वासनाप्रमाणें कांहींच घडून आलें नाही. होळकर वगैरे आपणांस मिळतील अशी इंग्रजांस आशा होती. तें कांहींच न साधतां महादजी शिंदे व हरिपंत फडके यांच्या हाताखालीं प्रचंड मराठी सेना आपणास सामना देण्यास सिद्ध आहे असें इंग्रजांच्या नजरेस आलें. या फौजेंची व इंग्रजांची गोळागोळी झाली. पण मराठ्यांनीं गनिमीकाव्याचें धोरण स्वीकारल्यामुळें एवढ्या मोठ्या फौजेला हटवून आपणाला पुणें गाठणें शक्य होणार नाहीं अशी इंग्रजांची खात्री झाली. मुंबईहून इंग्रजांना पुरवठा होण्याचा मार्गहि मराठ्यांनीं बंद केला होता. मराठ्यांची वीस हजार फौज बोरघाटाच्या पायथ्यापासून पनवेल पर्यन्त पसरली होती. त्यामुळें इंग्रजांचें मुंबईचें दळणवळणहि सुरक्षित नव्हतें. शिवाय नानानें तळेगांवापासून पुण्यापर्यंत सर्व मुलूख जाळून भस्मसात केला होता तात्पर्य मराठ्यांशीं लढणें हें काम सोपें नसून गनिमी काव्याचें हें झोंबट

आपल्याला महिनो महिने पुरून उरेल अशी इंग्रजांची खात्री झाल्यावर त्यांनीं तळेगांवच्या पुढें जाण्याचा बेत रद्द करून परत मागें मुंबईस येण्याचें ठरविलें.

इंग्रजांनीं परत फिरण्याचें ठरविलें खरें. पण आतां त्यांना परत फिरणेंहि कठीण झालें होतें. कारण मराठ्यांची आफाट सेना चोहो बाजूंना वावरत असल्यामुळें त्या सेनेला चुकवूनच इंग्रजांना परत फिरणें भाग होतें. तथापि अशा संकटांतहि शत्रूला चाहूल लागूं न देतां इंग्रजांनीं आपला मोर्चा हळूच वडगांवकडे वळविला. मराठे पाळतीवर होतेच. मराठ्यांच्या आजूबाजूला पसरलेल्या चौक्याशी झटापट करीत करीत इंग्रजांनीं वडगांव गाठलें. पण इतकें होतांच मराठ्यांच्या साऱ्या फौजा धावून आल्या व त्यांनीं वडगांवला वेढा दिला. या झटापटीची हकीगत पटवर्धनांचा कारकून शिवाजीपंत यानें खालील प्रमाणें लिहिली आहे. 'इंग्रजांचा मोड झाला चारपांचशें माणूस मारिलें. पांच तोफा व दोन गरनाळा सरकारांत पाडाव आणिल्या, शिवाय दोन हजार बंदुका वगैरे लूट सांपडली ' ( अ. यो. पा. १२५ ) या वेळीं मराठ्यांनीं इंग्रजांवर तोफांचा भयंकर भडिमार केला, या भडिमारापुढें आपला निभाव लागत नाहीं असें पाहून इंग्रजांनीं नाना महादजीशीं तहाचें बोलणें लाविलें. या एकंदर प्रकरणांची फलश्रुती शिवाजीपंतानें खालील प्रमाणें लिहिली आहे. 'इंग्रज वडगांवर जातात तोंच फार करून लुटले गेले. पुढें परिणाम नाहींसें समजोन थैली पाठविली कीं पत्राचें उत्तर येतांच भल्या माणसास पाठवूं तेव्हां तिकडून पत्राचें उत्तर गेलें. त्याजकडून भला माणूस आला त्यानें लिहून पाठविलें त्याज वरून इंग्रजाकडून अखत्यारी आला. त्याचें नांव मेस्तर होमस [ Mr. Holmes ]. त्यानें ठराव केला कीं साष्टी उरण व जंबूसर वगैरे गुजराथचे महाल सराकारचे व गायकवाडाकडील घेतले आहेत त्यासुद्धां झाडून सोडून देऊन श्रीमंत नानासाहेब व माधवरावसाहेबापासून तहनामा चालत आला त्याप्रमाणें चालवावें. श्रीमंत राजश्री दादासाहेबास हवाली करून द्यावें. कलकत्त्याहून कंपू आले आहेत त्यास दस्तक द्यावें म्हणजे ते परत जातील.

येणें प्रमाणें ठराव झाला. साष्टी वगैरे ठाण्यासाठीं इष्टुरफाकडचाचा पुतण्या ओलीस राहिला. आणि दुसरा फरमार [ Mr. Farmer ] म्हणून इंग्रजच. येणें प्रमाणें ओलीस राहिले. इंग्रज इतके दमानें आले असें असतां असें कसें जाहलें असें आपण म्हणतील त्यास मुख्यत्वें श्रीमंतांचे पुण्य विचित्र, अवतारी पुरूष त्या सारखें योग घडले ! ज्या मास्टीनानें मसलत केली तो घाटावर येतांच समाधान नाहीं म्हणून मुंबईस गेला, तेव्हां मृत्यू पावला. इष्टुर फाकडा मोठा लढाऊ तो गोळा लागोन ठार झाला. कर्णेल की ( लेफ्टनंट कर्नल के ) म्हणून होता त्यास वाण लागोन जेर झाला. आकारिक होते त्याची अशी अवस्था झाली. इकडून फौज तिकडे येईल म्हणून त्यास ( इंग्रजास ) भरंवसा होता पण फौज मिळाली नाहीं. इकडील फौजेंत देण्याघेण्याचा दंगा यास्तव फौज एकत्र मिळणार नाहीं असा त्यांजा समज. त्यास उभयता सरदार सुद्धां पन्नास हजार फौज जमा झाली. चोहोकडून फौजाचे भार पहातांच, छाती तडकली, तेव्हां माघारें कूच केलें. सारांश श्रीमंतांचा प्रताप हें खरें ( अ. यो. पा. १२७ ). दुसऱ्या एका पत्रांत शिवाजीपंत लिहितो ' इंग्रजांकडील वकिलांचे बोलणें चालणें ठरलें. श्रीमंत राजश्री दादासाहेबास हवाली करणें, दादासाहेबापासून तहनामे वगैरे दस्तऐवजी कागदपत्र ज्या ज्या समयीं घेतलें आहेत ते इंग्रजांनीं माघारें घ्यावे या प्रमाणें ठराव होऊन परस्परें करारनामे झाले. श्रीमंत राजश्री दादासाहेब आज अमावास्या म्हनून न आले. उदईक शिंद्याच्या गोटांत येणार. उभयतां कारभारी याचें मानस भेटी न घ्यावी. असें आहे तसेंच घडेल. दादासाहेबांचा पाहिजे तसा बंदोबस्त शिंदे यांनीं करावा. बंदोबस्ताचा हवाला शिंद्याकडे. सारांश श्रीमंत राजश्री राव साहेबांचें पुण्य विचित्र. इंग्रज म्हणजे सर्वांत मसलतीविशी भारी. नबाब निजामअल्ली, हैदरखान वगैरे सर्वांस याची आंच. अशांचे पारिपत्य जसें म्हणावें तसें झालें. ( अ, यो. पा. १२७ )

एकंदरींत दादासाहेब चिंतो विठ्ठल वगैरेंच्या भरंवशावर अवलंबून इंग्रजांनीं जो डाव टाकला तो वरील पत्रांत लिहिल्याप्रमाणें त्यांच्या चांगलाच

सं. क्र. ..........

आंगलट आला, आणि मराठे सांगतील त्या अटी कबूल करून इंग्रजांना मराठ्याशीं तह करावा लागला. या तहाला वडगांवचा तह म्हणतात तो तारीख १६-१-१७७९ रोजीं करण्यांत आला. " इंग्रज म्हणजे सर्वांस मसलतीविशीं भारी. नबाब व हैदरखान वगैरे सर्वांस आंच अशाचें पारिपत्य जसें म्हणावें तसें झालें. दादासाहेब हस्तगत झाले. घरांतील पेंच वारले इंग्रज नामोहरम होऊन सरकारास यश आले " ( खरे ७-२४६२-६४ ). या तहाप्रमाणें दादासाहेबास शिंद्याच्या स्वाधीन करून इंग्रज परत मुंबईस माघारे गेले. इंग्रजांजवळच्या या लढाईंत सखारामबापूचा राजद्रोह मात्र स्पष्ट उघड झाला. दादासाहेब व चिंतोविठ्ठल हे शिंद्याचे ताब्यांत आल्यावर त्यानीं या प्रकरणांत सखारामबापूहि अपराधी आहे ही गोष्ट शिंद्याच्या कानावर घातली व त्यांना आलेल्या सखारामबापूच्या फितुरीच्या चिठ्या शिंद्यास दाखविल्या. शिंद्यांनीं त्या चिठ्या नानास दाखविल्या. नंतर नाना व शिंदे या दोघांनी मसलत करून सखारामबापूस तात्काळ कैद केलें व त्याची रवानगी सिंहगडावर केली. सखाराम बापूला कैद झाल्याचें वर्तमान पर्शरामभाऊंनीं ऐकिलें तेव्हां सखारामबापूसारख्या थोर अनुभवी मुत्सद्याबद्दल परशरामभाऊंनें खालील प्रमाणें उद्‌गार काढले. ' गोष्ट वाईट झाली. चांगला कर्ता पुरूष होता. परंतु खळ न जात यामुळें हें प्राप्त झालें. होणार चुकत नाहीं.' ( अ. यो. पा. १३० ) सखारामबापू व पटवर्धन यांचे एकंदर संबंध लक्षांत घेतां परशरामभाऊंनीं बापूसंबंधानें काढलेले हे उद्‌गार आजकालच्या दृष्टीनेंहि न्याय्य आहेत असेंच कोणालाही वाटेल. वडगांवचा तह सन १७७९ च्या जानेवारींत झाल्यावर महिन्या दोन महिन्यांच्या आंतच जनरल गॉडर्ड हा हिंदुस्थानांतून निघून बऱ्हाणपुरावरून मार्च १७७९ मध्यें सुरतेस दाखल झाला. वडगांवच्या तहानें श्रीमंत दादासाहेब हे शिंद्याच्या स्वाधीन झाले होते. पण शिंद्याच्या हातावर तुरी देऊन ते निसटले व सुरतेस गॉडर्ड आला होता त्याला जाऊन मिळालें वडगांवच्या तहाप्रमाणें दादास मराठ्यांच्या स्वाधीन करावयाचें ठरलें असून सुद्धां गॉडर्डनें पळून गेलेल्या दादास पुन्हां आश्रय दिलाच. जनरल गॉडर्डला मराठ्यांशी तह

येणें प्रमाणें ठराव झाला. साष्टी वगैरे ठाण्यासाठीं इष्टुरफाकडयाचा पुतण्या ओलीस राहिला. आणि दुसरा फरमार [ Mr. Farmer ] म्हणून इंग्रजच. येणें प्रमाणें ओलीस राहिले. इंग्रज इतके दमानें आले असें असतां असें कसें जाहलें असें आपण म्हणतील त्यास मुख्यत्त्वें श्रीमंतांचे पुण्य विचित्र, अवतारी पुरूष त्या सारखें योग घडले ! ज्या मास्टीनानें मसलत केली तो घाटावर येतांच समाधान नाहीं म्हणून मुंबईस गेला, तेव्हां मृत्यू पावला. इष्टुर फाकडा मोठा लढाऊ तो गोळी लागोन ठार झाला. कर्णेल की ( लेफ्टनंट कर्नल के ) म्हणून होता त्यास वाण लागोन जेर झाला. आकारिक होते त्याची अशी अवस्था झाली. इकडून फौज तिकडे येईल म्हणून त्यास ( इंग्रजास ) भरंवसा होता पण फौज मिळाली नाहीं. इकडील फौजेंत देण्याघेण्याचा दंगा यास्तव फौज एकत्र मिळणार नाहीं असा त्यांजा समज. त्यास उभयता सरदार सुद्धां पन्नास हजार फौज जमा झाली. चोहोकडून फौजाचे भार पहातांच, छाती तडकली, तेव्हां माघारें कूच केलें. सारांश श्रीमंतांचा प्रताप हें खरें ( अ. यो. पा. १२७ ). दुसऱ्या एका पत्रांत शिवाजीपंत लिहितो ' इंग्रजांकडील वकिलांचे बोलणें चालणें ठरलें. श्रीमंत राजश्री दादासाहेबास हवाली करणें, दादासाहेबापासून तहनामे वगैरे दस्तऐवजी कागदपत्र ज्या ज्या समयीं घेतलें आहेत ते इंग्रजांनीं माघारें घ्यावे या प्रमाणें ठराव होऊन परस्परें करारनामे झाले. श्रीमंत राजश्री दादासाहेब आज अमावास्या म्हनून न आले. उदईक शिंद्याच्या गोटांत येणार. उभयतां कारभारी याचें मानस भेटी न घ्यावी. असें आहे तसेंच घडेल. दादासाहेबांचा पाहिजे तसा बंदोबस्त शिंदे यांनीं करावा. बंदोबस्ताचा हवाला शिंद्याकडे. सारांश श्रीमंत राजश्रो राव साहेबांचें पुण्य विचित्र. इंग्रज म्हणजे सर्वांत मनसोबेशी भारी. नबाब निजामअल्ली, हैदरखान वगैरे सर्वांस याची आंच. अशांचे पारिपत्य जसें म्हणावें तसें झालें. ( अ, यो. पा. १२७ )

एकंदरींत दादासाहेब चिंतो विठ्ठल वगैरेंच्या भरंवशावर अवलंबून इंग्रजांनीं जो डाव टाकला तो वरील पत्रांत लिहिल्याप्रमाणें त्यांच्या चांगलाच

आंगलट आला, आणि मराठे सांगतील त्या अटी कबूल करून इंग्रजांना मराठ्याशीं तह करावा लागला. या तहाला वडगांवचा तह म्हणतात तो तारीख १६–१–१७७९ रोजीं करण्यांत आला. " इंग्रज म्हणजे सर्वांस मसलतीविशीं भारी. नबाब व हैदरखान वगैरे सर्वांस आंच अशाचें पारिपत्य जसें म्हणावें तसें झालें. दादासाहेब हस्तगत झाले. घरांतील पेंच वारले इंग्रज नामोहरम होऊन सरकारास यश आले " ( खरे ७–२४६२–६४ ). या तहाप्रमाणें दादासाहेबास शिंद्याच्या स्वाधीन करून इंग्रज परत मुंबईस माघारे गेले. इंग्रजांजवळच्या या लढाईंत सखारामबापूचा राजद्रोह मात्र स्पष्ट उघड झाला. दादासाहेब व चिंतोविठ्ठल हे शिंद्याचे ताब्यांत आल्यावर त्यानीं या प्रकरणांत सखारामबापूहि अपराधी आहे ही गोष्ट शिंद्याच्या कानावर घातली व त्यांना आलेल्या सखारामबापूच्या फितुरीच्या चिठ्या शिंद्यास दाखविल्या. शिंद्यांनीं त्या चिठ्या नानास दाखविल्या. नंतर नाना व शिंदे या दोघांनी मसलत करून सखारामबापूस तात्काळ कैद केलें व त्याची रवानगी सिंहगडावर केली. सखाराम बापूला कैद झाल्याचें वर्तमान पर्शरामभाऊंनीं ऐकिलें तेव्हां सखारामबापूसारख्या थोर अनुभवी मुत्सद्याबद्दल परशरामभाऊंनें खालील प्रमाणें उद्‌गार काढले. ' गोष्ट वाईट झाली. चांगला कर्ता पुरुष होता. परंतु खळ न जात यामुळें हें प्राप्त झालें. होणार चुकत नाहीं.' ( अ. यो. पा. १३० ) सखारामबापू व पटवर्धन यांचे एकंदर संबंध लक्षांत घेतां परशरामभाऊंनीं बापूसंबंधानें काढलेले हे उद्‌गार आजकालच्या दृष्टीनेंहि न्याय्य आहेत असेंच कोणालाही वाटेल. वडगांवचा तह सन १७७९ च्या जानेवारींत झाल्यावर महिन्या दोन महिन्यांच्या आंतच जनरल गॉडर्ड हा हिंदुस्थानांतून निघून बऱ्हाणपुरावरून मार्च १७७९ मध्यें सुरतेस दाखल झाला. वडगांवच्या तहानें श्रीमंत दादासाहेब हे शिंद्याच्या स्वाधीन झाले होते. पण शिंद्याच्या हातावर तुरी देऊन ते निसटले व सुरतेस गॉडर्ड आला होता त्याला जाऊन मिळालें. वडगांवच्या तहाप्रमाणें दादास मराठ्यांच्या स्वाधीन करावयाचें ठरलें असून सुद्धां गॉडर्डनें पळून गेलेल्या दादास पुन्हां आश्रय दिलाच. जनरल गॉडर्डला मराठ्यांशी तह



सं. क्र. ..........

करण्याचा अधिकार कलकत्तेकर इंग्रजांकडून मिळाला होता व त्या प्रमाणें त्यानें नाना फडणीसाशीं तहाचें बोलणें लाविलें होतें. पण गॉडर्डनें दादासाहेबांना आश्रय दिल्यामुळें तहाच्या बोलण्यांत मोठाच व्यत्यय आला. साष्टीचा टापू व दादा यांस स्वाधीन केल्याशिवाय तहाचें बोलणें बोलण्याला आपण तयार नाहीं असें नानानें गॉडर्ड यास स्पष्टच कळविलें. पण इंग्रज या पैकीं कांहींच करण्यास तयार नव्हते. अर्थात लढाई शिवाय मार्गच उरला नाहीं. आणि इंग्रजांनीं लढाईचीच मसलत कायम ठरविली. इतकें होईपर्यंत सन १७७९ चा नोव्हेंबर महिना उजाडला. नोव्हेम्बर महिन्यांत गॉडर्ड मुंबईस आला व त्यानें मुंबईकर इंग्रजांशीं खलबत करून लढाईचें धोरण निश्चित ठरविलें. गॉडर्ड नंतर सुरतेस गेला. त्याच्या मदतीकरितां मुंबईकरांनींहि कांहीं फौज सुरतेस पाठविली. अशा रीतीनें लढाईची सिद्धता झाल्यावर सन १७८० च्या जानेवारीमध्यें गॉडर्ड यानें डभईवर चाल केली व तें ठाणें त्यानें दोन दिवसांतच काबीज केलें. गॉडर्डनें फत्तेसिंग गायकवाडालाहि सामील करून घेतलें व लगेच त्यानें अहमदाबादेवर चाल करून तें शहर त्यानें १५-१-१७८० रोजीं काबीज केलें. इतकें होतें तों इंग्रजांचा समाचार घेण्यास महादजी शिंदे व तुकोजी होळकर हे २५ हजार फौजेनिशीं गुजराथमध्यें उतरले. शिंदे होळकरांशीं गांठ पडतांच इंग्रजांना मराठ्यांचा गनिमीकावा नडूं लागला. गनिमीकाव्याच्या पद्धतीनें शिंदे होळकरांनीं इंग्रजांजवळ चारपांच महिने सारखा झगडा चालू ठेविला, व या अवधींत त्यांनीं इंग्रजांना कांहींहि करूं दिलें नाहीं. इतकें होईपर्यंत १७८० चा मे महिना संपत आला. ✿

मुंबईकर इंग्रजांच्या मतें उत्तर कोकणांत म्हणजे वसई प्रांतांत लढाई सुरू करावी असें होतें पण मे महिना संपून पावसाळा

✿ (टीप— शिंदे होळकर व इंग्रज यांच्या गुजराथेंत ज्या झटापटी झाल्या त्यांत इंग्रजांचे ८०० लोक ठार झाले अशी माहिती इ. सं. खं ६ पत्र ११९ मध्यें आहे).

जवळ आल्यामुळें गॉडर्ड वसईस आला नाहीं. मुंबईकरांनीं त्याच्या मदतीस फौज पाठविली होती ती मात्र त्यानें वसईकडे पाठविली, व कर्नल हार्टली नांवाचा एक सरदारहि त्या फौजेबरोबर पाठविला. इकडे मुंबईकरांनीं कल्याणवर छापा घालून तें ठाणें घेतलें व बोरघाटापर्यंत चौक्या बसविल्या. त्या चौक्या उठविण्यासाठीं व कल्याण परत घेण्यासाठीं नानानें बाजीपंतअण्णा या सरदारास पाठविलें. चौक्या उठवून बाजीपंत कल्याणवर जाणार तोंच कर्नल हार्टलीची फौज येऊन मुंबईकरांस मिळाली. या फौजेपुढें बाजीपंताचा निभाव न लागल्यामुळें तो परत घाटावर गेला. पावसाळा संपतो न संपतो तोंच म्हणजे ऑगस्ट १७८० मध्यें गॉडर्ड गुजराथेंतून वसईकडे निघाला. नानाला ही बातमी कळतांच त्यानें रामचंद्र गणेश व बाजीपंत अण्णा या सरदारांस घाईघाईनें वसईकडे पाठविलें. पण फौजेस अडविण्याकरितां कर्नल हार्टली याला गॉडर्डनें आगाऊच रवाना केलें व नंतर १७८० च्या नोव्हेंबरमध्यें त्यानें वसईस वेढा दिला. एक महिना वसईचा लढा सारखा चालू होता. वसईचा किल्ला गाडर्डनें ता. ११-१२-१७८० रोजीं काबीज केला. वसईचा हा लढा चालू असतांनाच तिकडे हार्टली व रामचंद्र गणेश आणि बाजीपंतअण्णा यांचाहि लढा चालूच होता. सबंध नोव्हेंबर महिना यांच्या चकमकी चालू होत्या. ता. १२-१२-१७८० रोजीं रामचंद्र गणेशानें मोठ्या धाडसानें इंग्रजाशीं युद्ध केलें पण त्यांत तो मारला गेल्यामुळें मराठ्यांची फौज मागें हटली. मराठ्यांच्या या माघारीमुळें कर्नल हार्टली याला स्वास्थ्य मिळालें असा याचा अर्थ नाहीं. कारण इतक्यांतच हरिपंत घाटाखालीं उतरले व पुन्हां इंग्रजांशीं जोरानें युद्ध सुरू झालें. परशुरामभाऊंना या युद्धांत सामील होण्याकरितां नानांनीं तांतडीनें बोलाविलें होतें व ते वास्तवीक या पूर्वींच यावयाचे. पण त्यांची मातोश्री जानकीबाई ही २९-१२-१७८० रोजीं मृत्यू पावली. त्या मुळें स्वारीस जाण्याचा बेत भाऊस लांबवावा लागला. रघुनाथराव कुरुंदवाडकराबरोबर थोडी फौज देऊन त्याला भाऊंनीं नानाकडे पाठविलें. हरिपंत घाटाखालीं उतरले ही बातमी लागतांच गॉडर्ड वसई सोडून हार्टलीच्या

मदतीस आला. हरिपंत व बाजीअण्णा यांची फौज तोंडा समोर असतांना गॉडर्ड फार लगट करील अशी मराठ्यांची कल्पना नव्हती. पण त्या धाडसी सरदारानें मराठांच्या फौजेस न जुमानतां बोरघाटाच्या पायथ्या-पर्यन्त मजल मारली. हरिपंत व बाजीअण्णा यांस न जुमानतां गॉडर्ड घाटापर्यन्त आला हे पहातांच नानानीं हरिपंताच्या मदतीस तुकोजी होळकर यास पाठविलें. इतकें झालें तरीही गॉडर्डनें मराठ्यांस दाद दिली नाहीं, व तो घाट चढून वर आला. मराठ्यांची फौज जास्त असून सुद्धां इंग्रज घाट चढून वर आले ही मोठी आश्चर्याची गोष्ट झाली. नानास हें समजतांच त्यानें हरिपंतास खालील प्रमाणें खरमरीत जबाब विचारला ' तीस हजार स्वार व साडेचार हजार पायदळ तुम्हांबरोबर असतांना तुम्हीं इंग्रजांस घाटावर कसें येऊं दिलें. ' या जबाबाला हरिपंत नें प्रांजलपणें उत्तर दिलें कीं आपल्या हातून ही चूक झाली. इंग्रज घाटावर आला ही गोष्ट स्पष्ट झाली आतां पुढच्या मार्गास लागलें पाहिजे. इंग्रजांच्या या चढाईचा परिणाम पुण्याच्या लोकांवर मात्र फार झाला. इंग्रज आतां नक्की पुण्यावर येणार असें झालें. पुण्यांत पळापळ सुरू झाली. श्रीमंतांनाहि पुरंदरास नेण्यात आलें. असो. इंग्रज घाटावर आल्यामुळें त्याला खालून व वरून दोन्ही बाजूंनीं चोपावा असा मराठ्यांनीं बेत केला. इंग्रजानें आपलें ठाणें घाटावर खंडाळें येथें ठेविलें होतें. हरिपंतांनीं बाजी-पंतअण्णास घाटाखालीं बदलापुरास ठेविलें आणि होळकरासुद्धां आपण कार्ल्याच्या मुक्कामीं राहिले. इंग्रजांना घाटावर रसद जात असे ती मार-ण्याचा बाजीपंतांनीं सारखा सपाटा चालविला. हरिपंतांनींहि कार्ल्याच्या अघाडीवरून इंग्रजांच्या खंडाळ्याच्या छावणीवर सारखा मारा चालविला. परशरामभाऊंना नानांनीं तातडीनें आमंत्रण पाठविलें होतें पण मातोश्रीच्या मृत्यूमुळें त्यांना अजून येतां आलें नव्हतें त्यांनीं रघुनाथराव कुरुंदवाडकराला पुढें पाठविलें होतें व तो बाजीपंत अण्णांच्या मदतीस येऊन पोंचला होता. इंग्रज घाटावर आल्यामुळें नानांनीं परशरामभाऊंना पुन्हा निकडीचीं पत्रें पाठविलीं, म्हणून भाऊ तासगांवाहून निघाले. सन १७८१

च्या फब्रुवारी महिन्यांत ते पुण्यास आले व नानाचें व त्याचें युद्धाविषयीं बरेंच खलबत झालें. नंतर भाऊ रणांगणावर निघाले ते हरिपंतास जाऊन मिळाले. भाऊंनीं इंग्रजांच्या छावणीची टेहेळणी करून पाहिली. इंग्रज फार बंदोबस्तानें राहिला आहे असें त्यांच्या नजरेस आले. तेव्हां सर्व सरदारांनीं एकत्र जमून लढाईचें पुढील धोरण आखण्याविषयीं खलबत केलें. त्यांत असें ठरलें कीं इंग्रजांना घाटाखालून मदत होते ती अजीबात तोडल्या शिवाय इंग्रजास हैराण करण्याचा दुसरा मार्ग नाहीं, आणि ही कामगिरी स्वतः परशुरामभाऊंनींच करावी असें ठरलें त्याप्रमाणें ठरल्यावर मुंबईहून पनवेलच्या मार्गानें इंग्रजांस मदत होते व रसद पोचते ती तोडण्याकरता भाऊ घाटाखालीं निघाले. ते कोळंब्याच्या घाटानें तळकोकणांत उतरले. सन १७८१ च्या मार्च मध्यें इंग्रजांची रसद तोडण्याचें काम पद्धतशीरपणें सुरू झालें. रघुनाथराव कुरुंदवाडकरांनीं खोपवलीपर्यंत जाऊन इंग्रजांचें सामानानें भरलेले दीड हजार बैल लुटून आणिले. भाऊचा मुक्काम भालवडी येथें होता. त्याच्याहि स्वारांनीं पांच सातशें बैल, तट्टें व उंटें हीं लुटलीं. तुपाचे बुधले साखरेच्या गोण्या वगैरे इंग्रजांकडे जाणारा माल लुटला गेला. कल्याण व पनवेलपर्यंत पटवर्धनांच्या फौजांचा संचार सुरू झाला. खोपवलीपासून चार कोसावर चौक म्हणून गांव आहे. तेथें इंग्रजांचीं दोन तीन पलटणें होतीं. साधल्यास त्यांवर हल्ला करून तीं कापून काढावयाचीं असा भाऊंचा विचार होता. पण हें काम मोठ्या धाडसाचें होतें. भाऊ या संबंधानें लिहितात ‘ पनवेलीहून रात्रीचे इंग्रज निघतात मध्यें मुक्काम करून बंदोबस्तानें राहून फिरोन रात्रीचें कूचकरून रस्त पोचवितात. त्यांनीं निशाचरी विद्या बरीच आरंभिली आहे. इंग्रजाकडील कागद मुंबईस जात होते ते सांपडले. त्यांतील तात्पर्यार्थ “ घाटमाथां गेलों परंतु त्यांची ( मराठ्यांची ) फौज आहे. यामुळें रस्त येऊन पोंचत नाहीं, रस्त न आली तर निभाव नाहीं. ” असें लिहिलें होतें. रस्तेचें पलटण एक दुसरें कापल्याशिवाय जरब बसत नाहीं व रस्त बंद झाल्याशिवाय इंग्रज कह्यांत येणार नाहीं पलटण रस्तेचे कापून काढावें हेंच

मनापासून आहे. याजकरितां त्याचे पिच्छावर पनवेल पावेतों फौज चि. रा. बळवंतराव याजसमागमें रवाना केली आहे. ते बंदोबस्तीनें येत असले तरी बळवंतरावांनीं त्यांस पाठीवर घेत पुढें यावें व आम्हास वर्तमान कळवावें. सर्वांनीं मिळून गांठ घालून पारिपत्य करावें असें योजिलें आहे. त्यांत श्रीसत्ता प्रमाण. चौकावर पलटण होतें तें कापून काढावें म्हणून भालवडीहून कूच करून कंडव येथें दीड कोस आलों. तों तें ( पलटण ) रात्रींच निघून गेल्याची बातमी आली. या करितां येथेंच मुक्काम करून खोपवली पर्यंत जाऊन आलों ' (खरे खं. ७ पान ३५३९ ) इंग्रजाचीं पलटणें वर लिहिल्याप्रमाणें चौकावरून निसटून जात होतीं. त्या पलटणांवर मराठ्यांनीं हल्ला केला. या हल्या संबंधानें परशुरामभाऊ लिहितात ' रस्त भरावयास फिरून इंग्रज पोक्त सामानानिशीं येतीलच तेव्हां आम्हालाही आणखी इतकी फौज, पायदळ पांच हजार, दोन तीन तोफा असाव्या. तेव्हां दोन्ही तोंडें फौज सारखी निकड करावयास पाहिजे. तेव्हां रस्त बंद होईल तर नकळे. दुसरी फौज कारभारी याजकडून यावयाचा विचार समजलाच आहे. तत्राप रा. नानास लिहिलेंच आहे. तिकडून सामान जरूर येईल. तोफे पुढें आमची गोडी फौज झटल्यानें फौजेचा नाश होतो. ते जागा धरून उभे राहून लढूं लागल्यावर फौजेचा काट चालत नाहीं. नासाडीच होईल. घाटाखालीं एवढी फौज आली. रस्त बंद होईना. कांहीं करावें असें सर्वांच्या चित्तीं. याजमुळें घोडीं घातलीं ते दिवशीं भृगुवार आमचा वर्ज्यवार म्हणून निशाणाचे पाठीमागेंच उभे समजोन होतों. तों चाळीस पन्नास घोडे ठार व चाळीस पन्नास जखमी झाले. आम्ही लोकाबरोबरच उठून निकड करितों तर फारच जायां होते. घोडीं इरेने जाया जाहलीं. असें आणखी एक दोन वेळ इरेने लढावें म्हटलें तर सरदारी बसावयाचा प्रकार. कूच करून लांबण पडल्या नंतर मग साधेल तें साधेल. जाग्यावर असतांच घोडीं घालूं म्हटलें तर काम होणार नाहीं अशी अडचण " ( खरे खं. ७ पा. ३५४० ) वरील हकिगतीवरून इंग्रजांची रसद मारणें म्हणजे किती कठीण काम होतें हें दिसून येईल. ही चकमक झाल्यावर इंग्रजांच्या पलटणाची व पटवर्धनांची पुन्हां गांठ पडली.

कर्नल मॅके हा सरदार दोन पलटणें घेऊन पनवेलीहून खोपवलीकडे येत असतां वाटेंत चौकला त्याला पटवर्धनानीं गांठलें. या बाबतींत परशरामभाऊ लिहितात ‘ बातमीसाठीं नेहमी फौज तिकडे ठेविली होती. बातमी येतांच आम्हीं फौजेसुद्धां गेलों. फाल्गून व. ७ भृगुवारीं प्रहर दिवसास गांठ पडली. लोकानी गोटापावेतों घोडीं घातलीं. तीन टोळ्या एकीकडे डावे बाजूस चि. रघुनाथरावदादा उजवे बाजूस तीर्थरूप राजश्री मेघश्याम बापू मध्यें चि. रा. बळवंतरांव येणें प्रमाणें तिन्ही तोंडें फौज उठली. गोटापर्यंत जाऊन मारामार करून शे दोनशें माणूस जाया जखमी केलें. चि. रा. दादाचे तोंडावर एक कुपणी–कुपणी म्हणजे शंभर माणसांची जमेत त्यांत एक निशाण. तें माणूस अव्वल ज्वान, चिरंजिवांवर चालून गेलें. तोफांची मारगिरी होतच होती. तो चिरंचिवानी निकड करून लोक उठविले तेव्हां ती एक कुंपणी कापून काढिली. या शिवाय आणखी शेंपन्नास माणूस मारून बंदुका आणिल्या. आणखी लोक थोडीशी निकड करते तर गोट झाडून लुटून लोक मारिले असते. फौज ही त्यांचे पारिपत्यापुरती होती. परंतु श्रीच्या इच्छेस असें तितकेच पारिपत्य ते वेळेस झालें. तों दोनप्रहर झाले पाण्याची वेळ झाली लोक निघूं लागले. तोफांची मारगिरी फिरून होऊं लागली. तेव्हां दहावीस घोडे ठार शेंपन्नास जखमी जाले. राऊत पुन्हां उठले तेव्हां तोफा बंद झाल्या. माघारे निघाले तेव्हां माणूस ही शें पन्नास जाया जखमी झाले ’ ( खरे खं. ७ पा. ३५४० ) ही चकमक होऊन दहा-बारा दिवस होतात तों पुन्हां रसद नेण्याकरितां इंग्रजांचे लोक आले या लोकांबरोबर कर्नल ब्राऊन हा मुख्य सरदार असून त्याच्या बरोबर तीन पलटणे सातशें स्वार व दहा तोफा असा पोक्त सरंजाम होता. त्या फौजेची व पटवर्धनांची ता. २९-३-१७८१ ला गांठ पडली. इंग्रजांनीं पुष्कळ प्रयत्न केला पण मराठ्यांनीं त्यांचे चार हजार बैल लांबविले. शिवाय उंटें, छकडे, तोफेंचे गोळे डेरे राहुट्याच्या कनाता असें पुष्कळ सामान मराठ्यांनीं लुटून घेतलें कर्नल ब्राऊन कसा बसा पनवेलीस पोंचला. पण त्याचें बहुतेक सामान लुटलें गेलें. या खेपेस इंग्रजांस मराठ्यांचें पाणी चांगलेंच समजलें असें

परशुरामभाऊच्या उद्गारावरून दिसतें 'आज इंग्रजास गनिमी कावा पुरता समजला. या खेपेस इंग्रजाची खराबी फार झाली. गनिमी जरब त्यांस समजली ' असे अभिमानाचे उद्गार परशुरामभाऊंच्या पत्रांतून आढळतात. कर्नल ब्राऊन हा पनवेलीस पोचला होता तेव्हां तो पुन्हा रसद घेऊन घाटावर येण्याचा प्रयत्न करीलच तरी त्याला अडविण्याकरितां जास्त तरतूद म्हणून नानानीं तुकोजी होळकरास भाऊंच्या मदतीकरितां म्हणून घाटाखालीं पाठविलें. *

सन १७८१ चा मार्च महिना पटवर्धन व इंग्रज यांच्या चकमकीमध्यें गेला. कर्नल ब्राऊन हा मोठचा शिकस्तीनें पनवेलीस गेला होता. तो परत रसद घेऊन येणार तेव्हां त्याला अडविण्याचें काम मराठचांस करावयाचें होतें. एप्रिलच्या आरंभीं मराठचांनीं अजमास केल्याप्रमाणें इंग्रज रसद घेऊन पनवेलीहून निघाले. या इंग्रजांच्या फौजेला पटवर्धन व तुकोजी होळकर यांनीं आघाडीस व पिछाडीस अडविण्याचा प्रयत्न केला. विशेषतः होळकरानें पिछाडीहून या फौजेला फारच सतावून सोडलें. मराठचांचा सारखा ससेमिरा पाठीमागें लागल्यामुळें घाटावर जरूरीप्रमाणें रसद मिळेनाशी झाली व त्यामुळें पुण्यावर चालून जाण्याकरितां घांट चढलेल्या गॉडर्डलाहि मोठी पंचाईत पडली. नुसता घाट चढण्याचाच अवकाश कीं मराठे तात्काळ तह्यावर येतील अशी गॉडर्डची समजूत होती. पण तसें कांहींच न होतां उलट रसद मराठचांनीं बंद केल्यामुळें घाटावर गॉडर्डचीच पंचाईत झाली. अशा स्थितींत घाटावर रहाणें अशक्य झाल्यामुळें गॉडर्डनें परत मुंबईस जाण्याचा निश्चय कायम केला पण मराठे त्याला परत तरी थोडेच जाऊं देणार? परत जातांनाहि गॉडर्डला मराठचाशीं झगडा टाळतां

* ( टीप — पटवर्धन व इंग्रज यांच्या चौकच्या बाजूला ज्या चकमकी झाल्या त्याची सविस्तर हकिगत खरे खं ७ ले. २६०५ ते २६२० मध्यें आणि महादजी शिंदे पत्रव्यवहार ले. १४०, १४८, १५८, १६०, १६६।६७ यामध्यें आहे.)

येणें शक्य नव्हतें. गॉडर्ड १७८१ च्या एप्रिलच्या विसाव्या तारखेस घाटाखालीं उतरला व खोपवलीस तळ देऊन राहिला. खोपवलीस गॉडर्ड येतांच त्यावर अघाडीकडून पटवर्धन व होळकर यांनीं हल्ले सुरू केले व पिछाडीकडून हरिपंततात्याहि घाटावरून खालीं उतरून तोफांचा मारा गॉडर्डवर करूं लागले. दोन्हीं बाजूंनीं कात्रींत सांपडल्याप्रमाणें झाल्यामुळें गॉडर्डची मोठीच पंचाईत झाली. त्यानें खोपवलीहून खालापुरास कसेंबसें दोन दोन कोस मकण गांठलें. तेथून तो चौकाजवळ आला तों पिछाडीकडून हरिपंतांनीं जोराचा तोफांचा भडिमार सुरू केला. अघाडीवर पटवर्धन होतेच. सारखी धुमश्चक्री सुरू झाली. या प्रसंगीं बरीच लढाई होऊन उभय पक्षाचें बरेंच नुकसान झालें. इंग्रजांनीं चौकास मुक्काम केला होता. तेथून कुच करतांना पुन्हा मराठ्यांची व त्यांची झगडाझगडी सुरू झाली. प्रथम होळकर व पटवर्धन यांनीं लढाईस सुरवात केली. मागून हरिपंताच्या हुजरातीचे लोकहि उठले. तोफांचा भडिमारहि सारखा सुरूच होता. चौकापासून पनवेलपर्यंत मराठ्यांना तोंड देत देत इंग्रजांनीं जेमतेम पनवेल गाठलें. पण या धुमश्चक्रींत इंग्रजांचे फारच नुकसान झालें. ✲

गॉडर्ड पनवेलीस पोंचल्यावर हरिपंत व होळकर हे घाटाखालींच राहिले व परशुरामभाऊ १७८१ च्या मे महिन्यांत हरिपंताचा निरोप घेऊन घाटावर आले. घाटावर आल्यावर त्यांनीं नानाची भेट घेतली. सुरत अठ्ठाविशींत स्वारीस जाण्याविषयीं नानांनीं परशुरामभाऊस फार आग्रह केला. पण मे अखेर आल्यामुळें पावसाळा जवळ आला म्हणून भाऊंनीं स्वारीस जाण्याचा बेत मान्य केला नाहीं. नानाचा निरोप घेऊन भाऊ

---

✲ (टीपः—परशुरामभाऊंच्या मताप्रमाणें इंग्रजांचे पांचसहाशें माणूस ठार व हजार दीड हजार जखमी झालें. खरे खं. ७–२६२० पण ग्रँटडफ साहेब इंग्रजांकडील ठार व जखमी यांची संख्या ४९६ देतात. म. शि. पत्रव्यवहार लेख १६६।६७ मध्यें इंग्रजांच्या चार पलटणींचा नाश झाला १२०० ठार व दोनहजार जखमी व एक हजार पळाले अशी माहिती आहे.)

श्रीमंतांच्या दर्शनाकरितां पुरंदरास आले. श्रीमंतांच्या भेटी झाल्या. श्रीमंतांनीं हरिहरराव पांडुरंग यांस शिरपेंच रघुनाथराव नीळकंठ यांस मोत्याचा तुरा व गणपतराव कान्हेर यांस चौकडा व खुद्द परशुरामभाऊंस मोत्यांची कंठी याप्रमाणें पटवर्धन सरदारांस जवाहीर दिलें. श्रीमंतांचा निरोप घेऊन फौजेसह पटवर्धन सरदार निघाले ते मिरज, तासगांव, कुरुंदवाड वगैरे आपापल्या स्थळास दाखल झाले.

इंग्रजांची बोरघाटांत मराठ्यांजवळ लढाई चालू होती. त्याच सुमारास उत्तर हिंदुस्थानांत महादजी शिंदे व इंग्रज यांच्याहि लढाया चालू होत्या. कर्नल कॅमक व कर्नल मूर या इंग्रजाच्या सेनापतींनीं माळव्यांत महादजीला फारच सतावून सोडलें होतें. पण महादजीनेंहि इंग्रजांचे कांहीं चालू दिलें नाहीं. या चकमकी चालू असतांच १७८१ चा पावसाळा जवळ आला. त्यामुळें इंग्रज माळव्यांतच छावणी करून राहिले. अर्थातच महादजीलाहि त्यांच्या तोंडावर छावणी करून रहावें लागलें. यावेळीं इंग्रजांवर चोहोंकडून रान उठलें होतें. नाना फडणीसाचें इंग्रजांविरुद्ध चौकडीचें कारस्थान म्हणून जें इतिहासांत प्रसिद्ध आहे त्याची चोहोंकडे अम्मलबजावणी होत होती. पेशवे, नागपूरकर भोंसले, निजामअल्ली व हैदरअल्ली यांनीं इंग्रजांविरुद्ध एकदम उठाव करावा असें हें कारस्थान होतें. या कारस्थानाप्रमाणें पेशवे व हैदरअल्ली यांनीं आपापले कार्यभाग व्यवस्थित पार पाडण्याचे उद्योग चालू ठेविले होते. हें सर्व कारस्थान यशस्वीरीतीनें चालू राहिलें तर हिंदुस्थानांत आपला निभाव लागणार नाहीं हें धूर्त इंग्रजांनीं पक्कें ओळखिलें होतें, आणि म्हणून या कारस्थानाच्या साखळींतील नेमका कच्चा दुवा गांठून तो खिळखिळा करण्याचा उद्योग त्यांनीं आरंभिला. भोसले व निजाम यांनीं या कारस्थांनांत कांहीं उद्योग केला नाहीं. इंग्रजांनीं नेमकीं हींच दोन सावजें हाताशीं धरून त्यांना या कारस्थानांतून फोडण्याचा उद्योग केला व तो यशस्वी झाला. भोसल्यानें सोळा लाख रुपये घेऊन बंगालवर सुरू केलेली स्वारी थांबविली आणि निजामालाहि इंग्रजांनीं तहाच्या जाळ्यांत पकडून जाग्यावर बसविला. राहतां राहिले पेशवे व

हैदरअल्ली. पण हेच दोन प्रखर असून ते इंग्रजांना भारीच होते. तेव्हां या दोघांशीहि युद्ध चालविणें कठीण हें ओळखून मराठ्यांशीं तहाचें बोलणें इंग्रजांनीं सुरू केलें. मराठ्यांतसुद्धां नाना व महादजी यापैकीं नाना जास्त कठीण. तेव्हां महादजीलाच हाताशीं धरण्याचा इग्रजांनीं प्रयत्न केला. सन १७८१ च्या ऑगस्टांत गॉडर्डनें महादजीच्या मागें टुमणें लावलें कीं पेशव्याचा व आमचा तह करून द्या. पण यावेळीं महादजीनें इंग्रजांना कळविलें कीं पूर्वींचा अनुभव पाहतां इंग्रजांनीं केलेले तह मोडले आहेत. तेव्हां आतां इंग्रजांना तह करणें असल्यास इंग्रजांनीं अगाऊच कांहीं गोष्टी कबूल केल्या पाहिजेत. वसई, कल्याण, अहमदाबाद वगैरे इंग्रजांनीं मराठ्यांची घेतलेलीं ठाणीं सोडल्या खेरीज तहाची भाषा पुणें दरबारजवळ बोलणें शक्य नाहीं असें महादजीनें इग्रजांस स्पष्टच कळविलें (महादजी शिन्दे पत्रव्यवहार ले. १६९) इंग्रजांनीं नागपूरकर भोंसल्याला मध्यस्थी घालूनहि पुणें दरबारजवळ तह करण्याचा उद्योग चालविला होता. पण हैदरअल्लीला सोडून इंग्रजांजवळ तह करण्यास नाना तयार नव्हते. तेव्हां इंग्रजांनीं पुन्हां महादजीच्याच पाठीमागें तहाचें टुमणें लाविलें. या वाटाघाटींत १७८१ साल खलास झालें. शिवाय महादजी व कर्नल मूर हे माळव्यांत एकमेकांसमोर छावणी करून राहिले होते तेहि युद्धाला कंटाळले होते. तेव्हां महादजीनें पुणें दरबारशीं तह करून देण्याचें काम पत्करून इंग्रजांजवळ उत्तर हिंदुस्थानांतलें युद्ध बंद केलें, आणि पुणें दरबारशीं तहाच्या वाटाघाटी सुरू केल्या. या वाटाघाटींत पुष्कळच काल गेला. व या तहासंबंधीचे कागदपत्रहि पुष्कळच उपलब्ध आहेत. शेवटीं तारीख १७ मे १७८२ रोजीं पुणें दरबार व इंग्रज यामध्यें तह झाला, त्याला सालबाईचा तह म्हणतात. सवाई माधवरावाच्या जन्मापासून सारखा सात वर्षें इंग्रज व मराठे यांमध्यें जो झगडा सुरू होता तो या तहानें थांबला. या तहांत एक साष्टी बेटाखेरीज इंग्रजांनीं मराठ्यांचा जेवढा मुलूख घेतला होता तेवढा सर्व परत दिला. दादासाहेबांनीं २५ हजार दरमहा नेमणूक घेऊन वाटेल तेथें रहावें असें ठरलें. हा तह सर्वस्वीं नानाच्या मतांप्रमाणें झाला नाहीं. साष्टी या तहांत इंग्रजांनीं

मराठ्यांस दिली नाहीं त्या संबंधानें नानानें बरेंच ओढून धरलें. महादजीच्या मतें तह झाल्यामुळें आपलें दिल्लींतील कारस्थान साधतें तर साष्टीकरितां आपण आग्रह धरूं नये. पण नानाला दिल्लीचें कारस्थान साधूनहि आणखी हैदरचें कारस्थान साधावयाचें होतें. हैदरनें इंग्रजांचा घेतलेला मुलूख परत द्यावा अशी तहांत अट होती. ही अट मराठ्यांनीं पुरी करून द्यावयाची होती. तेव्हां नाना हैदराशीं बोलणें करतांना असें म्हणे कीं धारवाड, बदामी वगैरे आमचे प्रांत तुम्ही घेतले आहेत ते परत द्याल तर आम्ही इंग्रजांशीं तह करीत नाहीं. इकडे इंग्रजांशीं नाना असें बोलणें करीत कीं हैदर आमचा दोस्त त्याला सोडून तह करणें कठीण. तरी साष्टी देत असाल व दादासाहेबांना तात्काळ आमच्या स्वाधीन करीत असाल तर तह करूं. अशा प्रकारें हैदर व इंग्रज या दोघांकडूनहि मराठ्यांचा जास्त फायदा होईल अशी मसलत नाना करीत होता. या वाटाघाटींत पुष्कळ काल गेला. शेवटीं हैदर मरण पावल्यावर २३-२-१७८३ रोजीं नानांनीं तहाच्या कागदावर पेशव्याकडून मखलाशी करून शिक्के मोर्तब करून तो कागद इंग्रजांच्या हवालीं केला. पुष्कळ बाबतींत महादजीचें म्हणणेंच मान्य करावें लागलें. पण नानानें हैदरअल्ली मेल्यावरच तहावर सही केली. कारण चौकडीच्या कारस्थानांत हैदर हा आपला दोस्त. त्याला वगळून तह करणें ही गोष्ट नानाला नामुष्कीची वाटत होती. हैदरअल्ली याच सालीं वारला. तेव्हां मात्र नानानें सही करून तह कायम केला.*

असो अशा रीतीनें इंग्रजाजवळ सतत सात वर्षें चाललेला झगडा सालबाईच्या तहानें थांबला. सालबाईचा तह इंग्रजांनीं सुखासुखी केला नाहीं.

* ( टीपः—इतिहासकार सरदेसाई यांनीं सालबाईच्या तहाच्या चर्चेत शेकडों पानें महादजीचें समर्थन करण्याकरितां खर्चिलीं आहेत. पण शेवटीं असा शेरा मारला आहे कीं महादजीनें घाई न करतां नानांच्या मताप्रमाणें तह घडवून आणला असता तर नानानें या तहान्वयें मराठ्यांचा जास्त फायदा करून घेतला असता. स. माधवराव खंड १ ला )

त्यांना मराठ्यांनीं चांगलीच जरब बसविली. गॉडर्डचा किती सणसणीत पराभव झाला या संबंधानें महादजीनें खालीलप्रमाणें आपला अभिप्राय नमूद केला आहे. ' श्रीमंतांचे प्रतापें करून गाडर इंग्रज घाट उतरून माघारा गेला. जातीनें लढाया दोन तीन निकराच्या झाल्या. त्यामुळें त्याजकडील नाश फार झाला. जरब चांगलीच बसली. पनवेलीस टिकेल असें दिसत नाहीं. फिरोन घाट चढोन वरतें यावयाचा इंग्रजास विचारच पडेल ( म. शिंदे प. व्य. ले. १६७)*

* (टीप—घाटाखालीं मराठ्यांच्या व इंग्रजांच्या ज्या लढाया झाल्या त्यांत परशुरामभाऊंची कामगिरी विशेष महत्त्वाची झाली ही गोष्ट खालील उल्लेखावरून स्पष्ट आहे. ' भाऊ व तुकोजी होळकर यांनीं कोकणांत जाऊन इंग्रजांची रसद बंद केली. रा. परशुरामपंत भाऊ अगोदर घाट उतरून गेले. त्याचेकडे सरंजाम सुभेदाराप्रमाणें (होळकराप्रमाणें) नसतां त्यांनीं कसें काम केलें हें ध्यानांत आहे.' (म. शिंदे प. व्य. ले. १६०).

# प्रकरण ९ वें.

## परशुराम भाऊंची सुरापुरावर स्वारी.

मोरोबा दादाच्या बंडखोरीमुळें हरीपंत व परशुरामभाऊ यानां हैदरावरील स्वारी तशीच अर्धवट टाकून परत यावें लागल्यामुळें हैदराला मराठ्यांच्या कर्नाटकांतल्या राज्यांत धुमाकूळ घालण्यास चांगलीच संधी मिळाली. या संधीचा फायदा घेऊन त्यानें तुंगभद्रेच्या उत्तरचें मराठ्यांचें राज्य काबीज करण्याचा उद्योग आरंभिला. चार दोन महिन्यांच्या अवधींत त्यानें कोपळ, बदामी, तेरदाळ, जमखिंडी व यादवाड हीं ठाणीं घेतलीं. हैदरनें धारवाडहि घेतलें व त्याचा शह मिरजेला बसणार असा रंग दिसूं लागतांच हैदरच्या या धुमाकुळाचा बंदोबस्त करण्याची कांहीं तरी योजना करणें मराठ्यांस प्राप्तच झालें. पण पुणें दरबारांत या वेळीं अनेक भानगडी चालू होत्या. नाना व सखारामबापू यांचीं मनें एकमेकांबद्दल शुद्ध नव्हतीं. शिंदे-होळकरहि रुष्टच होते. कर्नाटकांत स्वारीस गेल्यास मिळालेल्या मुलखाचा निम्मा भाग आपणास मिळावा असें शिंदे होळकरांचें म्हणणें पडलें. कारभाऱ्यांनीं अर्थातच हें मान्य केलें नाहीं, त्यामुळें कर्नाटकावरील स्वारीचा घोळ तसाच पडून राहिला. शेवटीं नानांनीं पमशुरामभाऊंस गळ घातली. परशुरामभाऊला मागच्या स्वारीचें कर्ज झालें होतें. त्याची फेड व पुढच्या स्वारीचा खर्च याची व्यवस्था सरकारांतून झाल्यास भाऊ स्वारीवर निघण्यास तयार

होते. पण तसें काहींच झालें नाहीं; आणि नानाचा व हरीपंताचा पराकाष्ठेचा आग्रह झाल्यामुळें परशुरामभाऊंनाच अखेरीस स्वारीचें प्रस्थान ठेवावें लागलें. इतकें होईपर्यंत सन १७७८ चा सपटेंबर महिना उजाडला. पण हैदरअल्ली आपला कार्यक्रम उरकून आगस्ट महिन्यांतच तुंगभद्रा उतरून परत गेला होता. अर्थातच हैदरचें संकट थोडें कमी झालें होतें. पण स्वारीचें प्रयोजन होतेंच. कारण इतर अनेक संकटेंहि दत्त म्हणून पुढें उभीं होतींच. परशुरामभाऊ पुण्याहून निघाले ते नीरा नदीपर्यंत आले. स्वारीकरतां फौज जमविण्याचें त्यांचें काम चालूच होतें. हैदरचें संकट थोडें कमी झालें पण करवीरकरांनीं दंगा सुरू केला होता. आणि इंग्रजांच्या पुण्यावरील स्वारीचीही गडबड सुरू झाली होती. अशा स्थितींत आपणाला पुण्याहून काय हुकूम येतील या बद्दल भाऊ साशंकच असल्यामुळें ते नीरेच्या आसपासच कांहीं दिवस तळ देऊन राहिले. अशा विवंचनेंत असतांना भाऊंना एकदम पंढरपुराकडे आपला मोर्चा वळवावा लागला. पंढरपुरच्या बाजूला कांहीं प्रमुख जहागिरदारांनीं एकदम बंडाचा बावटा उभारला. या बंडखोरांत नरसो गोविंद, भगवंतराव निंबाळकर, पिडाप्पा बेरड व सुरापूरकर बेरड देसाई हे प्रमुख होते. या सर्वांत सुरापूरकर देसाई हा बराच प्रबळ असून त्याच्याजवळ फौजफाटाहि चांगल्या तऱ्हेचा होता. हे सर्व बंड खोर दादासाहेबांच्या उत्तेजनावरून मराठी राज्यांत गोंधळ उत्पन्न करण्यास प्रवृत्त झाले होते. या दंगेखोरांपैकीं नरसो गोविन्द यानें पूर्वीहि बंड करून पटवर्धनांचें करकंब हें ठाणें बळकाविलें होतें. त्या वेळीं तुकोजी होळकरानें नरसो गोविंदाचें बंड मोडून त्याला पुणें दरबारच्या हवालीं केलें होतें. पण मध्यंतरीं मोरोबा कारभारी होतांच ही स्वारी कैदेंतून मुक्त झाली व इतर बंडखोरांना मिळून त्यानें पुन्हां बंडखोरीला सुरवात केली. नरसो गोविंद, भगवंतराव निंबाळकर, पिडाप्पा बेरड वगैरेंनीं जवळ जवळ पांच हजार फौज जमविली. एवढी फौज जमल्यावर सुरापुरकर देसाई त्यांस मिळाला व सर्वांनीं मिळून मराठी मुलुखावर स्वारी करण्याचें ठरविलें. सुरापूरकरानें प्रथम प्रतिनिधीचें बागेवाडी हें ठाणें घेतलें व तेथील कमा-

विसदारापासून तीस हजार व रयतेपासून साठ हजार रुपये दंड घेतला. प्रतिनिधीचे दीडशें घोडे ठाण्यांत होते ते नेले. नंतर त्यानें आलमेले परगण्यावर स्वारी करून तेथील रयतेपासून दोन लक्ष रुपये हाण मार करून घेतले. त्याच्या भयानें इंडी, तांबें वगैरे ठिकाणचे लोक घरेंदारें टाकून पळत सुटले. नंतर सुरापूरकर पंढरपूरकडे येणार व तें क्षेत्र लुटून मंगळवेढें, करकंब व नरडोल वगैरे तालुके घेणार अशा बातम्या उठल्यामुळें तो प्रांत गडबडून गेला. इतक्या गोष्टी झाल्या तेव्हां या बंडखोरांची या पुढें उपेक्षा करणें शक्यच नव्हतें. या करतां परशुरामभाऊंनीं इतर सर्व कामें बाजूस ठेऊन सन १७७८ च्या डिसेंबरच्या अखेरीस पंढरपुराकडे कूच केलें. परशुरामभाऊ पंढरपुराकडे आले त्या वेळीं सुरापूरकर व नरसो गोविंद वगैरे बंडखोर नरडोलच्या आसपास पांच सात हजार जमाव करून राहिले होते व त्याचा उपद्रव मंगळवेढ्यापर्यंत सुरू झाला होता. भाऊंनीं पंढरपुरास आल्यावर चार दिवस सर्व जुळवाजुळव करून या बंडखोरांवर अकस्मात हल्ला केला. भाऊंच्या फौजेनें बंडखोरांस गांठून त्यांचा पार धुव्वा उडवून दिला. या धुमःचक्रींत नरसो गोविंद जखमी झाला, सुरापूरकराचे तीनशें घोडे पाडाव सांपडले व शेंकडो लोक मारले गेले. अनेक रणांगणांत कसलेल्या त्या भाऊंच्या फौजेपुढें या भुरट्या दंगेखोरांना एक क्षणभरहि टिकाव धरतां आला नाहीं. दाणादाण होतांच हे बंडखोर पळून गेले. ही लढाई होतांच भाऊंनीं शिवगणी, देऊर, आलमेले वगैरे ठाणीं घेतलीं व करजगी, नरडोल, इंडी, तांबें या परगण्यांतून घासदाणा घेतघेत ते सुरापूरच्या हद्दीवर येऊन ठेपले. इतकें होतांच सुरापूरकराचा वकील तहाची भाषा करण्याकरितां आला.

सुरापुरकराचा वकील तहास आल्यावर त्याच्याशीं खंडणीचा ठराव करावा कीं सुरापुराला वेढा घालून एकदाचा कायम निकाल करावा हा भाऊपुढें प्रश्नच होता. पण वेढा घालण्याच्या भानगडींत पडावें तर त्याला काळ बराच लागणार. आणि यावेळीं कारभाऱ्यांच्या मनांत हैदरवर मोठी स्वारी करण्याचा विचार चालू होता. तो कायम झाला तर आपणाला

तिकडे नक्कीच जावें लागेल अशी भाऊंची खात्री होती म्हणून त्यांनीं सुरापुरास वेढा घालण्याच्या भानगडींत न पडतां सुरापुरकराच्या वकीलाजवळ खंडणीच मागण्याचें ठरविलें. भाऊंनीं खंडणीची रक्कम तीन लक्ष सत्तर हजार मागितली व बागेवाडीच्या ठाण्यांतून प्रतिनिधीचे घोडे सुरापुरकरानें नेले होते ते परत द्यावे असें सांगितलें. सुरापुरकराच्या वकीलानें धन्याजवळ बोलणें करून येतों असें सांगितलें व तो बोलणें करण्याकरितां सुरापुरास निघून गेला. सुरापुरकराचा विचार तहाची हूल दाखवून घोंगडें भिजत ठेवावें असा होता. याच सुमारास सुरापुरकराचा व्यंकाप्पा नांवाचा एक सरदार भाऊंच्या लष्करापासून सात आठ कोसावर हजार पांचशें स्वारांनिशीं फिरत होता. भाऊंचें कहीकवाड कोठें तावडींत सापडलें तर तें लुटावें या हेतूनें त्याचे प्रयत्न चालू होते. त्याच्या मुक्कामाची बातमी काढून भाऊंनीं त्यावर एक लहानशी टोळी पाठविली. त्या टोळीनें व्यंकाप्पाला गांठून त्याला लुटून फस्त केलें. यामुळें सुरापुरकराची लढाईची हिंमत पार खचून गेली. तथापि चेंगटपणा करून दिवस काढावे व तहाची नुसती भाषा चालू ठेऊन खंडणी देण्याचें शक्य तितकें टाळावें असा सुरापुरकराचा बेत होता. सुरापुरकराचा हा डाव ओळखून भाऊंनीं त्याला जास्त जरब देण्याचा उद्योग आरंभिला. मोंगलाईच्या हद्दीला लागून सुरापुरकराचे कांहीं गांव होते. ते लुटण्याकरितां भाऊ मोंगलाईंत सगर परगण्यांत शिरले; व त्या बाजूस सुरापुरकराचे जेवढे गांव होते ते सर्व लुटून फस्त केले. या ठाण्यांतील रयत मोंगलाईंत पळून गेली. त्याचा सुगावा काढून भाऊंनीं तीं ठाणींही लुटलीं. भीमेपलीकडे अफजलपूर, कलबुर्गे वगैरे मोंगलांचीं ठाणीं होतीं तींहि भाऊंनीं लुटली.

सुरापुरकराचा पाठलाग करीत करीत भाऊ मोंगलाई मुलखांत शिरल्यामुळें हैद्राबादचा निजाम व पेशवे यामध्यें बेबनाव होण्याला एक मोठेंच कारण उत्पन्न झालें. अफजलपूर, कलबुर्गे वगैरे मोगलांच्या हद्दींतील परगणे भाऊंनीं लुटले ही गोष्ट मोंगल अधिकाऱ्यांना अर्थातच आवडणारी नव्हती. शिवाय भाऊंनीं आणखी एक गोष्ट केली ती अशी की, या मोंगलाई मुल-

खांत मराठ्यांचें स्वराज्य, सरदेशमुखी बाबत जे हक्क होते त्यांचा ऐवज बरेच दिवसांत वसूल झाला नव्हता; तोही भाऊंनीं चोपून वसूल केला. भाऊंच्या या दांडगाईचा मोंगल अधिकाऱ्यांनीं मोठाच बोभाटा केला व निजामाकडे सारख्या तक्रारीवर तक्रारी जाऊं लागल्या. निजामाला या गोष्टीचा प्रतिकार करणें भागच होतें व त्यानें तहवारजंग व अल्लाउद्दौला हे आपले दोन सरदार भाऊंच्या पारिपत्याकरितां पाठविले. या दोन सरदारांची फौज व निजामानें आणखी मदतीस दिलेली फौज मिळून जवळ जवळ वीस हजार फौजेशीं गांठ घालण्याचा भाऊंवर प्रसंग आला. कोणत्याहि प्रसंगांत डर खाण्याचा भाऊंचा स्वभाव नव्हता. या प्रसंगाला उद्देशून भाऊंनीं पेशव्यांच्या भागानगरच्या वकीलाला खालीलप्रमाणें लिहिलें. " आम्हांकडून व्दैत भाव नसतां महालकऱ्याच्या लिहिण्यावरून (नबाबांची) मर्जी खफा होऊन मुकाबल्यास फौज रवाना केली आहे उत्तम आहे. आम्हीं सिद्धच आहों. जें होणें असेल तें होईल. " ( खरे ७ ले. २४९६ ) भाऊंची बोरश्री उसळून आल्याबरोबर त्यांनीं लढाईची तयारी केली खरी; पण भाऊ हे पेशव्यांच्या सरदारांपैकीं एक प्रमुख सरदार. त्यांच्या वागणूकीचें परिणाम एकंदर मराठेशाहीच्या धोरणाला बाधक होऊन चालण्यासारखें नव्हतें. आणि यावेळीं पेशवे व निजाम यामध्यें चुरस उत्पन्न होऊं न देण्याकडे कारभाऱ्यांचा कल होता. निजामानें लढाईची तयारी केली व त्याबरोबरच पुणें दरबारास भाऊंच्या वर्तनाविषयीं तक्रारीहि लिहुन पाठविल्या. या तकारी गेल्याबरोबर नानांनीं भाऊंस खालील प्रमाणें पत्र लिहिलें. " नवाब श्रीमंतांशीं अंतःकरण पूर्वक ममता करतात व या दौलतीची काळजी वागवितात. असें असतांना तुम्हीं त्याच्या तालुकियास उपद्रव देतां त्यामुळें नबाब फारच खट्टे आहेत. व जिवाजीपंत वकील यांनींहि बहुतच बखेडे आले म्हणोन लिहीलें आहे. असें न करावें. थोडक्या कामाकरितां मातबर कामास हिसका बसतो. घेतला ऐवज माघारा द्यावा. " ( खरे ७ ले. २४९४) नानाचें असें पत्र येतांच भाऊंनीं लढाईची मसलत सोडून दिली व लष्करचा तळ हालवून ते पुन्हां सुरापूरच्या हद्दींत आले. या संबंधीं भाऊंनीं खालीलप्रमाणें लिहीलें आहे.

९८३५
२८।८।५३



" कलह वाढवावा तर आम्हांवर शब्द येतो. तेंहि करावें. फौजहि जमा बरीच आहे, लोकहि चांगले आहेत, परंतु आम्हांवर निमित्त येतें. यास्तव काढतेंच घेतलें. " ( खरे ७–ले. २४९७ ) या प्रकरणाची नंतर निजामानें चौकशी केली त्यांत असें आढळून आलें कीं, प्रत्यक्ष निजामाच्या मुलुखाला भाऊंनीं उपद्रव दिला नव्हता. मराठ्यांचे हक्क वसूल करण्या पलीकडे त्यांनीं कांहीं केलें नव्हतें. अशा स्थितींत आपण भाऊवर फौज पाठविली हें गैर झालें असें वाटून निजामानें आपल्या वकिला मार्फत भाऊंना पत्र पाठवून त्या प्रमाणें कळविलेंहि. हीं पत्रें भाऊनें नानांकडे पाठविलीं ✽

परशुरामभाऊंची सुरापुरावरील मोहीम चालू असतांनाच हैदरच्या पारिपत्याचा कांहीं तरी विचार करण्याची योजना पुणें दरबारांत चालूच

---

✽ टीप—( निजामाच्या मुलखास भाऊंनीं उपद्रव दिल्याची तक्रार नानांच्या कानावर गेली होती. पण भाऊंनीं तसें काहींच केलें नव्हतें अशी निजामाची खात्री झाल्याची निजामाचीं पत्रें आलीं; तींच भाऊंनीं नानाकडे पाठविलीं या संबंधांत भाऊंच्या पत्रांतील उल्लेख खालील प्रमाणें आहे.

" इकडील वर्तमान तर नबाब निजाम अल्लीखान यांचे तालुक्यांत स्वराज्याचे अमलाविशीं वगैरे तगादा केला, सबब त्यांच्या कमाविसदारांनीं विपरीत करून लिहिलें वरून मर्जी खफा होऊन साहेब जादे व तहवारजंग यांची रवानगी आम्हावर केली. त्यावरून आम्ही आपले तर्फे कलह वाढवूं नये म्हणून भीमा दक्षिण तीर सोडून सुरापूरकरांनीं जाबसाल ठरला असतां लांबणीवर निशेचें टाकिलें. यास्तव सुरापूरनजीक आलों. साहेबजादे सेडवावर आहेत व तहवारजंग यातगिरीवर आहेत. नबाबानें महालचे कमाविसदाराचे लिहिण्याचा छान ( चौकशी ) करून पहातां आम्हांवर फौजा रवाना केल्या हें गैर झालें असें चित्तांत आणून खुषमर्जीनें आम्हांस बहुतां प्रकारें खातर जमेचीं पत्रें रा. जिवाजीपंत वकील याजकडोन लिहून पाठविलीं. तींच पत्रें राजश्री नानाकडे पाहावयास पाठविलीं आहेत. " खरे ७–ले. २४९८ ).

खांत मराठ्यांचें स्वराज्य, सरदेशमुखी बाबत जे हक्क होते त्यांचा ऐवज बरेच दिवसांत वसूल झाला नव्हता; तोही भाऊंनीं चोपून वसूल केला. भाऊंच्या या दांडगाईचा मोंगल अधिकाऱ्यांनीं मोठाच बोभाटा केला व निजामाकडे सारख्या तक्रारीवर तक्रारी जाऊं लागल्या. निजामाला या गोष्टीचा प्रतिकार करणें भागच होतें व त्यानें तहवारजंग व अल्लाउद्दौला हे आपले दोन सरदार भाऊंच्या पारिपत्याकरितां पाठविले. या दोन सरदारांची फौज व निजामानें आणखी मदतीस दिलेली फौज मिळून जवळ जवळ वीस हजार फौजेशीं गांठ घालण्याचा भाऊंवर प्रसंग आला. कोणत्याहि प्रसंगांत डर खाण्याचा भाऊंचा स्वभाव नव्हता. या प्रसंगाला उद्देशून भाऊंनीं पेशव्यांच्या भागानगरच्या वकीलाला खालीलप्रमाणें लिहिलें. "आम्हांकडून व्दैत भाव नसतां महालकऱ्याच्या लिहिण्यावरून (नबाबांची) मर्जी खफा होऊन मुकाबल्यास फौज रवाना केली आहे उत्तम आहे. आम्हीं सिद्धच आहों. जें होणें असेल तें होईल." (खरे ७ ले. २४९६) भाऊंची वीरश्री उसळून आल्याबरोबर त्यांनीं लढाईची तयारी केली खरी; पण भाऊ हे पेशव्यांच्या सरदारांपैकीं एक प्रमुख सरदार. त्यांच्या वागणूकीचें परिणाम एकंदर मराठेशाहीच्या धोरणाला बाधक होऊन चालण्यासारखें नव्हतें. आणि यावेळीं पेशवे व निजाम यामध्यें चुरस उत्पन्न होऊं न देण्याकडे कारभाऱ्यांचा कल होता. निजामानें लढाईची तयारी केली व त्याबरोबरच पुणें दरबारास भाऊंच्या वर्तनाविषयीं तक्रारीहि लिहुन पाठविल्या. या तकारी गेल्याबरोबर नानांनीं भाऊंस खालील प्रमाणें पत्र लिहिलें. "नबाब श्रीमंतांशीं अंतःकरण पूर्वक ममता करतात व या दौलतीची काळजी वागवितात. असें असतांना तुम्हीं त्याच्या तालुकियास उपद्रव देतां त्यामुळें नबाब फारच खट्टे आहेत. व जिवाजीपंत वकील यांनींहि बहुतच बखेडे आले म्हणोन लिहीलें आहे. असें न करावें. थोडक्या कामाकरितां मातबर कामास हिसका बसतो. घेतला ऐवज माघारा द्यावा." (खरे ७ ले. २४९४) नानाचें असें पत्र येतांच भाऊंनीं लढाईची मसलत सोडून दिली व लष्करचा तळ हालवून ते पुन्हां सुरापूरच्या हद्दींत आले. या संबंधीं भाऊंनीं खालीलप्रमाणें लिहीलें आहे.

९८३५
२८।८।५३



" कलह वाढवावा तर आम्हांवर शब्द येतो. तेंहि करावें, फौजहि जमा बरीच आहे, लोकहि चांगले आहेत, परंतु आम्हांवर निमित्त येतें. यास्तव काढतेंच घेतलें. " ( खरे ७-ले. २४९७ ) या प्रकरणाची नंतर निजामानें चौकशी केली त्यांत असें आढळून आलें कीं, प्रत्यक्ष निजामाच्या मुलुखाला भाऊंनीं उपद्रव दिला नव्हता. मराठ्यांचे हक्क वसूल करण्या पलीकडे त्यांनीं कांहीं केलें नव्हतें. अशा स्थितींत आपण भाऊवर फौज पाठविली हें गैर झालें असें वाटून निजामानें आपल्या वकिला मार्फत भाऊंना पत्र पाठवून त्या प्रमाणें कळविलेंहि. हीं पत्रें भाऊनें नानांकडे पाठविलीं ❋

परशुरामभाऊंची सुरापुरावरील मोहीम चालू असतांनाच हैदरच्या पारिपत्त्याचा कांहीं तरी विचार करण्याची योजना पुणें दरबारांत चालूच

---

❋ टीप—( निजामाच्या मुलखास भाऊंनीं उपद्रव दिल्याची तक्रार नानांच्या कानावर गेली होती. पण भाऊंनीं तसें काहींच केलें नव्हतें अशी निजामाची खात्री झाल्याची निजामाचीं पत्रें आलीं; तींच भाऊंनीं नानाकडे पाठविलीं या संबंधांत भाऊंच्या पत्रांतील उल्लेख खालील प्रमाणें आहे.

" इकडील वर्तमान तर नबाब निजाम अल्लीखान यांचे तालुक्यांत स्वराज्याचे अमलाविशीं वगैरे तगादा केला, सबब त्यांच्या कमाविसदारांनीं विपरीत करून लिहिलें वरून मर्जी खफा होऊन साहेब जादे व तहवारजंग यांची रवानगी आम्हावर केली. त्यावरून आम्ही आपले तर्फे कलह वाढवूं नये म्हणून भीमा दक्षिण तीर सोडून सुरापूरकरांनीं जाबसाल ठरला असतां लांबणीवर निशेचें टाकिलें. यास्तव सुरापूरनजीक आलों. साहेबजादे सेडवावर आहेत व तहवारजंग यातगिरीवर आहेत. नबाबानें महालचे कमाविसदाराचे लिहिण्याचा छान ( चौकशी ) करून पहातां आम्हांवर फौजा रवाना केल्या हें गैर झालें असें चित्तांत आणून खुषमर्जीनें आम्हांस बहुतां प्रकारें खातर जमेचीं पत्रें रा. जिवाजीपंत वकील याजकडोन लिहून पाठविलीं. तींच पत्रें राजश्री नानाकडे पाहावयास पाठविलीं आहेत. " खरे ७-ले. २४९८ ).

होती. उभयतां कारभारी कर्नाटकांत मोहीमेस निघणार असाहि पहिला बेत होता. पण मध्यंतरी इंग्रजांच्या युद्धांत सखारामबापूस फितुरीच्या आरोपावरून कैद झाल्यामुळें तो बेत आतां तहकूब राहिला. हैदरअल्ली चित्रदुर्गास वेढा देऊन बसला होता. विसाजीपंत आठवले व बाजीपंत अण्णा यांज बरोबर सात आठ हजार फौज देऊन त्यांस भाऊच्या मदतीस पाठवावें व भाऊंनीं या फौजेच्या मदतीनें चित्रदुर्गाचा वेढा उठवावा अशी नानांनीं योजना आंखली होती. पण ही योजना अमलांत येण्याच्या आधींच हैदरानें चित्रदुर्ग काबीज केलें. व त्यामुळे तो बेत तसाच राहिला. अशी स्थिती झाल्यावर नानांनीं भाऊस लिहीलें कीं, सुरापुरची मोहीम लवकर आटपती घेऊन भाऊंनीं बदामी, बागलकोटाकडे यावें, व त्या प्रांतीं रास्त्यांचीं जीं ठाणीं हैदरानें घेतलीं असतील तीं सोडविण्याचा उद्योग करावा. आणि नंतर करवीर व कित्तुर या ठिकाणीं येऊन तेथील बंडाळी मोडण्याचा प्रयत्न करावा.

हैदरअल्लीनें चित्रदुर्ग घेतल्यावर सावनुर, डंबळ, हरपनहल्ली, रायदुर्ग, कनकगिरी वगैरे संस्थानांपासून खंडण्या घेतल्या आणि कर्नुळ व अदवानी येथील नवाबापासून अनुक्रमे चार व सहा लक्ष खंडणी घेण्याचा ठराव केला. कडपेकर नवाबानें थोडासा प्रतिकार केल्यामुळें हैदरनें त्यावर हल्ला करून त्याचें राज्य घेतलें व त्याला कैदेंत टाकलें. कडपेकराचा निकाल लागल्यानंतर परशुराम भाऊवरहि छापा घालतां आला तर पहावा असा हैदराचा बेत होता. भाऊंस सावध राहाण्याविषयीं नरगुंद वगैरे ठिकाणांहून इशाराहि आला होता. व भाऊ त्याप्रमाणें सावधहि होते. भाऊंची स्थिती त्यावेळीं थोडी बिकटच होती. सुरापुरकरानें तहाप्रमाणें अजून ऐवज दिला नव्हता अर्थातच सुरापुरकराचा ऐवज वसूल झाल्याशिवाय भाऊंनां सुरापुरांतून निघतां येईना. शिवाय निजामाजवळ बिघाड झाल्यामुळें एकीकडून त्याचें भय व दुसरीकडून हैदराचा छापा येण्याचा संभव. अशा परिस्थितींत दोन्हीं बाजूंच्या बातम्या राखून भाऊंना फार सावधपणें राहावें लागत असे. भाऊ आपल्यापरी सावधच होते, पण हैदराच्या छाप्यासंबंधानें

आपण बेफिकीर आहों हें हैदराला भासविण्याचाहि उद्योग भाऊनीं चालू ठेविला होता. हैदर ज्या बाजूस होता तिकडे आपल्या लष्करपैकीं कांहीं टोळ्या भाऊ पाठवित असत. त्या टोळ्यांनीं शत्रूच्या मुलखांत लूट करावी व पोट भरावें आणि त्याच्या हालचालीवर नजर ठेवावी व जणु कांहीं आम्हांस हैदराची कांहींच पर्वा वाटत नाहीं असें त्यास भासवावें हा ह्या टोळ्या पाठविण्यांत भाऊचा उद्देश होता. ह्या वेळीं निजाम व हैदर या दोघांशीं लढाई देण्याचा प्रसंग येता तर भाऊंना तो जडच गेला असता. पण नानांच्या लिह्णयावरून भाऊंनीं निजामाच्या बाबतींत " काढतेंच घेतलें " हें बरें झालें. भाऊंच्या या धोरणामुळें निजामाशीं लढाई होण्याचा संभव फारच कमी होता.

हैदरबद्दल मात्र भाऊनां जास्त सावधगिरी बाळगणें जरूर होतें. हैदराचा धोका संभाळून सुरापूरकरांची रग जिरविण्याचें भाऊचें सामर्थ्य होतें व त्यामुळेंच त्यांनीं सुरापूरकराच्या राजधानीजवळ आपला तळ ठोकला होता.

भाऊ सुरापूरच्या हद्दीजवळ येऊन ठेपले तरी सुरापूरकर कांहींच हालचाल करीना. याचें कारण असें कीं त्यानें गुप्तरितीनें हैदराची फौज मदतीस आणण्याची योजना केली होती. ही बातमी भाऊस समजतांच त्यांनीं सामोपचाराचे सर्व मार्ग सोडून एकदम युद्ध प्रसंग करण्याचें ठरविलें या संबंधाची हकीकत त्यांनीं खालीलप्रमाणें लिहिली आहे.

" सुरापुरची बेरीज ठरून एक महिना झाला असतां आज उद्यां म्हणोन चाळवा चाळव करूं लागले त्यामुळें वाघीनगिऱ्यावर परवां पंचमी बुधवारी सडे तयार होऊन पहाटेच्या सहा घटका रात्रीस गेलो. किल्यास तोफा लाविल्या. खालील गढी घेऊन लुटली. किल्यावर लोक चढून निकड करून अर्धा किल्ला घेतला तो सावकारसुद्धां सगो निळकंठ येऊन बहुतच रदबदल केली. हातापायां पडूं लागले. याजमुळें लोक माघारें आणविले. करारप्रमाणें उदईक चिठी देतों म्हणून मुकाशाच्या जाबसालचा लढा होता यास्तव बोलोन येतों म्हणून माघारे सुरापुरास गेले, कीं षष्ठीस प्रहर

दिवस चढला नाहीं तो येतों. त्यास तो दिवस समग्र गेला. आले नाहींत. शत्रुकडील बातम्या अनेक प्रकारच्या येऊं लागल्या. दिवसगत कामाची नाहीं याजमुळें मागती काल सप्तमी भृगुवारी पहाटेची चार घटका रात्र आहे तों तयार होऊन फिरोन पहिला जागा सोडून सुरापूर व वाघिनगीरें याजमध्यें वाघिनगिऱ्यालगती गढी डोंगरावर आहे तेथून सुरापूर पाव कोसही होणार नाहीं, तेथें जाऊन तोफा लागू केल्या. अलीकडे एक बुरुज होता. त्यातील प्यादे तोफा पाहतांच गढीत गेले. मुख्य वाघिनगिऱ्याची गढी तीच तेथें तोफा सुरू करून हल्ला केला. लोक जाऊन भिताडास लागले. तो मागती सावकार घेऊन सगो निळकंठ आले. त्यांनीं करारा खेरीज वीस हजार रुपये गुन्हेगिरी जास्ती व हत्ती अेक नजर कबूल करून साहुकारी निशा दिली तेव्हां निशा चिठ्ठी घेऊन गोटास येऊन भोजन केलें. बाकीचो बागेवाडीचीं घोडी व बोली अलमेले व बागेवाडी येथील आज येतील तेथील फडशा जाहला. अतःपर एक दोन दिवशीं कूच करून कृष्णातीरास जातों. सुरापुरकर परिछिन्न अमित्राची वाट पहात होते. आम्हीं लवकर निकड केली याजमुळें निशा पटली. नाहीं तर पैका येत नव्हता. संस्थानचा भ्रम फार होता. आतां आब राहीला नाहीं. (खरे ७–ले. २४९९)✲

सुरापुरची मोहिम लवकर आटपून भाऊंनीं त्या प्रांतातली रास्त्यांचीं ठाणीं हैदरानें घेतलीं होतीं तीं सोडवावीं व नंतर करवीरकर व कित्तुरकर

---

✲ (**टीप** वाघिनगिऱ्याचा हा किल्ला पूर्वीं पेमनाईक या बंडखोरानें मोठ्या मर्दूमकीनें अवरंगजेबाविरुद्ध लढविला होता. झुलफिकारखान व सादतखान यांसारखे रथी महारथी इरेस पडून हजारों लोक मारले गेल्यावर हा किल्ला बादशहाच्या हातीं आला. परशुराम भाऊंनीं हा किल्ला पहिल्याच झटक्याबरोबर घेतल्यामुळें कै० खरे शास्त्री यांनीं मोठ्या अभिमानानें भाऊंच्या मर्दुमकी संबंधानें खालील प्रमाणें उद्गार काढले आहेत. "ज्या ठिकाणचे लोक त्यावेळीं अवरंगजेब बादशहा बरोबर वाघाप्रमाणें लढले त्याच ठिकाणच्या लोकांस परशुरामभाऊंनीं आतां कुत्र्याप्रमाणें झोडपून काढलें" (खरे ७–पा. ३४०९)

यांच्या बंदोबस्ताचें काम हातीं घ्यावें, असा पुणें दरबारचा भाऊंना हुकुम होता; व भाऊंच्या मदतीला पांच हजार फौजेसह भवानी शिवराम नांवाचे सरदारहि पुण्याहून आले होते. सुरापुरची मसलत आटपून भाऊ कृष्णातीरीं होनगुद्याच्या आसपास आले व लगेच हैदरानें काबीज केलेलीं ठाणीं सोडविण्याचा उपक्रम सुरू झाला. रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस भाऊंनीं हणम सागरचें ठाणें काबीज करण्यास पाठविलें व आपण स्वतः बाकीच्या फौजेसह होनगुद्यास आले. भाऊंनीं येतांच हल्ला करून पेठ घेतली व डोंगरांवर गढी होती. तिजवर तोफा सुरू केल्या. गढीतले लोक हत्त्यारांसुद्धां बाहेर जाण्याची परवानगी मागत होते पण भाऊंनीं ती गोष्ट मान्य केली नाहीं. हत्त्यारें खालीं ठेऊन जाण्यास तयार होतांच मात्र भाऊनीं त्यांना ज़ाऊं दिलें. शत्रूच्या लोकांस दहशत बसावी म्हणून भाऊंनीं कांहीं लोक पकडून त्यांचे हातपायही तोडविले.—हैदरखानाचा कमाविसदार सोमण्णा म्हणून होता तो व तेथील देसाई व देशपांडे सांपडले ते कैदेत ठेवण्यांत आले. रघुनाथराव कुरुंदवाडकर हणमसागरावर गेले होते. तेथील झटापटींत चाळीस पन्नास प्यादे ठार होतांच तेथला देसाई शरण आला व आठ हजार होन खंडणी देण्याचा करार करून परत गेला.

पण दुसरे दिवशीं खंडणीची रक्कम यावो ती आली नाहीं. तेव्हां रघुनाथरावांनीं हणमसागरची पेठ लुटली व खंडणी पुरता ऐवज वसूल करून ते लष्करास परत येऊन मिळाले. नंतर भाऊंनीं केरूळ, कटगिरें, बसूरकी, व मुदलाबी हीं ठाणीं घेतलीं. यापैकीं कोठही लढाई करावी लागली नाहीं. अनवाल व यादवाड येथेंहि ठाणीं बसलीं. केसूरचें ठाणें मजबूत होतें तेथें तोफा लाऊन हल्ला करण्याची भाऊंनीं तयारी करतांच आंतले लोक शरण आले व त्यांनीं तें ठाणें सोडून दिलें. एक बदामीच्या किल्याखेरीज बाकीची जेवढीं रास्त्यांचीं ठाणीं हैदरनें घेतलीं होतीं तेवढीं सर्व परशुरामभाऊंनीं परत घेऊन रास्त्यांच्या स्वाधीन केलीं. सुरापुरावरील ही मोहीम भाऊंनीं सन १७७९ च्या जानेवारींत सुरू केली ती त्याच वर्षाच्या मे अखेरपर्यंत चालू होती. ही कामगिरी झाल्यावर भाऊंनीं करवीरकरांचा बंदोबस्त करावा असा नानांचा हुकूम होता, त्याची अंमलबजावणी करण्याकरितां भाऊ करवीरकरांकडे वळले, ती हकीकत पुढील स्वतंत्र प्रकरणांत येईल.

## प्रकरण १० वें

# करवीरकरांचा बंदोबस्त.

पुणें दरबारास बाहेरचे शत्रू होते तसेच घरांतलेही होते, आणि वेळीं राजरोस शत्रु पुरवतो पण घरांतला पुरवत नाहीं हा अनुभव पेशव्यांस चांगलाच आला होता. सवाई माधवरावाच्या जन्मापासून राघोबाशीं घरांतलें भांडण चालूच होतें, त्यांत आतां आणखी करवीरकरांच्या भांडणाची भर पडली. घरभेद्यांचा नेहमीचाच खाक्या असाकीं घराचे शत्रु ते घरभेद्यांचे जानी दोस्त. या न्यायाला अनुसरून मराठ्यांचा राजरोस शत्रु जो हैदर अल्ली त्याची नेहमींच राघोबा व कोल्हापूरकर यांना मदत असे. अशा स्थितींत हैदरअल्ली व कोल्हापूरकर या दोघांचाही समाचार घेण्याचें काम पुणें दरबारास करावयाचें असल्यामुळें करवीरकरांची मसलत पार पाडण्यास नानांनीं महादजी शिंद्यास गळ घातली. महादजी नानाची कामगिरी उठवी पण प्रत्येक वेळीं नानाच्या अडचणींचा फायदा घेऊन आपलें जादा जहागिरीचें घोडें पुढें दामटीत असे. दहा लक्षांची जहागीर व अशीरगडचा किल्ला शिंदे मागत होते. हें देणें दिल्याशिवाय शिंद्याचें पाऊल हालेना. एवढी मोठी जहागीर एकाच सरदाराला द्यावी तरीही कठीण, न द्यावी तर करवीरकर हैदराच्या मदतीनें राज्य ग्रासीत चालले तें उघड्या डोळ्यांनीं पहावें लागण्याचा प्रसंग येणार. शेवटीं नानानीं शिंद्यांचें मागणें मान्य करून

त्यांची रवानगी करवीरकरांवर केली. *

महादजी शिन्दे कोल्हापूरकडे निघण्यापूर्वींच नानानें रामचंद्र गणेश कानडे या सरदारास कोल्हापूरकडे पाठविलें होतें. सन १७७७ च्या मे महिन्यांत रामचंद्र गणेश व कोल्हापूरचा येसाजी शिंदे याजमध्यें कवठे-हिंगण गांव या ठिकाणीं लढाई होऊन येसाजी शिंद्याचा पूर्ण पराजय झाला होता. ( खरे ६-२११६-२११९ ) मागाहून महादजी शिंदे आले त्यांनीं वडगांव, हेरलें, कडोली, आळतें वगैरे ठाणीं झपाटचानें घेऊन सन १७७८ च्या जानेवारींत खुद्द कोल्हापुरास वेढा दिला. असें होताच कोल्हापूरकर तहाला आले. या तहांत कोल्हापूरकरानीं पेशव्यास वीस लक्ष रुपये द्यावे, सहा लक्षांची निशा पटल्यावर शिंद्यांनीं मोर्चे उठवावे, बाकीचे रुपये चार महिन्यानीं द्यावे, चिकोडी, मनोळी, वगैरे पेशव्यांचा मुलूख घेतला होता तो परत द्यावा, दादासाहेब व हैदरअल्ली याशीं कांहीं संबंध ठेऊं नये वगैरे कलमें होती. हा तह पुरा होतो न होतो तोंच पुण्यास मोरोबाचें कारस्थान जोरांत आल्यामुळें कोल्हापूरच्या बंदोबस्तासाठीं पांच हजार फौज ठेवून बाकीच्या फौजेसह शिंद्यानीं तत्काळ पुण्यास यावें अशीं नानांची शिंद्याना पत्रें आलीं. कोल्हापूरकरांबरोबर तहाच्या वाटाघाटी चालू असतानांच नानांची हीं पत्रें शिंद्यांस आलीं. इतकें होईपर्यंत सन १७७८ चा मार्च महिना उजाडला. मोरोबाच्या बंडखोरीची वर्तमानें महादजीस कळतांच महादजीनें पहिली गोष्ट केली ती ही कीं त्यानें मोरोबाचा साथीदार जो तुकोजी होळकर त्यास कोल्हापूराहूनच असा स्पष्ट निरोप पाठविला कीं मोरोबाच्या नादीं लागून तुम्हीं राज्यांत बंडाळी कराल तर ती चालणार नाहीं. ( अ. यो. पा. ९७ ) या निरोपामुळें महादजी आपल्याला ताठ विरोध करणार हें होळकर व मोरोबा समजून चुकले. अर्थातच महादजींविरुद्ध कांहींतरी उपाय योजणें मोरोबास जरूर वाटून त्यानें करवीरकराकडे असें

* ( टीप--शिंद्यांनीं जादा जहागीर मागितल्याची हकीकत खरे ६-२०७४, २१९०, २२०० या पत्रांत आहे. आणि करवीरकरांनीं हैदरची मदत मिळविल्याचा उल्लेख खरे ६-२०७९ या पत्रांत आहे. )

संधान लाविलें कीं करवीरकरानी महादजी बरोबर केलेला तह मोडून युद्ध चालू ठेवावें. करवीरकराना पुण्याहून मदत करण्याचें आश्वासनही मोरोबानें दिलें. मोरोबाने लावलेल्या या मधाच्या बोटाला करवीरकर बळी पडले व त्यांनीं महादजी बरोबर केलेला तह मोडून पुन्हां युद्ध सुरू केलें. पुण्याच्या दरबारांत नानाची पिच्छेहाट व मोरोबाला इंग्रजांची मदत या गोष्टी करवीरकरांनीं ऐकल्या होत्या. म्हणून केलेला तह मोडण्यास करवीरकरांस अवसान आलें. पण मोरोबा पुण्यास, इंग्रज मुंबईस आणि महादजी मात्र करवीरकरांच्या उरावर कोल्हापूरास तळ देऊन बसला होता. तह मोडल्याचें समजतांच महादजीनें करवीरकरांवर असा तोफांचा जबरदस्त भडीमार सुरू केला कीं दर गोळ्यास शेंकडो घोडीं व माणसें पटापट मरूं लागलीं. हें पाहून करवीरकरांस पुन्हां पूर्वीचाच तह कायम करून युद्ध बंद ठेवण्याची याचना महादजीकडे करावी लागली. करवीरकरांनीं पूर्वींचा तह कबूल केल्यामुळें महादजीनेही करवीरकराच्या म्हणण्यास मान्यता दिली. हा तह १७७८ च्या एप्रीलमध्यें झाला. *

नंतर कांहीं काल तहाच्या कलमांच्या वाटाघाटींत गेला. आणि तहाच्या कलमांचा फडशा होऊन कोल्हापूरच्या मोहिमेचें काम संपल्यावर महादजीनें सन १७७८ च्या मे महिन्यांत करवीर येथून आपला मुक्काम हालवून तो पुण्यास मोरोबाची बंडाळी मोडण्यास निघाला. महादजीजवळ करवीरकरानीं केलेला तह केवळ नाईलाजानेंच केला होता. महादजी, पटवर्धन वगैरे सरदार पुण्यांत मोरोबाची बंडाळी मोडण्यात गुंतल्यामुळें आपणाला आतां रान मोकळें आहे, अशा समजुतीनें करवीरकरांनीं पुन्हा उचल केली. शिद्यानीं केलेल्या तहांत पेशव्याना द्यावयाच्या रकमेपैकीं अकरा लक्ष रुपयाची बाकी द्यावयाचे कलम होते. या रकमेला करवीर दरबारातले अमात्य प्रतिनिधी वगैरेना शिद्यानी जामीन घेतले होते. करवीरकरांनीं खलबताकरितां या लोकांस भेटीस

* टीप—(करवीरकरांनीं केलेला तह खरे खंड ६–२३११ या पत्रांत आहे. )

बोलावून कैद केले व शिंद्यास देऊं केलेल्या रकमेपैकीं पांच लक्ष रुपये पोचल्याची पावती त्यांच्याकडून लिहून घेऊन त्याना सोडून दिलें. करवीर दरबारांतील आपाजी शामजी नांवाच्या एका मोठ्या जहागिरदारास पकडून त्याच्याकडून पैसे उकळण्याचा करवीरकरांनीं प्रयत्न केला, व त्याच्या ताब्यांतल्या ठाण्याच्या सोडचिठ्ठ्या लिहून घेतल्या. परंतु कांहीं ठाणेदारांनीं चिठ्ठ्या लिहून देण्याचे नाकारल्यामुळें करवीरच्या महाराजांनीं आपाजी शामजीवर क्रुद्ध होऊन त्याचे डोळे काढविले. शिंद्याशी केलेल्या तहात चिकोडी, मनोळी ही ठाणीं पेशव्यास द्यावयाची होती व कागलचें ठाणें कागलकर घाटग्याना द्यावयाचें होतें. पण ही तीन्हीं ठाणीं जबरदस्तीनें घ्यावयाची मसलत कोल्हापूरकरांनीं ठरविली, व त्याप्रमाणें चिकोडी घेण्याकरितां सात आठशें स्वार व दोन हजार पायदळ बरोबर घेऊन सटवोजी भोसले स्वारीस निघाले. स्वतः महाराज व येसाजी शिंदे यानीं कागलासही वेढा दिला. पण चिकोडीकरांनीं घाटग्याना मदत केल्यामुळें महाराजास कागलचा वेढा उठवावा लागला. सटवोजी भोसलेही चिकोडीवर निघाला होता. तो येळगुडच्या ठाण्यास वेढा देऊन बसला होता. त्यावरही चिकोडीकरांनीं छापा घालून त्याला लुटून पिटाळून लावलें. चिकोडीकराची याप्रमाणें सरशी झाली, तरी पुन्हां येसाजी शिंद्यानें कागलवर चाल केली. कागलकर घाटग्यांनीं जोराचा प्रतिकार केला पण वेळेवर कोणाची मदत न मिळाल्यामुळें कागलचें ठाणें त्यास सोडावे लागलें. येसाजी शिंद्यानें येळगुडचें ठाणेंही घेतलें. इतके होईपर्यंत १७७८ साल खलास झालें व १७७९ चा जानेवारी महिना उजाडला. यावेळीं पेशव्यांचे इंग्रजाजवळ युद्ध सुरू होतें. व परशुरामभाऊ सुरापूरच्या मोहिमेवर होते. अर्थातच् करवीरकराना मोकळे रान सापडल्यामुळें त्यांनीं त्याचा चांगलाच फायदा घेतला. इंग्रजांशीं युद्ध संपल्यावर उभयतां कारभाऱ्यानीं हैदरच्या बंदोबस्ताकरतां कर्नाटकांत स्वारी करावी असा बेत पुण्याच्या दरबारांत घाटत होता. व तसें झालें असतें तर क़र्नाटकांत जाताना वाटेंत करवीरकरांचाहि बंदोबस्त त्यांनीं केला असता. पण इंग्रजांच्या युद्धानंतर सखारामबापूला फितुरीच्या

आरोपावरून कैद झाल्यामुळें तो बेत तसाच राहिला. तेव्हां नानानी परशुरामभाऊ सुरापुरच्या मोहिमेवर होते त्यांना असें कळविलें कीं भाऊनीं सुरापुरची मोहिम लवकर आटपून करवीरच्या बंदोवस्तास जावें. नानाच्या या हुकुमाप्रमाणें भाऊ सुरापूरची मोहिम आटपून १७७९ च्या मे महिन्यांत करवीरकराचा बंदोवस्त करण्याकरितां त्याच्या कटकोळ परगण्यांत येऊन उतरले. कटकोळ परगण्यात भाऊ येतांच त्यांनीं जरवेने बन्नुर व कटकोळ या ठाण्यांतून अनुक्रमें तीस व दहा हजार रुपये खंडणी वसूल केली. नंतर तोर्गलच्या ठाणेदारापासून थोडीबहूत खंडणी घेऊन भाऊ मनोळी तालुक्यातील सतीगीरें ठाण्यावरून गोकाककडे आले इतकें होईपर्यंत सन १७७९ चा जून महिना उजाडला. पावसाळा जवळ आल्यामुळें आठपंधरा दिवसांत भाऊस साधेल ती कामगिरी करावयाची होती. गोकाकचें ठाणें कित्तुरकर देसाई बळकावून बसला होता. व त्या ठाण्याच्या आसऱ्यानें तो तेरदाळ परगण्यास उपद्रव देत होता. शिवाय करवीरकराची अकिवाट व शिरोळ या ठाण्यांचाहि पटवर्धनाना उपद्रव होत होता. अकिवाट, शिरोळ व गोकाक ही तीन्ही ठाणीं घेण्याचा या स्वारीत भाऊचा मनसुबा होता. पण पावसाळा जवळ आल्यामुळें ही तीन्ही ठाणीं एकदम घेता येण्यासारखी नव्हती. म्हणून पहिल्यानें अकिवाट घेण्याचें ठरवून त्याप्रमाणें भाऊनीं अकिवाटला वेढा दिला. अकिवाटकरांनीं जोराचा प्रतिकार केला. त्यांनीं तीन आठवडेपर्यंत तें ठाणें मोठ्या शिताफीनें लढविलें. भाऊनीं मोर्चेबंदी करून तोफाच्या मारगिरीनें तटाच्या भिंतीस खिंडारें पाडून हल्ला केला, तेव्हां आतले लोक जिवावर उदार होऊन मोठ्या आवेशाने लढले. आतल्यापैकीं शेवटचा शिपाई मारला जाईपर्यंत उभयपक्षी हत्यार थांबलें नाहीं. त्यामुळें अकिवाट काबीज होईपर्यंत भाऊंची हानी फार झाली. नुसत्या हल्ल्यांतच त्यांचे नामी नामी दोनतीनशें माणूस ठार झाले, आणि तलवारीच्या व दगडाच्या जखमा लागलेल्यांची संख्या सातशेंपासून आठशेंपर्यंत होती इतकें होईपर्यंत जून महिना संपत आला आणि पावसाळा सुरू झाल्यामुळें मोहिमेचें काम तहकूब झालें.

पावसाळ्याचे चार महिने संपल्यावर परशुरामभाऊंनीं सन १७७९ च्या नोव्हेंबरात पुन्हां मोहिमेचें काम सुरू केलें. मिरज, तासगांव, कुरुंदवाड येथील पथकें बरोबर देऊन त्यांनीं चिकोडी परगण्याच्या रक्षणाकरता रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस पुढें पाठविलें. करवीरकरांवरील या मोहिमेला खर्च व मदत पुणें दरबारकडून अजून कांहींच झाली नव्हती. सर्व भार भाऊंनाच सहन करावा लागत होता. मोहीम जास्त काळ चालणार व खर्चही फार होणार याकरता मदतीची कांहींतरी व्यवस्था पुणें दरबारकडून व्हावी म्हणून खटपट करण्याकरतां स्वतः परशुरामभाऊ पुण्यास गेले. पुण्यास भाऊंचा मुक्काम असतां फौजेच्या मागील देण्याचे लढे होते, ते पुणें दरबारकडून उरकून घ्यावे व चालू सालच्या मोहिमेची खर्चाची तरतूद करावी अशी भाऊंची खटपट चालू होती. पण भाऊंच्या या म्हाणण्याचा पुणें दरबारनें कांहींच विचार केला नाहीं. मिष्ट भाषणाखेरीज भाऊंना नानाकडून जास्त कांहींच मिळालें नाहीं. भाऊंनीं स्वारीचा खर्च स्वारीतूनच भागवावा असें नानाचें म्हणणें पडलें. नानाच्या या म्हणण्याचा भाऊंना अर्थातच थोडा राग आला, व ते रुसल्यासारखे करून पुण्याहून कात्रजेस गेले. हरिपंततात्यानीं भाऊंची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण हरिपंतहि नानाकडून भाऊना कांहीं मदत देववू शकले नाहींत. शेवटीं पुण्यास तीन महिने राहून कंटाळल्यावर भाऊ मिरजेस येऊन पुन्हां करवीरच्या मोहिमेवर हजर झाले, इतकें होईतों सन १७८० चा फेब्रुवारी महिना उजाडला रास्ते, प्रतिनिधी, अक्कलकोटकर वगैरे लोकांचीं पथकें भाऊंबरोबर चाकरीस होती. एकंदर सरंजाम दहा हजारावर असून शिवाय पायदळ व तोफांचाहि सरंजाम चांगला होता. या सरंजामाच्या जोरावर करवीरकरांचा समाचार आपण घेऊं अशी भाऊंना धमक होती, व पुण्याहून मदतीची निराशा झाली तरी धीर न सोडतां ते करवीरकरांच्या मोहिमेवर त्यांच्या नेहमीच्याच उत्साहानें रुजू झाले.

स्वारीची सर्व तयारी होतांच भाऊंनी पहिल्यानें करवीरकराच्या शिरोळ या ठाण्यावर हल्ला करण्याचें ठरविलें. शिरोळ हें करवीरकरांचें ठाणें मिर

जेपासून सात मैलावर असून मध्यें कृष्णा नदी आहे. उन्हाळयांत नदीचें पाणी ओसरल्यावर शिरोळकरानी मिरजेला व आजूबाजूच्या खेडयांना उपद्रव द्यावा हें नेहमी घडत असे. या उपद्रवामुळें शिरोळचें ठाणें कायमचेंच काबीज करावें असा पटवर्धनांचा बेत होता, पण तो अजूनपर्यंत साधला नव्हता. करवीरकरांनीं महादजीजवळ तह ठरविला त्यांत शिरोळ ठाण्यांबद्दल दोन लक्ष रुपये देण्याचें करवीरकरांनीं कबूल केल्यामुळें शिंद्यानी शिरोळचा मुद्दा सोडून दिला होता. पण करवीरकरांनीं शिंद्याजवळ केलेला तह मोडल्यामुळें आतां शिरोळ घेण्यास चांगली संधी आली असें समजून भाऊंनी पहिल्यानें शिरोळवरच आपला मोर्चा वळविला. सन १७८० च्या एप्रील महिन्यापर्यंत स्वारीची सर्व जुळवाजुळव झाल्यावर त्याच महिन्यांत भाऊंनीं शिरोळला वेढा दिला. ठाण्यांतले लोक मोठया मर्दुमकीनें सुमारें तीन आठवडेपर्यंत निकराने लढले. याच सुमारास मानाजी फांकडे हैदरच्या कैदेतून सुटून करवीरकरांच्या आश्रयास आले होते. मानाजी फांकडे, सटवोजी भोसले, येसाजी शिंदे वगैरे करवीरकरांकडचे लोक कमीं पराक्रमी नव्हते. परंतु भाऊंसमोर येऊन लढण्यासारखी त्याच्याजवळ तयारी नव्हती. यामुळें शिरोळकरास मदत करण्याचें काम करवीरकरांकडून झालें नाहीं. भाऊंनी तोफांच्या माऱ्यानें शिरोळची तटबंदी जागोजाग ढासळून पाडिली व तारीख १ मे १७८० रोजी मोठा हल्ला करून ठाणें घेण्याचा निश्चय ठरविला. हल्ला झाला तेव्हां साऊ देवपूजा करीत बसले होते. हल्ला झाल्याची बातमीं येतांच देवपूजा तितकीच टाकून पळत जाऊन ते हल्ला करणाऱ्यांच्या पुढच्या रांगेत निशाण होतें त्यापाशी जाऊन ऊभे राहिले. हल्ला झाला. घटकाभर वीरश्रीची उभयपक्षी खडाजंगी होऊन शेकडों माणसें मारली गेली. ढाण्यावर पेशवे सरकारचें निशाण फडकूं लागले. आणि मग भाऊंनी परत येऊन स्वस्थपणानें देवपूजा वगैरे ब्रह्मकर्म समाप्त केलें. *

---

* टीप--( परशुरामभाऊ सारख्या धर्मनिष्ठ ब्राह्मणानें देशकाल परिस्थितीकडे लक्ष देऊन क्षात्रधर्म स्वीकारला तरी आपल्या ब्रह्मकर्माला+

शिरोळचें ठाणें काबीज झाल्यावर हुकेरी व सोंडूर हीं ठाणी घेतली. अकिवाट, हुकेरी, सोंडूर व शिरोळ या करवीरकरांच्या ठाण्यापासून पटवर्धनी मुलुखाला फार उपद्रव होत होता. हीं चारही ठाणीं घेतल्यामुळें करवीरकराचा उपद्रव आतां बंद झाला. नंतर भाऊंनी सन १७८० च्या मे महिन्यांत सामानगडाकडे आपला मोर्चा वळविला. सामानगडाकडे जातांना करवीरकरांचा बंदोबस्त राखण्याकरितां भाऊंनी इचलकरंजीकर व्यंकटराव घोरपडे यांस करवीरकरांच्या तोंडावर ठेविलें. करवीरकराकडे पेशव्यांच्या मुलुखांतून रसद जाते ती बंद करावी, घेतलेली ठाणीं राखावी आणि करवीरकर येसाजी शिंदे वगैरे सरदारास जरबेंत ठेवावें अशी कामें भाऊंनी व्यंकटराव घोरपड्यावर सोंपवून भाऊ सामानगडाकडे वळले. सामानगडाकडे असतांना भाऊंनी कापशीकर सेनापतीचे कांहीं गांव सामानगडकऱ्यानी घेतले होते ते सोडवून कापशीकर सेनापतीच्या स्वाधीन केले. या कामगिरीत भाऊंचे पंधरा दिवस मोडले. या अवधीत कित्तूरकर देसायाशी तहाचें बोलणें घाटत होते. परंतु तें बोलणें उडवाउडवीचेंच होतें अशा स्थितीत कित्तुरकर देसाई गोकाकच्या ठाण्यांत असल्याची बातमी भाऊंस सामानगडच्या मुक्कामींच समजली. कित्तुरकर गोकाकचा आसरा धरून बसला आहे असें समजतांच भाऊंनी लगेच गोकाकेस जाण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें रघुनाथराव कुरुंदवाडकर यास पुढें पाठविलें. कित्तुरकरांची व रघुनाथरावाची गांठ पडून लढाई झाली. त्यांत कित्तुरकराचा पराभव झाला. इतकें होतें तोंच परशुरामभाऊ सर्व लष्करासह गोकाकेस येऊन

---

+फाटा दिला नव्हता. तरी वेळ येतांच आपण होऊन पत्करलेल्या क्षात्रधर्माबद्दल ते किती कर्तव्यनिष्ठ होते व देवपूजा सोडून ते रणांगणावर कसे हजर झाले तें खालील पत्रावरून दिसून येतें. " आतांच दोन प्रहरीं गोपाळपंत सोनी यांचे मोर्च्याकडून लोक बुरुजावर चढले. तों श्रीमंत राजश्री भाऊसाहेब देवपूजा करीत होते. तसेच निघोन तेथें गेले. हल्ला घुमटावरी झाली. घुमट फत्ते झाला. फार करून लोक आंत सांपडतील बाहेर जाऊं पावणार नाहींत. श्री कृपेकरून फत्ते झाली " खरे ७-२५३२ )

पोचले. दुसरे दिवशीं मोर्चेबंदी होऊन गोकाकेवर तोफांची मारगिरी सुरू झाली. देसाई गोकाकेंत कोंडला गेला. त्याच्याजवळ तीनशे स्वार व हजार बाराशें प्यादे होते, परंतु बाहेरून नाकेबंदी झाल्यामुळें दाणावैरण व दारुगोळ्याचा पुरवठा बंद झाल्यामुळें कित्तुरकराचा कांहीं इलाज चालेनासा होऊन तो भाऊच्या स्वाधीन झाला. भाऊनी गोकाकेस आपलें ठाणें बसवून कित्तूरकर देसायास मिरजेच्या किल्ल्यांत कैदेंत ठेविले.

करवीरकरांच्या बंदोबस्ताकरितां भाऊनी व्यंकटराव घोरपड्यास ठेविल्याचे मागे सांगितलेच आहे. करवीरकरांनीं भाऊंजवळ तहाचे बोलणें सुरू ठेविलें होतें पण तें उडवाउडवीचेंच होतें. करवीरच्या दरबारांत येसाजी शिंदे, सटवोजी भोसले, आणि नुकताच करवीरकरांच्या आश्रयांस आलेला मानाजी फांकडे हे प्रमुख लोक होते. हे मोठे उपद्व्यापी असून कोणतीहि गोष्ट सरळपणानें करणारे नव्हते. तहाचें बोलणें सुरू असतांच या तिघानी व्यंकटराव घोरपड्यास न जुमानता कोल्हापूराबाहेर पडून वाळवे, इस्लामपूर, कऱ्हाडपर्यंत गांव लुटण्याचा व जाळण्याचा सपाटा चालविला कोल्हापुरकरांच्या या उपद्रवाच्या तक्रारी पुणें दरबारपर्यंत गेल्या. व्यंकटरावाला ही कामगिरी आटपत नाहीं असें पाहून भाऊनी गोकाकच्या मुक्कामाहून आपले ज्येष्ठ पुत्र रामचंद्रआप्पा यांच्यावरोबर चार हजार फौज देऊन त्याला कोल्हापूरकरावर पाठविलें. रामचंद्रआप्पाची ही पहिलीच स्वारी होती. त्यानी लांब मजला मारुन कोल्हापुरकरांना वाघापूर मुक्कामी अचानक गांठले. या ठिकाणी लढाई होऊन करवीरकरांचा एवढा जबरदस्त पराभव (सन १७८० जून) झाला कीं येसाजी शिंद्यास दहा स्वारांनिशि करवीरास पळून जावे लागले. (खरे ७–२५४४,४५,४६) असा प्रकार झाल्यावर करवीरकरांनीं लढाई बंद केली, व तहाचें बोलणें सुरूं केलें मानाजी फांकडे व सटवोजी भोसले यांस दरबारांतून काढून लावण्याचें कबूल केलें. मानाजीची जहागीर श्रीमंतानी जप्त केली होती ती सोडण्यास नाना तयार होते. पण नानाचा विश्वास मानाजीला न पुरविल्यामुळें तो श्रीमंताच्या पदरी येण्यापेक्षां सावंताच्यावाडीस जाण्याच्या विचारांत होता. परंतु मानाजीस आपल्या राज्यांत थारा देऊ नये असे पेशव्यानीं सावंतास

कळविल्यामुळें मानाजीचा तिकडे जाण्याचा मार्ग बंद झाला. तेव्हां तो तूर्त करवीरासच राहिला. मानाजीजवळ फौजफाटा कांहीं नसल्यामुळें तो करवीरासच राहिल्याबद्दल भाऊंनीं कांहीं तक्रार केली नाहीं. परन्तु सटवोजी भोसल्याची गोष्ट निराळी होती. त्याच्याजवळ फौजफाटा सरंजाम वगैरे सर्व असल्यामुळें त्याचा निर्वाह धामधुमीवरच चालावयाचा. पण उभयपक्षीं लढाई बंद झाल्यामुळें सटवोजीची मात्र फारच पंचाईत झाली. सटवोजीनें भाऊंकडे सल्ल्याचा पैगाम लाविला. भाऊंना कसेही करून ही ब्याद करवीरच्या राज्यातून बाहेर काढावयाचीच होती. भाऊंनीं त्याला इमान-पूर्वक कळविलें कीं तुम्ही करवीरकरांचा आश्रय सोडून आम्हाकडे निघून या. पेशवे सरकारांतून तुमची सोय लाविली जाईल. भाऊचें हें बोलणें मान्य करून सटवोजी करवीराहून निघाला तो मिरजेच्या आसपास भाऊचें लष्कर होतें त्याच्यासमीप येऊन उतरला. त्यास मानसन्मानानें आणण्या-करितां भाऊनी जनोबा सुभेदार याला पाठविलें. पण जनोबा सुभेदार हा फौजबंद असा गेल्यामुळें सटवोजीस त्याचा संशय येऊन आपण भाऊंच्या हातात सांपडतो कीं काय असा विचार त्याच्या मनांत आला. भाऊंचें व आपलें बनले तर ठीक. पण न बनले तर भाऊंच्या प्रतिबंधात कायमचें राहाण्याचा प्रसंग आपणावर येईल हा विचार त्याच्या मनांत येऊन त्याचें मन चलबिचल झालें. अशा स्थितीत त्यानें पुन्हां करवीरास जाण्याचा विचार केला व बरोबर आणलेले जडसामान बुणगे वगैरे तसेंच टाकून तो सडा खजिन्यासह पळून गेला. भाऊंना ही बातमी समजतांच त्यांनीं जनोबा सुभेदारास तात्काळ त्याच्या पाठलागाकरितां पाठविलें. जनोबानें त्याला गाठून त्याचा खजिना जडजवाहीर वगैरे सर्व लुटून पुरते फस्त केले. पण सटवोजी मात्र सांपडला नाहीं. कसाबसा जीव बचावून त्यानें करवीर गांठलें.

सटवोजी भोसले करवीरकरांकडे पळून गेल्याची हकीकत सन १७८० च्या ऑक्टोबरमध्यें घडली. उभयपक्षी युद्ध बंदच झालें होतें. यामुळें परशुरामभाऊंची करवीकरांवरची मोहीम येथेंच संपली असें

म्हणण्यास हरकत नाहीं. करवीरकरांनीं यानंतर दोनतीन वर्षे कांहीं हालचाल केली नाहीं, तथापि करवीरकरांनीं वेळोवेळी महादजी शिंदे, भाऊ यांजबर बर जे तह केले होते ते पाळले नव्हते. अनेक बाबी निकालांत निघावयाच्या होत्या. म्हणजेच करवीरकरांचें प्रकरण कायमचे निकालांत निघाले असें झालेच नव्हते. पण सन १७८० ते १७८३ पर्यंत करवीरकर व पेशवे यांचे युध्दप्रसंग झाले नाहींत. सन १७८३ सालातील विशेष गोष्ट म्हणजें भाऊंनीं त्या सालच्या ऑक्टोबर महिन्यांत भुधरगडावर स्वारी केली. भुधरगडच्या गडकऱ्यांनीं राजाविरुध्द बंड केलें होतें. बंडांत त्याचा निभाव लागत नाहीं असें पाहतांच गडकऱ्यांनी भुधरगड चिकोडीकराच्या स्वाधीन केला. चिकोडीकरांनीं भुधरगड भाऊंच्या हवाली केला. करवीरकरांनीं महादजी शिंद्याजवळ जो तह केला होता त्याप्रमाणें पेशव्यास त्यांनीं खर्चाबद्दल पंधरा लक्ष रुपये द्यावयाचे होते. ही रक्कम दिल्यावर चिकोडी, मनोळी तालुक्यांतल्या ठाण्याखेरीज करवीरकरांची पेशव्यांनीं घेतलेलीं सर्व ठाणीं त्यांस परत द्यावयाची होती. ही ठाणीं म्हणजे अळतें, वडगांव, कोडोली व शिरोळ ही होत. अकिवाट, हुकेरी, सोंडूर ही चिकोडी मनोळीपैकीं असल्यामुळें ती द्यावयाची नव्हती. करवीरकरांनीं तहांतील रकमेची अर्धीमुर्धी फेड केल्यावर आपली ठाणीं परत मागितली. त्याप्रमाणें पेशव्यानीं कांहीं ठाणीं परत दिली. पण ठाणीं परत दिल्यावर करवीरकरांनीं बाकीच्या रकमेचा फडशा करावयाचा तो मात्र केला नाहीं. पेशव्याच्या वतीनें भाऊंनी भूधरगड घेतल्यामुळें करवीरकर नाखूष होऊन तंटचास आणखी एक कारण उत्पन्न झालें. आपण भूधरगड घेतला व सामानगडच्या स्वारीत कापशीकर सेनापतीची ठाणीं करवीरकरांकडून सोडवून कापशीकरांच्या स्वाधीन केली ह्या गोष्टी करवीरकरांस आवडणाऱ्या नव्हत्याच. अर्थात तहांतील शिल्लक राहिलेलीं कलमें व बाकीच्या रकमेचा फडशा करवीरकराकडून करून घेण्याकरितां त्यांच्यावर स्वारी करण्याखेरीज मार्ग नाहीं असें पाहतांच नानानीं परशुरामभाऊंस करवीरकरांवर स्वारी करण्याचा हुकुम दिला. स्वारीचा हुकुम होतांच

भाऊंनी रघुनाथराव कुरुंदवाडकर यास करवीरच्या रोखें कूच करण्याकरितां पुढें पाठविलें. रघुनाथरावाबरोबर त्याचे स्वतःचे व मिरजकरांचे पथक व भाऊंच्या पथकापैकीं थोडे लोक मिळून सुमारें पांच हजार स्वार, शिवाय हजार पंधराशें पायदळ व कांहीं तोफा असें सामान होतें. बाकीची फौज भाऊंजवळ तासगांवीं होती.

करवीरकरांजवळ फौजफाटा फारसा नव्हता. त्यांचा सगळा जोर भाऊंच्या हातावर तुरी देऊन करवीरकरांच्या आश्रयास पळून गेलेल्या सटवोजी भोसल्यावर होता. सटवोजी ह्यावेळीं पन्हाळ्यास जाऊन राहिला होता. त्याचा समाचार घेण्याकरतां भाऊंच्या हुकुमाप्रमाणें रघुनाथराव कुरुंदवाडकर निघाले ते इचलकरंजीवरून संभापुरापर्यंत आले. त्यांच्याशीं गांठ घालण्याच्या भानगडींत न पडतां सटवोजीनें बत्तीस शिराळ्याकडे पोबारा केला व त्या बाजूचे गांव लुटून फस्त केले. तो दूर गेलासें पाहतांच रघुनाथरावानें कोडोलीच्या ठाण्यास वेढा घालुन तें काबीज केलें. इकडे सटवोजीचा पाठलाग करण्याकरितां भाऊंनी तासगांवाहून दुसरी फौज बत्तीस शिराळ्याकडे पाठविली. भाऊंची फौज येतांच सटवोजी बत्तीस शिराळ्याहून निसटला तो पुन्हां पन्हाळ्यास आला. पन्हाळ्यास आल्यावर त्यानें पुन्हां लुटालूट करण्यास सुरवात केली. लांबलांब दौडी करून त्यानें मायणीपर्यंतचे गांव लुटले. भाऊंना हें वर्तमान समजतांच भाऊ स्वतः त्याच्या पाठीस लागले. तेव्हां सटवोजीने मायणीहून अथणीकडे पलायन केलें. अथणीहून तो संकेश्वराकडे गेला व तेथून लुटालूट करीत तो सामानगडाकडे आला. बत्तीसशिराळें, मायणी, अथणी, संकेश्वर हीं सर्व स्थळें करवीरच्या आजूबाजूस सुमारें पन्नास कोसांच्या आंतबाहेर असून त्या सर्व ठिकाणीं सटवोजीनें मोठाच धुमाकूळ मांडला. सटवोजी सामानगडाकडे गेल्याचें कळतांच रघुनाथरावानें सामानगडाकडे कूच केलें आणि भाऊ संकेश्वराकडे येऊन राहिले. अशा तऱ्हेनें सटवोजी दोहोंबाजूनीं अडकला गेल्यामुळें त्याचा नाईलाज झाला. रघुनाथरावानें सांमानगडाला शह देऊन हलकर्णीचें ठाणें हल्ला करून घेतलें. लढाईंत आतां आपला परिणाम लागणें

कठीण असें करवीरकरांना समजून आल्यामुळें त्यांनीं भाऊंकडे तहाची याचना केली. बाळ जोशीराव व शिवराम सुरनीस हे करवीरकरांमार्फत तह ठरविण्यास आले. तहाच्या वाटाघाटी चालत असतांनाच भाऊंनी कित्तुरची खंडणीं वसूल करण्याकरितां त्या संस्थानावर स्वारी केली. कित्तुरकरांचें देसनूरचें ठाणें हल्ला करून कावीज केल्यावर भाऊंनी कित्तुरास वेढा घालण्याची तयारी केली. इतकें होतांच कित्तुरकर देसाईण शरण येऊन तिनें खंडणीचा जाबसाल चुकता करून दिला. इकडे करवीरकरानींहि भाऊंच्या म्हणण्याप्रमाणें तह कबूल करून खंडणीचा ऐवज कांहीं रोख दिला व बाकी पांच लक्ष रुपये ह्प्तेबंदीनें देण्याचें कबूल करून मनोळी व अळतें या तालुक्याचा वसूल या रकमेच्या फेडीस लावून दिला. याप्रमाणें करवीरकरांचा बंदोबस्त करण्याकरितां केलेली भाऊंची ही स्वारी सन १७८४ च्या मार्च एप्रीलच्या सुमारास समाप्त झाली. याच सालीं निजामअल्ली व नाना फडणीस यांच्या भेटी यादगीरीचे मुक्कामीं होण्याची मसलत ठरली होती. त्याप्रमाणें निजामअल्ली भागानगराहून आणि नाना व हरिपंत फडके पुण्याहून फौजेसुद्धां निघाले होते. या भेटीच्या प्रसंगी परशुरामभाऊंनींहि हजर असावें म्हणून नानाची भाऊंना पत्रें गेलीं होतीं. त्याप्रमाणें कित्तुरचा व करवीरचा उलगडा होतांच परशुरामभाऊ व रघुनाथराव कुरुंदवाडकर नानांच्या लष्करास मिळण्याकरितां यादगिरीकडे निघाले. नानांनीं सर्व पटवर्धनांना बोलाविले होतें म्हणून मिरजेहून गंगाधररावही पंढरपूरच्या मार्गें यादगिरीकडे जाण्यास निघाले.

———

## प्रकरण ११ वें

# टिपूचा समाचार

नारायणरावाच्या खुनापासून १७८२ सालीं सालबाईचा तह होईपर्यंत मराठ्यांचे सर्व प्रयत्न राघोबा दादाला कायमचा जाग्यावर बसवून मराठेशाहीतली भाऊबंदकी नष्ट करण्यांत खर्च झाले. पण हें करण्यांत राष्ट्राची नऊ वर्षे खर्च झालीं. शिवाय या अवधीत निजाम व हैदरअल्ली आणि त्याचा मुलगा टिपू यांनीं मराठेशाहीचे मोठेमोठे लचके तोडले ते निराळेच. आपसांतील भाऊबंदकीमुळें झालेलें हें नुकसान आतां भरून काढण्याचा उद्योग नाना फडणीस यांनीं हातांत घेतला. सन १७८६–८७ आणि सन १७९१–९२ या सालीं मराठ्यानीं टिपूवर दोन स्वाऱ्या करून त्यानें व व त्याच्या बापानें बळकाविलेला सर्व मुलुख मराठ्यांनीं जिंकून घेतला ; व नंतर १७९५ सालीं निजामार स्वारी करून त्याच्याहि घशाखालीं उतरलेला मराठ्यांचा सर्व मुलुख पुन्हां मराठेशाहींत सामील झाला. या उद्योगाचा पहिला अंक म्हणजे टिपूवरील स्वारीचा उपक्रम हा होय. टिपू हा कांहीं सामान्य माणूस नव्हता. तेव्हां त्याच्यावर स्वारी करण्याकरीतां नानांनीं निजामाशीं संगनमत करण्याचें ठरवून निजामाची व आपली भेट होण्याचें निश्चित केलें. टिपूनें निजामालाहि दुखविलेंच होतें. अर्थातच टिपूवरील स्वारी संबंधानें निजाम व मराठे समदुःखीच होते. त्यामुळें त्याची

भेट होऊन पुढील कार्यक्रम ठरविण्यास फारशा अडचणी आल्या नाहींत. नाना व निजामअल्ली अशा प्रसिद्ध माणसांची भेटहि कांहीं सामान्य गोष्ट नव्हे. या भेटीमुळें निजाम मराठ्यांची दोस्ती टिपूच्या नजरेस येऊन त्याजवर कांहीं परिणाम व्हावा हा नानाचा हेतू होताच. पण अशा दिखाऊ भेटीनां भीक घालणारा टिपू नव्हता. हें टिपूच्या वर्तनावरून पुढें दिसून येईलच. असो. या प्रमाणें भेटी होण्याचें ठरल्यावर निजाम व नाना आपापल्या लव्याजम्यानिशीं भेटीस निघाले. ही भेट कृष्णा व भीमा यांच्या संगमावर यादगिरी येथें व्हावी असें ठरलें होतें. त्या प्रमाणें निजामअल्ली भागानगराहून निघाले.

पुण्याहून हरीपंत नाना व तुकोजि होळकर अशी मंडळी फौजेसह निघाली. पटवर्धनांसही या भेटीस उपस्थित राहाण्याकरीतां निमंत्रण होतें. त्या प्रमाणें गंगाधरराव, परशुरामभाऊ, व रघुनाथराव हे आपापल्या फौजेनिशीं येऊन मुख्य लष्करास मिळाले. ठरल्याप्रमाणें यादगिरीस निजामअल्लीची भेट झाली. उभय पक्षीं मेजवान्या, वस्त्रें, जवाहीर वगैरे मानसन्मानाचें देणें घेणें झालें. बोलणींही पुष्कळ झालीं. परंतु ज्या कारणाकरितां ही भेट घडवून आणली होती तें कांहींच साधलें नाहीं. शिवशाही व मोगलाई यांचा एकोपा आहे हा देखावा टिपूच्या नजरेस यावा असा अर्थातच नानांचा हेतू होता. पण टिपूनें या भेटीला कांहींच किंमत दिली नाहीं. शिवाय टिपूवर निजाम व मराठे मिळून एकोप्यानें स्वारी करण्याचें तरी निश्चित व्हावें तेंही साधलें नाहीं. भेटीतल्या बोलण्यावरून टिपूवर स्वारी करण्यासारखी आपली तयारी नाहीं असेंच दिसून आलें. तेव्हां जास्त तयारी करून टिपूवरील स्वारीचा उद्योग पुढच्या वर्षीं हातीं घ्यावा असें शेवटीं या भेटींत ठरलें. भेटीतील महत्वाच्या मुद्याचा या प्रमाणें निकाल लागल्यावर निजामानें इतर कांहीं किरकोळ बाबींत मराठ्यांचें म्हणणें मान्य केलें. मोगलाई मुलखांतील मराठ्यांचीं बरीच ठाणीं निजामानें बळकाविलीं होतीं. तीं मराठ्यांस परत देण्याचें निजामानें या भेटीत कबूल केलें. शिवाय चौथसरदेशमुखीचे हक्क शाहु महाराजानीं दक्षिणच्या सहा सुभ्यांवर खुद्द बादशहाकडून मिळ-

विले होते. या हक्काची मराठे लोक स्वराज्यांत गणना करीत. या स्वराज्याच्या हक्कांबद्दलचें देणें निजामाकडे बरेच वर्षांचें तुंबलें होतें ; त्यापैकीं गेल्या दोन सालाचा वसूल निजामानें तात्काळ चुकता करून देण्याचें कबूल केलें. व त्या मागच्या वर्षांचे हिशोब करून जें योग्य ठरेल तें देण्याचेंही निजामानें कबूल केलें. अशा प्रकारें बोलणीं चालणीं होऊन निजाम व मराठे आपापल्या फौजा घेऊन परत फिरले व स्वस्थळीं गेले. या भेटी पासून मराठ्यांचा म्हणण्यासारखा असा काहींच फायदा झाला नाहीं. भेटीला गेलेले लोक फौजेसह गेले असल्यामुळें फौजेच्या पायमल्लीमुळें ठिकठिकाणची रयत मात्र नागंवली गेल्याचें या प्रकरणीं छापलेल्या खरे संग्रहांतील अनेक पत्रांवरून दिसून येतें. *

यादगिरीच्या भेटींत कांहीं निष्पन्न झालें नाहीं. या वाटाघाटींत १७८४ साल संपून गेलें. १७८५ सालीं जास्त तयारी करून टिपूचा समाचार घ्यावा अशी योजना यादगिरीच्या भेटींत ठरली होती. अर्थात ही बातमी ऐकून टिपूच्या मनावर कांहीं परिणाम होऊन त्याला दहशत वाटेल अशी निजाम व मराठे यांची अपेक्षा होती. पण तसा कांहींच परिणाम टिपूच्या मनावर झाला नाहीं. नुकताच त्यानें इंग्रजांचा पराभव करून बिदनुरास इंग्रजांची एक सबंध फौज कैद केली होती. व इंग्रजांस तह करण्यास भाग पाडिलें होतें. या पराक्रमाचा त्याला फारच गर्व झाला होता. अशा परिस्थितींत यादगिरीच्या भेटीला टिपूनें कस्पटासमान लेखलें. या

* ( टीपः–यादगिरीच्या या सुप्रसिद्ध भेटीस पटवर्धन सरदार हजर होते. व प्रमुख प्रसंगीं त्यानां हजर राहावें लागत असे. या भेटींतील बोलणीं पुष्कळशीं रात्रीचीं होत व तीं फार लांबत असत. अशा एका प्रसंगात रात्र फार झाल्यामुळें परशुरामभाऊनां कसा त्रास झाला याचें वर्णन एका पत्रांत खालील प्रमाणें आढळतें. "भेट प्रथम प्रहर रात्रीस झाली. माघारे गोटास आलों तेव्हां पहाटेची साहा घटका रात्र राहीली. ते दिवशीं रात्रीं संध्या देखील नाहीं. तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेब यांस प्रदोष होता अपरात्र गोटास यावयास झाली. यामुळें उपोषण झालें." (खरे ८–२७९०).

भेटीपासून दहशत खाण्याऐवजीं त्यानेंच मराठ्याची कळ काढण्याचा उद्योग आरंभिला.

नाना फडणीसानें इंग्रजांविरुद्ध चौकडीचें कारस्थान उभारलें त्यांत हैदरअल्ली नानाचा दोस्त झाला होता. मद्रासकडे इंग्रजांना हैदरनें तंबी द्यावी हें काम त्यानें करावयाचें होतें. या कामगिरी निमित्त तुंगभद्रा व मलप्रभा या नद्यां मधला मुलुख नानानें हैदरास दिला होता. या मुलुखाबद्दल हैदरनें सहा लक्ष रुपये पेशव्यांस द्यावे असा करार होता. हैदरला दिलेल्या मुलखांत नरगुंद व कित्तूर हीं संस्थानें होतीं. तीं पेशव्यांचीं मांडलीक होतीं. या संस्थानांवर सार्वभौम सत्ता पेशव्यांचीच चालावी व या संस्थानांनीं द्यावयाची खंडणी मात्र हैदरनें घ्यावी असा करार होता. पण हैदर जवळ पेशव्यांचे झालेले सर्व करार धाब्यावर बसवून हीं दोन्हीं संस्थानें घशांत घालण्याचा आसुरी विक्रम करण्याचा टिपूचा मनसबा होता. नरगुंदचे संस्थानिक भावे हे पटवर्धनांचे आप्त होते. यामुळें पटवर्धनांच्या व पेशव्यांच्या जोरावर नरगुंदकर टिपूशीं फटकून वागत असत. शिवाय नरगुंदकरांचा कारभारी काळोपंत पेठे म्हणून एक मोठा कर्तृत्ववान् माणूस होता. काळोपंत पेठे हा मोठा शूर मसलती आणि पराक्रमी पुरूष होता. त्यानें मोठ्या हिकमतीनें टिपूची एक दोनदां चांगलीच खोड जिरविली होती. या काळोपंतामार्फत टिपूचीं गुप्त कारस्थानें पटवर्धन व पेशवे यानां कळत असत. अर्थातच टिपूचें व नरगुंदकर भावे व त्यांचे कारभारी काळोपंत पेठे यांचें मोठेंच वितुष्ट होतें. तेव्हां हें नाकापेक्षां जड झालेलें मोती अजिबात उपटून टाकावें असा टिपूचा बेत होता. हा बेत टिपूनें पराक्रमापेक्षां कपट व विश्वासघात या दोन गुणांचा आश्रय करून कसा सिद्धीस नेला व त्यामुळें परशुरामभाऊनां केवढें दुःख झालें याची हृदयद्रावक कहाणीच आतां सांगावयाची आहे.

नरगुंद घेण्याचें टिपूनें ठरविलें, पण नरगुंदकरांनां मदत पेशवे केल्याशिवाय राहाणार नाहींत याची ही जाणीव टिपूला होतीच. यावर उपाय म्हणून टिपूनें अशी युक्ती योजली कीं पुण्यास आपला वकील पाठवून पेश-

[stamp]

व्याशीं आपला सलोखा कायम असल्याचें ढोंग उभें केलें. टिपूकडून पेशव्याना द्यावयाच्या खंडणीचा तगादा नानानें टिपूला लावलाच होता. त्या खंडणी-संबंधानें बोलणें करण्याकरतां म्हणून हा वकील आला होता. पण त्या वकीलाला अंतस्थ आज्ञा अशी होती कीं नानाला तहाचें आमिष दाखवून नरगुंदवर पेशव्यांची फौज न येईल असें त्यानें करावें व नानाला असें भासवावें कीं, नरगुंदकरांपासून फक्त खंडणी घेण्याकरतांच टिपूची फौज नरगुंदवर रवाना झाली आहे. नरगुंद संस्थान उडवावें व पेशव्याशीं विरोध उत्पन्न करावा हा टिपूचा मुळींच हेतू नाहीं, आणि म्हणूनच टिपूनें आम्हाला आपणाकडे पाठविलें आहे. टिपूनें आपला वकील नानाकडे पाठविला त्या-वेळींच नरगुंदवर फौजहि रवाना केली होती. टिपूनें आपला जो वकील पुण्यास पाठविला होता त्यानें आपलें काम फारच शिताफीनें केलें. लक्ष्मण-राव रास्त्यांच्या मार्फत त्या वकिलानें पेशव्यांच्या दरबारांत बोलणें सुरू केल्याबरोबरच नरगुंदवर टिपूच्या फौजा गेल्याची बातमी आली. दहा हजार स्वार, पंधरा हजार कवाइती पायदळ, पंधरा तोफा व दोन गरनाळा असा जबरदस्त सरंजाम पाठवून टिपूच्या फौजेनें नरगुंदास वेढा घातला. टिपूच्या फौजेवर त्याचा मेहुणा बुराणउद्दीन हा मुख्य सरदार होता. याचवेळीं टिपूनें तोरगळकर शिंदे, कित्तूरकर देसाई व करवीरकर महाराज यांस बऱ्या बोलानें आम्हांस खंडणी द्या व आमची चाकरी करा, नाहींतर आमची फौज येऊन तुमचीं संस्थानें घेईल अशा अभिप्रायाचीं धमकीवजा पत्रें पाठविलीं. नरगुंदास वेढा पडल्याचें वर्तमान समजतांच तात्काळ परशुरामभाऊंनीं नरगुंदचा वेढा उठविण्यासंबंधानें पुण्यास पत्रें लिहीलीं. पण टिपूचा वकील पुणें दरबारांत बोलणें करीत होता. त्यामुळें नानांनीं व हरीपंतांनीं भाऊंच्या म्हणण्याकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. टिपूच्या दुष्ट व खुनशी स्वभावाचें ज्ञान पुण्याच्या लोकांपेक्षां मिरजेच्या लोकांस अधिक होतें आणि नरगुंदच्या लोकांस तर सर्वांहूनहि अधिक होतें. एवढी मोठी फौज टिपूनें नरगुंदवर पाठविली त्या अर्थीं तो आपलें संस्थान नक्की घेणार हें नरगुंदकरांचा कारभारी काळोपंत पेठे यानें नक्की ओळ-

खिलें होतें. पण काळोपंत हा कसल्याहि प्रसंगाला न डगमगणारा शूर सरदार होता. शिवाय पुण्याहून आपणास मदत येईल ही त्यास मोठी आशा होती. त्यामुळें त्यानें डगमगून न जातां शत्रूशीं निकराचा झगडा सुरू केला. सन १७८५ च्या जानेवारी पासून जुलई अखेरपर्यंत ही लढाई सुरू होती. काळोपंताजवळ दोन हजार स्वार, दोन हजार पायदळ व कांहीं थोड्या तोफा होत्या. शत्रूनें नरगुंदकरांवर हल्ला करून त्यांस शहरांत पिटून लावलें व मोर्चे बसविले. तरी नरगुंदकरांची हिंमत कायमच होती. नरगुंदकरांनीं एकदां अकस्मात बाहेर पडून शत्रूचे दोन मोर्चे उधळून लावले. व शें दोनशें माणूस ठार केले. मग बुराणउद्दीनानें चिडून जाऊन मोठ्या बंदोबस्तानें नरगुंदच्या पेठेवर तोफांचा भडिमार सुरू केला. फेब्रुवारी महिन्यांत शत्रूनें पेठेवर हल्ला केला तो नरगुंदकरांनीं मोठ्या आवेशानें लढून मागें परतविला. तथापि पेठेंत एकदोन ठिकाणीं शत्रूनें आसरा धरिला होता. तेथून त्यास हुसकून लावणें नरगुंदकरांनां साधलें नाहीं. आश्रयाच्या याच जागांवरून शत्रूनें फेब्रुवारीच्या १२ तारखेस पेठेवर जोराचा हल्ला करून पेठ घेतली तेव्हां काळोपंतास किल्ल्याचा आश्रय करण्याखेरीज दुसरा मार्ग राहिला नाहीं. याप्रमाणें काळोपंत व त्याचा धनी व्यंकटराव भावे हे किल्ल्यावर गेले त्याज बरोबर गांवांतले हजारों लोक आपली चीजवस्त घेऊन वर गेले. किल्ल्यावर दोन हजार लढाऊ गडकरी होते. दारूगोळा व शिधासामग्री यांचा पुरवठा सहा महिनें पुरेल एवढा केलेला होता. शत्रूनें किल्ल्यावर तोफांचा भयंकर भडिमार सुरू केला. व आपले मोर्चे किल्ल्याच्या तटास नेऊन भिडविण्याचा उद्योग सतत चालू ठेवला. तथापि काळोपंतानें मोठ्या शिताफीनें लढाई करून शत्रूचे सर्व प्रयत्न हाणून पाडले.

शत्रुनें नरगुंदची पेठ घेतल्याची बातमी पुण्यास कळल्यावर टिपूचा वकील नानास म्हणूं लागला कीं, टिपू सुलतानास लिहून नरगुंदचा वेढा उठविण्याची मी व्यवस्था करतों. टिपूच्या वकीलाच्या या म्हणण्यावर आतां विश्वास ठेवणें धोक्याचें होतें. हें जाणून नानानीं गणेशपंत बेहेरे या सरदाराबरोबर तात्काळ पांच हजार फौज देऊन त्याला परशुरामभाऊंकडे रवाना

केलें. लगेच नानानीं भाऊसही पत्र लिहीलें कीं तुम्हीं आपली व बेहेऱ्यांची फौज बरोबर घेऊन नरगुंदचा वेढा उठवावा. शत्रूनें नरगुंदचा वेढा उठविला तर मात्र त्याशीं जास्त विरोध दाखवूं नये व त्याच्या मुलुखास उपद्रव देऊं नये असेंहि नानानीं भाऊंस कळविलें. नरगुंद प्रकरणी पुणें दरबाराकडून योग्य ती तजवीज झाली नाहीं याबद्दल भाऊ थोडे नाखूषच होतं पण नानांचें पत्र येतांच तात्काळ भाऊंनीं फौज जमा केली. भाऊंनीं आपल्या फौजेच्या तीन टोळ्या केल्या. पहिल्या टोळीवर जनोबा सुभेदार यानां मुख्य नेमलें. या टोळींत पांच हजार स्वार होते व त्यांनीं मनोळीकडे जाऊन तिकडचें काम करावयाचें होतें. दुसऱ्या टोळींत दहा हजार स्वार असून तीवर रघुनाथराव कुरुंदवाडकर हे मुख्य सरदार होते. रघुनाथरावांच्या मदतीस गणेशपंत बेहेरे रास्ते व व्यंकटराव घोरपडे सोंडुरकर यांची नेमणूक झाली होती. या टोळीस भाऊंचा असा हुकूम होता कीं, तिनें झपाट्यानें मजला मारून रामदुर्गास जावें व तेथून रामदुर्गच्या बारीनें नरगुंदास जाऊन शत्रूचा वेढा उठवावा. या कामीं जरूर पडल्यास शत्रूशीं निकराचा सामना देण्याचाहि भाऊनीं रघुनाथरावांस हुकूम दिला होता. या प्रमाणें दोन टोळ्यांची व्यवस्था केल्यावर खुद्द परशुरामभाऊ वेळ पडेल त्याप्रमाणें दोन्हीं फौजांस कुमक करण्याच्या उद्देशानें सात हजार फौजेनिशीं मुधोळावर तळ देऊन राहिले.

नरगुंदच्या मदतीस मराठ्यांच्या फौजा येणार ही बातमी बुराणउद्दीनास समजतांच त्यानें नरगुंदकरांना मदत पोहोंचण्याच्या आधींच किल्ला काबीज करण्याचे पराकाष्ठेचे प्रयत्न केले. तोफांच्या भडिमाराचा कांहीं उपयोग होत नाहीं हें पाहतांच त्यानें किल्ल्यावर हल्ला करून किल्ला घ्यावा या इराद्यानें आपलें कवाइती पायदळ पुढें घातलें. हें पायदळ किल्ल्याच्या तटाखालीं येऊन पोचतांच किल्लेकऱ्यांनीं वरून मोठ्या मोठ्या शिळा खालीं लोटून दिल्या. या शिळाखालीं पायदळाच्या अघाडीचे सुमारें शंभर माणूस ठार झाले. अघाडीच्या माणसांची ही अवस्था होतांच मागच्या लोकांचा धीर खचून ते पळत सुटले. किल्ल्याच्या पायथ्याशीं मोठे खडक

असल्यामुळें मोर्चेही पुढें नेतां येईनांत. अशा स्थितींत हा पहिला हल्ला फसल्यावर बुराणउद्दीनानें आठ चार दिवसांतच दुसरा मोठा निकराचा हल्ला केला. हा हल्ला होतांच किल्लयावरून तोफांचा व दगडांचा असा भयंकर मारा किल्लेकऱ्यांनीं केला कीं त्यांत बुराणउद्दीनाचे एक हजार माणूस ठार व दीड हजार जखमी झाले. यामुळें बुराणउद्दीनाची फौज कच खाऊन दोनशें मुडदे जाग्यावरच टाकून पळूं लागली. हें पाहतांच गडावरचे लोक खालीं उतरले व शत्रुच्या मोर्चांवर हल्ला करून त्यांत सांपडलेल्या सर्व लोकांची त्यांनीं कत्तल केली. शत्रूच्या सर्व मोर्चांस आगी लावून खालीं उतरलेले गडकरी पुन्हां वर गेले.

अशी स्थिती असतां रघुनाथराव कुरुंदवाडकर, रास्ते व बेहेरे वगैरे मराठे सरदार रामदुर्गावर येऊन उतरले. त्यांची फौज नरगुंदापासून दोन कोसांवर येऊन ठेपली. किल्लयावरील लोकांना ही बातमी कळतांच त्यांनीं खुशालीच्या तोफा सोडल्या. मराठ्यांची फौज आली. आतां प्रसंग कठीण. लढाई देणें व वेढा चालू ठेवणें हीं दोन्हीं कामें होणार नाहींत हें ओळखून बुराणउद्दीनानें नरगुंदचा वेढा तात्काळ उठविला. बरोबरचे बुणगे व मोठ्या तोफा त्यानें धारवाडास रवाना केल्या व आपण खड्या फौजेनिशीं नरगुंदा पलीकडे बेण्णिहाळ म्हणून प्रसिद्ध ओढा आहे त्यावर जाऊन श्रीरंगपट्टणाहून येणाऱ्या ताज्या मदतीची वाट पहात बसला.

नरगुंदचा वेढा बुराणउद्दीनानें उठविल्यावर भाऊंनीं जास्त कलागत शत्रूशीं करूं नये असें नानांचें मत होतें. "राव पंत प्रधान यांचा स्नेह आम्हांस राखावयाचा असल्यामुळें आम्हीं त्यांच्या सांगण्यावरून नरगुंदचा वेढा उठविण्या विषयीं आमच्या सरदारांस हुकूम पाठविला" (खरे ८ पा. ३८९९) असें टिपूचें पत्र पुण्यास त्याच्या वकिलाकडे आलें तें वकिलानें नानांस दाखविलें. त्या पत्राप्रमाणें वेढा उठविल्याची बातमी आली. यामुळें नानांनीं जास्त कलागत न वाढविण्यासंबंधानें भाऊंस लिहीलें. पण भाऊ प्रत्यक्ष रणांगणावर वावरत होते. टिपूनें पत्रांत कांहीं लिहीलें तरी त्याच्या सरदारांच्या वागणूकीचा प्रत्यक्ष अनुभव भाऊंस होता. त्यावरून टिपूचा

प्रामाणिकपणा भाऊस मान्य नव्हता. अर्थातच नानाच्या पत्रानें भाऊंचें समाधान होईना. भाऊंचें म्हणणें असें होतें कीं बुराणउद्दीन यानें नरगुंदची रयत धरून नेली आहे ती सोडावी. नरगुंदकरांची ठाणीं घेतलीं आहेत तीं परत द्यावी आणि आपल्या फौजेसह तुंगभद्रापार निघून जावें. इतकें झालें तरच शत्रूचें बोलणें सरळपणाचें आहे अशी आपली खात्री होईल. नानांचें म्हणणें असें होतें कीं शत्रूचा वकील खंडणीचें बोलणें करीत आहे. त्यानें नरगुंदचा वेढाहि उठविला आहे त्यापक्षीं आपण जास्त कलागत कशास करावी. पण नानांच्या म्हणण्याप्रमाणें शत्रू सरळ वागणारा नव्हता. या संबंधानें भाऊ लिहीतात:–" त्रिंबकराव रेठरेकर व जनोबा सुभेदार यांस बन्नुरास ठेविलें होतें. त्यांस आज शत्रुच्या फौजेच्या रोखे तलाव्यास जावयाविषयीं लिहीलें आहे. शत्रुची गांठ पडल्यासहि चिंता नाहीं. दोघांजवळचें सामान पोक्त आहे. शत्रुची फौज वेण्णीहाळावर होती ती पिल्लयाकडील (नरगुंदाकडील) मेणसंगी वगैरे दोन तीन ठाणीं घेऊन त्यांतील कांहीं लोक जिवें मारून व कांहीं कैदेंत ठेवून जार दिवसांपूर्वी रामदुर्गचे बारीपलीकडे तीन कोसांवर मलापहारी किनाऱ्यास आली. त्याजवर चि. रा. दादा व गणेशपंत चालून गेले आहेत. गांठ पडली किंवा नाहीं हें कळत नाहीं पुण्याचे पत्रीं (नरगुंदचे) मोर्चे सलुखानें उठले असें लिहीलें आहे. परंतु त्यांची चाल पाहतां तो प्रकार दिसत नाहीं. यांस (नानांस) मात्र भरंवसा वाटतो. चि. दादा याचे विचारें आम्हीं पुढें यावें. त्यावरून एक दोन दिवसांत कुच करून मुधापुरास जात आहों. (खरे ८–२८३३) दुसऱ्या एका पत्रांत भाऊ लिहीतात " पुण्याहून पत्रें कलागत करूं नये अशीं वरचेवर येतात. शत्रु तर बेजरब चालुन यावयाच्या मनसब्यांत आहे. त्याप्रमाणें दृष्टीसही पडतें. आज पावेतों कारभारी याचे लिहीण्यावरून सबुरी केली. हल्लीं माघारें सरकावें तर लौकिकांत चांगलें नाहीं. कलागत करावी तर तहास पेंच पडतो. असा प्रकार बनला आहे. कांहीं सुचत नाहीं. श्रीगजाननाचे कृपें करून घडेल तें खरें " (खरे ८–२८३४) बुराणउद्दीनानें नरगुंदचा वेढा उठविला तो त्याचा कांहीं इलाज चालेनासा झाला व मराठ्यांची फौज

जवळ आली म्हणून उठविला होता. टिपूच्या वकीलानें पुण्यास तहाचें बोलणें चालू ठेविलें होतें, म्हणून नव्हे. बुराणउद्दीन टिपुकडून मदतीची वाट पहात होता. व मदत येतांच पुन्हां जोर करण्याचा त्याचा विचार होता. टिपूकडून मदत येत होती या संबंधानें भाऊ लिहीतात "शत्रूस दोन तीन हजार फौज व तोफा सामील झाल्या म्हणून नरगुंदाहून पत्र आलें. त्याचा जमाव वरचेवर येतच आहे या उपर उपेक्षा करीत नाहीं. गांठ घालतों. मग श्रीगजानन आहे. (खरे ८–२८३५) भाऊ जरी याप्रमाणें लढाईस सिद्ध होते तरी पुण्याहून नानांचीं पत्रें वरचेवर कलागत करूं नये अशीं येत होतीं त्यामुळे भाऊ थोडेसे ना उमेद होऊन खालीलप्रमाणें नानांस लिहीतात "वकीलाच्या विश्वासावर राहून तरदूद करावयाची नसल्यास तसेंच लिहावें. आम्हीं मागें सरकोन कृष्णातीरास येऊं. नाहक खर्च खात बसणें किमर्थ ? दोन चार वेळां बातमीचीं पत्रें आपणाकडे पाठविलीं आहेत. त्यास त्या पत्रांचीं उत्तरें मळमळीत असल्यास त्या पत्रांची वाट न पाहतां मागें सरकोन कृष्णातीरास येतों मग आम्हांवर शद्ब नाहीं. ते पुढें येतात. आम्हीं उगेच न रहावें. परंतु आपला शद्ब लागेल यास्तव मागें सरकतों. नाहींतर दुसऱ्याहि बाऱ्या आहेत. प्रातं बारी पलीकडे त्याचाच आहे. मारून लुटून टाकतों. म्हणजे ही फौज सहजच बारी सोडून जाती. परंतु (आपल्या पत्रामुळें) उपाय नाहीं" (खरे ८–२८३८) दुसऱ्या एका पत्रांत भाऊ लिहीतात "त्याचे (टिपूच्या) पारिपत्यास अगाध नाहीं. परंतु पुण्याचीं पत्रें मळमळीत येतात, आणि तहाचाहि भाव दर्शवितात म्हणोन उतावळी करितां येत नाहीं" (खरे ८–२८४५) आणखी एका पत्रांत खालीलप्रमाणें मजकूर आहे "शत्रू इभ्रतीवर वेढा (नरगुंदचा) उठवून गेला होता. तेच समईं बारी पलीकडे फौज जाती तर शत्रू न ठरता. रा. नानांचीं पत्रें 'पुढें जाऊं नये तहाचें बोलणें लागलें' म्हणोनच येत गेलों यास्तव वडीली (भाऊंनीं) मुक्कामच करून राहिले. तो शत्रूनें आपला जमाव करून तीस हजार पायदळ व दहा हजार फौज व तीस तोफानिशीं चालून बारींत आला" (खरे ८–२८४८)

वर जे विस्तृत उतारे दिले आहेत त्यावरून असें दिसून येईल कीं,

टिपूची रणांगणावरील वागणूक आणि त्याच्या वकीलाचीपु ण्यांतील वागणूक यांत भयंकर तफावत होती. प्रत्यक्ष रणांगणाचा अनुभव परशुरामभाऊंना असल्यामुळें त्यांचाच सल्ला नानानें ऐकावयास पाहिजे होता, परंतु तसें कांहींएक न होतां शत्रूशीं कलागत वाढवूं नये हाच हुकूम शेवटीं नानांनीं भाऊंनां पाठविला. या हुकुमामुळें भाऊंचा निरुपाय झाला. नरगुंदच्या किल्ल्यातून काळोपंत पेठे व नरगुंदकर भावे यांनीं निघून बाहेर यावें असेंहि नानांनीं भाऊंस लिहीलें होतें व त्याप्रमाणें भाऊनींहि प्रयत्न केला पण काळोपंत व भावे बाहेर पडले नाहींत. त्यामुळें त्यांच्यावर मोठीच आपत्ती कोसळली.

टिपूनें बुराणउद्दीनाच्या मदतीस तीस हजार पायदळ दहा हजार स्वार व तीस तोफा इतका सरंजाम पाठविला होता. भाऊशीं टक्कर देण्याचें आ ां आपणांस सामर्थ्य आहे व भाऊंचें धोरण कलागत न वाढविण्याचें आहे हें लक्षांत घेऊन बुराणउद्दीनानें पुढें चाल करण्यास तात्काळच सुरवात केली. त्याचा मुक्काम वेण्णीहाळास होता. तेथून कूच करून तो रामदुर्गच्या बारींत येऊन उतरला. ती बारी बंद करून त्यानें एक टोळी रामदुर्गाकडे पाठविली; व दुसरी मनोळीच्या बारीकडे पाठविली. असा बंदोबस्त करून त्यानें बाकीच्या फौजेसह पुन्हां नरगुंदास वेढा दिला. बारीच्या तोंडावर रघुनाथराव कुरुंदवाडकर, गणेशपंत बेहेरे, रास्ते व जनोबा सुभेदार असे सरदार होते. पण त्यांस शत्रूवर चालून न जाण्याविषयीं हुकुम असल्यामुळें बुराणउद्दीनाची चढाई उघड्या डोळ्यांनीं पाहाण्याखेरीज ते कांहींच करूं शकले नाहींत. मराठे जरी पुढें जात नव्हते तरी शत्रूच्या फौजेचा रोंख चढाईचा असल्यामुळें मधन मधून चकमकी होत व उभय पक्षांचे थोडे बहुत माणूस ठार व जखमी होत. असे मराठ्यांनीं एकदां बन्नुरा अलिकडे शत्रची कही गांठून लुटून फस्त केली व कही बरोबर फौज होती तिचा पराभव करून शंभर सव्वाशें घोडे घेतले. या खेरीज म्हणण्यासारखी लढाई झाली नाहीं. शत्रूनें पुढें पुढें यावें व यांनीं मागें मागें हटावें असें होत गेल्यामुळें मराठी फौजा कृष्णेवर येऊन उतरल्या कलागत न

वाढविण्याचें धोरण असल्यामुळें नानांनीं भाऊंकडे पैसा अडका व सामानहि पाडविलें नव्हतें. कारण रामदुर्गची बारी ओलांडून शत्रू अलिकडे येऊन मराठ्यांच्या हद्दींत पुंडावा माजवील अशी नानांची अटकळ नव्हती. पण शत्रूनें बाऱ्या ओलांडून मनोळी, रामदुर्ग, बन्नुर वगैरे ठाणीं काबीज केल्याच्या बातम्या पुण्यास गेल्यावर नानांनीं दोन हजार पायदळ दहा हजार स्वार व कांहीं तोफा असें सैन्य भाऊंच्या मदतीस पाठविण्याची तयारी केली. पण आतां या धावाधावीचा कांहींच उपयोग नव्हता. कारण या हकीकती होई-पर्यंत सन १७८५ चा मे महिना खलास होऊन पावसाळा सुरू झाल्यामुळें रस्ते बंद झाले, नद्या भरल्या, फौजांच्या हालचालीचे दिवस निघून गेले. त्यामुळें गोळा केलेली फौज परशुरामभाऊंनीं घरोघर परत लावून दिली होती. रास्ते, बेहेरे वगैरे सरदार मात्र पुण्यास परत न जातां कृष्णेअलिकडे छावणी करून राहिले. शत्रूनें नरगुंदावर तोफांचा भडिमार सुरू केला. त्या तोफाचे आवाज गोकाकेपर्यंत ऐकूं येऊं लागले. पण ते आवाज ऐकून मरा-ठ्यांच्या मनाची तळमळ होण्यापलीकडे दुसरें कोणचेंहि प्रतिकाराचें साधन आतां त्यांच्या हातांत राहिलें नव्हतें !

रामदुर्गची बारी शत्रूनें बंद केली तरीसुद्धां दुसऱ्या बाऱ्या अजून मोकळ्या आहेत त्यांतून पलीकडे जाऊन शत्रूच्या पिछाडीवर यावें असें परशुरामभाऊंचें म्हणणें होतें तें नानांनीं मान्य केलें असतें तर रामदुर्गच्या बारींतून शत्रूस तात्काळ पलायन करावें लागलें असतें, व नरगुंदचाही बचाव झाला असता. पण तसें करावें तर शत्रूच्या मुलुखावर स्वारी करून आपण होऊन युद्ध सुरू केल्या सारखें होतें व मग टिपूस आपल्यावर शब्द ठेवण्यास वाव मिळतो या पेचामुळें नानांनीं भाऊंच्या धोरणास संमती दिली नाही. शेवटीं टिपूनें करावयाचें तें केलेंच. मराटी साम्राज्याची हानी व्हावयाची ती होऊन पुणे दरबारचा अपमान करण्याची संधी मात्र टिपूनें साधली. *

*(टीप:—नानांच्या धोरणामुळें नरगुंदकरांचें सर्वस्वी नुकसान झालें. या बावतींत कै. खरे शास्त्री यांनीं नानांच्या धोरणासंबंधानें खालीलप्रमाणें अभिप्राय प्रगट केला आहे. "या नरगुंद प्रकरणीं महाराष्ट्राच्या राज्यलक्ष्मीस+

असो. आतां नरगुंदावर आलेल्या आपत्तीचें हृदयद्रावक वर्णन देणें जरूर आहे. बुराणउद्दीनाला नवी मदत आल्यावर त्यानें पुन्हां नरगुंदाला वेढा दिल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. किल्ल्यावर नुसता हल्ला करून काम होत नाहीं; विनाकारण आपले माणूस मात्र फार मारलें जातें असा अनुभव आल्यामुळें बुराणउद्दीनानें किल्ल्यावर तोफांचा भडीमार सुरू केला. पण तोफांच्या भडिमाराचाहि फारसा उपयोग होत नाहीं असें दिसून आल्यावर किल्ल्यावरच्या लोकांची उपासमार केल्यास तो उद्योग यशस्वी होण्यासारखा आहे असें बुराणउद्दीनानें ठरविलें. उपासमारीनें किल्लेकऱ्यांनां आपण नक्की वठणीवर आणूं अशी बुराणउद्दीनाची खात्री झाल्यावर त्यानें काळोपंतास बदामीचा किल्लेदार गुलाम हैदर याचे मार्फत असा निरोप पाठविला कीं, तुम्हीं मुलें माणसेंसुद्धां खालीं उतरून किल्ला आमच्या स्वाधीन कराल तर तुमच्या जिवास कोणत्याहि तऱ्हेचा धक्का न लावतां तुम्हांस पार करून देऊं. तुम्हीं पाहिजे तिकडे खुशाल निघून जावें. पण मानी काळोपंतानें हें बोलणें मान्य केलें नाहीं. पण इतकें होईपर्यंत जुलै महिना उजाडला. दिवस पावसाळ्याचे होते पण त्या वर्षी पाऊस लवकर पडला नाहीं. त्यामुळें किल्ल्यावरील लोकांचे हाल होऊं लागले. अशा स्थितींत आजपर्यंत दाखविलेला सर्व पराक्रम, निग्रह व मर्दुमकी फुकट जाऊन शत्रूला शरण जाण्याखेरीज काळोपंतास गत्यंतर राहिलें नाहीं. बुराणउद्दीनानें तोरगलच्या काजीच्या विद्यमानें काळोपंतास पुन्हां आश्वासन दिलें कीं, तुम्हीं खुशाल खालीं उतरा. तुमच्या जिवास आम्हीं धक्का लावणार नाहीं. या आश्वासनावर काळोपंत, व्यंकटराव भावे वगैरे सर्व मंडळी खालीं उतरली. पण ही मंडळी खालीं उतरतांच शत्रूनें विश्वासघात करून त्या सर्वांनां कैद

+म्हैसूरकरांनीं जी ही तिसऱ्यांदा लाथ मारली ती नानांनीं मनावर घेतलें असतें तर त्यांस चुकवितां आली असती असें आमच्या बुद्धीस वाटतें" (खरे ८–पान ३९०४) मुरारराव घोरपडे व पांडुरंगराव पटवर्धन यांना हैदरानें पकडून नेलें होतें या पहिल्या दोन लाथा व नरगुंदकर भाव्यांना मारलेली ही तिसरी लाथ होय.)

केलें. ही सर्व हकीगत त्या वेळच्या उताऱ्यांतून वाचण्यासारखी असल्यामुळें ती खालीं दिली आहे. "काल शुक्रवारीं सायंकाळ समईं राजश्री काळोपंत कुटुंब लेंकरांसह दीडशें शिपाई, हजार दीड हजार लोक किल्लचावरून खालीं उतरून आले. सवेंच पांच सात हजारांचा पहारा देऊन उतरविले. काळोपंत सल्लचानें उतरोन खालीं आले. चौकी देऊन लोकांसुद्धां बसविले आहेत. नरगुंद किल्ला शत्रूच्या हस्तगत झाला. ( खरे ८-२८६१/६३ ) दुसऱ्या एका पत्रांत खालीलप्रमाणें हकीगत आहे. "नरगुंदाकडील वर्तमान कसें आहे म्हणून जाणविलें ऐशियास काळोपंत व भगवंतराव कुटुंबसुद्धां सोमापूर हणमंताच्या देवळाचे पाठीमागें रट्टी याचे घरांत कोंडिले आहेत. घराभोंवतीं हजार दोन हजारांची चौकी आहे. मशारनिल्हेनीं हत्यार अद्याप दिलें नाहीं. जवळ पांचजण प्यादे जिव्हाळचाचे हत्यारबंद आहेत. तेही सोडन निघन नाहींत. ब्राम्हण सर्व मंडळी पन्नास नारोदादाजी व शास्त्री आदीकरून एका घरांत घातले आहेत. एकाची खबर एकास नाहीं. नक्त नाणें सोनें रुपये म्हणतां लक्ष होनाचें गडावरील जाहलें. कापड व भांडीं खेरीज मशार निल्हेची कन्या ( काळोपंताची ) नारोदादाची सून चांगली आहे. ती मूल नबाबखान घेणार. परवांच आणविली होती वरकड सर्वत्रांस पट्टणास नेतात. सोडतील म्हणावयाची भ्रांत ठेऊन जीव ठेऊन बसले आहेत." ( खरे८-२८६७ ) आणखी एका पत्रांत खालीलप्रमाणें हकीगत आहे. "किल्लयांतील पाणी सरलें. थोडेंसें होतें. परंतु किडे फार पडून उपयोगी नाहीं व दारूगोळा व किरकोळ सामान झाडून सरलें जुनें दाणें आठ पंधरा दिवस खाऊन होते. दुखणें फार लोकांस लागलें. परिणाम नाहीं. तंव बोली तोरगलकर काजीचे मतें लोक व काळोपंतांस सोडून द्यावें ऐसा करार करून उतरले. त्यावर लष्करच्यांनीं पहारा देऊन तैसेच ठेविले होते. तीन परवानग्या येतील तेव्हां सर्वत्रांस सोडावें ऐशी बोली जाहली. त्यास दोनी परवानग्या तिकडून आल्या त्यावरून लोकांस थोडेबहुत निरोप दिला. सोमवारीं सोडलें. ज्यांचीं चांगलीं हत्यारें असतील त्यांचीं पाहून पाहून घेतात. कांहीं लोक व ब्राम्हण मंडळी चाळीस पन्नास सोमापुरांत ठेविली आहे. राजश्री

काळोपंत यांची मातुश्री खालीं उतरल्यावरी मृत्यु पावली. श्रीरंगपट्टणाहून तिसरी परवानगी आलियावर काळोपंतांस मंडळीसुद्धां सोडावें ऐसें लष्करांत बोलत होते. (खरे ८-२८६९) काळोपंतांस सोडण्यास श्रीरंगपट्टणची परवानगी येईल अशी जी आशा वरील पत्रांत व्यक्त केली आहे ती कशी निष्फळ ठरली हें खालील पत्रावरून दिसून येईल. "नरगुंदाकडील वर्तमान रा. व्यंकटराव (भावे) व राजश्री काळोपंत व त्यांच्या मुलांमाणसांस कौल देऊन पट्टणास नेलें. मार्गीं चालते समईं काळोपंतांस धरून मुसक्या बांधोन सर्वत्रांस माघारें आणविलें. शिपाई व राजश्री नारोदादाजी निळकंठशास्त्री सर्वत्रांस बिड्या घालून रवाना केलें. मागाहून व्यंकटराव व काळोपंतांस व मुलेंमाणसांस बिड्या घालून नेणार आहेत. टिपू बेंगरूळास फौजे सुद्धां आहे." (खरे ८-२८७०)

नरगुंद संस्थानाची काय अवस्था झाली हें वरील उताऱ्यांवरून स्पष्ट होईल. नरगुंदचें हें प्रकरण १७८५ च्या आगष्ट महिन्यांत समाप्त झालें. नरगुंद काबीज केल्यावर टिपूचें लक्ष कित्तूर संस्थानकडे वळलें. बुराणउद्दीनानें कित्तूरकडे आपला मोर्चा वळविल्यावर कित्तूरकरांला मोठा विचारच पडला. नरगुंदकरांसारखे बलिष्ट लोक जर टिकले नाहींत तर आपला निभाव कसा लागणार असा विचार करून त्यानें शत्रूस शरण जावें हें उत्तम असें ठरविलें. पण शरणागतास आश्रय देण्याचें टिपूचें ब्रीदच नव्हतें. कित्तूरचा देसाई शरण आल्यावर त्यास व त्याच्या बायका मुलांस टिपूच्या फौजेनें पहाऱ्यांत ठेविलें व कित्तूरचा किल्ला आणि संस्थानचा सर्व मुलुख ताब्यांत घेतला.

कित्तूरचा निकाल लागल्यावर १७८५ च्या नोव्हेंबर डिसेंबरच्या सुमारास टिपूच्या फौजेनें दोदवाड, खानापूर, संपगांव बसवंत, बागेवाडी वगैरे पेशव्यांचीं ठाणीं काबीज केलीं. डिसेंबरच्या अखेरीस शत्रूनें होसकोटे व पाच्छापूर हींही ठाणीं घेतलीं. तात्पर्य बेळगांव व शहापूर या दोन ठाण्यांखेरीज त्या प्रांतांतला पेशवे सरकारचा सर्व मुलुख शत्रूच्या फौजेनें काबीज केला. कर्नाटकांत टिपूचा याप्रमाणें अनावर संचार झाल्यामुळें पेशवे सरक-

गास त्याचा प्रतिकार करण्याची कांहीं तरी योजना करणें प्राप्तच होतें. १७८६ च्या जानेवारींत नानांनीं निजामअल्लीची भेट घेण्याचें ठरविलें आणि तुकोजी होळकर व गणेशपंत बेहेरे यांना फौजेसह कित्तूरकडे जाण्यास हुकूम केला. टिपूच्या फौजेनें कित्तूरच्या संस्थानांत भयंकर अत्याचार केले. लाखों रुपये रोख गोळा केले. कित्तूरचा वाडा खणून काढला. दागदागिनें भांडेंकुंडें वगैरे सर्व चीजवस्त संस्थानची घेतली. शिवाय प्रांतांत मातबर लोक होते त्यांच्याकडून पैसा उकळला. या सर्व गोष्टी करून टिपूच्या फौजेचें समाधान झालें नाहीं. अत्यंत असह्य असा आणखी जो जुलूम कित्तूरच्या लोकांवर झाला त्यावरून टिपूच्या स्वभावावर चांगलाच प्रकाश पडतो. या प्रांतांतल्या सुंदर बायका व दांडगे पुरुष पकडण्याचा टिपूच्या फौजेनें सपाटा चालविला. बायका टिपूच्या व त्याच्या आप्तांच्या जनानखान्याकरितां नेल्या जात, व दांडगे पुरुष बाटवून मुसलमान केले जात, या जुलुमामुळें त्या प्रांतांतल्या लोकांवर केवढा अनर्थ कोसळला होता त्याची हकीगत अस्सल पत्रांत खालील प्रमाणें आढळते. " मातबर कुळें पाहून धरून नेतात त्याचप्रमाणें गांवांतील पूर्व वयाचीं चांगलीं सुरेख माणसें पुरुष व बायका धरून नेऊन जमा करीत आहेत. कित्तूर प्रांतांतील वसूल व देसायांचे वाड्यांतील देखील घर खणून चीजवस्त वगैरे एकंदर झाडून रवाना करतात. बागेवाडी येथील चांगले बायका निवडक व दांडगे माणसें धरून घेऊन गेले. दोघे लिंगाइताचे चांगले बायका धरले. वरकडासहि धरावयाकरतां जमणी घातले आहेत. तमाम सुंदर बाइका बारा वाटा पळून गेले ! बायका धरावयास कारण पालक लेक (टिपूचे) आहेत त्यास स्त्रिया करून देणेस नेतात. असें वर्तमान शिबंदी ठेवण्याकरितां प्रांतांतील दांडगे जवान धरून पट्टणाकडे पाठवणार याप्रमाणें वर्तमान आहे. (खरे ८–२८८८, २८९०, २८९५)*

* (टीपः–नरगुंद प्रकरणांत काळोपंतांची मुलगी टिपूच्या जनानखान्यांत नेल्याची हकीकत वर आलीच आहे. आतां या कित्तूर प्रकरणांत लिंगायतांच्या बायका पकडण्याचा सपाटा टिपूच्या फौजेनें चालविला; यावरून टिपूच्या जुलुमाची परमावधी कोठपर्यंत गेली होती हें दिसून येईल. वरील पत्रें कानडी माणसांनीं लिहिलीं असल्यामुळें त्यांतील शब्द कानडी वळणाचे आहेत.)

असो. टिपूच्या फौजेनें याप्रमाणें धुमाकुळ चालू केल्यामुळें नानांनीं तुकोजी होळकर व गणेशपंत बेहेरे यांना कित्तूराकडे पाठविण्याचें वर लिहीलेंच आहे. शत्रूला ही बातमी लागतांच त्यानें आपले बाजार बुणगे व तोफा धारवाडकडे लावून दिले. आणि खानापूर व कित्तूर या दोन स्थळीं तो खड्या फौजेनिशीं राहिला. मराठ्यांची फौज कित्तूरवर आली तर आपण मराठ्यांशीं लढाई न करतां मागें हटावें व धारवाडकडून मुरगोडाकडे जावें असा शत्रूचा बेत होता. पण मराठ्यांची फौज सरळ कित्तूरवर न येतां धारवाडकडेच गेली असें वर्तमान कळतांच शत्रूनेंही फक्त पांच हजार स्वारांची टोळी कित्तूरास ठेऊन बाकी सर्व सैन्यासह हुबळीस जाऊन तेथें किल्ल्याच्या तटाखालीं तळ दिला.

असो. कित्तूरकर देसायानें शत्रूला शरण जाऊन आपला बचाव करण्याचा बेत केला पण त्याचा कांहीं उपयोग न होतां त्याचें संस्थान वर सांगितल्याप्रमाणें शत्रूनें लुटून पादाक्रांत केलें आणि तो व त्याचीं बायकामुलें व कारभारी या सर्वांस कैद करून श्रीरंगपट्टणास नेलें.

नरगुंद व कित्तूर हीं दोन्हीं पेशव्यांच्या आश्रयाखालील संस्थानें टिपूनें काबीज केलीं इतकेंच नव्हे तर घटप्रभा व मलप्रभा या दोन नद्यांमधला व बेळगांवच्या आसपासचा मुलूख घेऊन मिरजेच्या रोखें टिपूची फौज चढाई करणार असा रंग दिसूं लागला. अशी स्थिती प्राप्त झाल्यावर आतां टिपूची उपेक्षा करणें शक्यच नव्हतें. १७८५ चा पावसाळा संपल्यावर नानांनीं टिपूवर मोहीम सुरू करण्याची जोराची तयारी सुरू केली. मोहीमेचा बेत नक्की ठरल्यावर नानांनीं परशुरामभाऊंना पुण्यास बोलाविलें, भाऊ या वेळीं नानांवर फारच नाखूष होते. कारण नरगुंद प्रकरणीं नानांनीं भाऊंस मोठाच हिसका दिल्यामुळें नरगुंदकरांचा सर्व नाश झाला होता. भाऊंना या गोष्टीचें फार दुःख झालें होतें. तेव्हां भाऊंनीं नानांस असें कळविलें कीं आम्हीं कोणचीही मसलत सांगण्याकरितां पुण्यास येत नाहीं, कारण आमची मसलत तुम्हीं ऐकत नाहीं हें नरगुंद प्रकरणीं दिसून आलेंच आहे. तेव्हां तुम्हींच काय ती मसलत ठरवा व त्याप्रमाणें आम्हांस हुकूम करा

म्हणजे आम्हीं तयारच आहों. तूर्त आम्हांपैकीं कोणी पुण्यास येत नाहीं. पटवर्धनांनीं याप्रमाणें उदासीनपणा दाखविला तरी नानांस स्वारीची तयारी करणें प्राप्तच होतें. फौजेची जुळवाजुळव होऊन स्वारी निघेपर्यंत १७८५ चा डिसेंबर महिना उजाडला. डिसेंबरांत नाना स्वतः डेरे दाखल झाले. तुकोजी होळकर व हरीपंत बारामतीवरून पंढरपुरापर्यंत आले. मुधोजी भोसल्यांची स्वारीवर हजर राहाण्यासंबंधींचीं पत्रें आलीं. निजामअल्लीहि भागानगराहून हलक्या हलक्या मजला करीत यादगिरीच्या रोखें येऊं लागले. याच वर्षी गंगाधर गोविंद याचे पुत्र केशवराव व पांडुरंगराव गोविंद यांचे पुत्र चिंतामणराव या उभयतांचे विवाह मार्गशीर्ष महिन्याच्या वद्य पक्षांत झाले. हरीपंत फडके यांनीं आपली कन्या केशवराव यांस व आपली नात म्हणजे बाबा फडके यांची कन्या चिंतामणराव यांस दिली. या निमित्तानें गंगाधरराव यांचें पुण्यास जाणें झालें होतें. हरीपंत तात्या लग्नाकरतां घरीं आले नव्हते. ते लष्करांत असतां त्यांच्या घरीं लग्नें झालीं. गंगाधरराव पुण्यास असतांनाच नाना व हरीपंत यांनीं गंगाधररावांस पुण्याहून परस्पर लष्करांत येण्यासंबंधीं लिहीलें होतें. त्यामुळें वऱ्हाड मिरजेस लावून गंगाधरराव परस्पर लष्करास जाऊन मिळाले. गंगाधरराव पंढरपुरापुढें पांच चार मजलीपर्यंत लष्करांतच होते नंतर ते मिरजेस गेले. लष्कर पंढरपुरास येतांच तासगांवाहून परशुरामभाऊ व कुरुंदवाडाहून रघुनाथराव आपापल्या पथकांसह येऊन मिळाले. मुधोजी भोसलेहि याच वेळीं नागपुराहून येऊन मिळाले. मराठ्यांच्या ह्या एकत्र झालेल्या सेनेनें नंतर निजामअल्लीची गेल्यावर्षी ज्या ठिकाणीं भेट झाली होती त्या यादगिरीच्या रोखें कूच केलें. मराठ्यांच्या या सेनेंत पेशव्यांची हुजरात, पटवर्धन, होळकर, भोसले वगैरे सरदार हजर होते. गणेशपंत बेहेरे पूर्वींच कृष्णातीरीं गेले होते. त्यांच्या मदतीस रास्ते अक्कलकोटकर यांचीं पथकें होतीं. टिपूची पंचवीस हजार फौज कित्तूरच्या बाजूला होती. तिला जरबेंत ठेवण्याचें काम बेहेऱ्यांस करावयाचें होतें. म्हणून नानांनीं होळकरांची रवानगीहि बेहेऱ्यांच्या मदतीकरतां गेली. यादगिरीच्या मुक्कामीं मराठी फौजा एकत्र होतात तोंच निजामअल्ली तेथें

येऊन उतरले. दोन्हीं सरकारांच्या फौजा एकत्र झाल्यावर बोलणीं चालणीं भेटी गांठी होण्यांत बराच काळ गेला, व इतकें होईतों १७८६ चा मार्च महिना उजाडला. नाना लष्कराबरोर आले होते पण मोहीमेचें काम चालीस लावून परत पुण्यास जावें असा त्यांचा बेत होता. कारण पुण्यास पेशव्यांस एकटें ठेऊन नानांनीं फार दिवस दूर राहाणें इष्ट नव्हतें पण नाना लष्करांतून गेले तर निजामअल्लीहि लष्करांत राहाण्यास तयार नव्हता. त्यामुळें नानांनीं लष्करांत राहाण्याचें ठरविलें. नाना लष्करांत राहाण्याचें नक्की ठरल्यावर सर्वांच्या मतें बदामीचा किल्ला प्रथम काबीज करण्याची योजना नक्की ठरली. या योजनेप्रमाणें दोन्हीं लष्करें बदामीच्या रोखें चालू लागलीं. इतक्यांत निजाम अल्लीनें परत जाण्याचा हेका धरला. नाना व हरीपंत यांनीं त्यास फार आग्रह केला पण त्यानें ऐकलें नाहीं. तहावारजंग या नांवाच्या आपल्या सरदाराजवळ पंचवीस हजार फौज मोहिमेच्या कामावर हरीपंताच्या हाताखालीं ठेऊन निजामअल्ली भागानगरास परत गेला.

मराठ्यांचें लष्कर बदामीजवळ आलें. त्या प्रांतांत बदामी किल्ल्याची बळकटी विषयीं फार प्रसिद्धी होती. टिपूनेंहि त्या किल्ल्याची मजबुती उत्तम रीतीनें ठेविली होती. नरगुंदकरांची मध्यस्थी करून शेवटीं त्यांना दगा देणारा गुलाम हैदर हा बदामीच्या किल्ल्याचा मुख्य अधिकारी होता. त्याच्या हाताखालीं पायदळ, तोफा वगैरे मुबलक सामान किल्ल्याच्या रक्षणार्थ ठेविलें होतें. मराठी लष्कर किल्ल्याजवळ येतांच मराठ्यांनीं तारीख १ मे १७८६ ला अक्षतृतीयेच्या मुहूर्तानें मोर्चे बंदी केली किल्ल्यांतील लोकांनीं निकराचा प्रतिकार करण्याची तयारी केली होती. मराठ्यांचे मोर्चे रोज थोडथोडे पुढें जातच होते. सर्वांच्या पुढें परशुरामभाऊंचा मोर्चा होता व ते त्याच्या सामानाची वगैरे तरतूद आपण स्वतः पाहात असत. आंतल्या लोकांचा प्रतिकार दांडगा असल्यामुळें मोर्चे बंदीनें किल्ला हस्तगत करण्यास दिवस फार लागणार असा अंदाज दिसूं लागला. शिवाय टिपू प्रचंड सैन्य घेऊन श्रीरंगपट्टणाहून निघाल्याच्या बातम्याहि येऊं लागल्या. अशा स्थितींत मोर्चेबंदीपेक्षां एकदम हल्ला करूनच किल्ला घ्यावा असा मराठ्यांचा

निश्चय ठरला व त्यास अनुसरून त्यांनीं शिड्या वगैरे सामानाची तयारी केली. हल्ला करण्याची मसलत निश्चित झाल्यावर ता. २० मे १७८६ रोजीं मराठ्यांनीं बदामीच्या किल्ल्यावर जोराचा हल्ला करून तो किल्ला काबीज केला. या हल्ल्याचें वर्णन अस्सल पत्रांतून वाचण्यासारखें असल्या-मुळें तें खालीं दिलें आहे. " किल्ल्यांतील दोघे जमातदार पळून आले त्यांनीं सांगितलें कीं आंतील पांच तोफा बाहेरील गोळ्यांनीं जायां झाल्या. तथापि लढण्याची हिंमत किल्लेकऱ्यांची आहे. मोर्चे शहर पन्ह्यास सात आठशें हाताच्या अंतरानें आहेत. साऱ्यांचे मोर्च्यांपेक्षां श्रीमंत भाऊसाहेब यांचा मोर्चा पुढ आहे. सामानाची तरतूद चांगली आपण स्वत: जाऊन पाहात असतात. वैशाख शु॥ त्रयोदशीस हल्ला करावयाचा निश्चय घाटतो. शिड्या वगैरे तयारी झाली आहे. छ २१ रज्जबी मंदवारीं अरुणोदयास हल्ला जाहली किल्ल्याचे पश्चिमेस एक बातेरी होती. त्या सुमारें व शहर पन्ह्याचे दरवा-ज्यामध्यें व रेवणीजवळ दारवेचे बुधले किल्लेकऱ्यांनीं पुरलें होतें. हल्ला येतांच बत्ती दिली त्यांत लोक फार ठार झाले. अद्यापि कोणाकोणाचें ठिकाण लागत नाहीं. अजमासें शें दीडशें माणूस मेलें. खेरीज जखमी दोन अडीचशें. जेर जखमी शें पन्नास आहे. शहरपन्ह्याचा दरवाजा यजमान स्वामी (परशुरामभाऊ) कडील लोकांनीं अगोदर घेतला. यजमान स्वामी पाठोपाठ होते. गांवांत किल्ल्याचे खड्प्या लगत आणखी एक वाडा होता. त्यासही हल्ला याच हिरिरीत चढली. यजमान स्वामी अस्तमानपर्यंत गांवच्या दरवाज्यांत उपवासी बसले होते. अस्तमानीं माघारे आले. रणमंडळाचें व किल्याचें बोलणें लागलें आहे. जे जिवानिशी हत्यारसुद्धां पार करून घ्यावे. त्यास भोसले यास दरम्यान द्यावे. असें बोलणें येतांच सरकारच्या तोफा बंद झाल्या. परंतु वरील लोक अद्यापि उतरले नाहींत. यजमान स्वामीनीं (परशुरामभाऊंनीं) हरीपंतांस सांगून पाठविलें जे ही गोष्ट पसंत नाहीं. तोफा लागू कराव्या. आंतील लोक आपोआप बाहेर पडतात. उतरावयाचें असल्यास लवकर उतरवावें, नसल्यास कस्त करावी. परंतु बरें बरें म्हणतात. कालच्याच दिवसांत गुंता उरकावयाचा परंतु बोलण्यामुळें विलंब लागला.

९८८३५ / २८८५३



आहे. किल्लयांत गुलाम हैदर मुख्य आहे. त्यानें नरगुंदकरांची मध्यस्थी करून फसविलें त्यास धरावें. सोडूं नये. आणखी कारणीक मनुष्य असेल तें देखील (धरावें) बाकीची सोडावी असें यजमान स्वामीचें म्हणणें आहे. त्यास उभयतां कारभारी याचे म्हणणें जें वचन गुंतलें आहे पार करून देण्याविसी त्यास कसें धरावें. असा मजकूर आहे. डौल पहातां लोकही आज जरूर उतरतील. वर पाणी नाहीं. यास्तव आंताल लोकांचा दम नाहीं. गांवांत गुळें फार भरलें होतें. लूट माफ केली. किल्लयाचे लढाऊ व गांवांतील लोक मनस्वी मारले. बायकाही थोडया बहूत मेल्या. तशीच लहान लहान मुलेंही मेलीं. कांहीं मनुष्य सरकारांतून पाहाऱ्यांत दिले आहेत. वळख पाहून सुटका होते. बनशंकरीच्या वस्ता गांवांत पुरल्या होत्या त्या पुजारी यानें दाखविल्या. सरकारांत आणून ठेविल्या आहेत. आणखी चौकशी करण्यारितां पुजारी अटकेंत ठेविले आहेत. गांवांत ब्राम्हण समुदाय फार होता. तितकाही बाहेर आला. सरकारांतून झाडून पोटास दिलें." (खरे ८–२९७९, २९८१) *

गोविंद सखदेव याने याच हल्लयाचें वर्तमान मिरजेस बाळासाहेबास स्वतःच पत्रांतून कळविलें त्यांत खालीलप्रमाणें मजकूर आहे. "गांवांतील दरवाज्यापुढील मार्गावर खंदकासमोर बातेरींत गांवकऱ्यांनीं दारवेचे बुधले पुरले होते. हल्ला जवळ जातांच दारवेस बत्ती दिली. बुधले उडाले ते समई श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांजकडील शिलेदार मंडळी व रोहीले लोक व ब्राम्हण मिळून शंभरपर्यंत मनुष्य ठार झाले. हुजरांतीलहि लोक उठले होते. तिकडेही बुधले पुरले होते. परंतु तिकडे साठ माणूस उडाले. फार खराबी जाहली नाहीं. एकंदर भोसल्यांकडील व हुजुरातीकडील व नबाबाकडील व भाऊसाहेबांकडील मिळून आठशेंपर्यंत माणूस ठार झाले. गांवां-

* (टीप:—वरील पत्रें निळकंठ आपाजी पोंक्षे यानें मिरजेस बाळासाहेब यांस लिहीलेलीं आहेत. हा गृहस्थ परशुरामभाऊंचा कारकून होता. पत्रांत यजमानस्वामी म्हणून जो शब्द वापरला आहे तो परशुरामभाऊंना उद्देशून आहे.)

तील माणूस हल्लचाचे समयीं चारपांचशेंपर्यंत मारिले. पेठेस खंदक भाला-भर खोल रेवणी बांधीव चुन्याची दर गंजी रुंदी वीस पंचवीस हात, भिताड मजबूत याजप्रमाणें जागा फार अवघड. परंतु श्रीमंतांच्या प्रतापें साध्य जाली." (खरे ८–२९८२)

याप्रमाणें बदामीचा किल्ला फत्ते झाल्यावर पुढील स्वारीचें काम हरीपंतावर सोंपवून नानांनीं परत पुण्यास जाण्याचें ठरविलें. नानांनीं पुण्यास जाण्याचें ठरविल्यावर परशुरामभाऊहि तासगांवास जाण्या-करितां निघाले. या टिपूवरच्या मोहीमेंत भाऊ पहिल्या पासूनच उदास होते. नरगुंद प्रकरणापासून भाऊंचा नानांवर फार राग होता. टिपूवरच्या मोहीमेकरीतां नानांनीं भाऊंस फौज गोळा करण्यास सांगितलें व आयते वेळीं शत्रूची गांठ पडल्यावर पिछेहाट करावयास लावलें. यामुळें नरगुंदकरांचा सत्यनाश झाला तो भाऊंना उघड्या डोळ्यांनीं पहावा लागला. भाऊंना या गोष्टीमुळें फार दुःख झालें होतें; आणि म्हणून त्यांचें मन या टिपूवरच्या स्वारींत नीट लागेना. शिवाय नवीन फोज चाकरीस ठेवण्यासंबंधानेंहि नानांनीं भाऊंना योग्य ती मदत केली नव्हती. अशा अनेक कारणांमुळें परशुरामभाऊंचें मन प्रसन्न नव्हतें. इतकें असूनसुद्धा बदामीच्या वेढ्यांत भाऊंची कामगिरी कशी झाली याची हकीकत वर दिलेल्या उता-ऱ्यावरून दिसून येते. भाऊंचा मोर्चा सर्वांच्यापुढें असल्याचा उल्लेख वरील पत्रांत आहे. वीर पुरुष आपल्या शिपाईगिरीच्या बाण्यास साजेल अशा तऱ्हेनें वागतो. तो मानापमानाकडे पहात नाहीं. याच धोरणानें, नाना व हरीपंत आपलें ऐकत नाहींत तरीहि भाऊंनीं बदामीच्या प्रसंगांत योग्य ती मर्दूमकी दाखविलीच. बदामी फत्ते झाल्यावर मात्र भाऊंनीं तासगांवीं परत जाण्याचें ठरविलें. पण नाना व हरीपंत या गोष्टीला कबूल नव्हते. भाऊ स्वारींत नसले तर शत्रूवर मराठी सैन्याचें तेज व दरारा कमी पडेल. लढाईच्या ज्या ज्या मसलती होतील त्यांत भाऊंच्या अनुभवाची व धोर-णाची भर न पडल्यामुळें त्या त्या मसलतीचा पोक्तपणा तितका कमी होणार याकरितां भाऊंनीं स्वारीबरोबर असलेंच पाहिजे असा नाना व हरीपंत

यांचा फार आग्रह पडला. या बाबतींत अनेक वाटाघाटी झाल्या. भाऊंच्या किती विनवण्या नाना करीत होते त्याचा एक नमुना खालील पत्रांत दिसून येतो. निळकंठ आपाजी पोंक्षे मिरजेस पाठविलेल्या एका पत्रांत लिहीतो. " श्रीमंत राजश्री नाना यांनीं काल प्रहर रात्रीस यजमानस्वामीस (परशुरामभाऊस) बोलावणें पाठविलें होतें. त्यास कपाळ दुखतें येणें होत नाहीं. म्हणून सांगून पाठविलें. याजवरून नाना व तात्या मध्यरात्र झाल्यानंतर यजमानस्वामीकडे डेऱ्यास आले. सा-चार घटका बसून बोलणें झालें. नानांनीं आज १४ घटिका दिवसानंतर निघून केसूरच्या मुक्कामास जाऊन राहावें. यजमानस्वामीनीं प्रतिपदेस निघावें असें ठरून माघारे गेले. नाना व तात्या व यजमानस्वामी छ २३ रजबी किल्ला पहावयास गेले होते." (खरे ८-२९८४) नाना व हरीपंत यांनीं भाऊंना फार आग्रह केल्यामुळें भाऊंनीं घरीं मुलाची मुंज करणें आहे ती उरकून परत स्वारीवर येण्याचें कबूल केलें. पण भाऊंची ही कबूली वरकरणीच होती. त्यांच्या मनांत स्वारीस यावयाचें नव्हतें. घरीं बसून मोहीम कशी काय चालते हें पाहाण्याचाच त्यांचा उद्देश होता.

असो. अशा रीतीनें नाना व भाऊ मोहीमेंतून परत निघाले. त्यांचेबरोबर मुधोजी भोसलेहि निघाले. मुधोजी भोसले पुण्यावरून नागपुराकडे गेले; आणि नाना व भाऊ हळू हळू मजला करीत कृष्णांतीरीं कुडचीच्या आसपास आले. नाना कर्नाटकांतून पुण्यास जाणार तेव्हां त्यांनां वाटेंत पटवर्धनांनीं मेजवानीस बोलावण्याचें ठरविलें, व त्याप्रमाणें मिरजेचे गंगाधरराव बाळासाहेब मिरजेहून नानांस आमंत्रण देण्याकरितां निघाले. बाळासाहेबांनीं नानांची गांठ ऐनापुरच्या मुक्कामीं घेतली. पुण्यास जातां जातां कुरुंदवाड, मिरज व तासगांव या तिन्हीं ठिकाणीं मेजवानी घेऊन जावें असा भाऊनीं व बाळासाहेबांनीं नानांस फार आग्रह केला. त्यामुळें नानांनीं मेजवानीस येण्याचें कबूल केलें. तारीख ३१ मे १७८६ रोजीं नाना कुरुंदवाडास आले. तेथली मेजवानी उरकून दुसरे दिवशीं नाना मिरजेस आले. मिरजेच्या मेजवानीस " ब्राम्हण समुदाय शिवाय करून दोनशें मराठे जेऊं घालावयाचे. पांचशें शागीर्द पेशाचे माणसांस डाळ भाकरी करवाव्या."

अशी सूचना नानांनींच केल्याचा उल्लेख एका पत्रांत आढळतो. भिरजेची मेजवानी उरकल्यावर नाना व भाऊ बरोबरच तासगांवास आले. तासगांवास एक दिवस राहून तेथील मेजवानीचा समारंभ उरकल्यावर नानांची स्वारी मेणवलीस गेली व तेथून नाना पुण्यास आले. नानांसारखा मराठी साम्राज्याचा मुख्य सूत्रधार लष्करांतून परत जातांना पटवर्धनांच्या मेजवान्या घेत घेत जातो ही गोष्ट अगदीं सहजासहजीं घडली असेल असें वाटत नाहीं. या प्रकारांत थोडा राजकीय हेतूहि असावा. नरगुंद प्रकरणापासून पटवर्धनांचा नानांवर रुसवा झाला होता. आणि आतां टिपूच्या स्वारींतहि बदामी काबीज झाल्यावर भाऊ स्वारींतून परत फिरले होते. या गोष्टीमुळें नाना व भाऊ यांमध्यें कांहीं वितुष्ट आलें किंवा काय असा बोभाटा होऊं नये व पटवर्धनांचा व आपला पूर्ण मिलाफ आहे ही गोष्ट जगजाहीर व्हावी याकरितां मेजवान्या करण्याचा हा मार्ग स्वीकारला असण्याचा बराच संभव आहे.*

नाना व भाऊ मोहीमेंतून परत गेल्यार सर्व मोहीमेचें काम हरीपंतांकडे आलें. या पुढच्या मोहीमेंत परशुरामभाऊंचा संबंध नसल्यामुळें त्याची हकीगत येथें थोडक्यांत देऊन हें प्रकरण संपविणें जरूर आहे. तुकोजी होळकर व गणेशपंत बेहेरे हे चाळीस हजार फौजेनिशीं कित्तूर प्रांतांत सय्यदबुराण याच्या तोंडावर होते. त्यांनीं एकदोन महिने सक्त मेहनत करून धारवाड व सावनुर या प्रांतांतलीं शत्रूचीं ठाणीं उठवून लावलीं. इकडे हरीपंत फडक्यांनीं गजेंद्रगड व बहादुरबिंडा हे शत्रूचे नामांकित किल्ले हल्ला करून घेतले. टिपूनें अदवानीला वेढा घातला; पण हरीपंतानें फौज पाठवून तो वेढा उठविला आणि तेथील नबाबास सुरक्षितपणें बाहेर काढलें. पावसाळा जवळ आला. त्यामुळें तुंगभद्रेकडे आपला निभाव लागणार नाहीं हें

*(टीपः—परशुरामभाऊंचे आद्य चरित्रकार निगुडकर यांनीं भाऊ बदामीनंतर या मोहीमेंत तह होईपर्यंत होते असें लिहीलें आहे (पान ५३) पण तें चूक आहे. बदामीनंतर भाऊ तासगांवीं परत आले व मोहीम पुढें हरीपंतांनीं चालविली हें स्पष्ट आहे.)

पाहून हरीपंतांनीं अदवानीची मराठी फौज नबाबाला बरोबर घेऊन नदीच्या उत्तरतीरीं बोलाविली. मराठी फौज तुंगभद्रेच्या उत्तरतीरीं येतांच टिपूनें अदवानीला पुन्हां वेढा दिला व तें स्थळ काबीज केलें.*

टिपूनें अदवानी घेतली तरी तो अदवानीच्या उत्तरेला येणार नाहीं अशी हरीपंतांची खात्री होती. कारण तुंगभद्रेला पूर आल्यामुळें त्याला उत्तरेला येणें शक्य नव्हतें. तेव्हां या अवधींत तुंगभद्रेच्या उत्तरेकडचा शत्रूचा सर्व मुलुख स्वस्थपणें काबीज करावा असा हरीपंतांचा बेत होता. या बेतास अनुसरून तात्यांनीं कोपळच्या किल्ल्यास वेढाहि दिला. पण वेढ्याचें काम चालू असतांनाच टिपू एकदम ऐशीं हजार फौजेसह गलगनाथाजवळ तुंगभद्रा नदी उतरला व त्यानें एकदम सावनुरावर चाल केली. हरीपंताला ही बातमी समजतांच त्यांनीं कोपळच्या वेढ्याचें काम तसेंच टाकून सावनुराकडे कूच केलें. सावनूरच्या आसपास टिपूची व हरीपंतांची रेटारेटीचीं युद्धें पांच सहा महिने चालू होतीं. व कोणत्याहि पक्षास म्हणण्यासारखा असा निश्चित जय आला नाहीं. हरीपंत सावनुरच्या रक्षणास गेले व सावनुरच्या आसपास सारखीं युद्धें छापे वगैरे चालू होतीं पण सावनुरच्या नबाबास सावनुरास राहाण्याचा दम निघेना. तेव्हां तो हरीपंतांच्या लष्करांत येऊन राहिला. सावनुरचा नबाब सावनुरांतून बाहेर पडल्यावर टिपूनें तें शहर तात्काळ काबीज केलें. सावनुरच्या आसपास मराठ्यांची फौज अडचणींत पडल्यासारखी झाली होती. टिपूनें बळकटीच्या जाग्यांत राहून मराठ्यांवर पायदळाच्या व तोफांच्या जोरावर छापे घालण्याची कामगिरी सारखी चालू ठेविली होती. टिपूला युक्तियुक्तिनें मैदानांत आणून चोहोंकडून वेढून त्याचा कोंडमारा करावा असा हरीपंतांचा बेत होता व त्या बेतास अनुसरून हरीपंत थोडे थोडे मागें सरकत सरकत शिरहट्टीपर्यंत आले. इतकें होईतोंपर्यंत सन १७८६ चा नोव्हेंबर महिना उजाडला. टिपूच्या ताब्यांतला हा बळकट

---

*(टीप:—हरीपंतांनीं अदवानीची फौज तुंगभद्रेच्या उत्तरतीरीं बोलाविली हें " ठीक न जाहलें" असा परशुरामभाऊंनीं तासगांवाहून लिहीलेल्या एका पत्रांत अभिप्राय व्यक्त केला आहे. (खरे ८-३०००)

किल्ला हरीपंतानें १४ नोव्हेंबरला जोराचा हल्ला करून काबीज़ केला. शिरहट्टीच्या बचावाला टिपू आपली जागा सोडून पुढें येईल असें तात्यांना वाटत होतें पण त्याप्रमाणें तो आला नाहीं. नोव्हेंबर महिन्यांत मराठ्यांनीं शिरहट्टी घेतल्यानंतर पुढें दोन महिने टिपू व मराठे यांच्या झटापटी चालूच होत्या. दरम्यान टिपू तहाचें बोलणें करण्याचेंहि आमीष दाखवी, पण तहाला वकील पाठवून इकडे मराठ्यांवर छापे घालण्याचेंहि काम करी. टिपूची तहाची मध्यस्थी नेहमीं होळकरांमार्फत असे. होळकरानें या विश्वासघातकी मध्यस्थीला सणसणीत जबाब दिला कीं, सरकारांत तहाचें प्रयोजन पडेल ते समयीं वकीलास बोलावण्यांत येईल. या बाणेदार उत्तरानें टिपूही समजला कीं नुसते छापे घालून मराठ्यांनां वठणीवर आणणें सोपे काम नाहीं. त्यांच्या जवळहि अफाट सेना आहे व आतां नद्या नाले सर्व आटून गेल्यामुळे मराठ्यांचा संचार चारीबाजूस सुरू झाल्यावर आपल्यास जड जाईल. शिवाय मोंगल, भोसले व पेशवे यांची फौज एकत्र झाली होती. या तीन सरकारांना तोंड देणें आपणांस पुरवणार नाहीं तेव्हां तह करून मोकळें होणें बरें. इतकें होईपर्यंत सन १७८७ चा जानेवारी महिना उजाडला. या महिन्यांत उभयपक्षीं युद्ध बंद व्हावें असा करार होऊन तहाचीं बोलणीं सुरू झालीं. पण हरीपंतांस टिपूचा विश्वास येत नसल्यामुळें अनेक बाबतींत फार घासाघीस घालावी लागे. त्यामुळें जानेवारीपासून एप्रिलपर्यंत तहाच्या वाटाघाटी होऊन शेवटीं एप्रिलांत तहाच्या नक्की अटी ठरून याद्या झाल्या. त्यांत असें ठरलें कीं मराठ्यांची पांच सालची खंडणी पांसष्ट लक्ष टिपूकडे येणें होती. तिची तडजोड होऊन टिपूनें मराठ्यांस अठ्ठेचाळीस लक्ष रुपये द्यावे. त्यापैकीं बत्तीस लक्ष रोख द्यावे व बाकीचे सोळा लक्ष सहा महिन्यांनीं द्यावे. शिवाय गजेंद्रगड, बदामी, नरगुंद व कित्तूर हीं संस्थानें व किल्ले मराठ्यांस देऊन अदवानीचें संस्थान निजामअल्लीच्या हवालीं करावें; आणि सावनुरकर नवाबाचा मुलुख व राजधानी टिपूनें घेतली होती ती त्याची त्यास परत द्यावी. नरगुंद व कित्तूर येथील लोक टिपूनें पकडून नेले होते तें सर्व सोडावे. या तहाच्या अटी अमलांत येण्यास आणखीं महिना पंधरा

दिवस लागले. नंतर टिपू आपल्या फौजेसह श्रीरंगपट्टणास गेला, आणि मोंगलाच्या फौजेस निरोप देऊन होळकर व भोसले वगैरे सरदारांसह हरीपंततात्या यादवाड व तेरदाळ परगण्यांतून कृष्णेवर येऊन कुरुंदवाड, मिरज, तासगांव येथें मेजवान्या घेत घेत परत पुण्यास आले.*

या तहासंबंधानें पेशव्यांच्या दरबारीं असलेला इंग्रजांचा वकील मॅलेट यानें असें लिहीलें आहे कीं, एकंदरींत हा तह पेशव्यांपेक्षां टिपूच्याच फायद्याचा झाला. कारण मराठ्यांची जूट टिपूनें मोडली व ती जूट मराठ्यांत पुन्हां उत्पन्न होईल असें वाटत नाहीं. (P.R.C. 2–68) मॅलेटनें केलेल्या या टिकेचें कारण त्यावेळीं तुकोजी होळकरानें शत्रुपक्षांशीं बांधलेल्या संधानाचा झालेला बोभाटा हें असावें. टिपूनें मराठ्यांवर हल्ला केला त्यांत होळकरानें कुचराई केली असें मॅलेटनेंच एका पत्रांत लिहीलें आहे. ( P.R.C. 2–41 ) शिवाय खरे यांच्या ऐ. ले. संग्रहांतही एका पत्रांत असा उल्लेख आहे कीं, " जनवार्ता आहे जे होळकर यांनीं त्याजकडील ( टिपूकडील ) सुवर्ण दर्शन घेतलें सत्य मिथ्या नकळे" (खरे ८–३०७३) रियासतकार सरदेसाई यांनींहि सवाई माधवरावावरील खंडांत एका पत्राचा उल्लेख केला आहे त्यांत 'चतुर्थ वर्ण (होळकर व त्यांचेच पक्षाचे विप्र यांनीं शत्रूकडे डौल दाखविला. कित्येकास शत्रूनें हिरण्यश्राद्धें केलीं. करितां लढाईस कोणी तन देत नाहींत" असा मजकूर आहे. (सवाई माधवराव खंड २ पान २८८) तुकोजी होळकरासंबंधीचे वरील उल्लेख जमेस धरले तरी त्यावरून टिपूनें मराठ्यांत फूट पाडली हें म्हणणें सिद्ध होत नाहीं. कारण तसें असतें तर फुटीचा फायदा घेऊन टिपूनें मराठ्यांशीं युद्ध चालू ठेविलें असतें. पण तसें कांहीं न करतां उलट टिपूनेंच मराठ्यांस मॅलेटच्या मताप्रमाणें साठ लक्ष खंडणी देऊन वर बदामी, कित्तूर, नरगुंद वगैरे ठिकाणें दिलीं. अर्थातच हरीपंतांचा

*(टीपः—पूना रेसीडेन्सी रेकार्डमध्यें मराठे व टिपू यांच्यामध्यें झालेल्या तहासंबंधीं जी हकीकत आहे त्यांत टिपूनें ६० लक्ष रुपये द्यावे व बदामी, कित्तूर व नरगुंद मराठ्यांना मिळून गजेंद्रगड टिपूला मिळावा असें आहे. (P.R.C. 2–56/57)

चिवटपणा टिपूला जाणवला असला पाहिजे व होळकरांसारख्यांच्या फुटीची पर्वा हरीपंत करीत नव्हते हेंहि टिपूनें ओळखिलें असलें पाहिजे. एरवीं साठ लक्ष खंडणी देण्याला तो कांहीं मूर्ख खास नव्हता. टिपूनें तह करण्यांत मुत्सद्दीपणा दाखविला असें म्हणण्यास मात्र हरकत नाहीं. कारण पावसाळा ओसरला होता. पेशवे, निजाम व भोसले यांच्या फौजा एकत्र आल्या होत्या. शिवाय इंग्रज व टिपू यांचे संबंधहि बिघडत चालले होते. अशा स्थितींत त्यानें मराठ्यांशीं मिळतें घेण्यांत शहाणपणा दाखविला यांत शंका नाहीं. पण याचा अर्थ टिपूनें केलेला तह मान्य करण्यांत मराठ्यांचा कमकुवतपणा दिसून आला; असा मात्र नव्हे. टिपूची एकमुखी फौज आणि हरीपंतांची पंचभेळ फौज. भोंसले, निजामसारख्यांच्या मदतीवर हरीपंताला काम करावयाचें होतें. शिवाय होळकरांसारखे घरभेदीहि संभाळावयाचे होते. अशा स्थितींत हरीपंतांचें चातुर्य आणि सेनापत्य उच्च दर्जाचें असलें पाहिजे यांत शंका नाहीं. पण रियासतकार सरदेसाई यांनीं हरीपंतांपेक्षां टिपूचें सेनापत्य जास्त कौशल्याचें होतें असें लिहीलें आहे. आणि त्यांच्या नेहमींच्या धरसोडीच्या पद्धतीप्रमाणें शेवटीं असा शेरा मारला आहे कीं, "मात्र हरीपंतानें अखेरपर्यंत आपल्या बाजूस युद्धाची ढिलाई बिलकूल होऊं दिली नाहीं म्हणूनच हरीपंतांस टिपूचे वकील भेटून तहाच्या याद्या ठरल्या." (स. मा. खं. २ पा. २८९) एक मुखी ऐंशीं हजार फौजेवर स्वामित्व गाजविणाऱ्या टिपूवर हा प्रसंग आला. अर्थात सेनापती कोणता जास्त कुशल हें वाचकानें आपल्या स्वतंत्र बुद्धीनेंच ठरविलें पाहिजे.)

असो. याप्रमाणें टिपूचा समाचार घेण्याकरितां पेशव्यांनीं काढलेली ही मोहीम समाप्त झाली. या मोहीमेंत बदामी फत्ते झाल्यावर भाऊ स्वारींतून निघून आल्याचें पूर्वीं लिहीलेंच आहे. स्वारीची हकीकत ते घरीं बसून बारकाईनें पहात होते. स्वारीवर जाण्याचा मात्र त्यांचा विचार नव्हता. या अवधींत नानांचा व त्यांचा बराच पत्रव्यवहार झाला. भाऊंनीं स्वारीवर जाण्यासंबंधानें नानांनीं त्यानां आग्रहानें लिहील्याचें आढळतें. (खरे ८–३०१६, ३०२६, ३०५३) भाऊ स्वारींत नाहींत. म्हणून हरीपंत फार श्रमी असाहि

उल्लेख आढळतो. (खरे ८–३०४३) यावरून भाऊची गैरहजीरी मराठ्यांना केवढी जाणवत होती हें स्पष्ट होतें. स्वारी संपून तह झाला त्यांत पटवर्धनांना कांहीं मिळालें नाहीं. भाऊ स्वारीवर नव्हते तरी पटवर्धनांचीं सर्व पथकें स्वारीवर होतींच. अशा स्थितींत पटवर्धनानां कांहींच न मिळाल्यामुळें परशुरामभाऊ नाखूष होते. असें मॅलेटनें लिहीलें आहे. (PRC 2-64) स्वारी संपून तहाचीं बोलणीं सुरू झालीं, अशी बातमी लागतांच म्हणजे सन १७८७ च्या फेब्रुवारींत भाऊ कोंकणांत देवदर्शनाकरितां गेले. गणपतीपुळ्यास जाऊन तेथें श्रीगणपतीचें दर्शन घेऊन ते राजापुरास गंगेच्या दर्शनाकरीतां गेले. मिरजेस कृष्णा नदीस घाट बांधण्याचें काम गंगाधरराव यांनीं सुरू केलें होतें. तें काम चार पांच वर्षें चाललें होतें. या सालीं तें पुरें झाल्यामुळें शके १७०८ फाल्गुन शु।। ११ या दिवशीं त्यांनीं घाटाचा उत्सर्ग केला. दुसरे दिवशीं पांच सहस्र ब्राम्हण भोजनास घालून भूयसी वाटली. कुरुंदवाडास रामचंद्र दिक्षीत वाटवे यांनीं यज्ञ केला. त्याचें फाल्गुन शु।। १४ स महाव्रत होऊन पौर्णिमेस यज्ञसमाप्ती झाली. प्रतिपदेस अनभृत स्नान झालें. मिरज व कुरुंदवाड येथें झालेल्या दोन्हीं समारंभांस येण्याचा कोंकणांत जातांना भाऊंनीं संकेत केला होता. परंतु वेळेवर ते कोंकणांतून परत येऊं शकले नाहींत. (खरे ८–३०७९, ३०८४)

---

प्रकरण १२ वें

# श्रीरंगपट्टणची मोहीम

टिपूसुलतानाचा समाचार घेण्याकरितां मराठ्यांनीं त्याच्यावर मोठी स्वारी केल्याची हकीकत मागील प्रकरणीं आलीच आहे. त्या स्वारींत टिपूनें मराठ्यांना खंडणी देऊन जरी तह करून घेतला तरी मराठ्यांना समाधानकारक असा त्या स्वारीचा निकाल झाला नाहीं; यामुळें त्याचें पारिपत्य करण्याची आवश्यकता अजून शिल्लकच राहिली. मागच्या स्वारींत मराठ्यांना टिपूच्या सामर्थ्याचा चांगलाच अनुभव आला. शिवाय परशुराम-भाऊंसारखा रणवीर त्या स्वारींत हजर नसल्यामुळें मराठ्यांना ती स्वारी कशीतरी आटपावी लागली. अर्थातच पुन्हां प्रसंग साधून टिपूवर हत्यार धरण्याचें काम मराठ्यांना करावयाचेंच होतें. पण यावेळीं पहिल्यापेक्षां जास्त सावधगिरी बाळगूनच तें करणें प्राप्त आहे असें नानानें ठरविलें. टिपूहि मागील स्वारींत तहास येण्याचें कारण त्याचा दिवसेंदिवस इंग्रजांशी बिघाड होत चालला होता. या परिस्थितीचा फायदा घेऊन शक्यतर टिपूचा कांटा अजीबात काढून टाकण्याचा उद्योग आतां मराठ्यांस करावयाचा होता. निजाम व मराठे यांना टिपू म्हणण्यासारखा आटपला नाहीं. तेव्हां शक्यतर इंग्रजांसहि मिळवून घेऊन हें काम करावें असें नानानें ठरविलें. पण इंग्रज मंगलोरच्या तहानें बांधले गेल्यामुळें टिपूकडून कुरापत निघेपर्यंत त्यांना

टिपूवर हत्यार धरणें कठीण होतें. ही संधी इंग्रजांना टिपूनें त्रावणकोरच्या राज्यावर स्वारी केल्यामुळें आपोआपच आली. त्रावणकोरचा राजा किरीटो रामराजा हा इंग्रजांचा दोस्त होता. त्यावर टिपूनें स्वारी केल्यामुळें टिपूवर हत्यार धरण्याचा मार्ग इंग्रजांस खुला झाला. ✿

त्रावणकोरच्या राजावर स्वारी केल्यामुळें इंग्रजांना हवी होती ती संधी आयतीच आली. टिपूची खोड मोडण्याची मूळ मसलत इंग्रजांचीच होती. पण टिपूचें सामर्थ्य इंग्रजांनाहि माहीत होतें. अशा बलाढ्य शत्रूशीं सामना करावयाचा म्हणजे योग्य तरतूद करूनच तो केला पाहिजे हें ओळखून इंग्रजांनीं टिपूवरील या स्वारींत आपण होऊनच मराठ्यांकडे मदतीची याचना केली. *

टिपूवरील स्वारीच्या या वाटाघाटींत निजामानें प्रामुख्यानें भाग घेतला होता. इंग्रजांशीं त्यानें मराठ्यांना न विचारतांच वाटाघाटी सुरू

✿ (टीप:—टिपूनें त्रावणकोरच्या राजाकडे केलेल्या भयंकर मागण्या व त्याला त्रावणकोरच्या राजानें दिलेलें उत्तर पूना रेसिडेन्सि रेकॉर्डमध्यें सविस्तर छापलें आहे. P. R. C. 3-52)

* (टीप:—मराठ्यांचा आद्य इतिहासकार ग्रँट डफ् यानें मराठेच इंग्रजांची मदत मागण्यास गेले असें लिहिलें आहे; पण अलीकडे प्रसिद्ध झालेला पूना रेसिडेन्सि रेकॉर्डमधील पत्रव्यवहार पाहतां 'डफ्' साहेबांचें हें म्हणणें बरोबर नाहीं असें दिसतें. वाटेल तो स्वार्थत्याग करून मराठ्यांची मदत या स्वारींत मिळवावी व मराठ्यांना टिपूकडून खंडणी मिळते ती हिशेबांत न धरतां लढाईंतील फायद्याचा तिसरा वांटा मराठ्यांना मिळावा असें कॉर्नवॉलीस यानें एका पत्रांत लिहिलें आहे. P.R.C. 3–104 दुसऱ्या एका पत्रांत कॉर्नवॉलीस म्हणतो "Marathas should not be against us if not with us. We should not give them any cause for provocation. We should speak of them with respect. P.R.C. 3–113 वरील उताऱ्यावरून इंग्रजच मराठ्यांच्या मदतीची कशी याचना करीत होते हें स्पष्ट होतें.)

केल्या होत्या. असें करण्यांत त्याचा हेतू मात्र निराळा होता मराठ्यांचा चौथ सरदेशमुखीचा ऐवज निजामाकडे फार तुंबला होता. मराठ्यांनीं या ऐवजाची मागणी केल्यास आपणास इंग्रजांनीं मदत करावी अशी निजामाची अपेक्षा होती. हा आपमतलब साधण्याकरितां निजामानें टिपूवरच्या या स्वारींत फारच आतुरता दाखविण्यास सुरवात केली.

या मोहिमेचें खरें काम इंग्रजांनींच आपणाकडे घेतलें होतें. पण निजाम मात्र जणूकाय आपणच या मोहिमेचे पुढारी आहोंत असें मराठ्यांना भासवीत होता. इंग्रजांना मराठे व निजाम या दोघांचीहि मदत पाहिजे होती. पण आपण अडचणींत आहोंत हें निजाम व मराठे यांच्या लक्षांत येऊं नये अशा सावधगिरीनें इंग्रज वागत होते. *

निजामानें आपण होऊन पुढाकार घेऊन मराठ्यांशीं मोहिमेची वाटाघाट करण्यास सुरवात केली. त्यानें नानांच्या पाठीमागें असा लकडा लाविला कीं आपण तिघांनीं मिळून टिपूवर स्वारी करावयाची व सारखा मुलूख वाटून घ्यवयाचा अर्थातच स्वारीवर तिन्ही सरकारांचे प्रमुख प्रतिनिधी हजर असले पाहिजेत. नाना किंवा हरीपंत यांपैकीं कोणीतरी स्वारीवर हजर होणें जरूर आहे; तसें न होईल तर वांटणीचा सारखा वांटा मिळणार नाहीं. निजामाचें इंग्रजांशीं एवढें सूत जमलें ही गोष्ट नानाला रुचण्यासारखी नव्हती. पण निजामाचा नेट पाहून इंग्रजांचा वकील मॅलेट् हाहि मराठ्यांशीं निकरानेंच बोलूं लागला. मॅलेट्चेंहि म्हणणें असेंच पडलें कीं, खुद्द पेशव्यांनींच स्वारीवर निघावें. निजाम व इंग्रज यांचा जोराचा आग्रह दिसून आल्यावर नानालाहि स्वारीचा विचार करणें भागच पडलें. पेशव्यांनीं स्वारीवर निघणें शक्यच नव्हतें. हरीपंत पोट दुखीच्या आजारानें जाग्यावरच बसले होते. शेवटीं राहिले परशुरामभाऊ. मागच्या स्वारींत परशुरामभाऊ नसल्यामुळें स्वारीला कसा हिसका बसला याची जाणीव नानाला

*. टीप: पू. रे. रे. मधील एका पत्रांत कॉर्नवॉलीसनें मॅलेट्ला अशी सूचना दिली कीं मराठ्यांची मदत इंग्रजांना पाहिजे, पण इंग्रजांची अडचण आहे अशी मात्र मराठ्यांची समजूत होऊं देऊं नये. P.R.C. 3–60 )

ग्रंथ संग्रह

होतीच. तेव्हां भाऊंना बोलावल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें समजून नानानें भाऊंना तांतडीचें आमंत्रण पाठविलें. नानांचें आमंत्रण येतांच भाऊ इ. स. १७९० च्या मार्च महिन्यांत तासगांवाहून निघाले व दोन दिवसांनीं पुण्यास येऊन पोंचले. भाऊ पुण्यांस आल्यावर नाना, हरीपंत व भाऊ यांच्या अनेक बैठकी झाल्या. भाऊंच्या सर्व अडचणी दूर करण्याचें नानानें कबूल केलें. भाऊ आरंभीं स्वारीवर जाण्यास नाखूषच होते; पण नाना व हरीपंत यांचा फार आग्रह पडल्यामुळें शेवटीं भाऊंनीं स्वारीवर जाण्याचें कबूल केलें. भाऊंनीं स्वारीचें काम कबूल केल्यावर इंग्रज व निजाम यांच्याजवळ ठांसून बोलण्याचा दम नानांला आला व त्याप्रमाणें त्यांनीं इंग्रज व निजाम यांस कळविलें कीं आमच्या तर्फे परशुरामपंतभाऊ स्वारीस निघत आहेत. हरीपंत आजारी आहेत; त्यांना बरें वाटल्यावर तेहि स्वारीस निघतील. तिघाहि सरकारांनीं पराकाष्ठेची मेहनत करून सारखी वांटणी घ्यावी. नानांनीं असा खडखडीत जबाब दिल्यावर निजामानें परशुरामभाऊंनीं स्वारींत आपल्या हाताखालीं काम करावें अशी मागणी केली. अर्थातच भाऊंना ही मागणी मान्य होण्यासारखी नव्हती. भाऊंनीं साफच जबाब दिला कीं निजामाच्या हाताखालीं आमच्यानें काम होणार नाहीं. आम्हांस स्वतंत्र कामगिरी दिल्यास आम्हीं ती पत्करूं. इंग्रजांचा वकील मॅलेट् यानेंहि भाऊंच्या म्हणण्यास पुष्टी दिली. अशा रीतीनें भाऊंचें म्हणणें मान्य झाल्यावर तिघां सरकारांत पुष्कळ भवति न भवति होऊन शेवटीं कराराची याद ठरली व निजाम, मराठे आणि इंग्रज या त्रिवर्गांत टिपूवर स्वारी करून मिळेल तो मुलूख सारखा वाटून घ्यावा असें ठरलें. इ. स. १७९० च्या जून महिन्यांत त्रिवर्गांचा हा तह पुरा झाला. तह पुरा होण्याच्या आधीं निजाम व मराठे या दोघांनीं आपापला विशेष फायदा करून घेण्याची खटपट इंग्रजांजवळ केली; पण इंग्रजांनीं कोणाच्याहि म्हणण्यास दाद दिली नाहीं. चौथ सरदेशमुखीची तुंबलेली बाकी मराठे आपणाजवळ मागतील तरी त्या बाबतींत इंग्रजांनीं मध्यस्थी करून मराठे आपणाकडे चौथ सरदेशमुखीची बाकी मागणार नाहींत अशी खटपट

इंग्रजांनीं करावी असें निजामाचें म्हणणें होतें. पण इंग्रजांनीं तें मान्य केलें नाहीं. निजामाप्रमाणें पुणें दरबारनेंहि इंग्रजांच्या ताब्यांत असलेल्या काशी क्षेत्रांत औरंगजेबानें बांधलेली मशीद पाडून तेथें श्रीविश्वेश्वराच्या देवळाचा सभा मंडप बांधावा अशी मागणी इंग्रजांकडे केली होती. पण ही मागणीहि इंग्रजांनीं युक्तीनें टाळली.

असो याप्रमाणें करारमदार होऊन टिपूवर त्रिवर्गांनीं स्वारी करण्याचें निश्चित ठरल्यावर मराठ्यांतर्फे या स्वारीवर आरंभीं परशरामभाऊंची नेमणूक झाली.*

असो. अशा रीतीनें भाऊंची नेमणूक झाल्यावर भाऊ स्वारीस निघावयाचे पण भाऊंची तरतूद नाना काय करतात तें ठरल्याखेरीज भाऊ निघणें शक्य नव्हतें. भाऊंना बदामी नरगुंद वगैरे प्रकरणांत बरेंच कर्ज झालें होतें तें सर्व देऊन पुन्हा नव्या स्वारीची व्यवस्था केल्याखेरीज भाऊंना स्वारीस निघणें शक्य नव्हतें. शेवटीं वाटाघाटी होऊन भाऊंना चार लक्ष रुपये तूर्त देण्यांत आले. भाऊंनी पंचवीस हजार फौजेसह स्वारीवर निघावयाचें असें ठरलें

* (टीप:–भाऊंची नेमणूक स्वारीवर झाल्यानंतर भाऊंच्या लायकी-संबंधानें इंग्रजांनीं काढलेले उद्‌गार महत्वाचे असल्यामुळें त्यांतलें कांहीं खालीं देतों. भाऊंचें वर्णन एका पत्रांत an eminent member of the Maratha empire असें केलें आहे. PRC 3–63 दुसऱ्या एका पत्रांत the English got the help from so powerful an empire as the Marathas in war against Tipu. असें म्हणून आनंद व्यक्त केला आहे. P.R.C. 3–65 आणखी एके ठिकाणीं भाऊंचें वर्णन One ot the best of the Maratha Military officers असें केलें आहे. P.R.C. 3–67 दुसऱ्या एका पत्रांत Parshurambhau, a chief of considerable reputation entrusted to the conduct of the war, and being in command of the Maratha Frontier, success in the war is assured असें म्हटलें आहे. P.R.C. 3–85)

होतें. व त्याप्रमाणें निरनिराळ्या सरदारांच्या पथकांची योजना नानांनीं करून त्यांनीं भाऊंच्या हाताखालीं काम करावें असें ठरलें होतें. पटवर्धन तीन हजार, नवीन चाकरीस ठेवावयाचे सात हजार, रास्ते तीन हजार, प्रतिनिधी दोन हजार, मेहेंदळे दोन हजार, आणि किरकोळ पथकें आठ हजार अशी पंचवीस हजारांची योजना केली होती. शिवाय पानशांचा तोफखाना आणि मुंबईकर इंग्रजांचीं दोन पलटणें भाऊंच्या मदतीस याव-याचीं होतीं. याशिवाय पुणें दरबारनें पांच हजार गारदी पुरवावे आणि भाऊंनीं पांच हजार गारदी नवीन चाकरीस ठेवावे असें ठरलें होतें. इतका सेनासमुदाय जमून स्वारीचें काम सुरू होण्यास अर्थातच चार सहा महिनें लागणार ; याकरितां सर्व फौज जमा होण्याची वाट पहात पुण्यास न बसतां भाऊ श्रीमंतांचा निरोप घेऊन तासगांवास निघून गेले व त्यांनीं आपल्या पथकाचे शिलेदार वगैरे गोळा करण्याचा उपक्रम जारीनें सुरू केला. कारण भाऊंनीं स्वारीस लौकर निघण्याविषयीं नानाचा सारखा तगादा चालू होता. हा तगादा होण्याचें कारण असें होतें कीं, इंग्रजांनीं टिपूच्या मुलखावर हल्ला करतांच निजाम व मराठे यांनींहि टिपूच्या मुलखांत शिरावें अशी योजना निजाम अल्ली व नाना फडणीस यांनीं इंग्रजांच्या वकिलाजवळ कबूल केली होती. या योजनेप्रमाणें जनरल मिडोज् यानें मद्रासहून निघून टिपूच्या कोइमतूर वगैरे मुलखाकडे चाल केल्याचीं वर्तमानें येऊं लागलीं. तेव्हां मराठे व मोंगल यांना तात्काळ स्वारीवर नमूद होण्याखेरीज गत्यंतरच राहिलें नाहीं. नानांनीं भाऊंना तगादा करण्याचें मुख्य कारण वरीलप्रमाणें होतें.

मराठ्यांची फौज जमविण्याची धामधूम चालू असतांच टिपूनें मराठ्यांकडे आपले वकील पाठवून मराठ्यांना यूद्धांतून फोडण्याचा सारखा प्रयत्न चालू ठेवला होता. टिपूचे वकील पुण्यास आल्यामुळें अर्थातच मराठ्यांच्या प्रामाणिकपणाचा इंग्रजांना संशय येऊं लागला. नानानें टिपूच्या वकिलास एकदम हाकलून लावावें असें इंग्रजांचा वकील मॅलेट् याचें म्हणणें होतें. पण टिपूच्या वकिलाजवळ जुन्या खंडणीपुरतेंच आम्हीं बोलणें करीत आहों असें नानानें मॅलेट् यास कळविलें. साधेल तर जुन्या खंडणीचे पैसे

टिपूच्या वकिलाकडून वसूल करावे असें नानाचें धोरण होतें म्हणून टिपूच्या वकिलाजवळ नानाचीं बोलणीं चालू होतीं. मॅलेट् यांसंबंधानें सारख्या तक्रारी करीतच होता पण नानानें त्याला दाद दिली नाहीं.*

असो. मॅलेट्च्या मराठ्यांविरुद्ध दोन तक्रारीं नेहमी चालू असत. त्यांपैकीं एक वर लिहिल्याप्रमाणें टिपूच्या वकिला संबंधानें होती व दुसरी मराठे तात्काळ स्वारीला सुरवात करण्यांत दिरंगाई करतात अशी होती. मराठ्यांचे व इंग्रजांचे कराराचा झाले त्यावेळीं भाऊ स्वारीस निघतांच त्याचेबरोबर इंग्रजांनीं आपलीं दोन पलटणें मदतीस पाठवावीं असें ठरलें होतें. याकराराप्रमाणें इंग्रजांनीं इ. स. १७९० च्या मे महिन्यांतच भाऊंबरोबर स्वारीस जाणारीं पलटणें मुंबईहून जलमार्गानें रवाना केलीं. हीं पलटणें जयगडच्या खाडीनें संगमेश्वरास जाऊन उतरलीं व आंबा घाट चढून जून महिन्यांत तासगांवाजवळ दाखल झालीं. तीं दोन पलटणें व त्यांबरोबर गोलंदाज वगैरे सरंजामानिशीं सहा तोफा असा एकंदर सुमारें अडीच हजार.

---

*(टीपः–टिपूचे वकील रास्त्यांमार्फत पुणें दरबारशीं वाटाघाटी करतात. या संबंधानें मॅलेट्नें केलेल्या तक्रारी पूना. रे. रे. मध्यें अनेक छापल्या आहेत. टिपूच्या वकिलांनीं पेशव्यांना चार लक्ष रुपये दिले अशीहि तक्रार मॅलेट्नें एका पत्रांत केली आहे. P. R. C. ३–१२९ ) टिपूच्या वकिलाजवळ जुन्या खंडणीशिवाय दुसरें बोलणें करीत नाहीं असें नानाचें म्हणणें होतें त्यावर मॅलेट्नें नानास असें सुचविलें कीं, जुनी खंडणीं वकिलांनीं आणली असेल ती एकदम वसूल करून टिपूच्या वकिलास हाकलून कां देत नाहीं ? ही जुनी खंडणी पंधरा लक्ष टिपूच्या वकिलांनीं आणली होती असें मॅलेट्च्याच एका पत्रांत लिहिलें आहे. ही खंडणी वसूल करून वकिलांना कां घालवून देत नाहीं या मॅलेट्च्या सूचनेला नानांनीं मोठें मार्मिक उत्तर दिलें तें मॅलेट्नें कॉर्नवॉलीस यास कळविलें. हें उत्तर खालील प्रमाणें आहेः– "Decency where practicable, was in All cases preferable to violence particularly in matters of accounts, ( PRC 3-135 page 180 )

लढाऊ माणसांचा जमाव होता. या फौजेवर कॅप्टन् लिट्ल् हा मुख्य सरदार होता. आपले मराठे लोक त्याला लिटली असें म्हणत. हा सरदार मोठा शूर, पराक्रमी आणि शिस्तीचा असा होता. पर्शरामभाऊंचा आजपर्यंत इंग्रजांशीं संबंध आला होता तो शत्रुत्वाच्या नात्याचा होता. आतां यावेळीं कॅप्टन् लिट्ल् हा इंग्रजांचा सरदार भाऊंचा मित्र म्हणून भाऊंना मदत करण्याकरितां आला होता. अर्थातच इंग्रजांचें युद्धकर्मातलें कौशल्य, हिंमत, धोरण, शिस्त व टापटीप वगैरे अनेक बहुमोल गुणांचें निरीक्षण आतां मराठयांना इंग्रजांचे मित्र म्हणून जवळून करण्याची संधी आली होती. या सर्व गोष्टी इंग्रजांच्या साहचर्यामुळें या मोहिमेंत मराठयांच्या अनुभवास आल्या व त्यामुळें इंग्रजांच्या पराक्रमाविषयीं मराठयांच्या मनांत एक प्रकारचा आदर आणि दराराही वाढला.*

इंग्रजांची पलटणें तासगांवीं गेल्यावर ता. १२ जुलई सन १७९० ला या पलटणांचे अधिकारी व परशुरामभाऊ यांच्या भेटी झाल्या. पटवर्धनांची सरदारी यावेळीं चिंतामणराव पांडुरंग यांच्या नांवें होती. चिंतामणराव हे अल्पवयी होते म्हणून सरदारीचा सर्व भार भाऊंवरच होता. तथापि अशा महत्वाच्या प्रसंगीं सरदारी ज्याच्या नांवें असेल त्याला भेटीस बोलावण्याची वहिवाट होती त्याप्रमाणें भाऊंनीं या भेटीच्या समारंभाकरितां चिंतामणरावांना मिरजेहून मुद्दाम बोलावून आणलें. या भेटीचें वर्णन भाऊंनीं खालील प्रमाणें केलें आहे.

" इंग्रजांकडील पलटणांचे सरदार छ. २६ सकाळीं डेऱ्यास आले होते त्यांस वस्त्रें मात्र दिलीं. अगोदर आमंत्रणास रा. नारायण भिकाजी आठवले पाठविले. नंतर ते निघोन येऊं लागले तेव्हां वाटेस सुमारे चि. रा. जनोबा सुभेदार यांस पाठविलें होतें. छ. २७ तारिखेस आम्ही परत भेटीस गेलों

---

* (टीपः—कॅ० लिट्ल्चें भाऊंबरोबर जें साहचर्य झालें त्याची खुलासेवार हकिगत कॅ० लिट्ल्च्या हाताखालील मूर या नांवाच्या गृहस्थानें "Muir's narrative of Capt. Little's detachment" या नांवाचा एक स्वतंत्र ग्रंथ लिहून त्यांत फार उत्तम रीतीनें दिली आहे.)

तेव्हां आमंत्रणास एक गोरा आला. चि. रा. चिंतामणराव आप्पा यांस व आम्हांस शिरपेंच व वस्त्रें व मंडळीस वस्त्रें इंग्रजांनीं दिलीं." ( खरे ८ पा. ४२८९ ) इंग्रजांच्या व भाऊंच्या भेटी गांठी झाल्यावर कॅ. लिटल् हा भाऊंना स्वारीला निघण्याबद्दल फारच त्वरा करूं लागला. तासगांवच्या आसपास या इंग्रजांच्या पलटणांचा मुक्काम दीड दोन महिने पडला होता. या अवधींत भाऊंनीं सैन्याची जमवा-जमव करण्याची खटपट सारखी चालू ठेविली होती. तथापि त्यांच्या अपेक्षेप्रमाणें सैन्य मात्र जमा झालें नाहीं. एवढ्या अवधींत सुमारें पांच हजार स्वार व दोन हजार पायदळ एवढाच सरंजाम जमला होता. एवढ्या सैन्यासह निघण्यापेक्षां आणखी थोडा वेळ थांबून सैन्य भरती करावी असें भाऊंच्या मनात होतें. पण इंग्रज स्वारीवर निघाले, मोगलही निघाला. तेव्हां आपण दिरंगाई करण्यांत अर्थ नाहीं असें नानांनीं भाऊंना लिहिलें, शिवाय निजामअल्लीच्या लष्करांतून गोविंदराव काळे याचीहि भाऊंना खालील प्रमाणें सूचना आली. "मोंगल सरदार सत्वरच कृष्णा नदी उतरून पलीकडे जाणार, आपणहि उतरावें, यांत गुण व फायदे बहूत आहेत. न उतरल्यास दोष इंग्रजांचा येतो व सरकारचीहि नुकसानी आहे. आतां रहावें हे सलाह वक्त नाहीं कोइमतूर वगैरे जागे इंग्रजांनीं घेतले. इंग्रज गालब पडेल आपण सत्वर(कृष्णा नदी)उतरावें."(खरे ८ पा ४२८९

याप्रमाणें चोहोंकडून स्वारीस निघण्याचे तगादे येऊं लागल्यामुळें जमली होती तेवढीच फौज बरोबर घेऊन परशरामभाऊ इ. स. १७९० च्या आगष्ट महिन्यांत स्वारीस निघाले. पेशवाईंत घरांतल्या कर्त्या माणसा-बरोबर नवीन होतकरू माणसांनीं स्वारीवर निघण्याची प्रथा होती. तिला अनुसरून पटवर्धनांच्या घराण्यांतील चिंतामणराव आप्पा हे भाऊं बरोबर स्वारीवर जाण्याचा आग्रह धरून बसले होते; परंतु भाऊंनीं त्यास बरोबर घेतलें नाहीं. भाऊ यासंबंधानें लिहितात "चि. रा. चिंतामणराव आप्पाचे मतें स्वारीबरोबर असावें असें आहे तें चांगलेंच आहे. परंतु पर्जन्यकाळ, चिरंजिवाचें शरीर अशक्त, पलीकडे असा प्रसंग पडेल नकळे;

यास्तव दिपवाळी पावेतों घरीं राहून पुढें जसें दृष्टीस पडेल तसें केलें तरी बरें!"(खरे ८. पा. ४२९०)

असो. याप्रमाणें भाऊ स्वारीस निघाले त्याची हकीगत त्यांनीं पुढील प्रमाणें लिहिली आहे. "आम्हीं श्रावण शु० १३ रविवारीं पहांटेच्या दोन घटका रात्रीस उगारानजीक कृष्णा उतरून अलीकडे दक्षिणतीरास आलों. फौज उतरत आहे. दोन तीन रोजांत झाडून सर्व आली म्हणजे कूच करून ढवळेश्वराजवळ घटप्रभा उतरावयास जात आहों. चि. रा. रामचंद्र आप्पा ढवळेश्वराच्या उतारास पुढें गेले आहेत. त्याचा कागद "परवा रविवारीं पैलतीरास जातों झाडून सरंजाम उतरला" म्हणून आला होता. पार झालें असतील. तोफखाना पलटणासुद्धां गोकाक नजीक पार व्हावयास पाठविला आहे. तोही पार करून उतरला. बाकी लौकरच उतरेल. सारा जथ सतीगिऱ्याजवळ अकीसागर गोवन कोपऱ्या मुक्कामीं होईल. पुढें जाण्याचा बेत ठरवून लिहून पाठवितों" (खरे ८ पा. ४२९०) ढवळेश्वरीं आल्यावर भाऊ पुढें लिहितात.

"काल छ. १८ जिल्हेजी मुक्काम मजकुरीं आलों. फौज उतरत आहे. झाडून सरंजाम अलीकडे यावयास तीन चार रोज लागतील. कांहीं पागा वगैरे फौज मुधोळच्या उतारास पाठविली. तोफखाना व पलटणें गोकाके-जवळ पार झालीं. त्यांस मनोळीच्या सुमारें जाण्याविशीं लिहिलें आहे. व चि. रा. रामचंद्रपंत आप्पा यासहि मनोळीकडे जाण्याकरितां लिहून पाठविलें आहे. आम्हीं लौकरच जात आहों. शत्रूचा जमाव, पायचा दहा हजार व तोफा पंधरा. कांहीं राऊत येणेंप्रमाणें धारवाड नजीक आहे. एक बातमी कित्तुरावर येणार व दुसरी नरगुंदच्या पेठेवर जाणार अशा बातम्या येतात. मनोळी जवळ कुल सरंजाम जमा होतांच पुढें तिकडील सुरत दिसण्यांत येईल. त्या बेतानें जें कर्तव्य तें करावयाचें. तूर्त त्याच्या तालुक्यांत हंगामा सुरू जाहला. एकोडीचें ठाणें घेतलें. या उपर थोडक्याच दिवसांत मोठा हंगामा होईल असें दिसत आहे. घडेल तें मागाहून लिहून पाठवितो." (खरे ८–पा. ४२९०–९१) टिपूच्या मुलखांत जोराचा हंगामा

सुरू करून पुढें धारवाड गांठावे असें भाऊंच्या मनांत होतें; पण हें काम बरेंच अवघड होतें. कारण तो किल्ला टिपूच्या हाताखालील शूर सरदार बद्रीजमालखान याच्या देखरेखीखालीं होता. या सरदाराजवळ दहा हजार कवाइती पायदळ, दोन हजार स्वार, व पुष्कळ तोफा असा सरंजाम होता. शिवाय किल्ल्याची शिबंदी म्हणून निवडक लढाऊ माणूस तीन हजारपर्यंत होतें. धारवाडचा किल्ला त्या प्रांतीं बळकटीबद्दल प्रसिद्ध होता आणि त्याच्या रक्षणाकरितां शत्रूनें इतकी जय्यत तयारी ठेविली असतां तो किल्ला काबीज करणें जरा कठीणच होतें असें म्हणण्यास हरकत नाही. भाऊंजवळ या वेळेस दहा बारा हजार स्वार व पांच हजार पायदळ इतकीं फौज जमली होती. आणखी फौज मागाहून यावयाची होती, आणि इग्रजांचीं दोन पलटणें बरोबर होतीं. या भिस्तिवर भाऊंनीं धारवाडास वेढा घालण्याचें मनांत आणलें होतें पण तें थोडेंसें कठीणच होतें.

धारवाडास वेढा घालावयाचा म्हणजे त्याच्या आजूबाजूस शत्रूचीं ठाणीं असतील तीं आधीं काबीज करणें भाऊंना जरूर वाटलें. कारण धारवाडास वेढा पडल्यावर हे आजूबाजूचे शत्रूच लोक उपद्रव दिल्याखेरीज रहाणार नाहींत; तेव्हां त्यांचा बंदोबस्त आधीं करून मग धारवाडकडे वळावें असें भाऊंनीं ठरविलें. या कार्यक्रमाला सुरवात करून पहिल्यानें भाऊंनीं जाडरहेबळीचें ठाणें काबीज केलें. त्या ठाण्याच्या रक्षणाकरितां धोंडोपंत गोखले यांस हजार स्वारांसह ठेवून भाऊ हुबळीकडे गेले. भाऊ हुबळीकडे वळतांच धारवाडहून शत्रूचे लोक येऊन त्यांनीं धोंडोपंतावर छापा घातला, परंतू धोंडोपंतानें तो छापा मोठ्या मर्दुमकीनें मारून काढिला व शत्रूच्या लोकांस पिटून लाविलें. भाऊंनीं हुबळीस जातांच नवी व जुनी हुबळी घेतली आणि आपल्या फौजेच्या निरनिराळ्या टोळ्या करून त्यांच्या कडून दोदवाड आणि मिश्रीकोट हीं ठाणीं घेतलीं. पुण्याकडून भाऊंकडे प्रत्यहीं नवीन फौज येत होती. फौज जसजशी वाढत गेली तसतशी भाऊंची शत्रूचा मुलूख काबीज करण्याची कामगिरी जारीनें सुरू झाली. भाऊंना ही संधीहि चांगलीच होती ; कारण कोइमतुराकडे इंग्रजांनीं ताण दिल्या-

मुळें टिपू अडकून राहिला आणि भाऊ समोर असल्यामुळें बद्रीजमालखानहि धारवाड सोडून बाहेर पडेना. शिवाय रायचूर दुआबांत टिपूचा कुतुबुद्दीन नांवाचा सरदार कांहीं फौज घेऊन राहिला होता त्यावर निजामअल्लीचा सरदार दारा जहांबहादूर यानें चाल करून लढाई दिली. त्या लढाईत कुतुबुद्दिनाचा पराभव होऊन तो श्रीरंगपट्टणाकडे पळून गेला. अशा रीतीनें टिपू चोहोंकडून ताणला गेल्यामुळें त्याच्या मुलखाचे लचके तोडण्याची आलेली ही संधी भाऊंनीं फुकट दवडिली नाहीं. भाऊंनीं आपल्या फौजेच्या निरनिराळ्या टोळ्या करून त्यांना चोहोंकडे कामगिरीला पाठविलें व टिपूच्या मलखाचा धुव्वा उडविण्याचा सपाटा सुरू केला. आप्पाजी गोविंद सखदेव यांनीं सावनुराकडे जाऊन लक्ष्मेश्वर तालुक्यांत अम्मल बसविला. गणपतराव मेहेंदळे यांनीं बिदनूर प्रांतीं जाऊन जडें व अनवटी हीं ठाणीं घेतलीं. जयरामपंत जोशी यांनीं कारवारकडे जाऊन सोंदें घेतलें. दौलतराव घोरपडे यांनीं गजेंद्रगड घेतला. कान्हेर नरसिंह यांनीं तुंगभद्रा उतरून जाऊन हरपनहळ्ळीचें ठाणें व उंचगीदुर्ग हा पहाडी किल्ला घेतला. मुरारराव घोरपडे यांचा पुतण्या व्यंकटराव यानें गुत्तीकडे जाऊन धामधूम केली. या सर्व घडामोडी भाऊंच्या देखरेखीखालीं इ. स. १७९० च्या अक्टोबरपासून इ. स. १७९१ च्या फेब्रुवारीच्या दरम्यानच्या काळांत घडून आल्या. *

भाऊंचा मुख्य हेतु धारवाड काबीज करण्याचा होता. पण तें काम हातांत घेण्याच्या आधीं आजूबाजूच्या किरकोळ ठिकाणांचा बंदोबस्त करण्याचें त्यांनीं ठरविलें होतें; त्याप्रमाणें बरींच लहानसान ठाणीं हस्तगत

*(टीपः--भाऊंच्या फौजांचा चोहोंकडे संचार होऊन टिपूचा मुलूख काबीज करण्याचें काम जोरानें सुरू झालें होतें. या वेळीं भाऊ नुसतें देखरेखीचें काम करीत स्वस्थ बसले नव्हते. ते स्वतःहि जोराची मुलुखगिरी करीत होते. पूना रे. रे. च्या एका पत्रांत भाऊंनीं इ. स. १७९० च्या सप्टेंबर महिन्यांत इगुंडा, सोदत्ती, हुलीबतगिरी, पुरूषगर, कित्तूर, दासीपूर वगैरे ठिकाणें काबीज केलीं अशी माहिती आहे. P.R.C. 3-149)

झाल्यावर भाऊंनीं धारवाडची कामगिरी हातांत घेतली. धारवाडचा किल्ला हा मूळचाच मोठा बळकट होता. सप्टेंबर महिन्यांत भाऊ धारवाडपासून तीन कोसांवर नरेंद्र या ठिकाणीं लष्करासह येऊन दाखल झाले. या ठिकाणीं तळ देऊन तेथून भाऊंनीं धारवाडावर जावें व दिवसभर किल्ल्यावर तोफांचा मारा करून अस्तमानीं गोटास परत यावें असाच क्रम कित्येक दिवस चालला होता. भाऊंच्या या उद्योगाचा फारसा परिणाम बद्रिजमालखानावर होत नव्हता. त्याला दाणा, वैरण वगैरे बाहेरून मिळे ती बंद पडेना. तेव्हां भाऊंनीं आपल्या फौजेच्या निरनिराळया टोळ्या करून त्या किल्ल्याभोंवतीं सारख्या फिरत ठेवल्या. या उपक्रमामुळें शत्रूला दाणा वैरण मिळणें कठीण पडूं लागलें. शत्रूचे लोक दाणा वैरणीकरतां बाहेर पडतील त्यांचें सक्तीनें पारिपत्य करावें असा भाऊंचा हुकूम असल्यामुळें यावेळीं मराठ्यांनीं शत्रूपक्षाशीं क्रूरपणाचें वर्तन केल्याचें आढळतें. *

वरीलप्रमाणें कडक उपाय योजल्यामुळें किल्ल्यांत बाहेरून रसद जाणें अजीबात बंद झालें. रसद बंद झाल्यामुळें आंतल्या लोकांचे हाल होऊं लागले. रसद बंद केल्यावर भाऊंनीं आपला मुक्काम नरेंद्र येथून हालवून तो नवलूर म्हणून खेडें आहे तेथें आणला. हें खेडें धारवाडपासून सुमारें एक कोसावर होतें. या ठिकाणीं आल्यापासून भाऊंनीं मोर्चे बंदीचें काम

---

*(टीप:--शत्रूपक्षाचे लोक रसद नेण्याकरतां आलेले सांपडले तर त्यांचें पारिपत्य करतांना नाक, कान, हात, पाय तोडण्याचे प्रकार भाऊंच्या फौजेनें केले असें ऐ. ले. संग्रहांतील पत्रांवरून दिसतें. सामान्यतः मराठे सरदारांनीं असे क्रूरपणाचे प्रकार केल्याचें फारसें आढळत नाहीं. पण यावेळीं त्यांनीं हा मार्ग आक्रमण्याचें कारणहि एका पत्रांत दिलें आहे तें असें. "नाकें कापावयाचें कारण तरी इकडील बाजाराचा तांबोळी हुवहींस जात असतां कुसेगळकरांनीं धरून त्याचें नाक कापून त्यास लष्करांत पाठविलें. त्याजवरून तोच जावता उतरावयास प्रारंभ झाला आहे. आजपर्यंत हें नव्हतें. तिकडूनच सुरू झाल्यामुळें सुरू झालें आहे. खरे ८ पान४२९४ ले. ३२३३)

सुरू केलें. किल्लयाजवळ मैराल नांवाची एक टेकडी होती. त्या टेकडीवर एक देवालय होतें. मोर्चेबंदीचें काम कसें काय चालतें तें पहाण्यास हें उंचावरचें ठिकाण मोठें सोईचें होतें त्या ठिकाणीं जाऊन भाऊ आपल्या नजरेनें मोर्चेबंदीचें काम कसें होतें हें स्वतः पहात असत. टेकडीच्या पायथ्याशीं तोफा आणून गोलंदाज नेहमीं मारा करीत. किल्लयावर लांब पल्लयाच्या तोफा होत्या. त्यांच्या माऱ्यांत ही टेकडी येत होती. भाऊ या टेकडीवर येऊन बसतात हें किल्लयांतील लोकांना माहीत होतें. त्यामुळें टेकडीवरच्या देवळावर नेम धरून किल्लयावरचे लोक गोळे मारीत असत. पण भाऊ व त्यांच्याबरोबरचे लोक यांनीं या धोक्याची काडीमात्र परवा केली नाहीं. याप्रमाणें गोळागोळीचें काम सुरू झाल्यावर दोनतीन दिवसांनीं शत्रूशीं एक मोठी लढाई झाली. या लढाईचें वर्णन परशुरामभाऊंचे फडनवीस रामचंद्र श्रीधर काळे यांनीं फार चांगलें केलें आहे; व त्यांत इंग्रजांच्या मर्दुमकीची फार तारीफ केली आहे. हें वर्णन खालीलप्रमाणें आहे:—

"नरेंद्रावर मुक्काम भाद्रपद वद्य पंचमीस आला. त्यादिवसापासून दररोज धारवाड डावे एक कोस, एका कोसाचे अंतरानें टाकीत जाऊन धारवाडचे पश्चिमेस दिडाबाणाच्या पल्लयावर एक उलीबसाप्पाचें देवळ आहे. तेथें दडणी बहुत माळांच्या आहेत. त्या जाग्यावर तोफा मांडून रोज तृतीय प्रहर पावेतों शेंपन्नास गोळे मारून फिरून अस्तमान झाला म्हणजे गोटास यावें याप्रमाणें आश्विन वद्य ७ मी पावेतों रोज उठून येरझाऱ्या केल्या. पंचवीसपर्यंत घोडे ठार व चाळीस पन्नास माणूस गार्दी व इंग्रजांकडील व कांहीं शिलेदार ऐसे ठार झाले. आमच्या तोफा लागू व्हावयाच्या सुमारें त्यांनींहि किल्लयावरून व पेठेजवळून व वातेऱ्यावरून शेंपन्नास गोळे मारावे याप्रमाणें खेटे झाले. यानें कांहीं त्यास तंबी पोचेना; असें समजून आश्विन वद्य ८ मीच्या दिवशीं नरेंद्राहून कूच करून धारवाडच्या पूर्वेस एका कोसावर नवलूर म्हणून गांव आहे तेथें येऊन मुक्काम करून दुसरे दिवशीं रोजच्या दिनचर्येप्रमाणें तोफा मारावयासाठीं धारवाडच्या दक्षिणेस मैराळ टेकडी म्हणोन एक आहे तेथें टेकडीवर एक देवालय चांगलें आहे तेथें

स्वारी गोटांतून निघोन गेली. तेव्हां नवमीच्या दिवशीं प्रातःकाळीं दोन घटका दिवसास स्वारी टेकडीपाशीं गेली. बरोबर फार फौज नव्हती. टेकडीपासून पेठ एका बाणाच्या खाचेवर-तेथून किल्लाहि तितकाच. येणेंप्रमाणें असतां स्वारी तेथें गेली. जाऊन देवळांत बसले. तोफाहि गोटांतून आल्या नव्हत्या. इंग्रजहि गोटांतून आले नव्हते. स्वारीबरोबर चारपांचशें स्वार होते. दोन्हीं पागे सखोजी काटे व नारायणजी बाबर ऐसे बरोबर आले होते. इतक्यांत स्वारी जलदी गेली हें समजून मागून लिटली खासा व त्याच्या तोफखान्याचा सरदार व दुसऱ्या पलटणचा साहेब मेघडालन ऐसे तिघेजण मात्र ती. राजेश्री भाऊसाहेबांजवळ येऊन उभेराहिले. इतक्यांत सरकारच्या तोफाहि टेकडीपाशीं आल्या. गाडदीहि हजार पांचशेंपर्यंत टेकडीच्या उजवे बाजूस एक लहानसा तळ्याचा मेढ आहे तेथें आले. इतका आमचा जमाव नुकता होतो तों सकाळचा चार पांच घटका दिवस आला. तेव्हां किल्ल्यावरून दहा पंधरा जागीं तोफांचे बार बहुत होऊं लागले. वातेऱ्यावरूनहि बहुत मारूं लागले. आणि पेठेंतून तीन हजार पायदळ व तीन तोफा ऐशा नीट टेकडीच्या सुमारें चालून घेतलें. ते दिवशीं त्यांनीं बहुत जास्तीकरून मैलार टेकडीपासून लहानशा जेजालाच्या अंतरानें एक तळ्यामेढ आहे तेथें येऊन तीन्हीं तोफा ठेऊन बेमुरवत मारूं लागले. किल्ल्यावरील व पेठेवरील व वातेऱ्यांतील ऐसा चौतर्फा मारा तोफांचा होऊं लागला. पांच सात घोडीं गोळ्यांनीं ठार झालीं. त्यांचा बहुत मार होऊं लागला ते समयीं सखोजी काटे यांनीं येऊन वडिलांपाशीं विनंति केली कीं, आज त्याचा रंग एक प्रकारचा दिसतो. जर त्यांनीं चालून घेतलें तर या समयीं येथें जमाव बहुत थोडा आहे. दम धरणार नाहीं. आम्हांस आज्ञा दिल्यास आम्हीं येथून उजवीकडे एका गोळीच्या मारावर उभे राहतों जर त्यांनीं आपल्यावर चालून घेतलें असतां आम्हीं आडवीं घोडीं घालतों. तेव्हां वडिलीं सांगितलें कीं "तुम्हीं जावें" असें म्हणतांच सखोजी काटे व नारायणजी बाबर उभयतां आपल्या पागासुद्धां धारवाडच्या नीट पूर्वेकडे चालूं लागले. ते तिकडे गेल्यानंतर कप्तान लिटली यानें वडिलांपाशीं येऊन विनंति

केली कीं आज आंतील आम्हांवर बहुत चालून आले आहेत. दोन तीन हजार माणूस आहे. तीन तोफा आहेत त्यास त्यांनीं मागें जाईन म्हटलें तर पेठ लांब. एक गोळीच्या अंतराची जागा-यासमई आम्हांस आज्ञा केल्यास आम्हीं चालून जाऊन तोफा घेतों. ऐसें म्हणूं लागले. तों लिटली आणखी म्हणूं लागला कीं, तुम्हीं आपल्या गारद्यांची कलागत लावावी म्हणजे आम्हीं एका बाजूनें उठतों. नाहीं तर आमच्या बरोबर गाडदी यांनीं उठावें. परंतु आपल्याबरोबर गाडदी उठले तर विना अंगाशीं अंग लागल्याशिवाय बार काढूं नये. ऐसे इंग्रज म्हणूं लागले. गाड्यांचे जमातदार म्हणूं लागले कीं, आम्हीं धांवत जाऊं बार काढीत जाऊं ऐसें म्हणूं लागले. तें कांहीं लिटलीच्या मर्जीस येईनासें झालें आणि त्यांनीं (इंग्रजांनीं) दोघां तिघांनीं मनसबा केला कीं, हें कांहीं चांगलें नाहीं ऐसें म्हणून लिटलीनें येऊन वडिलांपाशीं म्हणूं लागला कीं, आतां बहुत उशीर झाला. दहा घटका दिवस आला. उद्यां पहावयास येईल. ऐसें म्हणून उगाच बसला. तों जिकडे या दोन्हीं पागा गेल्या होत्या त्याजवर किल्यावरून गोळे मारीतच होते. तेथें एक गोळा येऊन खुद्द नारायणजी बाबर यांसच बसला. डावे हातचे पंज्याजवळ मागें बसला तो उजवे कुशीस पार होऊन गेला. मशारनिल्हे ठार झाले. हें वर्तमान आलें तेव्हां यजमान बहुत कष्टी झाले. नारायणजी बाबरासारखा मनुष्य जायां होऊन जर काम कांहींच न झालें तर ठीक नव्हे असें मनांत आणून कप्तान लिटलीस सांगितलें कीं, खामखां आम्हापुढें तोफा आल्या आहेत त्या पाडाव कराव्या. तुम्हीं करीत असल्यास बरें; नाहींतर आम्हीं गाडदी उठवितों. आणि फौजाहि उठवितों. ऐसें बोलतांच त्यांनीं उत्तर केलें कीं, ऐसी मर्जी असल्यास तोफाचा पाड काय आहे. मीच तोफा घेतों. असें म्हणून एक पलटण टेकडीपाशीं आले होतें, दुसरेंहि पलटण गोटांतून आणून टेकडीपाशीं उभें केलें; आणि जेथें ती. रा. भाऊसाहेब बसले होते तेथें आपल्या तोफा टेकडीवर चढविल्या. एक वडिलांच्या उजव्या हातास ठेविली आणि एक तोफ डाव्या हातास ठेविली. आणि तोफखान्याच्या आपल्या सरदारास हुकूम केला कीं, आंतील

लोक आले आहेत त्यांजवर चालून घेतों. तूं या दोन्हीं तोफांचा मारा त्या लोकांवर कर. असें सांगून भाऊसाहेबांपाशीं आला आणि सांगितलें कीं, सरकारचे गाडदी बसले आहेत त्यांस कलागत लावणें म्हणोन सांगावें. आम्हीं तोफांवर लेण उठवितों. असें सांगतांच गाड्यांकडे सांगून पाठविलें. गाडद्यांच्या अंगानें गोळागोळी होऊं लागली तेव्हां लिटलीनें आपले पलटणापैकीं तीनशें माणसांची एक लोण पुढें आणली. तेव्हां भाऊसाहेबांनीं विचारलें कीं, आंतील तीन हजार माणूस उभे असतां तीनशें माणूस त्यांवर पाठवितां हें काय ? तेव्हां लिटलीनें सांगितलें कीं, तीनशें लोक पुरेत. खातरजमा आपल्यास असूं द्यावी. तुम्हीं पहात रहावें. तीनशें माणसांनिशीं तिन्ही तोफा घेतों; ही खातरजमा असूं द्यावी. इतके म्हणून टेकडीखालीं लेण उभी होती या लेणेस लिटलीनें आपली टोपी काढून दोन वेळां फिरविली. तेव्हां तीनशें माणसांची तुकडी चालूं लागली. हें पाहून खासा लिटली टेकडीखालीं जाऊन नीट त्याच्या लोकांवर चालून घेतलें. एक दुर्बिण मात्र खाशाच्या हातांत होती. तसेंच चालून त्यांच्या तोफापर्यंत तीनशें माणसांनिशीं जाऊन आंतील लोक मारीत होते त्याच्या अंगास अंग लाविल्यावर मग खासा लिटली रुमाल फिरवूं लागला. मग इंग्रजांच्या सळका सुटूं लागल्या. आंतील तीन हजार बार असतां तीनशें माणसांचा मार सोसवेनासा होऊन पळूं लागले. इंग्रजांचे उजवे बाजूनें आमचे सरकारचे रोहिले होते तेहि इंग्रजांबरोबरच तोफांपाशीं गेले. इंग्रजांनीं तोफा मागें टाकून त्याच्या पाठीवर पुढें पेठेकडे थोडेसे गेले. तोफा इंग्रजांनीं सोडविल्या. आणखी त्यांच्या (शत्रूच्या) कुमकेस कांहीं लोक व बाहेर पेठेंतून शें दोनशें आले. त्यांजवर फौज उठली. तोफांजवळ जे लोक होते ते व आंतील ऐसे फौजेनें घोडीं घालून पेठेच्या दरवाज्यापावेतों मारीत नेलें; तेव्हां ती. रा. बळवंतरावकाका व विठ्ठलरावबाबा यांनीं शिपाईगिरी चांगली आपल्या हातानें केली. रा. गोपाळ विठ्ठल यांनीं कामकाज चांगलें केलें. मशारनिल्हेस दोन गोळ्या लागल्या आहेत. खैर आहेत. कांहीं चिंता नाहीं. विठ्ठलराव यांस हातांस पुतळी लागली आहे. मग आंतून फार मार होऊं लागला. मग

सारे लोक मागें सरून आसऱ्यास आले. तीन्ही तोफाहि आणिल्या. आंतील दीडशें पावेतों माणूस ठार पडलें. शें दोनशें जखमीहि झाले असतील. आम्हांकडील त्यादिवशीं तीस घोडे ठार पन्नास साठ असामी गारदीसुद्धां शिवाय कवाइती माणूस तीस असामी ठार व पन्नास जखमी. आम्हांकडील जखमी शें दीडशें पावेतों जाले. यश चांगलें आलें. त्यादिवशीं इंग्रजानें बहुत तारफेनें लढाई केली. त्याच्या (इंग्रजांच्या) फौजेचे बार दहा आंखास एक बार याप्रमाणें यावत् लिटली फिरून भाऊसाहेबांपाशीं येई तावत्पर्यंत मार सारखा धरला होता. मग बंद केला. इंग्रजांच्या करण्यास हद्द आहे. वडिलीं (भाऊंनीं) लिटलीची तारीफ केली. जर त्यादिवशीं इंग्रज उठत नव्हता तर तोफा न येत्या.'' (खरे ८–३२३८)*

वरीलप्रमाणें लढाई झाल्यावर दोनचार दिवस गोळागोळी बंद होती. उभयपक्षांकडील मेल्यागेल्याचे मुडदे ज्याचे त्यानें ओळखून घेण्यास सवड द्यावी अशी बद्रीजमालनें विनंति केल्यावरून भाऊंनीं लढाई थांबविली होती. पण चार दिवस गेल्यानंतर पुन्हा चकमकी सुरू झाल्या. भाऊंनीं व आंतल्या लोकांनीं एकमेकांवर गोळ्या माराव्या हा क्रम सुरू झाला. बाहेरून रसद पोंचण्याचें बंद झाल्यामुळें आंतील लोकांची उपासमार होऊं लागली. यामुळें आंतल्या परिस्थितीस कंटाळून साधेल त्याप्रमाणें आंतलीं शेंपन्नास माणसें रोज पळून जाऊं लागलीं. इतकी जरी परिस्थिती झाली तरी धारवाडचा किल्ला काबीज होण्याचें काम त्यामुळें सोपें झालें होतें असें मात्र नव्हे. कारण बद्रीजमालखान हा मोठा धैर्याचा निश्चयी आणि शूर सरदार होता. त्यानें किल्ला शेवटपर्यंत लढविण्याचें ठरविलें होतें. अर्थातच भाऊंना आपल्या प्रयत्नाची शिकस्त करणें प्राप्तच होतें. ता. १३ डिसेंबर १७९० रोजीं भाऊंच्या फौजेनें पुन्हां धारवाडच्या पेठेवर हल्ला

*(टीपः—लिटलीनें तीनशें माणसांनिशीं तीन हजार माणसांवर चाल केली असें वरील पत्रांत आहे. पण Muir's Narrative of Capt. Little's detachment या ग्रंथांत लिटलीबरोबर यावेळीं ८०० माणसें होतीं व त्या माणसांनीशीं त्यानें शत्रूवर चाल केली असें लिहिलें आहे.)

केला. या हल्लयाची हकिकत भाऊच स्वतः लिहितात--"पेठेच्या दरवाज्या नजीक वातेऱ्या आंतील लोकांनीं बांधून गोळ्या मारीत होते. बहुत दिवस झाले. वातेऱ्यांतील लोक मारावे अशी योजना करून सारी फौज पायदळ एकत्र केली व गाडद व इंग्रजांकडील पलटणें जमा करून वातेऱ्यांवर उठविले. आंतील लोकांनीं बहुत मारामारी केली; परंतु आपल्याकडील फौजेनें व गाड्यांनीं व इंग्रजांकडील लोकांनीं बहुत कांहीं आंगेज करून शत्रूकडील लोकांजवळ जाऊन पावले. तेथें थोडीशी मारामार होऊन हत्यार चाललें. नंतर आंतील लोकांनीं पळ काढला. तेव्हां पेठेंत शिरले ते पेठ सारी मागें टाकून पुढें मैदान आहे तेथवर गेले. तेथें त्याकडील लोकांनीं संभाळून फिरोन चालून आले. पाठीमागें आमची फौज होती; तिनें घोडे चालविले; तेथेंहि मारून मागें सारिलें. श्रीमंतांच्या पुण्येंकरून बरेंच जाहलें. तीन तोफा पाडाव आणल्या. त्याजकडील चारपांचशें माणूस जखमी जाहलें. आपलेकडील गारदी व इंग्रज व फौजेंतील मिळोन शंभर पावेतों माणूस ठार झालें. खासा इंग्रज लिटली यासी गोळीची जखम लागली. खैर आहे. असा शिपाई पहाण्यांत आला नाहीं. जातीनें सरदार होऊन फार अंगेज करितो. बहुत कांहीं शिपाईगिरीची कस्त आहे. श्रीमंतांची फत्तेच झाली. चि. जनार्दनभाऊ (भाऊंचा चुलत पुतण्या) यांस मानेंत गोळी लागली. तो ठारच झाला. ईश्वरें बहुत अनुचित केलें. होणारास इलाज नाहीं. श्रीमंतांच्या कामास आला. परंतु आमचें मात्र वाईट झालें. ती. रा. बापूस वृद्धापकाळीं बहुत दुःख झालें. त्याजकडील लोकांनीं चांगली केली. तसेंच चि. जनार्दनपंत सुभेदार यांनीं गारद्यांबरोबरच चालून गेले. बहुत कस्त केली. अस्तमानानंतर माघारे गोटास आलों. शत्रूकडील लोकांचा नाश फारच जाहला. लोक बहुत कांहीं मारले गेले. पळूनहि गेले. आणखी त्या गडबडींत शंभर पावेतों माणूस पळून हत्यारसुद्धां आलें. ईश्वर बहुत कांहीं खैर केली होती परंतु चिरंजीव गेल्यामुळें फारच वाईट वाटलें. ईश्वर इच्छेस इलाज नाहीं. आपण वडिलांचें बहुत प्रकारें सांतवन करावें. इलाज नाहीं. चिरंजीवांचें येथेंच सार्थक करावें परंतु सर्वांच्या विचारें तेथेंच करवावें यास्तव तिकडे

अस्थि प्रातःकाळीं पाठवून देतों." (खरे ८–३२६३)

वरील पत्रात लिहिल्याप्रमाणें धारवाडच्या पेठेवर हल्ला करून भाऊंनीं धारवाडची पेठ घेतली. पेठ घेतल्यावर तिचीं भिताडें पाडून व बातेऱ्या जमीनदोस्त करून भाऊंनीं खुद्द किल्लयाच्या तटांस मोर्चेबंदी केली. तथापि किल्लयाच्या दक्षिणेस बाहेर बातेऱ्या होत्या त्यांतून गोळागोळी सुरू होतीच. कांहीं दिवसांनें कॅ. लिटल् यानें आपल्या इंग्रज पलटणानिशीं त्याहि बातेऱ्यांवर छापा घालून तेथील लोक उधळून लाविले व बातेऱ्या मोडून टाकिल्या. त्यामुळें आतां शत्रूचा प्रसार किल्लयाबाहेर बिलकूल राहिला नाहीं. धारवाडचा किल्ला आठपंधरा दिवसांत सहज काबीज होईल असें इंग्रजांना वाटत होतें, पण डिसेंबर महिना उजाडला तरी धारवाडचें काम अजून रेंगाळतच आहे असें पाहून इंग्रजांनीं परशुरामभाऊंच्या मदतीस आणखी तीन पलटणें मुंबईहून रवाना केलीं. या पलटणांवर मुख्य सरदार कर्नल फ्रेड्रीक नांवाचा होता. हा कर्नल जयगडच्या खाडीनें संगमेश्वरास गेला व तेथून तो धारवाडास गेला. तेथें गेल्यावर सर्व इंग्रजी फौजेचा मुख्य अधिकार त्याच्याकडे आला. *

फ्रेड्रीक धारवाडला पोंचल्यावर किल्ला घेण्यासंबंधानें त्यानें जारीची

*(टीपः—कर्नल फ्रेड्रीक याला भाऊंना मदत करण्याकरितां मुंबईहून पाठविलें त्यावेळीं मुंबईचा गव्हर्नर रॉबर्ट ऍबरक्रॉम्बी यानें कर्नल फ्रेड्रीकनें भाऊंजवळ कसें वागावें याबद्दल त्याला पुढीलप्रमाणें हुकूम दिला होता. "You will bear in mind as the very first object of your instructions that you are sent to assist the officer of another state and are therefore to implicitely obey such requisitions as he may make to you and on no account whatever, obstruct or interfere with the measures he may project however injudicions they may appear to your judgment.' (P.R.C. 3-177)

खटपट सुरू केली. किल्ल्याची तटबंदी मजबूत होती. ती ढासळल्याशिवाय किल्ला हस्तगत होणार नाहीं अशी भाऊंची समजूत होती म्हणून पुण्याहून व मिरजेहून त्यांनीं आणखी तोफाहि मागविल्या होत्या. त्या तोफांच्या जोरावर फ्रेड्रिकनें किल्लयाच्या तटबंदीवर जोराचा मारा सुरू केला. पण मारा सारखा सुरू ठेवण्यास दारूगोळ्याचा भरपूर पुरवठा पाहिजे. तो नसल्यामुळें दारूगोळा संपला म्हणजे थांबावें व पुन्हां जमा करून पुन्हां मारा सुरू करावा असा प्रकार होऊं लागला. किल्ला काबीज करण्याचें काम वाटलें होतें तितकें सोपें नाहीं असें फ्रेड्रिकला आढळून आल्यावर त्यानें भाऊंना अशी विनंति केली कीं हल्ला केल्याखेरीज नुसत्या तोफांच्या माऱ्यानें किल्ला हातीं येणार नाहीं. जास्त दिवस तिष्ठत बसण्यापेक्षां एकदम हल्ला करून किल्ला घ्यावा हें उत्तम. हें काम तुम्हीं तरी करा किंवा आम्हीं करतों. पण ज्यानें करावें त्यानें दुसऱ्याच्या मदतीची अपेक्षा न करतां करावें. फेड्रिकनें टाकलेला हा पेंच वास्तवीक गैरशिस्त होता. लढाईचें काम इंग्रज-मराठ्यांच्या साहचर्यानें व्हावयाचें होतें. अशा स्थितींत फ्रेड्रिकनें टाककेला हा सवाल सरळ वागणुकीचा नव्हताच पण तो मराठ्यांचें पाणी जोखण्याच्या कुटिल बुद्धीनें टाकलेला होता. पण पर्शरामभाऊहि कांहीं कमी नव्हते. ते पोक्त, दूरदर्शी आणि अनुभवी असल्यामुळें त्यांनीं या बाबतींत जें धोरण स्वीकारलें तेंच योग्य होतें व शेवटीं फ्रेड्रिकच्या आततायीपणामुळें त्याचीच कशी फजीती झाली हें पुढें दिसून येईल. तूर्त मात्र भाऊंना फ्रेड्रिकला काय उत्तर द्यावें हा मोठा विचार पडला. या बाबतींत भाऊ पुढीलप्रमाणें लिहितात:—"कर्नल फ्रेड्रिक याचें बोलणें जे-धारवाडचा किल्ला विसा रोजांत फत्ते करावा याप्रमाणें मुंबईहून निघतेसमईं हुकूम आहे. येऊन सोळा सतरा दिवस झाले. याउपर मुदत लागावयाची नाहीं. यास्तव खंदक भरावयास शेराचे वगैरे भारे व शिडचा येणेंप्रमाणें सरंजाम जलदीनें द्यावा. म्हणजे हल्ला करून स्थळ घेतों. हें काम आपल्या पलटणीनिशींच करणार. सरकारच्या लोकांनीं येऊं नये. तमाशा पहावा. अथवा सरकारच्या लोकांनीं ही गोष्ट करावी. आम्हीं पाहूं. कोणी कुणाची मदत करूं नये. आम्हीं

स्वतंत्र कार्य केल्यास स्थळ देऊं न देऊं हा अंदेशा आणो नये. सरकारशीं तफावत करणार नाहीं. खातरजमा असों द्यावी. किल्ल्यांत नक्त ऐवज जो असेल तो घेऊन शिपाई यांस बक्षीस देऊं. बरकड जिनसांस हात लावणार नाहीं. पेशजी आमची चाल किल्ला घेतला असता आंतील जिन्नस कोणताहि असो दरोबस्त घ्यावा किंवा किंमत ठरेल ती द्यावी असें होतें. अलीकडे तो जाबता राहिला. नक्त असेल तें मात्र घ्यावें. असें ठरावांत आहे, त्याप्रमाणें होईल. आम्हांजवळ सामान आहे तें थोडें असें वाटत असेल, त्यास त्या सामानानें धारवाडसारखे दोन किल्ले विल्हेस लावूं ! इतकें सामान या साठींच आणावयास कारण काम जलदीनें व्हावें एतदर्थी आणिलें आहे. हर-इलाज करून या जाग्यांतून मोकळें झालें पाहिजे. याचा इत्यर्थ काय तो सांगावा म्हणोन. त्याजवरून विचार पाहातां ही गोष्ट बुद्धी परती आहे. यास काय अजमास समजला हें कळत नाहीं. जागा कुबळ, तोफेच्या मारगिरीनें किंवा अन्नपाण्याच्या विपत्तीनें जेरीस यावा तर तूर्त मारगिरी होत आहे त्याचा विशेष काट जाला नाहीं व थोडें बहुत भिताड पडलेलें असावें तेंहि नाहीं: अन्नाची तूट (किल्ल्यांतून) जो येतो तो बहुतच सांगतो. तर्केंकरून मनास आणितां अन्नाव्यतिरिक्त किती दिवस गुदरतील. परंतु किल्ल्यांत धान्याचा संग्रह कांहीं आहे. लोकांस मात्र हमखास देत नाहींत. युक्तियुक्तिनें देतात. खंदक मातबर, भरावयाचा उद्योग केल्यास लौकर आटोपेलसें दिसत नाहीं. इतकें असोन याच्या बोलण्याची धमक मोठी ! मनसब्यानें उत्तर सांगितल्यास याचें बोलणें प्रतिज्ञेचें पडतें. परीक्षा पहावी तर दैववशात् याच्या वस्तू गोष्ट साधल्यास इंग्रज फार शेर होतील, आणि सरकारचें मनुष्य मुबलक असतां कांहीं प्रयोजन जालें नाहीं असें होईल व लौकिकांत बहुतच कमी पडेल. हा अर्थ ध्यानीं आणोन हल्ला करावयाचें आपणच कबूल करावें तर आपल्या लोकांचा दम किती हें समजण्यांतच आहे. मोहरा फिरल्यास हे इंग्रज तमाशा पहाणार. साऱ्यांनीं मिळोन उठावणी करावी म्हटल्यास त्याच्या चित्तास येत नाहीं. करणें तर स्वतःच करूं, कोणी कोणाची कुमक देखील करूं नये असे आवाज निघतात. उत्तर सांगावयास

सुचत नाहीं. मोठें संकट आहे. श्रीसत्तेकडून काय घडतें पहावें. सरकारची कुमक असावी असा आमचा बेत, परंतु त्याच्या म्हणण्यांत " आम्हीं (इंग्रज) माघारे फिरूं ही गोष्ट लक्षांतसुद्धां आणूं नये. कसेंहि असो. कुमकेचें प्रयोजन नाहीं. आमचें आम्हीं पहातों. " त्याजवरून शेराचे वगैरे भारे व शिडयांची तरतूद करविली आहे. ईश्वरी इच्छेनें काय घडेल तें खरें. साधेल असें वाटत नाहीं. मग श्रीमंतांचे प्रतापेंकरून काय घडेल तें खरें. दारूविशीं बहुत खोळंबा झाला आहे. दहा खंडी तर आपण रवाना केलीच आहे. आणखी पांच खंडी तरी सत्वर रवाना करावी. दुसरीकडे बहुत शोध केला, परंतु कोठें मिळेना. यास्तव लिहिलें आहे.'' (खरे ८–३२७७)

हल्ला करून किल्ला साध्य होण्यासारखा नाहीं अशी भाऊंची पक्की खात्री होती; पण कर्नल फ्रेड्रिक इरेला पडल्यामुळें त्याला काय उत्तर द्यावें याची भाऊंना पंचाईत पडली. शेवटीं भाऊंनीं खोल विचार करून फ्रेड्रिकच्या म्हणण्याला मान्यता दिली व त्याला शेराचे भारे, शिडया वगैरे सामान तयार करून दिलें. भाऊंची मान्यता मिळाल्यावर फ्रेड्रिकनें धारवाडचा किल्लेदार बद्रीजमालखान यांस निरोप पाठविला कीं, आम्हीं हल्ला करणार तेव्हां तुम्हांला कौल घेऊन बाहेर पडावयाचें असल्यास पडावें म्हणजे आम्हीं सोडून देऊं. न पडल्यास जे सांपडतील त्यांची आम्हीं कत्तल करतों असा आमचा शिरस्ता आहे. असा निरोप गेल्यावर बद्रीजमालखान यानें उत्तर पाठविलें कीं दोन दिवस मुहूर्त नाहीं. यानंतर पलटणांतील कोणी खासा यावा म्हणजे त्याशीं जें बोलावयाचें तें बोलूं या उत्तरावरून किल्लेदाराचा मतलब टाळाटाळी करण्याचा आहे अशा समजुतीनें कर्नल फ्रेड्रिकनें हल्ला करण्याचें ठरविलें. खंदकाच्या पाळीपर्यंत तरी आमले मोर्चे जाऊंद्या मग हल्लयाचा विचार करतां येईल असें भाऊ म्हणत होते; पण तें फ्रेड्रिकनें ऐकिलें नाहीं आणि ता. ७–२–१७९१ रोजीं त्यानें धारवाडच्या किल्लयावर हल्ला एकाएकी केला. या हल्लयासंबंधानें भाऊ लिहितातः—
"आज पहांटेची पांचचार घटका रात्र असतां इंग्रजांकडील पलटणवाल्यांनीं हल्लयाचा बेत करून खंदक भरावयाचें सामान वगैरे घेऊन नीट चाल करून

खंदकापर्यंत गेले आणि भारे वगैरे टाकून कांहीं लोकांनीं उड्या घातल्या. इतक्यांत किल्लेकरी सावध होऊन अतिशय मार धरिला. तोहि सोसून पुढील उद्योग करावा त्यास किल्लेकरी यांनीं भाऱ्यांस आगी दिल्या. भारे वाळले होते त्यामुळें आग जलद पोंचली सबब साराच बेत राहिला. परस्परें मारगिरी बेसुमार जाली. इंग्रजांकडील दहावीस माणूस ठार, पन्नास साठ असामी जखमी झाले. याखेरीज सरकारचें माणूस थोडें बहुत ठार जखमी झालें. अमूक संख्या लागली नाहीं. थोडेंच आहे असें वाटतें. इंग्रजांचा बेत सिद्धीस गेला नाहीं. फार खट्टे आहेत. आणखी कोणता इत्यर्थ करतात पहावें. महिपतराव आबाजी गोळीनेंच ठार झाले. ईश्वरें वाईट केलें. परवां मंदवारीं रात्रौ हल्लयाचा निश्चय करून सारें साहित्य देखील जालें होतें. परंतु ते दिवशीं इंग्रजांनीं गलबल पाहून राहविलें. काल रात्रौ अकस्मात कोणास कळूं न देतां ठरविलें. बरीच साधली होती. शेवट चांगला झाला नाहीं. असो. घडतां घडेल तें खरें." (खरे ८-३२८४) याच हल्लयाविषयीं आणखी तपशीलवार हकिगत दुसऱ्या एका पत्रांत आहे ती अशी:--"काल सोमवारीं प्रातःकाळीं तीन चार घटका रात्रीस इंग्रजांनीं हल्ला करावा म्हणोन इत्यर्थ करून इंग्रजांकडील लोक किल्लयाच्या खंदकापर्यंत गेले. खंदकांत उतरावयाचेपूर्वीं पंधरा दिवस रानांतील झाडपाल्याचे भारे हजार बाराशें आणिले होते. त्यांपैकीं पांचसातशें भारे खंदकांत टाकिले होते. त्याजवर किल्लेकऱ्यांनीं दारूचीं गाडगीं आग लावून टाकिलीं, व तेल व कडबा वरचेवर वरून टाकीत होते. तेणेंकरून भारे वाळले होते त्यांस आग लागून जाळ जाला. तेणेंकरून लोक खंदकांत उतरावयाचे राहिले. कांहीं दहा पांच लोक कवाइती व गोरे दोन तीन भारे वरचेवर खंदकांत टाकावयास रेवणींत उतरले होते ते आगीत पडले किंवा गोळीनें मेले अथवा किल्लयांत धरून नेले हें ठिकाण लागलें नाहीं. खंदकापर्यंत इंग्रजांचे लोक गेले होते तों किल्यांतील लोक सावध झाले. त्यांनीं मारगिरी बहुत केली व हल्ला होणेस वाट नाहीं तेव्हां माघारे फिरून आपले मोर्चास आले. माघारे येते समयीं गोळीचे मारगिरीनें तीस पंचवीस ठार व चाळीस पन्नास जखमी लोक त्याजकडील व

इंग्रजांचे झाले. सरकारचे लोक मोर्च्यांत बसले होते. ते तसेच बसले होते आपापले मोर्च्यांतून गोळागोळी करावी, 'हल्ला हल्ला' म्हणून गुल करावी ऐसा संकेत होता तेणेप्रमाणें खास निशाणांतील मोर्च्याचे लोक व आरब व रोहिले व गाडदी यांचे मोर्चे शुक्रवार पेठेच्या सुमारें होते ते मोर्चेतून उठले नाहींत. हावेरी पेठेंत चार पागे व धोंडोपंत गोखले व दोन हजार गाडद व आरब व कवाईत मिळोन व हशमी दोन हजार लोक व नामजादे हजार बाराशें लोक आपापल्या मोर्चांत होते. त्यांस संकेत मोर्च्यांतून उठूं नये, हा समजला नाहीं. ते हल्ला म्हणून शब्द होतांच आपापले मोर्चे सोडून पुढें चाकरी खंदकाजवळ होती तेथपर्यंत लोक गेले. दिवस उगवल्यावर किल्ल्यांतील लोक कांहीं बाहेर येऊन हावेरी पेठेकडील लोकांवर उठले होते. परंतु किल्ल्यांतील मारगिरी संभाळून आंतील लोक आले त्यास मागें हटविलें. आपणाकडील लोक पुन्हां आपापल्या मोर्च्यांत येऊन बसले. लढाईंत इकडील लोक ठार पंचवीस तीसपर्यंत व जखमी पन्नास साठपर्यंत झाले. कांहीं आपले मोर्च्यांत बसले असतां एक मोर्च्यांत दारूस आग लागून सहा सात माणूस ठार व चाळीस सुमार जखमी येणेंप्रमाणें झालें सरकारांत इंग्रज दोन अडीचशें कवाइती लोकांनिशीं चाकरीस ठेविला होता तो जमावसुद्धां छिटली इंग्रजांकडे निसबतीस दिला होता तो ठार गोळीनें झाला व त्याजकडील लोक चाळीसपर्यंत नाहींसे झाले, खंदकांत राहिले किंवा काय जालें हें कळत नाहीं. येणेंप्रमाणें इंग्रजांची मसलत कच्ची जाली. पुढें कोणती मसलत घटितार्थ होते पहावी." (खरे ८-३२८५)

कर्नल फ्रेड्रिकनें मोठ्या प्रतिज्ञेनें धारवाड काबीज करण्याचा प्रयत्न केला पण वरील पत्रांत लिहिल्याप्रमाणें तो त्याला साधला नाहीं. धारवाडवरील हल्ला फसल्यावर त्यानें पुन्हा आपले स्वतंत्र मोर्चे तयार करून तोफांची मारगिरी सुरू केली, त्याचाहि कांहीं विशेष उपयोग झाला नाहीं. अशा तऱ्हेनें सर्व बाजूंनीं माघार आल्यामुळें कर्नल फ्रेड्रिकचा फार हिरमोड झाला. पर्शरामभाऊसारख्या अनुभवी सरदाराचें म्हणणें आपण मान्य केलें नाहीं ही गोष्ट त्या मानी सरदाराच्या मनास फारच लागली. कर्नल फ्रेड्रि-

कची प्रकृती तितकीशी चांगली नव्हती. त्यांतच या अपयशाचा ध्यास मनास लागल्यामुळें त्यांचें दुखणें फारच वाढून ता. १२ मार्च इ. स. १७९१ रोजीं त्याचें देहावसान झालें. त्याचा अधिकार त्याचा दुय्यम मेजर सार्टोविअस म्हणून होता त्याजकडे आला.

फ्रेड्रिकचा प्रयत्न फसल्यावर भाऊंनीं आपलें काम सुरू केलें. भाऊंचे मोर्चे आस्ते आस्ते पुढें जात होते. किल्लयांत धान्याचा दुष्काळ पडल्यामुळें आंतील लोकांची स्थिति दिवसें दिवस कठीण होत होती. खंदकांतून वगैरे विहिरी होत्या त्यांचें पाणी मराठयांनीं बंद केलें होतें. किल्लयांतील एका विहीरीवर दहा पांच हजारांचा निर्वाह होणें अर्थातच कठीण होतें. अशी स्थिती असल्यामुळें बद्रीजमालखान यानें भाऊंकडे कांहीं संधानाचें बोलणें करण्याकरितां ता. २५ फेब्रुआरी रोजींच वकील पाठविले होते. पण समेटाचा घाट अजून कांहीं जमत नव्हता. समेट न जमल्यामुळें लढाई चालू ठेवावी लागणार अशी परिस्थिती असल्यामुळें किल्लयांत फक्त लढाऊ लोक ठेवून बाकीच्यांस बाहेर घालवून द्यावें असा विचार बद्रीजमालखान यानें केला. पण या बाहेर जाणाऱ्या लोकांना मराठयांनीं अटकाव करून पुन्हां किल्लयांतच हाकून दिलें. मराठे आपले मोर्चे हळू हळू पुढें सरकवीतच होते. मोर्चे जवळ येऊं लागले तसतसे किल्लेकऱ्यांनीं त्यांवर तोफांची भयंकर मारगिरी सुरू केली. ही मारगिरी किती शिताफीची होती तें खालील उताऱ्यावरून कळून येईल.

" इकडील वर्तमान तर मोर्चे पुढें वाढत चालले आहेत. रेवणीस कोठें शंभर कोठें पाऊणशें कोठे पन्नास हात याप्रमाणें मोर्च्यांस अंतर आहे. रेवणीवर मोर्चे कायम करावयाची कस्त आहे. आंतील लोकांची मारगिरी फार तारिफेची आहे. मोर्चा जसा जसा पुढें जातो तशा तशा तोफा उतरून मोर्च्यांवर मार देतात. रेवणीवरदेखील गोळे पडतात. कदाचित् खंदकांत लोक शिरले तरी तोफेची मारगिरी करावी अशा तऱ्हेचा बेत किल्लेकऱ्यांनीं साधला आहे. छऱ्यांच्या थैल्या लेस करून ठेविल्या आहेत असें आंतील येतात ते सांगतात आणि तसा डौलहि दिसतो. आज किल्लयांतील बायका

वगैरे कचरा किल्लेकऱ्यांनीं दाटी मोडावयाकरितां बाहेर लावून दिला. तो मोर्चावर आला होता. त्यास मागती इकडून माघारा घालविला. बायका पोरें बहुत होतीं. इकडे येऊं लागलीं तेव्हां मोर्चेवाल्यांनीं त्याजवर गोळ्या सरकारचे हुकुमावरून घातल्या तरी विपत्तीमुळें नीट चालोन आलीं तीं माघारीं लावून दिलीं. एकंदर मोर्चेवाल्यांस ताकीद 'कचरा इकडे येऊं न देणें, वेजरब गोळ्या घालून माघारा घालविणें' याप्रमाणें बेत झाला आहे. आंत पाण्याचा तोटा सांगतात. पोटाचे हाल तर प्रथमपासून ऐकण्यांत येतच आहेत. पाणी आजपर्यंत बाहेरून जात होतें तें बंद झालें. कांहीं विहिरी त्याच्या लगत होत्या. तेथें आमचे मोर्चे कायम न होत यास्तव त्यांत कांहीं पदार्थ दुष्ट घालून पाणी खराब केलें आहे." (खरे ८–३२९१)

किल्यांतील लोकांनीं तोफांच्या मारगिरीनें स्वसंरक्षणाचा प्रयत्न जारीनें सुरू ठेविला होता. ता. ८ मार्च १७९१ रोजीं किल्ल्यांतील सुमारें चारशें शिपाई एकदम बाहेर पडले व मराठ्यांच्या मोर्चांवर चालून आले. पण या झटापटींत मराठ्यांनीं त्यांना मारून पिटून परत लाविलें. मोर्च्यांतल्या धाडशी लोकांनीं रेवणीपर्यंत जाऊन व खंदकांत उतरून तेथील शत्रूच्या लोकांची मोठी दाणादाण करून सोडली व त्यांचीं हत्यारें हिसकून घेऊन ते परत मोर्चांत आले. अशा प्रकारच्या झटापटी सारख्या चालू होत्या. ता. २५ मार्चला मोर्च्यांतील लोकांनीं चिकाटीची लढाई करून रेवणी व खंदक काबीज केला. आंतील लोकांनीं खंदकांतून मोर्चांपर्यंत सुरुंग खणीत आणून त्यास बत्ती दिली; पण सुरुंग वायफळ उडाल्यामुळें मराठ्यांचें कांहींच नुकसान झालें नाहीं. याप्रमाणें धारवाड येथें पर्शरामभाऊ व बद्रीजमालखान यांमध्यें सारख्या चकमकी चालू होत्या. शेवटीं मार्च महिन्याच्या अखेरीस बद्रीजमालखान अगदीं टेकीस आला. किल्ल्यांतलें पाणी सरलें, धान्य सरलें, दारूगोळा सरला, टिपूकडून मदत येईल अशी आशा होती. पण तीहि आली नाहीं. अशा स्थितींत निरुपाय होऊन किल्ला हवालीं करून देतों म्हणून बद्रीजमालखानानें भाऊंशीं बोलणें सुरू केलें. किल्ल्यांतील अकरा तोफा; रोकड द्रव्य आणि सुमारें तीनशें घोडीं एवढें बरोबर घेऊन बद्री-

जमालनें बाहेर पडावें असें ठरलें. (खरे ९-३३२१) व त्याप्रमाणें भाऊंनीं त्याला मान्यताहि दिली. या कराराप्रमाणें बद्रीजमालखान व त्याचा दिवाण हरीदासपंत हजार दोन हजार लोकांनिशीं धारवाडांतून ता. ५ एप्रिल १७९१ रोजीं बाहेर पडले.असो. या प्रमाणें ६ एप्रिल (खरे ९-३३२४) रोजीं धारवाडच्या किल्यावर पेशवे सरकारचें निशाण लागलें. *

फ्रेड्रिकच्या अशा तक्रारीमुळें मॅलेटनें पुण्यास नानाजवळ सारखें टुमणें लाविलें कीं, भाऊ फ्रेड्रिकला मदत करीत नाहींत (P.R.C. ३-२०५) शेवटीं फ्रेड्रिकचा हल्ला फसल्यावर फ्रेड्रिकनें मॅलेट्ला कळविलें कीं, भाऊंच्या कुचराईमुळें हल्ला फसला. मॅलेट्नें ही हकीगत गव्हर्नर जनरलला कळविली. (P. R. C. ३-२३४) पण या बहाद्दरानें भाऊ मदत करीत असतां ती नाकारली. एक तुम्हीं तरी हल्ला करा, नाहींतर आम्हीं तरी करतों असा पेंच भाऊला घातला ही गोष्ट भाऊंच्या अस्सल पत्रांत वर दिलीच आहे त्यावरून फ्रेड्रिक हा किती सच्चा माणूस होता हें दिसून येईल ! अखेरीस फ्रेड्रिक मेल्यावर किल्ला भाऊंनीं काबीज केला तेव्हां इंग्रजांनीं भाष्य केलेंच कीं याच वेळेला इंग्रजांनीं बंगलोर घेतल्यामुळें त्या धास्तीनें धारवाड पडलें. (P. R. C. ३-२८३) तात्पर्य धारवाड काबीज करण्यांत फ्रेड्रिकला अपयश आलें आणि भाऊंना यश आलें तरी त्याचें खरें श्रेय इंग्रजांनाच कारण इंग्रजांच्या धास्तीमुळें धारवाड पडलें असें म्हणण्याचा आशय ! इतकें करूनहि इंग्रज थांबले नाहींत. धारवाड काबीज करण्यांत इंग्रजांच्या

---

*टीप—धारवाडच्या या प्रकरणांत कर्नल फ्रेड्रिकला अपयश आलें आणि भाऊंनीं किल्ला काबीज केला ही गोष्ट इंग्रजांना आवडली नाहीं. कर्नल फ्रेडिकनें आरंभापासूनच भाऊंसंबंधानें तक्रारी करण्यास सुरवात केली होती. त्यानें खालील प्रमाणें एका पत्रांत लिहिलें आहे. "If the Board knew what has happened they would not only acquit me but pity me and lay the whole blame at the door of Parsharampant where alone it is due.(P.R.C 3-183)

कामगिरीबद्दल त्यांनीं भाऊंजवळ एक लाख रुपयांच्या बक्षिसाचीहि मागणी केली. (P. R. C. ३–३००)

धारवाड भाऊंच्या ताब्यांत आल्यावर बद्रीजमालला सुखरूप बाहेर जाऊं द्यावयाचें असें भाऊंनीं कबूल केलें होतें. पण या गृहस्थानें भाऊंचा सल्ला न मानल्यामुळें त्यावर मोठाच प्रसंग गुदरला. भाऊंचा हुकूम न मानतां लष्करांतील लुटारू लोकांनीं बद्रीजमालला साफ लुटला. ह्या हकीगतीसंबंधानें अस्सल पत्रांत मजकूर आढळतो तो असा: "क़िल्ल्यांतून बद्रीजमालखान व हरीदासपंत बाहेर निघोन आपल्या गोटास उतरावयास जात असतां मार्गीं लष्करच्या तमाम लोकांनीं चैत्र मासाच्या गुदस्त महिन्याचें वाद्य करून पालखींत धूळ टाकून फारच शोभा केली. बराबर राजश्री हरबा आप्पा व त्रिंबकराव आण्णा पागा फौज सुद्धां होते. परंतु त्याच्या वस्तु आटोपेना. मिराची गत होईल असें समजून श्रीमंतांस चिठी पाठविली त्याजवरून ताकीद "चांगली करावी, असेंहि करतां मनुष्यें मेलीं तरी चिंता नाहीं." असा जाब पाठविला. इतक्यांत बंदोबस्तहि झाला. (खरे ९–३३२३) दुसऱ्या एका पत्रांत स्वत: भाऊ लिहितात "काल प्रात:काळींच कूच करून किल्ले धारवाडच्या दक्षिणेस दोन कोसांवर सुतगल्याचे दक्षिणेस आलों. बद्रीजमालखान यास सरंजामानिशीं याच मुक्कामास चि. रा. जनोबा सुभेदार व कृष्णसिंग व गणेश गंगाधर वग़ैरे पागे बरोबर देऊन आणविले. ते गोटानजीक आले असतां पुढें एक कोसावर रहावयास जाऊं म्हणोन आग्रह करूं लागले चिरंजीवांनीं जाऊं दिले नाहींत. सबब जिदीस येऊन बसले. अस्तमान होत आला यास्तव जाण्याची परवानगी सांगोन पाठविली. चालते झाले. इतक्यांत लुटारू यांनीं त्याच्या पिच्छावर गलबला करून दरोबस्त सरंजाम लुटला. हें पाहून खान मजकूर घोड्यावर बसून पळूं लागले. त्यांच्या पाठीवर लोक धांवले. त्याची त्यांचीं तोडातोड होऊन खाशास चार जखमा चढल्या. तेव्हा घोड्यावरून खालीं आले. त्यांस धरून आणून जखमा बांधून बंदोबस्त केला आहे. सरंजाम कोणताहि राहिला नाहीं. फार करून पाग्याकडेच उमगला आहे आज

त्यास पृथक् डेरा देऊन उतरविलें आणि तमाम लूट तेथें जमा होत आहे. तोफा मात्र बिन सरंजामी राहिल्या. मिराची गत होऊं लागेल असें समजोन विश्वासू पागे बरोबर देऊन बंदोबस्त राखिला असतां शेवट तोच प्रकार घडला. ईश्वराची इच्छा म्हणावी. इलाज नाहीं. किल्ल्यांतून निघते समईं त्यांनीं पायचें माणूस काढून आणिलें होते तें त्याच तळावरून रात बिरात निघून जात होतें. जाऊन बाकी राहिलें तें या गडबडींत पळालें." (खरे ९-३३२७) आणखी एका पत्रांत या संबंधानें हकीगत आहे ती येणेंप्रमाणें:--

"बदरूजमालखा यास जखमा लागल्याचें व सरंजाम दरोबस्त लुटला गेल्याचें वर्तमान श्रीमंतांचें पत्रीं लिहिलें आहे त्याजवरून समजलें असेल. ज्यावेळेस खान मजकूर जखमा लागून जमिनीवर लंबे झाले तेव्हां घोडें उधळून गेलें. जवळ स्वारी नव्हती. सबब लोकांनीं उंटावर बांधोन आणिले. जखमा बांधविल्या. खैर आहेत. लुटीचा सरंजाम जमा होत आहे. खुद्द खान मजकूर यांचे म्हणण्यांत आपले त्रेचाळीस हजार होन व बारा हजार रुपये, शिवाय सोन्याचे, रुप्याचे दागिने वगैरे जिंदगी असें आहे. नगदीचा थोडा बहुत पत्ता लागला. बाकीची चौकशी होत आहे. जिंदगी फार करून सांपडली. दागिन्यांचा ठिकाण नाहीं, त्यांजबरोबर पायचें माणूस अडीच हजार पावेतों निघतेसमईं होतें. त्यापैकीं प्रथम कांहीं तळावरूनच रात बिरात निघोन गेले. कांहीं राहिले होते तेहि लुटीच्या गडबडींत निघोन गेले. त्यांतून कांहीं सरकारांत रुजू होऊन चापाच्या बंदुका देऊन सरकारच्या परवानगीनें गेले. तळावर कांहीं बंदुका राहिल्या व तोफा राहिल्या त्या सरकारांत कारखान्याकडे लागू झाल्या." (खरे ९-३३३०)

बद्रीजमालखान भाऊंच्या सल्ल्याप्रमाणें न वागल्यामुळें त्याजवर हा प्रसंग गुदरला हें स्पष्ट आहे. खान मजकूर जखमी झाल्यामुळें त्याच्या जखमा बऱ्या होईपर्यंत पर्शरामभाऊंनीं त्याला नरगुंदच्या किल्यावर बंदोबस्तानें ठेविलें. वरील एका पत्रांत असा उल्लेख आलाच आहे कीं,

किल्ल्यांतील माणसें सरकारांत रुजू झालीं त्यांजवळ चापाच्या बंदुका सांपडल्या त्या सरकारांत देऊन त्यांना बाहेर जाण्यास सरकारांतून परवानगी झाली. भाऊंचा व बद्रीजमालखान याचा जो करार झाला होता त्यांत चापाच्या बंदुका किल्ल्याच्या बाहेर नेण्यास परवानगी नव्हती. "धारवाडच्या किल्ल्यांत तोफा बंदुका वगैरे जें सामान जसें असेल तसें तें तुमचे हवालीं करूं" असा करार होता. परंतु आयतेवेळीं बद्रीजमालखान यानें लबाडी करून चापाच्या बंदुका हजार दोन हजार-पर्यंत चांगल्या स्थितींत होत्या त्या मुद्दाम मोडून पेवांत घालून ठेविल्या होत्या (खरे ९-३३३०) व कांहीं चांगल्या तोफा होत्या त्या जमीनींत पुरल्या होत्या. हें कपट लौकरच उघडकीस आलें. भाऊंनीं या लबाडीचा जाब खानमजकुरास विचारतांच त्याच्याकडून योग्य उत्तर मिळालें नाहीं. अर्थातच या गोष्टीचा निकाल होईपर्यंत खानमजकुराला भाऊंच्या कैदेंत रहावें लागलें. ✻

---

✻ (टीपः– मराठ्यांचा इतिहासकार ग्रँटडफ् यानें पर्शरामभाऊंनीं बद्रीजमाल याला विश्वासघातानें कैद केलें असें लिहिलें आहे. पण पू. रे. रे. मधील इंग्रजांच्याच पत्र-व्यवहारावरून हा आरोप खोटा, असल्याचें सिद्ध होतें. बद्रीजमालनें आपली खासगी मालमत्ताच फक्त घेऊन जावें असा करार असल्याचा उल्लेख मॅलेटच्या एका पत्रांत स्पष्ट आहे. (P. R. C. ३-२८३) दुसऱ्या एका पत्रांत मॅलेट्नें कॉर्नवॉलीसला असें कळविलें आहे कीं, बद्रीजमाल यानें किल्यांतील तोफा फोडून निकामी केल्या म्हणून तो लुटला गेला. बदरी-जमालखान अपराधी असूनसुद्धां खानमजकुराला लुटणाऱ्या लोकांना भाऊंनीं शिक्षा केली व त्याच्या जखमा बांधण्याकरितां सर्जनला बोला-वून व्यवस्था केली अशी ही बातमी याच पत्रांत आहे यावरून भाऊंची वागणूक या प्रकरणांत किती सरळ आणि न्यायाची होती हें इंग्रजी पुराव्यावरून सिद्ध आहे. (P. R. C. ३ २९७

धारवाडचें काम आटोपल्यावर पर्शरामभाऊंस श्रीरंगपट्टणाकडे जावयाचें होतें. भाऊंनीं आपल्या फौजेपैकीं कांहीं फौज आगाऊच तुंगभद्रेपलीकडे पाठविली होती. या फौजेपैकीं आप्पाजी गोविंद याची टोळी चित्रदुर्गासमीप गेली असतां शत्रूनें त्या टोळीवर छापा घातला. पण आप्पाजी गोविंद यानें तो छापा मारून काढून शत्रूस पिटून लावलें. रघुनाथराव कुरूंदवाडकर हाहि भाऊंच्या सांगण्यावरून तुंगभद्रेपलीकडील फौजेच्या मदतीकरितां पांच हजार फौजेसह गेला होता. अशा रीतीनें तुंगभद्रेपलीकडील सर्व प्रदेश काबीज झाल्यावर व धारवाडहि घेतल्यावर भाऊ सर्व लष्करासह श्रीरंगपट्टणच्या रोखें चालू झाले.

ता. ६ एप्रिल १७९१ ला पर्शरामभाऊ तुंगभद्रा उतरून दक्षिण तीरास आले. त्या नदीच्या उत्तर तीराचा सर्व मुलूख मराठ्यांनीं काबीज केलाच होता. आतां नदी उतरून दक्षिणेकडे आल्यावर श्रीरंगपट्टणच्या रोखें भाऊंना जावयाचें होतें. असें करतांना श्रीरंगपट्टणच्या वाटेंत लागणारीं सर्व ठाणीं आपल्या ताब्यांत घेणें भाऊंना प्राप्तच होतें. कारण महाराष्ट्रांतून भाऊंना रसद पोंचण्याचा हाच मार्ग असल्यामुळें वाटेंतलीं ठाणीं शत्रूच्या हातीं ठेऊन पुढें जाणें धोक्याचें होतें. रघुनाथराव कुरुंदवाडकरांना भाऊंनीं पांच हजार फौजेसह पुढें पाठविलेंच होतें आतां भाऊहि त्याच बाजूला आल्यावर भाऊंची व रघुनाथरावांची बसवापट्टणच्या मुक्कामीं गांठ पडली.नंतर लगेच भाऊंनीं रघुनाथरावाला तोफा वगैरे सरंजाम देऊन त्यांची रवानगी पुढें अघाडीस केली. रघुनाथरावानें पुढें जाऊन संतीबिदनूर, मायकोंडा, हुपेगिरी चेनगिरी, वगैरे ठाणीं घेतलीं. या शेवटच्या ठाण्यांत दारूगोळा व धान्य बरेंच मराठ्यांना सांपडलें. पण यांवेळीं मराठ्यांच्या लष्कराबरोबर असलेल्या लमाण व पेंढारी वगैरे लोकांनीं एक अनिष्ट गोष्ट केली. या लुटारू लोकांनीं शृंगेरीच्या स्वामींचा मठ लुटला ही गोष्ट फारच वाईट झाली. *

* (टीप:—शृंगेरीचा मठ लुटल्याची हकिगत खरे भा. ९ प. नं. ३३३६, ३३३८, ३३४२, ३३८८ व ३४०४ या अस्सल पत्रांतून आलेली आहे व मठ+

भाऊंच्या फौजेपैकीं एक टोळी गणपतराव मेहेंदळे यांच्या हाताखालीं बिदनुराकडे गेली होती.या टोळीनें बरींच ठाणीं घेऊन उडगणीच्या ठाण्यास वेढा घातला होता. मेहेंदळचाच्या या टोळीचा प्रतिकार करण्याकरितां टिपूचें शिवमोघ्याच्या किल्यांतील सैन्य बाहेर आलें. या सैन्यानें मेहेंदळे यांनीं घेतलेलीं ठिकाणें परत घेतलीं अशी बातमी येतांच भाऊंनीं काशी-पंत रानडे याचे बरोबर तीन चार हजार गारदी गणपतरावाच्या मदतीस पाठविले. ही मदत येतांच गणपतरावानें शत्रूनें घेतलेलीं सर्व ठाणीं पुन्हा काबीज करून आणखी शिकारपूरचेंहि ठाणें घेतलें. मेहेंदळे व काशीपंत रानडे मिळून सुमारें पांच हजारांचा जमाव झाला होता. शत्रूच्या शिव-मोघ्याच्या किल्यांतील लोकांनीं पुन्हां गडबड करूं नये म्हणून भाऊंनीं मेहेंदळचाची ही फौज त्याच प्रांतीं ठेविली होती. इकडे विजयदुर्गाहून पेशव्यांचे आरमार जाऊन त्यानें कारवार जिल्ह्यांत समुद्रकांठचीं पुष्कळ

---

+ लुटारू लोकांनीं लुटला हें स्पष्ट आहे व लुटीचा माल स्वामीस परत देण्या-संबंधें भाऊ व नाना यांनीं खटपट केल्याचेंहि नमूद आहे. कै. खरेशास्त्री यांनींहि खरे भा. ९ पा. ४४७७ वर असें लिहिलें आहे कीं, लुटारू लोकांच्या झुंडीनीं केलेल्या अन्यायाबद्दल त्या त्या सैन्याच्या मुख्य सरदारास जबाबदार धरणें सर्वांशी योग्य नाहीं. अशी खरी स्थिती असतां इतिहासकार सरदेसाई यांनीं या बाबतींत रघुनाथराव पटवर्धनानें मठ लुटला असें लिहिलें तें अर्थातच बरोबर नाहीं. (स. माधवराव ख. २ पा. ३०७) पेशवाईंतील लष्कराबरोबर नेहमीं लुटारू पेंढार असे त्यांनीं इतर शंकराचार्यांचेहि मठ लुटल्याचीं उदाहरणें आहेत. पण कोणच्याहि ठिकाणीं सेनापतीच्या हुकुमानें मठ लुटल्याचें उदाहरण नाहीं; असें असतां कै. म. रा. बोडस यांनीं आपल्या शंकराचार्यांच्या चरित्रांत "पेशव्यांनीं शंकराचार्यांचे मठ लुटले म्हणून त्यांचें राज्य बुडालें" असें लिहिलें आहे.बोडसांचे हें लिहिणें साधार तर नाहींच पण त्याची कारण परंपराही तर्क शुद्ध नाहीं हें सांगावयास नकोच!)

ठाणीं घेतलीं पावसाळा जवळ आल्यामुळें तीं ठाणीं राखण्याकरितां बाबुराव साळोंखे याच्या हाताखालीं कांहीं पायदळ व ल्हान गलबतें राहिलीं व बाकीचें आरमार परत विजयदुर्गास गेलें. तें परत जातांच साळोंखे यास टिपूच्या फौजेनें हुसकून लावलें. भाऊंनीं नरसिंगराव देवाजी नांवाचा आणखी एक सरदार कारवाराकडे रवाना केला होता; त्या सरदारानें तिकडे पुष्कळ धामधूम करून चंदावर, होनावर, गिरीसोप, धारेश्वर वगैरे तमाम ठाणीं घेतलीं इतक्यांत टिपूची फौज त्यावरहि चालून आली. एक-मेकांनीं तींच तींच ठाणीं पुनः पुनः काबीज करावीं असें त्यांचे झोंबट तीन चार महिनें त्या प्रांतीं चालू होतें.

मे महिन्यांत पर्शरामभाऊंचे लष्कर चित्रदुर्गाजवळ आलें. भाऊंचा रोख श्रीरंगपट्टणवर जावयाचा होता व त्याप्रपाणें नानांचा त्यांना तगादाहि होता. बंगलोर काबीज झाल्यावर लॉर्ड कॉर्नवॉलीस हे टिपूच्या राजधानीवर चालून जाणार होते. मोगलांची फौज इंग्रजांना मिळाली होती. मराठे मात्र तुंगभद्रे अलीकडे आल्याची इंग्रजांना खबर नव्हती. मुंबईहून जनरल ऍबरक्रॉंबी हे कांहीं पलटणासह जलमार्गानें मलबार प्रांतीं आले होते. तेहि घाट चढून श्रीरंगपट्टणाकडे यावयाचे होते. तिघांनीं मिळून एकदम पट्टणास पोंचावें असा संकेत ठरला होता व त्याप्रमाणें इंग्रज व मोगल यांनीं अघाडी मारली व आपली फौज मात्र तुंगभद्रेकडे ठाणीं घेत राहिली हें बरें नाहीं असें नानास वाटलें. शिवाय पुण्याचा इंग्रजांचा वकील मॅलेट यानेंहि नानाला सारखा तगादा लावला. आपली फौज मागें राहिली आणि इंग्रजांनींच अघाडी मारून सर्व काम केलें तर आपल्याला कमीपणा येईल हें नाना ओळखून होते; म्हणून त्यांनीं मार्च महिन्यांतच हरीपंताची रवानगी म्हैसुराकडे केली होती. हरीपंतांनीं पानगल येथें निजाम अल्लीची भेट घेतली व तेथून ते एप्रिल महिन्यांत कृष्णा उतरून गुत्तीच्या सुमारें आले. इंग्रजांनीं त्वरा करून श्रीरंगपट्टण घेतलें तर टिपूचें राज्य तेच बळकावून बसतील अशी मराठ्यांना धास्ती होती. त्यामुळें कसेंहि करून लवकर श्रीरंगपट्टण गांठणें मराठ्यांना प्राप्त होतें. पण

इतक्यांत लॉर्ड कॉर्नवॉलीस पट्टणाकडे न जातां अंबूरच्या घाटाकडे मद्रासेहून रस्त येत होती. ती मिळवून घेण्यासाठीं कांहीं मजली परत फिरल्याचें वर्तमान आलें. ऍबरक्रांबी मलबार प्रांतीं होते त्याचीहि घाट चढण्याची कांहीं हालचाल दिसेना. यामुळें पुढें काय करावें अशा बुचकळ्यांत पडून हरीपंत व व परशुरामभाऊ इंग्रजांकडून काय वर्तमान येतें त्याची वाट पहात स्वस्थ राहिले. इतक्यांत कॉर्नवॉलीस याजकडून हरीपंतास पत्र आलें कीं आम्हीं पुन्हा श्रीरंगपट्टणाकडे चाललों, तरी परशुरामपंतास मिळवून घेऊन तुम्ही सत्वर आम्हास येऊन मिळावें. इंग्रजांकडून असें वर्तमान येतांच हरीपंत व पर्शरामभाऊ आपापलें तळ हालवून श्रीरंगपट्टणच्या रोखें चालूं लागलें. कॉर्नवॉलीसचें असें पत्र आलें तरी इंग्रजांचें लष्कर कोठें काय कामगिरी करीत होतें याची वार्ता मराठ्यांस नव्हती. बंगलोर घेतल्यावर कॉर्नवॉलीस यानें पट्टणाकडे न जातां मद्रासेहून अन्नसामुग्री, तोफा व दारूगोळा वगैरे रस्त येत होती ती मिळवून घेण्याचा आधीं प्रयत्न केला. ही रस्त हातीं पडतांच कॉर्नवॉलीस पट्टणाकडे वळला. ऍबरक्रॉम्बीहि मलबारांत होता तो घांट चढून पट्टणाकडे येऊं लागला. इतकें झाल्यावर टिपूची खात्री झाली कीं, आतां मात्र इंग्रज पट्टणावर नक्की येणार-टिपूनें मलबारकडून येणाऱ्या ॲबरक्रांबीला अडविण्याकरितां कांहीं सैन्य पाठविलें आणि बाकीच्या सैन्यासह लॉर्ड कॉर्नवॉलीस यास अडविण्याचें काम त्यानें स्वतः अंगावर घेतलें. इंग्रजांना मार्गाच्या आडचणी उत्पन्न करण्याकरितां टिपूनें आजूबाजूचा मुलुख जाळून बेचिराख केला, धान्याचा व वैरणीचा नाश केला आणि झाडेंसुद्धां तोडून टाकलीं. टिपूच्या या कृत्यामुळें इंग्रजांस फारच त्रास झाला ; तरी इतक्याहि संकटास न जुमानतां इंग्रज नेटानें चाल करून श्रीरंगपट्टणानजीक आले. इंग्रज इतके जवळ आल्यावर टिपूनें त्यांच्याशीं जोराचा सामना देण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें ता. १५ मे सन १७९१ रोजीं इंग्रज व टिपू यांनी निकराची लढाई होऊन टिपूचा पूर्ण पराजय झाला. ही लढाई अरिकेरा या ठिकाणीं झाली. (खरे ९-३३४४,३३५६) टिपूचा पराजय झाल्यावर तो मागें श्रीरंगपट्टणाकडे वळला व आपल्या राजधानीचें संरक्षण करण्याच्या

उद्योगास लागला. टिपूचा अरिकिऱ्यावर पराभव झाल्यावर इंग्रजांचें पुढचें काम म्हणजे श्रीरंगपट्टणावर चाल करून जाण्याचें होतें. पण हें काम फारच अवघड झालें होतें. कारण टिपूनें आजूबाजूचा मुलूख बचिराख करण्याची जी विलक्षण पद्धत स्विकारली होती त्यामुळें इंग्रजी फौजेचे भयंकर हाल होऊं लागले. शिवाय इंग्रजांना निजामाचें सैन्यहि पोसावयाचें होतें. दारूगोळा व मनुष्यबळ इंग्रजांजवळ भरपूर होतें; परंतु अन्नपाण्याच्या तुटवड्यामुळें इंग्रजांपुढें मोठेंच संकट उभें राहिलें. शिपाई सोजीर यांस दोन दोन दिवस उपास पडावा तेव्हां एकादे वेळीं अन्नाचा घांस दृष्टीस पडावा अशी स्थिति प्राप्त झाल्यामुळें कॉर्नवॉलीस यानें श्रीरंगपट्टणकडे न जातां परत फिरण्यांचें ठरविलें आणि ऍबरक्रॉंबीची फौज पश्चिमेकडून येत होती तिलाहि परत फिरण्याचा हुकूम केला. अशी व्यवस्था केल्यावर कॉर्नवॉलीसनें आपल्या लष्करचा तळ हालवून तो ता. २६ मे रोजीं परत बंगलोरकडे वळला.

पर्शरामभाऊ व हरीपंत यांचीं लष्करें कोठें होतीं त्याचा पत्ता इंग्रजांस अजून लागला नव्हता. याच सुमारास हीं दोन्हीं लष्करें मेलकोटचास एकत्र झालीं होतीं, भाऊंनीं आपले पुत्र रामचंद्रपंत आप्पा याजबरोबर पांच हजार फौज देऊन त्यास पट्टणच्या बाजूनें तलावा करण्यास पाठविलें होतें. रामचंद्रपंतांनीं पट्टणाकडून परत फिरणारें इंग्रजांचे सैन्य पाहातांच आपण आल्याची वर्दी कळविण्याकरितां त्यांजकडे कारकून व स्वार पाठविले. इंग्रजांस पहिल्यानें ही बातमी खरीच वाटेना. पण गोरे अधिकारी स्वतः चौकशीकरतां गेले तेव्हां त्यांची खात्री झाली. मराठ्यांची फौज आली ही बातमी ऐकून त्या भुकेनें व्याकूळ झालेल्या इंग्रजी सैन्यास काय आनंद झाला याचें वर्णन करणें कठीण आहे. कॉर्नवॉलीस, हरीपंत, भाऊ, वगैरेंच्या भेटी मेलकोटा येथें ता. २९।५।१७९१ रोजीं झाल्या. (P.R.C ३-३२५) मराठ्यांच्या लष्कराबरोबर बाजार भरपूर होता. त्यांनीं आपल्या बाजारांतील माल सर्रास इंग्रजांस देऊन इंग्रजांचे हाल वांचविले. भरपूर मालाचा पुरवठा सांपडतांच इंग्रजांनीं त्यावर कसा हात मारला याचें

वर्णन वाचण्यासारखें आहे. " आमचे फौजेसमागमें लमाण होतें. त्यांजकडे दोन हजार गोण्या दाण्याच्या पाठविल्या. त्याच्या यांच्या भेटी झाल्या. आमचें लष्करांत मोकळीक दाणेविशीं दिली. इंग्रजांची व मोंगलांची फौज यांनीं जो दाणे वगैरे जिन्नस सांपडला तितका नेला. पेढे फुटाणे वगैरे खोबरेची वाटी आदीकरून रुपयास दोन वाटचा घेऊन इंग्रजांनीं खादल्या. दह्याची मडकीं गौळ्यापासून दोन दोन रुपये द्यावे व गाडगेंच घ्यावें असें जाहलें. तेणेंकरून आमचे लष्करांत धारण रुपयेस शेर जाहली. वैरण नाहीं, पाऊस नाहीं तेव्हां मोठेंच संकट पडलें तेव्हां इंग्रजांचे याचे विचारें ठरलें जे, पाऊस होऊन वैरण होईपर्यंत आसपास रहावें. कावेरीचें पाणी उतरलेंनंतर पट्टणावर जावें. " ( खरे ९–३३७१ ) मराठ्यांजवळ असलेला धान्य पुरवठा इंग्रज व मोंगल यांच्या सैन्यानें फस्त केल्यामुळें अर्थातच मराठ्यांच्या लष्करांत धारण महाग झाली त्याचें वर्णन वरील उतान्यांत आलेंच आहे. धान्य वैरणीची अशी पंचाइत झाल्यामुळें या तीन्ही फौजा एकत्र रहाणें कठीणच होतें अशा स्थितींत महिना पंधरा दिवस गेल्यावर सर्वांच्या मतें असें ठरलें कीं इंग्रज व मोंगल यांनीं बंगलोरास रहावें. हरिपंतानीं शिऱ्याच्या आसपास रहावें आणि पर्शरामभाऊंनीं चित्रदुर्गाच्या आसपास रहावें आणि पावसाळा संपल्यावर सर्वांनीं एकत्र मिळून पट्टणावर चालून जावें. या प्रमाणें ठरल्यावर हीं तीन्हीं लष्करें निरनिराळ्या ठिकाणीं गेलीं. धारण महाग झाल्यामुळें भाऊंच्या लष्कराची फारच खराबी झाली होती. पण चित्रदुर्गाकडे गेल्यावर धान्याची स्वस्ताई झाली व वैरण भरपूर मिळूं लागल्यामुळें घोडीं व गुरें ताजीं तवानी झालीं. हरिपंत शिऱ्याच्या आसपास होते त्यांच्याजवळ पैशाचा तुटवडा होता. स्वारी शिकारी करून आपण पोट भरूं असा हरीपंतांचा बेत होता. पण इंग्रजांचें म्हणणें हरीपंतांनीं आपणाजवळ बंगलोरासच रहावें असें होतें. हरीपंतांची पैशाची नड लक्षांत घेऊन इंग्रजांनीं हरीपंतांस बारा लक्ष रुपये दिले. हरीपंताची नड दूर होतांच त्यांस स्वारी शिकारी करण्याचें कारण राहिलें नाहीं. त्यामुळें हरीपंत इंग्रजांबरोबर बंगलोर प्रांतीं आले.

भाऊंचें लष्कर चित्रदुर्गाकडे गेल्याचें पूर्वी सांगितलेंच आहे. भाऊ व त्यांचे पुत्र आप्पासाहेब हे चित्रदुर्गाच्या आसपास थोड्या अंतरानें तळ देऊन राहिले होते. पावसाळा सुरू झाल्यामुळें जुलै ते सप्टेंबर अखेरपर्यंत भाऊंच्या हातून कांहींच कामगिरी होण्यासारखी नव्हती त्यामुळें हे दोन तीन महिने ते स्वस्थच होते, तो काळ गेल्यावर शत्रूचीं ठाणीं वगैरे घेण्याचा उपक्रम करावयाचा. पण भाऊंची प्रकृति यावेळीं एकदम नादुरुस्त झाली. दोन तीन महिने भाऊ आजारी होते. त्यांस औषधोपचार करण्यांकरितां मिरजेहून बाळासाहेबांनीं वैद्य पाठविले. नानांनीहि पुण्याहून गणेशभट लागवणकर वैद्य यास भाऊंच्या लष्करास पाठवून दिले. औषधोपचार झाल्यावर दसऱ्याच्या सुमारास भाऊंच्या प्रकृतीस आराम पडत चालला. इतक्यांतच त्यांना हरिपंत व कॉर्नवॉलीस यांची पत्रे आलीं कीं, भाऊंनीं तात्काळ त्यांच्याकडे निघून यावें. इंग्रजांनीं मागडीचा किल्ला घेतला व नंदीगडास आक्टोबर महिन्यांत मोर्चे लाविले. मदगिरी, आदवानी, बाळापूर वगैरे ठाणीं दिवाळीपर्यन्त घ्यावीं व नंतर श्रीरंगपट्टणावर जावें असा कॉर्नवॉलीस व हरीपंत यांचा बेत ठरला होता. हरीपंत व कॉर्नवॉलीस हे श्रीरंगपट्टणवर जाईपर्यन्त मध्यें बराच काळ जाईल असें भाऊंना वाटलें म्हणून त्यांनीं हरीपंताच्या पत्राप्रमाणें त्यांच्याकडे न जातां दरम्यानच्या काळांत बिदनूर वगैरे प्रांतांत अंमल बसविण्याचा उद्योग हातीं घेतला. असें करतांना त्यांनीं नानाचाहि सल्ला घेतला होता. हा बेत ठरल्यावर भाऊंनीं प्रारंभीं चेनगिरी, होळेहोनूर वगैरे ठाणीं घेऊन एकदम शिवमोघ्याकडे कूच केलें. त्या किल्याजवळ टिपूकडील रेझासाहेब नांवाचा शूर सरदार वीस हजार कवाइती पायदळ, दोन तीन हजार स्वार व दहा बारा तोफा घेऊन उतरला होता. त्याला बांकी नबाब म्हणत. हा बांकी नबाब भाऊंचें लष्कर येतांच किल्ला सोडून तुंगेच्या तीरावर एका अडचणीच्या जंगलांत जाऊन राहिला. ही बातमी भाऊंना कळतांच त्यांनीं रामचंद्र आप्पा व रघुनाथराव कुरुंदवाडकर यांज बरोबर दहा हजार स्वार व इंग्रजी पलटणें देऊन त्यांस बांकी नबाबावर पाठविलें. जंगलांत स्वारांचा उपाय चालण्या-

जोगा नव्हता म्हणून ता. १८ जानेवारी १७९२ रोजीं इंग्रजी पलटणें पुढें सरसावून जंगलांत शिरलीं. प्रातःकाळपासून तिसऱ्या प्रहर पावेतों गोळा गोळी झाल्यावर बांकी नबाबाचा कांहीं इलाज चालेनासा झाल्यामुळें त्यानें पळ काढण्यास सुरवात केली. जंगलांतून शत्रूनें पळ काढल्याची बातमी कॅ. लिटल्नें रामचंद्र आप्पासाहेब व रघुनाथराव कुरूंदवाडकर यांस कळविली व लगेच पटवर्धनांच्या घोडेस्वारांनीं पळणाऱ्या शत्रूवर जोराचा हल्ला केला. चार घटका निकराची लढाई होऊन बांकी नबाबाचा पूर्ण पराजय झाला व तो डोंगरांत पळून गेला. शत्रूचें सर्व लष्कर मराठ्यांनीं लुटलें. या लढाईंत हरीपंत फडक्यांचा जांवई गणेश गंगाधर पागे व काशीपंत रानड्यांचा पुतण्या हे ठार झाले. ही लढाई झाल्यावर भाऊंनीं शिवमोघ्याचें ठाणें घेऊन लुटून जाळून फस्त केलें.

पर्शरामभाऊ व टिपू यांमध्यें गेलीं बरींच वर्षें भयंकर वैर पडलें होतें. सावशीच्या लढाईंत कान्हेरराव मारले गेले, पांडुरंगरावास कैद झाली, टिपूनें विश्वासघातानें नरगुंदकरास कैद करून त्याचें संस्थान घेतलें आणि गेलीं बरींच वर्षें हैदर व टिपू यांनीं कर्नाटकांतून एक पैसासुद्धां पटवर्धनांच्या हातीं पडूं दिला नाहीं. या सर्व गोष्टींचें उसनें फेडावयास भाऊंस आतां ही चांगलीच संधी आली होती व तिचा भाऊंनीं भरपूर फायदा घेण्याचें ठरविलें. बिदनूर प्रांतांत मराठ्यांची स्वारी बरेंच वर्षांत झाली नव्हती त्यामुळें तो प्रांत चांगल्या भरभराटींत होता; पण या स्वारींत भाऊंनीं गांव लुटण्याचा व जाळण्याचा असा कांहीं सपाटा चालविला कीं बिदनूर, चित्रदुर्ग, हसनबेळूर तुमकर वगैरे मुलुख मराठ्यांच्या लुटीमुळें इतका उजाड झाला कीं, पुढें पन्नास वर्षांतहि त्याला पूर्वस्थिती प्राप्त झाली नाहीं.

बिदनूर प्रांतांतलीं बहूतेक ठाणीं घेतल्यावर भाऊंनीं खुद्द बिदनुरावरच चाल केली. बिदनूर सहज हस्तगत होईल अशी भाऊंची अटकळ होती पण ती खरी ठरली नाहीं. बिदनूरच्या किल्लेकऱ्यांनीं मोठी हिंमत

धरून तो किल्ला निकरानें झुंजविण्याची तयारी केली. कॉर्नवॉलीस, भाऊ, व हरीपंत यांच्या पूर्वीच्या संकेताप्रमाणें भाऊंनीं इ. स. १७९१ च्या अक्टोबरच्या सुमारास श्रीरंगपट्टणकडे यावयाचें होतें; पण तो मार्ग सोडून भाऊ बिदनूर प्रांताकडे वळले ही गोष्ट कॉर्नवॉलीस याला आवडली नाहीं. कॉर्नवॉलीसनें या बाबतींत पुण्यास नानाकडे तक्रार केली. त्यामुळें बिदनूर घेण्याचें काम तसेंच टाकून भाऊंनीं तावडतोब श्रीरंगपट्टणाकडे जावें असें भाऊंना नानांनीं लिहून पाठविलें. बिदनूरचा किल्ला घ्यावयाचा तर तेथील किल्लेदारानेंहि किल्ला निकरानें लढविण्याचें ठरविलें होतें. अशा स्थितींत बिदनूरच्या नादीं लागावें तर सहज महिना दोन महिने त्या कामगिरीस लागणार. नानांचा आग्रह तर भाऊंनीं बिदनूरचा नाद सोडून श्रीरंगपट्टणाकडे जावें असा होता. अशी स्थिती प्राप्त झाल्यामुळें भाऊंनीं बिदनूरचा नाद सोडला व ते श्रीरंगपट्टणकडे वळले. *

---

* टीप—( भाऊंचा बिदनूर प्रांतांत प्रवेश हा एक मोठाच वादाचा प्रश्न होऊन बसला होता. नानांचीं पत्रें आल्यामुळें भाऊ बिदनूर सोडून श्रीरंगपट्टणाकडे आले अशी खरी स्थिती असतां कर्नल वुइल्क ग्रँटडफ् वगैरे इतिहासकारांनीं भाऊ टिपूच्या कमरुद्दिन नांवाच्या सरदाराला भिऊन बिदनुराहून पळाले असें लिहिलें आहे तें अर्थातच बरोबर नाहीं. बिदनूरच्या संरक्षणाकरितां टिपूनें कमरुद्दिन नांवाचा सरदार कवाइती पायदळाचा जंगी सरंजाम देऊन पाठविला होता. त्याच्याशीं लढाई देऊन बिदनूर सर करावयाचें ह्मणजे भाऊंना महिना दोन महिन्याचा अवकाश पाहिजे होता; पण इंग्रजांच्या भाऊविरुद्ध तक्रारी आणि नानाचा श्रीरंगपट्टणास त्वरेनें जाण्याचा आग्रह यामुळें भाऊंना बिदनूरची कामगिरी तशीच टाकून परत फिरावें लागलें. इंग्रजांच्या भाऊंविरुद्ध ज्या तक्रारी होत्या त्यातरी कितपत योग्य होत्या याचा विचार करतां त्या तक्रारीहि मतलबीच होत्या असें दिसतें. भाऊ, हरीपंत व कॉर्नवॉलीस यांच्या भेटींत ठरल्याप्रमाणें भाऊंनीं इ. स. १७९१ च्या दिवाळीनंतर श्रीरंगपट्टणाकडे वळावें ×

असो. बिदनूरची कामगिरी तशीच टाकून नानाच्या पत्राप्रमाणें भाऊ इंग्रजांस मिळण्याकरितां श्रीरंगपट्टणाकडे वळले. इतकें होईतों सन १७९२ चा फेब्रुआरी महिना उजाडला. या अवधींत श्रीरंगपट्टणाकडे इंग्रज व टिपू यांच्या काय काय झटापटी चालल्या होत्या त्या पाहिल्या पाहिजेत.

इंग्रज, मराठे व मोगल यांच्या सैन्याकडून टिपूचा मुलुख जरी चोंहोंबाजूंनीं उध्वस्त होत होता तरी टिपूनें अजून डर खाल्ली नव्हती. पर्शरामभाऊंना अडविण्याकरितां त्यानें शिवमोघ्याकडे सैन्य पाठविल्याचें पूर्वी लिहिलेंच आहे. हरिपंताच्या हुकुमावरून बळवंत सुबराव नांवाच्या सरदारानें मदगिरीचा किल्ला घेतला होता व तेथें थोडें लोक ठेविले होते त्यावरहि टिपूच्या

---

× असें ठरलें होतें ही गोष्ट खरी; आणि ठरल्याप्रमाणें न वागतां भाऊ बिदनुराकडे गेले हें बरें नाहीं असें हरीपंताचे उद्‌गार इ. सं. कि. प्र. ले ३-४ मध्यें आहेत. भाऊ पट्टणास न गेले तर श्रीमंतांचे वाटणीस हिसका बसेल, इंग्रजांशीं संबंध आहे असा उल्लेख खरे ९-३४११ या पत्रांतहि आहे. भाऊंनीं पट्टणास लौकर यावें ह्मणून हरीपंतानें गणपतीची प्रार्थना केल्याचा उल्लेखहि खरे ९-३४१४ या पत्रांत आहे. इतकें असूनसुद्धां भाऊ पट्टणाकडे न जातां बिदनुराकडे गेले यालाहि तशींच कांहीं तरीं कारणें असलीं पाहिजेत. हीं कारणें पाहतां असें दिसतें कीं, भाऊंचा बिदनूर प्रांतांत प्रवेश नानांच्या व इंग्रजांच्या वकीलाच्या संमत्तीनेंच झाला होता व त्याची दखलगिरी कॉर्नवॉलिसलासुद्धां असावी. एरवीं कॉर्नवॉलिसनें शिवमोघ्याच्या यशाबद्दल भाऊंचें अभिनंदन केलें (P.R.C.३-४१७-४३३) याची उपपत्ति लागत नाहीं. शिवाय कॅ. लिट्‌ल् हा जो भाऊंबरोबर होता त्याची हकीगत लिहिणारा मूर हा ग्रंथकार आपल्या ग्रंथांत भाऊ बिदनूरकडे गेले हेंच योग्य केलें असें पान १५२ वर ह्मणतो. अशी हकीगत असतां भाऊंच्या बिदनुराकडे जाण्यासंबंधानें इंग्रजांनीं अनेक तक्रारी सुरू केल्या. हृया ×

फौजेनें अकस्मात् हल्ला करून त्यांस हाकून लाविलें. टिपूचा मुलगा पत्ते हैदर यानें गुरुमकोंडयास जाऊन मोगल फौजेच्या एका टोळीचीहि अशीच दुर्दशा केली. कॉर्नवॉलिसच्या सैन्यासहि टिपू असाच उपद्रव देत होता. परंतु टिपूच्या उपद्रवास न जुमानतां कॉर्नवालीस श्रीरंगपट्टणावर चालून गेला. त्याच्या बरोबर निजामअल्लीचे पुत्र शिकंदरशहा मोंगली फौजेसह होते. मराठ्यांची फौजहि हरीपंताच्या हाताखालीं इंग्रजाबरोबर होती. असा हा प्रचंड सेना समुदाय १७९२ च्या फेब्रुआरीच्या पांचव्या तारखेस श्रीरंगपट्टणांजवळ आला. नंतर दोनच दिवसांनी इंग्रजांनीं टिपू

×तक्रारींचीं अनेक पत्रें पू. रे. कॉरेस्पाँडन्समध्यें छापिलीं आहेत. ह्या सर्व तक्रारींचें कारण असें दिसतें कीं, भाऊंचे बिदनूर प्रांतांतले विजय इंग्रजांना सहन झाले नसावेत. एका पत्रांत इंग्रजांची अशी तक्रार आढळते कीं, भाऊ हे आपल्या राज्याला सोइस्कर असा मुलुख जिंकण्याचा उद्योग करीत आहेत. ( P. R.C. ३-३१८ ) शिवाय या उद्योगाचें सर्व श्रेय भाऊंना जाऊं नये असेंहि एक पत्र आढळतें. या पत्रांत कॉर्नवॉलीसनें शिवमोघ्याच्या यशाचें श्रेय कॅ. लिटलीलाच दिलें पाहिजे असें ह्मटलें आहे. (P. R. C.३-४२५) शिवमोघ्याच्या यशाबद्दल भाऊंचें अभिनंदन कॉर्नवॉलीसनें केल्याचें वर लिहिलेंच आहे. एका पत्रांत भाऊंचें अभिनंदन व दुसऱ्या पत्रांत भाऊंच्या यशाचें खरें श्रेय कॅ. लिट्ल्ला! ही इंग्रज नीति पाहिली म्हणजे इंग्रजांना भाऊंचें यश सहन होत नव्हतें; आणि म्हणूनच त्यांनीं भाऊ बिदनूरकडे गेल्याच्या तक्रारी सुरू केल्या. पण भाऊ बिदनूरकडे नानाच्याच नव्हे तर इंग्रजांचा वकील मॅलेट याच्याहि संमतीनें गेले असल्यामुळें शेवटीं कॉर्नवॉलीसनें मॅलेटवरहि ताशेरा झाडण्यास कमी केलें नाहीं. या पत्रांत कॉर्नवॉलीस मॅलेट्ला लिहितो:– "I think you were a little off your guard when you in-some measure acquisced in the minister's (Nana's) ideas about Bednur, ' P. R. C. ३-४२५ ) कॉर्नवॉलीसच्या या पत्रावरून भाऊ बिदनूरकडे गेले ते नानाच्या व मॅलेट्च्या संमतीनेंच गेले होते ही गोष्ट निर्विवाद सिद्ध आहे.

पट्टणाबाहेर उतरला होता. त्यावर रात्रीच्यावेळीं छापा घातला. या छाप्याचें वर्णन हरीपंतांनीं खालीलप्रमाणें केलें आहे.

" इंग्रजांनीं पट्टणापासून तीन कोसांवर मुक्काम होता. तेथून पंधरा पलटणें सडी घेऊन रात्रीस निघाले ते टिपूचा गोट पट्टणचे उत्तरेस होता तेथें जाऊन पोचले. एक शिल्लक केली. टिपू सावध झाला. त्याच्या तोफांच्या व बाणाच्या व गारद्यांच्या शिलका होऊं लागल्या इंग्रजांनीं तोफा नेल्या नव्हत्या. फक्त पलटणाची शिल्लक करीत टिपू तळावरून उधळला तो कावेरी पलीकडे दक्षिण तीरास गेला. उभयपक्षीं लढाई आवशीचे चवदा घटका रात्रीस सुरू झाली ती दुसरे दिवशीं प्रहर दिवस पर्यंत होत होती. लढाई भारी झाली. इंग्रजांनीं करीघटाची टेकडी घेऊन लालबाग व शहरगंज येथें जाऊन पोहोचून जागा कायम केली. तीच जागा मजबूत करीत आहेत. इंग्रजांच्या जुवामर्दीची शर्त झाली." खरे ९-३४१४

याप्रमाणें श्रीरंगपट्टणची जागा काबीज केल्यावर शहरावर तोफा लावण्यासाठीं इंग्रजांनीं मोर्चेबंदी केली. ता. १६ फेब्रुआरीला जनरल ऍबरक्रॉंबी याचें सैन्य मलबारांतून येऊन पोचलें. त्यानें पश्चिमेकडे मोर्चे बांधिले. अजून दक्षिणचीं बाजू मोकळी होती त्या बाजूनें टिपूस बाहेरून रसद पोंचत असे. पर्शरामभाऊंनीं दक्षिणचा मार्ग बंद करावा व शहरास दक्षिणच्या बाजूनें वेढा द्यावा असा कॉर्नवालीसचा हेतु होता; परंतु भाऊ वेळेवर येऊं शकले नाहींत. टिपूनें तहाचें बोलणें करण्यास सुरवात केली होती तरी उभयपक्षीं लढाई सुरूच होती. ता. २२ फेब्रुआरी रोजीं टिपूनें ऍबरक्रॉंबीच्या सैन्यावर जोराचा हल्ला केला; परंतु त्या सैन्यानें तो हल्ला परतविला इतकेंच नव्हे तर टिपूला पिटाळून शहरांत पिटून लाविलें. असें झाल्यावर टिपूचे सर्व उपाय थकल्यासारखे झाले व नाइलाजानें त्याला शत्रू म्हणेल त्या अटीवर तहाचें बोलणें करणें प्राप्त झालें. इंग्रजांच्या मनांतून तह करावयाचा नव्हता; पण टिपूची दौलत साफ गारद झाल्यास इंग्रज फार प्रबळ होतील याकरितां त्याचा समूळ नाश होऊं द्यावयाचा नाहीं असे हरीपंत व निजाम यांचें आधींच

ठरलें होतें. अर्थातच हरीपंतानें या बाबतींत नेट धरला कीं, टिपूकडून तहाचें बोलणें आलें तें मान्य करावें हरीपंताची अशी भीड पडल्यामुळें कॉर्नवॉलीसला हरीपंताचें म्हणणें मान्य करावें लागलें हीं बोलणी होतात न होतात तोंच तारीख २४ फेब्रुआरी रोजीं पर्शरामभाऊ पट्टणास येऊन दाखल झाले व त्यांनीं तात्काळ टिपूची रसद बंद केली. भाऊंनीं टिपूच्या अनेक टोळयांवर छापे घालून त्या कापून काढिल्या व हरतऱ्हेनें भाऊंच्या सैन्याचा उपद्रव टिपूला होऊं लागला. पर्शरामभाऊंच्या या हालचालीमुळें टिपू एकदम चौताळून गेला व त्यानें कॉर्नवॉलीस यास निरोप पाठविला कीं, तुम्हीं मला मोकळा सोडाल तर पर्शरामभाऊचा समाचार घेण्याची माझी तयारी आहे. टिपू सुलतानाच्या या आव्हानाचा स्वीकार करून आपलें युद्धकौशल्य प्रगट करण्याची भाऊंनाहि हौस होती पण हा युद्ध चमत्कार पाहण्याची इंग्रज व मोंगल यांची तयारी नसल्यामुळें त्यांनीं टिपूच्या म्हणण्याकडे लक्ष दिलें नाहीं. मग हतवीर्य झालेल्या टिपू सुलतानास तह करण्याशिवाय गत्यंतर राहिलें नाहीं नाइलाजानें त्यानें तहाच्या कागदावर सही केली. तहाच्या अटी फारच जबर होत्या. टिपूनें तीन कोटी व तीस लाख रुपये व अर्धें राज्य द्यावें व या शर्तीचीं हमी म्हणून आपले मुलगे इंग्रजांकडे ओलीस द्यावे. P.R.C. 3–442 हीं कलमें फारच जड होतीं पण तीं टिपूस मान्य करावीं लागलीं. या तहानें मराठयांच्या वाटणीस एक कोट रुपये खंडणी व चाळीस लक्षांचा मुलुख आला. हा मुलुख म्हणजे कृष्णा व तुंगभद्रा या मधला टापू होय. यांत सावनूरचें संस्थान, पटवर्धनी जहागिरीचे लक्ष्मेश्वर, कुंदगोळ वगैरे परगणे व धारवाडचा सुभा याचा समावेश होतो. *

---

* ( टीप :— या लढाईचें विवेचन करतांना इतिहासकार सरदेसाई यांनीं भितांना जन्म गेलेल्या नानानें या लढाईंत तटस्थ रहावयास पाहिजे होतें, टिपू हा अद्वितीय योद्धा होता. हरीपंताला कॉर्नवॉलीसचे राजकीय डावपेंच समजण्याची पात्रता नव्हती, शृंगेरीचा मठ रघुनाथराव कुरुंदवाडकरानें लुटला. ( स. मा खं. २ पा. ३०७ ) वगैरे अनेक विधानें केलीं आहेत त्यांना ऐ. ले. सं. वगैरे प्रमुख मराठी कागदपत्र आणि नवीन प्रसिद्ध§

फेब्रुवारी १७९२ च्या अखेरीस टिपू व त्रिवर्ग दोस्त यांचेमध्यें तह झाला. तह झाल्यावर तीन्ही सरकारचीं सैन्यें आपापल्या मुलुखास जाण्यास निघालीं. कॅ० लिट्ल् याचीं पलटणें भाऊंबरोबर होतीं त्यांस पाठवून देण्या-विषयीं कॉर्नवॉलीसकडून लिहून आल्यावरून भाऊंनीं कॅ० लिट्ल् यास बहुमानार्थ हत्ती दिला आणि तो व त्याबरोबरचे सात गोरे अंमलदार यांस

---

§ झालेला पू. रे. रेकॉर्ड यांत कांहीं आधार नाहीं. शृंगेरीचा मठ लुटारू लोकांनीं लुटल्याचें मागें सांगितलेंच आहे. शिवाय हे स्वामी टिपूला यश येण्याकरितां अनुष्ठानें करीत होते ही गोष्ट वाचकांनीं या ठिकाणीं लक्षांत ठेवणें जरूर आहे. ( ऐ. टि. ६–२२–२४ ) नाना व हरीपंत यांच्या लायकी संबंधानें पू. रे. रे. मध्यें शेंकडों पत्रें आहेत त्यांचा विस्तार येथें करणें शक्य नाहीं. जिज्ञासूनीं तीं पू. रे. रे. भा. ३ मध्यें पहावीं. हरी-पंताचा उल्लेख कॉर्नवॉलीसनें एका पत्रांत A statesman as well as a soldier असा केला आहे [ P. R. C. 3–328 ]. दुसऱ्या एका पत्रांत कॉर्नवॉलीस हरीपंतासंबंधानें खालीलप्रमाणें लिहितो:—

I enjoyed every gratification that friendship can afford in Haripant's Society in so much that a moment's absence was that of a year, but sacrificing my own gratification to the impatience you must necessarily experience to see & receive from him on account of War I submitted to the necessity of separation. [P. R. C. 2–131] ज्या हरीपंताला राजकीय डावपेंच समजत नव्हते असें सरदेसाई म्हणतात त्या हरीपंतासंबंधानें कॉर्नवॉलीसचें काय मत होतें हें वरील पत्रावरून दिसून येईल. कॉर्नवॉलीस हा शहाणा, धूर्त मुत्सद्दी व पराक्रमी होता हें सरदेसाई यांना मान्य आहे, पण त्याच कॉर्न-वॉलीसचें हरीपंतासंबंधीचें मत मात्र सरदेसाई यांना मान्य नाहीं. समका-लीन जबाबदार माणसाच्या उद्गारांना महत्व असल्यामुळें कॉर्नवॉलीसचे §

वस्त्रें देऊन गौरवानें निरोप दिला. तीं पलटणें जनरल ऍबरक्राँबी याच्या सैन्यास मिळून मुंबईस गेलीं. कॉर्नवॉलीस याची इंग्रजी फौज आणि मोगल व मराठे यांच्या फौजा सर्व एकत्र मिळून पट्टणाहून दोन कोस कूच करून आल्या. हरीपंताचें म्हणणें शिवगंगेपर्यंत सर्वांनीं एकत्र मिळून जावें असें होतें; परंतु नवीन मिळालेल्या मुलखांत अंमल बसविण्याकरीतां लौकर गेलें पाहिजे असें निमित्त करून पर्शरामभाऊ वेगळें फुटलें. नंतर इंग्रज हरीपंत

---

§उद्गार वर दिले आहेत; मग सरदेसाई कांहीहि म्हणोत. तसेंच नानानें या लढाईंत तटस्थ रहावयास पाहिजे होतें या म्हणण्यांतहि कांहीं अर्थ नाहीं. नानानें रागरंग पाहूनच या लढाईंत शहाणपणानें भाग घेतला व आपल्या राज्याचा महत्वाचा फायदा करून घेतला. एककोटी खंडणी व कृष्णा तुंग-भद्रा यांमधील मुलुख मराठ्यांना मिळाला हा लहानसान फायदा नव्हे. शिवाय इंग्रज वरचढ होऊं नयेत हणून हरीपंतानें योग्य वेळीं टिपूचें तहाचें बोलणें मान्य करण्यास कॉर्नवॉलीस यास भाग पाडलें यांतही हरीपंताचा मुत्सद्दीपणाच दिसून येतो. आपला फायदा करून घेण्याकरितां वेळीं इंग्रजांची मदतही घ्यावयाची पण त्यांना वरचढ मात्र होऊं द्यावयाचें नाहीं हें धोरण नाना व हरीपंत यांनीं ठेविलें व त्यांत ते यशस्वीहि झाले यांत शंका नाहीं. नाना लढवय्या नव्हता हें प्रसिद्धच आहे; पण जो लढवय्या नव्हे तो भित्रा असा अर्थ केल्यास आज चर्चिल रूझवेल्ट यांनाहि भित्रेच म्हणावें लागेल हें इतिहासकार सरदेसाई यांनीं लक्षांत ठेवावयास पाहिजे. टिपूचा समूळ नाश इंग्रजांना करावयाचा होता पण मराठ्यांनीं तो करूं दिला नाहीं आणि तह मान्य केला ही गोष्ट इंग्रजांना मराठ्यांच्या वजनामुळें करावी लागली. कॉर्नवॉलीसनें मराठ्यांचें म्हणणें मान्य केल्यामुळें इंग्रजांचा सेनापती जनरल मेडोज् यानें आत्महत्या केली. ( P. R. C. ३–४४४) या गोष्टी-वरून इंग्रजांवर मराठ्यांचें या तह प्रकरणीं केवढें दडपण आलें असेल हें सहज दिसून येतें. एवढें दडपण घालून आपलें म्हणणें इंग्रजांस मान्य करा-वयास लावणारे नाना व हरीपंत भित्रे व राजकीय डावपेंच न समजणारे होते असें ज्यांना म्हणावयाचें असेल त्यानीं खुशाल म्हणावें. इतिहासाचा दाखला मात्र तसा नाहीं एवढेंच आम्हांस याठिकाणीं नमूद करावयाचें आहे.)

व मोगल हे एकत्रच मागें फिरले. श्रीरंगपट्टणाहून बंगोलोरला येण्यास त्यांना महिना दीडमहिना लागला. एप्रिलच्या आठव्या तारखेस इंग्रजांनी मद्रासकडे जाण्याकरितां हरीपंताचा निरोप घेतला.*

इंग्रजांनीं निरोप घेतल्यावर हरीपंत व मोगल मिळून थोरले बाळापुरावरून रायदुर्गापर्यंत आले. तेथून मोगलाचें लष्कर फुटून आपल्या देशास निघून गेलें नंतर हरीपंततात्या मे महिन्याच्या प्रारंभी कपाट संगमाजवळ कृष्णा उतरून अलीकडे आले ते ता. २५ मे १७९२ रोजीं पुण्यानजीक गारपिरावर येऊन उतरले. दुसरे दिवशीं श्रीमंतांच्या व त्यांच्या भेटी झाल्या.

हरीपंताच्या लष्करापासून फुटून निघाल्या नंतर पर्शराभाऊच्या लष्काराचे तुंगभद्रेवर येईपर्यंत फार हाल झाले.

भाऊ देशीं येऊन पोचेपर्यंत त्यांच्या लष्करांत रूपयास शेर याप्रमाणें धारण होती. वैरणीचा कडाड झाल्यामुळें शेंकडों गुरें व घोंडीं दररोज मरत होतीं इंग्रजांनी आपल्या अवजड तोफा परत नेण्याच्या अडचणीमुळें पेशव्यांस नजर केल्या होत्या त्या नेण्याची कामगिरी हरीपंतांनीं भाऊंवर सोंपवली होती. या तोफा ओढून नेणारे बैल गळाटल्यामुळें कोस अर्धा कोस याप्रमाणें भाऊंच्या लष्कराची मजल होत होती. टिपूबरोबर तह झाला होता म्हणून टिपूचा जरी राजरोस उपद्रव भाऊंना नव्हता तरी टिपूचे बैद भाऊंच्या लष्कराला. त्रास देत असत. भाऊंचें लष्कर मार्चचे अखेरीस मेलकोटचाहून निघालें तें वाटेंतील अनेक अडचणींना तोंड देत देत मेच्या दहा तारखेस

* ( टीपः— हरीपंताचा निरोप घेतांना कॉर्नवॉलीसनें हरीपंतासंबंधानें खालील उद्गार काढलेः—

"Haripant will make seven or eight more marches with me and he proposes and I believe with truth to look forward to our separation with very great concern. We have never had any serious differences and for many months past his behaviour has uniformly been most obliging and accommodating (P.R.C. 3-449)

३५९४



तुंगभद्रेवर हरिहरास आलें. तुंगभद्रेच्या उत्तर तीरीं आल्यावर भाऊंनीं आपल्या फौजेपैकीं बऱ्याचजणास निरोप दिला. त्यानंतर मोठाल्या मजली करून भाऊ १९ मे रोजीं घटप्रभेवर आले. दुसरे दिवशीं येडूर येथें कृष्णा पार होऊन ता. ३० मे १७९२ रोजीं भाऊंची स्वारी तासगांवास आली.

हरीपंत व पर्शराममाऊ या दोघांसहि नानांनीं दहा हजार स्वार व पांच हजार पायदळ घेऊन पुण्यास बोलाविलें होते ; परंतु बरेच दिवसांच्या मोहिमेमूळें लोक आपापल्या घरीं जाण्यास उत्सुक झाले होतें ; त्यामुळें पुन्हां जरूर लागेल त्यावेळीं तत्काळ आपण हजर होऊं अशी कबुली देऊन लोक आपापल्या घरीं निघून गेले. फौजेस निरोप दिल्यामुळें भाऊंना पुण्यास जाण्याचें कांहीं कारण राहिलें नाहीं म्हणून भाऊ पुण्यास न जातां तासगांवासच गेले.*

* (टीप:—श्रीरंगपट्टणची मोहीम आटोपून हरीपंत व भाऊ परत फिरतांना त्यांना नानांनीं आपपल्या फौजेसह पुण्यास बोलाविलें त्याच्या कारणांची ज्यास्त स्पष्टता अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या पू. रे. रे. मध्यें आढळते. हरीपंत मोहीम आटोपून ता. २५ मे १७९२ रोजीं पुण्यास दाखल झाले आणि पर्शरामभाऊ ता. ३० मे १७९२ रोजीं तासगाँवीं आले. याच सुमारास महादजी शिंदे पुण्यास येणार अशा वार्ता जिकडे तिकडे पसरल्या होत्या व त्याच्या येण्यासंबंधीं नानातऱ्हेचे तर्क वितर्क चालु होते. स्वतः शिंद्यांनीं पुण्यास येण्याचा आपला हेतू असा जाहीर केला होता कीं, शहाआलम बादशहांनीं पेशव्यांस वकील मुतलकीचा अधिकार दिला त्या अधिकाराची बादशाहाकडून मिळालेली सनद व वस्त्रें जवाहीर वगैरे बहुमान पेशव्यांस अर्पण करण्याकरितां आपण पुण्यास येत आहोंत. शिंदे पुणें मुक्कामीं ता. ११ जून १७९२ रोजीं येऊन दाखल झाले. शिंद्यांनीं आपल्या येण्याच्या जाहीर केलेल्या हेतूसंबंधानें पुणें दरबार साशंक असल्यामुळें नानांनीं हरीपंत व भाऊ यांना आपापल्या फौजेनिशीं पुण्यास बोलाविलें होतें. नानांची ही शंका किती साधार होती हें

(टीप-पृष्ठ २४२ वरून समाप्त)

पुण्याचा वकील मॅलेट यास कळविल्याची हकीगत एका पत्रांत सविस्तर आहे. (P. R. C. २-१३०) वरील हकीगतीवरून महादजींच्या पुण्यास येण्या-संबंधानें नाना साशांक होते तें किती बरोबर होतें हें स्पष्ट होते. प्रत्यक्ष नानानें या बाबतींत काढलेले उद्‌गार वरील हकीगतीशीं किती जुळते आहे हें पाहिलें म्हणजे महादजीच्या हेतूंसंबंधानें काडीचीहि शंका रहात नाहीं. नानाचे उद्‌गार ऐ. ले. संग्रहांत एके ठिकाणीं आहेत ते असे. " शिंदे येथें आहेत. त्याची चाल सुधी नाहीं. नबाबाकडे त्यांचें राजकारण आहे. बेदर सरकारच्या चौथेचा अंमल स्वराज्याचा आहे तो शिंद्यांनीं नबाबास द्यावा. नबाबांनीं शिंद्यास बीट परगणा अगदीं द्यावा आणि आमचा बंदोबस्त करावा. आपण श्रीमंताजवळ राहून दौलतीचा कारभार करावा असाहि डौल आहे." (खरे ९-३६३२) वरील उताऱ्यांत शिंद्याचें निजामाबरोबर राजकारण होतें असें म्हटलें आहे त्याचीहि भरपूर माहिती पू. रे. रे. मध्यें आहे. शिंद्याप्रमाणेंच निजामहि नानाची सत्ता उलथून पाड-ण्याच्या विचारांत होता. ( P. R. C. ४-१०७ ) आणि या बाबतींत शिंद्याचें साहाय्य मिळविण्याकरितां त्यानें शिंद्याला तीस लाख रुपये दिले होते. ( P. R. C. ४-२२) तात्पर्य शिंद्याच्या पुण्यास येण्यासंबंधानें ऐ. ले. सं. व पू. रे. रे. या दोन समकालीन पत्रव्यवहारांत एक सारखीच हकीगत आढळते. यावरून शिंद्यासंबंधानें पुणें दरबारनें घेतलेली शंका रास्त होती; आणि म्हणूनच नानांनीं भाऊंना श्रीरंगपट्टणच्या मोहिमेवरून परत येतांना फौजेसह पुण्यास बोलाविलें होतें.

———

## प्रकरण १३ वें

# करवीरकरांवर मोहीम

टिपूवरची मोहीम आटोपून परशुरामभाऊ तासगांवी आले व तेथें कांहीं दिवस राहिले. थोडी विश्रांती घेतल्यावर टिपूवरील मोहिमेंत भाऊंना झालेलें कर्ज व मिळालेला मुलूख याची व्यवस्था लावण्याकरितां भाऊ १७९२ च्या आक्टोंबरच्या सुमारास पुण्यास आले. मागच्या स्वारींत जमा किती झाली, खर्च किती झाला, कर्ज किती झालें वगैरे बाबींचा हिशेब भाऊंनीं पुणें दरबारास सादर केल्यावर त्यावर फारच तक्रारी व वादविवाद झाले. परशुरामभाऊंना अर्थातच या तक्रारी आवडल्या नाहींत. त्यांचे म्हणणें असें होतें कीं गेल्या मोहिमेंत आपणास जें कर्ज झालें त्याच्या फेडी करितां नवीन जिंकलेला सर्व मुलूख सरकारकडून आपल्या ताब्यांत मिळावा. परंतु नानाफडणीस या गोष्टीस मान्यता देईनात. शेवटीं पुष्कळ घासाघीस होऊन असें ठरलें कीं टिपूकडून ताब्यांत आलेल्या मुलखांपैकीं, धारवाडचा सुभा, सरकारांत ठेवावा, आणि १५ लक्ष रुपये उत्पन्नाचा सांवनूर प्रांत मात्र भाऊंच्या कर्जाची फेड होईपर्यंत त्यांजकडे राहावा, शिवाय पटवर्धनांच्या जहागिरीचा जो मुलूख सुटला होता तो त्यांच्याकडेच रहावा. सावनूर प्रांत पटवर्धनांच्या जहागिरांस लागून होता. त्यामुळें त्याचा बंदोबस्त करणें आपणांस फार

# प्रकरण १३ वें

# करवीरकरांवर मोहीम

—०००☆००—

टिपूवरची मोहीम आटोपून परशुरामभाऊ तासगांवी आले व तेथें कांहीं दिवस राहिले. थोडी विश्रांती घेतल्यावर टिपूवरील मोहिमेंत भाऊंना झालेलें कर्ज व मिळालेला मुलूख याची व्यवस्था लावण्याकरितां भाऊ १७९२ च्या आक्टोंबरच्या सुमारास पुण्यास आले. मागच्या स्वारींत जमा किती झाली, खर्च किती झाला, कर्ज किती झालें वगैरे बाबींचा हिशेब भाऊंनीं पुणें दरबारास सादर केल्यावर त्यावर फारच तक्रारी व वादविवाद झाले. परशुरामभाऊंना अर्थातच या तक्रारी आवडल्या नाहींत. त्यांचे म्हणणें असें होतें कीं गेल्या मोहिमेंत आपणास जें कर्ज झालें त्याच्या फेडी करितां नवीन जिंकलेला सर्व मुलूख सरकारकडून आपल्या ताब्यांत मिळावा. परंतु नानाफडणीस या गोष्टीस मान्यता देईनात. शेवटीं पुष्कळ घासाघीस होऊन असें ठरलें कीं टिपूकडून ताब्यांत आलेल्या मुलखांपैकीं, धारवाडचा सुभा, सरकारांत ठेवावा, आणि १५ लक्ष रुपये उत्पन्नाचा सांवनूर प्रांत मात्र भाऊंच्या कर्जाची फेड होईपर्यंत त्यांजकडे राहावा, शिवाय पटवर्धनांच्या जहागिरीचा जो मुलूख सुटला होता तो त्यांच्याकडेच रहावा. सावनूर प्रांत पटवर्धनांच्या जहागिरींस लागून होता. त्यामुळें त्याचा बंदोबस्त करणें आपणांस फार

खर्चाचें होणार नाहीं. अशा समजुतीनें परशुराम भाऊंनीं ही व्यवस्था मान्य केली होती. पण अनुभव मात्र निराळाच आला.

धोंडजी वाघ नांवाचा एक शिलेदार टिपूच्या कैदेंत होता. टिपूवरची मोहीम आटोपून फौज परत आल्यावर या धोंडजी वाघानें टिपूस कळविलें कीं मला कैदेंतून मुक्त केल्यास. धारवाड, सावनूर वगैरे प्रांतात धामधूम करून आपण पटवर्धनांना त्रास देऊं. परस्पर ही गोष्ट झाली तर टिपूस हवीच होती, म्हणन त्यानें तात्काळ धोंडजी वाघास कैदेंतून सोडलें. कैदेंतून मुक्त झाल्यावर वाघानें लुटारू शिपाई व स्वार चाकरीस ठेवून सन १७९३ च्या जानेवारींत सावनूर प्रांतात धुमाकूळ सुरू केला. वाघानें हवेरीचे ठाणें हल्ला करून घेतलें व युक्तीनें सावनूर शहरांत प्रवेश करून तेथेंहि आपला अंमल बसविला परशुरामभाऊंनीं दोन हजार स्वार, एक हजार गारदी, व दोन तोफा इतकें सामान सावनूरच्या रक्षणाकरितां त्र्यंबकराव रेटरेकर व जानोबा सुभेदार यांच्या हाताखाली त्या प्रांती ठेविलें होतें. वाघानें सावनूर घेतल्याची बातमी कळतांच ते दोघे सरदार त्यावर चालून गेले. वाघानें पहिल्या लढाईंत त्यास मागें हटविलें. पण पुन्हा सावर धरून रेटरेकरांनीं जोराचा प्रतिहल्ला करताच वाघानें हावेरीकडे पळ काढला. मग भाऊंच्या सरदारांनीं हावेरीसहि वेढा घातला. तेव्हां वाघ तेथूनहि निसटला तो मासूरच्या ठाण्यांत जाऊन बसला. मासूरच्या ठाण्यांत मात्र त्या सरदारांचा कांहीं इलाज चालेनासा झाला. तेव्हां परशुरामभाऊंचे चिरंजीव रामचंद्रआप्पा हे पांच हजार फौजेनिशी तासगांवाहून तेथें आले. रामचंद्रआप्पा येतांच वाघानें मासूरच्या ठाण्याहून पळ काढला. व तो टिपूच्या मुलुखांत गेला. आप्पानी मासुरचें ठाणें घेऊन पाडून टाकिलें. मासूर काबीज झाल्यावर तेथें अप्पाजी गोविंद सखदेव या सरदाराजवळ एक हजार स्वार, एक हजार गारदी, व दोन तोफा इतकें सामान ठेवून बाकी सर्व फौजेसह आप्पासाहेब १७९३ च्या जून महिन्यांत तासगांवी परत आले. येवढ्यानें वाघाचा दंगा शांत झाला असें मुळीच नव्हतें वाघाला टिपूचा

आश्रय असल्यामुळें त्यानें संधी साधतांच पटवर्धनांच्या मुलुखाला त्रास देण्याचा सपाटा चालूच ठेवला होता. तात्पुरता त्याचा बंदोबस्त आप्पासाहेबांनी केला इतकेंच.

वाघाचें हें प्रकरण जेमतेम मिटतें न मिटतें तोंच करविरकरांचें दुसरें एक प्रकरण उत्पन्न झालें. पूर्वीच्या एका प्रकरणांत परशुरामभाऊंनीं सन १७८४ च्या मार्च महिन्यांत करवीरकरांचा बंदोबस्त केल्याची हकीकत आलीच आहे. सन १७८४ पासून १७९३ पर्यंत करवीरकरांनीं कांहीं म्हणण्या सारखी गडबड केली नाहीं. दरम्यान सन १७८६।७ आणि १७९२ या सालीं पेशव्यांच्या टिपूवर स्वाऱ्या झाल्या. या स्वाऱ्यांत पेशव्यांच्या पौजा गुंतल्या होत्या हें पाहून करवीरकरांनीं सावंतवाडीकरांची कुरापत काढली .सन १७८५।८६ च्या सुमारास करवीकरांनीं सावंतवाडीकरांवर चढाई केली, व त्यांचा कांहीं मुलूख आणि किल्ले काबीज केले. सावंताचें राज्य हें छत्रपतींच्या हुकमतीखालचें होतें. व त्याचें संरक्षण करणे हें पेशव्यांचें कर्तव्य होतें टिपूवरची मोहीम १७९२ मध्यें आटोपल्यावर सावंतांच्या या तक्रारीकडे पेशव्यांना. लक्ष देणें भाग पडले. शिवाय १७९२ मध्यें महादजी शिंदे हे पुण्यास येऊन बसलें होते त्यांनीहि सावंतांचें प्रकरण हातांत घेण्यांस पेशव्यांस निकड लावली. महादजी शिंदे यांची पुतणी वाडीकर खेम सावंत यांस दिलेली होती. त्यामुळें शिंद्यांना सावंतवाडीकरांचे विशेष अगत्य होते. करवीरकरांनीं सावंतवाडीकरांचा घेतलेला मुलूख परत द्यावा असें पेशव्यांकडून करवीरकरांस लिहून दिले होतें. पण करवीरकर कोणच्याहि परिस्थितींत सामोपचाराच्या गोष्टी कधींच ऐकत नसत. लढाईच्या लकडयाशिवाय ते वळणावर येण्याचा मुळींच संभव नव्हता. अर्थातच करवीरकरांवर स्वारी करण्या खेरीज दुसरे गत्यंतरच पेशव्यांस राहिलें नाहीं. टिपूची मोहीम, त्याचे हिशोब वगैरे झाल्यावर, व धोंडजी. वाघाचाहि दंगा थोडासा शांत झाल्यावर नानांनीं परशुरामभाऊंस करवीरकरांवरची मोहीम हाती घेण्यास सांगितलें.

परशुरामभाऊंची स्वारी आपणावर होणार हें समजतांच करवीरकरांनीं आपण होऊनच दंग्यास सुरवात केली भाऊंच्या ताब्यांत कर्ज फेडीकरिता म्हणून करवीरकरांनीं आळल्याचें ठाणें पूर्वीं दिलें होतें, तें ठाणें करवीरकरांनीं जबरदस्तीनें घेतलें. करवीरकरांची ही जबरदस्ती पाहून भाऊंनीं त्यांच्या प्रतिकारार्थ आपले जेष्ठ चिरंजीव रामचंद्रआप्पा यांच्या बरोबर चार हजार स्वार, दोन हजार पायदळ व दोन तोफा असा सरंजाम देऊन त्यांना करवीरकरांवर पाठविलें. रामचंद्रआप्पांनीं पहिल्या तडाख्यासच आळत्याच्या ठाण्याला वेढा घातला. असें होतांच कोल्हापुराहून खुद्द महाराज सन १७९३ च्या डिसेंबरांत रामचंद्र आप्पांवर चालून आले. या प्रसंगीं जी लढाई झाली त्यांत रामचंद्रआप्पांचा पराजय झाला व ते जखमी होवून शत्रूकडे पाडाव सांपडलें (खरे ९–३५२९) रामचंद्र आप्पांचा पाडाव होतांच त्यांच्या फौजेचा पाठलाग कोल्हापूरकरांनीं कृष्णानदीपर्यंत केला. व आप्पांचें बरेंच सामान लुटून घेतलें. *

---

* ( टीप— रामचंद्रआप्पा शत्रुकडे पाडाव सापडलें त्या वेळीं पटवर्धनांच्या फौजेंत कांहीं फितूर झाला होता कीं काय अशी शंका येऊन त्या प्रमाणें. पुढें एका भेंटीत नानांनीं परशुराम भाऊंना प्रत्यक्ष विचारलें. त्यावेळीं भाऊंनीं दिलेलें उत्तर ऐ. ले. संग्रहातील एका पत्रांत खालील प्रमाणें आढळतें " रा. नाना फडणीस यांची स्वारी वडिलांच्या (भाऊंच्या) वाड्यांत भेटीस आली होती नानांनीं वडिलांस विचारलें कीं राजश्री रामचंद्रआप्पा राजांकडे पाडाव सांपडलें त्या समयीं इकडील फौजेंत कांहीं फितूर होता कीं काय? असें विचारलें. त्यांजवरून वडिलीं उत्तर केलें कीं फितुरांविषयीं दिक्कत घ्यावयाची नाहीं. समयोचित गोष्ट घडली. नंतर नाना उठोन आपलें वाड्यांत गेले " * (खरे ९– ३५९०) करवीरकरांनीं वाडीच्या सावतांचे नुकसान केलें होतें तें भरून मिळावें म्हणून भाऊंची स्वारी करवीरकरांवर व्हावयाची होती. तडजोडीनें व सामोपचारानें हा तंटा आपसांत मिटेल तर लढाईचा प्रसंग आणण्याचें भाऊंच्या मनांत नव्हतें.

करवीरकरांचे वकीलहि सलोख्याची बोलणी करण्याकरितां तासगांवी आले होते. पण इतक्यांत वर लिहिल्याप्रमाणें करवीरकर व रामचंद्रआप्पा यांची गांठ पडून रामचंद्रआप्पांचा मोड झाल्यामुळें व आप्पा पाडाव सांपडल्यामुळें सलोख्याच्या बोलण्याचा रंग एकदम पालटला. सावंतांचा प्रश्नच बाजूला राहिला, आणि स्वतःची इभ्रत संभाळण्याचा प्रश्नच पुढें आल्यामुळें करवीरकरांवर स्वारी करणें भाऊंस प्राप्त झाले. आप्पा पाडाव झाल्याची बातमी येतांच सर्व कामें बाजूस सारून भाऊ तात्काळ म्हणजे सन १७९३ च्या २९ डिसेंबरला डेरे दाखल झाले. डेरे दाखल होतांच त्यांनीं रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस पुण्यास पत्रें लिहिली. भाऊंनीं रघुनाथरावांस पुण्यास कळविलें कीं, रामचंद्रआप्पास आलेल्या अपयशाचें परिमार्जन करण्याकरितां फौज जमविली पाहिजे. आमच्या पथकांतले लोक आम्ही येथें गोळा करीतच आहोंत. पण रास्ते, प्रतिनिधी वगैरे सरदारांची फौज सरकारांतून या मोहिमेवर नेमिली आहे तिची रवानगी जलदीनें होईल अशी तजवीज करावी. या मोहिमेस पायदळाची जरूर आहे व ते आयत्यावेळीं मिळणें कठीण आहे; तरी म्हैसूरच्या स्वारींत आम्हाबरोबर इंग्रजांची दोन पलटणें होती तीं इंग्रजांकडून मिळत असल्यांस खटपट करून पाहावी. इंग्रजी पलटणें मिळत नसतील तर पुण्यास शिंद्यांच्या पलटणीपैकीं एकदोन मिळतील तर पाहावी. वरील हकीकत भाऊंनीं रघुनाथराव, कुरुंदवाडकरांस कळविल्यावर रघुनाथरावांनें पुणें दरबारांस तगादा लाविला नंतर पुण्याहून फौज, तोफा वगैरे सरंजाम रवाना झाला. पुण्याची ही फौज भाऊंनीं कृष्णातीरी अंकली येथें आपल्या फौजेचा तळ दिला होता त्या ठिकाणी येऊन दाखल झाली. इतकें होईतों सन १७९४ चा फेब्रूवारीं महिना उजाडला.

करवीरकरांनीं रामचंद्रआप्पाला पकडला खरा पण रामचंद्रआप्पा हा परशुराम भाऊंचा मुलगा. त्याच्या जिवास कमीजास्ती झाल्यास त्याचें परिणाम काय होतील हें करवीरकरांस माहीत होतें. तेव्हां त्यांनीं रामचंद्रआप्पाच्या जखमांची योग्य काळजी घेऊन त्यांस मोठ्या सन्मानानें परत

तासगांवी पाठवून दिलें. रामचंद्रआप्पाला करवीरकरांनीं सोडले खरे. पण तेवढ्यानें लढाईचें कारण संपलें नाहीं. भाऊंकडे कर्जाच्या फेडींबद्दल लाऊन दिलेल्या तालुक्यांतील आळत्याचें ठाणें करवीरकरांनीं जबरदस्तीनें घेतलें होते तें त्यांनीं सोडलें नाहीं व वाडीच्या सावंताच्या नुकसानीचीहि भरपाई केली नाहीं. अर्थातच सलोख्याची बोलणी मागें पडून लढाईस सुरुवात व्हावयाची ती झालीच.

कृष्णातीरी अंकलीच्या मुक्कामी भाऊ स्वारीची तयारी जारीनें करीत होते. पटवर्धनांच्या तिन्ही पथकांतलें स्वार तेथें गोळा झालें होते. पुण्याहूनहि फौज येऊन पोंचली होती. इतकें झाल्यावर भाऊंनीं लष्करचा तळ हालविला व ते कृष्णा नदी उतरून पंचगंगेवर आले. आणि ती नदी उतरून ता. ८ फेब्रुवारी १७९४ ला भाऊंची स्वारी करवीराजवळ हेरले या गांवी येऊन दाखल झाली. करवीराजवळ टेंबलाई नांवाची एक टेकडी आहे. त्या टेंकडीवर भाऊंनीं मोर्चेबंदी सुरू केली व तेथून करवीरावर तोफांचा मारा सुरू केला. करवीरकर चालून येतील म्हणून टेकडीच्या पायथ्याशीं स्वार, पायदळ वगैरे सरंजाम भाऊंनीं तयार करून ठेविला होता. शत्रूची फौज करवीरच्या तटाच्या आश्रयानें जमून तयार होती. परंतु त्यांनीं कांहीं हालचाल केली नाहीं. भाऊंनीं १२ फेब्रूवारीला सकाळपासून करवीरावर तोफांचा मारा सुरू केला होता. पण शत्रुनें सांयकाळच्या चार घटका दिवस राहीपर्यंत कांहीं हालचाल न केल्यामुळें भाऊंनीं तोफा व पायदळ काढून गोटाकडे परत लाऊन दिलें व आपणहि निघालें. भाऊंचें सैन्य गोटाकडे परत निघाले असें दिसतांच करवीरकरांनीं मागून हल्ला केला. या स्वारींत रामचंद्रआप्पा हजर नव्हते. शत्रूवर चालून जातांना व परत फिरतांना प्रत्येक स्वारींत अघाडी व पिछाडी संभाळण्याचें काम हे रामचंद्रआप्पा करीत असत. पण या स्वारींत ते हजर नसल्यामुळें हें काम भाऊंचे द्वितीय पुत्र हरीपंत बावा याजकडें आलें होतें. प्रस्तुतच्या प्रसंगी करवीरकरांची हुल्लड येतांच हरीपंतांनीं मागें वळून त्यांचा मोड करून त्यांस पिटून लावलें.

यानंतर पुन्हां १९ फेब्रूवारीं रोजीं करवीरकरांच्या लोकांनीं भाऊंशी गांठ घातली तींत सुद्धा त्यांचा पराजयच झाला. उभय पक्षांचे शेंपन्नास माणूस ठार व जखमी होण्यापलिकडे या लढाईपासून कांहीं निष्पन्न झालें नाहीं. भाऊंच्या लोकांना जखमा झाल्या त्यांत महादजी नाईक निंबाळकर व मानसींगराव पाटणकर यांच्या जखमा भयंकर होत्या. पुन्हा ता. १२ मार्च रोजीं करवीरकरांच्या चार पांचशें लोकांनीं भाऊंच्या मोर्चावर चाल केली. परंतु त्याहि वेळेस भाऊंच्या लोकांनीं त्यांचा तत्काळ मोड करून त्यांची दाणादाण करून सोडली.

करवीरकरांवर तोफांचा मारा सुरू झाल्या दिवसांपासून करवीरकरांकडील प्रीतीराव चव्हाण व लक्ष्मणराव शिंदे तोरगळकर हे तहाची वाटाघाट करण्याकरितां भाऊंकडे येत असत. त्यांजबरोबर बोलणें करण्याकरीतां भाऊंनीं हिंदुराव घोरपडे गजेंद्रगडकर व आनंदराव हुपरीकर यांस मध्यस्थ नेमिलें होतें. सावंतवाडीकरांचा मुलूख करवीरकरांनीं घेतला तो परत देण्यास करवीरकर तयार होते. परंतु हल्लीच्या स्वारीचा खर्च भाऊं बारालक्ष मागत होते त्या संबंधानें करवीरकरांचे वकील तीन लक्षापासून बोलत होते. त्यामुळें तहाची बोलणी न जमता लढाईच सुरूं होती. गोवेंकर फिरंग्याकडे करवीरकरांनीं मदत मागितली होती व त्याप्रमाणें तिकडून दोन पलटणें व चारशें गोरे करवीरांत आले आहेत. अशी बातमीहि भाऊंच्या लष्करांत उठली होती फिरंग्यांची मदत करवीरकरांस येवो अगर न येवो, स्वारीच्या खर्चाची रक्कम मिळेपर्यंत तह करावयाचा नाहीं असा भाऊंचा निश्चय ठरला होता. टेंबलाई टेकडीवर भाऊंनीं मोर्चे बसविले होते. त्यांचें काम चालूंच होतें. शेवटीं भाऊ ऐकत नाहींत असें पाहून करवीरकरांकडून बाळ जोशीराव बोलणें करण्यास आलें. त्यांनीं खर्चाची रक्कम महाराज दहालक्षपर्यंत देण्यास तयार आहेत. असें सांगितल्यावरून भाऊंनीं तें बोलणें मान्य केलें व तोफांचा मारा बंद केला. तह झाल्यावर भाऊंच्या फौजा परत गेल्या म्हणजे करवीरकर पुन्हां तह मोडून दंगा करतील अशी भाऊंस शंका होतीच. कारण याप्रमाणें करवीरकरांनीं पूर्वीं वर्तणूक केली

होतीच करवीरकरांनीं पुन्हां असें करूं नये म्हणून यावेळीं जागृत खबरदारी घेण्याचें भाउंनीं ठरविलें आणि करवीरकर तहाप्रमाणें वागतील याबद्दल हमी म्हणून भाऊंनीं महाराजाकडे रत्नाकरपंत राजाराम, नारायणराव पाटणकर, यशवंतराव घाटके, रायाजी जाधव, गुजाजी गाईकवाड आणि प्रितीराव चव्हाण इतक्यां असामी ओलीस मागितल्या. महाराजाचा निरूपाय झाल्यामुळे भाऊंचें हेंहि बोलणें करवीरच्या महाराजांनीं मान्य केलें. फक्त भाऊंनीं सांगितलेल्या असाम्यान पाठविता त्याच्या मुलांस ओलीस पाठवितो असें महाराजांनीं सांगितल्यावरून भाऊंनीं तें मान्य केलें याप्रमाणें ओलीस भाऊंच्या लष्करांत दाखल झाल्यावर परशुरामभाऊ तारीख २८ मार्च १७९४ रोजीं आपला तळ हालवून परत तासगांवी आले. ✻

---

✻ टीप करवीरकर व भाऊ यांच्यामध्यें जो तह झाला त्याची सविस्तर हकीगत खरे भा. ९ ले. ३५४६, ३५४७, ३५५०, ३५५६, ३५५९, ३५६४, ३५६६, ३५६७, ३५६८ यामध्यें आहे. करविरकरांनीं तह करतांना किती ओढून ताणून धरलें होते हें या विस्तृत पत्र व्यवहारांत स्पष्ट दिसून येते करवीरकरांनीं आरंभी तीन लक्षांपासून बोलण्यास सुरुवात केली त्या संबंधानें पटवर्धनांचा एक वकील विनोदानें लिहितो: "करवीरकरांच्या बोलण्यांत गरीबी बहूत! तीन लांख पर्यंत बोलतात" (खरे ९–३५४६) शेवटीं हें बोलणें दहा लाख पर्यंत आलें व तहाच्या हमीकरितां प्रतिष्ठित माणसांच्या मुलांना ओलीस द्यावें लागले. त्या ओलीसांची नावें एका पत्रांत दिली आहेत. ती अशी "यादी करवीरकरांकडून ओलीस आल्या त्यांची नांवनिशी (१) गुजाजी गायकवाड यांचा पुत्र (२) प्रीतीराव चव्हाण यांचा पुत्र (३) रायाजी जाधव यांचा पुत्र (४) निंबाजी जाधव यांचा पुत्र (५) रत्नाकरपंत यांचा पुत्र (६) बाळ जोशीराव यांचा पुत्र थोरला भाऊ जोशी" (खरे ९–३५३८)

# प्रकरण १४ वें

## खर्ड्याची लढाई

—✱★✱—

बाळाजी विश्वनाथ पेशव्यानी मोंगलाई मुलखांतून चौथ सरदेशमुखीचा वसूल करण्याचा जो हक्क मिळविला होता त्या मुळें मराठे व निजाम यांमध्यें भांडणाला नेहमीचेंच एक कारण उत्पन्न झालें होतें. पेशवे व निजाम यांमध्यें जीं अनेक युध्दें झालीं त्यांचें प्रमूख कारण चौथ सरदेश मुखीची वसूली हेंच होतें. माधवराव पेशव्यांपर्यंत निजामाशीं झालेल्या प्रत्येक युध्दांत हें देणें निजामाला द्यावें लागत होतें. निजामाला हें देणें नेंहमीच असह्य वाटत असे व लढाईचा प्रसंग आल्याशिवाय तो तें कधींहि देत नसे. पण नारायणराव पेशव्याचा खून झाल्यानंतर मराठेशाहित जी बेबंदशाही माजली ती निजामाच्या आयतीच पथ्यावर पडली. पुणें दरबार व राघोबा यांच्या भाऊबंदकीचा फायदा घेऊन निजामानें, राघोबाला व त्याला मदत करणारे इंग्रज यांना, मिळूनये म्हणून निजामाशीं मैत्री राखणें पुणें दरबारला जरूर पडलें. आपल्या प्रत्येक मसलतीस निजामानें मदत करावी निदान विरुध्द पक्षासतरी त्यानें मिळूं नये म्हणून पुणें दरबारनें निजामाला तीस लक्षांची जहागीर व दौलताबाद किल्लाहि दिला होता. राघोबाचे व पुणें दरबारचें भांडण इंग्रजाशीं सालबाईचा तह होऊन मिटल्यावर पेशव्यांची दृष्टी आपल्याकडे वळेल व चौथाईची तुंबलेली बाकी पेशवे मागूं लागतील

करवीरची कामगिरी उरकल्यावर भाऊंना धोंडजी वाघाचा समाचार घ्यावयाचा होता, या धोंडजी वाघानें सावनूर प्रांती दंगा केल्याची हकिकत पूर्वी आलीच आहे हा दंगा पूर्वी रामचंद्र आप्पा यांनीं मोडला होता. पण रामचंद्रआप्पा परत आल्यावर धोंडजी वाघानें पुन्हां दंग्यास सुरवात केली होती. त्याचा बंदोबस्त करण्यास भाउंनीं गोविंद सखदेव यांस नेमिलें होते. हा वाघ टिपूच्या आश्रयानें दंगल करीत असल्यामुळें टिपूच्या मुलखांतली कांहीं ठाणीं आपण उध्वस्त करावी असा भाऊंचा विचार होता. पण टिपूशी तह झाला असल्यामुळें तसें करण्यास नाना भाऊंना परवानगी देण्यास तयार नव्हते. नानांची परवानगी न मिळाल्यामुळें या कामीं भाऊंना वाघाचा उपद्रव सहन करीत स्वस्थच बसावे लागले.)*

---

* टीप— टिपूच्या मुलुखाला उपद्रव दिला म्हणजे वाघाचा उपद्रव आपोआप बंद होईल या भाऊंच्या योजनेला नानांनीं संमत्ती न दिल्यामुळें भाऊंचा हिरमोड झाला. या संबंधानें भाऊंनीं काढलेले निराशेचें उग्दार खालील प्रमाणें आहेत " बाळाजी विष्णू यांचें पत्र आपणास पाहाण्यासाठीं पाठविलें होतें. त्यांत राजश्री नाना यांची बोलणी रुष्टतेची आहेत. त्याचें कारण धोंडजी वाघ लहान माणूस त्यासाठीं टिपूच्या तालुक्यांत मोबदला करून कलागत वाढवूं नये. अशी आज्ञा सरकारची आहे म्हणून बाळाजी विष्णू यांनीं पेशजी लिहिलें होते त्याजवरून त्याचें उत्तर येथून गेले." सरकार तालुक्याची खराबी टिपूचे आश्रयानें होत असतां त्यांचें नांव काढू नये. अशीच मर्जी असल्यास मासूर घेण्याचे तरी प्रयोजन कोणते? उगाच श्रम व शिबंदी खर्च कशांस पाहिजे ? काय तें विचारून लिहावें. मासूरचे मोर्चे उठवून ठाणीं राहिलीं आहेंत ती त्याच्या हवाली करूं मुख्य टिपूच्या स्नेहाची जोड. वरकड कशास मोजावे?" या अन्वयें स्पष्ट लिहिलें होतें तें पत्र त्यांनीं (नानांनीं) पाहिले त्यांत आणखी विषेशणें लीहिली होती. यामुळें रुष्टतेचे बूट निघाले इतकांच प्रकार" (खरे ९–३५६९) भाऊंच्या उत्साहावर नानांनीं विरजण घातल्यामुळें भाऊंसारख्या शूर वीराला किती निरुत्साह वाटला असेल त्याचें मार्मीक वर्णन वरील पत्रांत आहे.

हें भय निजामास होतेंच पण त्याच्या सुदैवानें सन १७८२ सालीं सालवाईचा तह झाल्यावर पुणें दरबार टिपूच्या मसलतींत गुंतून पडलें. त्यामुळें चौथाईच्या बाकीचा प्रश्न आणखी कांहीं वर्षे पुढें ढकलला गेला.

इंग्रजांची मसलत १७८२ साली संपली आणि टिपूचें प्रकरणहि १७९२ च्या तहानें मिटलें. आतां मात्र मराठे आपणावर चौथाईच्या बाकीकरतां तगादा लावणार व जरूर पडल्यास स्वरीहि करणार हें निजाम पक्कें ओळखून होता. मराठयांची ही स्वारी टाळण्याकरतां निजामानें काय काय लटपटी केल्या हें थोडक्यांत पहाणें जरूर आहे. इंग्रज, निजाम व मराठे यांनीं टिपू विरुध्द जी मोहीम केली त्यावेळीं त्रिवर्गामध्यें जें तह झाले त्यांत मुख्य कलम असें होतें कीं टिपूनें त्रिवर्गापैकीं कोणाहि एकावर पुन्हां स्वारी केली तर त्रिवर्गानीं त्याचा प्रतिकार करावा. हें तह ठरवितांना निजामानें अशी खटपट चालविली होती कीं त्रिवर्गापैकीं एकानें जर दुसऱ्यावर स्वारी केली तरी त्याचाहि प्रतिकार बाकीच्या दोघांनीं करावा. तहांत हें कलम घालण्याचा निजामाचा आग्रह आपणांवर मराठयांची होणारी स्वारी टाळण्याचा होता हें उघड होतें. त्यावेळचे ग.ज. कार्नवालीस हे तहांत हें कलम घालण्यास तयार. होते पण मराठयांची मान्यता मिळाल्याशिवाय हें कलम तहांत घालणें शक्य नव्हतें. आपल्यावरच पुढें मागें उलटणाऱ्या या कलमाला मराठयांची मान्यता मिळणार कशी ? अर्थातच नाना फडणीसानी तहाचें हें कलम पार उडवून दिलें. या बाबतींत निजामाची निराशा झाल्यावर मराठयांना वगळून इंग्रजांशी स्वतंत्र तह करण्याची निजामानें खटपट केली निजामाच्या दरबारचा इंग्रजांचा वकील केनवे हा अशाप्रकारचा तह निजामाजवळ इंग्रजांनीं करावा अशा मताचा होता व त्याप्रमाणें त्यानें ग. ज. ला कळविलेंहि पण लॉर्ड कॉर्नवालीस व पेशव्याच्या दरबारचा इंग्रजाचा वकील मॅलेट या दोघांच्या मतें मराठयांना वगळून असा तह निजामाजवळ करणें शहाणपणाचें नाहीं असें ठरलें. अर्थात निजामाची याही बाबतींत निराशा झाली. इतकें झालें तरी पुढें मराठयांची स्वारी आतां आपणावर नक्की होणार हें दिसतांच निजामानें पुन्हां इंग्रजांकडे मदतीची

याचना केली. या वेळीं लॉर्ड कॉर्नवालिस जाऊन त्याच्या जागीं सर जॉन शोअर हे आले होते. त्यांनीं पूर्वीचे तह करारमदार पाहून निजामाला मदत कणण्यासारखें पूर्वीच्या तहात कांहीं कलम नाहीं असें स्पष्ट लिहीलें आहे. इतकेंच नव्हे तर शोअरनें असें लिहीलें आहे कीं मराठे हे सामर्थ्यवान असल्यामुळें त्याना विरोधी असें आम्ही कांहीं केलें तर त्यापासून इंग्रजांना धोका उत्पन्न होईल, व मराठ्यांची दोस्ती आम्ही कायम ठेवली तर हिंदुस्थानांतल्या इतर कोणत्याहि सत्तेची आम्हाला भिती राहणार नाहीं. शोअरनी आणखी असेंहि लिहिलें आहे कीं निजाम हा कमकुवत असल्यामुळें त्यानें मराठयांशीं मिळतें घेणेंच शहाणपणाचें आहे. *

इंग्रजांनीं निजामाला मदत करण्याचें सर्वस्वी नाकारल्यावर निजामानें दुसरा एक डाव टाकला. महादजी व नाना यांचे आपसांत जमत नसें हें निजामाला माहीत होतें. मराठेशाहीतल्या या दोन प्रमुख व्यक्तिच्या मतभेदाचा फायदा घेऊन आपला डाव साधावा असा निजामानें बेत केला. शिंदे यावेळीं पुण्यांस येऊन राहिले होते. व त्यांचे निजामाजवळ राजकारण सुरू झालें होते. शिंद्यांनीं पेशवे सरकारच्या चौथाईच्या अंमलांतील बेदर परगाणा निजामास श्रीमंतांकडून देववावा, निजामानें शिंद्यास बीड परगाणा द्यावा, आणि नानाचा बंदोबस्त करून शिंद्यांनीं श्रीमंताजवळ राहून दौलतीचा कारभार करावा असें हें शिंदे व निजाम यांजमधील राजकारण होतें.

* (टीपः- पुना रेसीडन्सी रेकॉर्ड भाग ४ मध्यें ह्या प्रकरणासंबधानें शेकडों पत्रें छापली आहेत प. नं. ७, २८, २९, ३०, ३१, ५३, ५४, ही पत्रें या तह प्रकरणांत विशेष महत्वाची असून जिज्ञासूनी जरूर पहाण्यासारखी आहेत त्यावरून समकालीन इंग्रजांचे मराठे व निजाम या संबधाचे मत स्पष्टपणें कळून येण्यासारखें आहे. या प्रकरणा संबधानें शोअरनें आपल्या वरिष्टानां विलायतेत लिहून पाठविलेला खलीता अतीशय महत्वाचा असून त्याचा सारांश रा. ब. सरदेसाई यांनीं स. माधवराव खंड २ मध्यें ४६५।६८ पानांवर छापला आहे. तोहि पहाण्या सारखा आहे.)

नानाचा पाडाव होणें ही गोष्ट निजामाला पाहिजेच होती व त्यासाठींच त्यानें शिंद्याजवळ हें राजकारण चालविलें होतें. निजामानें या बाबतींत शिंद्याना २५ लाखांची लांचहि दिली होती. एवढें जबरदस्त राजकारण निजामाजवळ करण्याचा शिंद्याचा हेतु एका पत्रांत खालील प्रमाणें लिहीलें आहे. " बिदूर ( शिंदे ) देशी आल्यापासून नबाबाशी हेंच संधान चालविले आहे जे. बेदर सरकार चौथाई तुम्हास श्रीमंताकडून देववितो. तुम्ही आमच्या लक्षात असावें. यातील आशय येथील कारभारी यांस स्वस्थांनीं बसवून दिल्लीस आपण ( शिंद्यांनीं ) कारभार केला तसा येथें श्रीमंताशीं आपण करावा ही गरमी आहे. या संधानावरहि नबाबाची मसलत उपस्थित केली आहे. काय धडते पहावे " ( खरे ९—३६६४ ) निजाम व शिंदे यांच्या या कारस्थानामुळें पेशव्यांच्यां निजामावरील स्वारीच्या तयारीत एक मोठे संकट उभेंराहिलें. यावेळीं हरीपंत प्रकृतीनें आजारी होते. नानालाहि मोठें संकटच प्राप्त झालें. नानाच्या विश्वासाचे परशुरामभाऊ हे यावेळीं पुण्यास होते. शिंदे कोणच्यावेळीं काय करतील याचा भरवसा नव्हता. अर्थातच परशुरामभाऊंनीं पुणें सोडून कोठें जाऊं नये असा आग्रह नानांनीं धरला. या संबधानें परशुरामभाऊचे वडील पुत्र रामचंद्र आपा मिरजेच्या बाळासाहेबांस लिहिलेल्या पत्रांत खालीलप्रमाणें लिहितात. " ते दिवशीं संकट चतुर्थीचें उपोषण होतें. वडील ( परशुराम भाऊ ) श्री चिंतामणीचें दर्शनास थेऊरास जाणार होते. स्वारी तयार होऊन उपाहारकरून प्रहर दिवसापूर्वी चालते व्हावें इतक्यांत मुख्य लेखकांचा (नानाचा) निरोप आला. जे " परिछिन्न जाऊं नये. यांची (शिंद्याची) नजर ठीक दिसत नाहीं. वडिली विसोपंताबरोबर सांगून पाठविलें जें, हें चखोट नव्हे. स्वारी तयार झाली. सायंकाळास देवदर्शन घेऊन येतो. न गेलों असतां लौकीक वाईट दिसेल. असे दोन तीन वेळां निरोप झाले शेवट न जावें ऐसें झालें. आणि गेले नाहींत" (खरे ९–३६३३) शिंद्याच्या या राजकारणाची नानाला मोठी विवंचना वाटत होती- पण परशुरामभाऊना मात्र त्याचे फारसें कांहीं वाटत नव्हते. भाऊ लिहितात " श्रीमंताचें पुण्य विचित्र आहे ते पक्षी कांहीं

घडणार नाहीं. रा. नानाचा व शिंद्याचा ऋणानुबंध चांगला ते ते स्वच्छतेनें आहेत. तेपक्षीं सर्वहि नीटच होईल. वाकडें व्हावयाचें नाहीं. उगीच आभाळें येतात जातात असा प्रकार आहे. ( खरे ९-३६३२ ) वरील उताऱ्यांत लिहील्याप्रमाणें "वाकडें व्हावयाचें नाहीं उगीच आभाळें येतात जातात" हें परशुरामभाऊचें निदानच शेवटीं खरें ठरलें व निजाम तोंडघशी पडला. निजाम व शिंदे एकहोऊन नानावर उलटण्याचें कारस्थान निजामानें केलें खरें व त्याकरतां निजामानें शिंद्याला लांचहि दिली. पण निजाम-शिंद्यांच्या कारस्थांनीं बुद्धीची मजल नानाच्या बुद्धी पुढें जाणारी नव्हती. नानांनीं हा डाव ओळखून शिंद्याला निजामाच्या कारस्थानांतून फोडण्याचा उद्योग आरंभला व तो यशस्वीहि झाला. येऊन जाऊन शिंदे नाना विरूद्ध अडून बसले होते त्याचें कारण त्याना नानाकडून आपले कांहीं मुद्दे उगवून घ्यावयाचे एवढेंच होते. नानांनीं हें ओळखून शिंद्याचे सर्व मुद्दे कबूल केले व हरीपंत फडक्यांच्या मध्यस्थीनें शिंद्याशी समेट करून निजामाविरूद्ध व्हावयाच्या स्वारींतच शिंद्याला सामील करून घेतलें. असा प्रकार झाल्यामुळें शिंद्याच्या सहाय्यानें निजाम पुण्यावर स्वारी करणार हें जें भय पुण्याच्या दरबारला उत्पन्न झालें होतें याच्या ऐवजीं आतां नाना व शिंदे एक होऊन उलट निजामावरच होणाऱ्या स्वारीचा देखावा दिसू लागला. पण मराठ्यांच्या दुर्दैवानें निजामावर होणाऱ्या या स्वारीला रंगरूप येण्यापूर्वीं पाटीलबावा महादजी शिंदे हे ता. १२ फेब्रुवारी १७९४ रोजीं नवज्वराच्या विकारानें एकाएकीं मृत्यु पावले. पाटील बावाच्या मृत्यूमुळें मराठी राज्याची जी हानी झाली ती पुढें कधींच भरून निघाली नाहीं.*

*( टीपः- नाना व महादजी यांच्या आपसातील फुटीचा फायदा इंग्रजानाहि घेतां आला नाहीं. असें सर जॉन शोअरनेच पुना रे रेकॉर्ड मधील एका पत्रात लिहीलें आहे ( P. R. C. 2-210 ) जेथें इंग्रजांची डाळ शिजली नाहीं. तेथें निजामाची दाद तरी कशी लागणार ? कै. खरे शास्त्री यांनीं याबाबतीत आपल्या नाना फडणीसाच्या चरित्रात खालीलप्रमाणें लिहीलें आहे 'दोघामध्यें वारंवार मतभेद उत्पन्न झाले, होते दोघेहि ×

शिंद्याजवळ केलेलें निजामाचें कारस्थान फसलें तेव्हां निजामानें आणखी एक उपाय करून पहाण्याचें ठरविलें. हा उपाय म्हणजे आपल्या दरबारचा एक वकीळ पुणें दरबारात मध्यस्थीकरतां पाठविणें हा होय

× वर्दळीवर येत. शिंद्याच्या बाजूनें खूपशी गडबड होई त्यामुळें या मतभेदाचा बभ्राहि अतीशय होत असे. परंतु इतकें होऊनहि या यादवीचा शत्रूला मात्र कोणताच फायदा मिळत नसे बुद्धिच्या जिवंतपणामुळें मतभेद उत्पन्न होत. परंतु ते कीतीहि तीव्र झाले तरी प्रखर राष्ट्राभिमानामुळें त्याना औचित्याची मर्यादा ओलांडून पलीकडे जाववत नसे. "नानाचा व माझा भाऊपणा. फडणीशी माझी आणि सरदारी नानाची,' असे शिंदे वारंवार म्हणत असत. या भाऊपणांच्या कल्पनेत नाना व शिंदे या मधील तंट्याचें बीज साठविलेलें आहे." (नानाचें चरित्र पान १५३) अशा या दोन धूर्त व राष्टभिमानी पुरुषांपैकीं एकाला म्हणजे शिंद्याला हाताशीं धरून नानावर मात करण्याचा निजामाचा उद्योग हास्यास्पद होता यांत शंका नाही. व शेंवटीं तो तसाच ठरला. शिंद्यानें निजामाजवळून लांच खाऊननाना विरुद्ध कारस्थान करण्याचा मोठा आव आणला होता, ही गीष्ट मात्र खरी. याबाबतीत खरे संग्रहातील उतारे जेवर दिले आहेत त्यानां पोषक अशी बरीच माहिती आतां पुना रे. रेकॉर्डमध्यें उपलब्ध झाली आहे. निजामाने शिंद्याला दिलेली लांचाची रक्कम खरे संग्रहांत एका पत्रांत २५ लाख आढळते (खरे ९–३६२८) आणि दुसऱ्या एका पत्रांत ती३२ लाख आढळते (खरे ९–३६३०) पुना रे. रेकॉर्डमध्यें ही रक्कम ३० लाख दिलेली आहे. (P. R. C. ४–२२) ही लांच घेऊन महादजी नानावर उलटणार कीं काय अशी धास्ती त्यावेळीं पुणें दरबारला वाटत होती हे खरें महादजीच्या महत्वाकांक्षेसंबंधानेंहि पूनारे. रेकॉर्ड मध्यें अनेक पत्रें छापलीं आहेत. महादजीला पुणें दरबारांत महत्वाचें स्थान पाहिजे होतें (P. R. C. २–५९) त्याचा धाकट्या बाजीरावाकडे कल होता. धाकट्या बाजीरावाला सवाई माधवरावाचा दिवाण नेमून त्याचा नायब दिवाण आपण व्हावें अशी खटपटहि महादजीनें केली होती (P.R.C.२–५८) महादजीला सत्तेचा अभिलाष होता§

मीरअलम नांवाच्या एका प्रतिष्टित गृहस्थाला निजामानें पुण्यास तडजोड करण्याकरतां पाठविलें. पण हें करण्यात निजामाचा हेतु प्रामाणीक होता असें मात्र नव्हे कारण निजामानें या वकीलाला पुणें दरबारशीं कोणत्याहि

§ त्याला पेशव्याजवळ वर्चस्व पाहिजे होतें (P. R. C. २–७०) अणि उत्तर हिंदुस्थानात त्याला पेशव्याकडून सर्वाधिकार पाहिजे होता. (P. R. C.२–२२३) वगैरे हकीगत पुना रे. रेकॉर्ड मध्यें विस्तृतपणें आली आहे ती सर्व खरे संग्रहातील पत्राना पोषक अशीच आहे. पण महादजीनें हा सर्व देखावा नानाला भेडसवण्याकरतांच केला होता. आपण निजामाला मिळणार हें कळतांच नानानें आपला देण्या घेण्या संबंधानें पुणें दरबारजवळ असलेला तंटा मिटवावा हेंच महादजीचें मुख्य धोरण होतें, आणि नानानेंहि हें शिंद्याचें धोरण ओळखून त्यानें पुणें दरबाराला सादर केलेलें गेल्या ८–१० वर्षाचें सर्व हिशोब मान्य करून महादजीजवळ मिटतें घेतलें. असें झाल्यावर निजामाची लांच खाऊनहि शिंद्यानें निजामाला टांग दिली, निजामाजवळ झालेल्या कारस्थाना संबधाचें सर्व कागदपत्र महादजीनें नानाला दाखविलें आणि देण्याघण्याचा पुणें दरबार जवळचा तंटा मिटल्यावर आपल्या इतर मागण्या मागें घेतल्या, ही सर्व हकीगत पुणें दरबारी असलेला इंग्रजांचा वकील मॅलेट यानें एका पत्रांत सविस्तर आणि मार्मिक अशी लिहीली आहे (P. R. C, ४–९७ अशा तऱ्हेनें या कारस्थानांत निजाम तोंडघशी पडल्यामुळे इंग्रजांच्या या वकीलाला फारच वाईट वाटलें व निजामानें शिंद्याला लांच दिली ती जर दुसऱ्या कोणाला दिली असती तर त्याचें काम झालें असतें असें उदगार काढलें या बाबतींत मॅलेटनें लिहीलेल्या पत्रातील मजकूर महत्वाचा असल्यामुळें त्यातला एक उत्तारा खाली दिला आहे.

"I am persuaded that had the Nizam spent half the money skilfully among the Sikhs and the Northern Rajas that he so foolishly threw away on Mahadji Shindia, he might have stirred up a flame in the north that would have endangered the Fabric of the Maratha power." (P. R. C. 4-117)

तात्पर्य महादजीला हाताशीं धरून नानाला गोत्यांत आणण्याचा जो प्रयत्न निजामानें केला तो वर दाखविल्याप्रमाणें निजामाच्या आंगलट आला.

शिंद्याजवळ केलेलें निजामाचें कारस्थान फसलें तेव्हां निजामानें आणखी एक उपाय करून पहाण्याचें ठरविलें. हा उपाय म्हणजे आपल्या दरबारचा एक वकीळ पुणें दरबारात मध्यस्थीकरतां पाठविणें हा होय

---

× वर्दळीवर येत. शिंद्याच्या बाजूनें खूपशी गडबड होई त्यामुळें या मतभेदाचा बभ्राहि अतीशय होत असे. परंतु इतकें होऊनहि या यादवीचा शत्रूला मात्र कोणताच फायदा मिळत नसे बुद्धिच्या जिवंतपणामुळें मतभेद उत्पन्न होत. परंतु ते कीतीहि तीव्र झाले तरी प्रखर राष्ट्राभिमानामुळें त्याना औचित्याची मर्यादा ओलांडून पलीकडे जाववत नसे. "नानाचा व माझा भाऊपणा. फडणीशी माझी आणि सरदारी नानाची,' असे शिंदे वारंवार म्हणत असत. या भाऊपणांच्या कल्पनेत नाना व शिंदे या मधील तंट्याचें बीज साठविलेलें आहे." (नानाचें चरित्र पान १५३) अशा या दोन धूर्त व राष्टभिमानी पुरुषांपैकीं एकाला म्हणजे शिंद्याला हाताशीं धरून नानावर मात करण्याचा निजामाचा उद्योग हास्यास्पद होता यांत शंका नाही. व शेंवटीं तो तसाच ठरला. शिंद्यानें निजामाजवळून लांच खाऊननाना विरुद्ध कारस्थान करण्याचा मोठा आव आणला होता, ही गोष्ट मात्र खरी. याबाबतीत खरे संग्रहातील उतारे जेवर दिले आहेत त्यानां पोषक अशी बरीच माहिती आतां पुना रे. रेकॉर्डमध्यें उपलब्ध झाली आहे. निजामाने शिंद्याला दिलेली लांचाची रक्कम खरे संग्रहांत एका पत्रांत २५ लाख आढळते (खरे ९-३६२८) आणि दुसऱ्या एका पत्रांत ती३२ लाख आढळते (खरे ९-३६३०) पुना रे. रेकॉर्डमध्यें ही रक्कम ३० लाख दिलेली आहे. (P. R. C. ४-२२) ही लांच घेऊन महादजी नानावर उलटणार कीं काय अशी धास्ती त्यावेळीं पुणें दरबारला वाटत होती हे खरें महादजीच्या महत्वाकांक्षेसंबंधानेंहि पूनारे. रेकॉर्ड मध्यें अनेक पत्रें छापलीं आहेत. महादजीला पुणें दरबारांत महत्वाचें स्थान पाहिजे होतें (P. R. C. २-५९) त्याचा धाकटचा बाजीरावाकडे कल होता. धाकट्या बाजीरावाला सवाई माधवरावाचा दिवाण नेमून त्याचा नायब दिवाण आपण व्हावें अशी खटपटहि महादजीनें केली होती (P.R.C.२-५८) महादजीला सत्तेचा अभिलाष होता§

मीरअलम नांवाच्या एका प्रतिष्टित गृहस्थाला निजामानें पुण्यास तडजोड करण्याकरतां पाठविलें. पण हें करण्यात निजामाचा हेतु प्रामाणीक होता असें मात्र नव्हे कारण निजामानें या वकीलाला पुणें दरबारशीं कोणत्याहि

§ त्याला पेशव्याजवळ वर्चस्व पाहिजे होतें (P. R. C. २–७०) अणि उत्तर हिंदुस्थानात त्याला पेशव्याकडून सर्वाधिकार पाहिजे होता. (P. R. C.२–२२३) वगैरे हकीगत पुना रे. रेकॉर्ड मध्यें विस्तृतपणें आली आहे ती सर्व खरे संग्रहातील पत्राना पोषक अशीच आहे. पण महादजींनें हा सर्व देखावा नानाला भेडसवण्याकरतांच केला होता. आपण निजामाला मिळणार हें कळतांच नानानें आपला देण्या घेण्या संबंधानें पुणें दरबारजवळ असलेला तंटा मिटवावा हेंच महादजीचें मुख्य धोरण होतें, आणि नानानेंहि हें शिंद्याचें धोरण ओळखून त्यानें पुणें दरबाराला सादर केलेलें गेल्या ८–१० वर्षाचें सर्व हिशोब मान्य करून महादजीजवळ मिटतें घेतलें. असें झाल्यावर निजामाची लांच खाऊनहि शिंद्यानें निजामाला टांग दिली, निजामाजवळ झालेल्या कारस्थाना संबधाचें सर्व कागदपत्र महादजीनें नानाला दाखविलें आणि देण्याघण्याचा पुणें दरबार जवळचा तंटा मिटल्यावर आपल्या इतर मागण्या मागें घेतल्या, ही सर्व हकीगत पुणें दरबारी असलेला इंग्रजांचा वकील मॅलेट यानें एका पत्रांत सविस्तर आणि मार्मिक अशी लिहीली आहे (P. R. C. ४–९७ अशा तऱ्हेनें या कारस्थानांत निजाम तोंडघशी पडल्यामुळे इंग्रजांच्या या वकीलाला फारच वाईट वाटलें व निजामानें शिंद्याला लांच दिली ती जर दुसऱ्या कोणाला दिली असती तर त्याचें काम झालें असतें असें उदगार काढलें या बाबतींत मॅलेटनें लिहीलेल्या पत्रातील मजकूर महत्वाचा असल्यामुळें त्यातला एक उत्तारा खाली दिला आहे.

" I am persuaded that had the Nizam spent half the money skilfully among the Sikhs and the Northern Rajas that he so foolishly threw away on Mahadji Shindia, he might have stirred up a flame in the north that would have endangered the Fabric of the Maratha power." (P. R. C. 4–117)

तात्पर्य महादजीला हाताशीं धरून नानाला गोत्यांत आणण्याचा जो प्रयत्न निजामानें केला तो वर दाखविल्याप्रमाणें निजामाच्या आंगलट आला.

तऱ्हेचा लेखी कायम स्वरूपाचा करार करण्याचा अधिकार दिला नव्हता. हा वकील पाठविण्यात निवळ कालहरण करण्यापलीकडें निजामचा दुसरा कोणताहि हेतु नव्हता अर्थात या वकीलाला कोणत्याहि तऱ्हेचा महत्वाचा अधिकार नसल्यामुळें पुणें दरबारशीं त्याच्या होणाऱ्या वाटाघाटीना फारसा अर्थ नव्हताच. पण निजामानें वकील मध्यस्ती करता पाठवितो अशी मागणी केल्यामुळें पुणेंदरबारने ती मान्य केली इतकीच. मीरअलमच्या आगमनाचा फायदा घेऊन निजाम मराठ्यांच्या या वादात आपलें घोडें पुढें दामटावें. असा उद्योग इंग्रजांचा वकील मॅलेट करीतच होता. पण नानाच्या धुर्ततेमुळें मॅलेटचें या प्रकरणात काहीहि जमेना. नानाची व मीरअलमची भेट होण्यापूर्वीच मीरअलमनें पुण्यास आल्यावर आपल्यालाच पहिल्यानें भेटावें अशी मॅलेटनें खटपट केली. पण याबाबतींत नानानें जास्त दक्षता घेऊन ही भेट होऊं दिली नाही. *

नानाची व मिरअलमची भेट झाल्यावर मिरअलम मॅलेटला भेटला मिरअलमची आधीच भेट घेण्यांत मॅलटचा हेतु असा होता कीं मीरअलमनें इंग्रजाच्या मध्यस्थिीची सूचना पेशव्यांना करावी पण इंग्रजांच्या मध्यस्थीला पेशव्यांची मान्यता नव्हती हे मिरअलम समजून होता निजामाचा दिवाण मशीरउल्मुक याच्या बेजबाबदार वागणूकीमुळें मीरअलमचें काम मोठेंच कठीण होऊन बसलें होतें. पेशव्याशी रीतसर बोलणें करण्यांसारखा निजा-

---

*(टीपः– या प्रकरणांसंबंधानें मॅलेटनें असें लिहीलें आहे कीं नानाची मिरअलमशीं भेंट होण्यापूर्वीच मिरअलमची भेंट घेण्याचे आपण ठरविलें व त्याप्रमाणें भेटीची वेळहि नक्की केली पण नानाला हें समजतांच त्यानें पेशव्याचें आमंत्रण मीरअलमला त्याचवेळीं भेटण्या संबधानें दिले. अर्थातच पेशव्याचें आमंत्रण आल्यामुळें मीरअलमने मॅलेटबरोबर होणारी भेट रद्द केली इतके झाल्यावर नानानें भेटीचा वेळ बदलला व पेशव्याची भेट न होता नानाच मीरअलमला भेटला. नानानें "ट्रीक" करून मिरअलमची व आपली भेट मुद्दाम होऊ दिली नाहीं असें मॅलेटनें लिहीलें आहे. P. R. C. 4-95 )

ग्रंथ ... इ.५९४



माच्या बाजूनें कांहींच मुद्दा नव्हता अशा अडचणीच्या प्रसंगांत मीरअलम पुणें दरबारांत नुसते दिवस मोजीत बसला होता. मीरअलमच्या या सर्व अडचणीचा उहापोह त्याची व मॅलेटची जी भेट झाली त्यात झाला होता. यावरून पेशव्यांजवळचें हें भांडण योग्य तडजोडीनें मिटण्यासारखें नाहीं हें मिरअलमला कळून चुकलें होतें. *

तात्पर्य मीरअलम पुढें असे पेंच असल्यामुळें त्याच्या शिष्टाईचा कांहीं परिणाम पुणें दरबारवर होईल अशी आशा नव्हती अशास्थीतींत इंग्रजांनीं मध्यस्थी करून निजाम-मराठयाचें हें भांडण मिटवावें अशीही खटपट निजामानें चालविली होती. पण इंग्रजांचें म्हणणें या बाबतींत असें होतें कीं निजाम व पेशवे या दोघानी आमच्याकडे विनंती केल्यास मध्यस्त

* (टीप:-मॅलेटची व मिरअलमची जी भेट झाली होती त्याची हकीगत मॅलेटने एका पत्रांत सविस्तर लिहिली आहे. या पत्रात पेशव्याजवळ बोलणें करण्यांत किती पेच आहेत याची सविस्तार हकीगत मीरअलमनें मॅलेटला सांगितली ती मॅलेटनें खुलासेवार लीहिली आहे. हरीपंतादेखत निजामाचा दिवाण मशीरउलमुक यानें नानाची नींदा केली ही गोष्ट वाईट झाली, मशीरउलमुक यानें यादगीरच्या नानाबरोबर झालेल्या तहाच्या अटी मोडल्या हें बरें झालें नाहीं इत्यादि हकीगत सांगून शेवटी मिरअलमनें असें म्हटलें आहे. कीं मशीरानें नानाला उलथून पाडण्याकरतां महादजीजवळ जें कारस्थान केलें त्याचा सर्व पत्रव्यवहार महादजींनें मरणापूर्वीं नानाच्या स्वाधीन केल्यामुळें हा पत्रव्यवहार नाना पुढें आणील तर त्याला निजामाच्या बाजूनें कांहीं उत्तर देतां येणार नाहीं, अशा रितीनें नानाजवळ वाटाघाटी करण्यामध्यें केवढा मोठा पेंच आहे याची उद्वेगजनक कथा मिरअलमनें मॅलेटला सांगितली आहे (P.R.C.४-९९) मराठी कागद पत्रांत निजामानें नाना व सवाईमाधवराव वगैरेची सोंगें आणून भरदरबारांत पेशव्यांचा वकील गोविंदराव काळे याच्या देखत यांची थट्टा केली वगैरे हकीगती आहेत त्या खऱ्या असल्या पाहिजेत असे पुना रे. रेकॉर्ड मधील वर उल्लेखकेलेल्या पत्रावरून स्पष्ट होते)

म्हणून आम्ही भांडण तोडूं (P. R. C.४–८१ ) पण इंग्रजांकडे मध्यस्थीची याचना करण्याचें पेशव्याना कांहीं कारण नव्हते. त्यामुळें इंग्रजांच्या मध्यस्थीची ही सूचना नानांनीं एकदम धुडकावून लावली. (P. R. C.४–१०१)❁

निजामानें मराठयांची स्वारी चुकवण्याचें सर्व प्रयत्न थकल्यासारखे झाले. तरी त्यानें अजून आशा सोडली नव्हती. सन १७९४ सालांत महादजी शिंदे व हरीपंत फडके हीं दोन मराठेशाहीतील नर रत्नें हरपली होती. आतां पुण्याच्या दरबारांत नानाच्या खालोखाल परशुरामभाऊ हेच काय ते वजनसरदार होते. परशुराम भाऊची व निजामाची जानपछान होती तेव्हां भाऊच्या मध्यस्थिनें हें प्रकरण मिटल्यास पहावें अशा आशेनें निजामानें भाऊशी पत्रव्यवहार सुरू केला. निजामाच्या या पत्रव्यवहाराला भाऊनीं मोठे समर्पक आणि सविस्तर असें उत्तर दिलें व त्यांत निजामाला कळवलें कीं पेशवे–निजामाचें हें भांडण तडजोडीनेंच मिटवणें योग्य आहे. निजामाचें व पेशव्याचें पूर्वीपासून जे संबंध आहेत ते तसेंच चालविणें निजामाला ईष्ट आहे. नारायणरावाच्या खुनानंतर निजामानें पेशव्याना केलेली मदत पेशव्याच्या लक्षांत आहे. आणि म्हणूनच निजामाशीं तडजोड करण्यास पेशवे तयार असतां पूर्वापार चालत आलेलें संबध विघडविणें निजामाला योग्य नव्हे. तरी निजामानें हें प्रकरण तडजोडीनें मिटवावें. निजामाला भाऊंनीं आणखी असेंहि कळवलें कीं, आपण पेशव्याचें पुरातन नोकर असून आपली कामगिरी जरी मुख्यतः लष्करी स्वरूपाची आहे तरी राज्यकारभाराच्या महत्वाच्या बाबतींत पेशवे आमचेहि मत घेतल्याशिवाय रहात नाहींत. आणि म्हणून आपण हें प्रकरण तडजोडीनें मिटवणेंच योग्य आहे असें जें मी आपणास कळवीत आहे तें योग्य माहितीच्या आधारेंच कळवीत

---

❁ (टीपः–सर जॉन शोअर मध्यस्थी करण्यास तयार होते. पण पेशव्याना मध्यस्थीची जरूर नव्हती याचीही जाणीव त्याना होती या बाबतींत ते म्हणतात ' They (Marathas) have every advantage over him (Nizam) both from the wisdom of their Councils and Superiority of actual force ' (P. R. C. 4–81)

आहे, इतके करूनहि शेवटीं तडजोड नच झाली तर मला माझ्या धन्याच्या हुकुमाप्रमाणें वागणेंच प्राप्त आहे. *

परशुरामभाऊजवळ झालेल्या पत्रव्यवहारांत निजामानें हें प्रकरण तडजोडीनें मिटवावें असा भाऊंनीं सल्ला दिला. भाऊंची तडजोड म्हणजे अर्थात पेशव्यांचे जें योग्य देणें निघेल तें निजामानें देऊन प्रकरण मिटवावें. अशा स्वरूपाची होती. पण निजामाला हें देणें द्यावयाचें नसल्यामुळें भाऊची तडजोडीची भाषा त्याला मान्य नव्हती निजामाचा दिवाण मशीर यानें शेवटीं निजामाला असा सल्ला दिला कीं, जवळ जवळ तीन कोटीची रक्कम पेशव्यांना देण्यापेक्षा त्याच रकमेच्या जोरावर सैन्याची उभारणी करून पेश-

---

*( टीपः- निजामानें भाऊंशीं पत्रव्यवहार केला ही हकीगत पुना रे. रेकॉर्ड मध्यें P. R. C. ४-१४९, १५१, १५८, १६६, या पत्रांत आहे. भाऊंनीं निजामाला लिहीलेलें सविस्तर पत्र P. R. C. ४- १५१ हें आहे. हें पत्र फार विस्तृत असून त्यांत शेवटीं तडजोड नच झाली तर आपल्याला पेशव्यांच्या हुकुमाप्रमाणें. वागावें लागेल असें भाऊंनीं लिहीलें आहे. या बाबतींत भाऊचें उग्दार खालील प्रमाणे आहेत.

" My occupation being that of a military chieftain, I know that my duty is to sacrifice my life in executing the order of my master. " (P. R. C. ४-१५१) भाऊच्या मध्यस्थीनें तडजोड व्हावी म्हणून विचार विनिमय करण्याकरतां निजामानें कुतबअल्ली बेग नांवाचा इसम भाऊकडे पाठविण्याची हकीगत एका पत्रांत आहे. (P. R. C. ४-१५८) आणि दुसऱ्या एका पत्रांत निजामाचा वकील मशीर उलमुल्क यानेंहि भाऊंजवळ पत्रव्यवहार सुरू केला होता असा उल्लेख आहे. ( P. R. C. ४-१६६ )

च्यांशीं लढाच द्यावा. निजामाला हें धोरण मान्य झाल्यावर शेवटीं प्रकरण लढाईवरच आलें. ✿

तडजोडीच्या सर्व वाटाघाटी फिसकटल्यावर लढाईची तयारी करणें प्राप्त आले. लढाई देण्याचा निश्चय ठरल्यावर पेशव्यांतर्फे सैन्याची जमवाजमवीचेकाम झपाट्यानें सुरू झालें. दौलतराव शिंदे यावेळीं पुण्यांत होते पण त्याजी फौज व फलटणांचे कंपु हिंदुस्थानांत होते ते आणण्या विषयीं पेशव्यांनीं शिंद्यास हूकूम केला. शिवाय नागपूरकर भोसले, होळकर, रास्ते, पटवर्धन, विंचूरकर, मालेगांवकर, राजेबहादुर, घोरपडे, पाटणकर, निंबाळकर, प्रतिनिधी वगैरे अनेक सरदारास आपापल्या फौजांची तयारी करण्याकरतां पेशव्यांचे हूकूम गेलें. मि. बॉइड नांवाचा एक इंग्रज अंमलदार नोकरीस ठेऊन त्याजकडून कांहीं नवीन फलटणाची उभारणी करण्याचाहि उपक्रम पेशव्यांनीं केला. शिंद्याची पांच सात फलटणें पुण्यास होती. ती डिबॉइनच्या नजरेखाली तयार झाली असल्यामुळें त्याचें शिक्षण उत्तम प्रकारे झाले होते. या फलटणाची कवाईत शिंद्यांनीं गुलटेकडीजवळ करून दाखविली. ही कवाइत पाहून श्रीमंत व नाना फडणवीस फार खूष झाले

खुद्द श्रीमंताची स्वारी नानासुद्धा या मोहिमेवर निघावयाची होती त्यावेळीं बाजीराव साहेब आनंद वल्लीस होते. स्वारीवर निघण्यापूर्वी त्यांचा पक्का बंदोबस्त करणें पेशव्यास जरूर वाटलें. कारण बाजीराव कोणत्यावेळीं काय मसलत करतील याचा नेम नव्हता. स्वारी सुरू झाल्यावर त्यानीं

---

✿ (टीपः- निजामानें व त्याच्या दिवाणानें तडजोडीचे केलेले सर्व उपाय थकल्यावर निजामाच्या दिवाणानें शेवटचा एक रामबाण उपायहि करून पाहिला. कोणत्याहि गोष्टीला नाना मान्यता देत नाहींत. अशी निजामाच्या या दिवाणाची समजूत झाल्यामुळें त्यानें नानावर मारेकरी घालण्याचाहि प्रयत्न केला. नानावर घातलेल्या या मारेकऱ्याची हकीगत खरे भा ( ९-३६३९ मध्यें आहे. )

कांहीं गडबड करूनये म्हणून बाजीराव, चिमाजींअप्पा व त्याचे दत्तक बंधु अमृतराव यास आनंदवल्लीहून काढून पक्या बंदोबस्तानें शिवनेरीच्या किल्यावर ठेवण्यांत आले.

पेशव्यांच्या या प्रचंड मोहिमेचा मुख्यभर परशुराम भाऊवर होता. कारण महादजी शिंदे व हरीपंत फडके हे दोन्ही वीर या वेळीं मृत्यू पावले होते.*

---

*( टीपः- भाऊच्या लायकी संबधानें जरी कोणालाच शंका नव्हती तरी हरीपंत मृत्यूच्या दारांत धरणें धरून बसला असता कदाचित् तो मेला तर मराठ्याना लढाई चालविणे जरा जड जाईल असें उग्दार इंग्रजानीं काढले आहेत. याबाबतींत इंग्रजाचा वकील खालील प्रमाणें म्हणतो.

" Should however the sickness of Haripant terminate in his demise which from the nature of it, his age and broken constitition is far from unlikely it will be, I think some check on this court ( Poona court ) for it would not easily find a commander so desirable in every expectation for an expedition against His Highness ( Nizam ) more especially when at the same time it would lose the benefits in its counsels of Haripanta's advice and experience which have of late years had considerable weight, particularly of Military Subjects, " (P. R. C. ४-६९)

वरील पत्र सन १७९४ च्या मे महिन्यातले आहे. थोड्याच दिवसांनीं म्हणजे जून महिन्याच्या १९ तारखेस हरीपंत वारले. हरीपंत वारल्यावर नानांनीं तात्काळ परशुरामभाऊंना पुण्यास बोलाविलें. भाऊंची योग्यताहि इंग्रज जाणून होते. इंग्रजांचा वकील मॅलेट भाऊ संबंधानें खालील प्रमाणें लिहीतो.

" The force of Patwardhan family led by Parshurambhau is entitled to much grater respect and is also summoned on the present occasion " (P. R. C. ४-८९)

हरीपंताच्या मृत्यूनंतर नानांनीं परशुरामभाऊना पुण्यास येण्यासंबंधानें तात्काळ निमंत्रण पाठविलें. भाऊ पुण्यास येई पर्यंत सन १७९४ चा नोव्हें-बर महिना उजाडला. भाऊबरोबर चिंतामणराव सांगलीकर, रघुनाथराव कुरुंदवाडकर, जनोबा सुभेदार यादवाडकर, विठ्ठलराव धोंडदेव मिरजकर, सदाशिवराव मंगळवेढेकर, व आणखी इतर भाऊबंद मंडळी स्वारीत हजर झाली. भाऊ पुण्यास आल्यापासून त्यांची नानाजवळ लढाई संबंधानें सारखी खलबतें चालू होती. निजामहि लढाईची तयारी जोरानें करीत होता. नोव्हें-बरच्या ८ तारखेस निजामअल्ली यानें बेदर येथें छावणी दिली. व तो डेरे दाखल झाला. हें वर्तमान पुण्यास येतांच हजुरातीचे मुख्य सरदार बाबा फडके यांस शहराबाहेर डेरे देण्यास श्रीमंतांचा हूकूम झाला. हुजुरात जमा होऊ लागली. दौलतराव शिंदे याचाहि गोट शहराबाहेर उतरला. इतकें होण्यात आणखी एक महिना निघून गेला डिसेंबरच्या ८ तारखेस नाना डेरे दाखल झाले व खुद्द श्रीमंताची स्वारी डिसेंबरच्या १४ तारखेस डेऱ्यात येऊन राहिली. परशुरामभाऊ श्रीमंताबरोबरच होते. तुकोजी होळकराचा मुक्काम खानदेशांत थालनेंरास होता. तेथून होळकर निघाले ते पुण्यास येऊन पोचले. त्याच्या बरोबर दहा हजार फौज होती.*

गारपीर, वडगांव थेऊर वगैरे ठिकाणी श्रीमंताचा मुक्काम महिना दिड महिना झाला. नंतर सर्व लष्कर कुच करीत करीत नगरच्या रोखें वळलें. इतके होतें तो निजामअल्ली बेदराहून धारुरास येऊन तेथून परांड्यांच्या बाजूनें कुच करून येऊ लागला. त्याच्या लष्करापैकीं एका टोळीनें त्याबाजूचें प्रसिद्ध आणि पवित्र क्षेत्र जोगाईचें आंबे हें लुटून फस्त केलें. दुसऱ्या एका टोळीनें बारशी, वैराग पानगांव वगैरे गांवें लुटली.

* (टीप:— होळकर आल्यावर त्यांची व श्रीमंताची भेट झाली त्यावेळीं होळकराचीं फौज बेताचीच आढळली. या भेटीचें वर्णन परशुराम-भाऊंनीं खालील प्रमाणें केलें आहे. "फौजेंत जीव नाहीं. गवगवा भारी ऐकण्यांत येतो. येवढे सरदार भेटीच्या समयीं मनुष्य चांगले आढळलें नाहीं" (खरे ९ पा. ४७०४)

याप्रमाणें त्याच्या लष्कराचे आणखीहि कांहीं टोळचांनीं आजूबाजूच्या मराठी मुलखास उपद्रव देण्याचा सपाटा सुरू केला. मराठ्यानीहि तोडीस तोड म्हणून मोंगलाई मुलूख लुटण्याचें काम सुरु केलें. शत्रूच्या सैन्याचा रोख पाहून श्रीमंतांच्या फौजेनेहि नगराहून सीना नदी पर्यंत कूच केलें. याठिकाणीं हिंदुस्थानांतून शिंद्याची फौज आली ती पेशव्यांच्या लष्करांत सामील झाली. या फौजेंत कवाईती फलटणीचे कंम्पू होते. त्यावर अधिकारी जिवबादादा बक्षी होते. व त्यांच्या हाताखालीं मुसा पेरू (Perron) हा फ्रेंच अंमलदार होता. शिंद्याचें घोडदळ पंधरा हजार होते तें देवजी गवळी याच्या हाताखालीं होतें. नंतर थोडयाच दिवसांनीं रघोजी भोसले आपल्या फौजे-सह येऊन मिळाले. भोसले मिळाल्यानंतर पेशव्यांच्या फौजेची गणती सुमारे एक लाख तीस हजारावर गेली. शिवाय शिंदे, होळकर वगैरे सरदारांचें पेंढार सुमारे वीस हजार होतें ते निराळेंच.*

*(टीपः—या लढाईत पेशव्यांचे सैन्य ७३ हजार घोडेस्वार व ३८ हजार पायदळ आणि १९२ तोफा शिवाय १० हजार परशुरामभाऊचे मिळून एकंदर १ लक्ष २१ हजार मराठ्यांची फौज होती. अशी माहिती पुना रे. रे. कार्ड भाग ४ पान नं. १६७ मध्यें आहे. इतिहास-कार सरदेसाई यांनीं आपल्या रियासतीत हेस्टिंग्स फ्रेजरच्या ग्रंथावरुन या लढाईतील सैन्याची जी माहिती दिली आहे त्याच्याशीं रे. रेकार्ड मधील माहिती जुळती आहे. फ्रेजरच्या ग्रंथांत मराठ्यांची फौज, ८४ हजार घोडे स्वार ३८ हजार पायदळ व १९२ तोफा अशी माहिती आहे. रे. रेकार्ड मध्यें ७३ हजार घोडेस्वार दिले आहेत. पण परशुरामभाऊची १० हजार फौज निराळी सांगितली आहे. भाऊंचें सर्व घोडेस्वारच होते. ते जमेस धरले म्हणजे रे. रेकार्ड प्रमाणें ७३+१०=८३ हजार घोडेस्वार झाले. फ्रेंजरनें ८४ हजार घोडेस्वार दिले आहेत म्हणजे फरक फक्त १ हजाराचा आहे. फ्रेजरच्या ग्रंथात निजामाची फौज ४५ हजार घोडेस्वार ४४ हजार पायदळ आणि १०८ तोफा इतकी होती ¶

फौजेची जमवाजमव झाल्यावर मुख्य सेनापती कोणास नेमावयाचे हा विचार नाना पुढें होता. हुजुरातचे सेनापती हरीपंत हे मृत्यू पावले होते प्रसिद्ध सरदार महादजी शिंदे हेहि वारले होते. त्यांच्यानंतर हें कठीण काम संभाळणारे परशुरामभाऊ हेच हयात होते. भाऊंची नेमणूक करण्याकरतां

¶ अशी माहिती आहे. शिवाय अलीकडेच उपलब्ध झालेल्या खर्ड्याच्या लढाई संबंधाच्या वैद्य घराण्यांच्या अप्रकाशीत पत्रांत ही माहिती खालील प्रमाणें आहे. "जिवबादादा बरोबर २ कंम्पू व दहा हजा फौज, भोसले बरोबर तीस हजार फौज व तोफा बीस सरकारची फौज बाबा फडके वगैरे चाळीस पन्नास हजार, होळकर दहा हजार, भाऊ व रास्ते मिळोन सहा हजार नबाबाची फौज ४० हजार व पायदळ ३६ हजार." इंग्रजी व मराठी कागत पत्रातील ही माहिती ताडून पहातां मराठी कागद पत्रांत दिलेले आकडे जवळ जवळ १० ते १५ हजारांनीं कमी पडतात. मराठ्याचें लिहीणें इंग्रजांइतकें काटेकोर नसल्यामुळें इंग्रजी कागद पत्रांत दिलेले आकडेच बरोबर धरून चालण्यास हरकत नाहीं. पण इंग्रजी व मराठी या दोन्ही कागद पत्रांत निजामापेक्षां मराठ्यांची फौज जास्त होती हें मात्र स्पष्ट आहे. मराठ्यांनीं इंग्रजांची मध्यस्ती मान्य करून हें भांडण मिटवावें अशी इंग्रजांची इच्छा होती. पण इंग्रजांची मध्यस्ती नानानीं झिडकारल्यामुळें इंग्रजांचा जळफळाट झाला होता. मराठ्यांची अफाट सेना रणांगणावर दाखल होताच इंग्रजांचा हा जळफळाट इंग्रजांच्या वकीलानें खालील प्रमाणें व्यक्त केला. इंग्रजांचा वकील मॅलेट हा मराठ्यांच्या तयारी संबंधानें ग. ज. ला खालील प्रमाणें लिहीतो.

"From the attention which this court ( Poona court ) pays to its warlike preparation, it ( Poona court ) seems well acquainted with the axiom that the longest sword makes the best treaties." (P.R.C.४–११२) पुणें दरबारचें हें वर्णन सन १७९५ सालाचें आहे. पानिपतनंतर मराठ्यांच्या तरवारीचें पाणी खलास झालें असें म्हणणारांनीं पुण्याच्या दरबारी असलेल्या इंग्रजांच्या वकीलाचें हें मत पाहून आपलें मत तपासणें जरूर आहे.)

नानानें मोठा दरबार भरविला व भाऊस विनंती केली कीं, "स्वारीचें ओझें तुमचे शिरावर आहे. तुम्हीच साऱ्यात पोक्त. तुम्ही डोई दिल्याशिवाय पल्ला येणार नाहीं "*

मराठ्यांचें लष्कर ता. ६ मार्चच्या सुमारास विचरणा नदीवर फकीराबाद धानोरे येथें आलें. निजामअल्लीहि २०/२५ कोस पुढें आल्याचें वर्तमान आलें होतें. मराठ्यांनीं आपल्या सर्व लष्करापैकीं साठसत्तर हजार फौज निराळी-काढली व या फौजेनें एक मजल नेहमीं आघाडीस राहावें असें ठरलें या आघाडीच्या फौजेवर हरीपंताचे ज्येष्ट चिरंजीव बाबाफडके हे मुख्य सरदार होते.

निजामअल्लीकडून शेवट पर्यंत तहाचें टुमणें चालूच होतें. अगदी शेवटच्या घटकेला गोंविदराव काळया मार्फत निजामाचें बोलणें आलें त्यांत चौथाईची बाकी बतीस लक्षाची जहागीर परत देण्याबिषयीं मुद्दे होते. पण मशीर उलमुल्क यास कारभारातून काढण्यात निजाम तयार नसल्यामुळें या शेवटच्या बोलण्याचाहि कांहीं उपयोग झाला नाहीं. §

---

*(टीपः—ता. ६-३-१७९५ च्या खरे संग्रहातील एका पत्रांत भाऊकडे मुख्य सेनापतीचें काम आल्याचा उल्लेख आहे तो असा "सर्व मसलत लढाईची करणें श्रीमंत राजेश्री भाऊसाहेबाकडे जाहले बहूत उत्तम गोष्ट जहाली" ( खरे ९-३६०६) मराठे शाहीत यावेळीं भाऊएवढा पराक्रमी, पोक्त आणि अनुभवी असा दुसरा कोणीहि सरदार नव्हता. अर्थात भाऊंची मुख्य सेनापती म्हणून झालेली निवड योग्यच होती. पण भाऊच्या योग्यतेकडे लक्ष न देतां भाऊ ब्राम्हण म्हणून नानांनीं त्याची निवड केली अशा तऱ्हेची टीका जनरल नानासाहेब शिंदे यांनीं आपल्या 'मराठ्यांच्या प्रसिद्ध लढाया' या ग्रंथांत केली तो निराधार आहे हें सांगावयास नकोच.)

§(टीपः—खडर्याच्या लढाईसंबंधाच्या वैद्यघराण्यातील अप्रकाशीत संग्रहामध्यें एका पत्रांत श्रीमंताचा बेत सल्ला करण्याचा होता. पण " निजामाचा दिवाणदौला याचा बेत एकवेळ लढाईच द्यावी असा आहे " असा उल्लेख आहे. )

तडजोडीची शेवटची बोलणी फिसकटल्यावर निजाम मोहरीचा घाट उतरून खडर्यांच्या किल्यानजीक खैरा नदीवर येऊन उतरला (P. R. C. ४-१७४) खैरा नदी ओलांडून निजामाचा बेत परांड्याकडे जाण्याचा होता (P. R. C. ४-१७५,१७७) पण निजामाला परांड्याकडे जाऊं देऊ नये म्हणून मराठयाचीं बाबा फडक्याच्या हाताखालची आघाडीची फौज निजामाला अडविण्याकरतां पुढें आली. या फौजेबरोबर परशुरामभाऊहि आणखीं कांहीं फौज व तोफा घेऊन आघाडीवर आले व त्यांच्या देखरेखे-खालीच सर्व फौजेची हालचाल सुरू झाली. ह्या हालचाली होईपर्यंत मार्च महि-न्याची सहा तारीख आली. परशुरामभाऊ आघाडीच्या फौजेत दाखल झाल्यावर त्यांनीं वीस पंचवीस हजार स्वारांच्या खड्या फौजेसह घोडगांव, परगणें जामखेड येथें तळ दिला. नबाबाचें लष्कर तेथून तीन कोस होतें. म्हणून भाऊ आणखी दीड कोस पुढें जाऊन उभें राहिले. भाऊ पुढें जातांच निजामअल्लीनेंहि आपली फौज त्यांच्या मुकाबल्यास उभी केली. याच स्थळीं शिंदे व भोसले यांनीं येऊन परशुरामभाऊस मिळावें असा पूर्वसंकेत होता. ते आल्यावर नबाबाच्या गोटावर हल्ला व्हावयाचा होता. हल्ला व्हावयाचा हा दिवस शनिवार ता. ७-३-१७९५ ठरला होता. सायंकाळच्या सहा घटका दिवसपर्यंत भाऊंनीं वाट पाहिली पण ठरल्याप्रमाणें शिंदे वगैरे सरदार आले नाहींत. तेव्हां हल्ल्याचा बेत तहकूब करून भाऊ परत फिरले भाऊ परत फिरताच मोंगलांची फौज त्याच्या पाठीवर आली. भाऊ घोडगांवपर्यंत आले तों अस्तमान झाला. इतक्यांत दुसऱ्याबाजूनें शिंद्याची फौज आली तिनें मोंगलावर तोफांचा मारा सुरू केला. तेव्हां मोंगल फौज निघून परत आपल्या गोटास गेली. भाऊ घोड्यावर तशीच जिनें ठेवून रात्रभर मोंगलांच्या टेहाळणीवर उभेच होते. ता. १० मार्चला मोंगल आणखी एक कोस पुढें आला. परंतु मराठ्याकडून तोफांचा मारा सुरू होतांच त्याची प्रगती थांबली. मोंगलांच्या लष्कराभोवती मराठी फौजा थोड्या अंतरावर रात्रंदिवस टेहेळणी करीत उभ्या राहिल्या फाल्गुन व॥ पंचमी ता. ११-३-१७९५ रोजीं खडर्याची मोठी लढाई झाली. त्या

दिवशीं मोंगल कूच करून चालला असतां परशुरामभाऊंनीं त्याशी गांठ-घातली. भाऊबरोबर फडके शिंदे, होळकर, भोसले यांच्याहि फौजा व कवाईती पायदळ वगैरे सरंजाम होता. उभय पक्षांची सैन्यें युद्धास सज्ज होऊन उभी राहिली असतां परशुरामभाऊंपुढें एक लहानशी टेकडी होती तेथपर्यंत जाऊन टेहळणी करीत होते. इतक्यांत मोगलांकडील सरदार भारामल व असदअल्लीखान यांनीं अकस्मात परशुरामभाऊंवर चालून घेतलें. त्याठिकाणीं मोठी लढाई होऊन भाऊस जखमा लागल्या व पुष्कळ लोक ठार व जखमी झाले. भाऊं टेकडीपासून अर्धा कोस मागें हटले व त्याच टेकडीवर मोंगलांचे सरदार जागा कायम करून उभे राहिले हें पाहतांच मोंगलांची इतर फौज व मुसारेमुची पलटणें यांनीं भाऊच्या डाव्या बाजूस शिंदे होते त्यावर चाल केली. त्यावेळीं शिद्यांनीं मोंगल फौजेवर तोफांचा भयंकर भडीमार केला. त्याचवेळीं भोसल्यांकडून बाणाची सरबत्तीवर सरबत्ती रेमूच्या पलटणावर होऊं लागली तेव्हां रेमूची पलटणें मागें हटू लागली. पलटणें मागें हटतात हें पहातांच भाऊसमोर लढत असलेले असदअल्लीखान वगैरे सरदार पलटणाच्या कुमकेस जाऊं लागले. हे पहातांच भाऊंनीं हुजरात वगैरे आपली सर्व फौज त्यांवर उठविली "सरकारची चाळीस हजार तलवार उठली" तेव्हां असदअल्लीखानाचा पराभव होऊन त्याच्या फौजेची दाणादाण झाली. मागून रेमूची पलटणें व इतर मोंगली फौज याचीहि तीच दुर्दशा झाली. इतकें होते तो अस्तमान होऊन अंधार पडू लागला त्यामुळें मोंगलांच्या लष्करांत पराकाष्ठेची अव्यवस्था व तारांबळ होऊन तें लष्कर लुटलें गेलें. ही दशा होतांच निजाम-अल्ली घाबरा होऊन खडर्यांच्या गढींत शिरला. रात्रभर त्याच्या लष्कराची एकसारखी लुटांलूट सुरूच होती.

खडर्यांच्या लढाईचो वर्णनें देणारी अस्सल पत्रें ऐ. ले, संग्रहात अनेक छापलीं आहेत. त्यातून विशेष जबाबदार माणसांची म्हणजे परशुराम भाऊची व रघुनाथराव कुरुंदवाडकर यांची महत्त्वाची आहेत. त्यातून कांहीं उतारे खालीं देतों. परशुरामभाऊ आपल्या पत्रांत म्हणतात "काल छ. १९

सावानी बुधवारी प्रातः काळीं नबाबाच्या कुचाची बातमी आली. त्याजवरून आम्ही आपली फौजसुद्धां तयार होऊन गेलों. रा. बाबा फडके. व शिंदे होळकर भोसले याच्याहि फौजा तयार होऊन गेल्या. तों त्यांची गाठ पडली. त्यांचे बाहेर बुनगें चालत होते. तों आम्हीं जाऊन पुढें उभे राहिलों. शिंदे आमच्या डाव्या बाजूस होते इतक्यांत दोन प्रहरच्या सुमारास नबाबाकडील भारामल व असदअल्लीखान वगैरे सरदार अघाडीचे चालणार आम्हावर चालून आले त्यांची व आमची झटापट झाली. मला उजवे बाहुश्यावर व कपाळास तरवारीची जखम लागली. अगोदर दोन वार पटयावरील तटले. खोळंबा पट्याचा तुटला आहे. चि. रा. जनोबा सुभेदार यांस डाव्या हातावरील जखम आहे. चि. विठ्ठलराव धोंडदेव गोळी लागून ठार झाले. ईश्वर इच्छेस इलाज काय ? चिरंजीव, सरकार कामास आला. वृद्धापकाळी ती. रा. आप्पा यास दुःख जाले. होणारास उपाय नाहीं. माझी जखम हलकी आहे. काल रात्रीस बुनग्यात येऊन जखम टाक्यानें शिववून शेकविली. आज प्रातःकाळीं सडे स्वारीत आलो. इतक्यांत बातमी आली जे खासानबाब मोहरीचा घाट चढोन मध्य रात्रीस गेला. त्यावरून फिरोन सरकारच्या फौजा पाठीमागें गेल्या आहेत. बुनगे लुटलें. कालच्या लढाईची शर्थ झाली. प्रहर दिवसा पासोन हिरिन्या तिकडील व इकडील होत होत्या. त्याचा विस्तार मागाहून लिहून पाठवू वरकड सारी मंडळी खैर आहे. चि आपा, बाबा सारी मंडळी फौजा घेऊन गेले आहेत. चि. रा. सदाशिव भाऊ याचोहि भाल्याची जखम आहे. चि. रा. सदोबा जोशी यासहि जखम लागली आहे. आणी बहूत जखमी जहाले. नबाबाकडील फौजेचा मोड जाहला. रात्रीसच खासा नबाब मोहरीचा घाट चढले म्हणोन बातमी आहे. फौजा आज पाठीस लागल्या आहेत. लूट येत आहे. चिंतामणराव खांडीलकर ठार जहाला अस्थी मागाहून लावून देतो. लढाई मोठ्या शर्तीची जाहली. श्रीमंताचें पुण्य विचित्र मोठे यश आले. नबाबाची दौलत गारद व्हावयाचा रंग आहे. श्री इच्छे नुरुप घडेल तें खरें. नबाबाकडील भारामल रादानखान व वजीरखान वगैरे वगैरे पांच सात सरदार ठार पडले व हजार पावेतो माणूस

कामास आले. या उपर कांहीं बाकी नाहीं" ( खरे ९-३६०८ ) रघुनाथराव कुरुदंवाडकर यानें लढाईचें वर्णन खालीलप्रमाणें केलें आहे. "अपत्यें रघुनाथ नीळकंठ, विज्ञापना तागायत छ. २१ साबात शुक्रवार चार घटका दिवस सकाळचा मुक्काम घोडेगांव येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष वडील ( परशुरामभाऊ ) फौजसुद्धा सडे होऊन मुक्काम मजकूरी आल्यावर नबाब खडर्याचे नजीक मोहरीचा घाट उतरून मुक्काम करून होते. तेथें तलाव्यास एक दिवस गेले होते. तोफा नव्हत्या. त्यादिवशीं सायंकाळीं माघारीफिरावयाचा समय झाला तोफा नाहींत. शिंदे फौजासुद्धा नाहींत अशी बातमी नबाबनीं नेऊन खासा पुस्तगीरीवर राहून फौजा व त्याजकडील फिरंगी पलटणें यांनीं चालोन घेतलें व आम्हास दीड कोस माघारे सारिलें. वडीलांनीं घोडे-गांवावरच मुक्काम केला. दुसरे दिवशीं त्याचा मुक्क़ामच होता. तिसरे दिवशी कूच होऊन त्यांनीं दीडकोसाची मजल केली. चालत असतां वडिलानीं तोफा लावून मारगिरी केली. शिंद्याकडीलहि तोफा लाविल्या होत्या. विशेष कांहीं जाहले नाहीं. तेथून बुधवारी नबाबानीं कूच केल्याची बातमी येतांच. शिंदे फौज कंपुसुद्धा तयार झाले. वडीलहि फौजसुद्धां तयार होऊन गेले. एक टेकडी होती तेथें पहात उभे राहिले. नबाबाची रव चालली होती. इतक्यांत नबाबांनीं दोनटोळचा करून असदअल्लीखां वगैरे सरदार फौजसुद्धां वडिलांच्या मुकाबल्यास उभे राहिले. शिंद्याकडे फिरंगी व भारामल वगैरे सरदार होते. खासा नबाब मध्यें उभे होते. इतक्यांत शिंद्यांनीं तोफासुरू केल्या. त्याजवर फिरंगी नबाबाकडील वगैरे यांनीं तोफा लावून उभयतांची मारगिरी चालती जाहली. वडील उभे होते. त्याबाजूस नबाबाकडील सरदार होते. त्यांनीं दोन टोळचा करून पायदळ तोफासुद्धां चालोन घेतले. तेव्हां मोठीच मारगिरी झाली. वडिलांसी जाग्यावरच जखम लागली. चि. विठ्ठल घोंडदेव सरकार कामास आले. वरकड मंडळी हुजरातेकडील व तिन्ही पथकातील जखमी जाली. आमची फौज एक कोसपर्यंत माघारी हटून टेंकडी होती तीवर येऊन नबाबाच्या फौजा उभ्या राहिल्या. वडिलांस जखमेनें काहिली

झाली. याकरता माघारे गोटांत गेले. मी व चि. रा. रामचंद्र आप्पा उभे होतों. इतक्यांत शिद्यांकडील लोकांनीं नबाबाचें तोंड माघारें सारलें. त्याचे कुमकेस आमच्या तोंडी सरदार नबाबाचे होते ते जाऊ लागले, तेवेळेस आम्हीं सर्व एकत्र जागा होऊन फिरोन चाल केली. तेव्हां त्याची आमची लढाई मोठी जाली. सरकारची हुजरातसुद्धां चाळीस हजार तरवार उठली ते वेळेस नबाबाचे फौजेचा मोड जाहला. करोली बहुत अपूर्व जाहली. त्यानें नबाबाचे लोक बहूत मेले घोडे शें दोनशें जाग्यावर पडले. माणसांस तर संख्याच नाहीं पिच्छा करीत गोटा पर्यंत गेलों. पांचसातशें घोडे पाडाव करून आणिले. श्रीमंताचे प्रतापे मोठें यश सरकारचे फौजेस आलें. शिद्यांनीं कांहीं शर्त केली नबाब मागें हटोन जाग्यावर राहिलें. सकाळच्या चारसहा घटका दिवसापासून शिद्यांकडील कंपूची मारगिरी होत होती. तीबारा घटका रात्रपर्यंत एकसारख्या तोफा उडत होत्या. इतक्यांत पेंढारानें नबाबाचें लष्कर चोहोककडून घेरून लुटून फस्त केलें नबाबाची ओझीं लादली होतीं ती उतरूं पावली नाहींत तसेंच नबाब मागे सरोन खडर्याचा किल्ला आहे त्याचे आसन्यास रात्रीस जाऊन राहिला. तळावर तोफा राहिल्या दारुगोळयाचे छकडे दोन चारशें राहिले. बाजार लुटला गेला. लमाण लुटलें गेले. वीस हजार पेंढार या खेरीज लष्कराचें माणूस म्हणता कांहीं बाकी ठेवली नाहीं. दोनचार हजार उंट लुटला. बैल वगैरे यांस तर संख्याच नाहीं. आद्यापी लुटीतच आहेत. नबाबाचे भोंवतें फौजेचे वलय पडले आहे. त्याच्या लष्करास रुपयास अद्‌शेर देखील दाणा मिळत नाहीं मोठी दौलत समयानुसार श्रीमंताचे प्रतापेंकरून पेंचात आली! नबाबाकडील सरदार मंडळी पांच सहा असामी कामास आली अशी बातमी आहे. कोणी जखमी झाले असेहि सांगतात. सारांश इतः पर श्रीमंतांनी कृपाकरून नबाबाची दौलत राखिल्यास राहील, नाहींतर कांहीं बाकी दिसत नाहीं. आज आणखी लढाई होणार. गोटावर तोफा लागू करणार पुढें काय होतें पहावें. वरकड मजकूर वडीलांनी लीहीलें आहे. त्याजवरून कळेल. हेंच पत्र कुरुंदवाडास चिरंजीवाकडे रवाना करावें म्हणजे त्यासहि वर्तमान समजेल. विदित होय हें विज्ञापना: उभयता बडि-

मराठी ग्रंथ

लास वृद्धापकाळीं मोठें दुःखाचें पर्वत झाले! हे विज्ञापना " (खरे९-३६०९) वैद्य घराण्याच्या अप्रकाशीत पत्रांत या लढाईसंबघानें खालील प्रमाणें वर्णन आहे. " नबाब परांडयांचे सुमारें जात होते. तेव्हां सरकारच्या फौजा शिंदे, भोसलेसुद्धा गांठ घातली. लढाई चार प्रहरपर्यंत मातबर झाली. नबाबाकडील नाश फार झाला, तोफा, हत्ती पाडाव आले. बुनगे लुटले. परशुरामपंतभाऊ यांस तरवारीची जखम आहे इकडील शिंदेसुद्धां सारे सरदारांनीं कामकाज चांगलें केलें तरवार चालली. काल बुधवारीं दोन प्रहरा पासोन मध्यरात्री पर्यंत लढाई झाली. अद्यापी तोफांची मारगिरी चाललीच आहे" वैद्य घराण्याच्या दुसऱ्या एका पत्रांत खालील प्रमाणें हकीगत आहे. "काल मध्यरात्री पर्यंत लढाई झाल्यानंतर साऱ्या फौजा माघारी आल्या नबाब दोन कोस मागें सरून होते. आज गुरवारी प्रातःकाळी सारी दौलत तोफासुद्धां घाटाखालीं सोडून सडे मोहरीचा घाट चढून घारूरचे रोखे गेले. बुनगे वगैरे दरोबस्त लुटलें. त्यास पानपतच झालें. मागेंहि लढाया सरकाराच्या बहूत वेळा झाल्या. परंतु अशी गोष्ट झाली. नाहीं. सरकारच्या फौजा व भोसले, होळकर, शिंदे यानी मोठी शर्त केली. त्यांत शिंद्यांकडील कंपू व फौज यांची तर फारच झाली. त्यांनीं हिंदुस्थांनात लौकीक केला, त्याचें सार्थक येथें केलें श्रीमंताचा प्रताप थोर त्यानें फत्ते जाली. नबाबाच्या पाठीवर फौजा धावल्या आहेत." ✿

---

✿" (टीपः– खर्ड्याच्या लढाई सबंधानें पुना. रे. रेकार्डमध्यें अनेक पत्रें छापलीं आहेत. त्यातील हकीगत वर दिलेल्या हकीगतीप्रमाणेंच आहे विशषतः P.R.C.भाग ४ प. न. १७८, १७८, A, १७९, १८०, १८१, १८९, १९३, १९६, आणि २०२ हीं पत्रें महत्वाचीं आहेत या पत्रातील हकीगत व मराठी कागद पत्रांतील हकीगत यावरून खर्ड्याची लढाई ही मोठी चुरशीची लढाई झाली यांत शंका नाहीं. पण मराठयांचें आद्य इतिहासकार डफ साहेब यांनीं मात्र आपल्या इतिहासांत या लढाईला फारसें महत्व दिलेलें नाहीं मराठयांसंबंधानें त्यांनीं फार तुच्छता बुद्धीनें लिहीलें आहे. निजामअल्ली उगीच पळून गेला, जय मिळाल्याबद्दल मराठयांची फुशारकी अगदीं ×

निजामाचें लष्कर चारी बाजूनें लुटलें गेल्यावर निजाम भयभित होऊन खडर्याच्या किल्यांत आश्रय घेऊन राहिला होता. पण खडर्याच्या किल्यासहि मराठी फौजानीं वेढा देण्याचें काम सूरू केल्यामुळें निजामाची अन्नपाण्याविणें फार हैराणगत होऊ लागली. लढाईच्या दुसऱ्या दिवशीं निजामाच्या गोटावर पुन्हां मराठ्यांच्या तोफांचा भडिमार सुरू होणार असा रंग दिसतांच नबाबांचें तहाचें बोलणें आले. व मार बंद करण्याविषयीं त्यानें विनंती केली. नबाबाच्या विनंतीप्रमाणें मराठ्यांनीं मार बंद केला व खालीलप्रमाणें निजामाला तहाच्या अटी कळविल्या.

(१) पूर्वी सदाशिवरावभाऊंनीं उद्गीरच्या लढाईंत जिकलेला मुलूख होता त्यापैकीं परांड्यापासून तहत तापीपर्यंतचा जितका मुलूख

---

× व्यर्थ होती साऱ्या लढाईत उभय पक्षी दोनशेंसुद्धां माणूस दगावले नाहीं. अशी हकीगत डफ साहेबांनीं लिहीली आहे. डफ साहेबाचें हें लिहीणें बरोबर नाहीं असें आतां रे. रेकार्डवरुन ठरत आहे. निजामाकडची रेगंडच्या फौजेपैकीं ५।६ शें माणसें मेली व १२ शें जखमी झाली अशी माहिती एका पत्रांत आहे (P R.C. ४ – १७८A ) Nizam's army Shamefully fled असा शेरा एका पत्रांत आहे. ((P.R C. ४–१८०) निजामाच्या मानानें मराठयांची माणसें अगदींच कमी मेली अशी माहिती एका पत्रांत आहे ( P.R.C. ४–१८१A ) निजामाकडील वजीरखान व लोलखान हे ठार झाले आणी रावरंभा, असद अल्लीखान वगैरें सरदार जखमी झाले अशी माहिती एका पत्रांत आहे (P.R.C. ४–१८९) निजाम आपल्या दिवाणाला कारभारातून काढून टाकण्यास तयार झाला. अशी माहिती एका पत्रांत आहे. (P.R.C.४–१९३) निजामाची अशी दुर्दशा झाली व त्याचा पराजय झाला ही बातमी मॅलेटला कळली तेव्हां त्यानें या बातमीचें वर्णन unfortunate news असें केलें आहे. (P.R.C.४–१७९) या मॅलेटनें खडर्यांच्या लढाईत दिसून आलेल्या मराठ्यांच्या गुणाचें जें वर्णन केलें आहे तें मोठें मार्मिक आणि महत्वाचें असल्यामुळें त्यांतील कांहीं भाग खाली दिला आहे. मॅलेट म्हणतो. §

गेल्या ३५ वर्षांत निजामअल्लीस परत देण्यांत आला होता तो सर्व त्यानें पेशव्यास परत द्यावा. (२) गंगथडीमध्यें घांसदाण्याबद्दल भोसल्यांचा हक्क आहे त्याबद्दल भोसल्यास निजामअल्लीनें ३१ लक्ष ८ हजार रुपये उत्पन्नाचा मुलूख निराळा तोडून द्यावा. भोसल्यांची वऱ्हाडाच्या वाटणी

§ " I confess when I view the different manners of the rivals and the advantages which these people (Marathas) possess in the most unexampled simplicity absence of wants in food & clothing, absolute submission to the will of the superiors and constant inurement to the most laborious field service, when I say; I observe these things and put them in contrast with opposite traits in our manners and add these to the immeasurable difference and dispraportion of our numbers, I confess that I cannot help feeling some anxiety for the issue [ Issue as regards the exishence of our (English people's) empire in the East ".

खडर्याच्या लढाईत मराठ्यांचें जें सामर्थ्य दिसून आलें. त्यावरून ब्रिटिश लोकांच्या पूर्व जगांतील साम्राज्याला धोका आहे अशी साधार भिती मॅलेटला वाटत असल्याचें त्यानें वरील पत्रांत सूचीत केले आहे. मॅलेटचें हें पत्र म्हणजे एक मोठा विस्तृत रिपोर्ट आहे. मराठ्यांच्या सामर्थ्याचें वर्णन करून नंतर त्यानें प्रत्यक्ष लढाई संबंधानें चिकित्सा केली आहे. मराठ्यांचे सैन्यामध्यें हुजरात व भाऊ, डावे बाजूस शिंदे, उजवे बाजूस भोसले होळकर वगैरे असे उभे होते. हल्ला चढविण्याचें निश्चित झाल्यावर भाऊच पहिल्यानें पुढे झाले. त्याचें कारण मॅलेटनें असें दिलें आहे कीं भाऊ जवळचें सैन्य घोडदळाचें होतें. पायदळ व तोफखाना नव्हता. घोडदळाच्या¶

पैकीं बाकी तुंबली आहे. तीबद्दल निजामअल्लीनें त्यास २९ लक्ष रुपये घ्यावे व पुढें वऱ्हाडांत अंमल पूर्वींच्या वहिवाटीप्रमाणें सुरळीत चालू द्यावा. (३) चौथाई सरदेशमुखीच्या बाकीबद्दल निजामअल्लीनें पेशव्याना ३ कोट रुपये द्यावे. (४) निजामअल्लीनें आपला दिवाण मशीरउलमुल्क यास पेशव्यांच्या हवाली करावें.

शेवटच्या कलमाखेरीज निजामअल्लीनें बाकींची सर्व कलमें कुरकूर न करतां एकदम मान्यकेली. पण आपला दिवाण पेशव्यांच्या ताब्यांत देण्याचें कलम मान्य करणें मात्र त्याच्या जिवावर आलें. पण दिवाण ताब्यांत

---

¶सैन्यानेच हल्ला पहिल्यानें चढविण्याचें काम सोईचें असल्यामुळें भाऊच पुढें झाले कारण तोफखाना एकदम हालवितां येत नाहीं. भाऊ जखमी झाल्यावर त्याला योडी माघार घ्यावी लागली. पण भाऊंच्या पाठीवर आलेल्या मोंगली सैन्यावर शिंदे व भोसले यानीं तोफांचा भडिमार सूरू केल्याबरोबर मोंगलांची एकदम दाणादाण उडाली. मराठ्यांच्या युद्धकौशल्यासंबंधानें मॅलेटनें असें लिहिलें आहे कीं एकंदर लढाईची निश्चित योजना अशी मराठ्यांनी अगाऊ आंखली होती असें दिसलें नाहीं. पण प्रत्येक पुढाऱ्यानें सावधगिरीनें वेळेला जरूर असें वर्तन केलें. त्यामुळें त्यांना यश आलें. मराठ्यांनीं रिझर्व फौज ठेवली नव्हती आणि कदाचित् पराभव झाला तर माघार कशी घ्यावी याची योजना मराठ्यांनीं केली नव्हती. जास्त शिस्तीचें सैन्य भेटलें आणि त्यांच्या बरोबरीचें घोडदळहि जमा केलें तर मराठ्यांना जिंकणें शक्य आहे असें मॅलेटनें शेवटीं आपलें मत दिलें आहे. या पत्रांत मॅलेटनें मराठ्यांचा प्रत्येक सरदार व त्याच्या पथकांतील सैन्य याची यादी दिली आहे. या सर्व सैन्याची बेरीज १ लक्ष २७ हजार ६६५ अशी दिली आहे ( P.R.C. ४–२०२ ) रे. रेकार्ड मधील जी माहिती वर दिली आहे तीवरून मराठ्यांची निजामाविरूद्ध जय मिळाल्याची फुशारकी व्यर्थ आहे हें डफ साहेबाचें म्हणणें कसें निराधार आहे. हें सहज लक्षांत येईल. )

आल्याशिवाय तह करावयाचा नाहीं असें नानाचें ठाम मत असल्यामुळें शेवटीं निजामाला आपला दिवाण पेशव्यांच्या स्वाधीन करावा लागला.*

तहाच्या वाटाघाटी व ठराव झाल्यावर परस्परांची मखलाशी तहाच्या यादीवर होऊन उभयतां युद्धमान फौजा आपापल्या ठिकाणी जाण्यास निघाल्या. निजामअल्ली भागा नगरास गेला, आणि पेशव्यांची स्वारी रमत रमत सन १७९५ च्या मे महिन्याच्या पहिल्या तारखेस आपल्या राजधानींत प्रवेश करती झाली. परशुराम भाऊहि श्रीमंताबरोबर पुण्यास आले. विजयश्रीनें श्रीमंताना माळघातल्यामुळें पेशव्यांच्या फौजा मोठ्या उत्साहानें विजयश्रीच्या जयघोषांत पुण्य नगरीत प्रवेश करत्या झाल्या. या समारंभाचे वर्णन ऐ. ले. संग्रहांत खालीलप्रमाणें आढळतें " छ. ९. सवाल बुधवारी श्रीमंतांचा मुक्काम थेऊरास आला. छ. १० रोजीं मुक्कामच होता.

---

*( टीप:-या तहासंबंधानें निरनिराळ्या पत्रांत मजकूर आले आहेत. त्यांत थोडी बहूत तफावत आढळते. दिवाण स्वाधीन करण्यासंबधानें मात्र सर्व ठिकाणी एक वाक्यता आहे. वैद्य घराण्याच्या अप्रकाशित पत्रांत या संबधानें खालील प्रमाणें मजकूर आहे. " लढाई तो ( निजाम ) देत नाहीं सल्ल्याचें बोलणें लागले आहे. परंतु सरकारची आड आहे जे, भोईनाथदौला कारभारी आमचे स्वाधीन करावा तर सल्ला. नाहीं तर गोष्ट बोलावयाची नाहीं." " नानानें बाबूराव आपटे यास लिहीलेल्या पत्रात खालीलप्रमाणें मजकूर आहे. " तहाचें बोलण्यात मुख्य मैनुदौलानें एवढा नाश केला तो नसावा. नंतर तह या गोष्टीस अनमान करू लागले. शेवटीं मैनुदौलास जाच न सोसे. तेव्हां इकडे राजकारण लाविलें. कीं ज्या गोष्टी जाहल्या त्या चूक. या उपर शरण मीच आपलेजवळ येतो. चित्तास येईल तें करावें. तेव्हां करार करून घेतला कीं ज्यात आम्हास संदेह ते करूं नये या प्रमाणें कबूल करून त्याची भेट होऊन त्यास बंदोबस्तांत ठेविलें" ( भा. व. पत्रें यादी ले. १० पान २४-२८ ) वरील हकीगतीवरून निजाम दिवाणास पेशव्याच्या ताब्यांत देण्यास तयार नव्हता पण दिवाण ताब्यांत +

छ. ११ सवाल भृगुवारी थेऊराहून कूचकरून वानवडीचे मुक्कामास आले. तेथें दोन घटका रात्रपर्यंत राहून उपरांत स्वारी तयार जाहाली. वडिलाकडे ( परशुराम भाऊकडे ) स्वारीबरोबर यावयांकरतां अंबारी आली होती. वडील अंबारीत बसून राजश्री नाना फडणीस यांचे अंबारी बरोबर श्रीमंताचे अंबारी पाठीमागें चालत होते. आणखी सरदार मुत्सद्दी अंबारीत बसून पाठिमागून चालत होते आम्ही फौजनिशाण सुद्धा घेऊन पाठी मागे होतो श्रीमंतांची स्वारी भवानी पेठेतून कांहीं शुक्रवार बुधवारांतून वाडा उजवा घालून दिल्लीदरवाजानें आवशीच्या सहा घटका रात्रीस वाड्यात दाखल झाली. पेठेतून दुतर्फा रोषनाई केली होती. आतषबाजी मुबलक जाहली होती. नजराणा जाहला. तीर्थस्वरुप राजश्री भाऊसाहेब यांनीं पांच मोहरा नजर केल्या " ( खरे ९-३६१८ ) दुसऱ्या एका पत्रांत खालीलप्रमाणें वर्णन आहे. " येथील वर्तमान लष्कराचा मुक्काम वैशाख शुद्ध ११ बुधवारी

---

+ आल्याशिवाय तह होत नाहीं असें पाहून तो दिवाणच आपण होऊन पेशव्याना शरण गेला असें दिसतें. खंडणी संबधानें वर उल्लेखिलेल्या नानाच्या पत्रांत ३ कोटी मागील बाकी, २ कोटी मसलतीचा खर्च, तीस लक्षाची जहागीर आणि दौलताबादचा किल्ला शिवाय भोसल्याचे जें देणें निघेल त्याचा फडशा करावा अशी हकिगत आढळते. पुना रे. रेकार्ड मध्यें या तहा संबंधानें खालीलप्रमाणें हकिगत आहे (१) ३२ लक्षांचा मुलूख पेशव्यांना मिळावा व दौलताबादचा क़िल्ला मिळावा. (२) २ कोटी रुपये ३ वर्षांचे आंत द्यावे. (३) दिवाण दौला ( मशीर उलमुल्क ) पेशव्यांच्या ताब्यांत द्यावा, (४) २९ लक्ष रुपये भोसल्यास द्यावे (५) ५० लक्ष शिंद्यास द्यावे. शिंद्यानें आधी घेतलेले २७ लक्ष ५० लाखांतून वजा करावे ( P. R. C. ४-२०४, २०८, २१४, २१५, ) दुसऱ्या एका पत्रांत पेशव्यांना द्यावयाच्या रकमेचा आकडा ३ कोटी दहा लक्ष आणि नानाला २॥ लक्षाचा मुलूख अशी माहिती आहे. (P. R. C. ४-२२१ ) परशुराम भाऊंना या लढाईत १ लाख रुपये दरबार खर्च मिळाल्याची हकीगत ( ऐ. टि. ३-२६ मध्यें आहे.)

थेऊरास झाला. ते दिवशीं श्रीमंत रा. नाना याचा मुक्काम पुढें वानवडीस येऊन उतरले. गुरवारचे पहाटेस मागील पांच घटका रात्र रहातां मुहूर्त करून आपल्या वाड्यांत दाखल झाले. गुरुवारी श्रीमंतांचा मुक्काम थेऊरासच जाहला. शुद्ध त्रयोदशी भृगुवारी कूच करून वानवडीस येऊन मुक्काम जाहला. श्रीमंतांची स्वारी येताच पर्वतीस जाऊन दर्शन करून माघारी वानवडीस डेऱ्यात जाऊन राहिले. श्रीमंत राजश्रीभाऊसाहेब सर्व मंडळी समागमेव होती. मागील संध्याकाळचा प्रहर दिवस राहातां नानाची स्वारी श्रीमंताकडे डेऱ्यास गेली. तों शहरांत सरकारचे वाड्यापासून भवानीं पेठेपर्यंत दोनबाजूनें चिराखा तयार केल्या. दारूचीं झाडें जागांजागां नाक्यानीं लाविली. नंतर श्रीमंतांची स्वारी नाना भाऊसाहेब सर्व मंडळी आदिकरून समारंभानें अंबाऱ्यांतून चवथे घटका रात्री डेऱ्यातून निघाले ते शहरांत दाखल झाल्यावर तोफा सुरू झाल्या. ते वाड्यांत दाखल होतपर्यंत बार जाले. आठवे घटका रात्रीस वाड्यांत जाले. थोरल्या चौकांत उववेकडील चाफेखणांत बैठक होऊन नजर नजराणा जाहाला. आधीं नाना यांनीं नजर केली. नंतर भाऊसाहेबानीं केली" (खरे ९-३६१९)

श्रीमंतांची स्वारी वर वर्णन केल्या प्रमाणें मोठ्या विजयोत्सवांत पुण्य नगरींत दाखल झाली. या प्रमाणें खडर्याच्या लढाईचा मोठा अभिमानास्पद असा निकाल लागला. मराठ्यांच्या इतिहासांत या लढाईचें फार महत्व आहे. कारण मराठी साम्राज्याकरतां झटणारे सर्व सरदार एका छत्राखालीं रणांगणावर उभे राहिल्याचा हा शेवटचाच प्रसंग होता. शिवाय या लढाईत मराठ्यांचें १ लक्ष २७ हजार सैन्य एके ठिकाणीं गोळा झालें होतें. एवढें मोठें सैन्य एका लढाईंत हजर असल्याचें दुसऱ्या कोणाच्याहि स्वारींत आढळत नाहीं. पानीपतच्या रणक्षेत्रावरसुद्धां मराठ्यांची लढवय्यी फौज १ लक्षांच्या आंत होती. असा हा अटी तटीचा सामना मराठ्यांनीं आपलें सर्व बळ एकवटून मोठ्या चुरशीनें जिंकला ही गोष्ट त्यांना भूषणावह आहे यांत शंका नाहीं. या लढाईंत शिंदे, होळकर, भोंसले. पटवर्धन

यांचे पराक्रम आणि नानांचा मुत्सद्दीपणा यांचा कळस झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. या लढाईंतला विजय मराठ्यांना मोठ्या अभिमानाचा वाटण्याचें मुख्य कारण शत्रूचा मुख्य दिवाण दौला याला शरण येण्यास भाग पाडून त्याला मराठ्यांनीं कैदेंत ठेविलें. दुसऱ्या राज्याचा दिवाण कैद करणें ही केवढ्या अभिमानाची गोष्ट मराठ्यांना वाटली. हें एका पत्रांत खालील प्रमाणें लिहीलें आहे. "दौलाकारभारी यासी सरकारांत आणवूं नयेत. या शिवाय जे जाब साल आसतील ते बोलण्यांत आणावें. नबाब फडशा करून देतात असें बोलत होते. परंतु सरकारांत ही गोष्ट सर्वथैव मान्य नाहीं. दौलास पाठवावें नाहीं तर तह होत नाहीं अशीं नेटाचींच उत्तरें इकडील होत गेलीं. तेव्हां दौलाकडील हरी नारायण, दौलाचे मुख्यत्यार आहेत, ते सरकारांत आले. रा. गोविंदराव पिंगळे यांचे विद्यमानें कारभाऱ्यांशीं बोलोन करार ठरला कीं, दौला सडे सरकारांत येतात. याचे मान महत राखावे म्हणोन. त्याजवरून पेशजीरुकनु दौलाची भेट जहाली. त्याप्रमाणें भेटीचा समारंभ करितों याप्रमाणें कारभारी लेखकानीं करार करून दौलानीं यावें म्हणोन सांगितलें त्यावरून छ ५ रमजानीं शुक्रवारीं दौला श्रीमंतांच्या लष्करास दाखल झाले. सात हत्ती, शंभर घोडे, पंधरा उंट इतका सरंजाम होता. सरकारची स्वारी डेरे दाखल झाल्यानंतर दौलानीं नजर केली ती घेतली. त्यानंतर दौला गोटास गेले. पांच हजार रुपये सरकारांतून मेजवानगी पाठविली. इतका मात्र महत्वाचा समारंभ झाला. वरकड बंदोबस्त दौलाचा उत्तम प्रकारें केला. दोन तीन हजार फौज, हजार दीड हजार गाडदी यांचा पहारा चौगिर्दा दिला आहे. वाण्यांचीं दुकानें आंतच दोन ठेवलीं आहेत. आतलें माणूस बाहेर किंवा बाहेरचें आंत येणें तर परवानगी शिवाय जात येत नाहीं. या प्रमाणें दौलाचा बंदोबस्त जाहला. सरकारचें दैव व प्रताप मोठा त्यायोगें करून या गोष्टी घडल्या. नाहींतर दुसऱ्या दौलतवंताचे घरचें दिवाण जोरबेजोर कैदेंत येणें, ही गोष्ट घडावयाची कीं काय ? परंतु दैवयोग पुण्य पराक्रम अनिर्वचनीय आहे. त्या योगें करून

सहजांत गोष्टी घडल्या. तहाच्या बोलण्यांत मोठी अडीची गोष्ट हीच होती ती उरकली. " ( खरे ९-३६१६)*

* टीप — दुसऱ्या दौलतवंताचे दिवाण कैद करून आपल्या ताब्यांत घेण्याचा पराक्रम मराठ्यांनीं खडर्याच्या लढाईंत केला या वरून या लढाईंत निजामाचा केवढा सणसणीत पराभव झाला असला पाहिजे ही गोष्ट सहज ध्यानांत येण्यासारखी ताहे. अशी स्थिती असतांना मराठ्यांनीं निजामाचा कांटा साफ उपटून कां टाकला नाहीं असा आक्षेप आजकालचे कांहीं विचारवंत काढीत असतात. पण हा आक्षेप प्रामुख्यानें आजच्या राजकीय परिस्थितींतून उत्पन्न झालेला आहे. हें लक्षांत घेऊन या आक्षेपाचा विचार केला पाहिजे. त्यावेळच्या राजकीय परिस्थितीचा विचार करून व त्या वेळच्या मुत्सद्यांचे विचार लक्षांत घेऊन या आक्षेपांकडे पाहिलें तर यांत कांहीं अर्थ नाहीं हें सहज लक्षांत येईल. या बाबतींत समकालीन मुत्सद्याचें काय विचार होते हें खालील उताऱ्यावरून स्पष्ट होईल. तहाच्या वाटाघाटी चालू असतां नानाच्या विश्वासांतले बाबूराव आपटे नांवाचे गृहस्थ नानास लिहितात. " जसें मिटेल तसें मिटवावे, लोकांच्या सहस्त्रबुद्धी, परंतु स्वामीस एक यश व सर्व मनसबे पहाणें हें लोकांस समजावयाचें नाहीं निजाम अल्लीखान हरीपंताचे आज्ञेंत संकटाचे वेळेस चालत होते. मजला सुचला तो अर्थ लिहीला आहे. सातारच्या छत्रपतींच्या व्यवस्थेस असलेल्या बाबूराव आपट्यासारख्या जबाबदार माणसानें वरील पत्र नानांस लिहीलें आहे. नानानीं त्याला खालीलप्रमाणें उत्तर दिलें "लढाईचे दुसरे दिवशीं अगदीं नबाब बुडवावा असेंच झालें होतें व सर्व सरदारांचेंहि मानस होतें परंतु नबाब समयास पूर्वीं कामावर पडले याकरतां रक्षण केलें."(भा. वर्ष पत्रें यादी ले १० पा. २४।२८)वरील उताऱ्यावरून त्यावेळच्या मुत्सद्याचें मत निजामास साफ बुडवावा असें नव्हतें हें स्पष्ट आहे. श्रीरंगपट्टणच्या मोहीमेंतहि टिपूचा साफ नाश करावा असें कार्नवालीसचें मत होतें पण हरीपंतानें तें होऊं दिलें नाहीं. कार्नवालीसनें हरीपंताचें ऐकलें म्हणून मेडोज नावांच्या इंग्रजांच्या एका सेनापतीनें आत्महत्त्या केल्याची हकीगत

यांचे पराक्रम आणि नानांचा मुत्सद्दीपणा यांचा कळस झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. या लढाईंतला विजय मराठ्यांना मोठ्या अभिमानाचा वाटण्याचें मुख्य कारण शत्रूचा मुख्य दिवाण दौला याला शरण येण्यास भाग पाडून त्याला मराठ्यांनीं कैदेंत ठेविलें. दुसऱ्या राज्याचा दिवाण कैद करणें ही केवढ्या अभिमानाची गोष्ट मराठ्यांना वाटली. हें एका पत्रांत खालील प्रमाणें लिहीलें आहे. "दौलाकारभारी यासी सरकारांत आणवूं नयेत. या शिवाय जे जाब साल आसतील ते बोलण्यांत आणावें. नबाब फडशा करून देतात असें बोलत होते. परंतु सरकारांत ही गोष्ट सर्वथैव मान्य नाहीं. दौलास पाठवावें नाहीं तर तह होत नाहीं अशीं नेटाचींच उत्तरें इकडील होत गेलीं. तेव्हां दौलाकडील हरी नारायण, दौलाचे मुख्यत्यार आहेत, ते सरकारांत आले. रा. गोविंदराव पिंगळे यांचे विद्यमानें कारभाऱ्यांशीं बोलोन करार ठरला कीं, दौला सडे सरकारांत येतात. याचे मान महत राखावे म्हणोन. त्याजवरून पेशजीरुकनु दौलाची भेट जहाली. त्याप्रमाणें भेटीचा समारंभ करितों याप्रमाणें कारभारी लेखकानीं करार करून दौलानीं यावें म्हणोन सांगितलें त्यावरून छ ५ रमजानीं शुक्रवारीं दौला श्रीमंतांच्या लष्करास दाखल झाले. सात हत्ती, शंभर घोडे, पंधरा उंट इतका सरंजाम होता. सरकारची स्वारी डेरे दाखल झाल्यानंतर दौलानीं नजर केली ती घेतली. त्यानंतर दौला गोटास गेले. पांच हजार रुपये सरकारांतून मेजवानगी पाठविली. इतका मात्र महत्वाचा समारंभ झाला. वरकड बंदोबस्त दौलाचा उत्तम प्रकारें केला. दोन तीन हजार फौज, हजार दीड हजार गाडदी यांचा पहारा चौगिर्दा दिला आहे. वाण्यांचीं दुकानें आंतच दोन ठेवलीं आहेत. आतलें माणूस बाहेर किंवा बाहेरचें आंत येणें तर परवानगी शिवाय जात येत नाहीं. या प्रमाणें दौलाचा बंदोबस्त जाहला. सरकारचें दैव व प्रताप मोठा त्यायोगें करून या गोष्टी घडल्या. नाहींतर दुसऱ्या दौलतवंताचे घरचें दिवाण जोरवेजोर कैदेंत येणें, ही गोष्ट घडावयाची कीं काय ? परंतु दैवयोग पुण्य पराक्रम अनिर्वचनीय आहे. त्या योगें करून

सहजांत गोष्टी घडल्या. तहाच्या बोलण्यांत मोठी अडीची गोष्ट हीच होती ती उरकली." ( खरे ९-३६१६)*

* टीप — दुसऱ्या दौलतवंताचे दिवाण कैद करून आपल्या ताब्यांत घेण्याचा पराक्रम मराठ्यांनीं खडर्याच्या लढाईंत केला या वरून या लढाईंत निजामाचा केवढा सणसणीत पराभव झाला असला पाहिजे ही गोष्ट सहज ध्यानांत येण्यासारखी ताहे. अशी स्थिती असतांना मराठ्यांनीं निजामाचा कांटा साफ उपटून कां टाकला नाहीं असा आक्षेप आजकालचे कांहीं विचारवंत काढीत असतात. पण हा आक्षेप प्रामुख्यानें आजच्या राजकीय परिस्थितींतून उत्पन्न झालेला आहे. हें लक्षांत घेऊन या आक्षेपाचा विचार केला पाहिजे. त्यावेळच्या राजकीय परिस्थितीचा विचार करून व त्या वेळच्या मुत्सद्यांचे विचार लक्षांत घेऊन या आक्षेपांकडे पाहिलें तर यांत कांहीं अर्थ नाहीं हें सहज लक्षांत येईल. या बाबतींत समकालीन मुत्सद्याचें काय विचार होते हें खालील उताऱ्यावरून स्पष्ट होईल. तहाच्या वाटाघाटी चालू असतां नानाच्या विश्वासांतले बाबूराव आपटे नांवाचे गृहस्थ नानास लिहितात. "जसें मिटेल तसें मिटवावे, लोकांच्या सहस्त्रबुद्धी, परंतु स्वामीस एक यश व सर्व मनसबे पहाणें हें लोकांस समजावयाचें नाहीं निजाम अल्लीखान हरीपंताचे आज्ञेंत संकटाचे वेळेस चालत होते. मजला सुचला तो अर्थ लिहीला आहे. सातारच्या छत्रपतींच्या व्यवस्थेस असलेल्या बाबूराव आपट्यासारख्या जबाबदार माणसानें वरील पत्र नानांस लिहीलें आहे. नानानीं त्याला खालीलप्रमाणें उत्तर दिलें "लढाईचे दुसरे दिवशीं अगदीं नबाब बुडवावा असेंच झालें होतें व सर्व सरदारांचेंहि मानस होतें परंतु नबाब समयास पूर्वीं कामावर पडले याकरतां रक्षण केलें."(भा. वर्ष पत्रें यादी ले १० पा. २४।२८)वरील उताऱ्यावरून त्यावेळच्या मुत्सद्याचें मत निजामास साफ बुडवावा असें नव्हतें हें स्पष्ट आहे. श्रीरंगपट्टणच्या मोहीमेंतहि टिपूचा साफ नाश करावा असें कार्नवालीसचें मत होतें पण हरीपंतानें तें होऊं दिलें नाहीं. कार्नवालीसनें हरीपंताचें ऐकलें म्हणून मेडोज नावांच्या इंग्रजांच्या एका सेनापतीनें आत्महत्त्या केल्याची हकीगत

(टीप पृष्ठ २८३ वरून समाप्त)

श्रीरंगपट्टणच्या मोहीमेंत आलीच आहे. तात्पर्य सरदारांचें मत कांहीं असलें तरी राष्ट्राचें खरें हित मुत्सद्यालाच जास्त चांगल्या रीतीनें कळत असतें टिपू, निजाम यांसारखीं देशी राज्यें अजीबात बुडवूं नयेत असेंच त्यावेळच्या मराठे शाहीतल्या मुत्सद्यांना वाटत होतें. याचें कारणहि उघडच आहे. इंग्रजांची परकी सत्ता हिंदुस्थानांत मूळ धरून दिवसें दिवस वाढत जात होती. पुढें मागें तिला शह देणें झाल्यास देशी संस्थानांच्या साहायानेंच ती गोष्टी शक्य होती. निजाम हैदर, मराठे यांनीं चौकडीचें कारस्थान उभारून असा एक प्रयत्न केला होता. तो जरी त्यावेळीं साधला नव्हता तरी पुन्हा असा प्रयत्न करणें झाल्यास तो सर्व देशी राज्यांच्या सहकार्यानेंच होणें जरूर होतें. अर्थातच देशी राज्यें अजीबात बुडविणें ही गोष्ट कोणाच्याच हिताची होण्याचा संभव नव्हता. उलट इंग्रजांची सत्ता वाढण्यालाच तें एक कारण झालें असतें, आणि हे लक्षांत घेऊनच नाना, हरीपंत वगैरे पेशव्यांचे कारभारी देशी राज्यें बुडविण्याच्या विरुद्ध होते. मराठ्यांचें हें धोरण यशस्वी न होऊन इंग्रजांनीं एका मागून एक या न्यायानें सर्वांनांच पालथें घातलें ही गोष्ट निराळी. पण त्यामुळें नाना हरीपंताचें धोरण चूक होतें असें मात्र म्हणतां येणार नाहीं. इंग्रज पुढें मागें सर्वांनांच गुंडाळून ठेवतील ही गोष्ट गृहीत धरून नानांनीं खर्ड्याच्या लढाईंतील तहाची कलमें ठरवावयास पाहिजे होतीं असें अर्थातच कोणीच म्हणणार नाहीं. पेशव्याचें राज्य अजीबात जाऊन निजामाचे लहानसें संस्थान शिल्लक राहिलें या स्थितीचा राजकीय परिणाम आज जो आपल्या मनावर होतो तो पाहून निजामाचें राज्य नानांनीं बुडविलें असतें तर बरें झालें असतें असें आज आपण म्हणतो. पण आजची ही परिस्थिती दूर दृष्टीनें हेरून नानांनीं तह ठरवावयास पाहिजे होता असें म्हणणें ऐतिहासीक दृष्टीनें बरोबर होणार नाहीं. हिंदु मुसलमानांचे आजचे प्रश्न १५० वर्षांपूर्वींच्या हिंदुमुसलमानांच्या प्रश्नाहून अगदीं भिन्न स्वरूपाचें आहेत. अर्थातच आजच्या परिस्थितींतून उत्पन्न होणारे आक्षेप मागच्या ऐतिहासीक घडामोडींना लावणें बरोबर होणार नाहीं.)

———

## प्रकरण १५ वें

# बाजीरावाचें पुण्यास आगमन

—००★००—

खड‌र्याची स्वारी संपवून पेशवे पुण्यास आल्यानंतर परशुरामभाऊस तासगावीं जाण्यास निरोप झाला. त्या प्रसंगीं खड‌र्याच्या स्वारींत चांगली कामगिरी केल्याबद्दल पटवर्धन मंडळीचा श्रीमंतानीं चांगला मान सन्मान केला. मिरजेचे नारायणराव गंगाधर यांस श्रीमंतानीं पालखी दिली व इतर पटवर्धन मंडळीसहि जडजवाहीर, वस्त्रें वगैरे देऊन श्रीमंतानीं त्यांचा बहुमान केला. नंतर १७९५ च्या सप्टेंबर महिन्यांत दौलतराव शिंद्यांना निरोप झाला. शिंदे हिंदुस्थानांत जाण्याकरीतां जांभगावीं निघून गेले. रघोजी भोसले यांना आक्टोंबर महिन्यांत निरोप होऊन तेहि निघून गेले. फक्त तुकोजी होळकर मात्र पुण्यास होते. अशा तऱ्हेनें सर्व सरदार आपापलीं कामें आटोपून स्वस्थानीं परत गेले व तूर्त कोणतीहि नवीन भानगड उपस्थित होण्याचा संभव नसल्यामुळें श्रीमंतांच्या राज्यांत आतां शांतता नांदेल असें सर्वांसच वाटत होतें. पण भवितव्यता कांहीं निराळीच होती. गेलीं वीस बावीस वर्षें नाना फडणीस यांनीं पेशवाईचा कारभार चालविला. या अवधींत अनेक वेळां त्यांच्यावर मोठे कठीण प्रसंग आले वेळोवेळीं राज्यांत भयंकर फितूर उत्पन्न झाले. नाना तऱ्हेचीं कारस्थानें उघडकीस आलीं. इंग्रज टिपू सारख्या बलाढ्य

शत्रूशीं अनेक वर्षें युद्धें चालवावीं लागलीं; राजकारणाच्या दृष्टीनें शत्रूलाहि कांहीं मुलुख द्यावा लागला व शत्रूनीं कांहीं जबरदस्तीनें घेतला. अखेर निजामाशीं तंटा उत्पन्न होऊन तोहि नानांनीं आपल्या अकलेच्या जोरावर पार पाडला. तात्पर्य नाना तऱ्हेचीं संकटें पेशवाईवर नारायणरावाच्या खुनानंतर आलीं. त्या सर्वांना तोंड देऊन नानांनीं पेशवाई राज्य आजपर्यंत संभाळलें इतकेंच नव्हे, तर कालमानाप्रमाणें तें राज्य ऊर्जितावस्थेला आणलें, असेंच म्हटलें पाहीजे. नारायणराव पेशव्याच्या मरणाच्यावेळीं जितका मुलुख पेशवाई अंमलाखालीं होता. तितकाच मुलुख हल्लीं सुद्धां सवाई माधवरावसाहेब यांच्या अंमलाखालीं आला होता. शिंदे, होळकर, भोंसले, गायकवाड वगैरे राज्यांतले सर्व सरदार पेशव्यांच्या आज्ञेंत वागत होते, आणि इंग्रज, टिपू, निजाम यांच्या सारख्या परकीय सत्ताधीशांजवळ तह, करार मदार होऊन परस्परांच्या राजकीय वर्तनाच्या मर्यादा ठरून गेल्या होत्या. इतकें सर्व झाल्यावर पेशवाईच्या भरभराटीचा कळसच झाला, असें कोणी म्हटल्यास तें वावगें नव्हतें. पण पूर्वीच म्हटल्याप्रमाणें भवितव्यता कांहीं निराळीच होती. कोणचीहि गोष्ट झाली तरी तिच्या भरभराटीला मर्यादाहि असतेच. या न्यायानें नानांचा उत्कर्ष पूर्ण होऊन त्याला उतरती कळा लागण्याचा प्रसंग आला. त्याचीच हकीगत आतां सांगावयाची आहे. कालचक्र फिरलें म्हणजे तें कोणाला केव्हां गोत्यांत आणील याचा काहींच नेम नाहीं. मग नानांची ती कथा काय ? *

* (टीपः— नाना फडणीसानें मराठ्यांचें राज्य राखलें हा समज उगाच आहे असें इतिहासकार सरदेसाई यांनीं लिहिलें आहे.पण नानांचें समकालीन प्रतिस्पर्धी जे इंग्रज ते काय म्हणतात हें पाहिलें म्हणजे नानांची कर्तबगारी कळून येते. इंग्रजांचा वकील मॅलेट हा नाना संबंधानें खालील प्रमाणें लिहीतो, " Nana Fadnis supported, in the most-perilous times almost singly, the Maratha Empire during the destrueted regency of an infant Peshwa. " ( P. R. C. 2–9 ). दुसऱ्या एका पत्रांत मॅलेटचा असिस्टन्ट युथाफ हा §

नानांनीं पेशव्याचें राज्य भरभराटीस आणलें ही गोष्ट खरी असली तरी सर्व राज्यांत नानांचे निंदक कोणी नव्हतेच असें नाहीं. या वेळीं धाकटे बाजीराव कैदेत होते. त्यांच्या वयाला आतां २१ वर्षें पुरीं होत आलीं होतीं. पेशव्यांच्या घरांतल्या वहिवाटीप्रमाणें पेशव्यांचा कारभार घरांतलाच दुसरा कर्ता माणूस करीत असे. धाकटे बाजीराव २१ वर्षें वयाचें झाल्यामुळें त्यांचेकडे नानांनीं कारभार कां देऊं नये असे विचार नानांचे निंदक घरीं बसल्याबसल्या करीत असत लोकांमध्यें राघोबाच्या प्राचीन अनुयायांचाच मोठा भरणा होता हें सांगावयास नकोच. या लोकांनीं बाजिरावाच्या गुणांची जाहिरात करण्यास सुरवात

---

§ खालीलप्रमाणें लिहितो. " It must be acknowledged that in the conduct of this important and arduous trust for a series of years, Nana displayed considerable talents of a Civil and financial nature, exerted with regularity, firmness and consistency, qualified with great prudence and moderation bending without breaking to foreign and domestic storms but possessing the address to recover his former position and to consign to almost total oblivion such instances as occurred, in hisconduct of temporising pusillanimity his command of the treasures and resources of the state and the authority and the influence of the Peshwaship, gave him till Madhavrao's death in October 1795 an effectual control not only over the military immediately dependent on the Peshwa, but also over the great members of the Empire. " (P. R. C. 6-72) +

केली व अशा पेशव्याच्या घराण्यांतील गुणवान माणसाला कैदेंत डांबून ठेवणें हा मोठाच अन्याय होत आहे, असा बोभाटा केला. या उपद्व्यापाचा परिणाम असा झाला कीं बाजीरावाचें हे गुणवर्णन सवाई माधवरावाच्या कानावर जाऊन खरोखरच बाजीराव हा मोठा गुणवान आणि कर्तृत्वसंपन्न असेल तर त्याचा सहवास आपणास घडावा अशी त्या तरूण पेशव्यास इच्छा झाली. *

---

+नानासंबंधाचें हें मत मोठ्या कौतुकानें इंग्रजांनीं लिहिलें असें नाहीं. नाना हुषार असला तरी इंग्रजांचा द्वेष करणारा आहे, असेंच या वकीलानें आणखी एका पत्रांत लिहिलें आहे. तो म्हणतो, " No one is so well qualified as Nana for the prosperous management of the affairs of the Peshwaship to which may be added jealousy and envy of the Company. " (P. R. C. 6–32) वर दिलेल्या प्रतिस्पर्धी इंग्रजांच्या समकालीन उताऱ्यावरून इतिहासकार सरदेसाई यांचें नाना संबंधाचें मत कसें निराधार आहे हें स्पष्ट होईल.)

* टीप— सवाई माधवरावाच्या मनांत बाजीरावासंबंधानें उत्पन्न झालेल्या या प्रेमळ भावनेसंबंधानें कै. खरेशास्त्री यांनीं खालीलप्रमाणें उद्गार काढलें आहेत " मानवी अंतःकरण हें सृष्टींतलें फारच विलक्षण कोडें आहे असें म्हणतात त्याचें हें प्रत्यक्ष उदाहरण होय ! गर्भवासापासून आपलें रक्षण करून नानांनीं आपलें राज्य उजगारीला कसें आणलें याची जाणीव सवाई रावसाहेबांस पूर्ण होती. ज्यानें आपल्या बापाचा खून केला त्याचा मुलगा बाजीराव कितीहि गुणवान असला तरी त्यास दूर बंदोबस्तांत ठेवणें हेंच सर्वथा उचित आहे. बाजीरावाच्या हातीं कारभार देणें म्हणजे नानाशीं कृतघ्न होऊन त्यांनीं केलेल्या सर्व गोष्टीस हरताळ फासणें व राज्यांत नवीन अनर्थाची परंपरा उत्पन्न करणें होय, या गोष्टी त्या पेशव्यास समजत नव्हत्या असें वाटत नाहीं. इतकें असून बाजीरावाविषयीं त्याचें मन स्निग्ध व दयार्द्र कां व्हावें याचा उलगडा करितां येणें अशक्य आहे " ( खरे भा. ९ पा. ४७७० )

धाकटे बाजीराव हे मोठे उपद्व्यापी पाताळयंत्री आणि तसेच कारस्थानींहि होते, सवाई माधवरावाच्या मनांत आपणासंबंधानें प्रेम उत्पन्न झाल्याची वार्ता त्याच्या कानावर जाण्यास फार उशीर लागला नाहीं. सवाई माधवरावाचें मन आपल्याकडे वळलें आहे हें समजतांच बाजीरावाच्या कारस्थानास सुरवात झाली. बाजीरावाच्या बंदोबस्ताकरितां बळवंतराव नागनाथ वामोरीकर नांवाचा एक सरदार नानांनीं नेमला होता. त्यास अनुकूल करून घेऊन त्याच्या द्वारें सवाई माधवरावाशीं बाजीरावानें पत्रव्यवहार सुरू केला. एक दोन चिठ्ठ्या इकडून तिकडे तिकडून इकडे गेल्या असतील नसतील तोंच ती गोष्ट नानांच्या कानावर गेली. नानांनीं तात्काळ बळवंतरावाला पकडून कैदेंत टेविलें; व त्या मूर्खपणाच्या कृत्याबद्दल सवाई माधवरावाची चांगलीच कानउघडणी केली.*

बाजीराव व सवाई माधवरावसाहेब यांचा पत्रव्यवहार सन १७९५ च्या आक्टोबर महिन्याच्या आरंभींच उघडकीस आला. नानानें या प्रकाराचा योग्य बंदोबस्त करून वळवंतराव नागनाथास कैदेंत टाकलें या गोष्टीं

* टीप—पुण्याच्या दरबारीं असलेला इंग्रजांचा त्यावेळचा वकील युथाफ यानें या संबंधानें एका पत्रांत असें लिहिलें आहे कीं बळवंतराव नागनाथ हा पुण्यातील नानांच्या विरोधकांचा हस्तक बनला होता, व त्यानेंच सवाई माधवरावाचें मन बाजीरावाकडे वळविण्याचा प्रयत्न केला व बाजीरावाला सोडविण्यासंबंधानें खटपट केली. युथाफनें या संबंधानें खालीलप्रमाणें शेरा मारला आहे. " Every thing that has yet come to my knowledge corroborates the idea that the design whatever it has been, was to the prejudice of Nana." (P. R. C. २–२६२). वरील उताऱ्यावरून असें दिसतें कीं, बाजीराव व सवाई माधवराव यांचा पत्रव्यवहार सुरू होण्याला पुण्यांतील राघोबाचे प्राचीन अनुयायी व नानांचे निंदक हेच मुख्यतः कारणीभूत झाले असावे. )

श्रीमंतांच्या मनास लागल्या नसतीलच असें म्हणवत नाहीं. तथापि नानांनीं केलेला बंदोबस्त राज्याच्या हिताचा होता ही गोष्ट नाकारतां येणें शक्य नाहीं. कांहींहि असो. ह्या गोष्टी झाल्यानंतर श्रीमंतांची प्रकृति बिघडली, हें मात्र खरें. निम्मा आक्टोबर होईपर्यंत श्रीमंतांच्या प्रकृतीस उत्तम प्रकारचें स्वास्थ होतें. व सर्व गोष्टी व्यवस्थितपणें चालल्या होत्या. या सुमारास अश्वीन महिन्यांस सुरवात झाली होती. नवरात्रांत श्रीमंतांस ज्वर येऊं लागला. व त्या ज्वरांत कांहीं वात विकृतीहि उत्पन्न झाली. दसऱ्याच्या दिवशीं श्रीमंत शिलंगणास गेले होते, पण त्यांची प्रकृति बिघडलेलीच होती. आश्वीन शुद्ध १२ तारीख २५-१०-९५ रोजीं सकाळच्या प्रहरीं श्रीमंत शनवारवाड्यांत गणपतीच्या दिवाणखान्यांत अेकटेच बसले होते. त्यांभोंवती रात्रंदिवस माणसांचा घोळका रहात असतां, त्यावेळीं दैववशात् तेथें एकहि माणूस नव्हतें. तशा स्थितींत श्रीमंतांस वायूचा झटका आला. व त्या भरांत दिवाणखान्याच्या पूर्वेच्या अंगचे कवाड उघडून त्यांनीं खालीं उडी टाकली. खालीं हौद होता. त्यांतील कारंज्यावर त्यांची उडी पडल्यामुळे मांडीस व अितर ठिकाणीं जबर दुखापत झाली. तशा स्थितींत ते दोन दिवसपर्यंत होते. त्यांच्या अिजेवर पुष्कळ उपचार झाले. परंतु त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. चदुर्दशीच्या दिवशीं सायंकाळीं म्हणजे ता. २७-१०-१७९५ रोजीं श्रीमंतांचें प्राणोत्क्रमण झालें. या प्रकरणासंबंधानें कांहीं महत्वाचे उतारे खालीं दिले आहेत. " श्रीमंत राजश्री रावसाहेब यांजला शरीरीं समाधान नव्हतें. औषधी उपाय चालत होते. चित्ताची स्थिरता अलीकडे नव्हती. आश्विन शु. १२ रविवारीं २-३ घटका दिवस सुमारें, गणपतीचे दिवाणखान्यावर माडीवर राव निजत होते तेथून, पूर्वेच्या अंगचें कवाड उघडून खालीं उडी टाकली. खाली कारंजाचा हौद होता. त्यांत पडले. दातांस व हातास व गालास व पाय अितके लागलें. परंतु पाय भारी दुखावला. आंतील हाड मांडिजवळ मोडलें. कांबी लावून बांधिलें. फार पायाचें दुःख आहे. " हे सर्व मजकूर राजश्री बाळाजी विष्णु सहस्त्रबुद्धे व विसाजी नारायण वाडदेकर यांनीं

वाड्यांत जाऊन रुबरूराव यांजला पाहून वडिलाकडे (परशुराम भाऊंकडे) वर्तमान कच्चें लिहून पाठविलें असेल. राव यांची प्रकृति ठीक नाहीं. दैवी ; मानषी उपाय बहुत होत आहेत. श्रीहरी आरोग्य करील " ( खरे भा. ९-३६४४ ) दुसऱ्या अेका पत्रांत मृत्यूचें वर्तमान खालीलप्रमाणें आहे. "कैलासवासी रावसाहेब आश्विन शु. १४ मंगळवारीं गजराचे वेळेस देवाज्ञा जाहले. चौकीं पहारे बंदोबस्त. पत्रीं काय लिहूं दुकानें बंद. रस्त्यांतून कार्याकारण मनुष्य फिरतें " ( खरे भाग ९-३६४६ ) परशुरामभाऊ आपल्या पत्रांत खालीलप्रमाणें लिहितात. " श्रीमन्त आमरणांत बोलत होते. बोलून चालून राजश्री नानास सांगितलें आमची वेळ जवळ आली आम्हास राज्याची अिच्छा नाहीं. तुम्ही आमचे नांवाचा दुसरा करणें. आपण सूर्य मंडळ भेद करून जातों अशों अनेक प्रकारचीं अन्याजवळ भाषणें केंलीं. ते समयीं कोणास खरी वाटलीं नाहींत. आतां सर्वांस वाटतें. असो. त्यांनीं आपला अवतार समाप्त केला. आतां पुढें हे विवंचना करितात." ( खरे ९-३६५० ) ✽

---

✽ ( टीपः—सवाई माधवरावाचे मृत्युसंबंधानें वर जे उतारे दिले आहेत त्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं श्रीमंतांनीं उडी टाकण्याचे आधीं ८।१० दिवस त्यांची प्रकृति बरी नव्हती व औषध उपाय चालू होते. वस्तुस्थिति अशी असतां मराठ्यांचे इतिहासकार ग्रॅांट डफ आणि तसेच इतर कांहीं लेखक यांनीं या प्रकरणीं असें लिहिलें आहे कीं नानांनीं अधिकाराचा हांवरेपणा धरिल्यामुळें अणि बाजिराव प्रकरणीं नानांनीं केलेल्या श्रीमंतांच्या कानउघाडणीमुळें श्रीमंतांनीं त्रासून प्राण दिला. मरण समई बाजीरावास गादीचे धनी करावे म्हणून श्रीमंतांनीं बाबा फडक्यांस सांगितल्याचेंहि डफ साहेबांनीं लिहिलें आहे. आतां या बाबतींत खरा प्रकार काय हें पाहतां श्रीमंतांनीं बाजीरावास गादीचे धनी करावे असें सांगितल्याबद्दल कोठेंहि आधार उपलब्ध नाहीं. आधार आहे तो नेमका उलट अर्थाचा आहे. वर दिलेल्या परशुरामभाऊंच्या ÷

सवाई माधवरावाच्या मृत्युमुळें राज्यांत मोठाच गोंधळ उत्पन्न झाला नाना फडणीसांनीं आजपर्यंत आपलें बुद्धिसामर्थ्य खर्च करून उदयास आणलेलें मराठ्यांचे राज्य धुळीस मिळण्याचाच प्रसंग आला. अशा स्थितींत पुढें काय करावें ही मोठीच विवंचना नानास उत्पन्न झाली. राज्याचा वारसा वास्तविकरीत्या दादासाहेबांचा कैदेंत असलेला मुलगा बाजीराव

÷ पत्रांत नानाला बोलावून श्रीमंतानीं मरण समयीं काय सांगितलें तें स्पष्ट दिलें आहे. "आमची वेळ जवळ आली. तुम्ही आमच्या नावाचा दुसरा करणें" असें श्रीमंतांनीं नानाला सांगितल्याचें परशुराम भाऊसारखे जबाबदार गृहस्थ लिहीत आहेत. "आमच्या नावाचा दुसरा करणें" याचा अर्थ बाजीरावाला धनी करणें असा केंव्हांहि होणार नाहीं. आमच्या नांवाचा दुसरा करणें म्हणजे दत्तक घेणें हाच अर्थ शक्य आहे. अर्थात बाजीरावाला धनी करावें असें श्रीमंतांनीं बाबा फडक्यांस सांगितल्याचें डफ साहेब लिहितात तें निराधार आहे हें सांगावयास नकोच आतां श्रीमंतांनीं नानाच्या जाचाला त्रासून प्राण दिला या डफ साहेबांच्या लिहिण्याला तरी काय आधार आहे याचा विचार करतां एक साहेबांनीं याहि बाबतींत थापच ठोकून दिली आहे हें आतां पु. रे. रेकॉर्ड मधील पुराव्यावरून स्पष्ट होत आहे. सवाईमाधवरावाच्या मृत्यूची बातमी इंग्रजांचा वकील युथाप यानें खालील प्रमाणें लिहिली आहे.

"I have the honour to acquaint you with the death of the Peshva, which happened yesterday evening about 7 O'clock in consequence of a fall from an upper apartment, in the morning of 25th of October 1795. The Peshawa in a temparary fit of delirium or derangement jumped or fell from an upper room or terrace into a fountain below" (P.R.C, 2-264-265)

वरील उताऱ्यावरून पेशव्यांनीं वाताच्या लहरींत उडी टाकली हें परस्पर त्रयस्थाच्या पुराव्यावरून स्पष्ट आहे.)

याजकडे येत होता. तथापि राघोबाची पूर्वीची परंपरा व त्याचा मुलगा बाजीराव याचे नानाच्या नजरेस आलेले गुण हे पाहातां बाजीरावाला गादीवर आणलें तर राज्य सुरळीत चालेल असें नानांना वाटत नव्हतें. अर्थात दुसरा मार्ग म्हणजे सवाई माधवरावाच्या बायकोच्या मांडीवर दत्तक देऊन राज्यकारभार चालविणें हा होता, व नानाच्या मनांत पहिल्यानें हाच विचार आला. पण हें करावयाचें तर राज्यांतील इतर सर्व प्रमुख सरदारांची या गोष्टीला संमत्ति घेणें जरूर होतें. या करितां नानांनीं शिंदे, होळकर, भोंसले, पटवर्धन व रास्ते वगैरे प्रमुख सरदारांस त्वरेनें पुण्यास बोलाविलें. पेशव्याच्या सुतकांतच परशुरामभाऊ पुण्यास येऊन दाखल झाले. होळकर पुण्याचे आसपासच होते. भोंसल्यांनीं आपला वकील पाठविला. शिंद्यांचा मुक्काम जांभ गावींच होता. त्यांनीं आपले कारभारी बाळोबा तात्या पागनीस व जिवबादादा बक्षी यांस पुण्यास पाठविलें. सर्व प्रमुख मंडळी पुण्यास आल्यावर पुष्कळ भवति न भवति झाली. त्यांत असें ठरलें कीं बाजीराव व त्याचे बंधु चिमाजीअप्पा यांपैकीं कोणासहि गादीचे धनी न करितां सवाई माधवरावांची बायको यशोदाबाई हिच्या मांडीवर गोत्रजांपैकीं मुलगा दत्तक देऊन त्याच्या नांवें राज्यकारभार चालवावा. नानांनीं ठरविलेल्या या विचाराला त्यावेळीं सर्वांनीं मान्यता दिली. व याप्रमाणें करावें अशा अभिप्रायाचीं यशोदाबाईच्या नांवाची पत्रें सर्व सरदारांनीं लिहून दिलीं. अितकें झाल्यावर भटाच्या घराण्यापैकीं किंवा तसा कोणी नच मिळाल्यास इतर गोत्रजांपैकीं मुलाची निवड करण्याच्या उद्योगास नाना लागले.

दत्तक घेऊन राज्यकारभार चालविण्याचो नानांची कल्पना राज्याच्या हिताची होती यांत शंका नाहीं. कारण राघोबाची पूर्वपरंपरा आणि त्यांचे पुत्र बाजीराव यांचे गुण नानास माहीत होते. तेंव्हा हे दिवटे राज्याचे धनी झाल्यास राज्याचें वाटोळें होण्यास वेळ लागणार नाहीं. हें नानांना पक्कें माहीत होतें. आणि म्हणूनच त्यांनीं सर्व प्रमुख सरदारांना बोलावून दत्तकाची योजना सर्वांच्यामतें ठरविली होती. पण सर्वसामान्य जनतेची दृष्टी

नानाइतकी दूरवर पोचणारी नव्हती. पेशव्याच्या घराण्यांत औरस वंश जिवंत असतां दत्तक घेण्याची कल्पना त्यावेळच्या महाराष्ट्रीय जनतेला थोडी चमत्कारीकच वाटली. शिवाय बाजीराव दिवटेच निघतील असें मानण्यास या लोकांना कांहींच कारण नव्हतें अशा स्थितींत दत्तकाच्या या प्रकरणाचा जम पहिल्या पासूनच नीट बसला नाहीं. मागें नारायण-रावाच्या खुनाच्यावेळीं लोकमताचा जो पाठिंबा बारभाईच्या कारस्थानास मिळाला त्याच्या नेमका उलट प्रकार यावेळीं झाला व जो तो दत्तकाच्या या कल्पनेमुळें नानांची कुचेष्टाच करूं लागला.

बाजीराव हे वयानें यावेळीं सुमारें अेकवीस वर्षांचे होते. त्याचें वय जरी फार नव्हतें तरी त्याचा स्वभाव मात्र मोठा उपद्व्यापी मतलबी आणि पाताळयंत्री होता. कारस्थानें करण्याची त्याची बुद्धीहि नानापेक्षां कांहीं कमी नव्हती. दत्तकाची योजना लोकांना फारशी मान्य नाहीं ही गोष्ट बाजीरावाच्या कानावर जातांच त्यानें नानाचा डाव उलटविण्याचा उद्योग आरंभिला. सर्व मराठे सरदारांत यावेळीं शिंद्याअितका जबरदस्त सरदार दुसरा कोणीहि नव्हता. ज्याचा मनगटाचा जोर त्याचें राज्य अशी त्यावेळची स्थिति होती. त्यामुळें शिंद्याशीं संधान बांधल्यास नानावर मात करतां येईल असें बाजिरावानें ठरविलें. नानाला चकवून ज्यानें सवाई माधवरावाशीं संधान बांधिलें त्याला शिंद्याशीं संगनमत करण्यास फारशी अडचण भासली नाहीं. शिंद्याचा दिवाण सदाशिव मल्हार याला आत्मविश्वासांत घेऊन बाजीरावानें जुन्नरच्या आसपास त्याच्या पांचसहा वेळां गुप्तभेटी घेतल्या व त्याच्याशीं असा पक्का ठराव केला कीं, शिंद्यानीं बाजीरावास पेशव्याच्या गादीवर बसवावें व बाजीरावानें शिंद्यास सव्वाकोट रुपये रोख द्यावे. व पंचवीस लक्षांची जहागीर द्यावी. हा करार ठरला तेंव्हा शिंदे गोदावरी पलिकडे गेले होते व त्यांच्या पलटणाचे कंपू व तोफखाना बऱ्हाणपुरास पोचला होता. जुन्नरला बाजीरावाशीं करार पुरा होऊन मसलत सिद्ध झाल्याचें शिंद्याला कळतांच त्यानें जागच्या जागींच मुक्काम केला व बऱ्हाणपुराहून तोफा व फलटणें परत बोलाविलीं. अिकडे पुण्यास

मराठी ग्रंथ संग्रहालय

बाळोबा तात्या व जिवबादादा बक्षी हे शिंद्याचे कारभारी होते. त्यांना शिंद्यानें बाजीरावाशीं झालेल्या कराराचा अिषारा देऊन सावध रहाण्यास सांगितलें. अितकें झालें तरी नानाला या कारस्थानाचा पत्ता लागलाच नव्हता. नाना दत्तकाच्या योजनेंतच गुंतले होते. मुलाची तपासणी होत होती आणि दत्तकप्रकरणाचे कागदपत्र तयार करून त्यावर सर्वत्रांची संमति घेण्याचें काम सुरू होतें. या कागदपत्रांच्या याद्या नानांनीं सर्व प्रमुख सरदारांपुढें ठेवतांच शिंद्याचे कारभारी बाळोबातात्या व जिवबा बक्षी हे या गोष्टीस मान्यता देण्यास टाळाटाळ करूं लागले. शिंद्याच्या कारभाऱ्यांचें हें वर्तन त्यांना शिंद्याकडून मिळालेल्या पूर्व अिशाऱ्याप्रमाणें सुसंगतच होतें. पण शिंद्यांच्या या वर्तनाचा नानास कांहींच उलगडा होईनासा झाल्यामुळें नाना व त्याच्या पक्षाचे अितर सर्व लोक मोठ्याच बुचकळ्यांत पडले. *

---

* ( टीप— नानानें दत्तकाची योजना केली ती सर्वांच्या विचारानेंच केली होती. या संबंधानें परशुरामभाऊ खालीलप्रमाणें लिहितात. "पुढील विचाराची गोष्ट दत्तक घ्यावा कीं औरसांपैकीं जेष्ठ कनिष्ठ आणावें या विषयींची वाटाघाट आजपावेंतो होत होती. दत्तकाविषयीं नबाबाचीं व भोंसले यांचीं पत्रें आलीं व येथील अधिकारी यांच्या मतास तेंच आलें. याजवरून शिंदे व होळकर यांचाहि सल्ला येथील मतानुरुप आला. आज रविवारी एकादशी १६ घटका दिवसास एक वाक्यता होऊन दत्तक घ्यावा असा निश्चय झाला या उपर मुलाचा शोध करतील." (खरे९-३६५४ ). वरील पत्रावरूस शिंदे, होळकर, भोसले वगैरेंनीं दत्तकाला संमति दिली होती हें स्पष्टच आहे. वरील ठरावाप्रमाणें होळकर व शिंदे यांनीं स्वदस्तुरचीं दत्तक घेण्याच्या संमतिचीं पत्रेंहि लिहून दिलीं (खरे ९-३६५५) हें पत्र होळकरांच्या संमतीचें व खरे ९-३६५९ हें पत्र शिंद्यांच्या संमतीचें उपलब्ध आहे. असें असतां शिंद्यांनीं अेकदम उलट खाऊन दत्तकाच्या योजनेस विरोध केला. (खरे ९-३६६१ ) आणि होळकरालाहि वळवून ¶

शिंद्याचा विरोध स्पष्ट झाल्यावर पुढें काय करावयाचें या संबंधानें नानांना मोठीच काळजी उत्पन्न झाली. शिंद्याच्या हालचालीच्या बातम्या हळू हळू कानावर येऊं लागल्या व शिंदे जुन्नरास जाऊन बाजीरावास घेऊन येणार याविषयीं कांहीं शंका राहिली नाहीं. हें उघड झाल्यावर नानांनीं दुसरीं एक योजना आखली नानांनीं आपल्या विश्वासांतले रास्ते, पटवर्धन वगैरे सरदारांचे मत घेऊन असें ठरविलें कीं शिंदे जुन्नरास जाऊन पोंचण्याचे आधींच

¶ त्याच्याकडूनहि दत्तकाला विरोध करविला. ( खरे ९–३६६२ ) शिंदे होळकरांच्या या विरोधाचें कारण बाजीरावानें शिंद्यांशीं केलेला गुप्त करार हेंच होय हें उघड आहे. शिंदे-बाजीरावाचा हा करार अितका गुप्त होता कीं त्याची दादहि नानास लागली नाहीं. या कराराची बातमी पहिल्यानेंच नानास समजली ती निजमाकडून समजली. ( खरे ९–३६६९ ) तेव्हां नाना जागे झाले व शिंद्यांच्या वर्तनाचा खुलासा त्यांना समजला. वास्तविक अशी स्थिति असतां म्हणजे शिंदे व बाजीराव यांचा गुप्त करार झाल्यामुळें शिंदे दत्तकाच्या योजनेच्या विरुद्ध गेले असतां जिवबादादा बक्षी यांचे चरित्रकार आपल्या ग्रंथांत म्हणतात कीं, " श्रीमंत सवाई माधवराव यांनीं मरणसमईं जिवबादादांस सांगितलें कीं आमचे वंशांतील गादीवर बसवावा. दत्तक करून नाना बसवितील तर बसवूं न द्यावें. या प्रमाणें हातावर हात मारावा. त्यावरून जिवबादादांनीं सांगितलें कीं ही गोष्ट आम्हाकडे लागली आज्ञेप्रमाणेंच करूं. " ( जिवबादादा बक्षी चरित्र पान २११–१२ ) वरील हकीगत खरी असली तर दौलतरावांनीं दत्तकाच्या संमतीचें नानांना पत्र दिलें त्यावेळीं जिवबादादांनीं सवाई माधवरावांना मरणसमईं दत्तक न घेण्याविषयीं दिलेल्या वचनाची आठवण दौलतरावास देऊन दत्तकाच्या योजनेला पहिल्यानें विरोध करावयास पाहिजे होता. पण तसें कांहीं अेक न करतां नानांनीं जिवबादादाचेंहि मत या दत्तकप्रकरणीं घेतलें तेव्हां जिवबादादांनीं खालीलप्रमाणें सांगितल्याचें जिवबादादाचे चरित्रकार आपल्या ग्रंथांत लिहीत आहेत. "आपला धनी शिंदा तो तरूण ×

आपण जुन्नरास जाऊन बाजीराव, चिमाजीअप्पा, अमृतराव या सर्वांना पुण्यास आणावें व पूर्व योजनेप्रमाणें दत्तक न घेतां चिमाजी अप्पास यशोदाबाईच्या मांडीवर देऊन त्यालाच पेशवा करावा. असें केल्यानें औरसवंशाला मागें टाकल्याची तक्रार शिंदे करीत आहेत ती त्यांना करतां येणार नाहीं व शिंद्याच्या कारवायांना चांगलाच खो मिळून आपलेंहि काम होईल. शिवाय पुण्याचे लोकमतहि दत्तकाला फारसें अनुकूल नव्हतें तेहि चिमाजी-

---

× आहे. यास्तव त्याचें सांगणें उपयोगी नाहीं वरकड भोंसलें वगैरे पुरातन मोठमोठे सरदार आहेत. ते सांगतील तें योग्य " (जिवबादादा बक्षी चरित्र पान नं. २१३)वरकड भोंसले वगैरे सरदारांनीं दत्तकाला संमति आगाऊच दिली होती. जिवबादादाचें तसेंच मत पडलें. अर्थात दौलतरावांनीं दत्तकाच्या संमतीचें पत्र दिलें तें जिवबादादाच्या संमतीनेंच दिलें. पण यावेळीं जिवबादादाना सवाई माधवरावांना दिलेल्या वचनाची आठवण कशी झाली नाहीं याचा उलगडा जिवबादादाचे चरित्रकार कांहींच करीत नाहींत. पुढें दौलतरावांनीं दत्तकाला विरोध करून बाजीरावाला गादीवर आणण्याची खटपट केली तेंव्हा मात्र जिवबादादांनीं आपल्या मरणापूर्वी बाजीरावास गादीवर बसविण्याविषयीं दौलतरावास सांगितल्याचें जि. दादाचे चरित्रकार लिहीत आहेत.(जि. दादा बक्षी चरित्र पा. २१८)पण याच पानावर शिंदे व बाजीराव यांचीं खलवतें होऊन शिंद्यानें बाजीरावास गादीवर बसविल्यास बाजीरावानें शिंद्यास चार लक्षाचा मुलुख व सैन्यास येईल तो खर्च द्यावा अशी हकीगत ग्रँटडफच्या बखरिच्या आधारावरून लिहिली आहे. तात्पर्य शिंदे बाजीराव यांचा झालेला गुप्त करार जिवबादादाचें चरित्रकारहि मान्य करीत आहेत. या सगळ्या हकीगतीचा निष्कर्ष असा कीं शिंद्यांनीं दत्तकाच्या योजनेला केलेला विरोध हा सवाई माधवरावांना दिलेल्या वचनामुळें नसून बाजीरावानें शिंद्यांच्या तोंडावर जादा जहागिरीच्या लोण्याचा गोळा मारल्याबरोबर शिंदे एकदम उलटले व त्यांनीं दत्तकाच्या संमतिचें स्वतःच्या सहिचें पत्र लाथाडून बाजीरावाला गादीवर आणण्याची खटपट सुरु केली.)

लाच दत्तक घेतल्यामुळें आतां विरुद्ध जाणार नाहीं. ही योजना ठरविण्यांत नाना व परशुरामभाऊ यांनीच पुढाकार घेतला व त्या उद्योगाला ते लागलें. चिमाजीअप्पा हा यशोदाबाईचा चुलत सासरा होत होता. सासऱ्याला सुनेच्या मांडीवर दत्तक देणें ही गोष्ट जरा चमत्कारिकच होती. कोणतेंहि धर्मशास्त्र झालें तरी तें अशा प्रकारच्या दत्तकविधानास मान्यता देणारें असें आढळणें शक्यच नव्हतें. पण राजकारणांत काय करावें लागेल आणि काय नाहीं याचा नेम नसतो. राज्याच्या हिताच्याच दृष्टीनें सर्व गोष्टी कराव्या लागतात हें लक्षांत घेऊनच नाना व परशुरामभाऊ यांनीं हा द्राविडीप्राणायाम सुरु केला होता. आतां चिमाजीअप्पास दत्तक घेण्याऐवजीं बाजीरावासच दत्तक घेण्याची योजना नाना व भाऊ यांनीं कां केली नाहीं अशी शंका कोणास येईल तर त्याला उत्तरहि राजकारण हेंच होतें. चिमाजीअप्पाच्या ऐवजीं बाजीरावास दत्तक घेतां आलें असतें तर तें नाना व भाऊ यांनीं केलें नसतें अशांतला भाग नाहीं पण बाजीरावापेक्षां चिमाजीला दत्तक घेणें ही गोष्ट नाना, भाऊंना राज्याच्या हिताची अशी वाटली. म्हणून त्यांनीं चिमाजीलाच दत्तक घेण्याची खटपट सुरू केली. त्याचें मुख्य कारण असें कीं बाजीरावाचा स्वभाव नानास माहीत होता. ते आधीं दत्तकाला तयार होण्याचाच संभव नव्हता. त्यांना बाजीराव, रघुनाथ या नांवानेच पेशवाई पाहिजे होती. अणि तसें झालें असतें तर नानानीं सवाई माधवरावाच्या नांवाने केलेलें सर्व कारारमदार बाजीरावानें मानले नसते आणि पुढें झालेल्या अनेक उलाढालीनंतर बाजीरावाला पेशवाई मिळाली तेंव्हा त्यानें तसेंच केलें. या कारणास्तव नाना भाऊंनीं चिमाजीलाच गादीवर बसविण्याची खटपट चालविली. चिमाजीला दत्तक घेऊन गादीवर बसविण्याचें नक्की ठरल्यानंतर बाजीराव, चिमाजी, अमृतराव वगैरेना जुन्नराहून पुण्यास आणण्याची महत्वाची कामगिरी करावयाची होती. ही कामगिरी करण्यास परशुरामभाऊशिवाय दुसरा कोणी लायक माणूस नानाजवळ नव्हता. स्वाभाविकच नानांनीं हें काम भाऊंकडे सोपविलें व त्यांची जुन्नरास रवानगी केली. ही

३८५४



कामगिरी शिंदे जुन्नरास पोंचून त्यांच्या हातांत बाजीराव सांपडण्याच्या आधींच मोठ्या त्वरेनें करावयाची होती. या संबंधाची हकीगत परशुराम-भाऊंनीं अेका पत्रांत खुलासेवार लिहिली आहे. त्यांतला महत्वाचा मजकूर खालीलप्रमाणें आहे. " नबाबाचें पत्र सरकारींत आलें कीं " तुमच्या घरीं राजकारणें बहुत होतात, परंतु तुम्ही आम्हांस कळवीत नाहीं. आयत्या वक्तास म्हणाल कीं फौज जमा करावी त्यास तेंव्हा कशी जमा होईल काय तें कळवावें. नाहींतर जसें पाहूं तसें करूं." त्याजवरून कारभारी यास त्याचा विचार पडला आहे. शिंदे यांनीं श्री. कै. दादासाहेब यांच्या पुत्राशीं राजकारण केलें हेहि प्रकटांत आलें. कोणा कोणाशी संधानें होतीं. तीं फुटलीं व जांभगांवाहून पुढें जाण्याचा शिंद्याचा मनसुबा यापूर्वी निराळा होता. आतांचें पाऊल वांकडेपणाचें आहे. फौज जमा करूं लागले व सडें होतात अशी बातमी आली. दत्तकाबिषयीं पहिला शिंद्याचा रुकार होता. आतां तें लक्ष नाहीं. आंतून राजकारण तर त्यांचें सिद्ध जाहलें. यास्तव येथें ठराव झाला कीं कैलासवासी यांचे पुत्र कोठें आवाज निघाला नाहींतों हाताखालीं घालावे व त्यांपैकी श्री. रा. चिमाजी अप्पा यांस पदावर बसवावें. म्हणजे त्याचें ( शिंद्याचे राजकारण ) व्यर्थ जाहलें. व बंदोबस्त आपला आपल्याहातीं राहातो. मग त्यांनीं काय करावयाचें आहे. असा इत्यर्थ होऊन आम्ही आज षष्ठी रविवारीं दोन प्रहरदिवसास पुण्याहून निघोन जुन्नरास जावयाकरितां गेलो. समागमें रास्ते यांचे पथक व गोविंद-राव पिंगळे आहेत. चि. रा. महादजीपंत दाजी काल कात्रजेजवळ आले. आज त्यांसहि बरोबर घेतलें. गोष्ट निरुपाय सबब जाणें प्राप्त. येथें गेल्या-वर जेष्टासी ( बाजीरावाशी ) बोलावयाचे कीं "श्रीमंत कैलासवासी नानासाहेब यांचा वंश चालविणें दरकार. याजकरितां चिमाजी अप्पा यांस पदीं बसविणार. तुम्ही जवळ असावें. या बोलण्यास कबूल न होता तिकडील ( शिंद्याकडील ) राजकारणावर नजर ठेवून अथवा आपल्या स्वार्थासाठीं वोढ घेऊन बोलूं लागल्यास खडखडीत चारगोष्टी नानासाहेबाशिवाय या दौलतीस दुसऱ्याचें नांव करावयाचें नाहीं, याजबद्दल कांहींहि घडो. पर हेंच

करणें जरूर अशा तऱ्हेच्या सांगोन पहाव्या. ताळ्यावर न येत तर कसेंहि करून त्यास मंडळीसुद्धां हाताखालीं घालोन येथें आणोन पाहिजे तसें करावें. असा बेत झाला. आहे. ईश्वराच्या इच्छेनें घडेल तें खरें. हुजरात जमा करावयाचा निश्चय जाला. आज पांच सात रोज या कामाविशी भारी घोळ पडला. या रंगास तर आलें आहे. बळवंतराव ! हें पत्र तुम्ही पाहोन तासगावास चिरंजिवाकडे पाठवून द्यावें या प्रकरणीं बहूत अेक बोलणी आहेत. ती पत्रीं किती लिहावी. ह्यांशील गोष्ट रंग समजला. शेवटास जाईल तें खरें श्री इच्छा प्रमाण. मी निघोन गेलों. घडेल तें मागाहून वरचेवर लिहितो." ( खरे ९–३६६९ )

वरील पत्रांत लिहिल्याप्रमाणें नाना व भाऊ यांचा वेत ठरून बाजीराव वगैरे मंडळीस आणण्याकरितां परशुरामभाऊ ता. १४।२।१७९६ रोजीं पुण्याहून जुन्नरास जाण्याकरितां निघाले. परशुरामभाऊच जुन्नरास निघाले ते पोक्त सरंजामासहच निघाले होते. भाऊंबरोबर त्यांची स्वतःची फौज होतीच पण त्या शिवाय रास्ते व प्रतिनिधी यांचीं पथकें व सात आठ पागा तीन हजार गारदी दोन लहान तोफा व बाणांच्या कच्था असा लढाईचा आणखी सरंजामहि होता. सवाशें ऊंट, फरासखान्याचें सामान, बोथाटी बारदार, इटेकरी व पट्टेकरी चोपदार व भालदार व सोन्याच्या काठीचे चोपदार, तीन अंबाऱ्या, चार पालख्या हुजुरपागापैकीं सरंजामसुध्दां वीस कोतवाल घोडीं या प्रमाणें सामान भाऊबरोबर होतें.

ता. १४ फेब्रुवारी रोजीं सायंकाळीं अडीच प्रहर दिवसास वरीलप्रमाणें सरंजामासह भाऊ पुण्याहून निघाले ते त्याच दिवशीं अिंद्रायणी नदीवर मोशीच्या मुक्कामास आले. तेथें ते उतरतात तोंच पुण्याहून नानाजी चिठ्ठी आलीं कीं शिंद्याचे लोक लवकरच जुन्नारास येणार आहेत ते तेथे जाण्याच्या आधीं आपण पोचलें पाहिजे. याकरितां रातोरात पुढें चालते व्हा. नानाचा असा निरोप आल्यामुळें भाऊ मध्यरात्रीच्या पूर्वींच कूच करून निघाले ते सूर्योदयास खेडावरून वडगांवास आले. तेथून त्यांनी आपले पुत्र हरिपंतबाबा व महादजीपंत दाजी यांजबरोबर कांहीं फौजा देऊन त्यांस तसेंच पुढें जुन्न-

रास पाठविलें व आपण घाइघाईनें बाकीच्या मंडळीसह् वडगांवास पुजा व भोजन आटपून सायंकाळीं जून्नराजवळ येऊन कुकडी नदीवर मुक्काम केला. या मुक्कामावर आल्यावर शिंद्यांचे लोक जुन्नारापासून वीस पंचवीस कोसावर आल्याची बातमी भाऊंस समजली. याच ठिकांणीं बहिरोपंत मेहेंदळे व गोविंदराव पिंगळे हे भाऊस येऊन मिळाले. मग दुसऱ्यां दिवशीं या मंडळीसह भाऊनीं जुन्नरास बाजीराव साहेबांची भेट घेतली भाऊ जातात तों आधींच शिंद्यांचे वकील रामजी पाटील हे बाजीराव साहेबांजवळ आगाऊच येऊन बसले होते.

भाऊंची व बाजोरावाची भेट झाल्यावर प्रथमतः सामोपचाराचें बोलणें बोलून बाजीरावसाहेबांकडून चिमाजी अप्पास मागून घ्यावें असा नाना भाऊचा बेत ठरला होता. श्रीमंत न वळतील तर धाक दपटशा देऊनसुध्दां आपला कार्यभाग साधावा असें भाऊना नानाचें सांगणें होतें पण जुन्नरास येऊन भाऊंनीं रागरंग पाहिला तों त्यांना सर्वच रंग निराळा दिसला शिंद्याशीं आपण राजकारण केल्यामुळेंच नानानीं भाऊना आपणाकडे पाठविलें हें त्या मतलबी बाजीरावानें पूर्ण ओळखिलें होतें. जोपर्यंत शिंद्याचा आधार आपणांस आहे तो पर्यंत नाना भाऊंच्या बोलण्यास भीक घालण्याचें आपणांस कांहीं कारण नाहीं. अशा समजुतीवर बाजीरावानें भाऊंना अगदींच उडवून दिलें. भाऊंनीं जें जें म्हणावें त्याच्या उलट बाजिरावानें बोलावें अशी घासाघीस सारखी होऊं लागली. भाऊंनीं चिमाजीअप्पास आमच्या स्वाधीन करा असें म्हणतांच बाजीरावानें तें साफ, नाकारलें. श्रीमंत म्हणालें कीं, आप्पास मी देणार नाहीं. मलाच तुम्हीं गादीवर बसविलें पाहीजे. तुम्हीं व नाना सांगाल त्या प्रमाणें मी वागेन. मला बाजूला सारून माझ्या धाकट्या भावाची स्थापना तुम्हीं कशी करतां मीच गादीवर बसणार. तुम्हांला हें करावयाचें नसल्यास आजपर्यंत बाहेरच्या दत्तकाची योजना करण्याचें तुम्हीं ठरविलें होतें त्या प्रमाणें खुशाल करा. यशोदाबाईच्या मांडीवर चिमाजीला बसवून त्याची दिवाणगीरी तुम्हांला देतों असें भाऊनीं पुन्हां बाजीरावास सांगितलें.

तेंही बाजीरावानें ऐकिलें नाहीं. शेवटीं तुम्हींच बाजीराव माधव होऊन गादीवर बसा असेहि भाऊनीं सांगून पाहीलें; पण बाजीराव तेंही ऐकेनात. बाजीरावाचें म्हणणें एकच कीं, नानासाहेबांचा वंश खुंटला त्याला कांहीं इलाज नाहीं. तुम्ही चिमाजीला दत्तक घ्याल तर तेंहि मी करूं देणार नाहीं. मीच गादीवर बसणार. व "बाजीराव रघुनाथ प्रधान" याच नावानें बसणार. आम्हीं दुसऱ्याचे ओटचांत कधींही जाणार नाहीं. श्रीमंतांचीं अशीं उत्तरें होऊं लागल्यामुळें परशुरामभाऊची मति कुंठित झाली; व पुढें काय करावें या विचारांत ते पडले.*

शिंद्यांच्या विश्वासावर अवलंबून बाजीराव भाऊंना उडवाउडवीचीं उत्तरें देत होते पण शिंदे अजून जून्नरला आले नव्हते आणि भाऊ मात्र जुन्नरला तळ देऊन बसले होते. भाऊच्या व बाजीरावाच्या वाटाघाटींत आठ दहा दिवस गेले. त्या दरम्यान शिंद्यांनीं येऊन पोंचावें पण ते न आल्यामुळें बाजीरावाचें मन चलबिचल झालें. बाजीराव बऱ्या बोलानें न ऐकतील तर त्यांना व चीमाजीला वाटेल त्या उपायानें घेऊन यावें असा नानांचा भाऊंना हुकूम होता व या हुकुमाची बाजीरावाला माहिती होती शिंदे वेळेवर न आले तर भाऊ आपणांस जबरदस्तीनें नेतील कीं काय अशी विवंचना बाजीरावास उत्पन्न झाली व त्यावर तोडगा म्हणून बाजीरावानें भाऊंशीं मोठीं मायावी भाषणें करण्यास सुरवात केली शिंदे तर

* टीप—परशुरामभाऊ व बाजीरावसाहेब यांचीं जीं बोलणीं झालीं त्यांची सविस्तर हकीगत खरे भा. ९-पत्र नं. ३६७५, ३६७६, ३६७७ ७८,–३६८३ आणि ३६८५ या पत्रांतून स्पष्ट आली आहे. बाजीरावानें भाऊशीं बोलण्याचा जो चढासूर ठेविला त्याचें कारण एका पत्रांत खालील प्रमाणें स्पष्ट दिलें आहे. भाऊ लिहितात "शिंदे यांच्या राजकारणांवर व स्वार्थावर वोढ फार आहे. शिंदे यांनीं आपला कंपू पुढें वऱ्हाण पुरास रवाना केला होता; तो त्यांनीं माघारा आणविला" (खरे ९–३६७६) यावरून स्पष्ट आहे कीं, शिंद्यांचा जोर पाठीशीं असल्यामुळें बाजीराव एवढ्या दमानें भाऊजवळ बोलत होते.)

अजून येत नाहींत तेव्हां भाऊंची पायधरणीं करून आपण गादी मिळवावी अशी बाजीरावानें युक्ती योजिली. पण बाजीरावाचें हें म्हणणें मान्य करण्यापूर्वी तें नानास कळविणें जरूर होते व नानांस कळवून मग श्रीमंतानां गादीवर बसण्याकरितां घेऊन जाईन असें भाऊनीं श्रीमंतास सांगितलें. *

---

*(टीप—बाजीराव मायावी व गोड भाषणें करण्यांत किती पटाईत होता याचा मासला खालील पत्रांत आढळतो "राजश्री बाजीरावसाहेब यांची व श्री. राजश्री भाऊसाहेब यांची बैठक एकांतीं दोघांचीच झाली. त्या बैठकेंत भाऊसाहेब यांच्या पायावर डोकी ठेवून पदर पसरून अंजुळीपूट जोडून विनंति केली जें, मागील द्वेष तुम्हीं मनांत आणूं नये; मी आणणार नाहीं. वडिलांच्या जागीं मला आपण मान्य. हाच मनोदय माझा शपथ पुरस्सर आहे. धाकट्यास दौलतेवरी बसवावें आणि मी बंदीत रहावें हें आपल्या विचारास येतें कीं काय? या अन्वयें बहुत ग्लानतेची बोलणीं बोलून अश्रुपात गळूं लागले. तेव्हां त्याहीपेक्षां विशेषात्कारें भाऊसाहेबांनीं विनंति केली जे "स्वामी म्हणतात त्यास कबूल आहों परंतु या गोष्टीचा इतल्ला नानास देऊन स्वामीस घेऊन जातो" (खरे ९–३६८३) बाजीराव मतलबी भाषणें किती कौशल्यानें करीत असे याचें प्रत्यंतर बाजीरावानें भाऊसंबंधीं दुसऱ्या एका प्रसंगीं काढलेल्या उद्गारांवरून दिसून येतें. बाजीराव म्हणतो, "भाऊंस नानांनीं मजकडे जुन्नरास पाठविलें तेव्हां मी भाऊंस पाहून बहुत संतोष पावलों. आधीं भाऊ वृद्ध, त्यांतून एकवचनी, जितेंद्रिय, कुटुंबवत्सल आणि प्रसन्नवदन पाहोन भाऊंचे पायावर मस्तक ठेविला. आणि दादासाहेब भाऊस म्हणोन भाऊंचे वचनावर मी आणि चिमण्या (बंधु चिमाजी अप्पा) असे भाऊबरोबर खडकीच्या मुक्कामास आलों." (खरे ९– पान ४८०४) भाऊसंबंधानें काढलेले वरील उद्गार जरी योग्य असेच होते तरी बाजीरावाची भाऊंजवळ जी पुढें वर्तणूक झाली त्यावरून वरील गुणवर्णन हें तोंड देखलेपणाचें होतें यांत शंका नाहीं.)

बाजीराव भाऊंचें कांहींच ऐकत नसस्यामुळें पुढें काय करावें हा मोठाच पेंच भाऊपुढें उभा राहिला. अर्थात पुढील विचाराकरितां नानाचें मत घेणें प्राप्त आलें. या कामाकरितां भाऊंनीं गोविंदराव पिंगळे यांज-बरोबर पुण्यास नानाला निरोप पाठविला कीं आपण पुण्यास जी योजना ठरवून जून्नरला आलों त्यांपैकीं कोणतीहि गोष्ट बाजीराव कबूल करीत नाहींत व त्यापुढें आमचें कांहीं चालत नाहीं. आम्हांसच गादीवर बसवा असा त्यांचा हट्ट आहे. तेव्हां पुढें काय करावें? भाऊ पुण्याहून निघाल्यापासून गोविंदराव पिंगळे नानास वरीलप्रमाणें निरोप घेऊन येईपर्यंत सुमारें १५ दिवसांचा अवधि लोटला. या अवधींत शिंद्यांनीं येऊन बाजीरावास घेऊन जावें. पण याचवेळीं शिंद्यांचे मुख्य कारभारी जिवबादादा बक्षी हे मृत्यू पावले. जिवबादादा हे आकस्मिक मृत्यु पावल्यामुळें शिंद्यांच्या लष्करची घडी थोडी विस्कळीत झाली व बाजीरावाजवळ कबूल केल्याप्रमाणें ते वेळे-वर जुन्नरला येऊं शकले नाहींत. जिवबादादा नंतर बाळोबातात्या यानीं शिंद्याच्या लष्करची पुन्हां सावरासावर करून आपल्या पलटणाच्या कंपूसह बाळोबा तात्या पुण्याच्या रोखें येण्यास निघाले. शिंद्याच्या लष्करासह बाळोबा पुण्यास येण्यास निघाले ही बातमी नानास लागलीच होती. इतक्यांत भाऊकडून पिंगळ्याबरोबर आलेला निरोप पोहोंचतांच नानानीं भाऊनां उलट निरोप पाठविला कीं, आतां घासाघीस घालण्यांत कांहीं अर्थ नाहीं. बाजीराव म्हणतील त्या अटी कबूल करून बाजीराव व चिमाजी अप्पा यांस घेऊन सत्वर पुण्यास यावें. नानांचा हा निरोप परशुरामभाऊस पोंहचतांच ते उभयतां श्रीमंतांची स्वारी बाहेर काढण्याच्या उद्योगास लागले.

बाजीरावाचें म्हणणें कबूल करून त्यांना गादीवर बसविण्याकरितां घेऊन जाण्यास परशुरामभाऊ तयार झाले हें पाहून बाजीराव फार खुष झाले होते. कारण भाऊ तें कबूल करते ना तर शिंद्यामार्फत गादी मिळवि-ण्याकरितां सव्हा कोट रुपये व पंचवीस लक्षांची जहागीर द्यावी लागणार होती. शिंद्यांची कामगिरी नाना भाऊंनीं केली. तर त्यांना कांहींच देण्याची

गरज नव्हती; त्यांचें आपलें जमलें तर ठीकच. कारण मग शिद्यांना सहजच स्पष्ट सांगतां येईल कीं, तुम्हीं वेळेवर न आल्यामुळें आतां आम्हीं तुमचें कांहींच देणें लागत नाहीं. फुकटांत पेशव्यांची गादी मिळविण्याचा हा योग आल्यामुळें बाजीरावाला आनंद होणें स्वाभाविक होतें, यांत शंका नाहीं.

जुन्नरचे दक्षिणेस बाराबावडीजवळ पुण्याहून गेलेला भाऊंबरोबरचा सरंजाम उतरला होता व तेथेंच डेरेहि दिले होते. या डेऱ्यांत श्रीमंत बाजीरावसाहेब तारीख २५ फेब्रुवारी सन १७९६ रोजीं येऊन राहिले. चिमाजी अप्पास यावेळीं बारावें वर्ष संपत आलें होतें. बाजीरावांनीं चिमाजीअप्पास बरोबर घेतलें, आणि आपली स्त्री व सापत्न बंधु अमृतराव यांस जुन्नरासच ठेविलें. दादासाहेबांवेळचे कारखाने, कापड, जवाहिर, नाटकशाळा वगैरे सरंजाम जुन्नरासच ठेविला; शागिर्दपेशापैकीं जुजबी माणसें व घोडे आणि कांहीं विश्वासू कारकून मात्र स्वारी बरोबर निघाले. श्रीमंत बाजीरावसाहेब चिमाजीअप्पासह जुन्नरास डेरे दाखल झाल्यापासून पुण्याजवळ खडकीच्या मुक्कामास येईपर्यंतच्या श्रीमंतांच्या स्वारीच्या प्रवासाची हकीगत मोठी मनोरंजक असल्यामुळें त्यांतील कांहीं महत्वाचा भाग खाली दिला आहे.

श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब व चिमाजीअप्पा व अमृतराव यांचे चिरंजीव असे त्रिवर्ग मुहूर्तेंकरून निघाले. बाजीरावसाहेब अंबारींत बसले. खवाशींत श्रीमंत राजश्री रघुनाथरावदादा, चिमाजीअप्पांचे खवाशींत श्रीमंत राजश्री हरीपंतबाबा व राजश्री बहिरोपंत मेहेंदळे होते. पुण्याहून कलाबतूची अंबारी आली होती त्या अंबारींत श्री राजश्री भाऊसाहेब बाजीरावसाहेबांस बसावें म्हणत होते. तेव्हां उत्तर जाहलें जे कलाबतूचे अंबारींत बसविणार आपणच आहांत. आज बसत नाहीं. तेव्हां ती अंबारी खुलीच राहिली. त्यांत अमृतराव यांचे चिरंजीव यांस बसविलें. स्वारीचे पुढें सांभाची पालखी निघाली. मागाहून स्वारी चालती जाहली. डावे बाजूस श्री राजश्री नारायणरावसाहेब यांची फौज होती. उजवे बाजूस रास्ते यांची फौज होती. दुरस्ता कोरबंदीनें गाडदी उभे होते. शिवनेरच्या किल्ल्या-

नजीक बाराबावडी म्हणून विहीर व बाग आंबराई आहे तेथें मुक्कामास आले. झाडून फौज तेथेंच आपले आपले विल्हेवार उतराव्या असा बेत होता. परंतु पाणी फौजेस पुरे असें नाहीं याजकरितां जुन्नरानजीक मुक्काम होता. तेथेंच पोहोंचवून माघाऱ्या गेल्या. श्री. राजश्री भाऊसाहेब मात्र श्रीमंताचे डेऱ्यासमीप डेरे देऊन राहिले. झाडून गाडदीहि तेथेंच होते. ते दिवशीं संध्याकाळीं भाऊसाहेबांनीं नारायणरावसाहेब यांजकडे सांगून पाठविलें जे पांचशें राऊत छबीन्यास पाठवावे. त्याजवरून राजश्री बाबाजी-पंत चाफेकर याजबरोबर पांचशें राऊत देऊन छबीन्यास पाठविले होते. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं श्री. राजश्री भाऊसाहेबांची फौज छबीन्यास आली. उपरांतीक बाबाजीपंत फौजसुद्धां गोटास गेले. छ १६ भृगुवारीं तेथेंच मुक्काम जाहला. श्रीमंतांस ते दिवशीं चतुर्थीचें उपोषण होतें. ते दिवशीं संध्याकाळची स्वारी तयार होऊन घोड्यावरून शिवनेरी किल्ला उजवा घालोन किल्याचे पश्चिमेस शिवा भवानी अर्ध्या डोंगरांत आहे. तेथें जावयास निघाले. मार्गी लांबदस्त मैदान पाहून श्रीमंत उभे राहिले व आमचे यजमान मंडळीस व राजश्री आबा शेलूकर यांस आज्ञा केली जे भरधांव घोडीं टाकणें त्याजवरून श्रीमंत राजश्री दादानीं व हरीपंत बाबानीं व नारायणरावसाहेब यांनीं घोडी टाकलीं. व आबा शेलूकर यानींहि टाकलीं. तेथून देवीचे दर्शनास गेले. दर्शन घेऊन किल्याचे उत्तरेस श्रीपंच लिंगेश्वर म्हणोन स्वयंभू लिंग आहे. तेथें गेले दर्शन करून कुकडी नदीवर सायंसंध्येस गेले. संध्याकरून दोन घटीका रात्रीस गोटास स्वारी आली व त्याबरोबर श्रीमंत राजश्री नारायणरावसाहेबहि डेऱ्यास गेले. छ १७ रोजीं मंदवारीं कूच जाहलें. स्वारी घोड्यावरच होती. दोन प्रहरीं श्री लेण्याद्री म्हणोन गणपती अष्ट विनायकांतील त्याचे दर्शनास गेले. दर्शनकरून जातेसमयीं डोंगर चढोन जावयाचा होता. चढाव फार नीट होता तेव्हां उभयतां श्रीमंत पाय उतारा बरोबर दादा व हरीपंतबाबा येणें प्रमाणें चढोन गेले. चढोन जावयाचा श्रीमंतांस बहूतसा आयास नाहीं. सह-जात आहे. श्री गणपती डोंगर तासोन आंत आहे. मंडप उत्तर दक्षीण चाळीस हात व पूर्व पश्चिम

पस्तीस हात येणेंप्रमाणें मध्यें खांब नसतां मंडप आहे. डोंगरच कोरलेला आहे. तेथून स्वारी उत्तुरास श्री. कपर्दीश्वर म्हणोन लिंग आहे. तेथें जाऊन दर्शन घेऊन कोसारास मुक्कामास आले. मजल दहा कोसांची जाहली. उत्तुरास मामलेदार यांनीं फलाहाराचें केलें होतें. तेव्हां आमचे यजमान मंडळीसह फराळ केले. छ १८ रोजीं रविवारीं कूच होऊन घोड्या वर स्वारी होती. बोसारचे श्री गणपतीचे दर्शनास गेले. अष्ट विनायकांतील गणपती. त्याचें दर्शन करून स्वारी चालती जाहली. मार्गी नारायण रावांजवळ अंगराईत निद्रा केली होती. चिमाजीअप्पा यांचा फराळ जाहला. नारायण गांवचे मामलेदारांनीं मिठाई व फळफळावळ आणिली होती. आमचे यजमानमंडळीसह फराळ जाहला. आणि स्वारी चालती जाहली. पुढें लांब दस्तमैदान पाहून भाले खेळावयास लागले. श्री. रा. दादास व हरीपंतबाबांस व नारायणरावसाहेब यांस भाले खेळावयास बोलाविलें. भाले खेळून स्वारी मौजे वडगांवनजीक कळंब घोडनदींतीरीं मुक्कामास दाखल जाहले. तेथून छ १९ रोजीं इंदुवारीं कूच करून अंबारींत स्वारी जाहली होती. खवाशींत श्री. रा. भाऊसाहेब होते. श्री. रा. चिमाजीअप्पाचे खवाशींत श्री. रा. दादा होते. पेठ म्हणोन गांव आहे. तेथील आंबराईत दोनप्रहरीं स्वारी आली. तेथें निद्रा जाहली. आप्पासाहेबांनीं फराळ केला. सहा घटका दिवसास तेथून स्वारी चालती जाहली. घोड्यावर स्वारी होती. मार्गी भाले खेळले. श्री. रा. दादा व बाबासाहेब भाले खेळावयास गेले होते. अस्तमानीं स्वारी खेडच्या मुक्कामास दाखल जाहली. खेडास श्री सिद्धेश्वर म्हणून स्वयंभू लिंग आहे त्याचें दर्शन घेऊन डेऱ्यास आलें. छ २० रोजीं भौमवारीं रा. गोविंदराव पिंगळे पुण्यास गेले होते ते आले. त्याचे बोलण्याकरितां मुक्काम जाहला. श्री. रा. हरीपंतबाबा व नारायणरावसाहेब पिंपळखरे यांचें घरीं भोजनास गेले होते. वस्त्रें श्री. रा. भाऊसाहेब व दादा विडे घ्यावयास गेले होते. वस्त्रें दिलीं. श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब व आप्पासाहेब प्रातःकाळीं भीमास्नानास गेले होते. माध्यान्ह स्नानास एकटे बाजीरावसाहेब गेले. माध्या-

न्हिक करून देव दर्शन घेऊन १६ घटका दिवसास भोजनास गेले. छ २१ रोजीं कूच जाहले. स्वारी घोड्यावरच जाहली होती. चाकणच्या गढीजवळ स्वारी आली तेव्हां गढीवरील पांच तोफांचे बार जाहले. तेथून पुढें येऊन आंबराईत निद्रा केली. सायंकाळच्या दोन घटिका दिवसास मौजे मोशी येथें मुक्कामास दाखल जाहले ते दिवशीं पुण्याहून श्री. रा. नानानीं श्रीमंतांकरीतां वस्त्रें व जवाहीर कंठी चौकडा व शिरपेंच या प्रमाणें प्रत्येक प्रत्येक उभयतांस व दोन भरजरी अबदागिऱ्या, येणें प्रमाणें अस्तमानी श्री. भाऊसाहेबांकडे पाठविली. त्यानीं श्रीमंतास प्रविष्ट केलीं. परंतु पुण्याहून आलेल्याचा अद्यापि उपयोग केला नाहीं. छ. २२ रोजीं मोशीहून कूच जाहलें. चौदा पंधरा घटका दिवसास स्वारी चालती जाहली. घोड्यावरच स्वारी जाहली होती. तेथून तीन कोसांवर आले. तेथें बाग व आंबराई बहूत शिरा होती. त्यांत स्वारी दाखल जाहली. तेथें निद्रा जाहली. श्री. रा. आप्पासाहेब यानीं यजमान मंडळीस बोलावणें पाठविलें. ती सारी मंडळी नेली. चार घटका बसले होते. उपरांतीक मंडळीसह फराळ जाहला. बाजीरावसाहेब निजले होते. ते सध्याकाळचे सहा घटिका दिवसास उठले. उपरांतीक द्राक्षें अंजीर भक्षून पोषाक घेऊन तयार जाहले तों श्री. रा. भाऊ साहेबानीं विसाजी पंताबरोबर सांगून पाठविलें जे स्वारी अंबारीत व्हावी तेव्हां उत्तर जाहलें जे आज घोड्यावरच बसतो. उदईक अंबारींत बसूं. याप्रमाणें भाऊस सांगोन काय उत्तर होतें तें सांगावें त्याप्रमाणें करूं म्हणोन आज्ञा जाहाली. त्याप्रमाणें वाडदेकर यानीं भाऊसाहेबांस विनंति केली. भाऊसाहेबांनीं उत्तम म्हणोन सांगितलें. हा निरोप पोंचतांच घोड्यावर स्वार जाहले. मार्गीं चार पाळ्या उभयतां खाशानीं घोडीं फेरली. संध्याकाळच्या चार घटका दिवसास खडकीनजीक पुणे येथील मुक्कामास दाखल जाहले. दोन प्रहरीं निद्रा आंबरांईत जाहली होती. तेव्हां मॉलिट दोन चार इंग्रजसह घोड्यावर बसोन व एक हत्ती येणेंप्रमाणें बागेभोवते फिरोन सारी स्वारी पाहोन आपले ठिकाणास गेले. ही बातमी

भाऊसाहेबांजवळ आली संध्याकाळीं श्रीमंतानीं श्रीमंत राजश्री नारायणरावसाहेब यांस भोजनास बोलाऊं कारकून पाठविला व श्रीमंतराव भाऊंसही बोलाविलें होतें सात घटका रात्रीस उभयतां श्रीमंतांच्या डेऱ्यास गेले. तेव्हां श्रीमंत राहुटींत बसले होते; तेथेंच गेले. पाठ बसावयास आणून देण्याविशीं आज्ञा जाहली. उपरांतीक श्रीमंत राजश्री नारायणरावसाहेब यांस पुसिलें जे तुम्हीं किती बंधु ?" तेव्हां यांनीं विनंति केली, चवघे बंधु. तेव्हां आणखो पुसिलें मातुश्री आहेत का ? यानीं उत्तर केलें मातुश्री देवाधीन जाहली. सापत्न माता आहे. त्यांस काय मुलें आहेत म्हणोन पुसिलें. तेव्हां उत्तर केलें, एक पुत्र आहे. आम्हीं प्रत्यक्ष तिघे. सापत्न एक. येणेंप्रमाणें उत्तर केलें. आणखी पुसिलें. तुम्हांस काय मुलें आहेत. तेव्हां बोलले नाहींत. मग श्रीमंतरावभाऊनीं उत्तर केलें जे अद्यापि मुलें नाहींत. बायकोस रजोदर्शन देखील नाहीं. तेव्हां श्रीमंत बोलले यांस किती वर्षें आहेत. तेव्हां सत्रा वर्षें म्हणून सांगितलें तेव्हां श्रीमंत बोलले माझे मतें वीस बावीस वर्षें असतील तथापि या वयांतही मुलें होतात असें बोलले. उपरांतीक पुसिलें गुदस्ता विठ्ठलराव लढाईंत कामास आले ते तुमचे कोण ? तेव्हां त्यानीं उत्तर केलें आमचे चुलत चुलत बंधु. उपरांतिक पुसिलें सारी पटवर्धन मंडळी किती होईल. यानीं उत्तर केलें तीस चाळीस असामी होईल तेव्हां बोलले झाडून लहान थोर तेव्हां उत्तर केलें चाळीस पन्नास पुरुष होतील. तेव्हां बोलले मोठें कुटुंब; व सरदार मातबर. असे, सरदार शिंदे होळकर व हे आहेत म्हणजेच राज्य क्षेम आहे. तेव्हां त्याजकडील एकजण बोलला नानांचाही बंदोबस्त अधीक तेव्हां श्रीमंत बोलले नाना एकटे काय करतील. असे मातबर सरदार असावे. उपरांतील श्रीमंतानीं नारायणराव साहेब यास पुसिलें बाळाराव येतील कीं नाहीं तेव्हां उत्तर केलें आज्ञा जाहली म्हणजे यतील. तदनंतर भोजनास उठले. भोजनसमयीं श्रीमंतराव भाऊस श्रीमंतानीं पुसिलें. पट्टणांत पांडुरंगराव किती दिवस होते. ते वारल्यानंतर तुम्हीं किती दिवस मंडळी ब्राम्हण किती व भले लोक किती येणें प्रमाणें

पुसिलें तेव्हां भाऊनीं सारें सविस्तर सांगितलें. भोजन होऊन विडे डेऱ्यांत घ्यावयास बसले. उपरांतीक निरोप घेऊन आले. छ २३ रोजीं श्रीमंतांचीं स्वारी पाषाणास गेली होती. अंबाऱ्यांत बसले होते. खवाशींत श्रीमंत राजश्री भाऊसाहेब होते येते समयीं घोड्यावर स्वारी जाहली होती छ. २४ रोजीं मंदवारीं पहाटचे ९ घटका रात्रीस श्रीमंतांचे भेटी करतां नाना आले तेव्हां श्री. राजश्री नारायणरावसाहेब यांस सरकारचें बोलावणें आलें होतें. गेले होते भेटी जाहल्या रा. आपा बळवंत व पांडोबाबाबा बारामतीकर व भोंसले याजकडील कारभारी वगैरे आले होते. श्रीमंतानीं लाल पोषाख व जवाहीर अंगावर घातलें होतें नानास पुष्पाचा तुरा श्रीमंतानीं दिला. नारायणराव यास श्रीमंत बोलले. फार उशीर यावयास लावलात. तेव्हां यानीं विनंति केली; बोलावणें येतांच निघालों परंतु गोट अंमळ लांब आहे. याजकरितां बोलावणें लवकर पावलें नाहीं. बोलावणें येतांच निघालों. उपरांतिक श्रीमंतांनीं विडे आपणच दिले. नानाचीही भेट तेथेंच झाली. उपरांतिक नाना व भाऊसाहेब, आप्पा बळवंत वगैरे मंडळी मंडपांत येऊन बसली. आणि श्रीमंतानीं आजच गृह प्रवेश करावा असा ठराव करून श्रीमंताकडे गोविंदपंत गोडबोले याज-बरोबर सांगोन पाठविलें. तेव्हां एकादशी घाततिथि असें उत्तर जाहलें मग सारे जोतिषी मिळून उदईक रविवारीं पहाटेचे दहा घटका रात्रीं वाड्यांत प्रवेश व्हावा असा निश्चय करून नाना शहरांत गेले. आज दोन प्रहरानंतर होळकर वगैरे मानकरी यांच्या भेटी डेऱ्यांतच होणार. या उपरीं होईल तें मागाहून सेवेशीं लिहीतों.'' (खरे–९–३६९०) दुसऱ्या एका पत्रांत श्रीमंतानीं नारायणराव पटवर्धन यास भोजनास बोलाविलें. त्यावेळची हकीगत नारायणरावानींच लिहीली आहे. ती अशी. "परवां गुरुवारीं मला श्रीमंतानीं रात्रौ भोजनास बोलाविलें होतें. बोलवावयास कारकुन च्यार घटका रात्रीस आला. ते दिवशीं चि. राजश्री महादेवराव दाजी येथें संध्याकाळीं चार घटका दिवसास आले होते त्यास भोजनास राहून घेतलें होतें. पानें मांडिलीं तों सरकारचें बोलावणें आलें. तेव्हां

आज्ञेप्रमाणें येतों म्हणून कारकुनापाशीं सांगितलें. तो गेल्यानंतर रामाजी दामोदर यास वडिलांकडे विनंति करावयास पाठविला. वडिलांची आज्ञा आली जे, जावें. त्याजवरून सहा घटका रात्रीस श्रीमंतांचे डेऱ्यास गेलों. तों श्रीमंत स्नान करून धोत्रें नेसत होते. मला पहातांच "नमस्कार करूं नका; कपाळीं काहीं लाविलें नाहीं." म्हणोन आज्ञा जाहली. धोत्रें नेसून संध्येस बसले. मला राजश्री आप्पाजीराव सहस्त्रबुद्धे घेऊन सांभाचे दर्शनास राहुटीस गेले. सांभाचें दर्शन जाहले. पंचमुखी स्पटिकाचें लिंग बहुत अपूर्व आहे. गवई यांचें गाणें होत होतें. उपरांतिक श्रीमंत बसले होते तेथें गेलों नमस्कार जाला. पाट बसावयास खाशानीं आणून ठेविले. आणि मला पुसिलें येथून कारकून गेला ते समयीं तुम्हीं काय करीत होतां. मी विनंति केली जे संध्या करून भोजनास गेलों, तो महाराजाची आज्ञा आली. त्याजवरून वरकड मंडळीस भोजनें करावयास सांगून मी आलों. तेव्हां श्रीमंत बोलले पटवर्धनाच्या घराण्याची धन्य आहे! भोजनास पात्रावर गेले असतां आज्ञा जातांच निघोन आले. घराण्याची रीत बहोत चांगली, घराणे थोर!! मातबर सरदार! इतकें बोलले आणि मला पुसिलें जे तुम्हीं दररोज कां येत नाहीं. निदान एक दिवस आड तरी येत जावें. मी आज्ञा म्हणोन विनंती केली. उपरांतिक भोजनास गेले. मी सोवळा होऊन गेलों. भोजन समयीं भात वाढला तेव्हां दुसरे एका गृहस्थानें आचारी यांस पुसिलें आज भात कोणते तांदळांचा? वास येत नाहीं तेव्हां श्रीमंत बोलले. पुण्याचा क्षय व पापाचा उत्कर्ष जाला. याजमुळें धान्याचें व वनस्पतिचें तेज गेलें. उपरांतिक बोलले गंगातीरीं वास असावा किंवा नानाचा तरी समागम असावा. आमचे दौलतींत मनुष्य आहे. पैका नाहीं. नानाचा समागम असल्यास सर्व गोष्टी घडतील. नबाबानीं पैका जमा केला. मनुष्य नाहीं! उपरांतिक मजकडे हात केला आणि बोलले, आमचे दौलतींत असले सरदार त्याअर्थी नबाबाकडून पैका घ्यावयास काय अशक्य आहे? पैका मिळेल परंतु मनुष्य मिळणें दुर्भल आहे. मी विनंती केली जे सर्व

प्रताप स्वामींच्या पायांचा आहे. भोजनसमयीं बहुत बोलले. भोजन झालें. उपरांतिक निरोप घेऊन तीर्थरुप भाऊसाहेबांचे डेऱ्यास आलों. श्रीमंत बोलल्याची सर्व विनंति केली. तेव्हां आज्ञा झाली जे त्या अर्थी एक दोन दिवशीं जात जावें. परवां राजश्री नाना अडीच प्रहर दिवसास वडिलांचे डेऱ्यास आले. तेथून वडिलांस घेऊन श्रीमंतांचे डेऱ्यास गेले. चार घटका रात्र पावेतों एकांत जाला. त्याप्रमाणें कालहि जालें. निखालसता जाली असें लौकिकांत आहे.''(खरे ९-३७१०)

बाजीरावसाहेबांना पुण्याच्या लोकांनीं अजून पाहिलें नव्हतें. बाजीराव पुण्यास आल्यावर जेव्हां त्यांना निरनिराळ्या लोकांनीं पाहिलें. तेव्हां बाजीराव संबंधानें त्याचे झालेले ग्रह त्यांनीं नमूद करून ठेविले आहेत. त्यांतील कांहीं महत्वाचा मजकूर पुढें दिला आहे. त्यावरुन बाजिरावाला पहिल्यानें पाहतांच लोकांचें काय मत झालें तें कळून येणार आहे. " श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब व आप्पासाहेब यांचा मुक्काम आज पुण्यानजीक खडकीवर जाणार. श्रीमंतांची मर्जी बहूत चांगली आहे. श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांची मर्यादा बहूत राखतात. मेहनती चांगले. शरीरेंकडून चांगले वळकट असे आहेत. बोलणें बहूत समयोचित आहे. लष्करांत(बाजीराव-साहेबांच्या) आम्हीं एक दोन वेळ गेलों होतों. राजश्री बळवंतराव लेले यांजपाशीं बोलले. त्यांनीं सांगितलें कीं, श्रीमंतांचे बुद्धीची शर्त आहे ! शरीरें करून दृढ, गोड भाषण ; बोलण्यांत जरब याप्रमाणें तारीफ आहे. श्रीमंतास पहाण्याकरितां पुण्यांतील साहूकार व उदमी व गोरगरीब व कसबी लोक बहूत आले होते. मालीटहि हत्तीवर बसून स्वारी पहाण्यास आला होता. अर्ध घटका रात्रीस श्रीमंतांची स्वारी परत डेऱ्यांत दाखल झाली. यजमान मंडळी सारी डेऱ्यास गेली. उपरांतिक श्रीमंतांनीं रघुनाथ-रावदादास पुसलें तुमच्या संध्येचा समय झाला. तेव्हां दादा बोलले. स्वामीचे पाय हीच आमची संध्या बाजीरावसाहेब किंचित् सांवळे वर्णाचे आहेत. चिमाजीअप्पा गोरे आहेत. शिवरात्रीचे दिवशीं मध्यरात्रीस सांभाची पुजा झाली ते समयीं पांच तोफा जाहल्या. श्रीमंत पहावयासाठीं मी डेऱ्यास

गेलों होतों. उभयतां श्रीमंतांची भेट घेतली. थोरले श्रीमंत माझ्या इतके उंच आहेत, आणि अंगानेही माझ्या इतके आहेत. परंतु माझें अंग मला वर्षे फार याजमुळें सुटलें आहे. त्यांचें वयाप्रमाणें आहे, परंतु सामर्थ्य अधिक आहेसें वाटतें. गोरेहि फार नाहींत माझ्या इतके गोरे आहेत. परंतु नाक डोळे चांगले आहेत. वित्पन्न आहेत. बोलणें फार पाहिजे. माणसांचा कंटाळा नाहीं. स्नानसंध्या फार आहे. अठरावे घटकेस भोजन होतें. रात्रौ बारावे घटकेस भोजन होतें. एकादशी केवळ निराशन करितात. तीन स्नानें करितात. धर्माविषयीं वासना बहूत आहेत. कृपणपणा अगदीं नाहीं. देवब्राह्मण यांजवर निष्ठा फार आहे. परंतु कांहींशी वृत्ति भोळी आहेशी भासते. माझ्या दृष्टीस भासते. राजश्री चिमाजी आप्पाहि पाहिले गोरे फार आहेत. प्रकृत उभयतांची चपळतेविषयीं आणि बुद्धिविषयीं सारखीच आहे. परंतु तेथें क्रोध कांहीं जाजती आहेसा भासतो. परंतु श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब यांची मर्जी बहुत राखतात. उभयतांचें भोजन वेगळें होतें. आज पांच सात दिवसांत पुण्यांतील फार करून गृहस्थ मंडळी भेटीस आली. हुजरातचे शिलेदार मानकरीहि रोज येऊन भेटत असतात. कोणाचीहि भेट जाहली असतां ती रा. रघुनाथराव दादा व बाबासाहेब अथवा वडील (परशुरामभाऊ) यांतून एक जणानीं जावें; तेव्हां भेटी होतात. श्रीमंत आजपावेतों अज्ञातवासी होते. त्यास विना समजून सांगितल्याशिवाय आगतस्वागत कोणास कसें करावें हें अंमळसें अवघड पडतें. परंतु धूर्त आहेत. समजतात लवकर कोणताही कारभार एक वर्ष पावेतों दुसऱ्याचें काम लागेल. मग स्वतः करतील त्यांत संदेह नाहीं. कैलासवासी श्रीमंताचें नांव चालावे यासाठीं बहूत खटपट केली. परंतु यांचें म्हणणें पडलें कीं, कैलासवासी नानासाहेबांचा वंश दैवयोगेंकरून राहिला, त्यास आम्हीं कसें करावें. परंतु आम्हीं कांहीं ओटयांत पडावयाचे नाहीं. ऐसे साफ उत्तर केलें तेव्हां निराशा जाहली श्रीमंतांचे दोन मुख्य मुद्दे. एक " बाजीराव रघुनाथ " ऐसेंच व्हावें. दुसरें आम्हांस कैलासवासी श्रीमंताचा बंदोबस्त होता. दुसऱ्यानें कारभारी याचे परवानगिशिवाय दर्शनास जाऊं नये आणि

कोणी बोलूं नये ऐसें होतें. तें कांहीं मला पुरवणार नाहीं. हे दोन्ही मुद्दे कारभारी यानीं व वडिलांनीं (परशुरामभाऊनीं) कबूल केले. यांत सारें आहे. वडिलांवर मर्जी फार चांगली आहे. तेथील मंडळी बोलत असते कीं, वडीलास (परशुरामभाऊस) यजमान (बाजीराव) निरोप देणार नाहींत ऐशी बोलवा आहे."(खरे ९–३६९५, ३७०३, ३७०४, ३७०८) *

बाजीराव पुण्यांत आल्यावर त्याला लोकांनीं पहिल्यानेंच पाहिलें व त्यांच्या संबंधानें आपले अभिप्राय पाहिलेल्या लोकांनीं लिहीले त्यांतले महत्त्वाचे उतारे वर दिले आहेत. त्यावरून त्याच्या मूर्तीची घडण कशी होती हें सहज लक्षांत येईल. नानासारख्या बुद्धिवान माणसालाहि बाजीरावापुढें हात टेकण्याचा प्रसंग उत्पन्न झाला.

जुन्नराहून पुण्यास येईपर्यंत श्रीमंत बाजीराव हे नानांची व भाऊंची सारखी स्तुती करीत होते. श्रीमंतांच्या बोलण्याचा गोडवेपणा व तरतरीतपणा पाहून पटवर्धन मंडळींना पहिल्यानें तर असेंच वाटलें कीं, श्रीमंत हे मोठे बुद्धिवान, धार्मिक आचरणाचे व सौजन्यपूर्ण असे सद्गृहस्थ असावे. पण श्रीमंतांच्या बेताबाहेर गोडवेपणाचा अर्थ

---

* (टीप—बाजीरावाचें वर्णन इंग्रजांचा पुण्याच्या दरबारचा वकील मॅलेट यानें खालीलप्रमाणें केलें आहे. " Bajirao is about 22 years of age. He seemed diffident and rather embarassed which is easily accounted for in his hither-to retired way of life. He is stout-made, of a grave countenance and deportment with a physiognomy indicating rather the qualities of deliberative sense than of energetic sensibility. But it would be presumptuous at present to form opinion of a mind whose beat and powers have hither-to bad no occasion of development " ( P. R. C. 2–290 )

धूर्त व चाणाक्ष लोकांनीं लावला कीं, श्रीमंतांच्या गोडबोलण्याच्या बुडाशीं त्यांचा मतलब--साधुपणाचा असावा.

श्रीमंतांची स्वारी खडकीच्या मुक्कामीं आल्यावर ता. ५ मार्च १७९६ रोजीं पहांटेस श्रीमंतांच्या भेटीकरतां नाना पुण्याहून आले. श्रीमंतांनीं नानाचा मोठाच गौरव केला. पुन्हां त्याच दिवशीं मानकरी मंडळी बरोबर घेऊन नाना पुन्हां श्रीमंतांच्या भेटीस आले. या प्रसंगींहि श्रीमंतांनीं नानांचें चांगलेंच स्वागत केलें, व मुद्दाम उठून फुलांचा तुरा नानांच्या पागोटयांत खोविला. या प्रमाणें भेटीचा समारंभ झाल्यावर नानांनीं श्रीमंतास सांगितलें कीं, आजच वाडयांत जावयास मुहूर्त उत्तम आहे. यावर बाजीराव साहेब म्हणाले कीं, आज आमची घात तिथी आहे. तेव्हां जाणें प्रशस्त नव्हे त्यांत नाना सांगतील तो आमचा मुहूर्त ! यावर नाना कशाला उत्तर देतात. ते स्वस्थच बसले. श्रीमंतांच्या या उत्तरावरून नानाला श्रीमंतांचा रंग समजला व नाना मनांत समजून चुकले कीं, श्रीमंतांचे हें घोडें आपण दामटावें तसें वळणारें नव्हे. श्रीमंतांनीं घाततिर्थीची सबब सांगितली तो केवळ बहाणा होता. एकटया नानांवर सर्व भिस्त ठेवून श्रीमंतांस राज्य मिळवावयाचें नव्हतें. अजून त्यांचे हात दोन्ही दगडींवर होते. नानांचें पाठबळ श्रीमंतांस हवें होतें. त्याचप्रमाणें शिंद्याच्याहि मदतीची ते अपेक्षा करीत होते केवळ नानांच्या शब्दावर विश्वास टाकून आपण शनवार वाडयांत प्रवेश केला तर शिंद्याची मर्जी बिघडेल अशी धास्ती श्रीमंतांस वाटत होती. त्यामुळें घाततिर्थीची सबब सांगून तूर्त श्रीमंतांनीं नानाला गप्प बसविलें.

बाजीरावाच्या एकंदर वागणुकीवरून नानांनीं बाजीरावाच्या मनाचा रोख ओळखिला व अशा बेभरंवशी माणसाशीं वागतांना आपल्या सुरक्षितपणाबद्दल कांहींतरी योग्य तजवीज करणें जरूर आहे. असें त्यांना वाटूं लागलें. या बाबतींत त्यांनीं परशुराम भाऊंना मध्यस्थ घालून बाजीरावाकडून एक करार लिहुन घेतला, व या करारांत बाजीरावानें पूर्वीच्या सर्व गोष्टी विसरून नानांच्या सल्ल्याप्रमाणें वागण्याचें कबूल केलें. नाना व श्रीमंत

बाजीराव यांचा असा करार झालेला शिंद्यांचा कारभारी बाळोबातात्या याच्या कानावर जातांच त्याच्या अंगाचा तिळपापड झाला. बाजीरावानें अगाऊ शिंद्याशीं करार केला होता त्याप्रमाणें न वागतां बाजीराव नानाच्या बोलण्यावरून पुण्यास गेला आणि नानानेंहि शिंद्यांची अपेक्षा न ठेवतां बाजीरावाला पुण्यास आणून पेशव्यांच्या गादीवर बसविण्याचें ठरविलें. यामुळें नाना व बाजीराव या दोघांवरहि शिंद्याचा कारभारी बाळोबातात्या याचा मोठा घुस्सा झाला होता. नानाच्या चतुरतेमुळें आपलें कारस्थान फसतें कीं, काय असें बाळोबाला वाटूं लागलें व कांहीं झालें तरी शिंद्यांच्या लष्कराच्या जोरावर नानाचा कारभार हाणून पाडण्याच्या सुडाच्या भावनेने बाळोबातात्या वल्गना करूं लागले. बाळोबाच्या या वल्गना नानाच्या कानावर येतच होत्या, पण नाना हा कसल्याहि प्रसंगाला डरणारा नव्हता. नानाला कारभारातून काढावें व बाजीरावानें कबूल केलेले पैसे नानाकडून जबरदस्तीनें वसूल करावे असा उद्योग करावयाचा म्हणजे नाना विरूद्ध कांहींतरी कुभांड रचणें बाळोबास जरूर झालें. महादजी शिंद्याचा एक विश्वासू कारभारी आबा चिटणीस नांवाचा होता. तो यावेळीं पुण्यांत असून नानाचें व त्याचें सख्य होतें. या आबा चिटणीसामार्फत नानांनीं शिंद्यांच्या लष्करांत फितूर केला व बाळोबावर मारेकरी घालण्याचाहि उद्योग केला असा पुकारा बाळोबानें सुरूं केला. हा पुकारा शिंद्यांच्या लष्करांत पसरतांच नाना विरूद्ध जिकडे तिकडें मोठें काहूर माजलें व नानाला कारभारांतून काढण्याच्या वल्गना ज्याच्या त्याच्या तोंडातून निघूं लागल्या. शिंद्यांच्या लष्करांत वरील प्रमाणें नाना विरुद्ध विचारांचे प्रवाह वाहूं लागले. इतकेंच नव्हे तर त्यांना अनसरून शिंद्यांच्या फौजेनेंहि आपला मोर्चा पुण्याकडे वळविला. पांच हजाराहून जास्त फौज पुण्यास आणूं नये असें शिंद्यांस नानांनीं श्रीमंताकडून कळविलें; पण शिंद्यांनीं तें मानलें नाहीं. अशी परिस्थिती उत्पन्न झाल्यावर पुण्यास राहाणें धोक्याचें असें समजून नानांनीं पुणें सोडण्याचा विचार केला व त्याप्रमाणें बाजीराव साहेबांस कळविलें श्रीमंतांच्या मनांत नानांनीं पुणें सोडून जावें

असें नव्हतें. पण नानांचा आग्रह व परशुराम भाऊंची रदबदली पाहून नानांच्या जाण्यास श्रीमंतांनीं रूकार दिला. नाना पुणें सोडतात ही बातमी बाळोबास कळतांच त्यानीं गोविंदराव पिंगळे याच्या मार्फत नानांस कळविलें कीं तुम्हीं पुणें सोडून कां जातां, तुमचें आमचें कांहीं वांकडें नाहीं आमचे कांहीं मुद्दे आहेत ते तुम्ही मान्य केल्यास तुमचें आमचें कांहींच वांकडेपण राहाण्याचें कारण नाहीं.*

---

*(टीपः--बाळोबानें शिंद्यांचे म्हणून जे मुद्दे नाना विरूद्ध सांगितलें ते खरे ले. सं. ९-प. नं. ३७१९।२० ३७२४ या पत्रांत सविस्तर दिलें आहेत. त्याचा सारांश असा कीं, (१) नानानें आमच्या विरुद्ध फितूर केला त्या लोकांस आमच्या स्वाधीन करावें. (२) खडर्याच्या लढाई संबंधाची आमची खंडणी नानांनीच द्यावी. (३) आम्हांस फौजेस खर्च पडला तो नानांनीं भरून द्यावा (४) मोरोबा दादास कैदेंतून सोडावें. (५) मोरोबाच्या फडणीशीचा सुमारें चाळीस पन्नास लाखांचा ऐवज नानांनीं आम्हांस मोरोबाच्या मुक्ततेबद्दल म्हणून द्यावा. (६) बीड व पाथरी हे दोन महाल सरकारांतून आम्हांस देववावे. (७) पेशवाईचा कारभार गैरवाजवी रीतीनें करणार नाहीं असें आम्हांस लिहून द्यावें. (८) निजामावर आम्हीं स्वारी करणार त्यांत सरकारच्या फौजेनिशीं सामील व्हावें. नाना विरुद्ध हे मुद्दे काढून शिंदे स्वस्थ बसले इतकेंच नव्हे तर त्यानीं हे सर्व मुद्दे व नानाला कारभारांतून अजीबात काढण्याचा एक जादा मुद्दा बाजीरावाकडून स्वतंत्र रीतीनें कबूल करून घेतल्याची हकिगत पुना. रे. रेकॉर्डमध्यें आली आहे. (P. R. C. २-२९२,२९३,२९४,२९५) पुना रे. रेकॉर्ड मधील पत्रांत आणखी असें लिहिलें आहे कीं, नानाच्या बाबतींत शिंदे व बाजीराव यांमध्यें झालेल्या कराराला परशुरामभाऊंचीहि संमती होती. परशुरामभाऊंच्या संमतीसंबंधानें पु. रे. रेकार्डमध्यें मॅलेटनें लिहिलेल्या या हकीगतीला खऱ्यांच्या ऐ. ले. संग्रहांत मात्र कोठें आधार आढळत नाहीं. )

शिंद्यानीं नानाविरुद्ध जे मुद्दे काढले होते त्यांचा अर्थ नानाला निर्माल्यवत करण्याचा होता हें स्पष्ट आहे. पण शिंद्यांचा कारभारी बाळोबा याला वाटत होतें तितके मात्र नाना अजून सामर्थ्यहीन झाले नव्हते. तथापि रागरंग लक्षांत घेऊन व शिंद्यांचें सैन्यबळ मोठें आहे हें ओळखून आतां यापुढें पुण्यांत राहाणें सुरक्षित नाहीं ; म्हणून नानांनीं पुणें सोडण्याचा विचार केला. नानांनीं २१ मार्च १७९६ रोजीं पुणें सोडलें. भाऊंनीं आपल्या खटपटीनें नानांनां पांच सहा हजार फौज बरोबर दिली. नाना पुण्याहून निघाले ते साताऱ्याजवळ करंजे म्हणून खेडें आहे तेथें येऊन उतरले.

नाना साताऱ्यास गेल्यावर इकडे पुण्यास बाजीराव साहेबांच्या नांवाची द्वाही फिरली व त्याच दिवशीं दौलतराव शिंद्यांची स्वारी आळंदीच्या मुक्कामास आली. आपला मुक्काम जाहीर करण्याकरतां शिंद्यांनीं तोफांचे बार काढले. ता २४ मार्च १७९६ रोजीं श्रीमंतांची व शिंद्यांची भेट झाली. श्रीमंतांनीं शिंद्याबद्दल फारच आपलेपणा दाखविला व शिंद्यांनीं मला पेशवाई दिली, असें म्हणून शिंद्यांचा मोठा आदर सत्कार केला. तथापि बाजीराव नानांच्या संमतीनें पुण्यास आले ही गोष्ट शिंद्यांचे शेणवीं कारभारी विसरले नव्हते. अर्थातच बाजीरावानें शिंद्यांबद्दल प्रत्यक्ष भेटीत जें अघळपघळ प्रेम दाखविलें तें वरकरणींच होतें हें शिंद्यांचा कारभारी बाळोबातात्या याच्या लक्षांत होतेंच

श्रीमंतांची व शिंद्यांची भेट झाली त्याच दिवशीं रात्रीं म्हणजे ता. २४ मार्च रोजीं श्रीमंतांची स्वारी शनवारवाड्यांत येऊन दाखल झाली. श्रीमंतांनीं मसनदीजवळ येऊन मसनदीस नमस्कार केला ; व तिजवर बसले. पण कोणाचे नजराणे घेतले नाहींत. या प्रसंगानिमित्त तोफांचे साठ बार काढण्यांत आले आणि हजारों रुपयांचा दान धर्महि करण्यांत आला.

श्रीमंत मसनदीवर बसल्या नंतर लगेच त्यांनीं आपला अधिकार गाजविण्यास सुरवात केली ; आणि सर्व अंमलदारांस ताकीद करून जाहीर केलें कीं, आपल्या हुकुमाखेरीज कोणीं कांहींही करूं नये. ता. २५ मार्च

सं. क्र.

रोजीं सायंकाळीं शिंदे श्रीमंताच्या भेटीस आले. श्रीमंतांची व शिंद्यांची झालेली ही भेट फार महत्वाची आहे. शिंद्याबरोबर त्यांची सर्व कारभारी मंडळी आली होती, व बरेंच खलबतहि झालें. या भेटींत शिंद्यांनीं श्रीमंताकडे मागणी केली कीं तुम्हांस गादीवर बसविण्यासंबंधीं तुम्हीं आम्हांस सव्वा कोट रुपये द्यावयाचे असा करार आहे त्या पैकीं आज पंचवीस लक्ष द्यावे. या मागणीवर श्रीमंत बोलले कीं करार तुम्हीं कोठें पाळला ? तुम्हीं जुन्नरास येऊन आम्हांस पुण्यास आणावें तो तुमच्या आधींच परशूरामभाऊ जुन्नरास येऊन पोंचले. तरी सुद्धां आठ दिवस आम्हीं तुमची वाट पाहिली तरीहि तुम्हीं आला नाहीं. पुण्यास येऊनहि पंधरा दिवस होत आले. तेव्हां आतां तुम्हीं येत आहां. अर्थातच पूर्वीचा करार आतां राहिला नाहीं. तथापि फौजेचा खर्च तुम्हांस पडला आहे. त्याबद्दल तुम्हांस कांहीं पैका देणें जरूर आहे हें खरें, पण नाना येथें नाहींत व खजीन्यांत एक पैसाहि नाहीं तेव्हां आतां कांहींच देतां येत नाहीं. तरीं नानास कारभारांतून काढण्याबद्दल तुम्हीं जो हेका धरला आहे तो सोडून द्या व नानांजवळ मिळतें घ्या म्हणजे द्रव्यास कांहींच तोटा नाहीं. वरीलप्रमाणें गोड भाषण करून श्रीमंतांनीं शिंद्याला जी ही उलटी टांग मारली व शिंद्याजवळ केलेला करार पार उडवून दिला तें पाहून शिंदे मनांत चपापले व त्यांना रागहि आला, पण त्यानीं तो बाहेर न दाखवितां नानाजवळ सख्य करणें जरूर आहे ही गोष्ट औपचारिकरीत्या मान्य केली आणि ते आपल्या गोटास निघून गेले.*

---

*(टीपः—शिंद्यांनी श्रीमंताशीं जो करार केला होता त्यांतील अटी निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या आढळतात. खरे ले. संग्रहांत या करारासंबंधानें एका पत्रांत खालीलप्रमाणें माहिती आहे "श्रीमंत बाजीराव साहेब जुन्नरास होते तेव्हां शिंदे यांनीं संधान करून श्रीमंतापासून लिहून घेतलें जे " आम्हांस राज्यावर बसवावें म्हणजे निम्मे राज्य व पन्नास लाख रुपये आम्हीं तुम्हांस द्यावे. त्यापैकीं पुण्यास×

शिंदे नाराज होऊन आपल्या गोटास गेल्यावर बाजीरावापुढें महत्वाचें काम म्हणजे सातारच्या महाराजांकडून पेशवाईचीं वस्त्रें आणणें हें होतें. या कामासाठीं श्रीमंतांची स्वारी ता २६।३।१७९६ रोजीं वाड्यांतून निघून गारापिरावर येऊन राहिली. बरोबर शिंदे होळकर यानीं यावें असें ठरलें होतें पण होळकर आले नाहींत. गारापिरावरून तळ हालवून २८

---

× जातांच पंचवीस व अखेरसालीं पंचवीस द्यावें," व मोरोबास सोडावें असें लिहून घेतलें. त्यांत मोरोबादादास सहा महिन्यांनीं आमचे विचारास आल्यास सोडूं. येणेंप्रमाणें श्रीमंतांनीं शेरा मारला. दोन कलमें कबूल केलीं. त्याजविशीं शिंदे वाड्यांत येऊन खलबत जाहलें. तेव्हां पंचवीस लक्ष रुपये देवावे म्हणोन पुसलें. त्याजवरून आज्ञा झाली जे तुम्हांसी आम्हीं करार केला त्याप्रमाणें तुम्हीं येऊन पोचावें ते आलां नाहीं. त्याजवरून भाऊनीं येऊन आम्हांसी बोलोन जुन्नराहून बाहेर डेऱ्यास नेलें तेव्हांहि आठ दिवस आम्हीं वाट पाहिली तथापि तुम्हीं आला नाहीं. त्याजवर पुण्यानजीकहि येऊन दाहाबारा दिवस वाट पाहिली. परंतु आला नाहीं. त्यापेक्षां करार कोठें राहीले. त्यांत राजश्री नाना गेले त्याजमुळें सरकारांतहि खर्चाची वोढ जाहली. जामदारखान्यांत म्हणावें तर पैसा नाहीं अशी अवस्था झाली आहे. त्यास नाना आल्याखेरीज कांहींएक समज नाहीं त्याजवरून शिंदे यांनीं बोलणें घातलें आम्हीं काय नानास करीत होतों. ते गेले कां? त्यास आम्हां करतां गेले त्या अर्थी आम्हींच जाऊन कोणास पाठवितों, आणि नानांची समजून करतों. याप्रमाणें बोलले. त्या उदईक पिंगळे सातान्यास जाणार. परंतु तेथेंहि नानाचे बोलणें पडेल जें निम्मे राज्य व पन्नास लक्ष रुपये तुम्हांस देऊन पुढें कारभार आमच्या हातून होत नाहीं. ते धनी व तुम्हीं सरदार आहां. माझें काय प्रयोजन? आज पावेतों बरें वाईट केलें. अतःपर स्नानसंध्या करून राहाणार." शिंदे धोंडीबास सरकारचे नेटावर पाठविणार. शिंदे यांचा बहूत चढ होता तो कालचे बैठके पासून कमी पडला. कांकी जन्नरचे बोलणें येथें नाहीं व नाना गेले याजमुळें दौलतींत बखेडे होणार हें निमित्त येणार" (खरे ९–३७३३)

तारखेस श्रीमंत खराडीवर आले. याच मुक्कामीं शिंदे श्रीमंतांस येऊन मिळाले. ता. २ एप्रिल रोजीं श्रीमंतांनीं खराडीहून कूच केलें व थेऊरचा मुक्काम गांठला. थेऊराहून पुढें सातान्यास जाण्याचा श्रीमंतांचा मार्ग खुंटला. थेऊरच्या मुक्कामावर बरेच दिवस लष्कराचा तळ पडला होता. या अवधींत थेऊर मुक्कामीं अनेक भानगडी अनेक राजकारणें आणि अनेक कलागती होऊन मोठी गडबड झाली. या गडबडींत शेणवी सरदार व परशुरामभाऊ यांचा पक्ष आणि नानांचा पक्ष असे दोन पक्ष पडले, व त्याचें पर्यवसान बाजीरावाच्या कैदेंत होऊन चिमाजी आपाची पेशवेपदावर स्थापना झाली. हा प्रकार कसा कसा झाला याची हकीगत पुढील प्रकरणांत येईल.

## प्रकरण १६ वें

# " चिमाजीअप्पा पेशवे आणि भाऊ कारभारी "

—००☆००—

श्रीमंत बाजीरावसाहेबांची स्वारी साताऱ्याहून पेशवाईचीं वस्त्रें आणण्यासाठीं म्हणून पुण्याहून निघून थेऊर मुक्कामीं दाखल झाल्याचें मागील प्रकरणीं सांगितलेंच आहे. श्रीमंतांचा बंदोबस्त हा वेळपर्यंत मुख्यतः भाऊंकडेच होता. अेकंदर पटवर्धनांची मिळून सुमारें चार हजार फौज श्रीमंतांबरोबर होती. येथून पुढें साताऱ्यास जाऊन पेशवाईची वस्त्रें आणावयाचीं हें मुख्य काम श्रीमंत बाजीरावसाहेबांस करावयाचें होतें. पण शिंद्यांच्या घोळामुळें थेऊराहून पुढें साताऱ्यास जाण्याचा मार्ग खुटल्यासारखा झाला.

थेऊरास आल्यावर शिंद्यांचे कारभारी श्रीमंतांकडे येऊन सारखी खलबतें करूं लागले. शिंद्यांच्या कारभाऱ्यांच्या म्हणण्याचा मुख्य आशय असा होता कीं नाना जेथें असतील तेथून त्यास पकडून आणून त्यांचें द्रव्य लुबाडण्याजी श्रीमंतांनीं आपणांस परवानगी द्यावी. आणि श्रीमंतांस गादीवर बसविण्याकरितां शिंद्यांस जो खर्च झाला आहे तो भरून द्यावा. पण नानांस उपद्रव करण्यांस श्रीमंतांसहि धैर्य होईना आणि परशुरामभाऊहि शिंद्यांस तसें करूं देण्यास तयार नव्हते. शिंद्यांचें दुसरें म्हणणें त्यांना

मराठी ग्रंथ संग्रहालय
१८८३४
२८१५३



झालेला खर्च श्रीमंतांनीं भरून द्यावा असें होतें पण श्रीमंत स्वत: कफल्लक असल्यामुळें याहिबाबतींत शिंद्यांना कांहीं मिळण्यांसारखें नव्हतें. तात्पर्य कोणत्याच बाबतींत शिंद्यांचें कांहींच साधत नसल्यामुळें त्यांनीं थेऊर मुक्कांमीं जो घोळ घालून ठेविला त्याचा निकालच लागेना. अशी स्थिती प्राप्त झाली.

श्रीमंत बाजीरावसाहेब प्रथम पुण्यास आले त्यावेळीं बाळाजी विश्वनाथाचा हा औरस वंशज सद्‌गुणांचा पुतळा असेल असें लोकांना साहाजिकच वाटत होतें. पण हळुहळु बाजीरावाचें अंतरंग उघड होऊं लागल्यावर त्या गाळींव रत्नाची पारख जाणत्या माणसांस होऊं लागली: परशुराम भाऊ व बाळोबातात्या यांचीहि खात्री होऊन चुकली कीं ह्या श्रीमंतांच्या भानगडींत पडणें सुरक्षित नाहीं. बाजीरांवाच्या धरसोडीच्या स्वभावामुळें शिंद्यांस आपला कार्यभाग साधणें जडजाऊं लागलें. शिंदे व नाना यांचें वांकडें आल्यामुळें नानांचें वाटोळें करण्यास शिंदे एका पायावर तयार होते. पण या कामास जरूर ती श्रीमंतांची संमति न मिळाल्यामुळें शिंद्यांचे कारभारी बाळोबातात्या यांचाहि श्रीमंतांवर फार राग झाला. *

---

* टीप— नानास कारभारांतून अजीबात काढून टाकण्याच्या बाबतींत शिंदे व बाजीराव यांचे एकमत होतें. याबाबतींत शिंदे व बाजीराव यांच्यामध्यें झालेल्या करारांची सविस्तर हकीगत पुना. रे. रेकॉर्ड भाग २ प. नं. २९२, २९३, २९४, २९५ या पत्रांत आहे. तथापि नानांच्या बाबतींत शिंदे व बाजीराव यांमध्यें एका मुद्यावर मतभेद होता. त्याची हकिगत प. नं. २९५ मध्यें आली आहे: या पत्रांमध्यें असें लिहिलें आहे कीं बाजीरावाच्या मतें नानानें कारभार सोडावा पण पुण्यांत राहूनच महत्वाच्या मुद्यावर सल्लामसलत द्यावीं. पण शिंद्यांचें म्हणणें असें होतें कीं नानानें कारभार सोडून देऊन पुण्यांतून निघून जावें व काशीस जाऊन रहावें. या महत्वाच्या मुद्दावर बाजीराव शिंद्यांचें ऐकत नसल्यामुळें शिंद्यांचे कारभारी बाळोबा याचा बाजीरावावर राग झाला होता. बाजीरावाला तरी ×

बाजीराव पुण्यास आल्यापासून त्याचा परशुरामभाऊंस व शिंद्यांचे कारभारी बाळोबा यांस जो अनुभव आला त्यावरून या दोघांचीहि खात्री झाली कीं बाजीरावाच्या भरंवशावर राहून कोणचीहि गोष्ट करणें सुरक्षित नाहीं. तेव्हां अशा नादान व क्षणोंक्षणी बुध्दि पालटणाऱ्या माणसास पेशवाईच्या गादीवर बसविण्यापेक्षा कांहींतरी दुसरी तोड काढणें प्राप्त आहे. असा विचार ठरल्यावर परशुरामभाऊ व शिंद्यांचे कारभारी बाळोबातात्या यांची पुढें काय काय करावयाचें यासंबंधानें अेकसारखीं खलबतें होऊं लागलीं. या प्रकरणांत शिंदे व परशुरामभाऊ यांनीं अेकमेकांस अंतर न देतां सर्व मसलत उभय पक्षीं अेकमतानें करावी अशाबद्दल शिंदे व परशुरामभाऊ यांनीं थेऊरच्या गणपतीच्या देवळांत शपथा घेतल्या.

थेऊरच्या गणपतीच्या देवळांत भाऊ व शिंद्यांचे कारभारी यांचा जो शपथविधि झाला त्यांत असें ठरलें कीं बाजीराव हा नादान व नालायक असल्यामुळें त्यास कैदेंत ठेऊन त्याचा धाकटा भाऊ चिमाजीअप्पा यास यशोदाबाईच्या मांडीवर दत्तक देऊन त्यास पेशवाईच्या गादीवर बसवावें. चिमाजीअप्पा अल्पवयी असल्यामुळें राज्याचा कारभार पूर्वी नाना करीत होते त्याप्रमाणें आतां परशरामभाऊंनीं करावा व बाजीरावाला शिंद्यांनीं आपल्या कैदेंत ठेवावें. राज्याच्या वारसाची अशी व्यवस्था ठरल्यावर पुढील

---

× नानांचें प्रेम होते असें नाहीं पण त्याला अजून पेशवाईचीं वस्त्रें मिळवावयाचीं होतीं. आणि साताऱ्याच्या छत्रपतींचा कारभार नानांच्या हातीं असल्यामुळें साताऱ्याहून पेशवाईचीं वस्त्रें मिळविण्याच्या बाबतींत बाजीरावाला नानांच्या मदतीची अपेक्षा होती. यामुळें तूर्त नानाला अेकदम दुखविण्याची बाजीरावाची तयारी नव्हती. नानाला कारभारांतून काढण्याच्या बाबतींत शिंद्याला भाऊंचीहि संमति होती असे वर उल्लेखिलेल्या रे. रेकार्डच्या पत्रांत लिहिलें आहे. पण आरंभीं आरंभी तरी नानास दुखविण्याला परशुरामभाऊ तयार नव्हते. असें खरे ले. संग्रहांतील अनेक पत्रांवरून दिसतें. )

मसलती संबंधानें भाऊ व शिंदे यांमध्यें असें ठरलें कीं दोघांनीं मिळून निजामावर स्वारी करावी व खर्डाच्या तहांत ठरल्याप्रमाणें मुलूख व खंडणी निजामापासून वसूल करावी. खंडणीपैकीं पाऊणकोट रुपये शिंद्यांस खर्चाला द्यावे. आणि भाऊंच्या कारभारास जे जे विरोध करतील त्यांचें पारिपत्य करून भाऊंचा कारभार निष्कंटक करून देऊन मग शिंद्यांनीं हिंदुस्थानांत परत जावें. वरील प्रमाणें सर्व योजना ठरल्यावर या नाटकाचा पहिला अंक म्हणजे बाजीरावास कद करण्याचा हा होय. हें काम शिंद्यांनीं ता. ८ अेप्रील १७९६ रोजीं पाडव्याच्या मुहूर्तावर मोठया शिताफीनें पार पाडलें. बाजीरावसाहेब सातान्याहून वस्त्रें आणण्याकरितां फार आतुर झाले होते. पण या कामांत परशुरामभाऊ व शिंदे हे मुळींच लक्ष घालीत नाहींत असें त्यांना आढळून आलें. तेंव्हां श्रीमंतांनीं असें ठरविलें कीं शिंद्यांची किंवा अितर कोणाचीहि वाट न बघतां जे कोणी बरोबर येतील त्यांना घेऊन आपणच सातान्यास निघून जावें व वस्त्रें आणावीं. अेकदां वस्त्रें मिळाल्यावर मग शिंद्यांचा समाचार घेतां येईल. याप्रमाणें मनोराज्य ठरविल्यावर श्रीमंतांनीं पाडव्याच्या मुहूर्तावर सातान्यास जाण्याची तयारी केली. पण या पाडव्याच्या मुहूर्ताचीच संधी साधून शिंदे व त्याचा कारभारी बाळोबा हे श्रीमंतांस पाडव्याचा मुजरा करावयाचे निमित्तानें श्रीमंतांकडे आले. शिंद्यांनीं श्रीमंतांस खलबतासाठीं अेकिकडे नेऊन स्पष्ट सांगितलें कीं आमच्या जाबसालाचा निकाल पहिल्यानें लावा व नंतर खुशाल सातान्यास जा. श्रीमंतांनीं शिंद्यांचें हें म्हणणें मान्य केलें तरीसुध्दां शिंद्यांची खात्री होईना. त्यांनीं श्रीमंतांना निक्षून असें सांगितलें कीं आमच्या मागण्या पुन्या करून देण्याबद्दल खुद्द परशुरामभाऊंनाच जामीन द्या. व मग तुम्ही सातान्यास जा. शिंद्यांचीं अशीं ताठ भाषणें होऊं लागल्यावर श्रीमंत अगदीं गर्भगळीत झाले. व भाऊंजवळ जाऊन गयावया करूं लागले. भाऊनींही मोठा आव आणून शिंद्यास जबाब दिला कीं श्रीमंतांनीं तुम्हाजवळ जे जे करारमदार केले आहेत त्यांतील प्रत्येक कलमाचा निकाल लागल्याखेरीज श्रीमंतांस येथून जाऊं न देण्याचें जोखीम मीं आपल्या शिरावर घेतो. पूर्वीच ठरलेल्या संके-

ताप्रमाणें हें सर्व नाटक उरकल्यावर त्या भित्र्या पण धूर्त बाजीरावाच्या लक्षांत येऊन चुकलें कीं आतां यापुढें आपलें स्वातंत्र्य नष्ट होऊन दरवेळीं शिद्यांकडून जें जें बोलणें येईल त्या त्या वेळीं भाऊंची मनधरणी केल्या. शिवाय आपला निभाव नाहीं. ता. १७ अेप्रील सन १७९६ रोजीं- बाजीरावाचे धाकटे बंधु चिमाजीअप्पा यांचा वाढदिवस होता. त्या दिवशीं त्याच्या वयास बारावें संपून तेरावें वर्ष लागलें. या वाढदिवसानिमित्त श्रीमंतांनीं आपल्या गोटांतील सरदार व मुत्सद्दी मंडळीस भोजनास बोलाविलें होतें. बहुतेक पटवर्धन मंडळी भोजनास गेली होती. पण परशुरामभाऊ व रघुनाथराव हे मात्र पोटांत दुखत असल्याचें निमित्त करून भोजनास गेले नाहींत. भोजनाचा समारंभ चालला असतां तो चार हजार निवडक शिलेदार व तीनचार पलटणें बरोबर घेऊन दौलतराव शिंदे अकस्मात् सरकारच्या कचेरीच्या डेऱ्यांत येऊन दाखल झाले. शिंदे आल्याचें समजतांच बाजीरावसाहेब कसेंबसें भोजन आटोपून जवळच एक दुसरा डेरा होता त्यांत येऊन बसले. श्रीमंत येतांच शिंद्यांनीं फौजेच्या खर्चाकरितां पैका देण्याविषयीं श्रीमंतामागें एकदम जिकीरीचा तगादा लाविला. पंचवीस लक्ष्यांची जहागीर, एक क्रोड रुपये देऊन शिवाय नानांस कारभारांतून अजीबात काढण्याविषयीं शिंद्यांनीं श्रीमंतांजवळ आग्रह धरिला. व या सर्व गोष्टींचा निकाल तात्काळ लाविण्यास बजाविलें. शिंद्यांची जिकीर पाहून कांहीं धोका वगैरे आहे कीं, काय अशी धास्ती वाटल्यामुळें श्रीमंताजवळचे, बाजीराव बर्वे, हिरोजी पाटणकर, नानाजी फांकडे वगैरे लोक आपल्या शिलेदारांसह नागव्या तरवारीनिशीं श्रीमंतांभोवतीं गराडा देऊन बसले. याप्रसंगीं शिंद्यांनीं हें सर्व नाटकच चालविलें असल्यामुळें विशेष धोका उत्पन्न होण्याचा संभव नव्हता. नाहींतर ही वेळ अशी होती कीं, नारायणरावाच्या खुनाप्रमाणें यावेळींहि बाजीरावसाहेब मारले जावयाचे. बाजीरावातर्फें बरीच मध्यस्थी करण्यांत आली. पण शिंदे कोणाचेंच ऐकेनात असें पाहून बाजीरावानें शेवटीं परशुरामभाऊंस बोलाविणें पाठविलें. भाऊ आले, तेहि नागव्या तरवारीं हातीं घेतलेले हजारपांचशें विश्वासू

शिलेदार बरोबर घेऊन आले. भाऊ आल्यावर त्यांनीं शिंद्यांकडे जाऊन त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण शिंदे, भाऊंचेंहि ऐकेनात ! उभय पक्षांची मंडळी सहा प्रहरपर्यंत समोरासमोर बसून राहिली होती. रात्र झाली त्यावेळीं भाऊंनीं शिंद्यांची भोजनाची तयारी करविली. पण तीहि शिंद्यानीं जुमानिली नाहीं. त्या दिवशीं शिंद्यांनीं भाऊंस व श्रीमंतास संध्येस देखील उठूं दिलें नाहीं. मग जेवण दूरच राहिलें. रात्रभर सर्व मंडळी उपाशीच होती. अनेकांनीं अनेकवार प्रार्थना करतां करतां दुसरे दिवशीं सकाळच्या सहा घटका दिवसास शिंद्यांनीं सात कलमी यादी तयार करून ती श्रीमंतांपुढें टाकली. या यादींतील कलमाचा उलगडा आठ दिवसांत करावा व परशुरामभाऊ आणि श्रीमंतांचे मेहुणे, पांडुरंगराव बारामतीकर यांनीं याबाबतींत जामीनगिरी पत्करावी असें मागणें शिंद्यांनीं केलें. श्रीमंतांनीं ही गोष्ट कबूल केल्यावर व भाऊंनीं जामीनगिरी पत्करल्यावर शिंदे श्रीमंतास मुजरा करून व विडे घेऊन निघून गेले. *

---

* (**टीप**—शिंद्यांनीं बाजीरावाजवळून जी सात कलमी यादी घेतली ती खरें ऐ. ले. सं. या ग्रंथांत भाग ९ पत्र नं. ३७६१ आणि ३७६२ या पत्रांत छापली आहे. त्यांतील कलमें व त्यावर श्रीमंतांची मखलाशी पहाण्यासारखी असल्यानें ती यादी खालीं दिली आहे.

| शिंद्यांची विनंति | श्रीमंतांची मखलाशी |
|---|---|
| १ नानांनीं कारभारांत असो नये टोक्यास जाऊन रहावें. | १ मेणवलीस रहावें. त्यांस दगाफटका होऊं नये. येविषयीं तुम्ही खातर जमा करावी. |
| २ नानांनीं फंदफितुरी केल्यास पारिपत्य करावें | २ वाजवीच आहे. |
| ३ नानाचे आत्मिक कोणी ठेवूं नयेत | ३ सरकार उपयोगी असतील ते ठेवून घेऊं |
| ४ आमचे यादीचे जावसाल लवकर उलगडून द्यावे. | ४ यादी समजोन आम्ही आठ दिवसांत फडशा करावा. |
| ५ सातारचीं वस्त्रें नानाचे विद्यमानें आणो नयेत | ५ सरकारचा कारकून पाठवून आणूं. |
| ६ नानापासून पैसा घ्यावा कर्ज सरकाराचें फेडावें | ६ विचारें विचारें केले जाईल. |
| ७ कित्ता | ७ — — |

¶

श्रीमंतांना शेवटचें कलम अपमानास्पद वाटलें असावें म्हणून त्यांनीं त्यावर कांहींच उत्तर दिलें नाहीं. हे उघड आहे. या यादींतील कलमांना श्रीमंतांनीं जीं उत्तरें दिलीं त्यावरून श्रीमंतांनीं आपला स्वाभिमान व धनीपणा गाजविण्यात कमी केलें नाहीं असें दिसतें. त्याबरोबर यादींतील कलमांचा रोख नानाविरूद्ध कसा आहे. हेंहि स्पष्ट होतें. प, न. ३७६२ मध्यें जी आठकलमी यादी छापली आहे. त्यांत शेवटीं शिंद्यांनीं नानाच्या बाबतींत परशुरामभाऊ व पांडुरंगराव बारामतीकर यांची जामीनकी मागितली असें लिहिलें आहे. पण ही जामीनकी पत्करतांना भाऊनींहि शिंद्यांविषयीं खालीलप्रमाणें अपेक्षा व्यक्त केली आहे, "शिंद्यांनीं अत:पर त्यांचा (नानांचा) द्वेष करूं नये. असा जामीन द्यावा असें बोलणें (भाऊंचे) मात्र आहे." (खरें भाग ९ प. नं. ३७६२) तात्पर्य शिंद्यांचा नानाविरूद्ध केवढा कटाक्ष होता हें या यादींतील कलमावरून व खरे संग्रहातील इतर अनेक पत्रांवरून उघड होतें. उदाहरणार्थ अेका पत्रांत खालीलप्रमाणें उल्लेख आहे. "नानांनीं कारभार करूं नये वगैरे लिहिलेंच आहे. नानाचें मोठें दैव कीं, ते दिवशीं येथें नव्हते. असते तर मशरीन मुलुख यास नबाबांनीं हातीं दिला तैसा ( नानास शिध्यांच्या हातीं ) द्यावा लागता अेकवेळ वहिवाटली पुढें दैवानुरुप घडेल ते खरें (खरे भाग ९-३७६७) दुसऱ्या पत्रांत खालील मजकूर आहे."

---

¶ हीच यादी पुन्हा अै. ले. सं. भाग ९ प. न. ३७६२ मध्यें छापली आहे. त्यांत थोडाबहूत फरक असून अेक कलम जास्त आहे. तें असें कीं, कारभारी दुसरा करावा. या कलमांस श्रीमंतांनीं उत्तर दिलें कीं, चित्तास येईल तो केला जाईल तुम्ही त्याजविषयीं बोलो नये. पत्र नं. ३७६१ मध्यें जी यादी आली आहे. त्यांत सातवें कलम कित्ता म्हणून लिहिलें आहे. व त्यावर श्रीमंतांची मखलाशी म्हणजे उत्तर मुळींच नाहीं. याचा अर्थ स्पष्ट करण्याकरितां याच पत्रांत खालीलप्रमाणें लिहिलें आहे.

" जाबसाल कित्ता म्हणोन कलम लिहिलें आहे. याजवर मखलाशी नाहीं याचा अर्थ श्रीमंत पळोन जाणार असें अैकतों येविषयींची खातरजमा करावी (असें शिंद्यांचे म्हणणे " )

" शिंदे यांजकडील कारभारी यांचे चढाचे बोलणें जे नानास धरूनच आणू तरच स्वामींचे अेकनिष्ट सेवक. असें बोलणेचे आवाज निघतात (खरे भाग ९-३७७०) आणखी अेका पत्रांत खालील प्रमाणें लिहिलें आहे· " शिंद्याचे सारे कारभारी यांचे मतें यांची (नानांची) व सरकारची जमीयत याजपाशीं आहे ती नसावी. शिंद्यांचे कारभारी यांची व भाऊची बोलणी पांच सात वेळा जाहली परंतु सारे शेणबी यांचा आग्रह यांजविषयीं (नानाविषयी) फारच आहे. त्यामारखें सरकारांतून यादीवरहि त्यांनी लिहून घेतले आहे." (खरे भाग ९-३७७४) दुसऱ्या एका पत्रांत खालील प्रमाणें लिहिलें आहे. " सारांश शिंदे जमीयतशीर बोलणीं तशींच पडतात. या प्रसंगी पाहतां भाऊसाहेबाशिवाय रगडून जाबसाल सांगणारा दुसरा कोणी नाहीं. जे दिवशी शिंदे यांनी जाबसालचे फडशें झालेच पाहिजेत म्हणोन बैठक मारली ते दिवशीं भाऊसाहेब या कामांत न पडतें तरी बहुत कांहीं खराबी होती हे सर्वांच्या प्रत्ययास आलें." (खरे भाग ९-३७७७) वर जे उतारे दिले आहेत त्यांना पोषक अशीच माहिती अलीकडे प्रसिद्ध झालेल्या पुना रे. रेकार्डमध्यें आहे. उदाहरणार्थ अेका पत्रांत असें लिहिलें आहे. कीं शिंद्यानें नानांना कारभारांतून काढून टाकण्याची अट बाजीरावाकडून कबूल करून घेतली. या प्रकरणांत शिंद्याजवळ लढणें किंवा अजीबात आपण होऊन कारभारांतून अंग काढून घेणें. अेवढाच मार्ग नानाला शिल्लक होता. (P. R. C.२-२९३) या सर्व प्रकारावरून नाना पुण्यातून निघून गेले ते प्रसंग ओळखूनच गेले असेंच म्हणावें लागतें. निवळ ते भित्रे होते म्हणून पळून गेले असें नव्हे. ते पुण्यास राहते तर शिंद्यानें त्याना पकडल्याशिवाय सोडलें नसतें हे वरील पत्रव्यवहारावरून स्पष्ट आहे.

शिंद्यानें बाजीरावाकडून जी यादी करून घेतली होती. त्या यादींतील कलमांचा निकाल अेका आठवड्यांत करावयाचा होता. पण ही गोष्ट व बाजीराव व त्याचे जामीन परशुराभाऊ यापैकीं कोणांसच शक्य नव्हती. आठ दिवस होतांच पुन्हां शिंदे काय करतील ही धास्ती श्रीमंतांना होतीच. पण शिध्यानीं अेक आठवड्याच्या अैवजीं तीन आठवडे वाट

पाहिली. तीन आठवडयांतसुद्धां जेव्हां यादीचा निकाल लागेना; तेव्हां शिंद्यांनीं पुन्हा ता. ९ मे १७९६ रोजीं श्रीमंतांच्या दाराशीं धरणें आणलें. यावेळीं प्रत्यक्ष शिंदे न येतां त्यांचें प्रमुख कारभारी बाळोबा तात्या हे आले होते; आणि त्याजबरोबर आठ हजार फौज घेऊन नारायणराव बक्षीहि आले होते. शिवाय पलटणें व तोफाहि होत्या बाळोबांनीं श्रीमंतांच्या मागें यादींतील कलमांचा तगादा लाविला. पण श्रीमंतांकडून कांहींच जाबसाल न आल्यामुळें शिंद्यांचे कारभारी फारच रागावले. यावेळीं श्रीमंतांस कैद करतां आलें तर पहावें असाहि बाळोबांचा बेत होता पण श्रीमंतांचे भोवतीं हजार बाराशें मानकरी शिलेदार यांचा गराडा असल्यामुळें श्रीमंतांस कैद करणें शिंद्यांच्या कारभाऱ्यास साधलें नाहीं. शक्यतितकें रक्तपात व गडबड न करितां श्रीमंतांस हस्तगत करावें असें बाळोबाचें धोरण होतें. पण तें साधलें नाहीं. हें पाहून शिंद्यांच्या कारभाऱ्यांना फार राग आला व अदवातदवा भाषणें करून शिंद्याचे हे कारभारी फौज व पलटणें घेऊन रागारागानें आपल्या गोटाकडे निघून गेले. शिंद्याचे कारभारी रागावून निघून गेले हें बरें झाले नाहीं सरदार रुसले तर त्याची समजूत धन्यानें करावी असा परिपाठ आहे. तरी श्रीमंतांनीं शिंद्यांच्या गोटांत जाऊन त्यांचें समाधान करावें असा सल्ला श्रीमंतांस त्यांच्याजवळच्या माणसांनीं दिला. शिंद्यांच्या गोटांस गेल्यास शिंद्यांचा रुसवा जाईल व त्याच्या रुसव्यापासून कांहीं अनर्थ होणार असेल तर तो टळेल या समजुतीनें श्रीमंतांनीं शिंद्यांच्या गोटास जावयाचें ठरविलें.

श्रीमंत शिंद्यांच्या गोटास जावयास निघाले तेंव्हा त्यांच्याबरोबर पांडुरंगराव बारामतीकर बाजीराव बर्वे, आपाजीपंत सहस्त्रबुद्धे, बाळाजीपंत पटवर्धन मानाजी फांकडे, हिरोजीराव पाटणकर, मालोजी घोरपडे, व रघुनाथराव पटवर्धन इत्यादि मंडळी होती. श्रीमंतांनीं परशुरामभाऊंसहि बरोबर येण्यास सांगितलें परंतु त्यादिवशीं प्रदोष असल्यामुळें आणि संध्याकाळहि झाली असल्यामुळें स्नान, संध्या, पूजा व भोजन झाल्यावर

आपण येऊं तूर्त श्रीमंतांनीं पुढें चलावें, असा भाऊंनीं श्रीमंतांस निरोप पाठविला. व ते आपल्या गोटांतच राहिले बाजीरावसाहेब शिंद्यांच्या गोटांत येतांच शिंद्यांनीं त्यांचा मोठा आदरसत्कार करून त्यांना आपल्या डेऱ्यास नेलें. शिंद्यांच्या डेऱ्यांत गेल्यावर आरंभी चार ख्याली खुशालीच्या गोष्टी झाल्यावर श्रीमंतांनीं लिहून दिलेल्या यादींतील कलमांचा फडशा पाडण्याविषयीं बोलणें सुरू झालें. बोलणें होतां होतां. प्रहर रात्र झाली. श्रीमंतहि फार बोलके असल्यामुळें बोलण्यालाहि खूप रंग चढला होता. रात्र बरीच झाल्यामुळें बोलणें थांबवून श्रीमंतांनीं परत निघावें अितक्यांत एक घोडेस्वार दौडत दौडत शिंद्यांच्या डेऱ्याच्या दारापर्यंत आला व "घात झाला" "घात झाला" असें ओरडू लागला! हे अैकून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला 'व काय झालें' विचारतांच त्यानें उत्तर दिलें कीं "परशुरामभाऊ चिमाजीअप्पास घेऊन पळून गेले" ही बातमी अैकतांच सर्वांनाच आश्चर्य वाटलें व बाजीरावसाहेबांची तर कंबरच खचली! श्रीमंत अितके घाबरुन गेले कीं त्यांनीं दौलतराव शिंद्यांची आर्जवें करून आतांच फौज पाठवून परशुरामभाऊंचा पाठलाग करावा व त्यास धरून आणावें अशी शिंद्यांस विनवणी चालविली. पण भाऊचें हें कृत्य पूर्वसंकेताप्रमाणें शिंद्यांचे संमतीनें झालें असल्यामुळें शिंद्यांनीं तिकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. व श्रीमंतांस कळविलें कीं रात्र काळोखाची असल्यामुळें व भाऊ कोणत्या वाटेनें गेले असतील हें माहीत नसल्यामुळें आतां फौजा पाठवून कांहीं उपयोग नाहीं. तेव्हां श्रीमंतांनीं तूर्त गोटास चलावें उद्यां सकाळीं हें काम प्रथम करू. शिंद्यांनीं भाऊंचा पाठलाग उद्या करूं आपण आपल्या गोटास जावें असें श्रीमंतांस सांगितलें पण श्रीमंत भाऊंच्या या कृत्यामुळें अितके घाबरून गेले कीं शिंद्यांच्या गोटाबाहेर जाण्याची त्यांची छाती होईना. त्यांना असें वाटूं लागलें कीं भाऊंनीं जातांना आपल्यालाहि कांहीं दगाफटका करण्याची व्यवस्था केली असेल. अशा संशयामुळें श्रीमंत शिंद्यांच्या गोटांत राहिले. तेंव्हां शिंद्यांनें त्यांना सांगितलें कीं हा गोट काय व तो गोट काय कोठेंहि राहिलां तरी आपण मालकच आहां. आपण खुशाल रहावें. मग

श्रीमंत तेथेंच राहिले. उजाडल्यावर श्रीमंतांनीं परत जाण्याची गोष्ट काढतांच मात्र शिद्यांनें त्यांना बजाविलें कीं आपणास माझ्या गोटा बाहेर पाऊल टाकण्याची सोय नाहीं. तसें कराल तर तात्काळ दगा होण्याचा संभव आहे. अशा स्थितींत मी आपणांस बाहेर जाऊं देणार नाहीं. शिद्यानीं असें सांगतांच श्रीमंत मात्र मनांत समजलें कीं आपण शिद्यांच्या कैदेंत सांपडलों. श्रीमंतांबरोबर आलेल्या मंडळीपैकीं फाकडे, पाटणकर व बाळाजी पंत पटवर्धन या तीन आसामीस शिद्यांनीं ठेऊन घेतलें व बाकीच्या मंडळीस परत लावून दिलें.

आतां अिकडे परशुरामभाऊंनीं काय चमत्कार केला तें पाहिलें पाहिजे श्रीमंत शिद्यांच्या गोटास गेले तेंव्हां परशुरामभाऊंस त्यांनीं बरोबर येण्यास आमंत्रण दिलें होतें पण प्रदोष असल्यामुळें स्नान, पूजा, भोजन वगैरे आटोपून आपण मागाहून येतों असें त्यांनीं श्रीमंतास कळविल्याचें पूर्वीं लिहिलेंच आहे. श्रीमंत शिद्यांच्या गोटास गेल्यावर भाऊंनीं स्नान केलें व शिवपूजा केली. नंतर जेवावयास बसण्यापूर्वीं श्रीमंतांस सांगितल्याप्रमाणें शिद्यांकडे जाण्याकरितां भाऊंनीं पालखीहि आणविली. नंतर भोजन झालें. पालखी तयार होतीच. परंतु पालखींत बसून भाऊंनीं शिद्यांच्या गोटास जावें तें न जातां ते श्रीमंतांच्या डेऱ्यांत चिमाजीअप्पा होता त्या ठिकाणीं दोनतीनशें लोक बरोबर घेऊन गेले. तेथें गेल्यावर भाऊंनीं चिमाजीअप्पास विनंति केली कीं आपण पुण्यास यावें. चिमाजीअप्पानें ही विनंति मान्य केली नाहीं. नंतर भाऊंनीं पुन्हां चिमाजीस साष्टांग नमस्कार घातला व "कृपा करून यावें" अशी विनंति केली. पण चिमाजी ऐकत नाहीं असें पाहून भाऊंनीं चिमाजीस जबरदस्तीनें पालखींत बसविलें. जबरदस्तीमुळें चिमाजीचें शंखवाद्याचा प्रयोग केला पण भाऊंनीं तिकडे लक्ष न देतां चिमाजीस पालखींत घातलें व थेट पुण्याचे रोखें चालते झाले *

* ( टीप—चिमाजीअप्पास परशुरामभाऊंनीं पुण्यास आणलें व शिद्यांनीं बाजीरावास आपल्या गोटांत कैद केलें ही हकिगत खरे भाग ९ §

चिमाजीअप्पास घेऊन परशुरामभाऊ रातोरात थेऊराहून निघाले. ते मध्यरात्रीस पुण्यास पोचले. शनवार वाड्यांत प्रवेश करण्यास त्यावेळीं मुहूर्त नव्हता. म्हणून भाऊंनीं रास्त्यांच्या नव्या वाड्यांत मुक्काम केला.

---

§ प. नं. ३७७९, ३७८०, ३७८१ आणि ३७८२ या पत्रांत सविस्तर आली आहे. हीच हकिगत पूना रे. रेकार्डमध्यें P.R.C. २-२९९-३०० या पत्रांत तशीच आहे. चिमाजीला भाऊंनीं जबरदस्तीनें पालखींत घातलें त्यावेळीं चिमाजीनें केलेली गडबड एका पत्रांत खालीलप्रपाणें दिली आहे. " सव्वा प्रहर रात्रीस श्रीमंत राजश्री चिमाजीअप्पासाहेब आपल्या डेऱ्यांत होते. तेथें जाऊन वडिलांनीं विनंति केली जे. " राज्यास अधिकारी कोणी नाहीं. राज्य बुडतें. आपण कृपा करून पुण्यास यावें. " याप्रमाणें विनंति केली. तेव्हां श्रीमंत बोलले जे " राज्य बुडलें तरी चिंता नाहीं. मी कांहीं यावयाचा नाहीं. " याप्रमाणें उत्तर जाहलें. मग वडिलांनीं साष्टांग नमस्कार घातला. आणि कृपा करून यावें अैशी विनंति केली. तरी मान्य न होय. तेव्हां दोघांजणांनीं मिळोन पालखींत बसविलें. तेव्हां श्रीमंतांनीं शंख वाद्याचा प्रयोग केला. नंतर वडिलांनीं शिंद्यांच्या लष्कराकडे रोख दाखवून पुण्याकडे घेऊन गेले " ( खरे भाग. ९-३७७९ ) पुना रे. रेकार्डमध्यें याबांबतींत असें लिहिलें आहे कीं चिमाजीअप्पा मोठ्या नाखुशीनें भाऊबरोबर आला. त्यानें पालखींतून उडी टाकली. व जानवेंहि तोडून टाकलें. तरी त्याला भाऊनें जबरदस्तीनें पुण्यास आणलें. भाऊनें ही हकिगत साताऱ्यास नानांलाहि कळविली ( P.R.C. २-३०० ) भाऊनें केलेली ही कामगिरी शिंदे व भाऊ यांचे पूर्वसंकेताप्रमाणें होती. असा मजकूर एका पत्रांत आहे. तो मजकूर असा " आवशीचे सात घटका रात्रीस श्रीमंत राजश्री चिमाजीअप्पासाहेब यांस पालखींत बसवून पुण्यास घेऊन वडील ( भाऊ ) बरोबर फौजसुद्धां आले. तिकडे शिंद्यानीं त्यांस ( बाजीरावास ) कैद केले. हा संकेत पूर्वीच होतासा सुमार दिसतो. त्याप्रमाणें घडलें. " ( खरे भाग ९-३७८१ )

नंतर ता. १२ मे. १७९६ रोजीं चिमाजीअप्पाचा शनिवार वड्यांत प्रवेश झाला.*

चिमाजीअप्पा पहिल्या दोनचार दिवस नाखूष आणि रुसलेलें असेच होते. पण पुढें पुढें त्यांस विसर पडत चालला. चिमाजीअपाचा वाड्यांत प्रवेश झाल्यापासून वाड्यांतील सर्व बंदोबस्त पटवर्धन मंडळीकडेच होता. परशुरामभाऊंचे द्वितीय पुत्र हरीपंतबाबा व जनोबा सुभेदार यादवाडकर हे वाड्यांत मुख्य अधिकारी नेमले होते. व त्यांचा मुक्काम नेहमीं वाड्यांतच असे दररोज तिसरे प्रहरीं परशुरामभाऊ सरकारवाड्यांत नेमानें येऊन बसत असत. चिमाजीअप्पाचा वाड्यांत प्रवेश झाल्यावर चार दिवसांनीं म्हणजे ता. १६ मे १७९६ रोजीं स्वतः दौलतराव शिंदे व त्यांचे बाळोबा वगैरे प्रमुख कारभारी सरकार वाड्यांत चिमाजीअप्पाचे भेटीस आले. चिमाजीची भेट झाल्यावर मग ते मातोश्री यशोदाबाईकडे गेले तेथें सेवा धर्माची पुष्कळ बोलणी बोलून यशोदाबाईची खातर जमा केली की " केला कारभार शेवटास नेतों यांत चलबिचल नाहीं." अशा रीतीनें मातोश्री यशोदाबाईची खातर जमा केल्यावर शिंदे आपल्या गोटास गेले. येथपर्यंत सर्व ठीक झालें पण आतां पुढें चिमाजीचें दत्त विधान व्हावयाचें व त्याला सातान्याहून वस्त्रें आणावयाचीं हीं दोन महत्वाची कामें व्हावयाचीं होतीं. पैकीं दत्तवि-

---

* (टीप:-चिमाजीअप्पाचा शनिवार वाड्यांत प्रवेश झाला त्याची हकीगत एका पत्रांत खालील प्रमाणें आहे. " श्रीमंत राजश्री चिमाजीअप्पासाहेब रास्त्यांचे वाड्यांतून निघोन गुरवारीं २० घटका रात्रीस भवानी पेठेंतून बुधवारांतून स्वारी वाड्यास उजवी घालून सरकार वाड्यांत दाखल झाली. समारंभें जरीपटका, साहेब नौबत चौघडा. अतसबाजी होऊन स्वारी मोठ्या समारंभानें आली. वडील (परशुरामभाऊ) पाठीमागें, सरदार वगैरे सर्व अंबारीमध्यें होतें. श्रीमंत रुप्याचे अंबारींत होतें. शिंद्यांकडील कांहीं लोक व धोंडिबा असे आले होते. वै. शु. १० स वस्त्रें होणार श्रीमंत राजेश्री चिमाजीअप्पासाहेब दोन रोज फार अर्जूदा (रुसलेले) होते. दिवसेंदिवस विसरतील " (खरे भाग ९-३७८४)

धानाचें काम भाऊ व बाळोबा यांचे हातांतील असल्यानें तें त्यांना सहज करतां येण्यासारखें होतें. पण दुसरें म्हणजे साताऱ्याहून वस्त्रें आणण्याचें काम मात्र तितकें सोपें नव्हतें. कारण नानाचें वास्तव्य साताऱ्यास असल्या मुळें त्यांत बऱ्याच अडचणी येण्याचा संभव होता. वस्त्र आणण्याचा कामांत नानाचा कांहीं संबंध असतां कांमा नये व नानांनीं साताऱ्यास महाराजांजवळ राहतां कामा नये असें शिंद्यांचे कारभारी बाळोबा तात्या याचें म्हणणें होतें. परशुरामभाऊंचें या बाबतींत बाळोबाशी अेकमत होतें. पण भाऊंचें पुढें आणखीं असें म्हणणें होतें कीं नाना कारभारांत नसावा हें ठीक आहे. पण ते ज्या ठिकाणीं जाऊन राहतील त्या ठिकाणीं त्यांना निर्वेध राहूं द्यावें. त्यांचा पैसा व अब्रू यांस धक्का लागतां कामा नये. शिवाय फडणीशीचा त्यांचा हक्क त्यांच्याकडे चालला पाहिजे. भाऊंचें हें म्हणणें बाळोबास पहिल्यानें मान्य नव्हतें. पण भाऊंनीं शेवटीं फारच आग्रह धरल्यामुळें बाळोबा या गोष्टीस तयार झाले. पण त्यांनींहि आणखी अशा अटी घातल्या कीं नानांनीं साताऱ्यास फौज जमविली आहे ती दूर करावी, राजकारभारांत काडिमात्र ढवळाढवळ करूं नये, परकीय राजेरजवाडयांशीं व राज्यांतील सरदाराशीं राजकारण करूं नयें, आणि गड, कोट, किल्ले व सरंजामाचा मुलूख त्यांच्या ताब्यांत आहे त्याच्या सोडचिठया द्याव्या. बाळोबाच्या या अटी भाऊंनीं मान्य केल्या व नाना त्याप्रमाणें न वागतील तर त्यांचें पारिपत्य करण्याचे कामीं आपण बाळोबास मदत करूं असें भाऊंनीं बाळोबास वचन दिलें.

भाऊ व बाळोबा याजमध्यें नानासंबंधानें तडजोडीचीं जीं बोलणीं झाली. ती नानास कळविण्याकरितां भाऊंनीं चिंतोपंत लिमये नांवाच्या गृहस्थास मुद्दाम साताऱ्यास पाठविलें. चिंतोपंतानें सर्व हकीगत नानास सांगितली. पण भाऊ व बाळोबा यांच्या मताप्रमाणें सातारा सोडण्यास नाना तयार नाहींत असें चिंतोपंतास दिसून आलें. चिंतोपंत नंतर पुण्यास आला व सर्व हकीगत त्यानें भाऊस कळविली. बाळोबानें हा कयास प्रथमच केला होता. अशा गोडीगुलाबीनें नाना सातारा सोडील असें बाळोबास मुळींच वाटत नव्हतें पण शक्यतोंवर तडजोडीनें व गोडीगुलाबीनें नानाचें

प्रकरण मिटवावें असा परशुरामभाऊंचा आग्रह असल्यामुळें बाळोबानें त्याला मान्यता दिली होती. अर्थात नाना साताऱ्याहून हालत नाहींत. तेव्हां साताऱ्यास फौज पाठवावी असा बाळोबानें आग्रह धरिला. परंतु अितक्या निकरावर गोष्ट येऊं नये म्हणून भाऊंनीं पुन्हा चिंतोपंताना नानाकडे पाठविलें तरीसुद्धां नानाकडून कांहीं उत्तर येईना. अितकें झाल्यावर आतां साताऱ्यास फौज पाठविणें प्राप्तच. या गोष्टीला आतां भाऊ विरोध करूं शकत नव्हते. कारण पेशवाईचीं वस्त्रें आणण्याचें काम लवकर उरकून घ्यावयाचें होतें. म्हणून दहा हजार फौज व पांच पलटणें बरोबर देऊन नारायणराव बक्षी यांनीं साताऱ्यास जावें असें ठरलें. नारायणराव बक्षी कवडीच्या मुक्कामाहून निघून यवतपर्यंत येऊन पोंचले. तेथून त्यांनीं पुढें जाऊ नये अशी भाऊंनीं त्यांना चिठ्ठी पाठविली. व नानाचे बाबतींत शेवटचा आणखी एक प्रयत्न करण्याकरितां बहिरोपंत मेहेंदळे याची नानाकडे साताऱ्यास रवानगी केली. बहिरोपंत साताऱ्यास पोहोंचल्यावर नाना तेथून न निघतील तर नारायणराव बक्षीनीं फौजासुद्धां कूच करून साताऱ्यास जावें असें भाऊंनीं ठरविलें होतें.

अितक्या थरावर गोष्टी आल्या तेव्हां बहिरोपंताच्या निरोपाप्रमाणें नानांनीं सातारा सोडण्याचें ठरविलें. भाऊंच्या अदमासाप्रमाणें नाना मिरज किंवा तासगांव या ठिकाणीं जातील असें होतें. पण पुढच्या बेतावर नजर ठेवून नाना मेणवलीस गेले. नाना साताऱ्याहून गेल्यावर भाऊंनीं त्रिंबकराव अमृत पेठे या गृहस्थास साताऱ्यास पाठवून महाराजांकडून चिमाजीअप्पाकरितां पेशवाईचीं वस्त्रें आणविलीं. या कामांत नानांनीं त्यांस कांहीहि अडथळा केला नाहीं. *

*( टीपः— नाना साताऱ्याहून ता. २२ मे १७९६ रोजीं मेणवलीस गेले. याच्या आधीं सुमारें ४।८ दिवस ज्या वाटाघाटी झाल्या त्याची हकीगत पु. रे. रेकॉर्ड मध्यें आली आहे. त्यांत असें लिहिलें आहे कीं शिंदे पुणें सोडून उत्तरेंत जातील तर नाना त्यांस अेक कोट रुपये देण्यास तयार होते. हे रुपये तीन हप्त्यांनीं द्यावयाचे होते. २५ लक्ष चिमाजीस वस्त्रें झाल्यावर

चिमाजीअप्पास पेशवाईचीं वस्त्रें मे सन १७९६ च्या अखेरीस झालीं. हा समारंभ फार मोठा थाटाचा झाला. नूतन पेशव्यास नजराणा करण्याकरितां शिंदे होळकर वगैरे प्रमुख सरदार हजर होते. शहरच्या लोकांसहि या समारंभामुळें फार आनंद झाला. ❀

---

२५ लक्ष शिंदे गंगेस गेल्यावर व ५० लक्ष शिंदे उत्तरेंत गेल्यावर द्यावयाचे असें नानानें कबूल केलें होतें. ( P. R. C. -२-३०१ ) यावरून चिमाजीअप्पास पेशवाईच्या गादीवर बसविण्यास नानाचें मत अनुकूल होतें असें दिसते. पण हा सर्व कारभार शिंद्यांच्या जबरदस्तीनें होत असल्यामुळें तो शेवटपर्यंत टिकणार नाहीं असें नानाचें मत असावें. )

❀( टीप:— चिमाजीअप्पास पेशवाईचीं वस्त्रें झालीं त्यादिवशीं आनंदोत्सवाप्रीत्यर्थ जो दानधर्म करण्यांत आला त्यांत पुळयाच्या गणपतीला चौघडा दिला गेला. (खरे. ९–३७९४) पुळयाचा गणपती हें पटवर्धनांचें दैवत असल्यामुळें परशुरामभाऊंच्या मध्यस्थीनेंच हा चौघडा मिळाला असावा. हल्लीं चौघड्या निमित्त १२०० रुपयांची रक्कम या देवस्थानास रत्नागिरी कलेक्टर कचेरींतून दर वर्षास मिळत असते. चिमाजीस वस्त्रें देतांना त्याचें दत्तविधान करणें प्राप्त होतें. हें दत्तविधान म्हणजे सुनेच्या मांडीवर चुलत सासऱ्याला बसवावयाचा होता. कारण सवाईमाधवरावाची बायको यशोदाबाई ही चिमाजी अप्पाची चुलत सून होती. अर्थातच अशा दत्तविधानाला त्या काळच्या शास्त्री लोकांची संमति मिळणें कठीणच होतें. या संबंधीं एका पत्रांत खालील प्रमाणें उल्लेख आहे. "बाळकृष्ण शास्त्री छत्रे दत्तविधानाचा सल्लाह देईनात. विधान झालें हें अशास्त्र म्हणोन दोन तीन दिवस क्षेत्र करून तुळशीबागेंत बसला आहे. वडिलांस ( परशुराम भाऊंस ) राग आला म्हणजे शहर पार करून देतील तेव्हां समजेल" ( खरे भा· ९–३७९२ ) सुनेच्या मांडीवर सासऱ्याला बसविणें हें अशास्त्र खरेंच पण कठोर राजकारणांत शास्त्र आडवें आलें तरी तें कापूनच काढावें लागतें; या न्यायानें परशुरामभाऊंसारख्या तीव्र धर्मनिष्ठ माणसालासुद्धां दत्तविधानाला शास्त्राची अडचण सांगणाऱ्या शास्त्र्याला तंबीच देण्याचा प्रसंग आला. )

चिमाजीअप्पास पेशवाईची वस्त्रें झाल्यावर पुढची गोष्ट म्हणजे शिंद्यानें निजामावर स्वारीस निघणें ही होती. निजामावर स्वारी करण्याची हूल उठविण्यांत शिंद्याचा हेतू असा होता कीं निजामानें नानाचे राजकारणांत पडूं नये. पण नानाचे पडत्या काळांतसुद्धां नानाचें निजामाजवळ वजन शिंदे समजत होते. त्यापेक्षां बरेच जास्त होते. शिंदे व भाऊ यांच्यांत झालेल्या कराराप्रमाणें नानाने कोणत्याच अटी पाळल्या नव्हत्या. नाना फक्त सातान्याहून मेणवलीस गेले होते. भाऊ व बाळोबा यांच्या म्हणण्याप्रमाणें नानांनीं कांहीं एक केलें नव्हतें; इतकेंच नव्हे तर भोसले व निजाम यांशीं नानाचे राजकारण असल्याचाहि संशय भाऊ व बाळोबा यांना आला. अर्थातच नानाची बाजू यापुडें सावरून धरणें यापुढें परशुरामभाऊंनाहि कठीण वाटूं लागलें. अशा स्थितींत भाऊ व शिंद्याचे कारभारी बाळोबा यांनीं असें ठरविलें कीं नानांनीं तात्काळ मेणवली सोडावी व टोक्यास जाऊन रहावें. आणि चातुर्मास्य संपल्यावर त्यांनीं काशीस जाऊन रहावें. नाना सामोपचारानें हें करण्यास तयार नसतील तर त्यांच्यावर पलटणें पाठवावीं. भाऊ व बाळोबा यांचा झालेला हा ठराव नानांच्या कानावर घालण्याकरितां भाऊंनीं चिंतोपंत लिमये व विसाजीपंत वाडदेकर या दोन इसमांस नानाकडे पाठविलें. पण अशा अरेराविला भीक घालणारे नाना नव्हते. नानांनीं या मध्यस्थ गृहस्थांस फार गरीबनेंच सांगितलें कीं आपण राजकारण वगैरे कांहींच करीत नाहीं. पण आपल्यास मेणवलीसच राहूं द्यावें टोक्यास जाण्यास आपण तयार नाहीं. भाऊ व बाळोबा यांना नानाचें हें म्हणणें मान्य होईना. परशुरामभाऊ म्हणत कीं नाना टोक्यास जाऊन राहिले तर त्यांस शिंद्याकडन काडिमात्र तसदी पोंचणार नाहीं या बद्दल मी जामीनगिरी पत्करीत असतां नानांनीं मेणवलीचाच आग्रह कां धरावा; सरळ स्वभावाच्या परशुरामभाऊंना नानाच्या वागणुकीचा ग्रंथ नीट उलगडेना. पण नाना आणि भाऊ या दोघांच्या स्वभावांत जमीन अस्मनाचे अंतर होतें. नानांची दूर दृष्टी व पाताळयंत्रीपणा भाऊंत नव्हता. भाऊ हे राज्याचे एकनिष्ठ सेवक होते. ते साधे सरळ स्वभावाचे शिपाईगडी होते. मेणवली-

* मों. अ.

सच रहाण्याचा आग्रह धरण्यांत नानाचा पुढील राजकारण साधण्याचा हेतु होता. अर्थात नानांचा आग्रह वाढत चालला तसा भाऊ बाळोबानांहि नानांच्या वागणुकीचा संशय येऊं लागला. नाना मेणवलीहून हालत नाहींत हें पाहून त्यांना पकडण्याकरितां उतावीळ झालेले बाळोबा यांनीं मेणवलीस पलटणें पाठविण्याचे ठरविलें. पण मेणवलीस शिंद्यांची पलटणें गेलीं तर कांहीं अतिप्रसंग होण्याचा संभव होता. आणि नानाबद्दल परशुराम भाऊच्या मनांत अजून पूर्ण आदर होता. तेव्हां नानावर कोणत्याहि प्रकारचा वराबाईट प्रसंग येऊं नये या प्रामाणीक समजुतीनें भाऊंनीं बाळोबाकडे मध्यस्थी करुन नानाला मेणवलीहून आणण्याचें काम आपणावर सोपवून घेतलें. बाळोबानें ही गोष्ट मान्य केल्यावर परशुरामभाऊचे तृतीय पुत्र महादजीपंत दाजी हे चार हजार फौज घेऊन नानास आणण्याकरितां मेणवलीस निघाले. शिंद्यांकडन नानास कोणत्याहि प्रकारचा उपद्रव होणार नाहीं अशी नानाची खात्री महादजीपंतानें करावी; मेणवलीहून टोक्यास जाईपर्यंत महादजीपंतानें नानाबरोबर असावें आणि टोक्यास आपणाजवळ रहा असें नाना म्हणाले तर महादजीपंतानें टोक्यास रहावें अशा सूचना भाऊंनीं आपल्या पुत्रास दिल्या होत्या. हा सर्व खटाटोप परशुरामभाऊंनीं जरी नानाच्या कल्याणाकरितां केला होता तरी नानाला मात्र आपल्याला पकडण्याचाच हा उद्योग आहे असें वाटत होतें. महादजीपंत दाजी मेणवलीस येण्याकरितां निघाले ही बातमी नानास कळतांच ते ता ४ जून १७९६ ला मेणवलीहून निघाले व त्यांनीं रायगडाकडे पलायन केलें. यावेळीं त्याजबरोबर दोन तीन हजार स्वार व हजार पंधराशें गारदी असा सरंजाम होता. ✽

✽ टीपः—पूना रे. रेकॉर्डमध्यें एका पत्रांत नानानें सातार्‍याहून मेणवली व तेथून रायगड व नंतर महाड येथें जाण्याचें असें कारण सांगितलें आहे कीं त्याच्या बाबतींत विश्वास घातानें वागण्याचा इतरांचा हेतु त्याला स्पष्ट कळला होता. ( PRC.२–३४३ ) अर्थातच परशुरामभाऊंचे पुत्र फौजेसह नानाला आणण्यास निघाल्याचें नानास कळतांच त्यानें मेणवलीहून पलायन केलें )

नाना रायगडास गेले पण तेथील किल्यावरील सर्द हवा त्यांस मानवेना. तेव्हां तेथें चार दिवस राहून नाना पुढें महाडास गेले पावसाळा सुरू झाल्यामुळें त्याच्या पाठीवर फौज येण्याचा संभव कमीच होता. तरी सुद्धां नानांनीं जातांना घाटांतील वाटा बंद केल्या होत्या व वाटेंत मोठमोठे वृक्ष तोडून आडवे घालून ठेविले होते. *

चिंमाजी अप्पास गादीवर बसविल्यानंतर व नानाचा बंदोबस्त केल्यानंतर शिंद्यांनीं निजामावर स्वारी करावी असे शिंद्यांचे कारभारी व परशुरामभाऊ यांमध्यें ठरलें होतें. पण नानाचा बंदोबस्त होण्याचें बाजूस राहून नानाच उलटा शिंदे व भाऊ यांच्या हातावर तुरी देऊन महाडास निसटला व तेथून त्यानें जे उद्योग सुरूं केले त्यामुळें शिंदे व भाऊ यांच्या कारभाराला मोठाच अडथळा होऊं लागला. नानानें महाडाहून अिंग्रजांशीं संधान बांधलें. त्याचा परिणाम शिंद्यांस जाणवूं लागला. अिंग्रजांच्या मार्फत नानाच्या कारस्थानाचा धक्का शिंद्यास बसतांच त्यानें निजामावरील स्वारीचा नाद सोडून दिला व त्याप्रमाणें परशुरामभाऊंसहि कळविलें. नानांनीं महाडाहून अिंग्रजांकडे संधान बांधल्यावर अिंग्रजांनीं नानाकरितां साष्टीचा किल्ला खालीं केला व शिंद्यांस कळविलें कीं नानाच्या अब्रूस तुम्ही धक्का लावाल

* टीपः—नाना महाडास गेल्याचें कळतांच परशुरामभाऊंनीं उद्गार काढले कीं "मनसब्यास प्रारंभ झाला" ( खरे भा. ९–३७९९ ) नाना महाडास गेल्यावर त्यांनीं तेथून मोठें प्रचंड कारस्थान केलें हें प्रसिद्धच आहे. )

तर नाना मसलत केल्याशिवाय राहाणार नाहींत व या कामीं आम्ही नानांचें सहाय्य करूं. *

इंग्रजांशीं बिघाड झाला तर त्याला तोंड म्हणून कांहीं तरी उपाय करणें भाऊस जरूरच होतें. कारभाराचें मुख्य ओझें यावेळीं भाऊंवरच होतें त्यांनीं असें ठरविलें कीं इंग्रज बिथरला तर निजाम तरी आपल्याला सामील असावा म्हणून भाऊंनीं कांहीं अटींवर निजामाचा दिवाण मशीद उलमुख पुण्यास पेशव्यांच्या कैदेंत होता त्याची मुक्तता करण्याचें ठरविलें. या मशीरानें पुणें दरबारास कांहीं नजराणा देण्याचें कबूल केलें. आणि आपली मुक्तता झाल्यास खर्ड्याच्या लढाईतील खंडणीहि नबाबाकडून देवविण्याचें आश्वासन दिलें. मशीराच्या या गोड थापांना भुलून परशुरामभाऊंनीं त्याला मुक्त केलें.

---

( *टीप: - नानानें अिंग्रजांकडे संधान बांधलें, पण इंग्रजांच्या भलत्याच अटी मात्र कबूल केल्या नाहींत. हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. नाना-आपल्याकडे मदत मागण्याला येतात या संधीचा फायदा घेऊन पूर्वीं राघोबानें पेशवाईचा ६ आणे हिस्सा अिंग्रजांस देण्याचें कबूल केलें होतें. त्याप्रमाणें नानानेंहि कबूल करावें असें अिंग्रजांचें म्हणणें होतें. पण नाना राघोबा नव्हता, हें अिंग्रज विसरले. नानानें यावेळीं इंग्रजांस दिलेलें उत्तर मार्मिक असल्यामुळें तें खाली दिलें आहे. " राजश्री नाना फडणीस यांनीं इंग्रजांशीं साष्टीचें बोलणें लाविलें तेव्हां त्यांनीं उत्तर सहा आणेचा कागद मागें दादासाहेबांनीं लिहून दिला आहे त्याप्रमाणें तुम्ही द्यावा तेव्हां नानांनीं उत्तर केलें जे त्यांनीं कागद दिला तो कोठें प्रमाण जाहला? आम्ही पेशव्यांचे पदरचे कारकून आमचा कागद काय प्रमाण? आम्ही कागद लिहून देत नाहीं." (खरे भा. ९-३८१४) इंग्रजांनीं नानाला सहाय्य करावयाचें असें ठरवितांच शिंद्यांच्या धोरणांत चलबिचल होऊं लागली शिंद्यांच्या दरबारीं धूर्त शेणवी कारभाऱ्यांचें वर्चस्व झालें होतें. तथापि त्याचे दुसरे कारभारी आबा चिटणीस, रायाजी पाटील व रामजी पाटील यांचेंहि दौलतराव शिंद्याजवळ वजन होतें. इंग्रजांचा शह शिंद्यांस बसतांच या ×

मशीराच्या मुक्ततेमुळें आपण निजामाची मैत्री संपादन केली व नानाच्या कारस्थानाचा एक दुवा खिळखिळा केला असें भाऊ व बाळोबा यांना वाटत होतें, पण ती त्यांची गैरसमजुत होती. निजामाचा परशुराम भाऊंच्या कारभारावर मुळींच विश्वास नव्हता. परिणाम लावील तर नानाच लावील अशी निजामाची खात्री होती. मुक्त झालेला हा मशीर पुढें नानाचाच मदतनीस ठरला हें पुढें दिसून येईलच.

---

×कारभारी मंडळीनीं शिंद्याचे कान फुंकलें व त्याला बजाविलें कीं या शेणवी मंडळीच्या नादास लागाल तर परिणाम येणार नाहीं. कारण इग्रज, मोंगल व भोंसले या सर्वांचे पाठबळ नाना आपल्या कारस्थानींच्या जोरावर मिळवील. या सर्वांचा शह आपल्यास लागला तर तो सोसण्याचें सामर्थ्य आपल्या सरदारींत आहे कीं काय याचा विचार करा आणि या शेणव्यांचा नाद सोडून देऊन नानाशीं मिलाफ करा. उज्जनीस महादजी शिंद्यांचा राव केशरी म्हणून होता तिनेंहि दौलतरावास निरोप पाठवून नानाशीं सख्य करण्याकरितां बोध केला. हा सल्ला दौलतरावास पटला व त्यानें रायाजी पाटलाच्या द्वारें नानाजवळ सलोख्याचा पत्रव्यवहार सुरु केला. चिमाजीअप्पास गादीवर बसविण्यांत आल्यावर बाजीराव व अमृतराव यांस कुटुंबसुद्धां बऱ्हाणपुरास ठेवावयाचें असें बाळोबा व भाऊ यांनीं ठरविलें होतें चिमाजी गादीवर बसल्यापासून परशुरामभाऊच मुख्य कारभारी म्हणून वागत होते. पण त्यांची सर्व मदार शिंद्यांच्या बळावरच होती. पण आतां शिंद्यांचीच चलबिचल होऊं लागल्यामुळें बाजीरावाची बऱ्हाणपुरास रवानगी करण्याच्या कामांत शिंदे दिरंगाई करूं लागले; इतकेंच नव्हेतर नानाच्या कारस्थानीमुळें शिंद्यांची बाजीरावाशीं खलबतें होऊं लागलीं बाजीरावास बऱ्हाणपुरास पोंचविण्याचें बाजूस राहून शिंदे आतां बाळोबास म्हणूं लागले कीं तुम्ही दोन कोट रुपये आम्हांस मिळवून देणार होतात, तो पैसा अजून दृष्टीस पडत नाहीं आणि नानाजवळ बिघाड केल्यामुळें इंग्रजहि आम्हांवर उलटणार. शिवाय बाजीरावसाहेबांस कैदेंत ठेविल्यामुळें आमचा दुर्लौकीक झाला तो निराळाच. तरी अशा पेचप्रसंगां-§

चिमाजीअप्पा गादीवर बसल्यापासून महिना दीड महिना झाला नाहीं तोंच चिमाजीचें आसन डळमळीत होण्यासारख्या गोष्टी घडूं लागल्या नानानें शिंद्यांशीं जें सगनमत केलें त्यांत शिंदे व नाना यांत असा करार ठरला कीं शिंद्यांनीं बाळोबा वगैरे कारभाऱ्यांस कैद करावें व परशुरामभाऊंचेंहि पारिपत्य करावें. शिंद्यांच्या मदतीनें बाजीराव गादीवर बसले व नाना कारभार करूं लागले म्हणजे शिंद्यांनीं उत्तर हिंदुस्थानांत जावें व ते गेल्यावर नानांनीं त्यास एक कोट रुपये द्यावे. शिवाय श्रीमंतांनीं शिंद्यांस अहमदनगरचा किल्ला व दहालक्ष्यांची जाहागीर द्यावी. श्रीमंत बाजीरावसाहेबांनींहि नानाशीं करार केला कीं आम्ही गादीवर बसल्यावर तुम्ही, शिंदे, भोंसले, नबाब वगैरे ज्याज्या लोकांजवळ करारमदार केले असतील तें सर्व आम्ही मंजूर करूं. हे सर्व करारमदार गुप्त खलबतें पुण्यास परशुरामभाऊ व बाळोबा यांना समजले नसतील असें नाहीं. परंतु या दोघांना अजून आत्मविश्वास होता व बाळोबाच्या लगामीं

---

§तून काय मार्ग काढावयाचा तें तत्काळ कळवा. शिंद्यांच्या मताचा हा थारेपालट बाळोबाच्या कानावर आलाच होता. पण दौलतराव अल्पवयी असल्यामुळें शिंद्यांच्या फौजेवर अजून बाळोबाचाच ताबा होता. आणि परशुरामभाऊ व बाळोबा यामध्यें पूर्ण ऐक्य होतें. यामुळें या दोघांनीं शिंद्यांच्या चलबिचलीच्या धोरणास दाद न देतां तसाच रेटून राज्यकारभार चालवावयाचा असें ठरविलें. मात्र सरकारी कामकाजांत नानाची मित्रमंडळी हळू हळू दूर करावी असा बाळोबानें भाऊंना सल्ला दिला व भाऊंनींहि तो उपक्रम सुरू केला. बाबा फडके व नारोपंत चक्रदेव यांजकडून भाऊंनीं हुजरातीचा कारभार काढिला. कांहीं हुजरात महादजीपंत बेहेरे यांच्या दिमतीस होती ती त्यांच्याकडून दूर केली. करवीरच्या महाराजांकडे नानाचे राजकारण सुरू होतें. त्या महाराजांना परशुरामभाऊंनीं बजाविलें कीं नानाशीं सख्य ठेवाल तर आम्हीं तुमचे पारिपत्य करूं. परंतु त्या महाराजांनीं भाऊंच्या या दमदाटीस जुमानिलें नाहीं.

शिंद्याची फौज असल्यामुळें त्याच्या जोरावर आपण नानाची सर्व कारस्थानें हाणून पाडूं असें परशुरामभाऊंनाहि वाटत असावें●

शिंद्याचा ग्रथ नानाजवळ जुळत चालल्यामळें शिंद्याच्या कैदेंत असलेल्या बाजीरावसाहेबांवरील निर्बंधहि ढिले होऊ लागले. गोडबोल्या बाजीरावानें याचा फायदा घेण्यास कमी केलें नाहीं. मानाजी फांकडयामार्फत बाजीरावानें नानाकडून कांहीं द्रव्य मिळविलें व त्याच्या जोरावर शिंद्यांच्या गोटांतच पांचसहा हजार फौज चाकरीस ठेविली. दौलतराव शिंद्यांनीं या गोष्टीकडे दुर्लक्ष केलें असावें पण या फौजेसह बाजीराव पळून जाणार असा संशय शिंद्याचे कारभारी बाळोबा यांस आल्यामुळें त्यांनीं ही फौज हांकलून लाविली पण मानाजी फांकडयांनीं जरूर लागेल तेंव्हा पुन्हा बोलावूं अशी गुप्त सूचना या फौजेस देऊन ठेविली. व तूर्त आपापल्या घरीं जाण्यास सांगितलें. ही कटकट मिटते तोंच दुसरा अेक कट उघकीस आला. हा कट सन १७९६ च्या ऑगस्टच्या अखेरीस झाला या कटांत बाबा फडके व नारोपंत चक्रदेव हे प्रमुख होते या लोकांनीं नानाकडून पैसा आणून तो हुजरातीच्या लोकांस वाटला व कांहीं होळकरांसहि दिला होळकर व हुजरात मिळून परशुरामभाऊस कैद करावे व चिमाजीआप्पास गादीवरून काढून त्याजागीं बाजीरावसाहेबांस बसवावें असा हा कट होता. पण ता उघडकस आला व फडके वगैरे फितुरी लोकांचें पारिपत्य करण्याचें परशुरामभाऊंनीं ठरविलें. बाबा फडक्यांनीं

●(टीप:-भाऊ व बाळोबा यांचा कारभार उलथून पाडण्याकरितां ज्या मसलती झाल्या त्याच्या बातम्या पुण्यास लोकांच्या कानावर येत. या संबंधानें अेका पत्रांत मजकूर आहे तो असा "शिंदे यांचे व त्यांचे कारभारी यांचे कांहीं वांकडे आलें असेंहि बोलतात. हल्लीं शिंदे यांचे त्रिवर्ग कारभारी गुलटेकडीजवळ बागेंत आले आहेत. मालीट अिंग्रजांचे व शिंदे यांचे व नाना फडणवीस व श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब हा ग्रंथ अेक जाहला असें बोलतात. यामध्यें शिंदे यांचे कारभारी नाहीत. पुढें कसें होईल ते पाहावें" (खरे ९-३८१५) सामान्य लोकांत जर या बातम्या पसरल्या तर त्या भाऊ व बाळोबा यांनाहि कळल्या असल्याच पाहिजेत)

पूर्वीं अेकदां असाच फितुर केला होता. फडक्यांचे अेकस्नेही बापूजीपंत लेले यांनीं अेक दिवशीं बाळोबाकडे जाऊन असें सांगितलें कीं परशुरामभाऊंना दूर करून बाजीरावाला गादीवर बसवाल तर मी तुम्हास पन्नास लक्ष रुपये देतो. बाळोबांनीं ही हकीगत भाऊस कळविली. भाऊंनी तपास केला त्यांत असें आढळून आलें कीं या मसलतींत बाबा फडके मुख्य असून त्यांना नाना व बाजीराव यांचें पाठबळ आहे. फडके हे भाऊंचे ऋणानुबंधी व आप्त असल्या-मुळें भाऊंनीं त्यांना क्षमा केली होती. पण फडक्यांनीं पुन्हा फितुरी केल्यामुळें त्याच्याच वाड्यांत भाऊंनीं त्यांना कैद करून ठेविलें. परशुरामभाऊंनीं निजा-माचा दिवाण मशीर यास मुक्त केले होतें हें पूर्वी सांगितलेंच आहे. नानाचें बंड मोडण्यास या मशीराचा उपयोग होईल असें परशुरामभाऊंना वाटत होतें. म्हणून मशीरानें फौज जमवून ती चाकरीस ठेवावी या गोष्टीस भाऊंनीं मान्यता दिली होती. पण मशीर हा निजामाचा नोकर असल्यामळें निजा-माच्या धोरणाप्रमाणेंच त्यास वागावयाचें होतें. आणि निजामाला तर नानानें आधींच हाताखालीं घालून ठेविलें होतें. अशा स्थितींत मशीराची भाऊंना मदत ही निवळ बाह्यात्कारीच होती. पण मशीरमात्र भाऊंना मी तुमच्याच बाजूचा आहें असें भासवीत असे. अदरकीबात निराळी होती हें भाऊना शेवटपर्यंत समजलेंच नाहीं. आपला प्रामाणिकपणा भाऊंना पटविण्या-करितां या मशिराने फडक्यांच्या कटांतले फडक्यांचे दिवाण नारोपंत चक्रदेव हे पुण्यांतून पळून गुळ टेकडीजवळ गेले होते त्यांना तत्काळ पकडून पहाऱ्यांत ठेविलें व पुणे दरबारबद्दल आपणाला किती कळकळ वाटते याचा मासला भाऊंच्या नजरेस आणून दिला.

नानांनीं निजाम व नागपूरकर भोंसले यांना आपल्या बाजुला वळवून घेतलें होतें. नानाच्या मताप्रमाणें बाजीराव गादीवर आल्यास नाना, निजाम, भोसले, अिंग्रज वगैरेंजवळ जेजे करार करतील ते आपण मंजूर करूं असें आश्वासनहि नानानें बाजीरावाकडून मिळविलें होतें. अितकें झाल्यावर नानानें निजाम भोंसले वगैरेंशी करारमदार केले. निजामाला ३२ लक्षांचा मुलुख मिळून शिवाय खर्ड्याच्या लढाईतील खंडणी माफ करावयाची होती.

भोंसल्याशीहि करार करून त्यास बाजीरावसाहेबाकडून १५ लक्ष रुपये व गढेमंडळ प्रांत देण्याचें ठरलें होतें. अिंग्रजाना मात्र कांहीं देण्याचें नानानें कबूल केलेलें दिसत नाहीं. तरी अिंग्रज आपल्याला मदत करतील विरुध्द जाणार नाहींत अशी नानानें खात्री करून घेतली होती. अशा रीतीनें निजाम व भोंसले यांना आपल्या जाळचांत अडकविल्यावर नानानीं परशुरामभाऊंना गोत्यांत आणण्याकरितां आणखी अेक उद्योग केला. करवीरचे महाराज व परशुरामभाऊ यांचे हाडवैर होतें. शिवाय करवीरकराचे चिकोडी व मनोळी हे तालुके परशुरामभाऊकडे कर्जाकरितां गुंतलेले होतें. नानांनीं करवीरकराशीं राजकारण करून त्यांना भाऊ विरुध्द उठविलें व या दोन तालुक्यांत आपला अंमल बसविण्याची त्यांस सूचना दिली. या कामीं पुढें मागें करवीरकरांवर भाऊची मोहीम झाली तर आपण तुमची मदत करूं असें आश्वासनहि नानानें करविरकरांस दिलें, व करवीरकरास नवीन फौज ठेविण्याकरितां तात्काळ दोन लाख रुपयेहि नानानें दिले अशा रीतीनें नानानें चारी बाजूंनीं आपलें राजकारण सिध्द केलें. व परशुरामभाऊच्या कारभाराच्या नाड्या आवळण्याचा उद्योग जवळजवळ पुरा करीत आणला. पण ते दिवस पावसाळ्याचे असल्यामुळें फौजेच्या हालचाली होण्यास गैरसोयीचे होते म्हणून हैदराबादचा निजाम, भोसलें व करवीरकर हे सर्व तयारी करून पावसाळा ओसरेपर्यंत वाट पहात बसले. पावसाळा संपला कीं सर्वांनीं नानाच्या सूचनेंप्रमाणें परशुरामभाऊंवर हल्ला करावयाचा व त्याचा कारभार उधळून लावावयाचा असें ठरलें होतें. इतकें झालें तरी परशुरामभाऊ व बाळोबा हे कांहीं डरले नाहींत. खरी गोष्ट म्हणजे नानांनीं महाडास बसून निजाम, भोंसले, इंग्रज, करवीरकर वगैरेंशीं जीं गुप्त कारस्थानें केली त्यांची नीटशी दादहि भाऊ बाळोबास लागली असेल असें वाटत नाहीं. हुजरातींत मात्र फितुरीचा व बंडाचा प्रादुर्भाव भाऊ व बाळोबा यांच्या नजरेस आला होता त्यावर मात्र त्यांनीं उपाय ताबडतोब केला. फितूरीचा प्रादुर्भाव होण्याचें कारण बाजीरावाचें पुण्यांतील वास्तव्य हें असावें असें

भाऊंनीं ठरविलें व हें कारण दूर करण्याकरितां कोणच्याहि उपायानें बाजीरावाला पुण्याबाहेर काढण्याच्या उद्योगास भाऊ व बाळोबा लागले. बाजीरावाचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी मुख्यतः शिंद्यावर म्हणजे त्याचा कारभारी बाळोबातात्या यांचेवर होती. म्हणून भाऊंनीं बाळोबामागें सारखा लकडा लाविला कीं कसेंहि करून बाजीरावाला पुण्यांतून काढा. बाळोबांनीहि विचार केला कीं बाजीरावाला त्याचा भाऊ अमृतराव जांबगावीं होता, त्या ठिकाणीं नेऊन ठेवावें व तेथून त्या दोघांची रवानगी हिंदुस्थानांत करावी. बाळोबांनीं हें ठरविलें खरें पण नानाच्या कारस्थानाचे पाश दौलतरावाच्या गळ्यांत अडकलेच होते. तेव्हां बाळोबानें केलेल्या सूचनेकडे शिंदे लक्ष देईनात व बाजीरावहि जाग्यावरून हालेना. बाजीराव ऐकत नाहींसें पाहून बाळोबानें बाजीरावास पंधरा लक्षांच्या जहागिरीचें मधाचें बोट दाखविलें. बाजीरावानें जांबगांवीं जावें व तेथें त्याला पंधरा लक्षांच्या जहागिरीच्या सनदा द्याव्या असें ठरलें. सनदा हातीं आल्यावर बाजीरावानें जांबगांव सोडून नर्मदातीरीं बडवे येथें जाऊन रहावें असें ठरलें. बाजीरावानें पंधरा लक्ष जहागिरीचा जो करार बाळोबा बरोबर केला त्यांत त्यानें बाळोबाबरोबर परशुरामभाऊंनाहि बांधून घेतलें होतें. इतकें सगळें झाल्यावर श्रीमंतांची स्वारी जांबगांवी जाण्यास निघाली. बरोबर शिंद्यांची तीन पल्टणें दोन अडीच हजार स्वारं, शिवाय विंचूरकर व राजेबहादूर यांची पथकें असा सरंजाम जावयाचा होता. शिंद्यांची फौज बरोबर होती त्यावर मुख्य सरदार सखाराम घाटगे सर्जाराव कागलकर यांची नेमणूक झाली होती. अशा रीतीनें बाजीराव व सर्जाराव हीं दोन अव्वल दर्जाचीं नररत्नें एकेठिकाणीं जमल्यावर त्यांनीं आपसांत जो एक करार केला तो नानासकट सर्व मराठी राज्यास भोंवला. सर्जेरावास एक सुस्वरूप मुलगी होती. तिच्याशीं आपण लग्न करावें असें दौलतरावास वाटत होतें. पण शिंद्याकडून शिंद्याची दिवाणगिरी मिळण्याचें आश्वासन मिळेल तर शिंद्यांस मुलगी द्यावयाची असा सर्जेरावाचा कल होता. म्हणून सर्जेरावानें अशी बतावणी केली कीं शिंद्यांची जातकुळी हलकी असल्यामुळें

आपण त्यास मुलगी देणार नाहीं. पण शिंद्यांची दिवाणगिरी मिळाली तर सर्जेराव शिंद्यांस मुलगी देणार हें बाजीरावास माहीत असल्यामुळें बाजीराव व सर्जेराव यांनीं आपसांत करार केला कीं सर्जेरावानें शिंद्यांस मुलगी द्यावी, श्रीमंतांनीं शिंद्याकडून शिंद्याची दिवाणगिरी सर्जेरावास द्यावी व सर्जेरावामार्फत दोन कोट रुपये श्रीमंतांनीं शिंद्यांस द्यावे व शिंद्यांनीं बाजीरावास गादीवर बसविण्याच्या बाबतींत नानास मदत करावी व श्रीमंताचें शिंद्यानें नानापासून रक्षण करावें. हा विलक्षण करार अखेरपर्यंत अितका गुप्त राहिला कीं तो शेवटपर्यंत नानासहि कळला नाहीं.

शिंद्यांच्या गोटांतून बाजीरावाची रवानगा जांबगावी झाल्यावर बाजीरावाचे साथीदार मानाजी फांकडे याचाहि निकाल लावणें प्राप्त होतें. मानाजी आपण होऊन मी निजामअल्लीकडे जातों असें म्हणू लागला. मशीराच्या मार्फत आपण निजामाकडचें सूत्र राखलें आहे अशी बाळोबा व भाऊ यांची समजूत असल्यामुळें त्यांनीं मानाजीला निजामाकडे जाऊं दिला. पण मानाजीचा कावा निराळाच होता. त्यानें चांभारगोंद्यापर्यंत जाऊन तेथें पूर्वसंकेताप्रमाणें फौज गोळा करण्यास सुरवात केली. ही बातमी पुण्यास आल्यावर आतां याचें पारिपत्य कसें करावयाचें हा भाऊंपुढें मोठा पेंच आला, पुण्यांत होळकराची फौज हुजरातीची फौज होती. पण त्या फौजेंत नानाचा फितूर उघडकीस आला होता. तेव्हां कदाचित ती फौज फांकड्यासच मिळण्याचा संभव होता. मशीरमात्र आपल्या बाजूचा आहे अशी भाऊंची समजूत होती. म्हणून मशीरलाच फांकड्याचें पारिपत्य करण्याकरितां भाऊंनीं पाठविलें. मशीर आपल्यावर येणार ही बातमी कळतांच फांकडे वाईस पळाला. पुण्यास फितूरीमुळें धरपकड चालू होती. त्या धरपकडींतून निसटून मालोजी घोरपडे व निळकंठराव परभू हे पळत पळत वाईस आले होते. त्यांची व फांकड्यांची गांठ पडल्यावर त्यांनीं नानाकडून पैसा आणून सात आठ हजार फौज नोकरीस ठेविली व नानाच्याच सल्यानें बजाबा शिरोळकर हा या फौजेवर मुख्य सरदार नेमला गेला.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

एकदरींत भाऊंच्या कारभारावर संकटांचें आभाळ चोहोंकडून उठत होते. भाऊंना मात्र त्याची नीटशी कल्पना होती असें दिसत नाहीं. बाळोबाच्या जोरावर ते कसातरी कारभार रेटीत होते. इतक्यांत त्या वर्षाचा दसऱ्याचा सण आला हा दसऱ्याचा समारंभ फार मोठ्या प्रमाणावर आणि थाटाचा असा झाला. या समारंभाची हकीगत एका पत्रांत खालील प्रमाणें दिली आहे. "इकडील वर्तमान दसऱ्याचे दिवशीं वडिलांस ( भाऊस ) पांढरा पोषाख द्यावयास काढिला होता तेव्हां श्रीमंतांनीं (चिमाजीअप्पानें) आज्ञा केली कीं सफेत पोषाख द्यावयाचा नाहीं. भाऊस रगीत पोषाख द्यावयाचा. तेव्हां कारकून पोतनिशीकडील यांनीं विनंति केली कीं एक पक्ष उणा झाल्या तागायत (बायको मेल्यापासून) भाऊ रंगीत पोषाख बांधीत नाहींत. तेंव्हां साहेबांची आज्ञा झाली कीं पांढरा कच्चीबुटी पोषाख व तांबडा-पिवळा यास चिंता नाहीं. दसऱ्याच्या दिवशीं पांढरा बराणपुरी पोषाख भसमी काम वर केलेला व ताइतोडीचा झगा, किनखाब व घोडा १ व घोडी १ निळी ऐसा सरंजाम दिला. दसऱ्याचे दिवशीं श्री. रा. आप्पा बळवंत व बाबासाहेब खवाशींत होते. वडील (परशुरामभाऊ) एका अंबारींत पाठीमागें त्यांच्यामागें अन्याबा मेहेंदळे होते. पंधरा अंबाऱ्या एकंदर होत्या. जरी पटका माहीमरातब, नालकी दोन चौघडे पागा फौज समेत मोठ्या समारंभानें स्वारी निघाली. शमी पूजन जाहलें तेथेंच होळकरांनीं व शिंद्यांनीं नजराणा केला. सरवत्ती दोहींकडील बेमोतार जाहली. आठदहा घटका रात्रीस स्वारी वाड्यांत दाखल झाली. साहेबांची स्वारी पुढल्या आरसेमहालाच्या अलीकडील दिवाणखान्यांत बैठक जाहली होती. हजुमा भारी होईल म्हणोन वडील दोन घटका चाफेखणांत बसले होते. उपरांत साहेबांजवळ गेले तों नजराणा होतच होता. नजर यजमानानीं दोन मोहरा केल्या. ऐसा समारंभ चांगला झाला (खरे भा. ९–३८४१)

वरील पत्रांत लिहिल्याप्रमाणें दसऱ्याचा समारंभ मोठ्या थाटाचा झाला खरा. पण हें सर्व वैभव औट घटकेचेंच राज्य होतें. व आठपंधरा दिवसांतच तें नष्ट होणार होतें याची दाद मात्र भाऊ, बाळोबा व चिमाजी-

असा यापैकीं कोणासच नव्हती. नानांचें कारस्थान दिवसेंदिवस बळावत चाललें होतें. परशुरामभाऊंचा जोर काय तो फक्त शिंद्यांच्या फौजेवर होता. कारण भाऊंची स्वतःची पटवर्धनी फौज तीन चार हजारांपेक्षां जास्त नव्हती. आणि बाबा फडक्याचा भाऊंनीं बंदोस्त केल्यामुळें हुजुरात ह बिथरलेलीच होती. होळकर हेहि नानाच्या पक्षाचेच होते येऊन जाऊन भर काय तो सर्व शिंद्यांच्या फौजेवर. पण दौलतरावाजवळ नानाचें कारस्थान सुरू झाल्यापासून शिंद्याजवळ बाळोबाचें पारडेंहि हलकें होऊं लागलें होतें. शिंद्यांच्या पलटणाचा एक नवीन कंपू दक्षिणेंत आला होता व तो पुण्यापर्यंत पोंचला होता. या कंपूवर ग्रँट नांवाचा फ्रेंच अंमलदार होता. तो दक्षिणेंत आल्यावर शिंद्यांच्या सर्व पलटणांवर त्याची हुकमत सुरू झाली. हा अंमलदार फक्त दौलतरावासच जबाबदार असल्यामुळें तो बाळोबाला जुमानणारा नव्हता. अर्थात ज्या शिंद्याच्या फौजेवर भाऊ व बाळोबा अवलंबून होते त्या शिंद्याच्या फौजेची पलटणें आतां या फ्रेंच अधिकाऱ्याच्या ताब्यांत होतीं व त्यामुळें भाऊंना त्यांचा उपयोग होण्याचा संभव नव्हता.

दसऱ्याचा समारंभ आटपल्यावर निजामअल्लीनें नानाच्या प्रेरणेप्रमाणें आपल्या फौजेचें कूच करविलें. ही फौज मोंगलाई सरहद्दीवर जागोजाग येऊन राहिली. व त्यापैकीं एक टोळी घेऊन इस्मामिया नांवाचा सरदार पुण्याकडे येऊं लागला. नागपूरकर रघोजी भोंसलेहि नानांच्या प्रेरणेप्रमाणें नागपूर सोडून निघाले. होळकर व हुजरात हे प्रथमपासूनच नानाच्या बाजूचे होते. मशीर हा आपण पुणें दरबारच्या बाजूचे आहोंत असें भाऊ बाळोबा यांना भासवून आंतून नानाच्या सल्याप्रमाणें वागत होता. वाईस पळून गेलेला मानाजी फांकडे हाहि फौज गोळा करून पुण्यावर येण्याची तयारी करीत होता. शेवटीं भाऊंच्या विश्वासाची अशी फौज शिल्लक राहिली ती म्हणजे पटवर्धनाची तीनचार हजार आणि शेणवी सरदारांची चार पांच हजार इतकीच कायती होती. पण या लहानशा फौजेच्या जोरावर नानाच्या कारस्थानाला धक्का देणें भाऊंना कठीणच होतें. अशा रीतीनें

नानाचें राजकारण रंगास येऊं लागलें व या राजकारणाचा पहिला अंक दौलतराव शिद्यानें करून दाखविला. ता. २६-१०-१७९६ रोजी दौलतरावानें आपला त्रिवर्ग शेणवी कारभारीं, बाळोबातात्या, सदाशिव मल्हार व धोंडो रामचंद्र यांस एकदम कैद केलें. कारभाऱ्यांचा बंदोबस्त करण्यापूर्वी शिद्यानें नानास खालीलप्रमाणें आश्वासन दिल्याचा मजकूर एका पत्रांत आहे तो असा. "राजश्री बाळाजीपंत नाना यांसी— सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकीत दौलतराव शिंदे विनंती उपरी पूर्वी आपले व आमचे पुण्याचे मुक्कामीं वचन प्रमाण होऊन परस्परे शपथ होऊन लिहिलें. त्यावर आम्हाकडील कारभारी यानीं वर्तणूक वाईट करून श्रीमंतांशी बेअदबी केली. व आमचे स्वच्छतेंत अंतर पाडून मनस्वी वांकडी चाल धरिली. याजकरतां आम्ही आपले कारभारी यांचा बंदोबस्त केला. त्यांचे करण्यामुळें संशय आले असतील ते सोडावे. आम्हाकडून आपले वाईट होणार नाहीं. व कोणी करूं लागल्यास नाशीयत करूं. पूर्वी कैलासवासी पाटीलबावाचे व आपलें वचन प्रमाण होऊन परस्परें लिहिलें दिलें त्याजवर आपली आमची स्वच्छता होऊन अकृत्रिमपणें चाललें त्याप्रमाणें चालवूं यांत अंतर करणार नाहीं. येविषयीं साहेबांची उदीव बेलभंडार व पाटीलबाबाच्या पायाची शपथ असें. (खरे भा. ९-३८४४)*

बाळोबातात्या पागनीस वगैरे शिंद्याचे कारभारी कैद झाल्यावर परशुरामभाऊ अगदींच उघडे पडले. त्यांच्यावर हल्ला करून त्यांस पकडण्यास ही उत्तम संधि आहे असें पाहून फडक्यांची हुजरात, मशीर व होळकर या सर्वांनीं शनवार वाड्यावर चालून जाण्याचा बेत केला. ता. २६ आक्टोंबर रोजीं रात्रीस शिंद्याच्या कारभाऱ्यांस कैद झाली व त्याच रात्रीं उजाड-

* टीपः—शिंद्यानें आपल्या कारभाऱ्यास कैद केल्याची सविस्तर हकीगत खरे भाग ९ प. न. ३८४५,३८४६ व ३८४७ मध्यें आली. आहे. पुना रे. रेकॉर्ड मध्येंहि शिंद्याच्या कारभाऱ्यांना कैद झाल्याची हकीगत आहे. P. R. C. २-३२२

ण्याचा आंत शनवार वाड्यावर हल्ला करून भाऊस पकडावें असा बेत होता व त्याप्रमाणें बाबा फडक्यांचे खासगी कारभारी परशुरामपंत वैद्य म्हणून होते त्यांस हा बेत नारोपंत चक्रदेवानें मशिराच्या गोटांतून चिठ्ठी पाठवून कळविला. पण ही चिठ्ठी जासुदाच्या गफलतीमुळें परशुरामपंत वैद्य यांच्या हातीं न पडतां परशुरामभाऊ पटवर्धन यांच्याच हातीं पडली व आपल्यावर होणाऱ्या हल्ल्याची बातमी आगाऊ भाऊनांच मिळाली.*

परशुरामभाऊवर होणाऱ्या हल्ल्याची बातमी त्यानांच आगाऊ समजल्यामुळें त्यांनीं तात्काळ सावध होऊन कुचाचा नगारा केला व वेळेवर जे हजार दोनहजार गोळा होण्यासारखे होते त्यांना बरोबर घेऊन ते शनवार वाड्यांत गेले व तेथें चिमाजीअप्पा होते त्यांना आपल्या घोड्यावर पुढें घेऊन ते वाड्याबाहेर निघाले. ही सगळी गडबड अस्सल पत्रांतूनच वाचण्यासारखी असल्यामुळें त्यातील कांहीं उतारे खालीं दिले आहेत.

"दौलतराव यांनीं आपले कारभारी छ. २४ ला रात्रीस कैद केले छ. २५ रोजीं अरूणोदयास मशिरानें आपली फौज तयार केली व होळकर तयार होऊन श्रीमंतांचे वाड्यावर चालून गेले. श्रीमंत रा. भाऊसाहेब आपले वाड्यांतून सरकारचे वाड्याजवळ जाऊन मुख्यास पाठीशी बांधले आणि बरोबर बाबासाहेब जनोबा सुभेदार घेऊन निघाले. तेथें होळकराची

---

* टीपः—पुना रे. रेकॉर्डमध्यें गफलतीनें भाऊना चिठ्ठी मिळाली ही हकीगत थोडी निराळी आहे. भाऊंना मिळालेली चिठ्ठी दौलतरावानें आप्पा बळवंताना पाठविली होती. ती भाऊंनीं पकडली अशी हकीगत पूना रे. रेकॉर्डमध्यें आहे. या पत्रांतील प्रत्यक्ष मजकूर खालील प्रमाणें आहे.

" A note from Daulatrao Shindia to Appabalvant the night of the revolution, having been interrupted and carried to Parshurambhaoo, gave the latter the first advice of what was in agitation and afforded him leisure to make his escape with about 2000 horses. ( P. R C. 2-328 )

चिकटी बसली. तेथे दोनचार वार जाहले. तैसे मारीत पर्वतीजवळील तळ्यापाशी आले. अेकवार भाऊसाहेबांचे घोड्यावर बापू होळकर यानें टाकला. तो तुमचीवर लागला. तेव्हां हरबा आपास कळले. ते तयार होऊन गेले. कात्रजेचा घाट चढले. मागे होळकराची चिकाटी बसलीच होती. या प्रमाणें तेथून जखम लागलेला शिलेदार सांगतो. श्रीमंत दाजीकडे मशीराची फौज गेली. गोट लुटला खासे कोठें आहेत हे वर्तमान नाहीं हरबा अप्पाचा गोट लुटला. याप्रमाणें वर्तमान झालें. होळकराची भाऊसाहेबांवर चिकाटी मुख्य पाठीशीं. कोणीकडे गेले हें वर्तमान अद्यापी आलें नाहीं. ईश्वरें मोठा घात केला. श्रीमंत तेथून निघाले त्या अर्थी नीरा दक्षिण तिरास रहावें अशी मसलत यजमानानीं केली आहे. नशिबांत जें येईल त्यासारखें करूं." खरे (भाग ९–३८४७) दुसऱ्या पत्रांत खालील प्रमाणें मजकूर आहे.

"पुण्यांत गर्दी जाली. वडील मुख्यास (चिमाजीस) घेऊन निघाले असें म्हणतात. मशीर व शिंदे अेक झाले. मशीराचा जमाव भारी. वडीलांची (भाऊंची) काय गत झाली हे नकळे ईश्वरें काय योजिलें नकळें" (खरे ९–३८४८)

चिमाजीअप्पास घेऊन परशुरामभाऊ शनवार वाड्यांतून बाहेर पडले ते थेट जुन्नरच्या मार्गे रवाना झाले. भाऊ बाहेर पडतात तोंच हुजरात, होळकर व मशीर यांच्या फौजा पाठलागास आल्या. भाऊ जुन्नरकडे गेले हें समजतांच या फौजाहि पाठलाग करीत जुन्नरला पोहोंचल्या. मोठ्या फौजा आपल्यावर आल्यामुळें आतां कांहीं अिलाज नाहीं. असें पाहून भाऊंनीं चिमाजी अप्पास किल्यावर ठेविलें. आणि पांचसातशें स्वारांनीशीं आपण खालीं उतरून प्रतिपक्षाशीं तडजोडीचें बोलणें सुरूं केलें. या बोलण्यांत भाऊंना किल्ल्यावरच कैदेंत ठेवावें असा सर्व सरदारांचा विचार होता, पण माधवराव रास्ते यांनीं भाऊस आपणाकडे मागून घेऊन आपल्या ताब्यांत असलेल्या मांडवगडाच्या किल्यावर त्यांस कैदेंत ठेविलें. चिमाजीअप्पा जुन्नरच्या किल्ल्यावर होते ते तूर्त तेथेंच राहिले.

परशुरामभाऊच्या पाठलागास फौज गेली असतां अिकडं कात्रजेवर भाऊंचा गोट होता. तो मशीरानें लुटून फस्त केला. आणि पुणें शहराची नाकेबंदी करून जागोजाग चौक्या ठेवून बंदोबस्त केला. अितकें झाल्यावर आतां बाजीरावसाहेबांना पुण्यास आणावयाचें काम शिल्लक राहिलें. शिंद्यानें आपल्या कारभाऱ्यास कैद केलें त्याच वेळीं त्यानें सर्जेराव घाटग्यास पत्र लिहून बाजीरावसाहेबांस जांबगावांहून परत आणण्याविषयीं कळविलें होतें. याच वेळीं शिंद्यानें नानासहि पत्र लिहून कळविलें कीं आमच्या कारभाऱ्यांनीं वांकडी नजर धरून भलत्या गोष्टी केल्या त्यामुळें आम्ही त्या कारभाऱ्यांस कैद केलें आहे. तरी तुम्ही आतां कोणत्याहि प्रकारचा संशय मनांत न बाळगतां लवकर पुण्यास येऊन राज्यकारभार हातीं घ्यावा. व पेशवाईच्या गादीवर बाजीराव साहेबांची स्थापना करावी.

शिंद्याचें पत्र नानास गेलें आणि पुण्यास झालेला प्रकारहि त्यांच्या कानांवर गेला अशा रीतीनें बाळोबा तात्या व परशुरामभाऊ यांचा कारभार आटोपून त्या दोघांची कैदेंत रवानगी झाल्याचें नक्की समजल्यावर नाना महाडाहून निघाले व मेणवलीस आले. तेथें थोडे दिवस राहून नाना सासवडास आले. तेथेंच त्यांना भोंसले व अिसामिया यांच्या फौजा पुण्याजवळ येऊन पोंचल्याचें समजलें. पण नानाहि सासवडाहून निघून पुण्यास आले व आपल्याच बागेंत मुक्काम करून राहिले. अेकंदरीत परशुरामभाऊ व बाळोबा तात्या यांनीं पेशवाईची घडी नीट बसविण्याकरितां जो उद्योग केला तो त्यांना साधला नाहीं. नानासारख्या खोल बुद्धीच्या चतुरस्त्र राजकारणी मुत्सद्याजवळ वैर धरून भाऊंनीं जो उद्योग केला तो त्यांच्या आंगलट आला व त्यांनाच कैदेंत पडावें लागलें. नानाशीं वैर धरण्यांत भाऊंचा कांहीं स्वार्थ होता असें म्हणण्यास मुळींच आधार नाहीं. कोणीकडून तरी पेशवाईचा कारभार नीट चालावा हाच भाऊंचा उद्देश होता. शिंद्याचे कारभारी व नाना यांचे मन शुद्ध नाहीं. आणि शिंदे हे मोठे फौजबंद तेंव्हां त्यांना दुखवून पेशवाईची घडी बसावयाची नाहीं. सबब तूर्त नानानीं बाजूस रहावें व पेशवाईचा कारभार सुरळीत चालू द्यावा अशी भाऊंची

प्रामाणिक कल्पना होती. पण भाऊ समजत होते तितकी ही गोष्ट सोपी नव्हती. राज्याचा वडील वारस बाजीराव हा शिंद्यांच्या मतलबी कारभाऱ्यांच्या ताब्यांत असतांना चिमाजी अप्पाची गादी टिकणें शक्य नाहीं ; ही गोष्ट सरळ स्वभावाच्या भाऊंच्या लक्षांत आली नाहीं. पण नानांनीं ती चटकन जाणली. आणि म्हणूनच जन्मभर जिवास जीव देणाऱ्या परशुरामभाऊंना विरोध करून नानानीं त्याचा कारभार उधळून लावला व बाजीरावाची पुन्हां गादीवर स्थापना केली. *

---

*(टीपः—नानानें महाडचें कारस्थान करून बाजीरावाला पुन्हां गादीवर आणलें. या त्याच्या कारभारांत नानांचा हेतु स्वार्थाचा होता असें कांहीं अितिहास कारांनीं म्हटलें आहे. कारण ज्या बाजीरावाला दूर सारून नाना दत्तकाच्या खटपटी करीत होते आणि चिमाजी अप्पाला गादीवर बसविण्यालाहि पहिल्यानें नानाचा विरोध नव्हता तर त्याच चिमाजीला भाऊंनीं वं बाळोबा तात्यांनीं गादीवर बसवितांच त्याला नानांनीं कां विरोध करावा व बाजीरावाला पुन्हां गादीवर कां आणावें हा प्रश्न सहाजिकच उत्पन्न होतो. याचें उत्तर असें कीं नानाचा विरोध चिमाजीअप्पाला नसून त्याच्या कारभाराला होता. कारण ज्या बाजीरावानें नानाच्या कडक प्रतिबंधात असतांनासुद्धां सवाई माधवरावाजवळ संधान बांधण्यास कमी केलें नाहीं तो बाजीराव आतां शिंद्याच्या ताब्यांत असल्यामुळें तेथून वाटेल तें कारस्थान करून चिमाजीचा कारभार उलथून पाडल्याशिवाय रहाणार नाहीं अशी नानांची पक्की खात्री होती. परशुरामभाऊंनीं जर बाजीरावाला आपल्या ताब्यांत घेऊन चिमाजीला गादीवर बसविला असतां तर नानांनीं महाडचें कारस्थान केलें असतें कीं काय याची शंकाच वाटते. पण भाऊंनीं हे संधान न राखल्यामुळें चिमाजीचा कारभार मागेंपुढें उधळला जाणारच अशी नानांची खात्री असल्यामुळेंच त्यांनीं बाजीरावाच्या नांवानें महाडचें कारस्थान केलें. आणि हें कारस्थान करण्यांतसुद्धां नानांचा हेतु बाजीरावास बाजूस सारून चिमाजीस गादीवर बसविण्याचा होता, हें§

वरील समकालीन आणि अिंग्रजासारख्या त्रयस्थाच्या उताऱ्यावरून बाजीरावाच्या नांवानें नानानें केलेलें महाडचें कारस्थान चिमाजी अप्पाचीच गादी कायम करण्याकरितां होते हें स्पष्ट आहे. चिमाजीअप्पाला गादीवर बसविणें नानाला शक्य झालें नाहीं. हा नानाच्या बुद्धीचा व राजकारणाचा दोष नसून तो त्याकाळच्या परिस्थितीचा दोष होय. वडील पण नालायक भावाला बाजूस सारून राज्याच्या हिताच्या दृष्टीनें दुसऱ्याला गादीवर बसवावें ही विचारसरणी त्यावेळच्या लोकांच्या गळीं उतरूं शकली नाहीं. याला नानांचा कांहींच अिलाज नव्हता. सारांश महाडचें कारस्थान करण्यांत नानाचा कांहींच स्वार्थ नसून राज्याच्या हिताच्या दृष्टीनें केलेला तो एक मोठा प्रयत्न होता हेंच ऐतिहासिक कागदपत्रांवरून सिद्ध होतें."

---

§ आतां पुना रे रेकॉर्डमध्यें उपलब्ध झालेल्या पुराव्यावरून स्पष्टच होत आहे. याबाबतींत अिंग्रजांचा त्यावेळचा पुण्यांतील वकील युथॉफ यानें खालील प्रमाणें लिहिलें आहे.

" There seems at present some doubt whether Bajirao or Chimaji Appa will be placed on the musnad. If everything is settled to Nana's wish, there is some reason to Suppose that Peshawaship may be held by Chimaji Appa, who will doubtless be a more convenient instrument for Nana than Bajirao. But the experience of the insurmountable difficulties that have hitherto attended the supersession of the rights of the elder brother, seems a very strong argument in favour of Bajirao being placed on the musnad" ( P. R. C. 2-328 )

## प्रकरण १७ वें

# परशुरामभाऊंची साताऱ्यावर स्वारी

नाना फडणविसांनीं केलेल्या महाडच्या कारस्थानामुळें परशुरामभाऊंच्या कारस्थानाचा बोजवारा उडून ते कैदेंत पडल्याची हकीगत मागच्या प्रकरणांत आलीच आहे. नानांनीं हें कारस्थान जरी राज्याच्या हिताच्या दृष्टीनें केलें होतें तरी मराठी राज्याला या कारस्थानापासून कांहींच फायदा झाला नाहीं व नानाच्याही वांट्यास मानहानी," हालअपेष्टा, कारागृहवास हींच आलीं. *

परशुरामभाऊंचा कारभार संपल्यावर नाना व श्रीमंत हे पुण्यास आले व पुढचा विधि म्हणजे श्रीमंतांस पेशवाईचीं वस्त्रें द्यावयाचा, तो विधि ता. ४ डिसेंबर १७९६ रोजीं पार पडून श्रीमंत पेशवे झाले व नाना कारभारी

* (**टीपः**–नानाच्या कारस्थानाचा पुढें कांहीं उपयोग झाला नाहीं याचें कारण कै. खरे यांनीं खालीलप्रमाणें लिहिलें आहे. "इतक्या शहाणपणानें लढविलेल्या मसलतीचें असें विपरीत पर्यवसान कां व्हावें याचा शोध करूं जातां असें दिसून येतें कीं, यांत नानांच्या बुद्धीचा दोष नसून तो राज्याच्या ऱ्हासकाळाचा प्रताप होय." (खरे १० पा. ५०४५) उघडच आहे कीं, बाजीराव मूर्ख निघाला हा कांहीं नानाचा दोष नव्हे.)

झाले. हें सगळें जरी झालें तरी श्रीमंत व नाना यांचीं मनें परस्परं शुद्ध नव्हतीं. त्यामुळें नानाचें मन कारभारांत नव्हतें. श्रीमंतांची स्वारी गादीवर येतांच तात्काळ त्यांनीं पटवर्धनांवर सूड उगविण्यास आरंभ केला आणि नानांस सांगितलें कीं परशुरामभाऊंनीं हरामखोरी केली सबब त्याची वस्तवानी व त्यांजकडे सरकारी सरंजाम, हत्ती, घोडे, उंट वगैरे सर्व कांहीं असेल तें सरकारांत आणण्याची व्यवस्थां करा. शिवाय भाऊंच्या पदरच्या मंडळीकडून जबरदस्त दंड वसूल केला पाहिजे. आणि भाऊंचे पुत्र हल्लीं तासगांव सोडून मिरजेस येऊन राहिले आहेत त्यांचीहि मालमत्ता जप्त करण्याची व्यवस्था करा. श्रीमंतांचा अशा प्रकारचा हुकूम होतांच नानांना कांहींतरी करणें प्राप्तच होतें. नानांनीं सन १७९७ च्या फेब्रुवारी महिन्यांत मिरजेस पटवर्धनांच्या जप्तीकरितां म्हणून एक कारकून पाठविला. पण मिरजेचे गंगाधरराव बाळासाहेब यांनीं त्या कारकुनास दाद दिली नाहीं. चारसहा महिने घासाघीस झाल्यावर सरकारच्या समजुतीकरितां भाऊंचीं निरुपयोगी घोडीं, उंटें, मोडक्या-तोडक्या पालख्या आणि आणखी कांहीं याच मासल्याचा सरंजाम बाळासाहेबांनीं त्या कारकुनाच्या हवाली केला. *

*(**टीप**—श्रीमंतांचा परशुरामभाऊ व इतर पटवर्धन सरदार यांवर किती राग होता याची भरपूर माहिती ऐ. ले. संग्रहांत आली आहे. पटवर्धनांनीं भाऊंकडे कैदेंत पत्रव्यवहार करूं नये (खरे १०-३८८६) पटवर्धनांनीं श्रीमंतांच्या भेटीस येऊं नये (खरे १०-३८८९), बाजीरावसाहेबाचें लग्न हरीपंताचे पुत्र दाजीबा फडके यांच्या मुलीबरोबर झालें. त्याचें आमंत्रणहि पटवर्धनांस नाहीं (खरे १०-३९१९।२०) पटवर्धनांचें नांवहि श्रीमंतांपाशीं कोणी काढतां कामा नये, ( खरे १०-३९२१ ) वरीलप्रमाणें उल्लेखावरून बाजीरावांचा पटवर्धनांवर केवढा राग होता हें दिसून येतें. स्वाभाविकच पटवर्धनांवर सूड घेण्याची कोणतीहि संधि बाजीरावानें फुकट जाऊं दिली नाहीं. आणि भाऊंचे मदतनीस जे जे सांपडले त्यांच्याकडून भयंकर मोठचा रकमा दंडाच्या वसूल केल्या. भाऊंच्या साथिदारांकडून खालीलप्रमाणें §

परशुरामभाऊंच्या साथीदारांना जर श्रीमंतांनीं जबरदस्त शिक्षा केल्या तर प्रत्यक्ष परशुरामभाऊंवर त्यांचा केवढा राग असेल हें सांगणें नकोच. तथापि परशुरामभाऊंबद्दल सहानुभूति बाळगणारे माधवराव रास्ते हे भाऊंची कैदेंतून सुटका करण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होते. श्रीमंत मात्र भाऊंच्या सुटकेबद्दल चकार शब्दहि कोणाला काढूं देईनात. अशा अडचणीच्या परिस्थितींतूनच भाऊंच्या सुटकेचा मार्ग रास्त्यांस काढावयाचा होता. दहा लक्षपर्यंत दंड भरूनहि भाऊंची सुटका करून घेण्यास रास्ते तयार होते; पण दीर्घद्वेषी श्रीमंतांपुढें त्यांचें कांहींच चालेना. शेवटीं रास्त्यांनीं नानांच्यामार्फत हें काम करण्याचें ठरविलें. नानांचें व भाऊंचें महाडच्या कारस्थानापासूनच वाकडें होतें हें लक्षांत घेऊनच रास्त्यांनीं भीत भीत

---

§ रकमा श्रीमंतांनीं वसूल केल्या. १ महादजीपंत काळे पन्नास हजार, भिकाजीपंत आठवले पंचवीस हजार, शिवरामपंत मोडक पंधरा हजार, गणपतराव करमरकर दहा हजार, चिंतोपंत लिमये ८५ हजार, जयरामपंत जोशी ५० हजार, बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे २५ हजार, याप्रमाणें श्रीमंतांनीं दंड वसूल केला. ( खरे १०–३८८८ आणि पा. ५०५८ ) परशुरामभाऊंचे आणखी एक साथिदार हरी विष्णु सहस्रबुद्धे यांस श्रीमंतांनीं भयंकर शिक्षा केली. यासंबंधींचा मजकूर एका पत्रांत खालीलप्रमाणें आहे. "हरी विष्णु ( सहस्रबुद्धे ) यांस सरकारनें कोरड्यांचा मार दिला. पन्नास कोरडा मारिला. आणि पाठींतून रक्तें फार निघालीं. आणि कानास चाप लाविला. एक कान तुटला. दोन्ही हातांचे बोटांस चाप लाविले. बोटांचेहि तुकडे पडले म्हणोन बाजार आवई आहे. मार दिल्यानंतर बाजारांतून गल्लीगल्ली फिरविलें. आणि मोठे हाल केले. इतका आग्रह मार द्यावयाचा श्रीमंत ( चिमाजी ) अप्पासाहेब यांचा पडला म्हणोन ऐकतों." ( खरे १०–३९२९ ) चिमाजी अप्पाला गादीवर बसविण्याचें भाऊंनीं ठरविलें त्या वेळीं थेऊरच्या मुक्कामाहून चिमाजीला जबरदस्तीनें पालखींत घालून पुण्यास आणणारे हे हरी विष्णु होते म्हणून त्यांना ही शिक्षा मिळाली. )

नानाजवळ ही गोष्ट काढली. आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं नानांनीं रास्त्यांस या कामांत मदत करण्याचें आश्वासन दिलें. नानांचें व भाऊंचें कितीहि वाकडें असलें तरी नाना हे धूर्त राजकारणी पुरुष होते. व त्यांना मराठी राज्याची आस्था होती. परशुरामभाऊंसारख्या शूर योद्धयाचा उपयोग राज्याच्या कल्याणाकरितां कसा करून घ्यावयाचा याची नानांना जाणीव होती. आणि या दृष्टीनें पूर्वीचें वाकडें विसरून जाऊन भाऊंच्या सुटकेचा प्रयत्न करण्याचें नानांनीं आश्वासन दिलें. यावेळीं टिपू व इंग्रज यांमध्यें लढाई होण्याचा रंग दिसूं लागला होता. तसें झालें तर मराठी फौजा इंग्रजांच्या मदतीस पाठविणें, पूर्वीच्या तहाप्रमाणें जरूर होतें. आणि हें काम अंगावर घेण्यास मराठी राज्यांत आतां भाऊंशिवाय दुसरा कोणीहि लायक आणि समर्थ सरदार नव्हता. अर्थात असा प्रसंग आला म्हणजे परशुरामभाऊंची सुटका नाइलाजानें कां होईना श्रीमंतांस करणें भागच पडेल अशी नानांची अटकळ होती व ती अर्थात बरोबरच होती. परशुराम-भाऊंस कैदेंतून सोडवून त्यांस टिपूच्या कामगिरीवर पाठवावें असे विचार नानांच्या मनांत घोळत होते व राज्याच्या हिताच्या दृष्टीनें तें योग्यच होतें. पण नानांना राज्याच्या हिताचा शांतपणें विचार करण्यास, श्रीमंत व शिंदे सवडच देत नव्हते. श्रीमंत व शिंदे यांचे विचार नानांना गोत्यांत आगण्याकरतां चालू होते. कोणत्याहि प्रकारें नानांचें द्रव्य लुबाडून घ्यावें याशिवाय श्रीमंत व शिंदे यांच्या मनांत दुसरा विचारच नव्हता. व हें काम कसें करतां येईल यांतच त्यांचा सर्व वेळ जात होता. शिंद्यांचें अफाट लष्कर पुण्यास तळ देऊन बसल्यामुळें त्याचा सर्व खर्च बेसुमार वाढला होता. तो भागविणें शिंद्यांस प्राप्त होतें. नानाला माहीत नव्हता असा एक करार श्रीमंतांनीं शिंद्यांजवळ केला होता. व त्या कराराप्रमाणें दोन कोट रुपये श्रीमंतांनीं शिंद्यांस द्यावयाचे होते. हे रुपये आतां शिंदे श्रीमंतांजवळ मागूं लागले. शिवाय महाडच्या कारस्थानांत नानांनीं शिंद्यांस एक कोट रुपये देण्याचें कबूल केलें होतें व त्या रकमेपैकीं ४४ लक्ष शिंद्यांस पोंहचलेहि होते. बाकीचे ५६ लक्ष नानाकडे राहिले तेहि शिंदे एकदम नाना-जवळ मागूं लागले पण नानाचें म्हणणे या बाबतींत असें होतें कीं मूळ करा-

राप्रमाणें शिंद्यांस निम्मे रुपये ते जांभगांवीं गेल्यावर व बाकीचे निम्मे रुपये ते गंगापार झाल्यावर द्यावयाचे. पण स्नेहाखातर आम्हीं आजवर ४४ लक्ष दिले तरी शिंदे पुणें सोडीत नाहींत. आतां शिंदे येथून निघून गेल्याशिवाय त्यांना एक छदामहि मिळणार नाहीं. नानाचें असें निकाराचें बोलणें पडल्यामुळें पुढें काय करावें हा शिंद्यापुढें मोठा पेंचच पडला. श्रीमंतांकडून घ्यावयाच्या पैशांबाबत श्रीमंतांनीं शिंद्यास स्पष्टच लिहून दिलें कीं आम्हांजवळ एक कवडीहि नाहीं. तुम्हीं वाटेल ती हिकमत लढवून नानास कैद करावें व त्यांचें व त्याच्या पक्षांतील सर्व मंडळीचें द्रव्य घेऊन फौजेचें देणें फेडावें. नाना बऱ्या बोलानें शिंद्यांस पैसे देत नाहींत, आणि बाजीरावानें तर नानास कैद करून नानाचें द्रव्य लुबाडण्यास शिंद्यांस परवानगी दिली; तेव्हां नानास कैद करण्याशिवाय दुसरा मार्ग राहिला नाहीं. पण नानास कैद कसा करावयाचा? कारण नानानें कोणताच गुन्हा केला नव्हता. उलट तो मुख्य कारभारी असून राज्याच्या हितासाठींच झटत होता. तेव्हां त्यास कैद करणेंहि सोपें नव्हतें. शिवाय नाना आपण होऊन सावधगिरीनेंच वागत होते. पण कांहीं झालें तरी नानाला कैद केल्यावांचून नानाचें द्रव्य मिळणेंहि शक्य नव्हतें. अशा स्थितींत सरळ मार्गानें नाहीं तर वाम मार्गानें म्हणजे विश्वासघातानें नानास कैद करण्याचें शिंद्यानें ठरविलें. प्रथम शिंद्यानें नानाकडे आपल्या विश्वासाचे बाणाजी शेटचे वगैरे आपले कारभारी मध्यस्थीस पाठविले. पण नानास या लोकांचा विश्वास येईना. शेवटीं शिंद्यानें आपल्या पदरीं असलेला फ्रेंच सरदार मुकीर (Michale Philose) यांस नानाकडे पाठविण्याचें ठरविलें. त्याकाळीं परकीय युरोपियन लोकांनीं हिंदुस्थानांत आपल्या वचनाच्या प्रामाणिकपणाविषयीं चांगला लौकिक संपादन केला होता. मुकीर साहेब विश्वासघात करणार नाहीं असें नानास वाटल्यावरून मुकीर साहेबाच्या मध्यस्थीला नानांनीं मान्यता दिली. मुकीराची मध्यस्थी मान्य झाल्यावर उभयपक्षीं करा-राची यादी होऊन त्याप्रमाणें शिंदे व नाना यांचा समेट झाल्यासारखा दिसला व शिंद्यांनीं आपला लष्करी तळहि हालविण्याचें सोंग केलें. इतकें

सगळें झाल्यावर शिंद्यास निरोप देण्याकरतां नानांनीं त्याच्या लष्करांत जावें असें ठरलें व तो दिवस ३१ डिसेंबर १७९७ हा ठरला. या भेटींत कोणचेंहि कपट नाहीं याबद्दल मुकीर साहेबाची हमी नानांनीं घेतलीच होती. तथापि आणखी नानांनीं मुकीराकडून बायबलावर हात ठेवून त्याच्याकडून इमानानें वागण्याची शपथहि घेवविली. इतकी तयारी झाल्यावर ठरलेल्या दिवशीं कांहीं जुजबी लवाजमा बरोबर घेऊन नाना फडनवीस शिंद्याच्या लष्करांत गेले. नानाबरोबर आबा शेलुकर, बजाबा शिरोळकर, नारायणराव वैद्य अशी कांहीं ठळक मंडळी होती. तेथें गेल्यावर परस्पर भेटी व आदराचे उपचार होऊन खलबत करण्याच्या निमितानें शिंदे, त्यांचे कारभारी मुकीरसाहेब व नाना असे निराळ्या जागेंत गेले, आणि तेथें गेल्यावर मुकीर साहेबानें नानास एकदम कैद केलें. हे घडतांच नानाबरोबर लोक होते त्यांवर शिंद्यांकडील लोकांनीं हल्ला करून त्यांस उधळून लाविलें. या गर्दीत पुष्कळ लोक मारले गेले व पुण्यांत मोठा हाहाःकार उडाला. पुण्यांतील लोक फार भयभीत झाले व आजच पेशवाईचा लय होऊन बेबंदशाहीस सुरवात झाली असें पुण्याच्या लोकांस वाटलें. नानाच्या कैदेमुळें मराठी राज्याचा आब गेला आणि सरकार दरबार म्हटलें म्हणजे त्या ठिकाणीं गांभीर्य, चातुर्य, प्रतिष्ठितपणा, दूरदृष्टी वगैरे गुण जे दिसावयाचे त्यांचा नायनाट होऊन हलक्या लोकांचा सुळसुळाट सुरू झाला. या बाबतींत समकालीन लोकांचे उद्‌गार महत्वाचे असल्यामुळें त्यांतले कांहीं खालीं दिले आहेत "काल श्रीमंत राजश्री नाना फडणीस यांस शिंदे यांचे घरीं खलबतास बोलविलें तेथें जातांच कैद केलें. बहुत वाईट गोष्ट जाहली असा पुरुष पुन्हां व्हावयाचा नाहीं. होणारें सोडीत नाहीं. वडीलीं बहूत सावध असावें. फौज जमा असावी चार वेळा सारख्या येत नाहींत. वडील सर्वजाण आहेत." (खरे १०-४१२५) दुसऱ्या एका पत्रांत खालीलप्रमाणें लिहिलें आहे. येथील विधि (नानास कैद करण्याचा) समाप्तीस गेला. याज उपरी

श्रीमंताच्या राज्याचा आब गेला! जो जबरदस्त त्याचे पागोटें वांचेल" (खरे १०-४१३२) *

वस्तुस्थिति अशी असतां कांहीं लेखकांनीं नाना हा आपल्या गुणांनींच कैद केला गेला असा सूर काढला आहे. उदाहरणार्थ जिवबा दादा बक्षी यांचे चरित्रकार असें लिहितात कीं नानांनीं बाळोबा तात्या, नारायणराव बक्षी वगैरे सारस्वतांचा द्वेष करून त्यांना शिंद्याकडून कैद करविलें. म्हणून जशास तसा हात दाखविण्यासाठीं बाळोबानीं आपल्या कैदेच्या ठिकाणाहून तोच नमुना उठवून दिला व आपल्या मुत्सद्दीगिरीनें व शहाणपणानें शिंद्याकडून नानाला कैद करविलें व आपणही मुत्सद्दीगीरींत व शहाणपणांत

---

*( टीपः—नानाला कैद करण्याच्या बाबतींत मुकीर साहेबानें विश्वासघात केला. असें मराठ्यांचे आद्य इतिहासकार ग्रांट डफ यांनीं लिहिलें आहे. हें विश्वासघाताचें कृत्य करून मुकीरानें युरोपिअन लोकांच्या नांवाला लांच्छन लाविलें असेंहि साहेब मजकुरांनीं लिहिलें आहे. ग्रांड डफाच्या या मताला पोषक अशीच माहिती अलिकडे प्रसिद्ध झालेल्या पुना रेकॉर्डमध्यें उपलब्ध झाली आहे. कर्नल फिलोज ( मुकीर साहेब ) याच्या विश्वासघातामुळें नाना पकडला गेला. असें पुण्याच्या इंग्रजांच्या वकीलानें लिहिलें आहे. ( P. R. C. 6–621 64, 79 हा वकील पुन्हां सर जॉन शोअरला माहिती कळवितानां खालीलप्रमाणें लिहीतो

"I Find it my duty to report to you that it is a generally received opinion in this quarter that but for the confidence which Nana placed in the good faith of Colonel Filore as an European he would not have put himself under the existing circumstances into the power of Daulatrao Shindia by visiting him in his Camp. I am disposed to concur in this opinion." (P. R. C. 6–68)

नानापेक्षां कमी नाहीं हें जगास सिद्धकरून दाखविलें ( जि. दादा चरित्र पा २३४ ) नानांची कैद मुकीरसाहेबांच्या विश्वासघातामुळें झाली ही गोष्ट अस्सल पत्रव्यवहारावरून सिद्ध असतां जि. दादाच्या चरित्रकारानीं आपल्या ज्ञातीच्या अभिमानानें वरीलप्रमाणें तोडलेले तारे निरर्थक आणि निराधार आहेत हें सांगणें नकोच. शिवाय नाना व बाळोबातात्या यांची तुलनाहि हास्यास्पदच आहे. कुठें नाना आणि कुठें बाळोबा ? नानानें इंग्रज, हैदर, टिपु, निजाम यांच्यासारख्या जहांबाज शत्रूंना वठणीला आणून मराठ्यांचें राज्य २५ वर्षें संभाळलें आणि बाळोबानें परशुरामभाऊंना सामील करून घेऊन चिमाजीअप्पाला गादीवर बसविलें. त्याचा कारभार चार सहा महिनेहि चालला नाहीं. यावरून बाळोबा हें काय किंमतीचे मुत्सद्दी होते, हें सहज कळून येण्यासारखें आहे. दुसरे एक लेखक सखारामबापूचे चरित्रकार श्री. कानेटकर यांनीं सखारामबापूच्या तोंडचेच उग्दार दाखल करून असें भासविलें आहे कीं नानांनीं शिंद्यामार्फत सखारामबापूंना कैद केलें त्याचाच परिणाम म्हणून शेवटीं १७९८ मध्यें शिंद्यांनीं नानांना कैद केलें. सखारामबापूंनीं आपल्या कैदेबद्दल नानाजवळ खालीलप्रमाणें उद्वार काढले " या दौलतीचे रफीक पूर्वीपासून होळकरांचे घर सांप्रत तुम्ही सिंदीबन वाढविलें आहे. या पासून तुम्हास आपाय होईल. हें खचीत मनांत वागवून फार जपावें. बाकी तुम्ही रजाचा गज करून दौलत नमुदास आणाल हा मज भरवंसा. सांगीतल्या गोष्टीस फार जपावें" (स. बापू च. पा. २११) पुढें बापू नगरच्या किल्यावर कैदेंत असताना त्यांनीं भविष्यसूचक अशी एक चिठी लिहून तेथील किल्लेदाराच्या स्वाधीन केली. ती चिठी अशी " शिंद्याकरवीं तुम्ही (नानांनीं) माझा जसा शेवट केलात तसाच शिंदे तुमचा शेवट करतील " सखारामबापूचें हें भविष्य खरें ठरून नानांना नगरच्या किल्यांत कैद प्राप्त झाली तरी बापूची कैद ही राजरोस त्याच्या राजद्रोहाचा अस्सल पुरावा त्यांना दाखवून त्यांना झालेली होती. हें बापूचे चरित्रकार यानींच स्पष्ट दाखविलें आहे आणि नानाची कैद मात्र शिंद्यांनीं आपमतलबाकरितां मुकीर साहेबाच्या मार्फत विश्वास

घातानें घडवून आणली हें स्पष्ट आहे. नाना व बापू या दोघांच्या कैदेच्या कारणांमधला हा महत्वाचा फरक लक्षांत घेतां सखारामबापूचें भविष्य काकतालीय न्यायाप्रमाणें खरें ठरलें तरी. एक राजद्रोही व दुसरा राज्यहितकर्ता ही वस्तुस्थिति त्यामुळें खोटी ठरत नाहीं) नानास कैद केल्यावर पुण्यांत शिंदे म्हणतील ती पूर्व दिशा झाली नानांची कैद ही मुख्यतः नानाचें द्रव्य हरण करण्याकरतां झाली होती. शिंद्याचे कारभारी सर्जराव घाटगे यांनीं नानासकट पुण्यांतील सर्व प्रतिष्ठित लोकांचें द्रव्य लुबाडण्याच्या हेतूनें जे हाल केले त्यांची अस्सल पत्रांतील वर्णनें अंगावर शहारे येण्यासारखीं आहेत. नाना सुमारें तीन महिने कैदेत होते. एवढ्या अवधींत पेशव्यांचें राज्य ही प्रत्यक्ष यमपुरी होऊन गेली व कित्येक लोकांनीं भयभीत होऊन पुण्यांतून पलायन केलें. लोकांचे असे अनन्वित हाल करून शिंद्यांनीं सुमारें दोन कोट रुपये पुण्याच्या लोकांपासून वसूल केले. हे हाल कशा प्रकारचे झाले याचा नमुना एका पत्रांत खालीलप्रमाणें आढळतो. "(गंगाधरपंत) भानूस पंधरा लक्ष तजकरा व आठ लक्ष खंड मागत होते. ऐवज उत्पन्न न होय. तेव्हां हातापायास दगड बांधले. शेवट वस्त्रविरहित करून दोन प्रहरीं तोफ ऊष्णांत तप्त होते त्या तोफेवर बसविलें, त्याची झळ नाजूक जाग्यास लागली नंतर ताडणहि जाहलें. शेवट काल जाहले." (खरे १०-४२१०) वरींल उताऱ्यावरून पुण्याच्या लोकांचे कसे हाल झाले याची कल्पना येईल. असे हाल करून शिंद्यानीं पुण्याच्या लोकांपासून कोटयाधि रुपये वसूल केले. पुण्यांतल्या लोकांपासून वाटेल त्या मार्गानें पैसे वसूल करून घ्यावे अशी परवानगी बाजीरावानेंच शिंद्यास दिली होती. त्याचा फायदा घेऊन शिंद्यानें सर्जराव घाटग्यामार्फत पुण्यांत जो कहर उडवून दिला त्यामळें बाजीरावासहि वाईट वाटलें. पुण्या सारख्या अव्वल दर्जाच्या शहरांत प्रतिष्ठित लोकांचा कधींहि पूर्वीं झाला नाहीं असा छळ होईल अशी बाजीरावाचीहि समजूत नव्हती. पण प्रत्यक्ष प्रकार पाहिल्यावर बाजीरावाचेहि मन शिंद्याविषयीं कलुषीत झालें. याच वेळीं शिंद्यानें आणखीं एक कलागत उत्पन्न केली, ती अशी कीं दौलतराव शिंदे व महादजीच्या बायका यांचें झोंबट आपसांत

बरेच दिवस चालू होतें. आतां नाना तुरूंगांत गेले आणि पुण्यांत आपणांस विरोध करण्यास कोणी नाहीं ही संधि साधून या शिंदे बायांचा कायमचा निकाल लावून टाकावा अशी मसलत दौलतराव व सर्जेराव यांनीं ठरविली. या मसलतीप्रमाणें बायांना उत्तर हिंदुस्थानांत कायमच्या रवाना कराव्या किंवा तें न जमेल तर अहमदनगरच्या किल्ल्या-वर बंदोबस्तानें ठेवाव्या असा शिंद्याचा विचार होता. पण बायांच्या बाजूसहि नारायणराव बक्षीसारखे शिंदेशाहींतले कांहीं सरदार असल्यामुळें बायांना ताब्यांत घेण्याचें घाटग्यांचे हें कारस्थान साधलें नाहीं. बायांच्या आसपास अमृतराव पेशव्याचा मुक्काम होता. ही संधि पाहून बाया अमृतरावाच्या आश्रयास गेल्या व अमृतरावामार्फत त्यानीं बाजीरावाकडे असें बोलणें लाविलें कीं, दौलतराव नीट वागत नाहीं तरी आम्ही नवीन दत्तक घेतों त्यास शिंद्याच्या दौलतीवर बसवून दौलतरावास पदच्युत करावें. शिंद्याबद्दल बाजीरावाचें मन वाईट झालेंच होतें तेव्हां त्यावर जरब बसविण्याकरतां ही उत्तमच संधि आली असें समजून बाजीरावानें बायांचे बोलणें मनावर घेण्याचें ढोंग उभें केलें. शिंदे व घाटगे यांच्या कानावर ही गोष्ट जातांच त्यांनीं श्रीमंतांना घाबरें करण्याकरितां साताऱ्याच्या महाराजांचा आश्रय केला व सातारकर छत्रपतींनीं पेशव्याचा अंमल झुगारून देण्याचा उद्योग करावा अशी छत्रपतींना चिथावणी दिली. सातारकरांना मदत करण्याचेंहि आश्वासन शिंद्यांनीं दिलें. अशा कारण परंपरेनें सातारकर दंगा करण्यास प्रवृत्त झाले. व त्यामुळेंच सातारकरांवर स्वारी करण्याचा प्रसंग पेशव्यांवर आला. सातारकरांना दंग्यास प्रवृत्त करण्यास शिंदे कारणीभूत झाले हें खरें असलें तरी स्वतः बाजीरावानेंहि आपल्या मूर्खपणामुळें सातारकरांना दंगा करण्यास कारण उत्पन्न करून ठेविले होतें. नानास कैद झाल्यापासून नानामार्फत जेथें जेथें कारभार चालू होता त्या त्या ठिकाणच्या सर्व अधिकाऱ्यांस पत्रें पाठवून बाजीरावानें असा पुकारा केला होता कीं, नानास कैद होऊन तो अधिकारभ्रष्ट झाल्यामळें सर्व ठिकाणीं आतां नानाचा हुकूम न चालतां फक्त श्रीमंतांचाच चालावा. साताऱ्चा किल्ला व तेथील

महाराजांचा बंदोबस्त हीं कामें आजपर्यंत नानाकडे होतीं. नानास कैद झाल्यावर श्रीमंतांनीं सातारकरांस कळविलें कीं, नानास आम्हीं कारभारांतून काढल्यामुळें नानाच्या मार्फतीनें साताऱ्यास बंदोबस्ताकरितां जे कारकून आहेत त्यांस कैद करावें. आम्हीं इकडून आमच्या विश्वासाचे दुसरे कारकून पाठवून देऊं तोंपर्यंत सातारच्या महाराजांनीं किल्ला आपलेच हातीं ठेवावा. श्रीमंतांचा अशा प्रकारचा हुकूम आणि शिंद्यांचेहि पाठबळ या दोन गोष्टी जमल्यावर मग सातारकरांनांहि पेशव्यांच्या कचाटच्यांतून कायमचें मोकळें होण्याची मोठी महत्त्वाकांक्षा उप्पन्न झाली सातारच्या महाराजांनीं आपल्या नात्यागोत्याचे सर्व लोक गोळा केले, किल्ल्यावरील गडकरी मंडळीसहि सामील करून घेतलें आणि नानाच्या मार्फतीचे तेथें बंदोबस्ताकरतां असलेले कारकून, बाबूराव आपटे यांस कैद करून किल्ल्यावर आपला अंमल बसविला. करवीरकरांप्रमाणें आपणहि स्वतंत्र व्हावें व पेशव्यांचा अंमल झुगारून द्यावा अशी स्वाभावीकच सातारकरांस इच्छा झाली. या कामीं महाराजांचे बंधु चतुरसिंग आणि इतर सोयरे मंडळी, बापू महाडीक, भवानजी शिर्के आणि येलोजी मोहिते वगैरे लोकांचा महाराजांना पूर्ण पाठिंबा मिळाला.

बाजीराव मनांत मांडे खात होते कीं, साताऱ्यास नानाचा अंमल उठवून आपला बसवावा, व त्याप्रमाणें आपल्या विश्वासाचा म्हणून शिवराम नारायण थत्ते नांवाचा एक कारकून श्रीमंतांनीं साताऱ्यास रवाना केला, व त्याबरोबर सातारकर छत्रपतींस विनंतिपत्रक दिलें कीं, साताऱ्याचा किल्ला थत्ते यांच्या स्वाधीन करावा. पण आपणच उठविलेलें गांधील शेवटीं आपणांसच डसेल हें श्रीमंतांस माहीत नसल्यामुळें सातारकरांनीं बाबूराव आपटयास हाकलून दिलें, त्याचप्रमाणें थत्ते यासहि किल्ल्यावर येण्यास साफ मनाई केली. ही गोष्ट श्रीमंतांस कळतांच श्रीमंत एकदम गडबडले व आतां काय करावें याचा विचार करण्याकरितां त्यांनीं माधवराव रास्त्यांकडे धांव घेतली. माधवराव रास्ते यांनीं फौजेसह साताऱ्यास जाऊन महाराजाची समजूत पाडावी व फौजेच्या जोरावर महाराजांभोंवतीं गोळा

झालेल्या मराठे मंडळीवर दहशत बसवावी अशी बाजीरावांनीं योजना आंखली. या योजनेप्रमाणें रास्ते फौजेसह साताऱ्यास येऊन पोंचले व त्यानीं सातारच्या महाराजांशीं किल्ला हवाली करण्याविषयीं बोलणें लाविलें. महाराजांनीं या बोलण्याकडे फारसें लक्ष दिलें नाहींच. पण उलट पुण्यास शिंद्यांच्या व पेशव्यांच्या दरबारीं आपले वकील पाठवून आपली बाजू समर्थन करण्याचा उद्योग आरंभिला. शिंद्यांचें सूत महाराजांशीं होतेंच. आतां वकील आल्यावर त्यांच्याच म्हणण्याला पाठिंबा देण्याचें धोरण शिंदे व घाटगे यांनीं सुरूं केल्यामुळें बाजीराव व शिंदे यांमध्यें जबरदस्त तेढ उत्पन्न झाली. सन १७९८ च्या मे महिन्याच्या सुमारास ही तेढ पराकाष्ठेस पोंचली. या वेळीं श्रीमंतांना घाबरें करण्याकरितां म्हणून सर्जेराव घाटग्यानें साताऱ्यास माणसें पाठवून महाराजांस आश्वासन दिलें कीं तुम्हीं खुशाल पेशव्याचें वर्चस्व झुगारून द्या. पेशव्यांशीं लढण्याचा प्रसंग आल्यास शिंद्यांची पलटणें घेऊन मी स्वतः तुमची मदत करण्यास येतों. शिवाय करवीरकरमहाराजांचीहि मदत सातारकरांस मिळवून देण्याचें आश्वासन घाटग्यानें सातारकरांस दिलें इतका सर्व बाजूंनीं पाठिंबा मिळतांच मग सातारच्या महाराजांनीं एकदम वक्रता धारण करून रास्त्यांस दम दिला कीं बऱ्या बोलानें तुम्हीं येथून निघून जा. न जाल तर जबरदस्तीनें तुम्हांस घालवून देऊं. या धामधुमीचें वर्णन एका पत्रांत आलें आहे तें असें. "सातार प्रकरणीं वर्तमान तर महाराजांनीं दोन हजार फौजा व किल्लासुद्धां पांच हजार पायदळ आज चार दिवसांत जमा केलें. आणखींहि वरचेवर जमाव होतच आहे. दहा हजारपर्यंत जमाव आठ चार दिवसांत होईल असें आहे. यास कारण तर शिंदे यांजकडील बोलणार आले होते. त्यांची बोलणीं होऊन संधान मिळून हा जमाव झाला. वरचेवर स्वार व पायदळ आणखीं जमा होत आहे. महाराज किल्याखालीं येऊन उतरणार आहेत. रा माधवराव (रास्ते) यांसही येथून निघून जाणें असे महाराजांकडून बोलण्यांत आलें आहे. हेहि श्रीमंतांच्या वाड्यांत आहेत. ही जागा सोडून कृष्णेच्या सुमारें जावें या बेतांत आहेत. सारांश महाराजांचें बल दिवसें दिवस अधिक पडत चाललें.

लो. म.



महाराज शहराबाहेर डेरे देऊन फौज उतरविणारा रास्ते यांस तेथून काढणार या प्रमाणें आहे. महाराजांची मसलत स्वाऱ्या करून वं गांवगन्ना व शहरांत वगैरे धामधूम करून ऐवज करावा अशीहि आवई आहे. शहरचे लोक गडबडले आहेत. याप्रमाणें वर्तमान आहे "(खरे भा. १०-४२५९)✽

सातारकर, करवीरकर आणि शिंदे या त्रिकुटाचा साताऱ्यास घडत असलेला हा बनाव श्रीमंतांच्या कानांवर जातांच त्यांची जी त्रेधा तिरपीट उडाली ती सांगणें नकोच. श्रीमंतांच्या या त्रेधा तिरपिटीमुळेंच कैदेंत असलेल्या परशुरामभाऊंची सुटका होण्याचा योग जमून आला. सातारचें खूळ बळावून सातारकर स्वतंत्र झाले तर आपल्या पेशवेपदाला कांहींच किंमत रहाणार नाहीं हें श्रीमंतांस माहीत होतें. पण हें खूळ मोडण्यास फौजबंद सरदार शिंद्याशिवाय श्रीमंतांच्या पदरीं दुसरा कोणीच नव्हता. शिंदे फौजबंद असले तरी दौलतराव व शिंदेबाया यांच्या झोंबटांत श्रीमंतांनीं बायांना आश्रय देऊन दौलतरावालाच उडवून देण्याचा उठाव उभा केल्यामुळें दौलतरावाचें पाठबळ सातारकरांना मिळालें होतें. शिवाय करवीरकरांचाहि पाठिंबा सातारकरांस मिळणार होता. अशा तऱ्हेनें श्रीमंतांवर जो बिनतोड प्रसंग आला होता त्यांतून निभावून नेण्याचें सामर्थ्य मराठेशाहींत आतां परशरामभाऊंखेरीज दुसरें कोणांत नव्हतें. तेव्हां नाइलाजानें कां होइना, रास्ते भाऊंच्या सुटकेकरितां श्रीमंतांजवळ रदबदली करीतच होते ती मान्य करून भाऊंची सुटका करणें श्रीमंतांस भाग पडलें.

---

✽ टीप:— साताऱ्च्या महाराजांना एवढें बळ प्राप्त होण्यास शिंदे कारणीभूत झाले. त्याप्रमाणें करवीरकरही झाले. त्याची हकीगत नारो हरी करंदीकर यानें करवीरच्या लष्करांतून पत्र लिहून कळविली ती खालीलप्रमाणें आहे. " श्री राजश्री छत्रपती ( करवीरकर ) आज तिसरे प्रहरीं इंदुवारीं कूच करून धूणकीच्या मुक्कामास गेले. सातारकर महाराज यांचीं पत्रें निकडीनें येणेंविशीं आलीं. कारण पुण्यास वर्तमान समजून बंदोबस्त झाला नाहीं, तों जलदीनें यावें अशीं आलीं त्यावरून जलदीनें निघाले. इसलामपुरासही ठाणे घालावयाचा बेत आहे. आणखी पुढें काय होतें पहावें " खरे १०-४२६०

परशुरामभाऊंच्या सुटकेबद्दल आजपर्यंत मिरजेचे बाळासाहेब पटवर्धन आणि माधवराव रास्ते हे खटपट करीतच होते. नाना फडणवीस, अमृतराव पेशवे आणि दौलतराव शिंदे यांनाही भाऊ कैदेंतून सुटावे असें वाटत होतें. पण बाजीरावाचा मात्र परशुरामभाऊंवर फारच राग असल्यामुळें ते कोणाचेंच ऐकेनात व भाऊंची सुटका होईना. भाऊ कैदेंत गेल्यापासून त्यांची प्रकृतीहि बिघडली होती. ते मांडवगणास कैदेंत होते तेथें त्यांना आमांशाचा विकार होऊन ते फार हैराण झाले होते. भाऊंची प्रकृति अशा प्रकारें बिघडल्यामुळें त्यांना हवा पालटण्याकरितां दुसऱ्या कोणत्यातरी ठिकाणीं न्यावें अशी खटपट रास्ते करीत होते. भाऊंना हवा पालटण्याकरितां कोंकणांत चिपळूणकडे न्यावें अगर त्यांना वाई प्रांतीं नेऊन ठेवावें असा विचार रास्ते यांच्या मनांत घोळत होता. पण त्याच वेळीं पुण्यांत सर्जेरावाचा अंमल सुरू होऊन ज्याच्यात्याच्याजवळून दंड उपटण्याचा उद्योग चालू होता. भाऊंस जाग्यावरून हालवावयाचें झाल्यास त्यांच्याकडूनहि दंड घ्यावा असा आग्रह घाटग्यानें सुरू केला व दंड दिल्याशिवाय भाऊंस मांडवगणाहून हालविण्यास त्यानें हरकत घेतली. घाटग्याच्या या दुराग्रहामुळें भाऊ होते तेथेंच राहिले पण भाऊंना सोडवावयाचें झाल्यास दंड घेतल्याशिवाय सोडावयाचें नाहीं हें श्रीमंत बाजीरावसाहेबांनींहि ठरविलें होतें. साताराचें खूळ मोडण्यास परशुरामभाऊंना सोडावयाचें असें जरी आतां बाजीरावानें कबूल केलें होतें तरी तसें करतांना त्यांनीं माधवराव रास्ते यास बजाविलें कीं आतां जरी साताराच्या कामगिरीकरितां भाऊंना मोकळें केलें तरी गुन्हेगारीबद्दल दंड भरल्याखेरीज भाऊ कैदेंतून सुटले असें समजूं नये. भाऊंनीं कमींत कमी १५ लक्ष दंड भरला पाहिजे व तो भरीपर्यंत भाऊंना सरकारांत आणून हजर करण्याची जबाबदारी तुम्हांवर आहे असें श्रीमंतांनीं रास्त्यांस बजावण्यास कमी केलें नाहीं *

---

* ( टीपः—भाऊंनीं भरावयाच्या दंडासंबंधानें खरे ले० संग्रहांत खालीलप्रमाणें उल्लेख आढळतात. 'राजश्री बाबा तुळापुरावर श्रीमंत रा. रावसाहेब यांचे सैन्यांत गेले §

परशुरामभाऊ कैदेंत पडल्यापासून त्यांना सोडविण्याचे सर्व उपाय त्यांचे हितचिंतक करीतच होते. दहा पंधरा लक्षांपर्यंत दंड भरण्याची त्यांची तयारी होती. पण बाजीरावाच्या दुराग्रहामुळें अशा प्रयत्नांना अजून यश आलें नव्हतें आतां सातारकरांचें प्रकरण उत्पन्न झाल्यामुळें भाऊंची सुटका होण्याचा समय आपोआपच आला. दंड भरीपर्यंत भाऊंना कैदेंतच समजावें पण तूर्त साताऱ्च्या कामगिरीकरतां सोडावें हें श्रीमंतांचें बोलणें म्हणजे पडत्या फळाचीच आज्ञा समजून रास्त्यांनीं भाऊंची मांडवगणाहून सुटका केली. भाऊंची प्रकृती बरी नव्हती तरी तशाच स्थितींत ते ता. १६।६।१७९८ रोजीं मांडवगणाहून आपला मक्काम हलवून रास्त्यांच्या लोकाबरोबर भीमा उतरून अलिकडे आले. भाऊंच्या सुटकेचें वर्तमान एका पत्रांत खालील प्रमाणें आहे. "श्री. राजेश्री भाऊसाहेब आज मंदवारीं आवशीचे तीन घटका रात्रीस भीमा दक्षीण तीरास आले रास्ते यांजकडील कारभारी फौजसुद्धां बरोबर आहेत. उदइक मोरेश्वरास .स्नान करून पुढें जाणार. रा. बाळाजीपंत भिडे येऊन पोहोंचले मला मिरजेस जाण्याची आज्ञा झाली म्हणजे निघोन येतों श्री. रा. भाऊसाहेबांची प्रकृती भृगुवारापासून बरी

---

§ होते. तिकडील वर्तमान बाल्राग्र जाहिराण्यांत आलें नाहीं बाजारी वर्तमान श्री. राजश्री रावसाहेब यांनीं श्रीमंतांचे वचन घेऊन बोलतात. रास्तेहि बोलतात. श्रीमंत रावसाहेब बोलतात तें कांहीं हिरण्याचे पंधरा वीस (लक्ष) पावेतों आहे, म्हणोन ऐकतों. यांत खरें लटकें न कळे" (खरे १०-४२३८) दुसऱ्या एका पत्रांत खालीलप्रमाणें उल्लेख आहे. "बाबा काळे श्री. राजेश्री अमृतरावसाहेब यांजकडे गेले होते. दहा (लक्ष) रुपये पावेतों बोलिले. परंतु श्री. राजेश्री बाबासाहेब (बाजीराव) यांचे मर्जीस गोष्ट आली नाहीं, याजमुळें राहिलें. दैवापुढें उपाय नाहीं. समय होता. पण श्रीचे चित्तांत गोष्ट आली नाहीं." (खरे १०-४२४९)

आहे. आमांशाचा उपद्रव राहिला. पुण्याकडील अधिकोत्तर नाहीं.' (खरे १०-४२५०)*

परशुरामभाऊंची कैदेतून सुटका होणार ही गोष्ट सातारकरांच्या कानीं गेल्याशिवाय रहाणें शक्यच नव्हतें. सातारकरांनीं माधवराव रास्त्यांना साताऱ्याहून निघून जाण्याविषयीं धमकी दिल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. त्या धमकीमुळें रास्ते निघून जातील असें सातारकरांस वाटलें होतें. पण रास्ते निघून न जातां ते परशुरामभाऊंची वाट पहात तेथेंच राहिले. परशुरामभाऊ व रास्ते एक झाले तर जड जाईल हें ओळखून ज्या दिवशीं भाऊ मांडवगणाहून निघाले त्याच दिवशीं म्हणजे ता. १६।६।१७९८ रोजीं रात्रौ सातारकरांनीं माधवराव रास्त्यांवर मोठा जबरदस्त छापा घातला व त्यांना साताऱ्याहून हुसकून लाविलें. रास्त्यांना साताऱ्याबाहेर निघावें लागल्यामुळें त्यांनीं आपल्या फौजेचा तळ हलविला व ते कृष्णेपलीकडे गोव्याजवळ येऊन राहिले. भाऊंची भेट झाल्याशिवाय पुढें कांहीं करावयाचें नाहीं असें ठरवून रास्ते भाऊंची वाट पहात होते. भाऊ १६ जूनला मांडव-

---

*(टीप-परशुरामभाऊच्या सुटकेची बातमी पु. रे. रे मधेंही आहे. (P R C ६--१२०) भाऊंच्या सुटकेबद्दल लोकांना किती आनंद झाला त्याचें प्रत्यंतर एका पत्रांत खालीलप्रमाणें आहे. पटवर्धनाचे करवीरच्या दरबारांतले वकील नारो हरी करंदीकर लिहितात. "रा. भाऊसाहेब पुण्यास आले. श्रीमंतांच्या भेटी झाल्या लष्करांतहि वीस पंचवीसपर्यंत आवाज ऐकूं आलेत. परंतु कोठें तोफा झाल्या हें खचीत वर्तमान कळत नाहीं. भाऊसाहेब पुण्यास आल्याचें ऐकून तोफा संतोषाच्या झाल्या असें असल्यास लिहावें." (खरे १०-४२६६) वरील पत्र करवीरच्या लष्करांतून मिरजेस लिहिलेलें आहे. करवीरच्या लष्करांत तोफांचे आवाज ऐकूं आले ते भाऊसाहेबांच्या सुटकेमुळें मिरजेस काढलेले होते कीं काय अशी चौकशी सदरहू लेखक करीत आहे. यावरून भाऊसाहेबांच्या सुटकेबद्दल त्यांचे हितचिंतक किती आतूर होते हें दिसून येतें.)

गणाहून निघाले ते ता. २५ जूनला रास्त्यांच्या लष्करासमीप येऊन दाखल झाले. उभयतांच्या भेटी मोठ्या समारंभानें झाल्या. त्या प्रसंगीं खुशालीच्या तोफाहि झाल्या. भाऊंच्या बंदोबस्ताकरितां रास्त्यांचेच लोक होते. व रास्त्याच्या लष्करांत पटवर्धनांचेहि तीन चारशें स्वार होते भाऊंची सुटका होतांच हे स्वार घेऊनच त्यांनीं आपला निराळा गोट स्थापन केला. भाऊंस कैद करते वेळीं त्यांची शिक्के कट्यार, लगी, डंका, निशाण वगैरे सरंजाम रास्त्यांनीं काढून घेतला होता तो या प्रसंगीं रास्त्यांनीं मोठ्या समारंभानें भाऊंच्या हवालीं केला. तोच सरंजाम घेऊन त्याच मुहूर्तावर भाऊंनीं आपला द्वितीय पुत्र हरीपंतबाबा यांस स्वारीवर निघण्यास सांगितलें. पुण्याहूनहि बाजीराव साहेबांनीं रास्त्याच्या कुमकेस नरसिंगराव विंचुरकर यास पाठविलें होतें. विंचुरकर २७ जूनला येऊन पोंचले. ते आल्यावर भाऊंनीं चोहोंकडे माणसें व पत्रें पाठवून स्वार व पायदळ गोळा करण्याचा जारीनें उद्योग सुरू केला. या वेळीं सन १७९८ चा जून महिना संपत आला असून पावसाळा मोठ्या जोरानें सुरू झाला होता. व सैन्य भरतीस ते दिवस सोईचे नव्हते तरीसुद्धां परशुरामभाऊंसारख्या रणयोध्याची लढाऊ महाराष्ट्रावर एवढी जबरदस्त मोहिनी होती कीं भाऊंचीं पत्रें जातांच दूरदूरच्या ठिकाणाहून रोज शेकडों स्वार चाकरीस राहाण्याकरितां त्यांच्या लष्करांत हजर होऊं लागले. असें होतां होतां जुलैच्या अखेरीस परशुरामभाऊंजवळ सात आठ हजार फौज गोळा झाली. शिवाय रास्ते व विंचुरकर यांची तीन चार हजार फौज होती ती निराळीच. अशा रीतीनें सातारकरांना तोंड देण्याकरितां भाऊंजवळ आतां दहा बारा हजार फौज जमा झाली. इतकी फौज जमा झाली तरी सातारकरांवर एकदम चालून जाणें भाऊंना शक्य नव्हतें. सातारकरांजवळ भाऊंपेक्षा जास्त फौज होती असा अर्थ नाहीं. त्यांच्याजवळ पांच सहा हजारच फौज होती. पण पावसाळ्याचे दिवस असल्यामुळें नदीनाले भरून गेले होते. त्यामुळें फौजेच्या हालचाली करणें शक्य नव्हतें. अशा स्थितींत भाऊ व सातारकर या दोघांनाहि स्वस्थ रहाणेंच प्राप्त झालें. सातारकरांनीं या अवधींत आपली फौज वाढविण्याचा प्रयत्न केला

नाहीं. त्यांनीं फक्त बेरड चाकरीस ठेऊन भाऊंना उपद्रव देण्याचा क्रम सुरू ठेविला होता. या बेरडांचा भाऊंना फार त्रास होत असे. पण त्यांनीं त्यांची फारशी पर्वा केली नाहीं. सातारकरांनी वास्तविक आपली फौज वाढविण्याचा प्रयत्न करावयाचा पण तो मात्र त्यांनीं केला नाहीं, याचें कारण असें कीं शिंदे व करवीरकर हे आपणास आयत्या वेळीं मदत करतील या आशेवर सातारकर स्वस्थ राहिले. पण प्रत्यक्ष वेळ आली त्या वेळीं या दोन्हीं ठिकाणाहून सातारकरांना मदत झाली नाहीं शिंदे व करवीरकर सातारकरांना कां मदत करूं शकले नाहींत हेंहि पाहिलें पाहिजे. सातारकरांनीं रास्त्यांवर छापा घालून त्यांस साताऱ्याबाहेर काढून लाविल्यावर लगेच त्यांनीं करवीरकरांस कळविलें कीं रास्त्यांस पुण्याहून मदत येण्यापूर्वीच तुम्हीं सत्वर निघून आमच्या मदतीस यावें. सातारकरांचें असें पत्र येतांच करवीरकर सुमारें तीन हजार स्वार, दोन हजार पायदळ व एक मोठी तोफ असा सरंजाम घेऊन सातारकरांच्या मदतीस निघाले. त्यांनीं पहिला मुक्काम इस्लामपुरावर केला. त्या ठाण्यातून खंडणी वसूल करून ते अष्टे येथें गेले व तेथें ठाणें बसवून ते कासेगावास आले. कासेगावांस आल्यावर तेथें त्यांना कऱ्हाडकर प्रतिनिधींचे वकील भेटले. करवीरकरांच्या लोकांनीं प्रतिनिधीच्या मुलुखास उपद्रव न देण्याचें कबूल केल्यास कऱ्हाडकर प्रतिनिधी करवीरकरास कृष्णा नदी उतरून पुढें मार्ग देण्यास तयार होते. पण करवीरकरांचें बोलणेंच चढाईचे पडलें. त्यांनीं उलट प्रतिनिधींजवळ खंडणी मागण्यास सुरूवात केली. करवीरकर खंडणी मागूनच स्वस्थ बसले नाहींत. त्यांनीं आजूबाजूच्या खेड्यांची लुटालूट सुरू केली. पंचगंगा कृष्णा व वारणा या नद्यांच्या उत्सवाकरितां प्रतिनिधींनी ब्राम्हणांस इनाम दिलेले गांव करवीरकरांनीं लुटलें. अशा परिस्थितींत पुढें काय करावें हा प्रतिनिधींस मोठा विचारच पडला. इतक्यात रास्त्यांकडून त्यांस इशारा आला कीं तुम्हीं करवीरकरांस मार्ग देऊं नये. आम्हीं तुमची कुमक करतों. अशा तऱ्हेचें भरतीचें आश्वासन मिळतांच कऱ्हाडकर प्रतिनिधींनीं करवीरकरांस साफ सांगितलें कीं तुम्हांस मार्ग मिळणार नाहीं व खंडणीहि मिळणार नाहीं तुम्हीं परत जावें.

करवीरकरांनीं पुढें येऊं नये अशा अर्थाचें बाजीरावसाहेबांनीहि त्यांना पत्र पाठविलें होतें आणि त्यांत असेंहि सुचविलें होतें कीं तुम्ही जेवढा मुलूख घेतला असेल तेवढा तूर्त तुमच्याकडेच असूं द्यावा. पुढें स्वस्थता झाल्यावर तुमचा तह करून देऊं व तो तुमच्या मर्जीप्रमाणें देऊं. करवीरकरांनीं श्रीमंतांचें हें बोलणें मानलें नाहीं व पुढें येण्याचेंच ठरविलें. कऱ्हाडकरांचें आपण पारिपत्य करूं अशी त्यांची खात्री होती. म्हणून त्यांनीं कांसेगांवाहून आपला मुक्काम हालविला व ते कऱ्हाड शेजारीं वाडें या गांवीं तळ देऊन राहिले. या अवधींत त्यांनीं कऱ्हाडकरांच्या गांवापासून खंडणी वसूल केली व नंतर ते सर्व गांव लुटून फस्त केलें. कऱ्हाडकरांचे गांव लुटण्याच्या दंगलींत करवीरकरांनीं सातारकर महाराजांचाहि येवोळें हा गांव लुटला. करवीरकर हे सातारकरांना मदत करण्याकरितां येत होते. अशा स्थितींत त्यांनीं वाटेंत सातारकरांचाहि गांव लुटण्यास कमी केलें नाहीं. यावरून सातारकरांना मदत करण्याचा करवीरकरांचा हेतु किती प्रामाणिक होता हें लक्षांत येण्यासारखें आहे. सातारकरांना मदत करण्याच्या हेतूनें लूट जमा करावी हाच करवीरकरांचा हेतु होता असें दिसतें. ही लूट त्यांनीं किती बेदरकारपणें केली हें खालील उताऱ्यावरून स्पष्ट होईल. "येरोळें लुटलें गेलें त्या दंग्यांत सात आठ बायकांनीं नदींत उडी टाकून जीव दिले. त्या बायका कऱ्हाडास लागल्या. वस्त्रें देखील नाहींत. एका बायकोच्या खाकेंत मूल लहान होतें. तें मूल तसेंच मेलेलेंसुद्धां बायको होती. हें वर्तमान कळलेवर कऱ्हाडकर श्री मातोश्री साहेबांनीं अग्न देविली. बाईका ब्राम्हणांच्या होत्या. वरकड तीन चार शूद्रांच्या. काल्यांतील घरें पंचरावीस जाळिलीं. बाकीचीं घरें रहाण्याकरितां गांवकऱ्यांनीं सात हजार रुपये कबूल केले आहेत." ( खरे १०-४३३५ )

करवीरकरांची अशा प्रकारची लुटालूट चालू असतां इकडे सातारकरांचा जीव मात्र कासावीस होत होता. कारण परशुरामभाउंची फौज दिवसेंदिवस वाढत चालली होती हें त्यांना दिसत होतें अशा स्थितींत करवीरकरांच्या मदतीची ते सारखी मार्गप्रतीक्षा करीत होते. व सारखे

करवीरकरांस निरोपावर निरोप पाठवीत होते. परशुरामभाऊंच्या वाढत्या बळामुळें सातारकरांची त्रेधा तिरपीट उडाली आहे. आणि पावसाळा ओसरतांच भाऊ साताऱ्यावर चाल करणार हें पक्कें समजल्यावर करवीरकरांनीं कृष्णा उतरून साताऱ्याचा पल्ला गांठण्याची योजना आंखली. कृष्णा नदी या वेळीं भरून चालली असल्यामुळें करवीरकरांनीं मालखेडाजवळ नावा गोळा करून पलीकडे जावें अशी योजना आंखली होती. पण ही बातमी पटवर्धनांस लागतांच त्यांनीं त्या नावा लांबविल्या व कोठें नाहिंशा करून टाकिल्या त्याचा पत्ता लागेना. असें झाल्यामुळें नदी उतरण्याचीं पुन्हां अडचण उत्पन्न झाली. यामुळें करवीरकरांनीं पुन्हां कऱ्हाडकरांशीं बोलणें लाविलें कीं आम्हीं तुम्हांस यापुढें त्रास देणार नाहीं. तरी तुम्हीं तुमच्या मुलुखांत कृष्णेचे उतार असतील तेथून पलीकडे जाण्याकरितां आम्हांस मार्ग द्या पण कऱ्हाडकरांनीं हें बोलणें मुळींच ऐकलें नाहीं. कऱ्हाडकर ऐकत नाहींत असें दिसतांच कऱ्हाडकरांवर हल्ला करून पुढें जाण्याखेरीज दुसरा मार्ग नाहीं अशी स्थिति प्राप्त झाली. कऱ्हाडकरांशीं दोन हात करण्याचें प्राप्त झाल्यामुळें जुलैच्या २१ तारखेस करवीरकरांची फौज कऱ्हाडकरांवर चालून गेली. कऱ्हाडकरहि तयारच होते. उभय पक्षांची थोडी चकमक होतांच करवीरकरांना मागें हटावें लागलें. कऱ्हाडकर मात्र तोफा डागून लढाईच्या ठाण्यावरच मुक्काम करून राहिले. ता. २१ जुलैचा हा मोका फसल्यावर ता, ३ ऑगस्ट रोजीं करवीरकर पुन्हां कऱ्हाडकरांवर चालून आले. यावेळीं मागच्यापेक्षां मोठी लढाई होऊन पुन्हां करवीरकरांचा मोड झाला व त्यांना मागें हटावें लागलें. करवीरकर व कऱ्हाडकर यांच्या या झटापटी जुलै ऑगस्टमध्यें चालल्या असतांना पुण्यास काय चाललें होतें हेंहि पाहिलें पाहिजे या अवधींत शिंदे व शिंदेबाया यांचें भांडण विकोपास जाऊन त्यामध्यें प्रत्यक्ष लढाईच सुरू झाली होती. व शिंदे बायांना या कामांत बाजीरावांचे बंधु अमृतराव यांचें पाठबळ होतें. या भांडणांत शिंद्यांनीं अमृतरावावर हल्ला करून त्याचा गोट लुटला. शिंदेबायांचें म्हणणें श्रीमंत बाजीराव व अमृतराव यांनीं आमचा व दौलतरावांचा

समेट करून द्यावा असें होतें. पण ही गोष्ट शिंद्यांस मान्य नव्हती. बाया श्रीमंतांच्या आहारीं गेल्या ही गोष्ट दौलतरावास आवडली नाहीं. तेव्हां या पेंचप्रसंगातून पार पडण्याकरितां दौलतरावानें अशी युक्ति योजिली कीं श्रीमंतांचें वर्म नाना फडणवीस तेव्हां नानाला कैदेंतून मोकळें केल्यास श्रीमंत ताळयावर येतील. ही युक्ति योजण्यांत शिंद्यांचे अनेक हेतु होते. एक तर श्रीमंतांस नानांचें भय उत्पन्न करावें. दुसरें नानांच्या मध्यस्थीनें बायांचा तंटा मिटला तर पहावा आणि नानाला कैदेंतून मोकळें केल्यामुळें त्याच्याकडून कांहीं द्रव्य मिळालें तर पहावें, असें अनेक हेतु शिंद्याचे होते. या बेतास अनुसरून शिंद्यानें फकीरजी गाढवे याजबरोबर सहा पलटणें व पांचशें स्वार देऊन त्यास नानाची मुक्तता करण्याकरितां नगरास पाठविलें. फकीरजी गाढवे नगरास गेल्यावर त्यानें नानाजवळ दोन कोट रुपयांचें मागणें केलें.

शेवटीं बरीच घासाघीस होऊन नानांनीं दहा लक्ष रुपये कबूल केले. या वाटाघाटीत असें ठरलें होतें कीं शिंद्यानीं नानांस मुक्त करावें. व त्याची कारभारी म्हणून नेमणूक करावी आणि नंतर नानांनीं १० लक्ष रुपये शिंद्यांस द्यावे. नानांनीं नंतर शिंद्याचा बायांशीं समेट करून द्यावा. हा करार ठरल्यावर नाना फकीरजीबरोबर १५ जुलै १७९८ रोजीं नगरहून पुण्याकडे जाण्यास निघाले ते १७ जुलैला रात्री वानवडीवर शिंद्यांच्या छावणींत दाखल झाले. नाना छावणींत आल्यावर दौलतराव शिंद्यानें मोठ्या समारंभानें त्यांची भेट घेतली व खुशालीच्या तोफा केल्या. नानाला सोडण्यांत शिंद्याचा हेतु नानाकडून पैसे उकळण्याचा होताच. पण शिंदेबायाचा तंटा नानामार्फत मिटवावा हा दौलतरावाचा मुख्य हेतु होता. या कार्यांत मुख्य अडचण सर्जेराव घाटग्याची होती ही अडचण काढून टाकण्याकरितां दौलतरावानें नानाची सुटका झाल्यापासून आठ दिवसांतच म्हणजे ता. २५ जुलै रोजीं सर्जेराव घाटगे व त्याचा साथीदार फकीरजी गाढवे यांना कैद केलें. या घडामोडीचा सातारकरांवर मोठाच परिणाम झाला. सातारकरांस मदत करण्याचें शिंद्यानें कबूल केलें होतें. तें सर्जेराव घाटग्यानेंच केलें होतें. आतां शिंद्याचा व त्याचा बेबनाव होऊन तो कैद झाल्यामुळें शिंद्याकडून मदत मिळण्याची सातारक-

रांस आशा उरली नाहीं. सातारकरांस मदत करणारे दुसरे करवीरकर त्यांची फौज कृष्णा कांठावर कऱ्हाडकर प्रतिनिधींनीं अडकवून धरली आणि ३ ऑगस्टला लढाई होऊन करवीरकरांना मागें हटावें लागलें. हें पूर्वी लिहिलेंच आहे. इतकें सर्व होईपर्यंत सन १७९८ चा आगस्ट महिना उजाडला या अवधींत परशुरामभाऊ फौजेची जमवा जमव करीत होते. व पाऊस ओसरण्याचीहि वाट पहात होते. त्यांचा मुक्काम कृष्णेपलीकडे मालगांव व गोवें या ठिकाणीं होता. विचुरकर, रास्ते व परशुरामभाऊ यांची मिळून सुमारें पंधरा हजार फौज भाऊंच्या हाताखालीं जमा झाली. व आतां पाऊसहि थोडा कमी होऊं लागला होता. सातारकरांना शिंद्यांकडून मदत होत नाहीं आणि करवीरकरांकडूनहि होत नाहीं अशी परिस्थिती उत्पन्न झाली आणि भाऊंजवळहि पुरेशी फौज गोळा झाली, तेव्हां जास्त विलंब न करतां याच वेळीं जलदी करून सातारकरांशीं लढाई द्यावी व बंड मोडून सातारकराचा बंदोबस्त करावा असें परशुरामभाऊंनीं ठरविलें. ही मसलत मनाशीं योजून ता. ४ ऑगस्टला भाऊंनीं आपल्या उद्योगास सुरवात केली. या प्रसंगाचें वर्णन भाऊंनींच लिहिलें आहे. तें खालील प्रमाणें आहे. "काल सप्तमीसह अष्टमी मंदवारीं प्रातःकाळीं आम्हीं व रास्ते व राजेश्री नरसिंग खंडेराव (विंचुरकर) कूच करून श्री कृष्णापार होऊन बुणगे मागें निबखिडीनजीक ठेऊन सडे फौजेनिशीं वेण्णापार जाहलों. दोन प्रहर दिवसाचे सुमारें महाराजांकडील व आम्हांकडील फौजेचें, रास्ते व शिवाजी विठ्ठलसह, तोंड लागलें. झटपट बरीच जाहली. महाराजांकडील लोक शहरापुढें तोफेचे माराबाहेर आले होते. त्यांस हटवून माघारें घालविलें झटपट जाहली त्यांत चि. रा. विठ्ठलराव यांस उजव्या डोळयानजीक बोटाच्या अंतरानें कानसुलास बरचीची जखम लागली आहे. खैर आहे. कांहीं चिंता नाहीं. क्षेत्रोजी शितोळे यांचा धाकटा लेक ठार जाहला चाळीस पन्नास घोडीं इकडील तिकडे पाडाव आलीं. आणखीहि इकडील कांहीं जखमी झाले आहेत. महाराजांकडीलहि मोहिते व शिर्के, महाडीक वगैरे जाया जखमी वीस-पंचवीसपर्यंत जाहले. महाराजहि

किल्ल्याखालीं आपले फौजेंतच होते अस्तमानच्या प्रहर दिवसाचे अजमासें त्याजकडील उगेच नादाचें बोलणें बोलावयाकरितां राजश्री विश्वनाथजी वगैरे भले माणूस चार पांच आसामी आले होते. त्यांचें म्हणणें वेण्णा नदी उतरून फौजेसुद्धां जावें. प्रातःकाळीं (समेटाचें बोलणें) बोलणार पाठवितों. तें आम्हीं मान्य न करतां आज रात्रीं सडे फौजेनिशीं तोफेच्या गोळ्याचा मारा टाकून उभे आहों. बहुतकरुन आज बोलणेंच बोलतील. काय होईल तें मागाहून लिहून पाठवितों. (खरे १०-४३४३)

वरील पत्रांत सातारकर भाऊंस फौज मागें घ्या आम्हीं बोलणें करण्यास येतों, असें सांगत होते. पण भाऊंनीं तें मान्य केलें नाहीं. कारण सातारकरांना अजून करवीरकरांच्या मदतीची आशा वाटत होती. ती मदत येऊन पोंचेंपर्यंत कालहरण करावें हाच सातारकरांचा हेतू होता. पण परशुरामभाऊंना ह्या डावपेचाची माहिती होती. त्यामुळें त्यांनीं फौज मागें न घेतां सातारकराकडून बोलणें करण्यास येणाऱ्यांची वाट पहात बसल्याचें ठरविलें. सातारकर उगाच नादाचें बोलणें करण्याच्या विचारांत होते हें भाऊंना माहीत होतें. कारण याच वेळीं सातारकरांनीं करवीरकरांकडे तांतडीनें मदत पाठविण्यासंबंधानें पत्रें लिहिलीं होतीं. या बाबतींत करवीरच्या दरबारांत असलेला पटवर्धनाचा वकील खालीलप्रमाणें लिहितो. "साताऱ्याहून महाराजांचें पत्र दस्तुरचें इंदुवारीं प्रहर रात्रीस आले त्यांत लिहिलें होतें कीं, आपले भरंशावर आम्ही उद्योग केला. असें असतां अद्याप (आपली) फौज येऊन पोहोंचली नाहीं त्यास हल्लीं निदानसमय आहे. येथें एक दोन रोजांत फौज येऊन पोंचल्यास उत्तम नाहींतर आपला प्राण रहात नाहीं. या उपर वाट पहावयाची पराकाष्टा राहिली नाहीं." अक्षर कांहीं बाळबोध व कांहीं मोडी असा कागद होता. ऐशास येथून हल्लीं फौज यावयाचा संकेत राहिला श्री. रा. भाऊसाहेब (परशुरामभाऊ कृष्णा पार होऊन साताऱ्यानजीक गेले. तेव्हां इकडून फौज जाणें कळतच आहे.) (खरे १०–४३५२)

परशुरामभाऊंना समेटाच्या बोलण्यांच्या नादास लावून कालहरण करावें व करवीरकरांची मदत आल्यावर मग लढाई द्यावी असा सातारकर महाराजांचा विचार होता व त्याप्रमाणेंच त्यांनीं करवीर करांस पत्र पाठविलें होतें. पण भाऊ साताऱ्यानजीक येऊन ठेपल्याची बातमी कळतांच करवीरकरांनीं फौज पाठविण्याचा संकेत रहित केला, अशी बातमी वरील पत्रांत पटवर्धनांच्या वकिलानें लिहिली आहे. तात्पर्य करवीरकरांची फौज येत नाहीं आणि सातारकरहि समेटाचें बोलणें करण्यास येत नाहींत अशी स्थिति प्राप्त झाल्यामुळें पुढें काय करावयाचें हा भाऊंपुढें मोठा प्रश्न उभा राहिला. कारण सातारा हें छत्रपतींच्या राजधानीचें शहर असल्यामुळें त्यावर हल्ला करून तें लुटावें असें भाऊंना वाटत नव्हतें शक्य तितके करून तडजोडीनें प्रकरण मिटवावें असें परशुराम भाऊंचें मत होतें. पण सातारकरांनीं कालहरणाचें धोरण स्वीकारल्यामुळे भाऊंचा इलाज चालेनासा झाला व शेवटीं साताऱ्यावर हल्ला करण्याचा शेवटचा उपाय भाऊंना योजावा लागला *

* (टीपः–करवीरकरांनीं साताऱ्यास मदत करण्याचें नाकारलें याचें कारण भाऊ साताऱ्यानजीक आले हें आहेच पण दुसरें महत्वाचें कारण कऱ्हाडकर-प्रतिनिधींनीं करवीरकरांस वाटेंत जबरदस्त विरोध केला हें होय. या संबंधानें करवीरच्या लष्करांतून पटवर्धनाचा वकील खालील प्रमाणें लिहितो " इकडील फौज साताऱ्यास जाण्याचा रंग दिसत नाहीं. कऱ्हाडकरांस जरब देऊन हत्ती व जरीपटका द्यावा हा बेत जाला होता परंतु कऱ्हाडकर यांचा नेट चांगला आहे. दीड हजारपर्यंत राऊत व तीन हजारपर्यंत पायदळ चांगलें येणेंप्रमाणें जमाव आहे व पंतहि पुण्याहून निघाले व रास्ते यांजकडीलहि कुमक येणार तेव्हां कऱ्हाडकरांचें बोलणें नरमाईचें नाहीं. यांनीं (करवीरकरांनीं) गुंतावें तर कऱ्हाडकर, श्री. रा. रा. भाऊसाहेब व रास्ते यांच्या फौजा एक होऊन तूर्त शहास गुंतावें. करवीर लांब, मध्यें नद्या दोन, असे कित्येक प्रकारचे अंदेश चित्तांत आणून माघारें जावें अशी मसलत होत आहे. (खरे १०—४३४१)

सं. न.

परशुरामभाऊंनीं साताऱ्यावर हल्ला करण्याचें ठरविलें त्यासंबंधानें त्यांनींच स्वत: हल्ल्याची हकीगत खालीलप्रमाणें दिली आहे. ' साताऱ्यावरी निकड करावी तरी शहर लुटलें जातें. या करितां चार पांच दिवस वाट पाहिली, तिकडील बोलणारहि येत होते. परन्तु भाग तुटावयाचें बोलणें एकहि नाहीं. दिवसगती घालविण्याचा प्रकार. आणखीं आठ चार दिवस इकडून लांबणीवर टाकावें तरीं पर्जन्याचे दिवस. बुणगे वेष्णेच्या पलीकडे, सडी फौज अलीकडे. नदीस पाणी आलें असतां अडचण जाणून व बोलणेंहि धराचें नाहीं हें पाहून आज प्रातःकाळीं गुरुवारी रास्तेसह पायदळसुद्धां तीन टोळ्या करून शहरावरी चालोन घेतलें पायदळसुद्धां लोक शहरांत गेले. शहर लुटलें गलें ताकीदहि न लुटण्याविशीं केली आहे. फौजेंत दोन चारशेंपर्यंत घोडे व चार पांच हत्ती आले. घोडें माणूस जाया जखमी दोहोंकडील जालें ते समजलें नाही. मागाहून लिहून पाठवितों. शहर लुटलें जाऊं नये म्हणून चारपांच दिवस लांबणीवर टाकिलें. परन्तु होणार सोडीत नाहीं, इकडील लोक व पायदळ शहरांतच आहे. याउपरीं लुटूं नये अशी ताकीद वरचेवर करून नाकेबंदी करविली आहे. ( खरे १०--४३५० )

साताऱ्यावर भाऊंनीं वरील पत्रांत लिहिल्याप्रमाणें हल्ला केला तो ९ ऑगस्ट १७९८ रोजीं केला. हा हल्ला केल्यामुळें सातारा हें राजधानीचें शहर लुटलें जातें याची भाऊंना किती काळजी वाटत होती हें त्यांनीं हल्ला करण्याच्या आधीं एक दिवस लिहिलेल्या पत्रावरून स्पष्ट होतें. त्यांत भाऊ लिहितात " सातारकर महाराजांकडील बोलणें बोलावयाकरितां (वकील) येतात. परन्तु अद्यापि कोणताहि ठराव नाहीं. एक दोन रोजांत दोहींतून एक ठरेल. इकडून निकड करावी तर शहर लुटलें जातें. या अंदेशामुळें युक्ती युक्तीनें बंदोबस्त जाहल्यास करावा असा विचार आहे. ईश्वरेच्छेनुरूप काय घडेल तें पहावें. मोठी गोष्ट येथें आल्यापासून पर्जन्यानें उघाडी दिली आहे. येथें ( सातारकरांचा ) सरंजाम तर विशेष नाहीं. परंतु राजधानीची जागा, शहर लुटलें जाईल म्हणोन बोलण्याखालीं पडलें आहे."

( खरे १०--४३५१ ) सातारा ही छत्रपतींची राजधानीची जागा ती लुटली जाऊं नये अशी भाऊंची इच्छा होती. पण समेटानें तडजोड होऊं शकली नाहीं. व सातारकर निव्वळ कालहरण करणार असा रंग दिसतांच भाऊंनीं ९ ऑगस्टला साताऱ्यावर हल्ला केला. हल्ला होतांच सातारकरांच्या फौजेची दाणादाण उडाली व ती फोज चोहोंकडे पळून गेली. सातारचे महाराज किल्यावर गेले व त्यांचे साथीदार चतुरसिंग व भवानजी शिर्के हे पांच सहाशें स्वारांसह करवीरकरांकडे जाण्याकरतां पळाले. परशुरामभाऊंनीं आपले पुत्र हरीपंतबावा यांस त्यांचा पाठलाग करण्याकरितां पाठविलें. हरीपंतबावांनीं चतुरसिंग व शिर्के यांस वसंतगडाखाली गांठलें व त्यांचे निम्मे स्वार मारून त्यांची घोडीं पडाव केलीं. चतुरसिंग व शिर्के हे मात्र निसटले.पण वाटेंत कोयना नदी उतरतांना कऱ्हाडकरांनीं त्यांच्यावर हल्ला केला. त्यांत चतुरसिंग व शिर्के यांचें उरलें सुरलें सर्व सामान व घोडीं लुटलीं गेलीं. केवळ पांच पंचवीस लोकांनिशीं चतुरसिंग व शिर्के जीव बचावून करवीरकरांच्या लष्करांत पोंचले. सातारकरांची अशी दुर्दशा झालेली पाहातांच करवीरकरांचे लष्कर कऱ्हाडजवळ होतें तें मागें फिरलें व त्यानें करवीरची वाट धरली. कारण रास्ते व पटवर्धन हे पुढें येतील व कऱ्हाडकरांच्या मदतीनें आपणांवर हल्ला करतील अशीं करवीरकरांस धास्ती वाटली. सातारकरांचा अशा रीतीनें मोड झाला तरी समेटाचें बोलणें करण्याचा त्यांचा रंग दिसेना. या बाबतींत सातारकर कशी दिरंगाई करीत होते. या संबंधानें परशुरामभाऊंनींच खालीलप्रमाणें लिहिलें आहे." इकडील मजकूर तरी बुनगें वेण्णेपलीकडे होतें तें आज अलीकडे आणवून सडी फौज साताऱ्याचे शहरापासोन एक कोसावरी मुक्काम होता. तेथून बुनगेसह पुढें येऊन शहरापासोन पाव कोसाचे तफावतीनें मुक्काम रास्तेसह करून आहों. किल्यावरील बोलणें आहे. परंतु अद्यापि कोणती एक गोष्ट ठरावांत नाहीं. आणखी किती दिवस लांबणीवर पडतें पहावें (खरे १०—४३५५) दुसऱ्या एका पत्रांत भाऊ लिहितात. ' साताऱ्याचे शहराचा बंदोबस्त जाहला शहरांत गाडदी

ठेवून नाकेबंदीनें चौक्या बसविल्या. किल्यावरील बोलण्याचा शिलशिला आहे. परंतु धराचे बोलणें बोलून एकादी गोष्ट ठरावांत लवकर आणावी हें ध्यान नाहीं दिवसगतीवर घालावें असें चाललें आहे. असेंच करून शहराची खराबी केली.पुढें काय घडेल तें खरें."(खरे १०-४३५७) सातारकरांचा बेत निव्वळ कालहरण करणें हाच होता. सातारच्या किल्यावरून मातोश्री आईसाहेबांचाहि परशुरामभाऊनां निरोप आला कीं आम्हीं किल्याखालीं येऊन रास्तेसह जाबसाल ठरावांत आणतों. या निरोपामुळें भाऊंनीं आणखी आठ दिवस वाट पाहिली. पण बोलण्याचा रंग कांहींच दिसेना. या बाबतींत भाऊ पुन्हां लिहितात. "सातारचे किल्यावरून मातोश्री आईसाहेबांचा निरोप आला कीं आम्हीं किल्याखालीं येतों तेथें रास्तेसह बोलणें होऊन जाबसाल ठरावांत आणावे. त्याप्रमाणें बंदोबस्त व्हावा त्याजवरून आठ दिवस वाट पाहिली परन्तु त्याप्रमाणें घडण्यांत येईना. उगाच नाद मात्र बोलण्याचा लावून दिवसागतीवर घालवावें असें दिसोन आल्यावरून आमचा मुक्काम किल्याचे उत्तरेस होता तेथून छ. १२ तारखेस कूच करून किल्याचे ईशान्येस अर्धकोसाचे तफावतीनें येऊन राहिलों. रास्ते व विंचुरकर किल्याचे पूर्वेसच आहेत. शहरांत किल्यावरील लोकांचीं घरें आहेत. त्यांचे दारीं चौक्या बसविल्या लांकूड फाटे किल्यावरी जाऊं नये याप्रमाणें बंदोबस्त केला." (खरे१०—४३६७) सातारकरांचा मोड झाला व साताऱ्याचाहि बंदोबस्त भाऊंनीं केला तरी सातारकर समेटाचें बोलणें करण्यास येईनात. अशा स्थित्तींत वाट किती पहावी हें जाणून भाऊंनीं पांच हजार गारदी व कांहीं स्वार किल्याच्या बंदोबस्तासाठीं ठेविले व ते स्वत: ता. ३० ऑगष्ट १७९८ ला कूच करून कृष्णेपलीकडे माहुलीस जाऊन राहिले.भाऊ माहुलीस गेल्याचें कळतांच सातारच्या आईसाहेब किल्याखालीं उतरल्या व त्यांनीं भाऊंस भेटीकरितां बोलाविलें निरोप येतांच भाऊसाहेब परत साताऱ्यास आले व त्यांचा व आईसाहेबांचा साताराप्रकरणाबाबत समेटाचा ठराव झाला. ठराव झाल्यावर सातारच्या किल्याचा ताबा घेण्याकरतां रास्त्यांचे कारकून किल्यावर चढले आणि

महारांजाचे किल्यावर सुमारें पंधरांशें माणूस होतें तें खालीं उतरले नंतर रास्त्यांनीं किल्याचा ताबा घेतला. इतकें सर्व होण्यास बरेच दिवस लागले. या दिरंगाईचें कारण परशुरामभाऊंनीं खालीलप्रमाणें लिहिलें आहे. " सातान्यास अजमासें तीनशेंपर्यंत लोक चढले. दरवाजा इकडील लोकांच्या स्वाधीन झाला. किल्यावर पंधराशेंपर्यंत माणूस चाकरीचें होतें, त्यांपैकीं तीनचारशें माणूस व किल्यावरील कांहीं अधिकारी यांचे आप्तविषयीं यांचीं मुलें माणसें खालीं उतरलीं. आणखी वरचेवर लोक उतरतात. काय व्हावयाचें तें होतच आहे, परंतु लांबण लागतें ! पदाची जागा. निकड करितां येत नाहीं. कांहीं (महाराजांची) मर्जी, कांहीं सरकार काम असें पाहून कारभार विल्हेस लाविला पाहिजे या बेतानें चालिलें आहे. यामुळें जे दिवस लागतील ते लागोत. बहुतकरून लवकरच उलगडा पडेल " (खरे १०-४३७७)

सातारच्या किल्याचा ताबा तडकाफडकी घेणें शक्य नव्हतें सातारकरांचा मोड झाला असला तरी ते छत्रपती होते. त्यांचा मानसन्मान राखूनच व्यवस्था करणें प्राप्त होतें म्हणूनच भाऊंनीं वरील पत्रांत " पदाची जागा निवड करतां येत नाहीं " असें लिहिलें आहे. असो दिरंगाईनें कां होईना. पण सातारचें प्रकरण परशुरामभाऊंनीं हातांत घेतलें तें पूर्णपणें यशस्वी करून छत्रपतींचा बंदोबस्त पूर्वीप्रमाणें झाला ही पेशव्यांची मोठीच कामगिरी परशुरामभाऊंनीं केली व अशा रीतीनें सातारच्या धामधुमीचें हें प्रकरण एकदांचें संपलें. आणि सातारच्या महाराजांस पुन्हां पेशव्याचा बंदोबस्त मानणें भाग पडलें. ❁

सातारचें प्रकरण सन १७९८ च्या ऑगष्ट महिन्याच्या अखेरीस संपलें. तें संपल्यावर परशुरामभाऊंनीं पुढें काय करावयाचें हा प्रश्नच होता.

---

(❁ टीप:—परशुरामभाऊंनीं सातान्यावर स्वारी करून सातारकर छत्रपतींचा बंदोबस्त केला ही हकीगत पु रे रे. मध्येंहि एका पत्रांत सविस्तर आली आहे. (P. C. R. ६-१३४)

कारण रास्त्यांमार्फत भाऊंची सुटका श्रीमंत बाजीरावसाहेबांनीं केली, ती फक्त साताऱ्चें प्रकरण मिटविण्यापुरतीच होती व भाऊंनीं दंडाची रक्कम भरीपर्यंत ते कैदेंतून मुक्त झाले असें समजूं नये अशा तऱ्हेची सूचना बाजीरावसाहेबांनीं रास्त्यांस भाऊंना सोडतेवेळींच केली होती. तेव्हां दंड भरून मुक्तता करून घेतल्याशिवाय परशरामभाऊंना यापुढें कांहींच करतां येण्यासारखें नव्हतें परशुरामभाऊ यावेळीं फौजबंद होते. त्यामुळें दंडाच्या रकमेचा तगादा श्रीमंत याचवेळीं करतील असा संभव जरी नव्हता तरी पुढें मागें केव्हां तरी दंड हा भरावा लागणारच. शिवाय फौजबंद असेपर्यंत जरी श्रीमंतांनीं दंडाचा तगादा न केला तरी दंड लांबणीवर टाकण्याकरितां फौजेचा खर्च सोसणेंहि जडच होतें हा सर्व विचार करून भाऊंनीं दंड भरण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें व्यवस्था करण्यास त्यांनीं मिरजेचे बाळासाहेब यांस कळविलें. या बाबतींत भाऊ बाळासाहेबांस लिहितात. " पेशजी आम्हीं मांडवगणावर होतों. ते समयीं तुम्हीं सुटकेची तरतूद करीत होतां, तोच विचार हल्लीं जाहल्याखेरीज मोकळेपण होत नाहीं. फौज जमा केली त्याजमुळें मोकळे करितों अशी बोलणीं प्रस्तुत होतात. ओढून धरावें तरी फौजेचा खर्च पडोन शेवटीं परिणाम कसा पडतो न कळे. एकदां मोकळें व्हावें हा अर्थ ध्यानांत आणून कबूल करावें लागेल त्याची तरतूद करावी." (खरे १०-४३४५) भाऊ मांडवगणास कैदेंत असतां मिरजेच्या बाळासाहेबांनीं रास्त्यांमार्फत दहा लक्ष रुपये पेशवे सरकारांत भरून भाऊंची सुटका करावी अशी खटपट चालविली होती. तीच खटपट पुन्हां करून रकमेची तरतूद करण्याकरितां भाऊंनीं वरील पत्रांत बाळासाहेबांस लिहिलें आहे. याप्रमाणें खटपट करून भाऊंनीं रास्त्यांमार्फत दहा लक्ष रुपये ठराविक मुदतींत भरण्याचें कबूल केल्यामुळें त्यांना साताऱ्चे प्रकरण संपल्यावर आपल्या गांवीं म्हणजे तासगांवीं जाण्याचा मार्ग मोकळा झाला.

सातारप्रकरणाचा व भाऊंच्या कैदेबद्दल भरावयाच्या दंडाच्या रकमेचा निकाल लागल्यावर भाऊ तासगांवीं जाण्याकरितां निघाले ते भाद्रपद

( खरे १०--४३५१ ) सातारा ही छत्रपतींची राजधानीची जागा ती लुटली जाऊं नये अशी भाऊंची इच्छा होती. पण समेटानें तडजोड होऊं शकली नाहीं. व सातारकर निव्वळ कालहरण करणार असा रंग दिसतांच भाऊंनीं ९ ऑगस्टला साताऱ्यावर हल्ला केला. हल्ला होतांच सातारकरांच्या फौजेची दाणादाण उडाली व ती फौज चोहोंकडे पळून गेली. सातारचे महाराज किल्यावर गेले व त्यांचे साथीदार चतुरसिंग व भवानजी शिर्के हे पांच सहाशें स्वारांसह करवीरकरांकडे जाण्याकरतां पळाले. परशुरामभाऊंनीं आपले पुत्र हरीपंतबाबा यांस त्यांचा पाठलाग करण्याकरितां पाठविलें. हरीपंतबाबांनीं चतुरसिंग व शिर्के यांस वसंतगडाखालीं गांठलें व त्यांचे निम्मे स्वार मारून त्यांची घोडीं पाडाव केलीं. चतुरसिंग व शिर्के हे मात्र निसटले.पण वाटेंत कोयना नदी उतरतांना कऱ्हाडकरांनीं त्यांच्यावर हल्ला केला. त्यांत चतुरसिंग व शिर्के यांचें उरलें सुरलें सर्व सामान व घोडीं लुटलीं गेलीं. केवळ पांच पंचवीस लोकांनिशीं चतुरसिंग व शिर्के जीव बचावून करवीरकरांच्या लष्करांत पोंचले. सातारकरांची अशी दुर्दशा झालेली पाहातांच करवीरकरांचे लष्कर कऱ्हाडजवळ होतें तें मागें फिरलें व त्यानें करवीरची वाट धरली. कारण रास्ते व पटवर्धन हे पुढें येतील व कऱ्हाडकरांच्या मदतीनें आपणांवर हल्ला करतील अशीं करवीरकरांस धास्ती वाटली. सातारकरांचा अशा रीतीनें मोड झाला तरी समेटाचें बोलणें करण्याचा त्यांचा रंग दिसेना. या बाबतींत सातारकर कशी दिरंगाई करीत होते या संबंधानें परशुरामभाऊंनींच खालीलप्रमाणें लिहिलें आहे. " इकडील मजकूर तरी बुनगें वेण्णेपलीकडे होतें तें आज अलीकडे आणवून सडी फौज साताऱ्याचे शहरापासोन एक कोसावरी मुक्काम होता. तेथून बुनगेसह पुढें येऊन शहरापासोन पाव कोसाचे तफावतीनें मुक्काम रास्तेसह करून आहों. किल्यावरील बोलणें आहे. परंतु अद्यापि कोणती एक गोष्ट ठरावांत नाहीं. आणखी किती दिवस लांबणीवर पडतें पहावें (खरे १०—४३५५) दुसऱ्या एका पत्रांत भाऊ लिहितात. ' साताऱ्याचे शहराचा बंदोबस्त जाहला शहरांत गाडदी

ठेवून नाकेबंदीनें चौक्या बसविल्या. किल्यावरील बोलण्याचा शिलशिला आहे. परंतु धराचे बोलणें बोलून एकादी गोष्ट ठरावात लवकर आणावी हें ध्यान नाहीं दिवसगतीवर घालावें असें चाललें आहे. असेंच करून शहराची खराबी केली.पुढें काय घडेल तें खरें.''(खरे १०-४३५७) सातारकरांचा बेत निव्वळ कालहरण करणें हाच होता. सातारच्या किल्यावरून मातोश्री आईसाहेबांचाहि परशुरामभाऊनां निरोप आला कीं आम्हीं किल्याखालीं येऊन रास्तेसह जाबसाल ठरावांत आणतों. या निरोपामुळें भाऊंनीं आणखी आठ दिवस वाट पाहिली. पण बोलण्याचा रंग कांहींच दिसेना. या बाबतींत भाऊ पुन्हां लिहितात. " सातारचे किल्यावरून मातोश्री आईसाहेबांचा निरोप आला कीं आम्हीं किल्याखालीं येतों तेथें रास्तेसह बोलणें होऊन जाबसाल ठरावांत आणावे. त्याप्रमाणें बंदोबस्त व्हावा त्याजवरून आठ दिवस वाट पाहिली परन्तु त्याप्रमाणें घडण्यांत येईना. उगाच नाद मात्र बोलण्याचा लावून दिवसागतीवर घालवावें असें दिसोन आल्यावरून आमचा मुक्काम किल्याचे उत्तरेस होता तेथून छ. १२ तारखेस कूच करून किल्याचे ईशान्येस अर्धकोसाचे तफावतीनें येऊन राहिलों. रॉस्ते व त्रिचुरकर किल्याचे पूर्वेसच आहेत. शहरांत किल्यावरील लोकांचीं घरें आहेत. त्यांचे दारीं चौक्या बसविल्या लांकूड फाटे किल्यावरी जाऊं नये याप्रमाणें बंदोबस्त केला." (खरे१०—४३६७) सातारकरांचा मोड झाला व साताऱ्याचाहि बंदोबस्त भाऊंनीं केला तरी सातारकर समेटाचें बोलणें करण्यास येईनात. अशा स्थितींत वाट किती पहावी हें जाणून भाऊंनीं पांच हजार गारदी व कांहीं स्वार किल्याच्या बंदोबस्तासाठीं ठेविले व ते स्वतः ता. ३० ऑगष्ट १७९८ ला कूच करून कृष्णेपलीकडे माहुलीस जाऊन राहिले.भाऊ माहुलीस गेल्याचें कळतांच सातारच्या आईसाहेब किल्याखालीं उतरल्या व त्यांनीं भाऊंस भेटीकरितां बोलाविलें निरोप येतांच भाऊसाहेब परत साताऱ्यास आले व त्यांचा व आईसाहेबांचा साताराप्रकरणाबाबत समेटाचा ठराव झाला. ठराव झाल्यावर सातारच्या किल्याचा ताबा घेण्याकरतां रास्त्यांचे कारकून किल्यावर चढले आणि

महाराजांचे किल्यावर सुमारें पंधराशें माणूस होतें तें खालीं उतरले नंतर रास्त्यांनीं किल्याचा ताबा घेतला. इतकें सर्व होण्यास बरेच दिवस लागले. या दिरंगाईचें कारण परशुरामभाऊंनीं खालीलप्रमाणें लिहिलें आहे. "साताऱ्यास अजमासें तीनशेंपर्यंत लोक चढले. दरवाजा इकडील लोकांच्या स्वाधीन झाला. किल्यावर पंधराशेंपर्यंत माणूस चाकरीचें होतें, त्यांपैकीं तीनचारशें माणूस व किल्यावरील कांहीं अधिकारी यांचे आप्तविषयीं यांचीं मुलें माणसें खालीं उतरलीं. आणखी वरचेवर लोक उतरतात. काय व्हावयाचें तें होतच आहे, परंतु लांबण लागतें! पदाची जागा. निकड करितां येत नाहीं. कांहीं (महाराजांची) मर्जी, कांहीं सरकार काम असें पाहून कारभार विल्हेस लाविला पाहिजे या बेतानें चालिलें आहे. यामुळें जे दिवस लागतील ते लागोत. बहुतकरून लवकरच उलगडा पडेल" (खरे १०–४३७७)

साताराच्या किल्याचा ताबा तडकाफडकी घेणें शक्य नव्हतें सातारकरांचा मोड झाला असला तरी ते छत्रपती होते. त्यांचा मानसन्मान राखूनच व्यवस्था करणें प्राप्त होतें म्हणूनच भाऊंनीं वरील पत्रांत "पदाची जागा निवड करतां येत नाहीं" असें लिहिलें आहे. असो दिरंगाईनें कां होईना. पण साताराचें प्रकरण परशुरामभाऊंनीं हातांत घेतलें तें पूर्णपणें यशस्वी करून छत्रपतींचा बंदोबस्त पूर्वीप्रमाणें झाला ही पेशव्यांची मोठीच कामगिरी परशुरामभाऊंनीं केली व अशा रीतीनें साताराच्या धामधुमीचें हें प्रकरण एकदांचें संपलें. आणि साताराच्या महाराजांस पुन्हां पेशव्याचा बंदोबस्त मानणें भाग पडलें. ✿

साताराचें प्रकरण सन १७९८ च्या ऑगष्ट महिन्याच्या अखेरीस संपलें. तें संपल्यावर परशुरामभाऊंनीं पुढें काय करावयाचें हा प्रश्नच होता.

---

(✿ टीपः—परशुरामभाऊंनीं साताऱ्यांवर स्वारी करून सातारकर छत्रपतींचा बंदोबस्त केला ही हकीगत पु रे रे. मध्येंहि एका पत्रांत सविस्तर आली आहे. (P. C. R. ६-१३४)

कारण रास्त्यांमार्फत भाऊंची सुटका श्रीमंत बाजीरावसाहेबांनीं केली, ती फक्त सातारचें प्रकरण मिटविण्यापुरतीच होती व भाऊंनीं दंडाची रक्कम भरीपर्यंत ते कैदेंतून मुक्त झाले असें समजूं नये अशा तऱ्हेची सूचना बाजीरावसाहेबांनीं रास्त्यांस भाऊंना सोडतेवेळींच केली होती. तेव्हां दंड भरून मुक्तता करून घेतल्याशिवाय परशरामभाऊंना यापुढें कांहींच करतां येण्यासारखें नव्हतें परशुरामभाऊ यावेळीं फौजबंद होते. त्यामुळें दंडाच्या रकमेचा तगादा श्रीमंत याचवेळीं करतील असा संभव जरी नव्हता तरी पुढें मागें केव्हां तरी दंड हा भरावा लागणारच. शिवाय फौजबंद असेपर्यंत जरी श्रीमंतांनीं दंडाचा तगादा न केला तरी दंड लांबणीवर टाकण्याकरितां फौजेचा खर्च सोसणेंहि जडच होतें हा सर्व विचार करून भाऊंनीं दंड भरण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें व्यवस्था करण्यास त्यांनीं मिरजेचे बाळासाहेब यांस कळविलें. या बाबतींत भाऊ बाळासाहेबांस लिहितात. " पेशजी आम्हीं मांडवगणावर होतों. ते समयीं तुम्हीं सुटकेची तरतूद करीत होतां, तोच विचार हल्लीं जाहल्याखेरीज मोकळेपण होत नाहीं. फौज जमा केली त्याजमुळें मोकळे करितों अशी बोलणीं प्रस्तुत होतात. ओढून धरावें तरी फौजेचा खर्च पडोन शेवटीं परिणाम कसा पडतो न कळे. एकदां मोकळें व्हावें हा अर्थ ध्यानांत आणून कबूल करावें लागेल त्याची तरतूद करावी." (खरे १०-४३४५) भाऊ मांडवगणास कैदेंत असतां मिरजेच्या बाळासाहेबांनीं रास्त्यांमार्फत दहा लक्ष रुपये पेशवे सरकारांत भरून भाऊंची सुटका करावी अशी खटपट चालविली होती. तीच खटपट पुन्हां करून रकमेची तरतूद करण्याकरितां भाऊंनीं वरील पत्रांत बाळासाहेबांस लिहिलें आहे. याप्रमाणें खटपट करून भाऊंनीं रास्त्यांमार्फत दहा लक्ष रुपये ठराविक मुदतींत भरण्याचें कबूल केल्यामुळें त्यांना सातारचे प्रकरण संपल्यावर आपल्या गांवीं म्हणजे तासगांवीं जाण्याचा मार्ग मोकळा झाला.

सातारप्रकरणाचा व भाऊंच्या कैदेबद्दल भरावयाच्या दंडाच्या रकमेचा निकाल लागल्यावर भाऊ तासगांवीं जाण्याकरितां निघाले ते भाद्रपद

शु. १ ता. ११ सप्टेंबर या दिवशीं गणपतीच्या उत्सवाकरितां तासगांवीं दाखल झाले. तासगांवीं श्री. गजाननाचा उत्सव दरवर्षी मोठ्या थाटानें होत असे, या वर्षीचा मंगलमूर्तीचा तासगांवीं झालेला हा उत्सव परशुरामभाऊंच्या आयुष्यांतील शेवटचाच होय.

## प्रकरण १८ वें

# परशुरामभाऊंचा वध

—oo✡oo—

श्री गजाननाच्या उत्सवाकरितां परशुरामभाऊ सप्टेंबर १७९८ च्या आरंभीं तास गांवीं गेल्याचें मागील प्रकरणांत सांगिलेंच आहे. भाऊ साताऱ्यास असतांना त्यांचेजवळ १२-१३ हजार फौज जमली होती. गणेशचतुर्थीचा उत्सव तासगांवीं पार पडल्यावर या फौजेपैकीं ७-८ हजार फौज बरोबर देऊन भाऊंनीं आपले ज्येष्ठ पुत्र रामचंद्रपंत यांना सुरापुराकडे स्वारी करण्यास पाठविलें. रामचंद्रपंत अप्पांना सुरापुराकडे पाठविल्यावर भाऊंनीं आक्टोबरच्या आरंभीं तासगांवाहून आपला मुक्काम हालविला व ते मिरजेच्या आसपास ८-१० कोसांच्या अंतरानें येऊन राहिले. परशुरामभाऊंच्या या वेळच्या हालचाली फार दिरंगाईनें होत होत्या. त्याचें कारण त्यांच्यापुढें निश्चित अशी कांहींच कामगिरी नव्हती. पण कांहींतरी कामगिरी काढल्याशिवाय भाऊंना गत्यंतरच नव्हतें. कारण सातारच्या कामगिरीच्यावेळीं त्यांनीं गोळा केलेली फौज अजून त्यांचेजवळच होती. तिला एकदम जा म्हणावें तरी कठीण होतें. आणि न जा असें म्हणावें तर संभाळण्याचा खर्च चालविणें प्राप्त होतें. अशा स्थितींत भाऊ फारच पंचाइतींत होते. शिवाय त्यांची घरची स्थितीहि फारच खालावलेली होती. आदल्या वर्षींच भाऊंचा घरप्रपंच भागविण्याकरितां त्यांचे पुत्र रामचंद्रपंत यांना सोनेंनाणें

विकावें लागलें होतें. शिवाय श्रीमंत बाजीराव साहेब यांचाहि भाऊंवर अजून रागव होता. साताऱ्च्या कामगिरीकरितां जरी श्रीमंतांनीं भाऊंची सुटका केली होती, तरी रास्ते हे भाऊंना जमीन राहिले होते, व जरूर पडेल तेव्हां भाऊंना आणून सरकारांत हजर करूं असें रास्त्यांनीं श्रीमंतांस लिहून दिलें होतें. अशा स्थितींत रास्त्यांची जामीनकी मोकळी करून आपली सुटका करून घ्यावयाची म्हणजे श्रीमंत मागतील ती दंडाची रक्कम भरणें भाऊंना प्राप्त होतें. पण भाऊंच्या खालावलेल्या स्थितींत ते दंड भरण्यासहि असमर्थ होते. *

परशुरामभाऊंवर आलेल्या या आर्थिक आपत्तींतून वर डोकें काढणें ही गोष्ट भाऊ व नाना यांचा स्नेह जमल्यास शक्य होती. नानाही शिंद्यांच्या कैदेंतून सुटून यावेळीं पुण्यास येऊन राहिले होते. नाना व भाऊ यांनीं एकमेकांविरुद्ध वाटेल त्या उलाढाली केल्या होत्या तरी दोघांनाहि आतां एकमेकांच्या मदतीची आवश्यकता वाटूं लागली होती. शिंदे बेभरंशी असल्यामुळें परशुरामभाऊखेरीज दौलतींत दुसरा कोणी सरदार नाहीं. तेव्हां भाऊंना हाताशीं धरावें असें नानाला वाटत होतें, आणि श्रीमंतांच्यां रोषांतून नानाच आपल्याला सोडवील असें भाऊंनाहि वाटत होतें. तेव्हा दोघेहि अडचणींतच असल्यामुळें आपला पूर्वींचा स्नेह पुन्हां दृढ करावा अशा हेतूनें मिरजेचे बाळासाहेब यांनीं परशुरामभाऊंमार्फत नानाशीं पत्र-

*(टीप:- परशुरामभाऊंना श्रीमंतांनीं रास्त्यांच्या जामीनगतीवर सोडलें होतें. ती जामीनगत मोकळी करून घेऊन भाऊंना आपली सुटका करून घ्यावयाची म्हणजे सरकारांत दंडाची रक्कम भरणें प्राप्त होतें. या दंडाच्या रकमेची चर्चा करणारीं खरे लेख संग्रहांत अनेक पत्रें आहेत. त्यांवरून असें दिसतें कीं कमींत कमी १५ लक्ष रुपये दंड भरणें भाऊंना प्राप्त होतें. खरे १०,४४३९, ४४४१,४४५३)

परशुरामभाऊंच्या ऐपतीच्या बाहेर ही दंडाची रक्कम होती हें त्या वेळच्या भाऊंच्या सांपत्तिक स्थितीवरून स्पष्ट दिसतें.

व्यवहार सुरू केला. नाना व भाऊ यांचें जरी मनस्वी वांकडें आलें होतें तरी मिरजेच्या बाळासाहेबांनीं नानाच्या स्नेहसंबंधाचा धागा आपल्या हातीं ठेविला होता. त्याच धाग्याचा उपयोग करून बाळासाहेबांनीं नानाला खालीलप्रमाणें लिहिलें:— "ती. राजश्री परशुरामभाऊ यांचा आपला ऋणानुबंध कोणे प्रकारें चालत आला हें सर्वांस विदीत आहेच. कालपरत्वें करून विक्षेप आला त्यास पूर्वींपासून वडिलादारभ्य आमचे घरावर आपली ममता. त्यांत न व्हावयाची गोष्ट होऊन सरकारची गैरमर्जी वडिलांवर जाली. रास्ते यांचे योगें करून वडिलांस सातान्यानजीक आणिल्यावर फौज जमा करून सरकार कामहि केलें. कृपा श्रीमंतच करतील. माझे मतें उभय पक्षीं चित्तांतील किलाफ दूर करून पूर्ववत् ममतेनें निखालसपणें आपण व वडिलीं असावें. श्रीमंतांचे पदरीं आपणासारखीं व भाऊंसारखीं माणसें कोठें आहेत? आपली कृपा माझे ठायीं जाणून हा मजकूर लिहीला आहे. राजश्री बाळकृष्णपंतभाऊ व एथून राजश्री मोरो अप्पाजी परांजपे पाठविले आहेत. उभयतां विनंति करतील" (खरे १०-४३९२)

बाळासाहेबांनीं वरीलप्रमाणें पत्र पाठविल्यावर परशुरामभाऊंनींहि नानाशीं पत्रव्यवहार सुरू केला. नानाला लिहिलेल्या पत्रांत भाऊ लिहितात, "आम्ही मांडवगणास (कैदेंत) होतों. तेथून सातान्यास रास्ते यांचे योगें आलों. फौज १० १२ हजार ठेविली. सातान्याचा बंदोबस्त झाल्यानंतर फौजसुद्धां इकडे आलो. आपलें येणें पुण्यास जालें हें ऐकून संतोष जाला. श्री. रा. पंतप्रधान यांचा रोष मजवर आहे त्यास आम्ही श्रीमंतांचे सेवक बहुता दिवसांचे. सेवकापासून अंतर पडलें असतां श्रीमंतांनीं कृपा करून सांभाळ करावा. चित्तांत, अंतर पडलें हें आणू नये. श्रीमंतांचे पायाखेरीज आश्रय आम्हांस कोणाचा नाहीं. येविशीं आपण श्रीमंतांस विनंति करून आम्हाविशीं खातरजमा होईल. तो अर्थ केला पाहिजे." (खरे १०-४४११) दुसऱ्या एका पत्रांत भाऊंनीं नानाला खालीलप्रमाणें लिहीलें आहे. "आपला आमचा स्नेह पूर्वीं चालत होता. मध्यें विपर्यास कित्येक गोष्टीवरून चित्तांत आला तो आम्ही सोडला. पूर्वीं आपला आमचा स्नेह

श्रीमंत कैलासवासी माधवराव, नारायण पंतप्रधान यांचे समाप्तीपर्यंत चालत आला. त्याप्रमाणें चालूं. यांत अन्तर होणार नाहीं. येविशीं श्रीगणपतीच्या दूर्वा दिल्या आहेत. याउपर कांहीं किंतु मनांत नसावा. मजकडूनहि नाहीं. बहुत काय लिहीणें कृपा करावी हे विनंति.(खरे १०-४४१५ बानाचा स्नेह संपादन करण्याकरितां बाळासाहेब व परशुरामभाऊ यांनीं जो पत्रव्यवहार सुरू केला. त्याला योग्य उत्तरें देऊन नानानीहि भाऊंची खातरजमा केली. व उभयपक्षीं पूर्वीप्रमाणें व्यवहार सुरू झाला.

परशुराम भाऊंनीं आपले पुत्र रामचंद्र अप्पा यास सुरापुराकडे पाठविलें होतें व आपण स्वत: मिरजेच्या आसपास तळ देऊन बसले होते. हें पूर्वी सांगितलेंच आहे. सुरापुरास रामचंद्र अप्पाला मदत करण्याकरितां आपण जावें कीं, काय अशा विचारांत असतांच सुरापुरच्या संस्थानिकानें रामचंद्र अप्पास खंडणी देऊन समेटाचें बोलणें लाविल्याचो बातमी भाऊंना समजली. सुरापुरचें काम याप्रमाणें निकालांत निघाल्यावर भाऊ करवीरावर चालून येणार अशी बातमी पसरली होती. परंतु तसें न करतां भाऊ १७९८ च्या नोव्हेंबरच्या २८ तारखेस गलगल्याजवळ कृष्णा नदी उतरले, व दुसरे दिवशीं घटप्रभा पार होऊन कनकगिरी व अनागोंदीचा रोख धरून चालूं लागले. भाऊंनीं नवीन फौज चाकरीस ठेविण्याचा उपक्रम एक सारखा चालूच ठेविला होता. यामुळें त्यांच्याजवळ यावेळीं २५ हजार स्वार शिवाय गाडदी व तोफखाना असा सरंजाम जमला होता. या फौजेच्या भाऊंनीं ३ टोळचा केल्या होत्या. पहिली टोळी ७–८ हजारांची असून तिच्याबरोबर रामचंद्र अप्पा अघाडीस चालत. त्यांच्यामागून ३--४ कोसांच्या अन्तरानें दुसरी टोळी चाले. तींत भाऊंचे तृतीय पुत्र महादेवराव दाजी हे मुख्य सरदार होते. या टोळीच्या मागून ४ कोसांच्या अन्तरानें खुद्द परशुरामभाऊ चालत. त्यांच्याजवळ बाजारबुणगे व तोफखाना वगैरे सरंजाम असे.

परशुरामभाऊ कृष्णा उतरून कर्नाटकांत उतरल्यावर त्यांचें पतिस्पर्धी करवीरकर हे काय करीत होते हेहि पाहिलें पाहिजे. करवीरकरांनीं रत्नाकरपंत राजाज्ञा यास कर्नाटकांत पाठवून सावनूर प्रांत जिंकण्याची

कामगिरी त्यांस सांगितली होती. पण पेशवे सरकारमार्फत धोंडोपंत गोखले हे तिकडे जाऊन त्यांनीं रत्नाकरपंत राजाज्ञा यांना कर्नाटकांतून हुसकून लाविलें. याप्रमाणें रत्नाकरपंत राजाज्ञा यांचा फडशा उडाल्यानंतर करवीरकरांनीं सावनूरचा नाद सोडून दिला व परशुरामभाऊ कर्नाटकांत गेल्याचें समजतांच पटवर्धनांच्या मुलुखाची लुटालूट करण्यास आरंभ केला.

परशुरामभाऊ मोठ्या फौजेसह कर्नाटकांत गेले ही गोष्ट पेशवे व नाना या दोघांसहि पसंत पडली नाहीं. भाऊंनीं मोठी फौज ठेऊन विना-कारण खर्च वाढविला ही गोष्टही नानांस पसंत पडली नाहीं. करवीरक-रांशीं सामना देण्याकरितां भाऊंनी एवढी मोठी फौज कदाचित् ठेविली असली तरी करवीरकरांचें व पटवर्धनाचें भांडण लढाईच्या पल्ल्यावर न नेतां सामोपचारानेंच मिटवावें असें नानाचें म्हणणें होतें. आणि करवीरकर नानांच्या सूत्रांत असल्यामुळें हें भांडण तडजोडीनें मिटेल अशी नानांची खात्री होती. शिवाय परशुरामभाऊंचें सरकारांत काम लागलें तर तें लांब गेल्यामुळें त्यांना वेळेवर येतांहि येणार नाहीं असें नानाला वाटत होतें.

श्रीमंत बाजीराव साहेबांचा पशुरामभाऊंवर राग निराळ्याच कार-णामुळें होता. नाना व भाऊ यांचें आपसांत वांकडें होतें. ही गोष्ट श्रीमं-तांच्या पथ्यावर होती. पण त्या दोघांचा पूर्ववत् स्नेहसंबंध झाल्यामुळें आपली आतां धडगत नाहीं. असें श्रीमंतांना वाटत होतें अशा स्थितींत परशुरामभाऊंना पुन्हां जरबेत आणतां आले तर पहावें असें श्रीमंतांनीं ठरविलें. पर्शरामभाऊंची सुटका साताऱ्च्या कामगिरीकरितां रास्त्यांमार्फत झाली होती. पण आतां सरकारच्या परवानगीशिवाय भाऊ मोठ्या फौजेसह कर्नाटकांत गेले. हेंच निमित्त करून श्रीमंतांनीं रास्त्यांना जाब विचारला कीं, भाऊंची सुटका फक्त साताऱ्च्या कामगिरीपुरतीच झाली होती. ते अजून कैदीच आहेत. अशा स्थितींत ते सरकार हुकुमाखेरीज कर्नाटकांत उतरले. तरी तुम्ही भाऊंना जामीन असल्यामुळें त्यांना तात्काळ आणून हजर करा. श्रीमंतांनीं रास्त्यांना अशी तंबी दिली तेव्हां रास्त्यांनीं परशुराम-भाऊसारख्या माणसाला पुन्हां कैदेंत घालूं नये म्हणून श्रीमंतांची हरतऱ्हेनें

विनवणी केली. पण श्रीमंत कांहीं केल्या ऐकेनात तेव्हां रास्त्यांनीं शेवटीं निरुपाय म्हणून श्रीमंतांस सांगितलें कीं, परशुरामभाऊ फौजबंद सरदार आहेत. त्यांस आणून श्रीमंतांपुढें हजर करण्याचें सामर्थ्य आमच्यामध्यें नाहीं. श्रीमंताच्या इच्छेस येईल. तें आमचें अगर परशुरामभाऊंचें पारिपत्य श्रीमंतांनीं खुशाल करावें. रास्त्यांकडून असा जबाब येतांच तोडानें वाचाळ पण कृतीनें दुर्बळ असे श्रीमंत बाजीराव साहेब एकदम थंड पडले. शेवटीं श्रीमंत व भाऊ यांच्या मधला हा तंटा तडजोडीनें मिटविण्याची कामगिरी नानांनीं आपल्या अंगावर घेतली.

नानाच्या मध्यस्तीनें परशुरामभाऊंनीं सरकारांत दंड भरून आपली मुक्तता करून घ्यावी व रास्त्यांची जामीनगत मोकळी करावी ह्या मुद्यावर वाटाघाटी होऊं लागल्या श्रीमंत, दंडाची रक्कम भरमसाट मागूं लागले. तीसचाळीस लक्षपर्यंत भाऊंनीं दंड भरावा असें श्रीमंतांचें म्हणणें होतें. पण एवढी रक्कम परशुरामभाऊकडून वसूल होणें शक्य नाहीं अशी श्रीमंतांची रास्ते व नाना यांनीं खात्री केल्यावर श्रीमंत पंधरा लक्षापर्यंत खालीं उतरले. पण पटवर्धन दहा लक्षांवर देण्यास तयार नव्हते. तेव्हां पुन्हां वाटाघाटी होऊन नानाच्या मध्यस्तीनें चौदा लक्ष ठरले, व तेही दहा लक्ष रोख देऊन बाकांच्या चार लक्षांची फेड भाऊंना कामगिरी सांगून करून घ्यावी असें नानांच्या मध्यस्तीनें ठरलें.

श्रीमंत पेशवे व परशुरामभाऊ यामधील तेढ अशा रीतीनें मिटल्यावर श्रीमंतांनी भाऊंच्या सरंजामाची जप्ती केली होती ती उठवावी असें ठरलें व त्याप्रमाणें श्रीमंतांनी भाऊंस सरंजामाची वस्त्रें व बहुमान देण्याकरितां कृष्णाजीपंत ढेकणे या गृहस्थांस भाऊंच्या लष्करांत पाठविलें भाऊंचा मुक्काम दोदवाडानजीक आला असतां ढेकणे लष्करांत येऊन पोहोंचले. व त्यांनीं ता. १८ फेब्रुआरी सन १७९९ रोजीं मोठ्या समारंभानें सरंजामाची वस्त्रें

मोत्याची कंठी व तुरा भाऊंस अर्पण केला. याच वेळीं भाऊंच्या चौथा पुत्रांस सरकारांतून वस्त्रें व शिरपेंच देण्यांत आले ✽

परशुराम भाऊ संबंधानें रास्त्यांची रदबदली, श्रीमंतांचा दुराग्रह आणि नानांची मध्यस्ती वगैरे प्रकार पुण्यास दोन तीन महिने चालले होते. या अवधींत भाऊंनीं मात्र आपली मुलुखगिरीची कामगिरी निर्धास्तपणें चालू ठेविली होती. गजेंद्रगड, येलबर्गं वगैरे ठिकाणीं भाऊंनीं खंडण्या वसूल केल्या व नंतर दहा हजार फौजा बरोबर घेऊन भाऊनीं आपले पुत्र रामचंद्रअप्पा व महादेवराव दाजी यांना सावनुराकडे पाठविलें सावनुरांत कांहीं ठाणीं करवीरकरांनीं वसविलीं होती तीं उठवून तेथें आपला अंमल बसविण्याचें काम या फौजेकडे सोंपविलें होतें. हें काम चालू असतांना भाऊ हळुहळु मजली करीत गदगच्या मार्गानें फेब्रुवारींत दोदवाडपर्यंत पोंचले होते. याच ठिकाणीं वर सांगितल्याप्रमाणें त्यांना श्रीमंतांकडून सरंजामाचीं वत्रें मिळालीं.

परशुरामभाऊ कर्नाटकांत मुलुख-गिरीवर गेल्यामुळें इकडे करवीरकरांस मोकळें रान सांपडलें. करवीरकरांनीं पेशवे व पटवर्धन यांच्या मुलखाची जाळपोळ केली आणि रयतेस त्राही त्राही करून सोडलें. करवीरकरांनीं अशा प्रकारची दांडगाई चालविल्यामुळें पुढें मागें पटवर्धन व करवीरकर यांचा लढाईचा प्रसंग येणार हें निश्चित होतें. पण नाना व बाजीराव या दोघांच्याहि मनांतून हा तंटा लढाईवर जाऊं नये असें होतें. करवीकर अशा प्रकारच्या तडजोडीला तयारच होते कारण त्यांची धामधूम परशुरामभाऊ लांब कर्नाटकांत गेल्यामुळेंच चालू होती. तेव्हां भाऊंच्या गैरहजिरींत त्यांच्या मुलुखाची जाळपोळ करावी व मग तंटा तडजोड करून नानाच्या मध्यस्थीनें मिटवावा असें करवीरकरांचें मतलबी धोरण होतें.

---

✽( **टीप**:– परशुराम भाऊंना ढेकणें या गृहस्थामार्फत वस्त्रें देण्याच्या या समारंभासंबंधानें खरे. ले. संग्रहांत भाग ११ पत्र नं. ४६१०, ४६९२, ४६९५, ४७३१, आणि ४७३९ या पत्रांतून सविस्तर माहिती आहे.)

या प्रकरणासंबंधानें करवीरकर व पुणें दरबार यांच्यामध्यें वाटाघाटी होऊन तह ठरला या तहाप्रमाणें करवीरकरांनीं पेशवे सरकारचीं सर्व ठाणीं सोडावीं. आणि त्यांबद्दल मोबदला म्हणून पेशव्यांनीं चिकोडी व मनोळी हे दोन तालुके करवीरकरांस द्यावे व सरंजाम म्हणून तीन लक्षाचा मुलुख द्यावा असें ठरलें. या सरंजामाच्या उत्पन्नांतून करवीरकर महाराजांनीं फौज चाकरीस ठेऊन "हुजूर चाकरी" म्हणजे पेशव्यांची चाकरी करावी असें ठरलें.*

श्रीमंत बाजीराव साहेब व करवीरकर यांनीं आपसांत जो तह केला तो पटवर्धनास अर्थातच मान्य नव्हता. परशुरामभाऊसंबंधानें श्रीमंताचें मत चांगलें नसल्यामुळें हा तह करतांना पटवर्धनांच्या नफा नुकसानीचा विचार या तहांत मुळींच झाला नव्हता. उलट पटवर्धनांचे म्हणणें असें होतें कीं करवीरकरांनीं आमचें घर जाळलें, मुलूख मारिला ऐवज घेतला. अशा स्थितींत करवीरकरांचें यथास्थित पारिपत्य करण्याकरितां श्रीमंतांनीं आम्हांस मदत करावी पण पटवर्धनाच्या या म्हणण्याकडे दुर्लक्ष करून श्रीमंतांनीं तह ठरविला तो अर्थातच पटवर्धनांस अमान्य होता. अशा रीतीनें पटवर्धन व करवीरकर यांची चुरस वाढतच गेली. व पुढेंमागें परशुराम-

*(टीपः— करवीरकर हे छत्रपती असल्यामुळें त्यांचा दर्जा स्वाभाविकच पेशव्यापेक्षां मोठा होता. पण पेशव्यांकडून तीन लक्षांचा सरंजाम मिळतांच त्या उत्पन्नांतून फौज ठेऊन करवीरकरांनीं पेशव्यांची चाकरी करण्याचें कबूल केलें. ही हकीगत नानांनीं ऐकल्यावर करवीरकरांच्या वकिलांचा नानांनीं धिक्कार केला. ह्या बाबतींत खरे ले. संग्रहांत खालीलप्रमाणें माहिती आहे. " लेखकाकडे ( नानाकडे ) जावयाचें, त्यास तें बोलणें शंकर जोशी याचे विद्यमानें आहे. तेथें वकील गेले होते. सरकारचा करार मदार ठरला. तो त्यास सांगितला. शंकर जोशी यासी नाना बोलले जे " तुम्हांकड ( करवीरकरांकडे ) यांनीं ( पेशव्यांनीं ) चाकरी करावी तें राहिलें आणि तुम्ही हुजूरची ( पेशव्याची ) चाकरी करावी हे काय कबूल केलें ? " ( खरे ११-४६३२ )

भाऊंची करवीरकरावर मोहीम होण्याचा संभव कायमच राहिला. या प्रकरणांत श्रीमंतांनीं पटवर्धनाकडे दुर्लक्ष केलें तरी नाना व भाऊ यांचा आतां स्नेह झाल्यामुळें नानांनीं तरी पटवर्धनांच्या योग्य तक्रारींकडे लक्ष देणें जरूर होतें. पण नाना महाडच्या कारस्थानांत करवीरकरांच्या शद्वाला गुंतल्यामुळें नानाचें या बाबतींतले धोरण करवीरकर व परशुरामभाऊ या दोघांनाहि संतुष्ट करण्याचें होतें. करवीरकरावरच्या लहान मोहिमेंत तुम्ही पडूं नका टिपूवरच्या मोठ्या मोहिमेवरची कामगिरी तुम्हांला सांगतों व सरकारांत भरावयाच्या चौदा लाख दंडाची रक्कम या मोहिमेंत वजा घाला म्हणजे प्रत्यक्ष दंड भरण्याच्या अडचणींतून मुक्त व्हाल, असें नाना भाऊंना सूचवीत होते पण भाऊंना ही गोष्ट मान्य झाली नाहीं.*

श्रीमंत बाजीराव साहेब व नाना या दोघांच्या मनांतून करवीरकर व पटवर्धन यांचा तंटा विकोपास जाऊ देऊं नये असें होतें. पण श्रीमंतांनीं करवीरकरांशीं केलेला तह व नानानें त्या तहासंबंधानें स्वीकारलेलें तटस्थतेंचें धोरण यामुळें करवीरकर व परशुरामभाऊ यांचो चुरस वाढतच गेली. परशुरामभाऊ कर्नाटकांत कनकगिरी, कोपळ, गजेंद्रगड वगैरे भागांत फिरत

---

*(टीप:— दोन परस्पर विरुद्ध पक्षांना संतुष्ट करण्याचें काम शहाण्या माणसालाहि नेहमीं साधतेंच असें नाहीं. हाच प्रकार नानांच्याहि बाबतींत या वेळीं झाला. नानांच्या या धोरणानें पटवर्धन असंतुष्ट झाल्यामुळें त्यांच्या एका कारकुनानें नानाविषयीं खालीलप्रमाणें लिहिलें आहे. "मुख्य गोष्ट श्री. रा. नानांचे बोलणें कोणतें समयीं कसें होईल याचा भरवंसा धरावयाचा नाहीं. सारा दिवस बोलत असतां दस्तऐवज बोलण्यांत सांपडावयाचा नाहीं. या चाली बोलावयाच्या आहेत. काम लागलें असतां साखरेपेक्षां गोड बोलण्यास उशीर नाहीं. काम जाहलेनंतर त्या गांवचे देखील नव्हता. येथील विचार असा आहे" (खरे ११–४६९७) कैलासवासी खरे शास्त्री नानांच्या या स्वभाव वर्णनासंबंधानें लिहितात. "हे वर्णन नानांसच काय पण स्वतःच मुत्सद्दी समजणाऱ्या प्रत्येकास लागू पडणारें आहे.)

होते तोंपर्यंत त्यांच्या तोंडावर चाळीस पन्नास कोसांचें अंतर ठेऊन मनोळीच्या बारीवर करवीरचे महाराज आपल्या मुख्य फौजेचा तळ देऊन बसले होते, आणि या ठिकाणापासून बारी अलिकडचा गोकाक, तेरदाळ, शहापूर वगैरे प्रांत निर्धास्तपणानें लुटीत होते. पण येलबर्ग्याची खंडणी उरकल्यावर परशुरामभाऊ परत फिरल्याचें पहातांच करवीरकर मनोळीची बारी सोडून मुधोळ, जमखिंडीकडे आले, व तेथून अथणी विजापूर पर्यंत रास्ते व प्रतिनिधी वगैरेंच्या जहागिरी लुटीत चालले. याच वेळीं मराठी राज्यांत जिकडे संधी मिळेल तिकडे जाळपोळ लुटालूट करीत हिंडणाऱ्या शिंदेबाया करवीरकराच्या लष्करासमीप आल्या. या बायांना मिळवून घेऊन उभयतांनीं मिळून पटवर्धनी मुलुखाचा फडशा पाडावा असा करवीरकरांचा बेत होता पण करवीरकरांचा हा कावा ओळखून आगाऊच मिरजेचे बाळासाहेब व परशुरामभाऊ यांनीं आपले कारकून बायांकडे पाठवून त्यांना आपल्याकडे मिळवून घेण्याचा प्रयत्न चालविला होता. *

---

* ( टीपः—शिंदेबाया व परशुरामभाऊ यांच्या ज्या वाटाघाटी चालल्या होत्या त्या संबंधानें इंग्रजांचा पुणें दरभारचा वकील पामर यानें खालील प्रमाणें लिहीलें आहे. " It is reported and with circumstances of probalitility that the Bhayas ( शिंदेबाया ) have engaged Parashuram Bhau in their cause and intend to repair with united force to Poona. This transaction is said to be combined with the recall of Balloba Tatia and to threatan the ruin of the Peshwaa and the minister not-with-standing that Parashuram Bhau has lately been reconciled to both under solemn engagements ". ( P. R. C. 6-225, 230. ) इंग्रजांचा वकील पामर यानें लिहिलेली ही हकीगत अतिशयोक्तिची दिसते. भाऊंनीं बायांना मिळवून घेण्याचा केलेला प्रयत्न करवीरकरांस शह देण्याकरितांच होता. पाम-§

शिंदे बायांनीं करवीरकरांकडे जाऊं नये म्हणून पटवर्धनांनीं पुष्कळ प्रयत्न केले. पण शेवटीं तो सर्व फुकट जाऊन एक आगांतुक निमित्त करून बाया करवीरकरांकडेच गेल्या. करवीरकर महाराजांची भेट घेण्यास बायांस एक चांगलेंच निमित्त सांपडलें करवीरकर महाराजांचा लेकावळा मुराररराव शिंदे व महादजी शिंद्याच्या राखेची मुलगी यांचे लग्न ठरलें होतें. बाया अनायासें इतक्या जवळ आल्यामुळें तें लग्न याचवेळीं उरकून घ्यावें असें महाराजांनीं बायांना कळविलें बायांनी ही गोष्ट मान्य करून पटवर्धनांच्या आग्रहाकडे लक्ष न देतां करवीरकरांकडेच जाण्याचें ठरविलें. व त्याप्रमाणें आपल्या फौजफाटयासह त्या महाराजांकडे जाण्यास निघाल्या.

लग्नाचें निमित्त करून बाया करवीरकरांकडे गेल्या व लग्नही पार पडलें. लग्न उरकल्यावर करवीरच्या महाराजांनीं हळूहळू बायांजवळ असें बोलणें लाविलें कीं तुम्ही आम्ही मिळून परशुरामभाऊवर चाल करून जाऊन त्यांचा मुलूख लुटावा हें बोलणें मात्र बायांना पसंत पडेना बायांचें म्हणणें असें पडलें कीं तुम्हीं परशुरामभाऊंचे शत्रु असलां तरी भाऊ व आम्ही सरकारचे चाकर. तेव्हां त्यांच्याशी भांडण उत्पन्न करणें आमच्यानें होणार नाहीं. करवीरकरांनीं बायांना खर्चाकरितां एक लाख रुपये दिले होते. त्यांत हेतु असा होता कीं बाया परशुरामभाऊ विरुद्ध आपणांस सामील होतील. पण तो रंग कांहींच दिसेना. तेव्हां करवीरचे महाराज थोडे नाखुषच झाले. व त्यांनीं बायांशीं पुन्हां असें बोलणें लाविलें कीं निदान तुम्ही मध्यस्ती करून आमचा व भाऊंचा समेट तरी करून द्या करवीरकरांच्या या बोलण्याचा मात्र विचार करण्याचें बायांचे

---

§ रनें लिहिल्याप्रमाणें पेशवे व नाना यांचा नाश करण्याकरितां नव्हता. भाऊंचा हा प्रयत्न साधला नाहीं व बाया पटवर्धनांकडे न येतां करवीरकरांकडेच गेल्या हें पुढें दिसून येईलच. पण ह्यावरून भाऊ व बाया यां मधल्या वाटाघाटी करवीरकरांकडे जावयाचें कीं पटवर्धनांकडे जावयाचें या पुरत्याच होत्या. पेशवे व नाना यांचा नाश करण्याकरितां नव्हत्या हें स्पष्ट आहे. )

कारभारी बक्षी यांनीं आश्वासन दिलें. अशारीतीनें बायांनी जरी करवीर-करांस भाऊविरूद्ध मदत करण्याचें कबूल केलें नाहीं तरी बाया व करवीर-कर यांची फौज एकत्र जमून तिचे मुक्काम मिरजेच्या आसपास होऊं लागले. हें पाहून पटवर्धनांस आपल्या मुलखाची काळजी उत्पन्न झाली. मिरजेच्या बाळासाहेबांनीं रघुनाथराव कुरूंदवाडकर यांस मदतीस बोलाविलें, व त्यांची व आपली मिळून सुमारें चार पांच हजार फौज मिरजेजवळ तयार ठेविली. तथापि एवढ्या फौजेवर मिरजेचें रक्षण होईल असें त्यांस वाटत नव्हतें. म्हणून त्यांनी परशुरामभाऊस तत्काळ पत्रें लिहून मिरजेच्या आसपास येण्यास कळविलें. बाळासाहेबांनीं नाना फडणवीस यांसहि ही हकीकत कळविली व या संकटाचें निवारण करण्याकरितां पेशवे सरकारांतूनहि मदत मागितली. नानांनीं भाऊंच्या मुलखावर आलेल्या ह्या संकटाचें निवारण करण्याकरितां अनेक सरदारांस पत्रें लिहीलीं. शिंदे, निजामअल्ली, रास्ते, विंचुरकर प्रतिनिधी वगैरे सर्वांस नानानीं पत्रें लिहीलीं. इतक्या सर्वांनीं आपापली फौज पटवर्धनांच्या मदतीस पाठविली असती तर परशुराम भाऊंच्या मदतीस सुमारें पन्नास हजार फौज जमली असती. मग कुठच्या बाया आणि कुठचे बाबा! सर्व दंगेखोरांचा चुराडा झाला असतां पण नानाचा हा सर्व कागदी पत्रव्यवहार जागच्या जागीं राहिला, आणि वेळेवर कोणी हजर झाला नाहीं. याचें कारण सन १७९५ मधले नाना, आणि सन १७९९ मधले नाना, यांच्या अधिकारांत जमीन अस्मानाचें अन्तर पडलें होतें. तात्पर्य पटवर्धनांना इतर सरदारांकडून मदत होण्याचा संभव फारच कमी होता. पटवर्धनांवरील करवीरकरांचें हें संकट निवारण्याचें सामर्थ्य फक्त पर-शुराम भाऊंच्या लष्करांतच होतें. आणि बाळासाहेबांनीं भाऊंस वारंवार पत्रें लिहून मिरजेकडे येण्यास लिहीलेंहि होतें. पण भाऊचें लष्कर लांब होतें, आणि म्हणून तें तरी वेळेवर येतें कीं नाहीं ही शंकाच होती तरी भाऊंच्या लष्कराला मिरजेकडे लवकर येण्याला काय अडचणी होत्या हे पाहिलें पाहिजे.

सन १७९९ च्या फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीपर्यंत परशुरामभाऊ कर्नाटकांत दोदवाड मुक्कामी होतें. तेथें असतानांच मिरजेच्या बाळासाहेबांची मिरजेस निघून येण्यासंबंधी भाऊंस पत्रें येऊं लागलीं. हीं पत्रें येतांच कर्नाटकची मुलुखगिरी तहकूब करून भाऊंनीं मार्च महिन्याच्या आरंभीं परत फिरण्याचें ठरविलें. परत येतांना मिश्रीकोट व बेटगिरें येथें भाऊंनीं ठाणीं बसविलीं; आणि तेथून ते एकोडीच्या मुक्कामास आले. या ठिकाणीं भाऊंची प्रकृति नादुरूस्त झाली. त्यामुळें भाऊंचे मुक्काम फार मंदगतीनें होऊं लागले. कर्नाटकाचा उष्णकाळ त्यांस सहन झाला नाहीं. शिवाय पैशाचा तुटवडाहि त्यांस जाणवत होता. सरकारांत भरावयाचा दंड भाऊंस द्यावयाचा होता. तो वसूल करण्याकरितां रास्त्यांचे करभारी भाऊंच्या लष्करांत आले होते. फौजेच्या शिपायांचेंहि देणें तुंबलें होतें. अशा अनेक अडचणी मुळें भाऊंचे मुक्काम फार मंद गतीनें होऊं लागले. भाऊ अशारितीनें अनेक अडचणींत असतां त्यांचा थोडा काळ एकोडीजवळच असलेल्या मुरगोड या गांवीं एका साधूच्या समागमांत गेला. हे साधु चिदंबर दिक्षित या नावानें प्रसिद्ध होते. भाऊ मुरगोडास जाऊन त्यांनीं चिदंबर दिक्षितांचें दर्शन घेतलें. व तेथें ते पांच सहा मुक्काम राहिले. दिक्षितबाबांच्या समागमांतला हा काळ भाऊंना अत्यन्त सुखाचा गेला. बाबांचा निरोप घेऊन भाऊ कित्तूर येथें मुक्कामास आले. आणि सावनुराकडून रामचंद्रअप्पा फौजेसह येऊन भाऊंस मिळावयाचें होते, त्याची वाट पहात तेथेंच राहिले.

कित्तूरच्या मुक्कामीं असतां धोंडोपंत गोखले आपल्या फौजेसह भाऊंच्या भेटीस आले. नानांनीं अनेक सरदारांस पत्रें लिहून भाऊंस मदत करण्याकरितां कळविलें होतें. त्याप्रमाणें फक्त हे धोंडोपंत गोखलेच काय ते भाऊंच्या मदतीस आले. भाऊंनीं धोंडोपंतास शिरपेंच कंठी व वस्त्रें देऊन त्यांचा गौरव केला. शिंदेबाया व करवीरकर यांनीं भाऊवर चढाई केल्यास भाऊंच्या मदतीकरतां म्हणून हे धोंडोपंत आले होते. पण तो युद्धप्रसंग तूर्तच प्राप्त नसल्यामुळें करवीरकरांकडून सौंदत्तीचें ठाणें घेण्याची कामगिरी भाऊंनीं धोंडोपंतास सांगितली. गोखल्यानीं तें ठाणें काबीज

केलें, तों शिंदेबाया पुण्याकडे गेल्याचें समजलें. त्यामुळें गोखले पुन्हां भाऊंच्या लष्कराकडे न येतां गदग नवलगुंदाकडे निघून गेले. कित्तुर मुक्कामीं सावनुराकडून येणाऱ्या रामचंद्र अप्पाची वाट पहात भाऊ थांबले होतें हें पूर्वी सांगितलेंच आहे. सावनुर प्रांतांतील सर्व ठाणीं घेतल्यावर रामचंद्रअप्पा हुबळीस आले. हुबळीचें ठाणें भाऊंच्या स्वाधीन करावें असा श्रीमंतांचा हुकूम धारवाडच्या सरसुभ्यास झाला होता. परन्तु धारवाडचा सरसुभा हुबळी रामचंद्रअप्पांच्या स्वाधीन करीना. अशा स्थितींत हुबळी लढून घेण्याच्या भरीस पडावें तर वेळ बराच मोडणार; आणि मिरजेकडे तर तांतडीनें जाणें जरूर होतें. म्हणून हुबळीचा नाद सोडून देऊन रामचंद्रअप्पा एप्रिलच्या दहाव्या तारखेस भाऊंच्या लष्करास येऊन मिळाले. रामचंद्र अप्पा येऊन मिळतांच भाऊंनीं कित्तुराहून आपला मुक्काम हालविला. व ते गोकाकच्या मार्गें चालूं लागलें. गोकाक लढून घेण्याचा भाऊंचा निश्चय मात्र कायम होता. भाऊ गोकाकच्या मार्गें निघाल्यावर त्यांनीं लवकरच गोकाकची बारी गांठली व तेथें तळ देऊन त्यांनीं आपले पुत्र रामचंदअप्पा व माधवराव दाजी यांस पुढें पाठविलें. रामचंद्र अप्पांनीं ता. २४ एप्रिल १७९९ रोजीं गोकाकेस जाऊन तेथें मोर्चे लाविले. व गोकाकेवर एकदम तोफांचा मारा सुरू केला. अशा प्रकारें गोकाकेस बसलेला भाऊंच्या फौजेचा वेढा उठवावा आणि भाऊंची फौज बारीपार हुसकून लावावी अशी खटपट करवीरचे महाराज करीत होते. आणि या कामांत आपल्याला शिंदेबायांची मदत होईल अशी त्यांची अपेक्षा होती. पण शिंदेबायांचें प्रकरण डोईजड झाल्यामुळें दौलतराव शिंद्यांनें बाळोबा तात्यांची कैदेंतून सुटका करून त्यांच्या मार्फत बायांचें प्रकरण मिटतें घेण्याचा उद्योग चालविला होता. बायाहि बाळोबा तात्याच्या सल्याप्रमाणें वागण्यास तयार झाल्यामुळें त्यांना आतां करवीरकरांचें कांहीं महत्व वाटत नव्हतें. बाळोबा तात्याच्या भरंवशावर बायांनीं पुण्याकडे जाण्याचें ठरविल्यावर त्यांच्या मदतीची करवीरकरांची अपेक्षा निष्फळच ठरली. शेवटीं गोकाकेवर चार दिवस सारखा तोफांचा भडिमार झाल्यामुळें ता. २९

मराठी ग्रंथ संग्रहालय नों. क्र.

एप्रिल रोजीं तें ठाणें रामचंद्रपंतांच्या हातीं आलें. गोकाक हातीं आल्यावर पुढच्या पंधरावीस दिवसांत भाऊंच्या फौजेनें कोटबागी, हुकेरी, घोडगिरी, यमकणमुर्डी वगैरे ठाणीं घेतलीं आणि मेच्या २५ तारखेस बागेवाडीस मोर्चे बसविले. याचवेळीं भाऊंच्या फौजेपैकीं २०० स्वारांची एक टोळी चिकोडी-कडे तलाव्यास गेली होती. ती करवीरकरांच्या झपाटयांत सांपडून तिचा विध्वंस झाला व त्या टोळींतले विष्णुपंत पटवर्धन यादवाडकर हे जखमा लागून शत्रूकडे पाडाव सांपडले. अशी हकिगत झाल्यामुळें रामचंद्रअप्पानीं चिकोडीवर हल्ला करून चिकोडीची पेठ जाळून टाकिली. इकडे बागे-वाडीवर मारगिरी चालूच होती. त्या ठिकाणावर जोराचा मारा झाल्या-मुळें बागेवाडीचें ठिकाण मेच्या ३० तारखेस काबीज झालें. बागेवाडीचें ठाणें काबीज झाल्याचें पाहतांच चिकोडीकर दुसऱ्याच दिवशीं भयग्रस्त होऊन ठाणें टाकून पळाले. अशा रीतीनें चिकोडीचें महत्वाचें ठाणेंही फार प्रयत्न न करितां परशुरामभाऊंच्या हातीं आलें.

सन १७९९ च्या मे महिन्याच्या अखेरीपर्यन्त परशुरामभाऊंच्या युद्धनीतीचा सारखा उत्कर्ष होत गेला. प्रत्येक ठिकाणीं त्यांना यशच येत गेलें. पण या अवधींत त्यांच्या शरिरावर मात्र फार परिणाम झाला. एप्रिल व मे महिन्यांतल्या युद्धाच्या हालचाली व ठाणीं घेण्याचा धूमधडाका जसा जोरानें सुरू होता त्याच वेगानें त्यांचे शरीरहि खालावत चाललें होतें. त्यांची प्रकृति फार नाजूक आणि क्षीण झाली होती. आणि उत्तम वैद्यांनीं उपचार केले असतांहि प्रकृति सुधारत नाहीं असें पाहून सर्वांना असें वाटूं लागलें कीं भाऊंची व्याधी शरीरगत नसून ही परकृत पीडा आहे. म्हणजे कोणा शत्रूनें त्यांजवर जारण--मारणाचा प्रयोग केला आहे. *

---

* टीप— परशुरामभाऊच्या आजारासंबंधें खरे ले. संग्रह भाग ११ मध्यें अनेक पत्रें छापलीं आहेत. त्या सर्वांवरून भाऊंचा रोग हा शरीरगत नसून परकृत आहे अशी त्या वेळच्या सर्व लोकांची समजूत झाली होती असें दिसतें. भाऊंचे पुत्र रामचंद्रअप्पा यांचाहि समज तसाच होता. ते एका पत्रांत लिहीतात " वडिलांची प्रकृति बहुत क्षीण झाली आहे. पंडितरायांचा

परशुरामभाऊ कर्नाटकात मुलूखगिरीवर असतांना इंग्रज व टिपू यांचा बेबनाव उत्पन्न झाला होता. टिपूशीं लढाईचा प्रसंग इंग्रज, मराठे व निजाम या तिघांपैकीं कोणालाही प्राप्त झाल्यास इतर दोघांनीं त्याला मदत करावी असे टिपूशीं झालेल्या सन १७९२ च्या लढाईतील तहांत ठरलें होतें. या तहांप्रमाणें इंग्रजांनीं निजाम व मराठे यांजकडे मदत मागितली निजामानें मदत तात्काळ दिली. पण मराठेशाहीचीं सूत्रें आतां बाजीराव साहेबांच्या हातीं आल्यामुळें टिपू विरुद्ध इंग्रजांस मदत करण्याच्या बाबतींत सारखी वाटाघाट चालू होती. तहाप्रमाणें इंग्रजांस मदत द्यावी असें नानाचें

---

(औषधी) उपाय चालला आहे. दिक्षीत बावांचा आशिर्वाद, आरोग्य होईल. वडिलांचें सामर्थ्य अगदीं राहिलें. स्नानसंध्या निजूनच करतात. श्रीचें अर्चन मात्र सांग होतें. सारांश रोग नाहीं. परकृत पीडा आहे. (खरे ११–४८६१) भाऊंच्या रोगाचें निदान परकृत पीडा असें ठरल्यावर त्यावर उपाय ह्मणून दैवी उपचार सुरू झाले. या संबधानें माहिती देणारीं अनेक पत्रें खरे सग्रहांत आहेत जप, तप, मंत्र, तंत्र देवसेवा वगैरे उपाय जोरानें सुरू झाले. हें सर्व सुरू असतां भाऊंच्या बुध्दीला भ्रंश होणार असें दिसूं लागलें. या संबंधाची हकीकत एका पत्रांत खालीलप्रमाणें आहे. "श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांचा मुक्काम गच्ची कुरबेटावर होता. तेथून कुच करून छ २६ रोजीं गोकाकेचे मुक्कामांत आले. ते दिवशीं प्रदोष होता. मजलीस येतांच गंजिफा खेळत बसले. सायंकाळ जाहला तरी स्नानास उठेनात. खेळ पुरा होईना सर्वांनीं स्नानास उठावें, प्रदोष आहे ह्मणों लागले. तेव्हां उत्तर जाहलें जे अद्याप बारा घटका दिवस आहे. आतांच उठावयाचें नाहीं म्हणोन तसेच दोन तास रात्रपर्यंत खेळ जाहला. मग खेळ पुरा केला. तथापि स्नानास उठेनात मनास येईल तसें भाषण करूं लागले. प्रकृतीस कांहीं वायुचा विकार जाहलासा जाहला. तेव्हां तसेच चारी प्रहर रात्र उपवासी. सर्वांसहि उपोषण जाहलें. दुसरे दिवशीं प्रात:काळीं स्नान करून भोजन केलें आणि निजले ते तिसरे प्रहरपर्यंत निजले. जवळ श्रीमंत राजश्री आपासाहेब व बाबासाहेब नेहमी एकजण असतात. जवळ दाटी होऊं देत नाहींत. याप्रमाणें भ्रांत पडली आहे. प्रयोग अथवा पित्तप्रकोप वायु असेल

ह्मणणें होतें. व त्या कामगिरीवर परशुरामभाऊंची नेमणूक करावी असा नानांचा आग्रह होता. पण बाजीराव साहेबांचा कोणताच निश्चय ठरेना. शिवाय त्यांची टिपूच्या वकिलाजवळ खलबतेंहि चालू होतीं अशा रीतीनें अनेक दिवस वाटाघाट होऊन शेवटीं परशुरामभाऊंचे पुत्र रामचंद्रआप्पा यांस इंग्रजांच्या मदतीस पाठवावें असें पुण्याच्या दरबारांत ठरलें. पण पेशव्यांचा हा सिध्दांत ठरेपर्यंत इंग्रज स्वस्थ बसले नव्हते त्यांनीं आपल्या व निजामाच्या बळावर या पूर्वींच टिपूवर चढाई सुरू केली होती. पूर्वींच्या अनुभवावरून टिपूवरील ही स्वारी सुमारें एक दोन वर्षें सहज चालेल,

---

असें दिसतें आठ दिवसांपासून प्रकृतीस भेद कांहीं पडला. परन्तु लौकीकांत आलें नाहीं. हल्लीं सर्वत्र प्रसिद्ध जाहलें. तेव्हां सेवेसीं लिहीलें आहे." ( खरे ११-४९२८ ) अशा तऱ्हेनें भाऊंच्या प्रकृतीस जे चढउतार होत होते त्यांत सुधारणा होऊन १५ जूनच्या सुमारास भाऊंची प्रकृति बरीच सुधारली. या संबंधानें मजकुर एका पत्रांत आहे तो खालीलप्रमाणें "सैन्याधिकारी (भाऊ)यांची तीन दिवस प्रकृति पाहिली त्यास बुधवारीं ओलें भस्मलेपन बहुत होतें. संध्याकाळचे भोजन तीन घटका दिवस, गुरवारी घटका दिवसास भोजन, भस्मधारण निम्मे, भृगुवारीं भस्मधारण पुर्ववत भोजन घटका रात्र, बोलणेंहि प्रथम दिवशीं एक जाबसाल पुसिला दुसरें दिवशीं दोन, तिसरे दिवशीं भृगुवारीं पांच जाबसाल पुसिले. सारांश बाबांचे कृपेकरून आठ चार दिवसांत प्रकृत यथास्थित होईल."( ११-४९९६) तात्पर्य भाऊंची प्रकृति बिघडली ती परकृत पीडा झाल्यामुळें बिघडली. व सुधारली ती चिदंबरबावा दिक्षितांच्या कृपेनें सुधारली अशी तत्कालीन लोकांची भावना होती हें वरील पत्रावरून दिसतें. या भाऊंच्या आजारासंबंधानें कै. खरेशास्त्री यांनीं असें लिहीलें आहे कीं भाऊंची प्रकृति कर्नाटकच्या उष्ण हवेमुळें बिघडली व जून महिन्यांत पावसाळा सुरू होतांच हवेंत थंडपणा आल्याबरोबर सुधारूं लागली. कारण या अवधींत स्वत: पर्शरामभाऊंनीं त्यांचे चुलतबंधु मिरजेचे बाळासाहेव यांना लिहिलेलीं जीं पत्रें आहेत त्यांत भ्रांतीचा लवलेशहि कोठें दिसून येत नाहीं.)

अशी मराठ्यांची समजूत होती. पण ती खोटी ठरली. इंग्रजांनीं आपल्या फौजेची तयारी चांगली केली होती व निजामाकडूनहि त्याना चांगली मदत मिळाली होती यामुळें मराठ्यांच्या मदतीची अपेक्षा न बाळगतां इंग्रज आपल्या पराक्रमावरच टिपूचें राज्य आक्रमीत चालले. टिपूनें जोराचा प्रतिकार केला तरी प्रत्येक लढाईंत त्याचा पराभव होऊन एप्रिल महिन्यांत इंग्रजांनीं श्रीरंगपट्टणास मोर्चे दिले. सतत एक महिना लढाई चालून ता.७मे सन १७९९ रोजीं इंग्रजांनीं हल्ला करून श्रीरंगपट्टण घेतलें. या लढाईंत टिपू मारिला गेला. व मुलेंमाणसेंसुद्धां त्याची सर्व दौलत इंग्रजांच्या हातास लागली. ही बातमी एका पत्रांत खालीलप्रमाणें लिहिली आहे. "इंग्रजांनीं पट्टणास मोर्चे बसविले होते. महिनाभर मोर्चे होते. नंतर छ १ जिल्हेजीं हल्ला करून पट्टण इंग्रजांनीं घेतलें. टिपू रणास आला. कुटुंबसह दौलत इंग्रजांचे घरास गेली." ( खरे ११-४९६९ ). टिपूचा अशा रीतीनें निकाल लागल्यामुळें इंग्रजांच्या मदतीस जाण्याचें आतां कांहीं कारणच उरलें नव्हतें. टिपू मारला गेल्यावर त्यानें कैदेंत ठेवलेल्या म्हैसुरच्या राजास इंग्रजांनीं मुक्त करून त्यास म्हैसुरप्रांत दिला. व बाकीचें टिपूचें राज्य इंग्रज व निजाम यांनीं वाटून घेतलें. अर्थातच मराठे वेळेवर हजर न झाल्यामुळें त्यांना या लढाईंत कांहींच मिळालें नाहीं. उलट इंग्रजांची दहशत मात्र त्यांना बसली. *

---

* ( टीप:— टिपूविरूद्ध इंग्रजांना मदत मराठ्यांनीं करावी या संबंधानें विस्तृत पत्र व्यवहार पुणें रेसिडेन्सी रेकॉर्डमध्यें प्रसिद्ध झाला आहे. P. R. C. खंड ६ मध्यें या विषयावर अनेक पत्रें आहेत. त्यांवरून असें दिसतें कीं नानाच्या मनांत इंग्रजांना मदत करण्याचें होतें पण बाजी-रावानेंच याकामीं टिपूकडून लांच खाऊन मदत करण्याचें प्रथम नाकारलें. नानाला न समजतां बाजीरावानें टिपूशीं पत्र व्यवहार सुरू ठेवला. व इंग्रजांना मदत न करितां बाजीरावानें तटस्थ रहावें. या कामगिरीबद्दल टिपूकडून बाजीरावानें १३ लक्ष रुपये घेतले. ( P. R. C. 6-238 ) नानांच्या मनांत परशुरामभाऊंना या कामगिरीवर पाठवावें असें होतें. [ P. R. C. 6-164 ] आणि इंग्रजांच्या मनांतहि परशुरामभाऊच

शिंद्यांचे कारभारी बाळोबातात्या यांची कैदेंतून सुटका झाली. या गोष्टीमुळें बाजीरावांचें मन फारच अस्वस्थ झालें होतें. बाळोबातात्या व परशुरामभाऊ यांची एकी झाल्यास आपल्या गादीला मोठेंच संकट येणार. अशा समजुतीनें भाऊंच्या गळयांत टिपूवरची कामगिरी अडकवून त्यांना तिकडेच वर्ष दोन वर्षें गुंतविण्याची युक्ती बाजीरावानें काढली होती. पण

---

आपल्या मदतीस यावे असें होतें. या संबंधानें इंग्रजांचा वकील पामर असें लिहितो कीं भाऊंचा टिपूविरुद्ध जाज्वल्य व्देष आहे. आणि तोच अनुभवी व पराक्रमी आहे. " The Bhau is an active and experienced offiicer bearing strong hatred against the Sultan " [ P. R. C 6–162 ] भाऊंना जरूर पाठवितों असें नाना इंग्रजांच्या वकिलाला सांगत होता. ( P. R. C. 6–207 ) पण बाजीरावाचा टिपूजवळील गुप्त पत्रव्यवहार इंग्रजांना समजला असल्यामुळें त्यांनीं मराठ्यांच्या मदतीची अपेक्षा न ठेवतां आपली टिपूविरुद्ध मोहीम सुरू केली होती. अशा रीतीनें वाटाघाटी सुरू असतां मध्यंतरीं शिंद्यांच्या कैदेंत असलेले बाळोबा तात्या यांची सुटका झाली. या सुटकेमुळें बाजीराव अतिशय घाबरून गेला. भाऊ व बाळोबा हे मित्र. तेव्हां ते एक झाल्यास आपल्याला जड जाईल या धास्तीनें टिपूकडून लाच खाल्लेला असूनसुद्धां बाजीरावानें परशुरामभाऊंना टिपूविरुद्ध पाठविण्यास मान्यता दिली व या कामीं भाऊंनीं घातलेल्या अनेक अटी मान्य करून शियाय त्यांनीं सरकारांत भरावयाचा १५ लक्ष दंडहि माफ केला. ( P. R. C. 6–249 ) इतकें झालें तरी कोल्हापूरकरांच्या उपद्रवामुळें टिपूवर आपल्याला जातां येईल कीं नाहीं या बद्दल भाऊंना शंकाच होती. ( P. R. C. 6–251 ) आपल्याला जातां न आलें तर भाऊंचे पुत्र रामचंद्रपंत यांनीं जावें असें ठरलें. पण हा ठराव होईपर्यंत सन १७९९ चा मे महिना अर्धा होऊन गेला, आणि इकडे इंग्रजांनीं आपल्या बळावर चालविलेल्या मोहिमेचा शेवट होऊन टिपू मारला गेला. व इंग्रजांनीं श्रीरंगपट्टण ता. ४ मे सन १७९९ रोजीं घेतलें. ( P. R. C. 6–254 ).

टिपूचा निकाल झटपटच लागल्यामुळें बाळोबा तात्या व भाऊ यांचा समेट होऊं देऊं नये अशा उद्योगास बाजीराव साहेब लागले. आतां हें काम करण्यास नानाशिवाय दुसऱ्या कोणाचाहि उपयोग होणार नाहीं हें जाणून बाजीरावानें नानाची मनधरणी करण्याचा सपाटा चालविला. पण नाना बाजीरावाला चांगलेच ओळखत असल्यामुळें बाजीरावाच्या मनधरणीचा फारसा उपयोग झाला नाहीं. उलट बाळोबा तात्याकडून मैत्रीचा संदर्भ नानाकडे आला त्याला मात्र नानानें तत्काल मान्यता दिली. फक्त नानांनीं बाळोबाला एकच अट घातली ती अशी कीं आपला व बाळोबाचा स्नेह व्हावयाचा तो परशुरामभाऊंच्या मध्यस्तीनें व्हावा आणि यापुढें राज्याच्या कल्याणाकरितां जें जें कांहीं करावें लागेल तें तिघांनीं एकविचारानें करावें. *

परशुरामभाऊंच्या मध्यस्थीनें नाना व बाळोबा यांचा स्नेह जमला. अशा रीतीनें नाना, भाऊ व बाळोबा या तीन थोर पुरुषांची एकी हें बाजीरावाला धुमकेतुप्रमाणें दुश्चिन्हच वाटत होतें. हे तीन मुत्सद्दी एक झाल्यावर

* ( टीपः—नानांनीं बाजीरावाला झिडकारलें आणि बाळोबा तात्याशीं स्नेह करण्यास तयारी दाखविली. ही हकीगत एका पत्रांत खालीलप्रमाणें आहे. " श्रीमंत राजश्री नानास विनंति केली कीं ' आपणास पुण्यास येऊन एक वर्ष होत आलें. श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांचे व श्रीमंत राजश्री रावसाहेब यांचें आपलें चित्त मिळालें किंवा मिलाफ राहिला आहे ' त्यावरून बोलिले कीं " यांचें आमचें चित्त या जन्मामध्यें मिळावयाचें नाहीं. लौकिकार्थ बहुता तऱ्हेनें गोड भाषण बोलतात परंतु चित्तांत भाव कुटील. रंगा मौजी बोलणी करतात. राजश्री बाळोबा तात्या आले. आपले त्यांचें कसें आहे. एक विचार आहे कीं त्यांचें चित्तांत प्रशस्त नाहीं." याप्रमाणें पुसिलें. नंतर उत्तर केलें कीं, त्यांचे बोलणें आम्हांकडे आलें होतें. जे, आजपर्यंत परस्परें ज्या गोष्टी झाल्या त्या उत्तम. या उपरी आपला स्नेह असावा. त्यावरून आम्हीहि सांगितलें कीं उत्तम आहे. तुमचा आमचा विचार एक व्हावा कोणीकोणास अंतर देऊं नये. परंतु हा विचार राजश्री परशुरामपंत भाऊ यांचे विद्यमानें व्हावा " ( खरे ११-५०४४ )

आपली गादी टिकेल कीं हे आपल्याला उडवून देऊन दुसऱ्या कोणाला गादीवर बसवितील या विषयीं बाजीरावाला मोठीच धास्ती उत्पन्न झाली. दौलतराव शिंद्याचा मात्र बाजीरावाला भरंवसा वाटत होता आणि त्याच्याच जोरावर तो दिवस कंठीत होता. टिपूची दौलत गारद झाल्यामुळें मराठेशाहींतल्या शहाण्या लोकांना मोठी काळजी उत्पन्न झाली होती. इंग्रजी सत्तेचा कल्पनातीत उत्कर्ष झाल्यामुळें टिपूची गत झाली तीच आपली होईल कीं काय ही काळजी सर्व जाणत्या माणसांना उत्पन्न झाली. अशा स्थितींत नाना, बाळोबातात्या, नारोपंत, चक्रदेव वगैरे मंडळीमध्यें इंग्रजांवर नक्ष राखून आपल्या राज्याचा बचाव कसा करितां येईल याच्या वाटाघाटी सुरू झाल्या. या वाटाघाटीमध्यें असाहि एक सूर ऐकूं येत होता कीं बाजीरावाला गादीवरून काढून त्याच्या जागीं अमृतरावाचा पुत्र विनायकराव यास यशोदाबाईच्या मांडीवर दत्तक देऊन राज्य कारभार चालवावा, कारण नाना, बाळोबा व परशुरामभाऊ यांनीं आपसांतले मतभेद बाजूला ठेवून कोणताही उपक्रम राज्याच्या कल्याणासाठीं सुरू केला तरी तो बाजीरावाला मान्य होणें कठीणच होतें. राज्य संभाळणें झाल्यास बाजीरावास दूर करणें सर्वांनाच जरूर वाटत होतें. कारण बाजीरावाचा अनुभव आतां सर्वांनाच आला होता.*

---

* (टीपः—नानानें महाडचें कारस्थान करून जरी बाजीरावाला गादीवर आणलें होतें तरी शक्यतर बाजीरावाला काढून चिमाजीला अगर अमृतरावांच्या मुलाला गादीवर बसवून राज्यकारभार चालवावा हें नानाचें धोरण कायमच होतें. टिपूची दौलत बुडाल्यावर मराठी राज्यरक्षणसंबधानें जाणत्या लोकांत ज्या वाटाघाटी सुरू झाल्या त्यांतही नानानें आपलें हें धोरण साधण्याचा प्रयत्न केला होता. असें एका पत्रावरून स्पष्ट दिसतें नारोपंत करंदीकर एका पत्रांत या संबंधानें खालील प्रमाणें लिहीतात. "पुण्याकडील वर्तमान श्रीमंत राजश्री नाना व बाळोबा पागनीस यांची चित्तशुद्धी जाहली. नानाच्या विचारें सर्वत्रांनीं चालावें असा तह ठरला. नानाच्या चित्तांत कैलासवासी नानासाहेबांचा वंश बुडवावयाचा नाहीं.

नाना, बाळोबा, परशुरामभाऊ, नारोपंत चक्रदेव वगैरे शहाण्या आणि पराक्रमी लोकांमध्यें एकी होऊन जर एखादी मसलत सिद्ध होती तर मराठी राज्याचा बचाव होण्याचा पुष्कळ संभव होता. कारण शिंद्यांच्या फलटणांचा उपयोग बाळोबा तात्यामार्फत झाला असता, परशुरामभाऊंनीं राज्य रक्षणांचें जोखीम पत्करलें आसते, आणि या दोघांना मार्गदर्शक म्हणून नानाच्या विशाल बुद्धीची प्रेरणा होतीच. इतकें सगळे जमून आलें असतें, तर शिवशाहीकडे वक्र दृष्टीनें पाहाण्याची इंग्रजांचीहि छाती नव्हती. पण मराठी राज्याला वाईट दिवस आले हेंच खरें. या वाटाघाटी सन १७९९ च्या जुलै आगष्टमध्यें चालू होत्या, आणि सर्वांनीं मिळून काय धोरण ठरवावयाचें याचा पूर्ण विचार होण्यापूर्वींच महिना पंधरादिवसांच्या आंतच नाना, तात्या, व भाऊ या तिघांपैकीं भाऊंची असामान्य व्यक्ति या दृश्य जगांतून अजिबात नाहींशी झाली. या वेळीं करवीरकर व भाऊ यांचा झगडा चालू होता. ह्या झगड्यांत ता. १६ सप्टेंबर रोजीं पट्टणकुडी येथें करवीरकर व परशुरामभाऊ यामध्यें लढाई होऊन तींत परशुरामभाऊ मारले गेले. अशा रीतीनें मराठी राज्याच्या उत्कर्षाकरितां झटणाऱ्या तीन प्रमुख आधारस्तंभापैकीं दक्षिण दिशेचा स्तंभ जो परशुरामभाऊ तो अकस्मात ढांसळून पडला व मराठे शाहीचें पुरें दुर्दैव ओढवलें.

---

अमृतराव यांचा पुत्र दत्तक करावा असा बेत आहे." ( खरे ११–४९९२ ) पुना. रे. रेकॉर्डमध्येंहि यासंबंधानें बातमी आहे. पुण्याच्या इंग्रजांच्या वकिलानें गव्हर्नर जनरलला असें कळविलें कीं, नाना व बाळोबा तात्या हे एक होऊन त्यांनीं बाजीरावाला गादीवरून काढण्याचा व चिमाजीला गादीवर बसविण्याचा कट केला आहे. (P. R. C. ६–३१८) या दोन बातम्यांमध्यें फरक इतकाच आहे कीं, खरे. ले. संग्रह ांतल्या पत्रांत अमृतरावांच्या मुलाला दत्तक घ्यावा असें आहे आणि इंग्रजाच्या वकिलाच्या पत्रांत चिमाजीला दत्तक घ्यावा असें आहे. तात्पर्य दोन्ही बातम्यांमध्यें बाजीरावाला गादीवरून काढण्याचा विचार पुणें दरबारांत चालू होता. हें स्पष्ट दिसतें.)

परशुरामभाऊ व करवीरकर यांचा जो झगडा चालू होता. त्यांत आतां भाऊंची मजल कोठपर्यंत आली होती हें पाहिलें पाहिजे. सन १७९९ च्या मे महिन्याच्या अखेरीस भाऊंनीं चिकोडीचें ठाणें घेतल्याचें पूर्वी सांगितलेंच आहे. चिकोडी काबीज झाल्यानंतर सबंध जून महिना भाऊंचा मुक्काम खरोशी येथें होता. जुलै महिन्यांत भाऊंनी पुन्हां एकदम चढाईचें धोरण सुरू केलें; व आगष्ट अखेर एकसंबे, सोलापूर. गलदगें, व खडकलाट हीं ठाणीं घेतलीं. चिकोडी व मनोळी हे दोन्ही तालुके आतां पूर्णपणें भाऊंच्या ताब्यांत आले. शिरोळ व अकिवाट हीं ठाणीं आणि भूदरगडचा किल्ला एवढेच आतां घ्यावयाचे राहिले होते. हीं कामें झाल्यावर करवीर-करांनीं तासगांवाच्या वाड्याचें नुकसान केलें होतें. तें भरून द्यावयाचें होतें. एकाद्या लढाईंत करवीरकरास जबर ठोकर लागली म्हणजे ते समेटास तयार होतील असा रंग दिसूं लागला होता. कारण भाऊंचें चढाईचें धोरण सारखें यशस्वी होत होतें. परशुरामभाऊ कैदेंतून सुटल्यापासून त्यांची कामगिरी पाहिली तर त्यांस कोठेंच अपयश आलेलें दिसत नाहीं. त्यांनीं साताऱ्याच्या मोहिमेंत यश मिळविलें, सुरापुरच्या संस्थानिकाकडून खंडणी वसूल केली, कर्नाटकची मुलुखगिरी केली, सावनूरचे महाल सोडविले, आपल्या सरंजामापैकी यादवाड व गोकाक परगण्यांत करवीरच्या महाराजांचा अंमल बसला होता तो उठविला, करवीरच्या महाराजांदेखत त्यांच्यापासून चिकोडी व मनोळी हे तालुके घेतले, सरकारांत भरावयाची चौदा लक्ष दंडाची रक्कम माफ करून घेतली, आणि नाना फडणीस व बाळोबा तात्या यांचा स्नेह संपादन करून पुणें दरबारांत आपलें वजन जबरदस्त वाढविलें. इतकें यश भाऊंनीं संपादन केल्यामुळें त्यांची चोहोकडे वाहवा होत होती. व कदाचित् करवीरकरहि भाऊंशीं समेट करतील असा रंग दिसत होता. तथापि भाऊंचे यश बाहेरून जरी मोठें दिसत होते तरी आंतून त्याची स्थिती खालावलेली होती. आर्थिक अडचणीमुळें ते फार पेचांत आले होते. आणि आपल्या वजनावर त्यांनीं कशीतरी फौज संभाळून धरली होती. शिवाय भाऊंच्या ह्या स्वारीला पुणें दरबारांत पाठिंबा नव्हता.

बाजीरावानें करवीरकरांशीं तह करून गोडी केली होती. आणि परशुरामभाऊंपासून करवीरकरांचें रक्षण करण्याकरतां नाना फडणवीसहि वचनबद्ध झाले होते. अशा स्थितींत भाऊस पुणें दरबारांतून सैन्याची अथवा द्रव्याची मदत होण्याचा मुळीच संभव नव्हता. *

पुणें दरबारांतून भाऊंना मदत मिळण्याचा संभव नाहीं हें स्पष्ट झाल्यावर भाऊंना मदतीचा दुसरा आधार त्यांच्या भाऊबंदांचा होता. त्या बाबतींतहि भाऊंनीं खटपट करून पाहिली. पण या वेळीं सर्व पटवर्धन सरदारांचें पूर्वींप्रमाणें ऐक्य नव्हतें शिवाय भाऊंची ही स्वारी पुणें दरबार व नाना

*( टीपः– नाना फडणवीस परशुराम भाऊंच्या करवीरकरावरील मोहिमेच्या विरूद्ध होते. याचें कारण नानांनीं महाडच्या कारस्थानांत करवीरकरांशीं राजकारण केलें होतें. व त्यांस वचन दिलें होतें. या संबंधीचा मजकूर एका पत्रांत खालीलप्रमाणें आढळतो. " श्रीमंत राजश्री नाना महाडास गेले ते समयीं करवीरवासी महाराज यांजकडे नानांचे संधान राजकारणाचें होतें. त्यांचे सांगितल्यावरून महाराजांनीं दंगा फौज धरून केला. तो आजपर्यंत चाललाच आहे. श्री. राजश्री नानांचे म्हणणें वारंवार पडले कीं पांच चार लक्ष कमीजास्ती करून तह करावा. तूर्त मसलत लहान तेथें राजश्री भाऊंनीं गुंतावयाचे नाहीं. मातबर काम भाऊंस सांगावयाचें म्हणतात. त्यास नानांचें वचन महाडास असतां करवीरवासी यांनीं घेतलें आहे असें दिसतें. त्यांजकडून ( करवीरकरांकडून ) इतका अपराध झाला. आणखी होतच आहे असें असतां राग ( नानास ) येत नाहीं. याचा विचार वचन दिलें आहे असें दिसते " ( खरे ११–४६९९ ) नानाकडून भाऊंना मदत मिळण्याचा संभव नव्हता. याचें कारण वरील पत्रांत स्पष्ट आलें आहे. भाऊंनीं करवीरकरांशीं तह करावा असें नानांचें म्हणणें होतें. पण भाऊ त्या गोष्टीस तयार नव्हते. कारण करवीरकरांनीं भाऊंचे फारच नुकसान केलें होतें. तें भरून देण्यास करवीरकर तयार नव्हते. म्हणून भाऊंस मोहिम चालविणें प्राप्तच झालें. अशा स्थितींत भाऊंना मदत करणें नानाला जड गेलें कारण ते करवीरकरांशी वरील पत्रांत दर्शविल्याप्रमाणें वचनबद्ध झाले होते. )

फडणवीस यांच्या मताच्या विरूध्द असल्यामुळें पुणें दरबारची आपणांवर इतराजी होईल कीं काय या धास्तीनें भाऊंचे भाऊबंदहि या वेळीं भाऊंस मदत करण्यास तयार झाले नाहींत. जून महिन्याच्या अखेरीपासून भाऊ वारवांर मिरजेच्या बाळासाहेबांस लिहीत होते कीं आम्हास मिरजेस येणें जरुर आहे. पण वाटेंत करवीरकरांची फौज आहे ती दूर सरली पाहिजे तुम्ही व कुरूंदवाडकर मिळून इचलकरंजीकडे स्वारी कराल तर करवीरकरांस मागून पायबंद बसल्याप्रमाणें होऊन मागें हटावें लागेल. म्हणजे आम्हांस मिरजेकडे येतां येईल. परंतु भाऊंच्या ह्या लिहिण्याकडे त्यांच्या भाऊबंदांनीं पूर्ण दुर्लक्ष केलें. व तिऱ्हाइताप्रमाणें ते लढाईची मौज पहात आपल्या जागीं स्वस्थ राहिले.

परशुरामभाऊंनीं शेवटचा उपाय म्हणून शिंद्याचे कारभारी बाळोबातात्या यांचेकडेहि मदत मागितली पण तिकडूनहि भाऊंस नकार मिळाला. बाळोबांनीं लिहिलें कीं शिंद्याच्या घरांत कलह आहे. शिवाय शिंदे व शिंदेबाया यांमध्यें झालेल्या करारांत भाऊ व करवीरकर यांचा समेट करून द्यावा असें कलम आहे. त्यामुळें मदत पाठवितां येत नाहीं.*

---

*(टीप बाळोबांनीं परशुरामभाऊंस मदत नाकारल्याची हकीकत एका पत्रांत खालीलप्रमाणें आहे. "श्री राजश्री भाउसाहेब याणीं राजश्री बाळोबा तात्यांस एक दोन पत्रें पाठविलीं होतीं. (कीं) दोन पलटणें करवीरकरवासी यांचे पारिपत्याबद्दल द्यावी. रोजमुरा नेमणूक करून पाठवावा त्याप्रमाणें देऊ म्हणून लिहीलें होतें. राजश्री बाळाजीपंत सहस्त्रबुध्दे यांनी पत्रें राजश्री बाळोबा तात्यास दिली त्यानीं उत्तर केलें कीं आमचे घरचा कलह मिटेतों पावेतों इकडून एक माणूस देखील येत नाहीं. आणखी एक प्रकार हा. बायांच्या करारयादी ठरल्या त्यांत कलम लिहीलें आहे कीं करवीरवासी महाराज व भाऊ यांचा तह सरकारांत अलिजाबहादूर यांनीं बोलोन ठरावांत गोष्ट आणावी व भाऊसाहेब याजपाशी अलिजाबहादूर यांणीं शहाणा माणूस पाठवून तह करावा. याप्रमाणें यादींत मुद्दा घातला आहे. त्यास आम्हांस पलटणें देतां येत नाहींत. याप्रमाणें उत्तर जाहलें. पलटणांचा विचार राहिला" (खरे ११-५०८७)

अशा प्रकारें भाऊंस कोठूनहि मदत मिळण्याचा मार्ग न उरल्यामुळें ही मोहीम त्यांना आपल्या बळावरच चालविणें प्राप्त झालें. चिकोडीचें ठाणें भाऊंनीं घेतल्यावर त्यांच्या लष्कराच्या हालचालीच्या अनुरोधानें करवीरकर आपल्या हालचाली करूं लागले. करवीरकर यांनीं आपल्या फौजेचे मुक्काम बारवाड कोष्णूर, सदलगें असे बदलत नेले. शत्रूच्या फौजेपासून सात आठ कोसांच्या अन्तरावर राहून आपला लाग साधेल ती संधी पहात बसावें असें करवीरच्या महाराजांनीं धोरण ठेविलें होतें. त्यांच्याजवळहि फौज बेताचीच होती व शत्रूशीं एकदम गांठ पडल्यास काय परिणाम होईल याची त्यांनाहि खात्री नव्हती. अशा स्थितीमुळें तलावे करितां करितां एकदोन वेळ उभय सैन्यें अर्धकोसांच्या टापूंत येऊन परस्परांची दृष्टादृष्ट झाली तरी सुध्दां युद्धप्रसंग घडून आला नाहीं भर पावसाळ्याचे दिवस असतांनासुध्दां छावणीच्या कष्टास न जुमानतां करवीरचे महाराज तीन साडेतीन महिने सैन्यांतच राहिले होते. करवीरकरांचें सैन्य व परशुरामभाऊंचें सैन्य यामध्यें सात आठ कोसाचें अन्तर असून मध्यें वेदगंगा नदी होती. मध्यें नदी असल्यामुळें पलीकडे असलेल्या भाऊंच्या फौजेस त्रास देणें करवीरकरांस जड होतें. तरी सुद्धां कांहीं धाडसी लोक नदी पलिकडे जाऊन भाऊंच्या फौजेला त्रास देत. पण एकदां अशाच प्रकारची एक तीनशें स्वारांची टोळी पलीकडे गेली असतां भाऊंच्या फौजेनें मारून टाकली. तेव्हांपासून लहान लहान टोळ्यांनीं पलीकडे जाण्याचें धाडस केलें नाहीं. पण अशा रितीनें किती दिवस थांबावें असा विचार मनांत येऊन करवीरच्या महाराजांनीं पलीकडे जाऊन लढाई देण्याचें ठरविलें. नदीला पाणी फार असल्यामुळें नदी उतरण्यास महाराजांचे सरदार एकदम तयार होईनात. शेवटीं महाराजाच स्वतः नदी उतरण्यास पहिल्यानें निघाल्यामुळें इतर लोक तयार झाले. ता. २ सप्टेंबर १७९९ ला करवीरचे महाराज आपल्या फौजेनिशीं वेदगंगा नदी उतरले. व पलीकडे हमीदवाडा येथें डोंगराच्या आश्रयानें त्यांनीं आपल्या फौजेचा तळ दिला.

हमीदवाड्यापासून सुमारें दोन कोसांच्या अंतरावर पट्टणकुडी येथें परशुरामभाऊंच्या फौजेचा तळ होता. मोहिमेच्या भर उमेदींत भाऊजवळ

पंचवीस हजार फौज होती. ती घटतां घटतां आतां सुमारें पांच हजार स्वार, दीड दोन हजार पायदळ व दोन तोफा एवढीच शिल्लक राहिली होती. करवीरच्या महाराजांचेंहि सैन्य जवळ जवळ इतकेंच होतें. दोन्ही पक्षांचीं सैन्यें जवळ जवळ सारखींच असल्यामुळें लढाईचा परिणाम काय लागेल याबद्दल कोणासच खात्री नव्हती. अशा स्थितींत मिरजकर बाळासाहेब व रघुनाथराव कुरून्दवाडकर यांनीं जर भाऊंना मदत केली असती तर भाऊंना नक्की यशाची खात्री होती. मिरजकर व कुरुंदवाडकर मिळून पांच हजार स्वार दोन हजार पायदळ व मिरजेच्या किल्यांतल्या तोफा एवढें सामान भाऊंच्या मदतीस आणण्यासारखें होते. शिवाय रघुनाथराव कुरुंदवाडकर हे चांगले मोहिमा केले सवरलेले शूर सरदार होते. ते जर फौज घेऊन करवीरकराच्या पिछाडीवर येते तर मागून ते व पुढून भाऊ यामध्यें करवीरकरांचा नक्कीच चुराडा झाला असता. पण रघुनाथराव व बाळासाहेब यांच्या हातून ही कामगिरी झाली नाहीं. दोघांच्याहि घरांत भाऊबंदकी उत्पन्न झाली होती. बाळासाहेबांच्या मनांत पुतण्या चिंतामणराव यास वाटणी द्यावयाची नव्हती. आणि रघुनाथरावांच्या मनांत त्यांचा चुलतभाऊ गणपतराव कान्हेर यांस वाटणी द्यावयाची नव्हती. या घरगुती भांडणांत परशुरामभाऊंनीं आपला कैवार घेतला नाहीं म्हणून भाऊंवर दोघांचाहि रुसवा होता. अशा स्थितींत पुणें दरबार व करवीरकर यांचीच मर्जी राखणें जास्त अगत्याचें वाटून या आणिबाणीच्या वेळीं भाऊंच्या भाऊबंदानीं भाऊंस दगा दिला. तथापि बाळासाहेबांचा पुतण्या चिंतामणराव यानें स्वताच्या हिमतीवर हजार बाराशें स्वार गोळा केले आणि पावसाळ्याचे दिवस असतांनासुद्धां त्यानें कृष्णा उतरून आळत्याच्या ठाण्यावर चाल केली. पण त्यांचा जमाव थोडा आणि स्वारीचा उद्योगहि फार उशीरानें म्हणजे लढाईपूर्वी चार दोन दिवस झाल्यामुळें चिंतामणरावाच्या उद्योगाची भाऊंस कांहीं मदत झाली नाहीं.

परशुरामभाऊचें सैन्य पट्टणकुडीस आणि करवीरकरांचें सैन्य हमीदवाडा येथें असून त्यामध्यें दोन कोसांचे अन्तर होते. दोन्ही सैन्यें इतकी

जवळ असूनसुद्धां कोणीच कांहीं हालचाल करीना लढाईची कुरापत पहिल्यानें कोणी काढावी हा निश्चय कोणाचाच होईना. अशा स्थितींत दहा बारा दिवस गेले. शेवटीं करवीरच्या महाराजांनींच प्रथम हल्ला करण्याचें ठरविलें हल्ला करण्याचें निश्चित झाल्यावर करवीरचे महाराज भाद्रपद वद्य तृतीयायुक्त चतुर्थी मंगळवार ता. १७ सप्टेंबर १७९९ या दिवशीं सकाळच्या प्रहर दिवसांस लढाईच्या तयारीनें फौजेसुद्धां गोट सोडून निघाले. हें वर्तमान येतांच परशुरामभाऊंनींहि युद्धाची तयारी केली. परशुरामभाऊंनीं आपल्या सैन्याच्या एकंदर तीन टोळ्या केल्या. सुमारें एक हजार स्वार जवळ ठेवून स्वतः भाऊ गोट संभाळण्याकरितां जाग्यावर राहिले. आणि बाकीच्या दोन टोळ्या त्यांनीं शत्रूवर पाठविल्या एका टोळींत रामचंद्रपंत व दुसऱ्या टोळींत महादेवराव-दाजी हे मुख्य सरदार होते. शत्रूचा हल्ला होतांच उभयपक्षीं तोफांचा मारा व पायदळाची लढाई सुरू झाली. सायंकाळच्या प्रहर दिवसास करवीरकरांची फौज रामचंद्रपंताच्या टोळीवर तुटून पडली. रामचंद्रपंतांनीं पराकाष्टेची जवामर्दी करुन आपली जागा कायम ठेविली. रामचंद्र अप्पानें नेटानें आपली जागा कायम धरल्यामुळें करवीरकरांचा इलाज चालेनासा झाला. तेव्हां त्यानीं मागें सरून महादेवराव दाजी यांच्या टोळीवर मोठ्या आवेशानें हल्ला चढविला.महादेवराव दाजीची टोळी कच खाऊन मागें सरूं लागली. त्या बरोबर लढाईची शिस्त बिघडून रामचंद्र अप्पासहि मागें हटावें लागलें. या पिछेहाटींत रामचंद्रअप्पा जखमी झाले, तरी त्यांनीं आपली टोळी व्यवस्थीत रीतीनें मागें आणली होती. पण संध्याकाळ होत चालला तसा त्याहि टोळीचा धरबंध सुटला. रामचंद्र पंतांनीं गोट हालवून कूच करण्याविषयीं भाऊंस निरोप पाठविला व त्याप्रमाणें ते पालखींत बसून निघण्याच्या तयारींत होते. इतक्यांत करवीरकर महाराजांची सर्व फौज एकवटून तिनें भाऊंच्या गोटावर हल्ला चढविला. हल्ला होतांच पालखींत बसलेले परशुरामभाऊ खालीं उतरले. व लगेच घोड्यावर बसून जेवढे लोक जवळ होते. तेवढ्यांसह लढाईस उभे राहिले. शत्रला पाठ दाखविणें हें भाऊंचें ब्रीदच नव्हतें. आपल्याला यश येईल कीं नाहीं आणि

आपल्याजवळ फौज किती कमी आहे. याचा विचार न करितां शत्रू आंगावर आल्यावर त्यास तोंड देणें हें सरदाराचें कर्तव्य असें समजून भाऊंनीं जिवावर उदार होऊन शत्रूस तोंड दिलें हे त्यांच्या एकंदर चरित्रास अनुरूप असेंच झालें. भाऊंच्या फौजेपेक्षां शत्रूची फौज कितीतरीच जास्त असल्यामुळें पहिल्या धडकीबरोबरच भाऊंच्या हजार पाचशें लोकांनीं कच खाऊन पळ काढला व परशुरामभाऊंस तीन जखमा लागून ते विश्वासराव घाडगे यांच्या हातीं पाडाव सांपडले. या लढाईसंबंधानें पुष्कळच पत्रें उपलब्ध आहेत त्यांतून एक दोन उतारे खालीं देतों. “ काल तिसरे प्रहरीं करवीरकर यांची फौज तयार होऊन निपाणीजवळ आली याचें वर्तमान श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांस कळल्यावर श्रीमंत राजश्री अप्पासाहेब तयार होऊन पुढें त्यांचे तोंडावर गेले. तेथें करवीरकरांनीं तोफांची मारगिरी करूं लागल्यावर श्रीमंतांनीं आपल्याकडील तोफा नेऊन मारगिरी करूं लागले. चाळीस पन्नास बार तोफांचे झाले. तों त्यानीं चालून घेतले. अप्पासाहेब जागा सोडून निघाले नाहींत तेव्हां तिकडून निघून दाजीसाहेब यांचे फौजेवर चालून घेतलें तेव्हां ते कच करून माघारें निघाले. भाऊसाहेब गोटांत तयारच होते. ते पालखींतून उतरून घोडयावर बसले आणि निघाले तो करवीरकरांची फौज गोटांत शिरली. लष्करची लुटालूट होऊन जिकडे ज्यास मार्ग सांपडला तिकडे निघाले. याप्रमाणें फौजेचा मोड जाहला. खासे पाठीमागें होते तेथेंही फौज जाऊन गोट लुटला. श्रीमंत राजश्री भाउसाहेब खासा कोणीकडे गेले, काय जाहलें. हें वर्तमान अद्याप समजलें नाहीं. मोड जाहला ते समयीं येकसलकर भोसले दाजीसाहेब यांचे गोटांत होते. त्याजपैकीं चार स्वार आज प्रातःकाळीं येथें आले. त्यांनीं जबानी सविस्तर सांगितलें. तें सेवेशीं लिहीलें आहे.” (खरे ११-५०९३) दुसरें एक पत्र स्वतः रामचंद्रअप्पा यांनीच लिहिलें आहे तें असें “ अपत्यें रामचंद्रानें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. काल भौमवारीं सायंकाळीं सहा घटका दिवसास करवीरकरांची लढाई झाली. आपली फौज नामोहरम होऊन माघारी फिरली नंतर वडील मागें लष्करापुढें तयार होऊन उभे होते. सामान थोडें होतें. तो करवीरकरांचे फौजेची गांठ पडली ते समयीं वडील जातीनिशीं

तट खाऊन जागा धरून उभे राहिले. "मागें फिरा" ह्मटलें असतां फिरेनात. त्यामुळें जाग्यावर त्यांचे हस्तगत झाले. दोन जखमा आहेत. कोणी नाहीं ह्मणतात. ऐसें आहे. झाडून दौलत गर्द झाली. आह्मी व चि. राजश्री बाबा, दाजी, व ती. राजश्री विठ्ठलराव व हरबाअणा मात्र पळ खाऊन रात्रीं मध्यरात्रीस अंकलीस आलों. मला दोन जखमा. उजवे हाताचे दंडावर गोळी लागून पार जाहली. बाबास उजवे हाताचे अंगठयाजवळ तरवारेची पुतळी लागली आहे. विठ्ठलराव बाबास डावे मांडीस गोळी लागून पार जाहली. बहूत माणूस कामावर आलें. झाडून बुनगेंसुध्दा दौलत गर्द झाली. आह्मी जखमा लागल्या आहेत. त्यामुळें नदी उतरून अलीकडे मांजरीस आलों. बाबा फौजेसुद्धां अंकलीवर आहेत. त्यास फौजेस खर्चास नाहीं तरी हजार दोन हजार रुपयांची तरतूद करून पाठवावी. इश्वरें मोठा गहजब केला. तो लिहीतां येत नाहीं. चि. राजश्री बाबा फडणीसास पुण्यास लवकर पाठवून द्यावें. पुण्यास राजश्री नानास व बाळोबा तात्यास वृत्त जलदी कळवावें. गर्द होणेंत बाकी राहिलें नाहीं. पुढें उपराळा लोकर व्हावा ह्मणोन सुचना (पुण्यास) ल्याहावी हे विज्ञापना " (खरे ११-५०९१)

वरील पत्रांत लिहिल्याप्रमाणें लढाई बिघडून परशुरामभाऊस जखमा लागल्या व ते विश्वासराव घाडगे यांच्याकडे पाडाव सांपडले. घाडग्यांनीं भाऊंस आपल्या घोडयावर उचलून घेऊन करवीरकर महाराजांपुढे नेलें. त्यावेळीं भाऊ आसन्नमृत्यु होते. भाऊस पहातांच महाराजानीं त्वेषानें "मारा" ह्मणून सांगितलें. लगेच विश्वासराव घाडग्यानें भाऊस घोडयावरून ढकलून दिलें आणि महाराजांजवळच्या शिलेदारांनीं तरवारीचे वार करून भाऊंचे शरीर छिन्नविछीन्न केलें. नारो हरी करंदीकर यानें या प्रकारासंबंधानें खालीलप्रमाणें लिहीलें आहे. " भाऊसाहेब पाडाव आले. घाडगे यानीं घोडयावर पुढें घेतलें होतें. त्यास महराजांच्या समक्ष आलेवर घोडयावरून ढकलून दिल्यावर "मारा " ह्मणोन मुख्यांनीं सांगितलें. मग दहा पांच असामींनीं वार टाकिले. तोंडावर तो बाकी तिळमात्र जागा राहिली नव्हती. सर्वांस दिक्क नाहीं. अग्नि-संस्काराविषयीं खटपट बहूत केली. त्याचा विस्तार पत्रीं कोठवर लिहावा.?

परवानगी घेतली. मुक्कामास प्रेत आणण्याचा प्रयास पडला प्रहररात्र जाहली उपाय नाहीं. तेव्हां प्रेत घोडीवर पुढें घेऊन आणिलें तों तीन प्रहर रात्र जाहली. नंतर दहनाचें साहित्य मिळवून भडाग्नी दिला" (खरे ११-५०९४) भाऊंचे चुलतबंधु बाळासाहेब मिरजकर यांना भाऊंची हकीकत समजल्यावर त्यांच्या तोंडून उद्‌गार निघाले ते असे "छत्रपति ह्मणवितात, कर्मे अंत्यजाचीं केलीं." (खरे ११-५१०१) याप्रमाणें मराठयांच्या ह्या प्रसिद्ध सेनापतिचा एका भिकार लढाईंत अशा अधम प्रकारानें शेवट झाला. भाऊंना समरांगणांत मरण आलें तो दिवस अंगारकी संकष्टी चतुर्थीचा होता. त्यामुळें भाऊसारख्या विख्यात गाणपत्याचें व्रीरव्रत सिद्धीस जाऊन त्याच्या किर्तीस भूषण झालें. बाकीचा प्रकार मात्र त्यांच्या शत्रूच्या किर्तीस दूषणास्पद झाला. ✲

---

✲ (टिप:- परशुरामभाऊ लढांईत मारले गेले कीं त्यांचा करवीरच्या महाराजांनीं वध केला हा मुद्दा मराठ्यांच्या इतिहासांत बराच वादग्रस्त आहे. ग्रँट डफनें असें असें लिहीलें आहे कीं लढाईंत हजर असलेले दाजीसाहेब लिमये यांच्या माहितीवरून महाराजांनी गोटास आल्यावर परशुरामभाऊंचा वध करविला. पण खरे ग्रंथसंग्रहांतल्या पत्रांवरून ही माहिती बरोबर नसून भाऊ पाडाव सापडतांच लढाईच्या गर्दीतच महाराजांनीं भाऊंस मारविलें. गोटांत परत गेल्यावर मारलें काय आणि पाडाव सांपडतांच मारलें काय कोणच्याहि परिस्थितींत बधाचा आरोप कमी होत नाहीं. कारण भाऊंस मृत्यु आला तो निवळ लढाईंतल्या जखमामुळें आला असें नसून जखमी स्थितींत भाऊंना घोड्यावरून ढकलून देऊन महाराजांनीं मारविलें ह्मणून आला ही गोष्ट अस्सल पत्रावरून स्पष्ट आहे. मराठ्यांचे इतिहासकार रावसाहेब सरदेसाई यानीं मात्र नवीनच एक शक्कल काढली आहे. त्यांनीं या संबंधानें खालीलप्रमाणें लिहीलें आहे. "भाऊंला महाराजांसमोर आणलें त्यावेळेस त्यांस जीव नव्हता. शवच महाराजापुढें आणलें आणि महाराजांनीं तें घोड्यावरून ढकलून देऊन त्यांचा शिरच्छेद करविला. जिवंत हस्तगत झाल्यावर मुद्दाम त्याचा प्राण घेतला असें नव्हे." (म. रियासत उत्तरविभाग ३ पान ८९) रावसाहेब सर-

परशुरामभाऊंचा अशा शोकजनक रितीनें शेवट झाल्यावर त्यांच्या शवाला अग्नि देण्याचेंहि भान करवीरच्या महाराजांस राहिलें नाहीं. करवीरकरांच्या लष्कराबरोबर या वेळी मिरजकरांचे वकील नारो हरी करंदीकर हे होते त्यांनीं मोठी खटपट करून भाऊंच्या प्रेताला अग्नी देण्याची महाराजांकडून परवानगी मिळविली व हमीदवाडा येथें भाऊंचें प्रेत नेऊन त्यास अग्निसंस्कार केला या बावतींत स्वत: करंदीकर यांनीं काय खटपट केली तें त्यांनींच एका पत्रांत सविस्तर लिहिलें आहे. त्यांत ते म्हणतात, "मी तेथें जवळच होतों. महाराज प्रेत सोडून पुढें पाव कोस जाऊन बैठक केली. तोफांचे बार करविले. साखरा वांटल्या खुशाली जाहली. चहूंकडे फत्ते

---

देसाई यांनीं महाराजांना वधाच्या आरोपांतून मुक्त करण्याकरितां ही नवीन युक्ति काढली खरी, पण जिवंत माणसाला मारण्यापेक्षां त्याच्या प्रेताचे तुकडे करणें ही गोष्ट जास्त लांछनास्पद आणि अतिशय हीनवृतीची दर्शक राहे. हें रावसाहेबांच्या लक्षांत आलें नाहीं व वधाच्या आरोपापेक्षां जास्त घाणेरडा आरोप मात्र नकळत त्यांनीं महाराजांवर केला. असो. या सर्व विषयावर त्रयस्थ माणसांच्या मतें निकाल देतां येण्यासारखें साधन आतां उपलब्ध झालें आहे. त्यावरून वाचकानीं योग्य तो बोध घ्यावा. पुणें. रे. रेकार्डमध्यें भाऊंच्या मृत्यूची बातमी पुण्याचा त्यावेळचा वकील पामर यानें गव्हर्नर जनरलला कळविली आहे. त्यामध्यें भाऊंच्या मृत्यूला पामरनें 'मर्डर' हा शब्द वापरला आहे. भाऊ मेल्यानंतर अकरा दिवसांनीं ह्मणजे ता. २८।९।१७९९ रोजीं हें पत्र पामरनें योग्य चौकशी करून लिहिलें असलें पाहिजे. या पत्रांत पामर म्हणतो "This Government in cocert with Sindia was preparing to detach a force against the Raja of Kolhapur in order to punish him for the murder of Parshurambhau" (P. R. C. 6—313) इंग्रजांच्या वकिलानें परशुरामभाऊंचा वध असे स्पष्ट शब्द वापरल्यामुळें भाऊंचा वध झाला कीं नाहीं अशी शंका घेण्याचें आतां काहींच कारण राहिलें नाहीं.)

झाल्याचीं पत्रें रवाना झालीं. मी प्रेताजवळच होतों. तों रात्र जाहली. तेव्हां दहनाचा विचार भाऊराव जोशी यांस सांगितला त्यांनीं आज्ञा घेऊन कळवितों म्हणून गेले. त्यांची वाट दोन तीन घटका पाहिली. त्यांनीं विचारलेंच नाहीं. नंतर मी घाटग्यास सांगितलें. त्यांनीहि विचारलें नाहीं. नंतर प्रीतीराव चव्हाण यांस कांहीं दरबार खर्च कबूल करून मजकूर सांगितला त्यांनीं जाऊन महाराजांस विनंति केली. त्यावर महाराजानीं दोन घटका खलबत केलें. चव्हाणांचा नेट पडला. त्यावरून मी पुढें जाऊन महाराजांस विनंति केली कीं आपणाकडे पाडाव आले त्यांस अग्निसंस्कार करणें हें महाराजांचे लौकिकास चांगलें. त्यावरून दहन करावें म्हणून आज्ञा जाहली. महाराजांनीं जोशीरावास सांगितलें साहित्य लागेल तें देणें इतकें होईपर्यंत अडीच प्रहर रात्र जाहली. नंतर प्रेताजवळ आलों घोडीवर पासोडी होती ती काढून त्यांत प्रेत घालून घोडीवर घेतलें. वाट अवघड त्यांत पाऊस थोडा पडत होता. पहांटेच्या तीन घटका रात्रीस हुमीदवाड्यावर आलों. साऱ्या गांवांत दोन मोटा गोवऱ्या सांपडल्या इतक्यांत सूर्योदय झाला. रत्नाकरपंतांचे गोटांत लांकडें तीस चाळीस भारे मिळालीं. गांवानजीक तळें आहे. तेथें जागा नेमिली गांवांतील पांच सात आसामी भिक्षुक आणून प्रेत तळयावर नेलें मंत्राग्निसाठीं चांगला ब्राह्मण मिळाला नाहीं मग भडाग्नि देऊन दहन केलें दुसरे दिवशीं रक्षा व अस्थि काढिल्या. मिरजेस किंवा कृष्णेस नेणेस ब्राह्मण मिळेना. दूध गंगेंत रक्षा विसर्जन केली. अस्थि मिरजेस पोंचविल्या चौघे पुत्र शिवाय कुटुंबिक मंडळी, शिवाय आप्त थोर थोर असतां समयास जवळ कोणीच नाहीं. नारो हरी करंदीकराचा जन्मांतरीचा योग उभा राहिला. म्हणून अशा पुण्यश्लोकाचे देहास हात लागून अन्तकाळची सेवा जी पुत्राचे हातून व्हावयाची ती माझे हातून घडली भाऊंचा काळ उत्तम प्रकारें जाहला आमरणान्त क्षात्र धर्मानें पेशव्यांची सेवा करून धारातीर्थी शूरास मरण यावें तसें झालें. असा प्राणी सूर्यमंडळ भेदून उत्तम लोकास जातो. श्री गणपती आराध्य दैवत त्याची निस्सीम भक्ति अंगारकी चतुर्थी व्रताचा दिवस, एक पत्निव्रत, दिगन्त कीर्ती प्रदोष समय त्या काळीं देह विसर्जन

जाहले "(का. सं. पत्रें यादिले ४६७)

वरील पत्रांत भाऊंच्या दहनविधीच्या हकीगतीबरोबर भाऊंच्या चारित्र्यासंबंधानेंहि लेखकानें आपला अभिप्राय व्यक्त केला आहे. तो फारच मार्मिक आहे. परशुरामभाऊ हे धर्मनिष्ठ होते. गणपति हें त्यांचें दैवत होतें. अशा धर्मनिष्ठ माणसाला अंगारकी चतुर्थीच्या दिवशीं मृत्यु आला हें भाऊंच्या पुण्याईचेंच फळ यांत शंका नाहीं, भाऊंच्या मृत्यूनें सर्व महाराष्ट्र हळहळलें थोर थोर लोकांनीं भाऊंच्या मुलांना सांत्वनपर पत्रें लिहून कृतज्ञता व्यक्त केली. त्यांतलीं कांहीं खालीलप्रमाणें आहेत. श्रीमंत बाजीरावसाहेब पेशवे यांनीं खालीलप्रमाणें लिहिलें आहे. "परशुराम रामचंद्र यांनीं करवीरकर महाराजांशीं मोठे मर्दुमीनें लढाई दिली. शिपायगिरीची शर्थ करून कामास आले. व त्यांचे त्रिवर्ग पुत्रांनीहि जवामर्दी केली. रामचंद्र परशुराम व हरी परशुराम यांस जखमा लागल्या. हिमतीनें लढलें. हे चांगलें केलें. परशुराम रामचंद्र या सारिखे मनुष्य राज्यांतील गेले. मोठें वाईट जाहलें. हा मृत्युलोक, येथें विवेक प्राधान्य" ( खरे ११-५१२२ )

दौलतराव शिंदे यांनीं खालीलप्रमाणें लिहिलें आहे. " भाऊंनीं आपली शर्त जुरतीची करावयाची ती करून यावत्प्राण आपला नक्षच करून स्वामी सेवेवरी कामास आले. परन्तु यशदाता ईश्वर ! ही सत्ता त्याची आहे. ज्याणीं मोठीं मोठीं कामें काजें करून दौलतीचे बचाव करीत आले. व पुढेंहि ज्यांचे भरंवशावरी स्वस्त असावें अशी मनुष्यें सरकारच्या पदरची गेल्याचा खेद कोणास झाला नाहीं असें नाहीं. ईश्वर इच्छा प्रमाण. तुम्ही विवेक करून चित्ताचें सांत्वन करावें आणि हिंमत धरून लोकांचा जथ धरून लहान मोठीं माणसें पदरची असतील त्यांस आळा घालून शत्रूचे पारिपत्याची तरतूद करावी." ( खरे ११-५१२३ ). बाळोबातात्या यांनीं भाऊं संबंधानें खालीलप्रमाणें लिहिलें आहे. " भाऊंस जखमा लागोन देहावसान झालें म्हणोन कळलें. ऐशियास जुरतीची तो शर्त व तरतुदेची शर्त जाहली. परन्तु ईश्वरेच्छेपुढें उपाय नाहीं. भाऊंसारखा मोहरा गेला.

येविशीं खेद सर्वांसच आहे. आम्हांस आज तीन वर्षे भेटीची उत्कंठा होती. परन्तु ईश्वराचे चित्तास गोष्ट न आली. ऋणानुबंध प्रमाण. येविशीचा खेद चित्तास जाला. तो पत्रीं कोठवर लिहावा ? भाऊंनीं तो आपले क्षात्र धर्म सेवन केल्याचा शेवट केला. चतुर्थी भौमवार, व्रतस्थ ते समयीं धारातीर्थी देह ठेवला. तेव्हां सूर्यमंडळ भेदून गणपतीरूप झाले. त्यांनीं आजपर्यंत शिपाईगिरीची टेक राखिली. तैशीच शेवटास नेऊन दाखविली. ही तारिफ पत्रीं कोठवर लिहावी. परन्तु करवीरकरांनीं अशी गोष्ट करावयाची नव्हती. वर्तमान कळतांच फौज पलटणें पाठवून पारिपत्यच करावें. येविशी श्री राजश्रीपंत प्रधान स्वामी यांस विनंति केली. व रा. नानासहि बोलण्यांत जाणिले. व आमचे श्रीमंत यजमानसाहेबांस विनंति केली. व राजश्री आप्पा व बाबा व दाजी व बापू यांस सरकारचीं पत्रें खातरजमेचीं व आमच्या यजमानांची व आम्ही लिहीलें आहे. त्यास आपण चार गोष्टी सांगोन भाऊंचे दुखः जाहले आहे. येविशीचें शांतवन करून त्याणी व आपण सर्वांनी हिंमत धरून शत्रूचे पारिपत्याची तरतूद करावी. बदला घ्यावा यांतच लौकिक व नक्ष आहे." ( खरे ११-५१२५–२६ ) नानास भाऊंची बातमी कळल्यावर त्यांनीं उग्दार काढले ते एका पत्रांत खालीलप्रमाणें आहेत. "श्रीमंत राजश्री नानाकडे मी व राजश्री बाळाजी विष्णू उभयतां गेलों. पत्रें दिलीं. पत्रें वाचून नानांनीं बहूत खेद केला. आपणाकडील पत्रे आल्याचे पूर्वी तृतीय प्रहरीं राजश्री बळवंतराव जवाहिरखान्याचें पत्र नानास आलें होते. त्यांतहि वडील सरकार कामास आल्याचें लिहिलें होतें. तेव्हांपासून सचिंत होते. पत्र पाहिल्यावर बहूत श्रमी जाहले. भाऊंसारखे सरदार दौलतीमध्यें कोणी नाहीं. आम्हांस हांक मारावयास आतां कोणी नाहीं. असो! होणार गोष्टीस उपाय नाहीं." याप्रमाणें बोलिले. नंतर विनंति केली जे "जाली गोष्ट ते ईश्वरेच्छेनें जाली. याउपर याचा अभिमान सर्व प्रकारें आपणास आहे. सरकारांतून पैरवी हरएक प्रकारें होऊन बाजी सुधारे असा प्रकार झाला पाहिजे." ( खरे ११–५१२७ ) माधवराव रास्ते यांनीं भाऊंसंबंधानें खालीलप्रमाणें

लिहीलें आहे. " सरकार दौलतीची बाजू गेली. परन्तु भाऊ यांनीं मोठी मोठी कार्ये करून शेवट उत्तम लोकाचें साधन केलें. त्यांचे पराक्रमाची शर्त झाली. राजश्री आप्पा व बाबा व दाजी व बापू यांस भाऊ यांचे जागीं वडील आपण आहेत. आपण विवेकें करून चित्तांचें शांतवन करून त्यांस हिंमत देऊन फौज व गाडद वगैरे सरंजाम पोक्त जमा करवून महाराजांचे फौजेवर शह द्यावा. सरकारांतून सरंजामाची पैरवी व्हावी येविशीं आपण लिहिलेच आहे. येथूनहि श्रीमंतास व राजश्री नाना यांस पत्रें पाठविलीं आहेत. भाऊ यांनीं महाकीर्ती संपादन केली. त्यांचे आशिर्वादें पुढें उद्योग तोच करित असतां यश व किर्तीं संपादन होईल. एकवेळ बाजी विसकटली म्हणून पराक्रमी पुरुष स्वस्थ बसत नाहींत. पुन्हा त्याच कार्यांत प्रवर्त होऊन बाजी जमवितात. प्रस्तुत समय पाहतां या उद्योगास विराम करावयाचा समय नाहीं. आपण सूज्ञ व धैर्यवान आहांत त्याहावेसें नाहीं. सारांश ईश्वरसत्ता प्रमाण आहे. धैर्यानें सर्वसंकटें परिहार होतील. सरकारांतून कुमक व्हावी येविशीं उद्योग करीत आहों.'' (खरे ११--५११५) धोंडोपंत गोखले यांनीं मिरजेचे बाळासाहेबांस भाऊंची हकिगत समजल्यावर पत्र लिहीलें त्यांत खालील मजकूर आहे. 'श्रीमंत राजश्री भाऊ यांची व करवीरकर यांची लढाई होऊन बिघडली. म्हणन राजश्री आपासाहेब यांचे पत्र आलें त्यावरून सविस्तर कळलें. होणार तें जाहलें. अत:पर त्यांचे परीक्षेचा समय आहे. त्यांचे पुण्येंकरून आहों हें पुष्कळ सर्वांनी सर्वस्वास उदार होऊन एक विचार करून मसलतीचा उद्योग होऊन शत्रूचा सूड घ्यावा हा पुरुषधर्म आहे. ये विषईचा विचार तेथें असतील त्यांस बोध होऊन पक्केपण ठरेल त्यांत मी आहे. मजपाशीं पांच हजार फौज तीन हजार पायदळ तोफा सरंजाम सुद्धां आहे. पक्का निश्चय झाल्यानें ईश्वर अनुकुल होईल. या उद्योगास मसलत मोठी, पैका पाहिजे. परिणाम कसा होईल, धनीपणाचा विचार एक प्रकारचा, पुरवणी मागून होणें कठीण, मोठेपणाप्रमाणें पदरी पैसा नाहीं. हे अंदेशे समजावणार बहूत मिळतील परंन्तु ते चित्रांत आणावमास हा समय नव्हे. पटवर्धन यांच्या घराण्यांत

कैलासवासी गोविंदपंत नाना यांच्या वंशानें दौलत मिळविली. ती पाठीमागें भाऊ यांनीं रक्षिली. त्यापेक्षां पुढेंही त्यांचें कोणी आहेत असें म्हणविणें आपल्याकडे आहे. इतकें विस्तारें मी लिहावें अशी माझी योग्यता नाहीं. परंतु भाऊजवळ माझे वचन गुंतले आहे. कीं. चार (पुत्र तुमचे) तसा मी पांचवा यास्तव हे लिहीलें लौकिकी नव्हे" (खरे ११--५१३२)

परशुराम भाऊसंबंधानें वरील पत्रांमध्यें थोर थोर माणसांनीं जे उद्‌गार काढले आहेत त्यांवरून भाऊंना अकल्पित रीतीनें जो मृत्यु आला त्याची वार्ता समजतांच सर्व मराठे मंडळाला कसा जबरदस्त धक्का बसला हें सहज लक्षांत येतें वरील पत्रांतून बहुतेकांनीं भाऊंना जें अपशय आलें. तें धुवून काढण्याकरितां प्रयत्न केला पाहिजे असें सुचविलें आहे. व या कामांत अनेकांनीं अप्पासाहेबांना मदतीचीं आश्वासनेंहि दिलीं आहेत. भाऊंचे पुत्र अप्पासाहेब यांनीं पुन्हा जमवाजमव करून करवीरकरांवर चढाई करण्याचा प्रयत्नहि सुरू केला. तथापि मराठ्यांच्या दुर्दैवानें पेशवाईचे धनी दिवटे बाजीरावसाहेब यांची राजवट यावेळीं सुरू असल्यामुळें अप्पासाहेबांच्या प्रयत्नास म्हणण्यासारखें यश आलें नहीं व करवीरकरांबरोबर सुरू केलेली लढाई पुणें दरबारांत झालेल्या अनेक भानगडीमुळें सोडून द्यावी लागली आणि धोंडोपंत गोखले यांनीं लिहील्याप्रमाणें "धनी पणाचा विचार एक प्रकारचा" याचाच अनुभव आल्यामुळें रामचंद्रआप्पांनीं करवीरकरांवर केलेल्या स्वारीचा फारसा उपयोग झाला नाहीं तात्पर्य परशुरामभाऊंचा मृत्यु हा मराठें शाहीला एक जबरदस्त धक्काच ठरला सवाई माधवरावांच्या मृत्यूनें मराठेशाहीवर ओढवणाऱ्या अनर्थांची जी भयसूचक घंटा वाजूं लागली तिच्या टोल्यापैकीं भाऊंचा मृत्यु हा फारच मोठा व शेवटचा भयानक टोला ठरला. कै. खरे शास्त्री यांनीं या संबंधानें खालीलप्रमाणें लिहीलें आहे. "मराठी राज्याचा भावी नाश सुचविणारे तीन अनर्थ गेल्या पांच वर्षांत घडून आले. ते सर्व अकस्मातच घडून आले. सवाईमाधवरावांचा मृत्यु, टिपूच्या राज्याचा नाश, आणि परशुरामभाऊंचा मृत्यु हे ते तीन अनर्थ होत. जणूं काय भवितव्यता देवीनें तीवदां

ढोल पिटून सर्वांस जागें केलें कीं मराठी साम्राज्य नष्ट होणार! होणार! होणार!" (खरे ११--पान ५८६९)*

*(टीप—भाऊंच्या मृत्युचा सूड घेण्याकरितां रामचंद्रअप्पानें करवीरकरांवर जी स्वारी केली त्यांत करवीरला मोर्चे लावून करवीरकरांवर मारा सुरू करतांच करवीरकरांची गाळण उडून ते चारी दिशांत पळूं लागले. या पळापळींत करवीरकरांचा सबंध गोट लुटला जाऊन शेंकडों लोक मारले गेले. व शेंकडों पाडाव आले. पाडाव आलेल्या लोकांत करवीरकर महाराजांच्या प्रीतींतला एक सरदार विश्वासराव गायकवाड हा सांपडला भाऊंच्या मृत्यूचा सूड म्हणून रामचंद्रआप्पानीं या विश्वासरावास ठार मारिविलें. करवीरच्या महाराजांनीं भाऊंस 'मारा' म्हणून सांगितल्यावर भाऊंच्या अंगावर ज्यांनीं वार केले. त्यांत हे गायकवाड होते. म्हणून रामचंद्र अप्पानीं त्यांस मारविलें. या गोष्टीचा उल्लेख येथें करण्याचें कारण एवढेंच कीं रामचंद्रअप्पाच्या या कृत्याचा निषेध पटवर्धन घराण्यांतल्या लोकांनीच केला आहे. त्यावरून पटवर्धनांची रणनीति कशी होती हें दिसून येतें. चिंतामणरावअप्पा सांगलीवर यांनीं आपल्या 'अप्पासाहेबांचा बांका' या आत्मचरित्रांत या संबंधानें खालील प्रमाणें लिहीलें आहे, "विश्वासराव याजवर श्री. महाराज छत्रपती यांचा लोभ पुत्रवत तो पाडाव सांपडला ती. परशुरामपंत भाऊसाहेब यांस श्रीं महाराज छत्रपति यांनीं मारविलें. सबब विश्वासराव यांस मारीलें ही गोष्ट बे हिशेंबाची ती. परशुरामपंत भाऊसाहेब यांस मारिलें म्हणून छत्रपती यांस कोणी चांगलें म्हटलें नाहीं. विश्वासराव गायकवाड सांपडला त्याची बरदास्त करावी, बहुमान करून छत्रपतीकडे पाठवावे तें न करितां मारिलें ही अपकीर्तीची गोष्ट झाली. आमचे घराण्याचे अवसाकास योग्य न जालें."

## प्रकरण १९ वें

# उपसंहार

### " पटवर्धन कुळीं फत्ते तलवार परशुरामपंत भाऊची "

**( कर्नाटकांतील स्वारीचा पोवाडा** पा. १८९ शाहीर–**नारो त्रिंबक)**

परशुरामभाऊंच्या चरित्रांतील ठळक राजकीय उलाढालीची हकीगत मागील अठरा प्रकरणांतून सविस्तर सांगितली आहे. आतां या प्रकरणांत भाऊंची कौटुंबिक गृहस्थिति व त्यांचें खाजगी जीवन या संबंधानें थोडी माहिती सांगून एकंदर चरित्र ग्रंथ पुरा करावयाचा आहे.

पटवर्धनाची जहागीर जरी गोविंद हरीच्या नांवें होती तरी त्यांत रामचंद्र हरी व त्रिंबक हरी असे आणखी दोन भागीदार होते. एकंदर जहागिरींतले हे तिन्ही भागीदार तीन ठिकाणीं रहात होते. गोविंद हरीचे वंशज मिरजेस रहात होते; त्रिंबक हरीचे कुरुंदवाड येथें रहात होते; आणि रामचंद्र हरीचे पुत्र परशुरामभाऊ हे तासगांव या ठिकाणीं रहात होते. हल्लीं तासगांव हें सातारा जिल्ह्यांतील एक तालुक्याचें ठिकाण आहे. तासगांव हें मिरजेपासून उत्तरेस पंधरा सोळा मैलांवर आणि सदर्न मराठा रेल्वेचें भिलवडी स्टेशन पासून पूर्वेस अजमासें सहा सात मैलांवर आहे. हल्लीं तें तालुक्याचें मुख्य ठिकाण असल्यामुळें तेथें जरी सरकारी कचेऱ्या वगैरे आहेत तरी गांव मात्र परशुरामभाऊंच्या वेळच्या मानानें अगदींच

मोडकळीस आलेला आहे. परशुरामभाऊंच्या वेळीं हा गांव बराच भरभराटीस आलेला होता. त्यावेळच्या भरभराटीचे कांहीं अवशेष आज देखील गांवांत दृष्टीस पडतात. गांवाचे मध्यवस्तींत श्रीमंत पटवर्धनांचा जीर्णावस्थेंत असलेला वाडा आहे, व त्याचे लगतच पटवर्धनांचे आप्त स्वकीय व पदरचे लोक यांचेहि वाडे जीर्णावस्थेंत आणि निर्मनुष्य असे आहेत. वाड्याचें पूर्व अंगास परशुरामभाऊंनीं आपलें उपास्य दैवत श्री गजानन व त्याचें पंचायतन यांचें बांधलेलें विशाल देवालय आहे. या देवालयापुढील भव्य गोपूर व त्या पुढचा नगारखाना हीं त्या वेळच्या वैभवाची साक्ष देत आहेत. परशुरामभाऊंचे द्वितीय चिरंजीव हरीपंत बाबा यांनींहि तासगांवीं काशीविश्वेश्वराचें एक उत्कृष्ट मंदीर बांधलें आहे. या देवालयांवरील कारागिरीचें कामहि त्यावेळच्या कला कौशल्याची साक्ष देत आहे. तासगांवच्या मध्य भागीं पटवर्धनांचा चारी बाजूंनीं तट असलेला जीर्ण वाडा अजून उभा आहे व त्यांत पटवर्धनांचे वंशज अजून रहात आहेत.

परशुरामभाऊंचे वडील रामचंद्रअप्पा यांस परशुरामभाऊ हे थोर वयांत झालेले पुत्र पुढें पराक्रमी निघाल्यामुळें हरीवंशाच्या बखरींत बखरकारानें खालीलप्रमाणें उल्लेख केला आहे.

" रामचंद्रआप्पास पुत्र परशुरामभाऊ जाहले ते साक्षात् परशुराम अवतार जाहला." ( ह. वं. बखर पा. ४ )

भाऊंचे वडील लहानपणींच वारल्यामुळें त्यांचें संगोपन करण्याचें काम त्यांची आई जानकीबाई हिनें फार उत्तम तऱ्हेनें केलें. जानकीबाई ह्या पुण्यांतील खासगीवाले लिमये यांच्या घराण्यांतील होत्या. खासगीवाल्यांचें घराणें त्यावेळच्या प्रतिष्ठित घराण्यांपैकीं होतें. आपल्या घराण्याच्या परंपरेला योग्य असें शिक्षण जानकीबाईच्या देखरेखीखालीं परशुरामभाऊंना मिळालें. भाऊंचा जन्म इ. स. १७४० मध्यें झाला, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. त्यांचें लग्न सन १७५३ च्या सुमारास पुण्यास झालें. भाऊंची पत्नी राधाबाई ही तासगांवचे प्रसिद्ध सावकार जोग यांच्या घराण्यांतील होती. ही बाई फार प्रेमळ आणि साध्वी अशी होती. राधाबाईच्या पोटीं परशुरामभाऊंस पांच पुत्र व चार कन्या अशीं नऊ अपत्यें झालीं. परशुरामभाऊंना

(१) रामचंद्रअप्पा (२) हरीपंत बाबासाहेब (३) माधवराव दाजी (४) गणपतराव बापूसाहेब (५) विनायकराव असे पांच पुत्र होते. पैकीं पहिले तीन भाऊंच्या हयातींतच चांगले नांवारूपास येऊन स्वारी शिकारीचीं कामें करीत होते. शेवटचा विनायकराव मात्र लहानपणींच वारला. भाऊंना चार कन्या झाल्या. (१) वडील कन्या बयाबाई ही बारामतीकर जोशी यांजकडे दिली होती. (२) दुसरी द्वारकाबाई ही कायगांवकर पाटणकर यांजकडे दिली होती. (३) तिसरी मनकर्णिकाबाई ही वाईकर वैद्य यांजकडे दिली होती. (४) चौथी ठमाबाई ही हुपरीकर जोशी यांजकडे दिली होती. * *

---

* (टीप १:--भाऊंची तिसरी मुलगी मनकर्णिकाबाई ही ज्या वाईकर वैद्यांकडे दिली होती ते वैद्य मूळचे कोंकणांतील नांदिवडें गांवचे असून ही मुलगी नांदिवड्यास सती गेली अशी माहिती नांदिवड्याच्या वैद्य घराण्यांतील जुनी माणसें सांगतात. या बाईचें सतीवृंदावनही नांदिवड्यास आहे.

* (टीप २:—भाऊंची वडील कन्या बयाबाई हिचें लग्न झाल्यापासून पंधरा दिवसांचे आंतच तिचा पति वारला. मुलीचें वय त्यावेळीं सात आठ वर्षांचें होतें. प्रसिद्ध रामशास्त्री प्रभुणे व काशींतील पंडीत यांनीं या मुलीचा पुर्नविवाह करण्यास हरकत नाहीं असा शास्त्रार्थ भाऊंना दिला होता. पण प्रचारांत नाहीं ती गोष्ट करण्यास भाऊ तयार झाले नाहींत अशी हकीगत परशुराम भाऊंचे आद्य चरित्रकार श्री. निगुडकर यांनीं आपल्या ग्रंथांत दिली आहे. तथापि कै. खरे शास्त्री यांनीं आपल्या "अधिकारयोग" या सुप्रसिद्ध ग्रंथांत पुर्नविवाहाच्या चर्चेची ही हकीगत सर्वस्वीं निराधार आहे असें सिद्ध केलें आहे. अलीकडेच बेळगांवच्या रानड्यांनीं "नारायणरावाचा खून कीं आत्महत्या" हें जें एक भिकार आणि खोडसाळ चोपडें प्रसिद्ध केलें आहे त्यांत त्यांनीं या मुलीच्या पुर्नविवाहासंबंधीं कांहीं विलक्षणच माहिती दिली आहे. पटवर्धनांनीं शंकरचार्यांचे मठ लुटले म्हणून शंकराचार्यांनीं भाऊंच्या मुलीच्या पुर्नविवाहास मान्यता दिली नाहीं अशी विचित्र हकीगत रानड्यांनीं दिली आहे. (रानडे खंड २ पा. ६८५ ). पण ही हकीगत साफ खोटी आहे. पेशवाईंत धर्म विषयक गोष्टींचा निर्णय

आज्ञाधारक, पराक्रमी पुत्र आणि साध्वी, प्रेमळ स्त्री लाभल्यामुळें भाऊंचा संसार सुखाचा झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. भाऊंची स्त्री मात्र भाऊंच्या हयातींतच स. १७८५ मध्यें वारली ( खरे ८-२८५५ ) भाऊंनीं दुसरें लग्न केलें नाहीं. परशुरामभाऊ हे धार्मिक वृत्तीचे होते. त्यांची धर्मनिष्ठा जाज्वल्य होती. स्वाऱ्या शिकाऱ्यांचा लकडा सारखा पाठीमागें असून सुद्धां स्नानसंध्या, जपजाप्य वगैरे गोष्टी ते नियमानें करीत. गणपतीपुळें व राजापूरची गंगा या ठिकाणीं भाऊ जात असत ( खरे ८-३०८४). चिमाजी अप्पास वस्त्रें झालीं त्या दिवशीं भाऊंनीं पुळयाच्या गणपतीस चौघडा देवविला ( खरे ९-३७९४ ). परशुरामभाऊ हे व्रतस्थ वृत्तीनें वागणारे होते. ते एकपत्नी व्रतानें वागणारे होते असा त्यांच्या संबंधानें उल्लेख

---

लावण्याचा अधिकार शंकराचार्याचा नव्हता. या कामाकरितां पेशव्यांच्या पदरीं शास्त्री, पंडीत असत ते निकाल देत. विशेष महत्वाची बाब असली तर विद्वानांची सभा भरवून बहुमतानें निर्णय घेत. उदाहरणार्थ पेशवाईंत पंचांगाचा वाद निघाला तेव्हां सर्व हिंदुस्थान मधील तज्ञ बोलावून निकाल लावल्याचें पेशवे दप्तरमध्यें नमूद आहे.; तसेंच ऋग्वेदी, आपस्तंभ ब्राह्मणांचा वाद उपस्थित झाला तेव्हां त्याचा निर्णय विद्वानांची सभा भरवूनच लावलेला आहे. तात्पर्य कोणताहि वादविषयक धार्मिक प्रश्न शंकराचार्याकडे पाठविल्याचें पेशवाईत आढळत नाहीं. अर्थातच शंकराचार्याला निकाल देण्याचा अधिकारच नव्हता; अशा स्थितींत शंकराचार्याची मान्यता भाऊंच्या मुलीच्या पुनर्विवाहाला होती कीं, नव्हती हा प्रश्नच उभ्दवत नाहीं. शंकराचार्यांचे मठ लुटण्याची कारणें अगदीं निराळीं होतीं. तीं मुख्यत: राजकीय होतीं. वेळीं अवेळीं शंकराचार्य शत्रूला सामील असत. अशा शंकराचार्यांचे मठ लुटलें गेले यांत कांहीं आश्चर्य नाहीं. श्रृंगेरीचे स्वामी टिपूला यश येण्याकरितां अनुष्ठानें करीत होते ही हकीगत पूर्वीं या ग्रंथांत आलीच आहे. अशा शंकराचार्यांचे मठ पेशव्यांनीं साफ बुडवून टाकले नाहींत हेंच आश्चर्य आहे. तात्पर्य रानडयांनीं लिहिलेली हकीगत सर्वस्वीं निराधार आहे. )

आहे. भाऊंनीं बायको वारल्यापासून उंची पोशाख केला नाहीं. बायको मेल्यावर ते नेहेमीं पांढरा पोशाख करीत (खरे ९--३८४१) स्नानसंध्या वगैरे नित्यकर्म ते आजारीपणांत सुद्धां चुकवीत नसत. भाऊ संध्या आजारीपणामुळें निजूनच करतात असा उल्लेख आहे (खरे ११--४८६१). एका स्वारीच्या प्रसंगीं किल्ल्यावर हल्ला चढविण्याच्या वेळीं भाऊ पुजेला बसले होते. हल्ल्याची वेळ होतांच पुजा अर्धी टाकून हल्ला करावयास गेले. व काम पुरें होतांच पुन्हां पुजा पुरी करून नंतर भोजन केल्याची हकीगत या ग्रंथांत पूर्वीं आलीच आहे. प्रदोषाच्या दिवशीं निजामाशीं खलबत होण्याचें ठरलें व वाटाघाट रात्रभर चालू राहिल्यामुळें भाऊंना प्रदोष सोडतां आला नाहीं ही हकीगतहि पूर्वीं आलीच आहे. अशा तऱ्हेची धार्मिक वृत्ती असल्यामुळें भाऊंनीं दानधर्महि फार केला. अतीत, वैदिक, अभ्यागत, पुराणिक यांची ते योग्य संभावना करीत. विद्वान् व पूज्य अशा शास्त्री पंडितांस व वैदिकांस भाऊंनीं इनामें व वर्षासनें दिलीं. देवालयें बांधणें व त्यांना देणग्या देणें हीं कामेंहि भाऊंनीं फार केलीं.

परशुरामभाऊंनीं श्रीकाशी क्षेत्रीं एक शिवालय बांधलें व लक्ष ब्राह्मणांस इच्छा भोजन घातलें तेथें भाऊंनीं एक वाडा बांधला व अतीत, संन्यासी वगैरेंचा परामर्ष तेथें घेतला जावा अशी व्यवस्था केली. *

---

* (टीप— भाऊंच्या बरोबर टिपू विरुद्ध झालेल्या लढाईंत हजर असलेल्या मूर साहेबानें भाऊंच्या दानधर्माविषयीं खालीलप्रमाणें लिहिलें आहे.

" His (Bhau's) charity is very extensive. Not to mention what he does in a domestic way he has a house in Benares where at a great expense he daily feeds a number of poor persons. Charity, it is said, covereth a multitude of sins and be the Bhau's what they may, if so judged their nakedness will offend no one. " (Muirs Narrative page 389)

पंढरपूर येथें भाऊंनीं पांडुरंगाचा सभामंडप, श्रीमारुतीचें देवालय व नगारखान्याकरितां कमान बांधिली. श्री. अमृतेश्वराच्या देवालयाचा जीर्णोद्धार केला. या क्षेत्रींहि भाऊंनीं श्रीविठ्ठल मंदिरा सन्निध एक वाडा बांधला व तेथें आल्या गेल्याची सोय होण्याकरितां अन्नछत्र ठेविलें. पुणतांबें येथें श्रीगोदावरीच्या कांठीं शिवालय घांट व वाडा बांधला आणि गांवकुसू केलें.

परशुरामभाऊंचा रहावयाचा गांव तासगांव या ठिकाणीं भाऊंनीं श्रीगणपतीचें देवालय बांधलें. गणपति हें भाऊंचें आराध्य दैवत् असे. हे देवालय फार शोभिवंत व भव्य व्हावें म्हणून भाऊंनीं दूरदूरचे कारागीर आणले होते. या देवालयांत श्रीगणपती पंचायतनाची स्थापना शके १७०१ फाल्गुन शु ॥ २ या दिवशीं भाऊंनीं सुमुहूर्तावर मोठ्या समारंभानें व थाटमाटानें केली. पेशवे दरबारांत खटपट करून भाऊंनीं या देवस्थानाकरितां दोन हजार रुपयांची जमीन व दोन हजार रुपये वर्षासन करून घेतलें. तासगांव येथें हटकेश्वर म्हणून एक अनादि देवस्थान होतें त्याचाहि भाऊंनीं जीर्णोद्धार केला. चिंचणी येथें भाऊंनीं परशुरामेश्वराचें देवालय बांधलें व भिलवडी येथें श्रीकृष्णाबाईस मोठा घाट बांधला. पुणें येथील तुळशीबागेंतील श्रीरामास भोकारी हा गांव भाऊंनीं इनाम दिला. परशुरामभाऊंचा मूळ गांव कोतवडे येथील कुसुमेश्वर देवास प्रतिवर्षी महारुद्राभिषेक करण्याची भाऊंनीं व्यवस्था केली होती. *

* ( **टीप** — पटवर्धनांचा मूळ गांव कोतवडें येथे पटवर्धनांचें मूळ घर अजून आहे. तें हल्लीं सांगलिकरांच्या ताब्यांत असून तेथें देवपूजा, नैवेद्य वगैरे सांगलीकरांकडून चालू आहे. पटवर्धनांचें कुटुंब वाढल्यावर परशुरामभाऊंनीं कोतवडें येथें स्वतःचें असें निराळे घर बांधलें. त्या घरांत जोशी म्हणून विद्वान ब्राह्मण घराणें रहात असतें. हें घर हल्लीं जमखिंडीकरांच्या ताब्यांत असून तेथें जोशी यांचें घराणें आज नांदत आहे. हें जोशी घराणें वेद विद्येविषयीं फार प्रसिद्ध असून त्यांच्या घरांत नामांकित वैदिक होऊन गेले. हल्लीं त्या घरांत वे. शा. सं. रघुनाथ भट जोशी हे रहात असून ते पहिल्या प्रतीचे वैदिक आहेत. कोतवडें गांवांत दुसरें महत्वाचें देवस्थान श्रीमहालक्ष्मी हें होय या देवस्थानाचाहि जीर्णोद्धार हल्लीच्या जमखिंडीकरांचे वडील यांनीं तीस चाळीस वर्षांपूर्वीं केला.)

को.

कोंकणांतून त्या काळीं हजारों ब्राह्मण देशावर येत त्यांच्या सोई-करितां परशुरामभाऊंनीं आंबेघाट व अणस्कुरा घाट यांवर मोठ्या खर्चानें अन्नछत्रें ठेविलीं होतीं. चिचणी गांवाजवळ भाऊंनीं मोठें धरण बांधले होतें. आणि जमखिंडी येथें मोठा बळकट किल्ला बांधिला होता. *

परशुरामभाऊंनीं केलेले दानधर्म व त्यांची कौटुंबिक माहिती दिल्या-वर भाऊंच्या अंगीं असलेल्या वैयक्तिक गुणावगुणांची चर्चाहि करणें जरूर आहे. परशुरामभाऊ टिपूवरील मोहिमेंत असतांना त्यांच्या स्वारींत अस-लेल्या मूर साहेबानें भाऊ हे शरीरानें कसे होते तें खालील प्रमाणें लिहिलें आहे–

" Parshuram Bhau appears to be about fifty or fiftyfive years of age, is not a very well looking person, but has something interesting and a great deal of good nature in his contenance. His stature is rather under the common size. " ( Muirs Narrative P. 17)

उत्तर पेशवाईंत जीं पराक्रमी माणसें झालीं त्यांत भाऊंची प्रामुख्यानें गणना केली पाहिजे. महादजी शिंदे, नाना फडणीस, हरिपंत फडके आणि परशुरामभाऊ हे चार थोर पुरूष उत्तर पेशवाईत मराठ्यांना लाभल्यामुळें पानिपतच्या अपयशानंतर मराठे पुन्हा प्रबळ झाले व इंग्रजांसारख्या जहांबाज लोकांचेंहि मराठ्यांपुढें कांहीं चाललें नाहीं. परशुरामभाऊ हे उपजतच लढाऊ वृत्तीचे होते. शौर्य, धैर्य आणि साहस हे भाऊंचे प्रमुख गुण होत, वयाच्या चौदाव्या वर्षी भाऊ रणांगणावर उभे राहिले ते वयाला साठ वर्षें होईपर्यंत सारखे रणांगणावरच वावरत होते. एवढ्या अवधींत त्यांनीं कधींहि शत्रूला पाठ दाखविली नाहीं. शेवटच्या लढाईंतहि

* टीपः—परशुरामभाऊनीं केलेल्या दान धर्माची व त्यांनीं केलेल्या सार्वजनिक कामाची माहिती श्री. निगुडकर यांच्या ग्रंथाच्या आधारें दिली आहे.)

शत्रूचा जोर ज्यास्त असतांना व आपल्या जवळ फार थोडी माणसें असतांना शत्रु समोर येतांच भाऊ एकदम घोडेस्वार होऊन लढाईस सिद्ध झाले व शेवटीं रणांगणावरच त्यांनीं आपला देह ठेविला. परशुरामभाऊंच्या रण-कौशल्याबद्दल स्वकीय व परकीय लोकांनीं मुक्तकंठानें स्तुति केली आहे. टिपूविरुद्ध इंग्रजांनीं सन १७९२ मध्यें जी मोहिम केली त्यांत मराठे सामील होते. मराठ्यांतर्फे परशुरामभाऊंची नेमणूक झाल्यामुळें इंग्रजांनीं समा-धान मानल्याचें टिपूवरील मोहिमेंत पूर्वीं सांगितलेंच आहे. दुसऱ्याहि अनेक ठिकाणीं भाऊंच्या शूरपणाबद्दल चांगले उद्गार इंग्रजांनीं काढल्याचें पुणें रेसिडेन्सि रेकॉर्डमध्यें नमूद आहे ( P. R. C ३–५५,६७) स्वकीयांचेहि उद्गार तसेच आहेत. सावशीच्या लढाईत पटवर्धनांचा पराजय झाला. पण त्या लढाईंत भाऊ हजर नव्हते. भाऊ हजर नसल्यामुळें असा अनर्थ पटव-र्धनांवर ओढवला असें नानांनीं लिहिलें आहे. नानांनीं या बाबतींत भाऊंस लिहिलें " आपल्यासारखे कृतकर्मे त्या फौजेंत असते तर असें झालेंच नसतें." (खरे ६–१९८९)हैदर, टिपू, निजाम व इंग्रज अशा मोठ्या रणशूर व बलाढ्य शत्रूंना परशुरामभाऊंनीं आपल्या समशेरीनें जर्जर केलें. इंग्रजां-जवळ झालेल्या लढ्यांत जनरल गॉडर्डचा पराभव करण्यांत परशुराम-भाऊंचा मोठाच भाग होता हें त्या प्रकरणांत पूर्वीं लिहिलेंच आहे. कर्नाट-कांत पेशव्यांचा अंमल स्थिर होण्यास परशुरामभाऊंचेच पराक्रम कारणी-भूत झाले. खडर्याच्या लढाईंत परशुरामभाऊ मुख्य सेनापतीच होते पहि-ल्याच झटापटीस भाऊ जखमी झाले. परंतु तशाहि स्थितींत सैन्याचें योग्य नेतृत्व करून भाऊंनीं निजामाला दातीं तृण धरावयास लाविलें. सवाई माधवरावांच्या मरणानंतर पेशवाईत जो गोंधळ माजला त्यांत भाऊंना राजकारणात लक्ष घालावें लागलें. राजकारण हा भाऊंचा मूळ प्रकृति स्वभाव नव्हे; पण राज्याच्या हिताच्या दृष्टीनें व पेशव्यांबद्दलच्या स्वामि-निष्ठेनें भाऊ राज्यकारभारांत पडले. हें राजकारण भाऊंच्या आंगलट आलें व त्यांत त्यांना कैद भोगण्याचा प्रसंग आला. तो काळ सर्वत्र अंदाधुंदीचा असल्यामुळें जिकडे तिकडे बंडाळी माजली. सातारकर छत्रपतींनीं पेशव्यांचा

अंमल झुगारून देण्याचा प्रयत्न केला. त्यावेळीं मराठी राज्यांत भाऊंच्या दर्जाचा दुसरा कोणीच सेनापति नव्हता. सातारकरांचें संकट उत्पन्न झाल्यावर धाकटचा बाजीराव साहेबांना परशुरामभाऊंची आठवण झाली. परशुरामभाऊशिवाय या संकटाचे निवारण करण्यास कोणी समर्थ नाहीं हें पाहून बाजीरावांनीं भाऊंची कैदेंतून सुटका केली. सुटका होतांच भाऊंनीं सातारकरांचा बंदोबस्त करून बाजीरावाला स्वास्थ्य मिळवून दिलें. पण बाजीराव हे खाल्याघरचे वासे मोजणारे होते. सातारचें बंड निवारतांच त्यांनीं भाऊंच्यामागें सुटकेबद्दल दंड भरण्याचा लकडा लाविला. दंडाची रक्कम भरण्यास भाऊ असमर्थ असल्यामूळें भाऊंना हा पुढचा काळ मोठचा संकटांत काढावा लागला. अशा स्थितींत भाऊंनीं स्वसंरक्षणाकरितां फौज जमवून कर्नाटकांत स्वारीस जाण्याचें ठरविलें. या स्वारींत त्यानीं अनेक विजय मिळविले व बराच मुलूख काबीज केला. भाऊंचे हे सर्व पराक्रम मागील प्रकरणांत आलेच आहेत. ही स्वारी चालू असतांच भाऊंचा कोल्हापूरकरांशीं संबंध आला. भाऊची प्रकृतीहि या स्वारींत बरी नव्हती. पण भाऊंच्या वजनामुळें व मराठे शिलेदारांचें भाऊच्या ठिकाणीं प्रेम असल्यामुळें पगाराची फिकीर न करतां भाऊजवळ फौज धर धरून होती. स्वारीचें काम भाऊंचे कर्ते सवरते पुत्रच पहात असत. अशा स्थितींत मूळ फौजेपासून जरा दूर असलेल्या भाऊंच्या गोटावर कोल्हापूरकरांनीं अचानक हल्ला करून भाऊंना ठार मारलें. पण अशा आकस्मिक संकटांत सुध्दां भाऊनीं शत्रूला पाठ दाखविली नाहीं. जे कांहीं लोक जवळ होते त्यांच्यासह भाऊ शत्रूशीं सामना देण्यास उभ राहिले. या सामन्यांत भाऊ पाडाव झाल्यावर कोल्हापूर करांनीं त्यांचा अत्यंत हृदयद्रावक रीतीनें शेवट केला ही हकीगत मागील प्रकरणांत दिलीच आहे. कोल्हापूरकर कसेही वागले असले तरी परशुरामभाऊंनीं मात्र शूराला योग्य असेंच वर्तन केलें व आपली कीर्ति अजरामर करून ठेविली. सवाई माधवरावांच्या कारकीर्दींत पेशव्यांच्या राज्याची जी भरभराट झाली त्याचें मुख्य श्रेय भाऊंनाच आहे. पेशव्यांचे जरातचे सेनापति हरीपंत

फडके होते त्यांनींच ही गोष्ट कबूल केली आहे. हरीपंत एके ठिकाणीं म्हणतात " आम्हांस भरंवसा भाऊंचा. " (खरे ५--१८०५) नाना फडणीस पेशव्यांचे मुख्य प्रधान होते त्यांचाहि अभिप्राय असाच आहे. नाना म्हणतात " भाऊंसारखा सरदार दौलतींत नाहीं." (खरे ११--४५७४) तात्पर्य परशुरामभाऊंच्या शौर्याबद्दल आणि रणकौशल्याबद्दल शत्रु मित्रांचे अभिप्राय सारखेच होते.

परशुरामभाऊ जसे रणशूर होते तसेच ते स्वामिनिष्ठहि होते. भाऊंची स्वामिनिष्ठा मतलबी नसून प्रेमळ आणि कळकळीची होती. पेशव्यांच्या राज्याबद्दल भाऊंना अभिमान होता. पेशव्यांचें राज्य हें हिंदूंचें राज्य असून तें कायम टिकावें अशी भाऊंची इच्छा होती. भाऊंना हिंदु राज्याचा अभिमान होता हें दर्शविणारा उल्लेख त्यांच्या एका पत्रांत आला आहे (खरे ५-१३०१) पेशवे हे हिंदु राज्याचे प्रतिनिधी होते. त्यांच्या हाताखालीं नोकरी करण्यांत भाऊंना मोठा अभिमान वाटत असे. पेशव्यांबद्दलची ही स्वामिनिष्ठा भाऊंनीं शब्दांत व प्रत्यक्ष कृतींतहि सर्व आयुष्यभर उतरून दाखविली. सर्व पटवर्धन घराणेंच पेशव्यांविषयीं स्वामिनिष्ठ होतें. सवाई माधवराव लहान असतांना त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी पटवर्धनांनींच सांभाळली होती. सवाई माधवरावाबद्दल भाऊंनीं काढलेले उद्गार त्यांची कळकळ व प्रेमळपणा दाखविणारे आहेत. सवाई माधवराव लहान मूल असतांना भाऊ दर्शनास गेले; त्यावेळीं त्या लहान श्रीमंतांना पाहून भाऊंच्या तोंडून उग्दार निघाले "श्रीमंतांची लीला काय लिहावी? केवळ ईश्वर स्वरूपी आहेत." (खरे ७--२३६१) परशुरामभाऊंनीं पेशव्यांची नोकरी इमानें इतबारें बजाविली व कोणत्याहि कामगिरीला नाहीं असें म्हटलें नाहीं. खर्ड्याच्या लढाईच्या वेळीं भाऊंच्या मध्यस्थीनें मराठ्यांची आपणावर होणारी स्वारी टाळतां आली तर पहावी असे प्रयत्न निजामानें केले होते; पण भाऊंनीं निजामाला खडखडीत जबाब दिला तो खर्ड्याच्या लढाईच्या प्रकरणांत दिलाच आहे. भाऊंनीं निजामाला स्पष्टच

सांगितलें कीं पेशव्यांच्या न्याय्य मागण्या जर मान्य न झाल्या तर पेश-व्यांच्या हुकुमाप्रमाणें प्राणांचे मोल देऊनहि पेशव्यांचे हुकूम अमलांत आणणें हेंच माझें कर्तव्य आहे. (P. R. C. ४--१५१) परशुरामभाऊंच्या या स्वामिनिष्ठेला गालबोट लावतां आलें तर पहावें असा उद्योग इंग्रजांनीं करून पाहिला., पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. सन १७९२ सालीं टिपू विरुद्ध जी मोहीम झाली त्यांत परशुरामभाऊंचा इंग्रजांशीं संबंध आला. पेशव्यांच्या दरबारीं असलेल्या या मोहऱ्याला फोडतां आलें तर पहावे म्हणून इंग्रजांनीं एक दोस्तीच्या तहाची यादी करून ती भाऊंकडे पाठविली. ही यादी आपटेकृत पटवर्धन घराण्याचा इतिहास या ग्रंथांत छापिली आहे. (प. ध. इतिहास पा. २१७--२७) या यादींत शेवटीं असें लिहिलें आहे कीं पेशव्यांचें राज्य असेपर्यंत ही यादी गुप्त समजली जावी. तात्पर्य असें कीं पेशव्यांचें राज्य आज ना उद्यां आम्हीं घेणार, तरी पेशव्या-नंतर तुमचें संस्थान आम्हीं चालवूं असें मधाचें बोट इंग्रज भाऊंना दाख-वीत होते,. पण परशुराभाऊंनीं या यादीला मान्यता दिल्याचें कोठेंहि उपलब्ध नाहीं. फक्त इंग्रजांनीं भेदनीतीचा केलेला हा उद्योग दाखविणारा कागद भाऊंच्या दप्तरीं पडून राहिला इतकेंच. हा कागद फक्त एक तर्फी असून तो भाऊंच्या पुढें सादर केलेली एक योजना (proposal) वजा आहे. भाऊ व इंग्रज यांमध्यें झालेला करारनामा नव्हे. हा कागद भाऊंच्या दप्त-रांत सांपडला एवढ्यावरून परशुरामभाऊंच्या स्वामिनिष्ठेस कोणत्याहि तऱ्हेचा कमीपणा येत नाहीं. पटवर्धन घराण्याचे इतिहासकार आपटे यांनींहि असेंच लिहिलें आहे. ते म्हणतात "अशा तऱ्हेची गुप्त कलमबंदी याद कंपनी सरकारकडून जरी भाऊंचे हातीं आली तरी परशुरामभाऊ मरे-पर्यंत स्वामीसेवेस अंतरले नाहींत." (प. ध. इ. पा. २२७) या यादीवरून एवढें मात्र सिद्ध होतें कीं पेशव्यांचें राज्य घशांत घालण्याला टपून बसलेले इंग्रज पेशव्यांच्या स्वामिभक्त सरदारांस स्वामिभक्तीपासून च्युत करण्याचा प्रयत्न करीत होते. इंग्रजांचा हा उद्योग सन १७९२ सालीं सफल झाला नाहीं तरी त्यांनीं आपली चिकाटी मात्र सोडली नव्हती. महादजी शिंदे,

हरिपंत फडके परशुरामभाऊ आणि नाना फडणीस हीं माणसें जिवंत असेपर्यंत पराक्रमानें मराठ्यांना नामोहरम करण्याचें सामर्थ्य इंग्रजांना नव्हतें हें त्यांनींच लिहून ठेविलें आहे. अशा स्थितींत भेदनीति हा एकच मार्ग उरतो व त्याचाच अवलंब इंग्रज काळवेळ पाहून करीत असत. परशुरामभाऊंना फोडण्याचा आणखी एक प्रयत्न इंग्रजांनीं सन १७९९ मध्यें केला असल्याचें पूना रेसिडेन्सी रेकॉर्डवरून दिसून येतें. कलकत्याच्या गव्हर्नर जनरलनें मुंबईच्या गव्हरर्नरला एक पत्र पाठविलें त्याची नक्कल गव्हर्नर जनरलनें पुण्यास इंग्रजांचा वकील पामर हा होता त्याला पाठविली. त्या नकलेबरोबर एक पत्र गव्हर्नर जनरलनें पुण्यास पामरला पाठविलें त्यांत गव्हर्नर जनरलनें खालीलप्रमाणें लिहिलें आहे.

"I desire this communication at present for your private information. I shall, in the event of its becoming necessary to open negotiations with Parsharam Bhau mentioned in the enclosure, furnish you with the necessary instructions for disclosing the matters to the Peshwa with such explanations as I may judge expedient." ( P.R.C. 6-248 )

वरील पत्रावरून भाऊंना फोडण्याचा प्रयत्न करण्याचा इंग्रजांचा विचार होता असें दिसतें; आणि हा काळहि असा होता कीं, यावेळीं बाजीरावी अंमल सुरू होता. धाकटे बाजीराव आणि परशुरामभाऊ यांचें सूत नव्हतें. अशा स्थितींत बाजीरावाविरुद्ध भाऊंना उठवावें असा इंग्रजांचा विचार होता असें दिसतें. पण भाऊ मात्र मरेपर्यंत इंग्रजांच्या या भेदनीतीला बळी पडले नाहींत. *

---

* ( टीपः— भेदनीतीनें मराठे हटणार नाहींत ही गोष्ट इंग्रजांच्या लक्षांत आली होती; पण त्यांना फोडण्याचें निदान नाना फडणीस जिवंत

परशुरामभाऊंचा काळ बहुतेक स्वारीशिकारींतच गेल्यामुळें भाऊंना ख्याली खुशाली करण्याला वेळच नव्हता, व त्यांचा प्रकृतिस्वभावहि तसा नव्हता. तथापि मर्दानी खेळाची भाऊंना आवड होती असें दिसतें. सवाई माधवरावाला भाल्याच्या खेळाचा ( Lance exereise ) फार नाद होता व हा खेळ परशुरामभाऊबरोबर तो खेळत असतां एक इंग्रज गृहस्थ

---

असेपर्यंत दुसरें कांहीं साधन नसल्यामुळें वेळीं अवेळीं इंग्रज भेदनीतीचा अवलंब करीत. पण या भेदनीतीपासून कांहीं उपयोग न होतां उलट मराठ्यांत फूट पाडण्याचा आपण प्रयत्न करतों अशी मराठ्यांना शंका येण्याचा संभव असल्यामुळें हा भेदनीतीचा उद्योग आपण सोडून द्यावा असें कलकत्याचा गव्हर्नर जनरल सर जॉन शोअर यानें पुण्याचा रेसिडेंट मॅलेट् यांस एका पत्रांत लिहिलें आहे. सर जॉन शोअर लिहितो:—

" Admitting with you the general policy of dis uniting the interest of the great feudatories of the Maratha State, I should think the object under the very great difficulties attending a successful pursuance of it, ill--obtained in any degree which we could hope to accomplish, at the risk of exciting the distrust or enmity of the Poona administration. " ( P.R.C. 2-210 )

भेदनीतीनें मराठे फुटणारे नाहींत, युद्ध करूनहि मराठ्यांमध्ये फूट पाडतां आली नाहीं; उलट खडर्याच्या लढाईनंतर मराठे ज्यास्तच प्रबळ झाले तेव्हां ते आतां आपल्यावर आक्रमण करतील कीं काय अशी भीती इंग्रजांना वाटू लागली. ही भीति टाळण्याचें एकच संभाव्य कारण इंग्रजांच्या वकिलाला सुचलें व तें म्हणजे नाना फडणीसाचा मृत्यु हें होय. नाना फडणीस आतां म्हातारा झाल्यामुळें लौकरच मेला तर मराठ्यां

हजर होता.. त्यानें पेशव्याचा भाऊंबरोबरचा खेळ पाहून खालीलप्रमाणें लिहिलें आहे.

" I was satisfied with a sight of this prince ( Sawai Madhavrao ) exercising the long spear with Parsharambhau and other celebrated Maratha Chiefs. A vast number of sepoys and other attendants surrounded the place which was allotted for the purpose of his exercise. In the centre was placed a small pile of stones. The Peshwa after riding round the course

---

पासून आपल्याला भीति बाळगण्याचें कारण नाहीं असें या वकिलानें लिहिलें आहे. हा वकील मॅलेटचा असिस्टंट युथाफ नांवाचा होता. त्यानें या बाबतींत खालील प्रमाणें लिहिलें आहे.

" We have still a further prospect of security to ourselves in the consideration that the present flourish ing and formidable state of the Maratha Empire is principally ascribable to the personal abilities and influence of Nana and that his death will probably make a very material alteration in the State. He is now an elderly man and is very far from robust. " ( P.R.C. 2–254 )

परशुरामभाऊनंतर थोड्यांच दिवसांनीं नाना वारले आणि इंग्रज वकिलाच्या भविष्याप्रमाणें मराठेशाहींत फूट पाडण्याला इंग्रजांना चांगलीच संधी सांपडली. नानानंतर मराठेशाहींत कोणीच कर्तृत्ववान माणूस न राहिल्यामुळें इंग्रजांचें कारस्थान यशस्वी होऊन मराठेशाही इंग्रजांच्या घशांत उतरली.)

with a long spear, on the end of which was stuck a small ball covered with red cloth, approached the little pile at full gallop. He struck it and it fell, after which he retreated, loudly applanded for his successful efforts. Parshrambhau next advanced in the same manner. He aimed at the pile with his spear, but did not hit it. Several other Chiefs made the like attempt, but none were successful. One of them afterwards rode furiously round the course pursued by the Peshwa, who endeavoured to unhorse him with his spear. He defended himself while retreating, but the prince by his superior skill in the use of the spear soon accomplished what he pursued him for. I was highly pleased to see such exquisite feats of horsemanship. Their horses were thoroughly trained for the purpose. On a full gallop at the word of command given, they would make a full stop. The Marathas in general spare no trouble in training this noble animal for the field." ( Poona in by-gone-days, by D. B. Parasnis p. 122—23 )

मर्दानी खेळाप्रमाणेंच भाऊंना बैठे खेळ खेळण्याचाहि नाद होता असें दिसतें. परशुरामभाऊस सोंगटया खेळण्याकरितां पेशव्यांचें आमंत्रण गेल्याचा उल्लेख आहे, ( खरे ९-३४८५ ) भाऊंना बुद्धिबळें व गंजिफाहि खेळण्याची आवड असावी असें वाटतें. ✿

---

✿ ( टीप--पट्टणकुडीच्या लढाईच्यावेळीं परशुरामभाऊंवर कोल्हापूरकर हल्ला करावयास आले त्यावेळीं भाऊ बुद्धिबळें खेळत बसले होते.*

परशुरामभाऊंना कसलेंहि व्यसन असल्याचा कोठें उल्लेख नाहीं. त्यांचें खासगी वर्तन अत्यंत निर्मळ आणि पवित्र होतें. भाऊ हे धर्मनिष्ठ होते त्यांच्या मृत्यूनंतर जे उद्गार मोठ्या लोकांनीं काढले त्यांत भाऊ गणपतीरूप झाले असें बाळोबा तात्यांनीं लिहिलें आहे. भाऊंना मृत्यूहि अंगारकी चतुर्थीच्या दिवशीं आला. भाऊनीं एकपत्नीव्रतहि पाळल्याचा उल्लेख आहे. तात्पर्य भाऊंच्या अंगीं दुर्गुण असा कोणताहि नव्हताच. व्यसनच म्हणावयाचें झाल्यास परशुरामभाऊंना चहाचें व्यसन होतें असें दिसतें. इंग्रजांच्या सहवासानें कदाचित् हें व्यसन त्यांस लागलें असावें. परशुरामभाऊंकरतां चहा, बुंद, व चहादाणी मागविल्याचा उल्लेख आहे. (खरे ११-४८७३).*

एकंदर विचार करतां भाऊ हे एक आदर्श पुरूष होते यांत शंका नाहीं. पहिल्या प्रतीचे सेनानायक आणि पेशव्यांचे एकनिष्ठ सेवक या दृष्टीनें परशुरामभाऊंची गणना उत्तर पेशवाईंतील थोर पुरुषांतच केली पाहिजे. आतां भाऊंच्या ठिकाणीं कोणतेच दोष नव्हते असा अर्थ नाहीं. मनुष्यमात्राच्या ठिकणीं गुणदोष हे असणारच; तथापि एकंदर विचार करतां दोषांपेक्षां गुणांचें प्रमाणच भाऊंच्या ठिकाणीं ज्यास्त असल्यामूळें भाऊंना

---

*(टीप:—भाऊंस चहाचें व्यसन होतें तसें नाना फडणीस यांस तपकिरीचें व्यसन होतें असें दिसतें नानास तपकिरीकरतां तंबाखू मागविल्याचा उल्लेख एका पत्रांत आहे. (खरे ११-४८५१)

---

*असें भाऊंचे आद्य-चरित्रकार श्री. निगुडकर यांनीं आपल्या ग्रंथात लिहिलें आहे. (पा. १९०) पट्टणकुडीच्या लढाईच्या या शेवटच्या प्रसंगांचीं अनेक पत्रें खरे संग्रहांत आहेत; तथापि त्यांत भाऊ बुद्धिबळें खेळत असल्याचा उल्लेख कोठें आढळत नाहीं शिवाय यावेळीं भाऊंची प्रकृतीहि बरी नव्हती म्हणून त्यांना मागें गोटांत ठेवून त्यांचे पुत्र लढाईची सर्व व्यवस्था पहात होते. या एकंदर परिस्थितीवरून कोल्हापूरकरांचा हल्ला आला त्यावेळीं भाऊ बुद्धिबळें खेळत होते हें श्री. निगुडकरांचें लिहिणें बरोबर असेल असें वाटत नाहीं.)

मराठी ... सं. क्र. ...

आदर्श पुरुषच म्हणणें जरूर आहे. भाऊंनीं आपल्या राजवटींत कांहींच चुका केल्या नाहींत असें नाहीं. परशुरामभाऊ हे मोकळ्या मनाचे आणि निष्कपटी असल्यामुळें आंत एक आणि बाहेर एक अशी वर्तणूक त्यांना साधली नाहीं. कपटी लोकांनीं भरलेल्या जगांत सरळ वर्तनाचा परिणाम लागत नाहीं हें भाऊंना अनुभवानें समजून आलें. नाना फडणीस व बाळोबा तात्या ह्या दोन मुरब्बी मुत्सद्यांच्या झटापटींत परशुरामभाऊ तोंडघशी पडले. मुत्सद्दीपणाच्या बाबतींत परशुरामभाऊ हे नानाफडणीसाशीं सामना देण्यास समर्थ नव्हते. चिमाजी अप्पाला गादीवर बसविण्याच्या कारस्थानांत भाऊंनीं राजकारणांत प्रवेश केला तो त्यांच्या चांगलाच आंगलट आला. चिमाजीला राज्यावर बसवितांना त्याचा थोरलाभाऊ बाजीराव याला कैद करून आपल्या ताब्यांत घ्यावा अशी सूचना नानांनीं भाऊंना दिली होती. ( मॅक्डोनाल्ड कृत नानाचें चरित्र पा० १३१–३२ ) पण भाऊंनीं ही महत्वाची सूचना मानली नाहीं व बाजीरावाला शिंद्याच्या ताब्यांत राहूं दिला ही मोठी चूक झाली. बाजीराव शिंद्याच्या ताब्यांत राहिल्यावर चिमाजीअप्पाची गादी चालणार नाहीं अशी नानांची पक्की खात्री होती; पण शिंद्यांनीं चिमाजी अप्पाला राज्यावर बसविण्यास मान्यता दिल्यामुळें बाजीराव शिंद्याच्या ताब्यांत असला तरी कांहीं हरकत नाहीं असें सरळ मार्गी परशुरामभाऊंस वाटलें व त्यांनीं नानाच्या सूचनेकडे दुर्लक्ष केलें. शिंद्यांनीं चिमाजी अप्पास मान्यता दिली तरी ती कायम किती टिकेल याबद्दल नानाला जबरदस्त शंका होती. शिंद्यांनीं पूर्वी नानाच्या दत्तकाच्या योजनेला मान्यता दिली असून सुद्धां पुन्हां बाजीरावाकडून जादा जहागिरीचीं वचनें मिळतांच बाजीरावाला गादीवर आणण्याचा प्रयत्न केला होता. नानाप्रमाणें भाऊंनाहि ही हकिगत माहित होतीच. शिंद्यांच्या या अशा वर्तणुकीमुळें पेशवाईचा वडील वारस बाजीराव याला शिंद्याच्या ताब्यांत ठेवणें धोक्याचें होतें. पण भाऊंनीं तिकडे दुर्लक्ष केल्यामुळें नाना व भाऊ यांचें जबरदस्त वितुष्ट आलें व परशुरामभाऊंचा हा धोक्याचा कारभार साफ उधळून टाकण्याचा नानांनीं चंग बांधला. चिमाजी अप्पाला गादीवर बसवून भाऊ कारभारी झाले; पण

हा कारभार सुरळीत चालू शकला नाहीं. नानांनीं पुण्याहून पलायन करून महाड गांठलें व तेथें जाग्यावर बसून आपल्या बुद्धीच्या जोरावर पुण्याचा परशुरामभाऊंचा कारभार साफ उडवून दिला व भाऊ आणि त्यांचे साथीदार बाळोबा तात्या यांना तुरुंगाची हवा दाखविली. या झटापटींत नाना व भाऊ यांचें भयंकर वांकडे येऊन दोघांनीं एकमेकांचा सत्यनाश करण्याचे अनेक उद्योग केले. या कटकटींना भाऊ इतके कंटाळले कीं एकेठिकाणीं त्यांनींच लिहिलें कीं " हा थोर कारभार, ओझें उचलत नाहीं; मोरोबास द्यावा व आपण मोकळें व्हावें. " ( खरे ९-३८२० ) तात्पर्य कठोर राजकारणांत भाऊ तितकेसे वाकबगार नसल्यामुळें नानांशीं मतभेदाचा प्रसंग येतांच लष्करी पेशाच्या भाऊंना जीव नकोसा झाला; एरवीं भाऊ व नाना यांचे संबंध किती प्रेमळ होते हें प्रसिद्धच आहे. नानांचा सर्व भार परशुरामभाऊंवर होता. नाना म्हणतील ती कामगिरी भाऊ उठवीत होते. सर्व जन्मभर एकमेकांच्या जिवास जीव देणारे हे दोन्ही थोर पुरुष राजकारणांत मतभेद झाल्याबरोबर एकमेकांचा जीव घेण्यास प्रवृत्त झाले. यावरून राजकारण हें किती कठोर असतें हें स्पष्ट होतें *

असो. राज्यकारभारांत माणसाला पुष्कळ वेळां मनाला न पटणाऱ्या गोष्टी कर्तव्य म्हणून कराव्या लागतात. अशा वेळीं चांगल्या माणसाच्या हातूनहि कांहीं चुका होतात. परशुरामभाऊंच्या चुकांकडे याच दृष्टीनें पाहिलें पाहिजे. टिपूवरील मोहिमेंत भाऊबरोबर हजर असलेल्या मूर साहेबानेंहि भाऊंच्या चुकां संबंधानें असेंच लिहिलें आहे तो म्हणतो—

" Doing his duty as a general, a statesman and a patriot, was frequently repugment to his ( Bhau's ) feelings and created a pang in his bosom as a man.

---

* ( टीप:—नाना परशुरामभाऊंना किती मानीत होते या संबंधानें खालील प्रमाणें एक उल्लेख आहे. " नाना हजामतीस बसले असतां भाऊ आले. नानांनीं नखें काढावयाचीं होतीं तसेंच उठून स्वागत केलें. " ( खरे ७–२५१५ )

This, in general should be admitted and the more readily in a particular case where a variety of circumstances, enforce it. The Bhau, where he is best known is most respected and by the inhabitants of his districts more than usually beloved. This is perhaps a pretty sure criterion to judge by as it denotes a disposition for affability and temper, the reverse of oppression." ( Muir's Narrative—P. 388 - 89 )

परशुरामभाऊंच्या गुणावगुणांचा एकंदर विचार करतां भाऊंच्या अंगीं दोषां पेक्षां गूणच ज्यास्त होते यांत शंका नाहीं. या नश्वर जगांत अखंड टिकणारी कोणती वस्तु असेल तर ती माणसाच्या आंगचे गूण होच होय. कैक राज्यें येवोत, कैक जावोत, राज्यांचे उदयास्त झाले तरी नवीन पिढीला स्फूर्ति दायक असे हीं राज्यें चालविणाऱ्या माणसांच्या आंगचे गूण हेच होत. कालाच्या ओघाबरोबर राज्यें चालविण्याच्या साधनांतहि सारखा फरक होत आहे परशुरामभाऊंनीं जें केलें तेंच आज करावें कसें कोणीच म्हणणार नाहीं ; पण आज विमान चालविण्याला जें धाडस लागतें त्यापेक्षां परशुरामभाऊंच्या काळांत भाला, बरची, बंदूक व तरवार चालविण्याला लागणारें धाडस कमी प्रतीचें होतें असें खास म्हणतां येणार नाहीं. कोणतेंहि राज्य गुणी माणसांच्या जोरावरच चालतें. अशा ज्या गुणवान् आणि थोर माणसांची परंपरा मराठी राज्याला लाभली त्यांतच परशुरामभाऊंची गणना असल्यामुळें भाऊंचें चरित्र हें आज बदललेल्या काळांतील पिढीलाहि स्फूर्तिदायक असेंच आहे. शौर्य, साहस, धाडस, बुद्धिमत्ता, राजकारण पटुत्व नीतिमत्ता हे गूण अंगीं असलेलीं माणसें जोंपर्यंत मराठे शाहींत होतीं तोंपर्यंत मराठ्याचें राज्य चाललें. महादजी शिंदे, हरीपंत फडके, परशुरामभाऊ व नाना फडणीस हीं थोर माणसें हयात असेपर्यंत कावेबाज व चतुर इंग्रजांनींहि त्यांच्यापुढें हात टेंकले. भाऊनंतर लौकरच नानाहि वारले व मराठे

शाहीची नीतिमत्ता, चातुर्य ( wisdom and moderation ) नाना बरोबरच खलास झालीं असें इंग्रजांनींच लिहून ठेविलें आहे.*

धाकटे बाजीराव व दौलतराव शिंदे हे मराठेशाहीचे धनी झाल्यावर राज्याचें वाटोळें होण्यास वेळ लागला नाहीं यांत कांहीं आश्चर्य नाहीं ; पण याचाच अर्थ असा कीं न्याय नीतिमत्ता जोंपर्यंत मराठेशाहींत होती तोंपर्यंत मराठी राज्य टिकलें व नीति खलास झाल्यावर तें बुडालें अशा नीतिमान् माणसांपैकींच परशुरामभाऊ असल्यामुळें त्यांच्या चरित्राकडे पहाणें पुढच्या पिढीस अत्यंत जरूर आहे. मराठ्यांना कांहीं लोकांनीं रानटी म्हटलें तरी त्यांच्या राज्याचा पाया सद्गुणावरच उभारलेला होता ही गोष्ट एका इंग्रज इतिहासकारानेंच लिहून ठेविली आहे. तो उतारा देऊन परशुरामभाऊंचें हें चरित्र पूर्ण करूं मूर साहेबानें आपल्या ग्रंथामध्यें डॉव साहेबाच्या इतिहासाच्या तिसऱ्या खंडांतून हा उतारा घेतला आहे.

" The Marathas who have been represented as barbarians, are a great and rising people subject to regular Government the principles of which are founded on Virtue. ' ( Muir's Narrative P. 240-41 )

---

*(टीपः—नानाच्या मरणाची बातमी देतांना इंग्रजांचा वकील पामर म्हणतो, "With him (Nana) was departed all the wisdom and moderation of this Govt. (Maratha Govt.) (P. R. C. 6-331)

समाप्त

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. C 0 8 2
REFBK-0008043

[illegible]

(टीप पृष्ठ २४१ वरून चालू)

आतां पू. रे. रे. वरून स्पष्ट होत आहे. पू. रे. रे. च्या दुसऱ्या ग्रंथाचे प्रस्तावनाकार रा. सा. सरदेसाई यांनीं आपल्या प्रस्तावनेंत असें लिहिलें आहे कीं महादजीचा पुण्यास येण्यांचा हेतू मराठे शाहीची घडी नीट बसविण्याचा होता ; पण नानानें आपलें महत्व कमी होईल या भीतीनें महादजीस तसें करूं दिलें नाहीं. सरदेसायांच्या या विधानांना पू. रे. रे. मध्यें कांहीहि आधार नाहीं. आधार आहेत ते सरदेसाई यांच्या विधानांच्या उलट अर्थाचे मात्र आहेत. पुणें दरबारांत आपल्याला महत्वाचें स्थान असावें असें शिंद्याला वाटत असल्याचें एका पत्रांत आढळतें. ( P. R. C. २-५९ ) धाकटचा बाजीरावाला सवाई माधवराचा दिवाण नेमावें व त्याचा नायब दिवाण आपण व्हावें अशी खटपट वडगांवच्या तहांत महादजीनें केली होती असें मॅलेटनें एका पत्रांत लिहिलें आहे. (P. R. C. २-५८) सत्तेचा अभिलाष व पेशव्यांजवळ वर्चस्व हे महादजीचें पुण्यास येण्याचे हेतू होते असें दुसऱ्या एका पत्रांत लिहिलें आहे. (P. R. C. २-१७०) सर जॉन शोअरनें तर असें लिहिलें आहे कीं टिपूवरील मोहिमेंत मराठ्यांना जो मुलूख मिळाला त्यांत आपण वांटा मागावा व उत्तर हिन्दुस्थानांत पेशव्यांकडून आपणाला सर्वाधिकार मिळवावा अशी खटपट करण्याकरितां महादजी पुण्यास आला होता. ( P. R. C. २-२२३ ) तात्पर्य मराठेशाहीची घडी नीट बसविण्या ऐवजीं नानाच्या कारभाराची उलथापालथ करण्याचीच खटपट महादजीस पुण्यास येऊन करावयाची होती हें पू. रे. पत्रव्यवहारावरून स्पष्ट दिसतें. पुणें दरबारला महादजीच्या या कारस्थानाची शंका होतीच. म्हणून हरीपंतानें टिपूवरील मोहिमेवरून परत फिरतांना कॉर्नवॉलीसजवळ हा प्रश्न काढला होता. महादजी पुण्यास येऊन कांहीं गडबड करील तर इंग्रज त्याला मदत करतील कीं काय असें हरीपंतानें विचारल्यावरून कॉर्नवॉलीसनें उत्तर दिलें कीं, पेशवे, मित्र या नात्यानें आमच्याकडे मागणी करतील तरच आम्ही या नगडींत पडूं. कार्नवॉलीसचें हें उत्तर त्यानें आपला

(टीप पृष्ठ २४१ वरून चालू)

आतां पू. रे. रे. वरून स्पष्ट होत आहे. पू. रे. रे. च्या दुसऱ्या ग्रंथाचे प्रस्तावनाकार रा. सा. सरदेसाई यांनीं आपल्या प्रस्तावनेंत असें लिहिलें आहे कीं महादजीचा पुण्यास येण्यांचा हेतू मराठे शाहीची घडी नीट बसविण्याचा होता ; पण नानानें आपलें महत्व कमी होईल या भीतीनें महादजीस तसें करूं दिलें नाहीं. सरदेसायांच्या या विधानांना पू. रे. रे. मध्यें कांहीहि आधार नाहीं. आधार आहेत ते सरदेसाई यांच्या विधानांच्या उलट अर्थाचे मात्र आहेत. पुणें दरबारांत आपल्याला महत्वाचें स्थान असावें असें शिद्याला वाटत असल्याचें एका पत्रांत आढळतें. ( P. R. C. २-५९ ) धाकटचा बाजीरावाला सवाई माधवराचा दिवाण नेमावें व त्याचा नायब दिवाण आपण व्हावें अशी खटपट वडगांवच्या तहांत महादजीनें केली होती असें मॅलेटनें एका पत्रांत लिहिलें आहे. (P. R. C. २-५८) सत्तेचा अभिलाष व पेशव्यांजवळ वर्चस्व हे महादजीचें पुण्यास येण्याचे हेतू होते असें दुसऱ्या एका पत्रांत लिहिलें आहे. (P. R. C. २-१७०) सर जॉन शोअरनें तर असें लिहिलें आहे कीं टिपूवरील मोहिमेंत मराठ्यांना जो मुलूख मिळाला त्यांत आपण वांटा मागावा व उत्तर हिन्दुस्थानांत पेशव्यांकडून आपणाला सर्वाधिकार मिळवावा अशी खटपट करण्याकरितां महादजी पुण्यास आला होता. ( P. R. C. २-२२३ ) तात्पर्य मराठेशाहीची घडी नीट बसविण्या ऐवजीं नानाच्या कारभाराची उलथापालथ करण्याचीच खटपट महादजीस पुण्यास येऊन करावयाची होती हें पू. रे. पत्रव्यवहारावरून स्पष्ट दिसतें. पुणें दरबारला महादजीच्या या कारस्थानाची शंका होतीच. म्हणून हरीपंतानें टिपूवरील मोहिमेवरून परत फिरतांना कॉर्नवॉलीसजवळ हा प्रश्न काढला होता. महादजी पुण्यास येऊन कांहीं गडबड करील तर इंग्रज त्याला मदत करतील कीं काय असें हरीपंतानें विचारल्यावरून कॉर्नवॉलीसनें उत्तर दिलें कीं, पेशवे, मित्र या नात्यानें आमच्याकडे मागणी करतील तरच भाआम्ही या नगडींत पडूं. कार्नवॉलीसचें हें उत्तर त्यानें आपला